वर्ष अगाऊ किंमत वर्षाची १ रुपया दुसरें

सत्य शांति साहित्य

# सद्धर्मदीप.

श्रावण शके १८०१

अंक १

मार्गे मार्गे निर्मलं साधुवृंदं । वृंदे वृंदे तत्वचिंतानुवा :
वादे वादे जायते तत्वबोधो । बोधे बोधे सच्चिदानं



अलीबाग
'सत्यसदन' छापखान्यांत छापिलें

फुटकळ अंकाची किंमत चार आणे

पुस्तकाची किंमती शिवाय टपालखर्चाबद्दल प्रत्येक अंकास अर्धा आणा जास्त पडेल

टिळक ग्रंथसंग्रहालय
दा. क्र. १५७८३
वाई जि. सातारा

# सद्धर्मदीप.

अंक १

## ईशसत्ता.

सर्व जगाचा नियंता, निर्गुण, निर्विकार, व सर्वत्रांचें पालन करणारा असा जो जगदेक प्रभु, ज्याचे सत्ते वांचून स्थिरचरादि वस्तूंचे व्यापार चालत नाहींत, जगांतील अनेक उलाढाली घडण्यासाहि ज्याची सत्ताच कारण आहे, रावाचा रंक व रंकाचा राव करणें हें ज्याच्या कोपाचें व प्रसादाचें फळ होय, सर्व विश्वास व्यापूनहि जो शेष उरला आहे, नभोमंडळांतील चंद्र, सूर्य व तारे हे ज्याच्या सत्तेनें उदय आणि अस्त पावतात, ज्याच्या अतर्क्य चरित्रांचें वर्णन करतांना महान पूज्य विद्वानांनींहि बोटें टेंकलीं, जो नाना वेषधारी, जगांतील अनेक दृश्यमान वस्तूंवरून ज्याचें अस्तित्व सहज सिद्ध करतां येतें, आणि त्याच वस्तूंचा नाशिवंतपणा मनांत आणून व कार्यकारण भाव संबंधावरून ज्याच्या स्वरूपा विषयीं चित्ताला व्यामोह उत्पन्न होतो, जो अनेक प्रमाणांवरून सिद्ध करतां येत असल्यामुळें आहे सारखा व अनेक प्रमाणांवरून नाहीं सारखा भासून जगांतील अनेक मतभेदांचा प्राधान्य विषय बनला आहे, जो सर्व जगाचा चालक व सूत्रधार असून स्वत: त्यापासून निराळा आहे, जो वादविवादाविषयीं अखंड विषयक, भक्तांना अभीष्ट देणारा, सद्धर्मरक्षक व उपासक यांचा कल्याणकर्ता, अधर्मप्रेरकांचा शास्ता, अनंत शक्तिमान, दयालू, अपूर्व व अद्वितीय, असा जो महासमर्थ ईश्वर त्यास अनंत नमस्कार असोत.

भो आर्य बांधव हो, परम दयाळू जो ईश्वर, अति पवित्र व सत्य असा जो आर्यधर्म, अनुपम प्रीतीविषयीं पात्र असा जो आपला हा आर्यावर्त, आणि स्नेहसंपादनास योग्य व सदसद्विचाराविषयीं समर्थ असे जे हे

आर्यबांधव, या सर्वांविषयीं यथामति विचार सादर करण्याचें मनांत आणून हें लहानसें पुस्तक प्रतिमासीं प्रसिद्ध करण्याची सुरवात केली. पुढें या कृत्यास देशबांधवांकडून जी मदत मिळाली, व असल विचार वाचणे, ऐकणे आणि त्यांचे मनन करणें याविषयीं लोकांची जी जिज्ञासा दिसून आली त्याजवरून आपलें काम अंशतः तरी लोकांस पसंत पडून ते आपणास उत्तेजन देत आहेत हें पाहून फार समाधान वाटलें. व हा क्रम सतत चालविण्या विषयीं उत्साह बुद्धी उत्पन्न झाली.

परमेश्वर कृपेनें या पुस्तकाचें एक वर्ष पुरें होऊन दुसरे वर्षाला सुरवात झाली आहे. प्रत्येक गोष्टीचे आरंभीं ईश्वाराचें स्मरण करून व त्याची "कर्तुमकर्तु अन्यथा कर्तु" ही शक्ति मनांत आणून आपले हातून अहंपणादि मनोविकारां पासून उत्पन्न होणारे जे उन्माद ते न होऊं देण्याविषयीं आणि झालेले असतील त्यांची क्षमा करण्या विषयीं ईश्वराची प्रार्थना करणें हा मनुष्याचा धर्म होय. याकरितां तसें करणें योग्य जाणून या ठिकाणीं चार शब्द लिहिले आहेत. ज्या प्रमाणें गतवर्षी आह्मी आपल्या देशबांधवांची सेवा अल्प वार्षिक वेतनानें बजाविण्यास प्रवृत्त झालों व ती परमेश्वराच्या कृपेनें शेवटास नेली, तद्वत या सालींहि आह्मी केलेला आरंभ नियमित वेळीं व योग्य रीतीनें परमेश्वरानें शेवटास न्यावा अशी त्याची प्रार्थना आहे. आह्मी मनुष्यें जें कांहीं करतों, लिहितों, बोलतों, पहातों, ऐकतों, व मनन करतों, ही सर्व त्या जगदीश्वराची सत्ता होय. एका कवीने ह्मटलें आहे.—

अवघा बोले चाले हरी। ज्याची कथा तोची करी॥
होवोनीयां श्रोता वक्ता। करी आपुली आपण कथा॥

तेव्हां असा सर्व शक्तिमान व सर्व सत्तात्मक जो प्रभु त्यास विसरणें हें महत्पाप होय. असें सर्वत्रांनीं ध्यानांत ठेवून ऐहिक व्यवहार चालवावे,

# नामसंकीर्तन

नामसंकीर्तन साधन हें सोपें ॥ जळतील पापें जन्मांतरीचीं ॥
(तुकाराम)

गतवर्षाच्या तिसऱ्या अंकांत ' नवविधा भक्ति ' या विषयावर काहीं विचार वाचकांस सादर करून त्या नवविधा भक्तींतहि अमुक भक्ति श्रेष्ठ व अमुक कनिष्ट असा कित्येक लोकांनीं दुराग्रह माजवून व आपले मतास कांहीं साधक प्रमाणें घेऊन भक्तिमार्गांतील सरळ व साधे पणाचा पूर्वांपार संबंध मनांत न आणतां कसा घोटाळा केला आहे व त्या योगाने लोकांत द्वैतभाव आणि अज्ञान कसें माजत चाललें आहे या विषयीं कांहीं विचार करण्याचें अभिवचन दिलें होतें. त्या प्रमाणें आजच्या प्रसंगीं ' नामसंकीर्तना' विषयीं चार शब्द लिहूं.

या नवविधा भक्तिमार्गाचा अन्योन्य संबंध असा कांहीं निकट आहे कीं, त्यांतील एका विषयीं विचार करूं लागलें ह्मणजे ओघानें सहज अन्य मार्गाचे विवेचनाचा त्यांत संबंध येतोच. या करितां आज जरी आह्मी या एकाच भक्तिमार्गा विषयीं विचार करणार आहों,तथापि त्यापासून सहाजीक त्यांत इतर भक्तिमार्गांविषयींहि लिहावें लागणार आहेच. आतां या नामसंकीर्तनाच्या श्रेष्ठत्वाबद्दल मोठमोठ्या जबरदस्त पंडितांनीं शेरे मारून ठेविले आहेत. या जगांत अज्ञानी लोकांचा भरणा फार असल्यामुळें त्यांची स्थिति शुद्ध मेंढरांसारखी असते. एखादा पुढारी होऊन तो एखाद्या मार्गानें जाऊं लागला ह्मणजे ही मंडळी आपली त्याचे पाठीमागून जाणार. मग त्यांत आपण खाड्यांत पडत आहों किंवा आपले बचावाचा त्या गोष्टींत कांहीं मार्ग आहे याचा विचार देखील करावयाचा नाहीं. लोकांचा भरंवसा बहुधा जुन्यावर फार असतो यामुळें एखादा नवीन पंथ उपस्थित करावयाचा झाला, किंवा चालू असलेले कित्येक गोष्टींत कांहीं फेरफार करावयाचा झाला ह्मणजे आपले मतास

साधक अशीं कांहीं जुनाट ग्रंथांतील वचनें काढावीं, तशीं न निघतील तर कांहीं पदरचीं तयार करून तीं जुन्या ग्रंथांचे नांवावर विकावीं, आणि अशा योगानें आपल्या मताचा मोठेपणा फुगवून लोकांस नादीं लावावें, असा प्रकार बहुधा शहाण्या म्हणविणारे लोकांचा असतो. मिळून कोणीकडून तरी आपलें घोडें जाईल तितकें पुढें ढकलण्याचा मनुष्य यत्न करितो. थोडे दिवसां पूर्वीं आमच्या सरकारनें या देशांतील वर्तमान पत्रिकांस निस्पृह उपदेशकत्वाची दिलेली देणगी परत घेण्याचे संबंधांत जो कायदा प्रसिद्ध केला तो करण्यास कित्येक वर्तमान पत्रांतील मजकुराची आगा पिच्छा सोडून देऊन मधलींच वाक्यें घेतलीं, व तीं राजभक्तीला अनुचित असें दाखवून या देशांतील लोकांचा राज्यद्रोह व्यक्त करून दाखविला, तसाच प्रकार हल्लींच्या या नवीन पंथांत होतो, आता वरील कायदा हा व्यवहारिक असल्यामुळें त्याजपासून होणारा नाश अल्पकालीन असतो, परंतु या ईश्वरभक्तीच्या व पारमार्थिक कल्याणाच्या खऱ्या मार्गापासून लोकांस पराङ्मुख केल्यानें ते चिरकालिक सुखास आंचवतात. पण हा विचार ते धूर्त उत्पादक करतील ही आशा नाहीं. लोकांनींच प्रत्येक गोष्टीचा सारासार विचार केला पाहिजे. असो आतां या नामसंकीर्तनाचे श्रेष्ठत्वा बद्दल प्रथम आमचे भागवत्कारांनींच एक शेरा मारला आहे. तो हा—

कृते यत् ध्यायते विष्णुं । त्रेतायां जयते मखैः॥
द्वापरे परिचर्यायां । कलौतद्धरिकीर्तनात् ॥

"कृतयुगाचे ठायीं ध्यान धारणादिकानें, त्रेतायुगांत यज्ञयागादिकानें, द्वापार युगांत सेवादिक धर्मानें, आणि कलियुगांत नामसंकीर्तनानें ईश्वराची प्राप्ती होते" आतां या युगांचे भिन्नते विषयीं विचार करूं लागलें असतां त्यांत ईश्वराचें स्वरूप बदलतें, किंवा तो आपला व्यापार सोडून देतो, अथवा जगांतील व्यापार तो बंद करतो, असें कांहींच घडत

नाहीं. ईश्वराच्या स्वरूपांत, सामर्थ्यांत व महत्वांत युगपरत्वानें कांहीं देखील फरक होत नाहीं. या युगांचे भेद मनुष्याच्या ज्ञानावर, कर्तृत्वावर, आचरणावर आणि योग्यतेवर अवलंबून आहेत. आणि वर जे ईश्वराचे भक्तिमार्गांत कांहीं निरनिराळे भेद आहेत तेंहि काळानुकूलते प्रमाणें अयोग्य ह्मणतां येत नाहींत. पण त्याचा वास्तविक अर्थ समजला पाहिजे. ह्मणजे मग तरी अशा ठोकळ मतभेदाकडे लक्ष दिल्यास हरकत नाहीं नामसंकीर्तना बद्दल आणखी एका कवीनें ह्मटलें आहे.

हरेर्नामैव नामैव नामैव ममजीवनं ॥
कालौ नास्त्येव नास्त्येव नास्त्येव गतिरन्यथा ॥

"कलियुगामध्यें नामसंकीर्तना वांचून ईश्वर प्राप्तिला दुसरी गतीच नाहीं"

कलियुगीं साधन नामचि सार ॥
जपतप साधन कांहीं न जाणे ॥ नलगे सगुणविचार ॥

तेव्हां या युगामध्यें नामसंकीर्तन हेंच श्रेष्ट धरलें आहे. आतां ईश्वर कधीं कोणाला असें ह्मणत नाहीं कीं, अमुकच रस्त्यानें तुह्मी आलां तर तुह्मास मी आपल्या दरबारांत घेईन, आणि अमुक रस्त्यानें आलां तर घेणार नाहीं. त्याच्या दरबाराच्या दाही दिशा मोकळया आहेत. मात्र त्याची ओळख पटली पाहिजे. डोई मुंडून आणि दाढी वाढवून इंद्रियांचा छेद केला होत्साता मशिदींत गुडघे टेंकून "ला इला इलल्ला महंमदया रसूलल्ला" या सूक्ताचा जप करील तरच त्यास ईश्वरप्राप्ती होईल, किंवा सर्वांगाला भस्माचे पट्टे ओढून भराभर रुद्राक्षाच्या माळा गळ्यांत ओडकवून मोठ्या अगडबंब मूर्तींची पूजा करतांना नाक कान धरून "र्‍हां र्‍हीं र्‍हूं" या मंत्राचा जप करील तरच तो ईश्वराचा प्रिय होईल, किंवा सहकुटुंब सहपरिवार एखाद्या सुंदर बगिच्यांतील रमणिय हवेलींत पलंट

णी च्या लोकांसारखे उभे राहून छानछोक पोशाखानें व मोठ्या थाटानें नटून वर डोळे लाऊन "हे आकाशांतल्या बापा, हे तारणाऱ्या" अशा चातक पक्षासारख्या हांका मारल्या तरच त्या प्रभुला ऐकूं जाऊन तो दया करील असा प्रकार मुळींच नाहीं. या सर्व मनुष्याच्या कल्पना, दुराग्रह, व दंभ आहे. स्वस्थचित्त होत्साता बसल्या ठिकाणींच अंतःकरण पूर्वक ईश्वराची अनुपमेय शक्ति व त्याची अतर्क्य लीला आठवून आपल्या यःकश्चित्पणा पासून व अज्ञानाचे योगानें आपल्या हातून ज्या चुका झाल्या असतील त्यांची पश्चात्ताप पूर्वक क्षमा करण्याविषयीं त्याची प्रार्थना करणें हेंच खरें नामसंकीर्तन होय. त्याकरितां प्रार्थना समाज मंदिरांत जावयास नको, मशिदी सोधावयाला नकोत, जंगलें धुंडावयास नकोत, व कांहीं खटपट नको.

ठायींच बैसोनी करा येकचित ॥ आवडी अनंत आळवावा ॥
नलगे सायास जाणे वनांतरा ॥ सुखें येतो घरा नारायण ॥
योग याग विधी येणें नोहे सिद्धी ॥ वायांची उपाधी दंभधर्म ॥

मिळून सर्वांचे अशाच प्रकारचे शेरे आहेत. जो तो या नामसंकीर्तनाचीच प्रशंसा करतो. पंतांनीं ह्मटलें आहे.—

नलगे व्याकरण्याची । न्यायाची घटपटादि खपपटती ॥
वैकुंठ पेठ मोठी। नामावर हीन दीन खट पटती ॥

नामसंकीर्तन तरी नवविधा भक्ती पैकींच एक मार्ग आहे. आतां कांहीं लोकांचें असें ह्मणणें पडतें कीं आह्मी नवविधा भक्तीविक्ती कांहीं जाणत नाहीं. आह्माला तेवढें 'हरिहरि' ह्मणावयाचें ठाऊक आहे. त्यांतच परमेश्वर आमच्यावर कृपा करावयाची असली तर करील. असें बहुत लोकांचें ह्मणणें असतें, पण तें भ्रांतीमूलक व चुकीचें आहे. कारण पूर्वोक्त नवां पैकीं आद्य जी श्रवण भक्ति तिच्यावांचून नामसंकीर्तनाची इच्छाच उत्पन्न होणार नाहीं. तसेंच नामसंकीर्तनास ज्ञानादिकांहि अवश्य

पाहिजेत नाहीं पेक्षां त्या ज्ञानसंकीर्तना पासून खरा उपयोग होणार नाहीं. अग्नीची क्रिया ह्मटली ह्मणजे कोणत्याहि पदार्थाला स्पर्श होतांच जाळून टाकणें ही होय, तद्वत हरिनामानें पातकांचा नाश होत असल्या मुळें तें कसें जरी ह्मटलें तरी सारखेंच असें कित्येकांचें ह्मणणें आहे. कारण वामनांनीं नामसुधेंत ह्मटलें आहे—

न कळतां पद अग्निवरी पडे।
न करि दाह असें न कधीं घडे॥
अजित नाम वदो मलशा मिसें।
सकळ पातक भस्म करीतसे॥

तेव्हां याजवरून भगवन्नाम ग्रहणास ज्ञानादिकांची गरज काय असा प्रश्न उत्पन्न होतो, पण तो यथार्थ नाहीं. या संबंधानें आह्मी एक गोष्ट ऐकलेली स्मरते, ती या ठिकाणी सांगितली असतां अप्रासंगिक होणार नाहीं असें जाणून सांगतों.

काशिक्षेत्रामध्यें येक तरुण व रूपसंपन्न वेश्या राहात असे. तिच्याच शेजारीं एक ज्ञानी विरागी पुरुष अल्पवयांतच चतुर्थाश्रम धारण करून मठांत राहात असे. गंगेवर जाण्याचा मार्ग या वेश्येचे दारावरून असल्या मुळें तो संन्याशी सुप्रभातीं नेहमी स्नानास जात असे. दिवस थंडीचे असून हा विरागी पुरुष असा उघडा बोडका कुडकुडत सकाळचे प्रहरीं थंड पाण्यांत नित्य स्नान कां करितो याचें इंगित तिला कळेना. खरें आहे, शाल जोडीचा बुरखा मारून प्रहरदिवस येई पर्यंत खुशाल छप्पर पलंगावर निजून राहणारी वेश्या तिला ही तापसी वृत्ती कशानें कळणार? आसो तिणें असा निश्चय केला कीं, या संन्याशास या दुःखकारक स्थितींतून काढून विषय सुखाचें महत्व त्यास प्रकट करून कांहीं दिवस आपले संगतीस ठेवावा. ती वेश्या मोठी चतुर होती. दुसरे दिवशीं तिणें सकाळींच उठून त्या संन्यासी बोवांचा रस्ता आडवून धरला. नित्या प्रमाणें संन्यासी तिचे

घरावरून जात असतां वेश्येनें त्यांस नमस्कार करून उभें राहण्याविषयीं विनंती केली. स्वामी उभे राहिल्यावर ती ह्मणाली—स्वामी महाराज, आपण नित्यश: अशा ऐन थंडीचे वेळीं भागीरथीचे शीतोदकाचें स्नान करितां याचें कारण काय? तसेच आपण त्या कंटाळवाण्या मठांत एकटे पडून राहून आयुष्याचे दिवस उदास वृत्तीनें व्यर्थ घालवितां याचें तरी कारण काय? आपणापाशीं द्रव्य वगैरे नसेल तर त्याची कांहीं काळजी न करितां आपण माझ्या येथें चलावें. मी आपली मनोभावें सेवा करून सर्व इच्छा तृप्त करीन. आतां आपण ह्मणाल कीं, विषयादिक भोग हे पापकारक आहेत, तेव्हां त्या पासून दूर असावें. पण ही आपली समजूत चुकीची आहे. कारण, आपण भागीरथीचे संन्निध राहत असून पापाचे पर्वत असले तरी तिच्या उदकस्पर्शानें भस्म होतात अशी प्रसिद्धी आहे. तेव्हां आपण उभयतां सुखोपभोग घेऊन नंतर एकदां भागीरथीचें स्नान करूं ह्मणजे मुक्तीस जाऊं. आपण नेहमी शरीराला अशी पीडा दिलीत तथापि शेवटीं तीच गती आहे मग उगाच दु:ख कां भोगितां?—त्या वेश्येचा सर्व भाव जाणून स्वामींनीं याचें उत्तर उद्यां देईन असें सांगून गंगेवर गेले. त्या वेश्येच्या मायिक उपदेशानें त्यांच्या चित्ताला लेशमात्रहि विकार झाला नाहीं. ते ज्ञानी विरागी असून त्यांस अनुभव घडलेला असल्यामुळें त्यांची चित्तवृत्ती भगवत् स्वरूपीं दृढतर जडली होती, स्वामींचा चतुर्थाश्रम दांभिक नव्हता. नाहीं पेक्षां "व्याज नारायण, मुद्दल नारायण" असा जप करणारे संन्याशी गांवगन्ना दृष्टीस पडतात. एका कवीनें ह्मटलें आहे—

डोई मुंडुनी । भगवें गुंडुनी ॥

मन हें विषय सुखांत रतावें ॥ या संन्याशा काय ह्मणावें ॥

तेव्हां स्वामीचें आश्रम धारण असें कधें नव्हतें. त्यांस विषयसुखाचा तिटस्कारा येऊन त्यापासून ते पराङ्मुख झाले होते, तेव्हां ते या वेश्येच्या स्वरूपास व संपत्तीस भुलणारा कोठून? खरेंच आहे रत्नपारखी

आहे तो मोठी चकचकीत गारगोटी दृष्टीस पडली ह्मणून त्यास हिरा ह्मणेल काय? खोटें मोंतो दिसण्यांत मोठें पाणीदार व गोलदार असतें ह्मणून तें मोलाला चढतें काय? तद्वत नश्वर जे विषयादिक त्यांस ज्ञानी आहे तो भुलणार नाहीं. स्वामींची वृत्तीहि अशीच होती. असो, दुसरे दिवशीं स्वामींनीं जातांना बरोबर कांहीं कापूस घेतला. त्या पैकीं कांहीं तशाच गांठी होत्या व कांहीं चांगला पिंजरून स्वच्छ केला होता. स्वामी वेश्येचे घराशीं गेले तों ती वाटच पहात होती. ती स्वामीस माडीवर घेऊन गेली व कालचे प्रश्नाचें उत्तर काय तें सांगावें ह्मणून विनंति केली. स्वामींनीं तिच्या पुढें तो कापूस टाकला, पण त्यापासून तिला कांहीं बोध होईना. तेव्हां स्वामींनीं तिला दिवा घेऊन येण्या विषयीं सांगितलें व तो त्या गांठीच्या कापसास लावला पण तो चांगला पेटेना. धुमसत धुमसत जळूं लागला, पुढें त्या पिंजरून लख्ख केले ल्यां कापसास लावतांच तो भरकन जळून गेला. नंतर त्यांणीं त्या वे-श्येला सांगितलें कीं, गंगास्नानानें व काशीवासानें आपण उभयतांहि मुक्तीस जाणार हें खरें, पण विषयोपभोगापासून ज्याचें चित मलीन झालें असेल तो या गांठीच्या कापसा प्रमाणें अनेक जन्म घिरट्या घालून शेवटीं गेला तर तडीस जाईल नाहींपेक्षा मध्येंच विझून जाईल. पण पिंजरलेला कापूस अग्निस्पर्श होतांच जसा अग्नीरूप बनला, तद्वत शुद्धाचरणानें ज्याची चित्तशुद्धी झाली असते व विषयादि कचरा काढून टाकून ज्याचें अंतकरण शुद्ध झालें असतें, त्यास भगवदनुग्रहाचा लाभ होतांच तो तद्रूप बनुन जातो. तेव्हां आतां तूंच सांग कीं, तुझ्या संगतीनें मी आपलें चित्त मलीन करावें, किंवा विशेष शुद्धीचा मार्ग धरावा? स्वामींच्या मार्मिक उपदेशानें त्या वेश्येला उपरती होऊन लज्जाहि उत्पन्न झाली व हाच आपला गुरु असें जाणून तिणें स्वामींचे चरण धरले, आणि त्या दिवसापासून ती सन्मार्गानें वागूं लागली.

तेव्हां याजवरून काय समजावयाचें कीं, ज्ञानावांचून भक्तिमार्ग हे व्यर्थ आहेत. नामसंकीर्तनाला ज्ञानाची अवश्यकता आहे. आतां नुसतें 'हरी हरी' जरी केवळ फुकट जाणार नाहीं तथापि तें भारवाहका प्रमाणें होय. बैलाचे पाठीवर जशा साखरेच्या गोणी तद्वत अज्ञानी मनुष्यास हे मार्ग आहेत. त्यांत इतकेंच कीं, लांकडाच्या मोळया किंवा शेणाच्या गोणी लादण्यानें जीं खटें पडतील तीं साखरेपासून पडणार नाहींत. असो तेव्हां या नामसंकीर्तनास ज्ञानादिकाची जरूर आहे. " अजितनाम वदो भलत्या मिसें सकळ पातक भस्म करीतसे" हें जरी खरें आहे, तथापि ज्ञाना वांचून विंचरलेल्या कापसा सारखी स्थिती होणार नाहीं. साधारण व्यवहारिक गोष्टी या देखील जर ज्ञाना वांचून सिद्धीस जात नाहींत, तर मग प्रत्यक्ष ईश्वर प्राप्तीला तर तें किती अवश्य आहे याचा विचार करणें फारसें अवघड नाहीं. परंतु अलीकडे या नामसंकीर्तनाचीहि इतर पूजादि भक्तिमार्गा प्रमाणेंच दुर्दशा झाली आहे. ह्मणजे त्याजबद्दल लोकांच्या भलभलत्याच समजुती होऊन त्या नामसंकीर्तनाचें रूपांतर झालेलें दिसतें. ज्याप्रमाणें यज्ञयागादिक करावयाचीं असलीं ह्मणजे स्रुची, स्रुवा, यज्ञमंडप, होमकुंडें, ऋत्विज, यज्ञपशू, वेदी, इत्यादिक सामान लागतें त्याचप्रमाणें या नामसंकीर्तनाचीहि स्थिति झाली आहे. या नामसंकीर्तनासहि, टाळ, तंबुरा, ढोलकी, चिपळ्या, चाळ, नाचणारे व गवई इत्यादि सर्व सरमजाम पाहिजे. यामध्यें आणखी सप्ताह, वाऱ्या, वगैरे नियमीत व वार्षिक प्रकार उत्पन्न होऊन सर्व दम माजून गेलें आहे. ईश्वराचें नाव घेण्याचा उद्देश या भजनवाल्या मंडळींत थोडक्यांचाच असेल. ''ज्ञानदेव तुकाराम, ज्ञानोबा तुकाराम" असा जप धरून घटका घटका ओरडावें व नीट तालावर आणि सुस्वर गाऊन पायांत चाळ बांधून नाच्या पोऱ्या सारखें नाचावें यास नामसंकीर्तन असें ज्ञानी आहे तो ह्मणणार नाहीं. आतां इतकेंच कीं, हा

एक कर्मणुकीचा मार्ग असून दुराचरणांत व लोकांच्या उठाठेवी करण्यांत जो काळ घालवावयाचा त्या पेक्षां हें भजन बरें. पण नवविधा भक्ति मार्गांत जें नामसंकीर्तन सांगितलें व ज्यापासून अंतःकरणाची शुद्धि आणि भगवत्प्राप्ति होते तें हें नव्हे. ज्या प्रमाणें ख्रिस्ती लोकांतील प्रार्थना व मूर्ति पूजकांची पूजा ही दांभिक बनली आहे त्याच प्रमाणें प्रस्तुत भजनी भक्तमंडळीचे नामसंकीर्तनाचा बोजवार झाला आहे. आतां या मंडळींत सर्वच दांभिक असतात असें नाहीं, जो ज्ञानी आहे तो त्यांतील खरें तत्व जाणून वर्तत असतो. पण असे थोडे. जों जों ज्ञानप्राप्ति जास्त होऊं लागते, व ईश्वराचे अलौकिक सत्तेविषयीं मनुष्यास अनुभव घडूं लागतो तसे हे दांभिक मार्ग कमी होत जातात. लोकांमध्यें प्रार्थना, पूजा, व भजन, यांचें दंभ न माजवणारा ज्ञानी, आणि रात्रंदिवस या दांभिकमार्गानें टाहो फोडणारा भजक यांचे मध्यें ज्ञानी श्रेष्ठ असून ईश्वरप्राप्तीला योग्य होय. या लिहिण्या वरून लोकांनीं एकदम भक्तिमार्ग सोडून द्यावे असा अर्थ नाहीं. कारण, आश्रम धरमा प्रमाणें जीं नियमित कर्में करावयाचीं तीं केलींच पाहिजेत. मात्र त्यांत सारासार विचारकरून ज्ञानप्राप्तीकडे विशेष लक्ष द्यावें. मनुष्यास जशी ज्ञानप्राप्ति विशेष होऊं लागते तशीं त्याचीं कर्में आपोआप सुटूं लागतात. नवविधा भक्तिमार्ग सांगण्याचें कारण तरी हेंच आहे. एका मार्गानें ईश्वराचे स्वरूपाचा बोध झाला म्हणजे दुसऱ्यानें त्याचे प्राप्तीची इच्छा करावी, आणि अशा क्रमानें जाऊं लागलें म्हणजे पूर्वींचा मार्ग आपोआप सुटतो. ईश्वराचें भजन चार मंडळी बरोबर घेऊन आणि त्यांत मनोरंजनाचाहि कांहीं भाग धरून केलें तथापि तें अगदीं फुकट जाईल असें नाहीं, म्हणून वर सांगितलेंच आहे. पण त्या भजन करणाऱ्यांनीं जन्मभर हातांत तंबुरा धरून ओरडतच बसूं नये. या भजनाचा उद्देश काय हें त्यांणीं मनांत आणून त्याज

पासून जें कार्य साधावयाचें असेल तिकडे लक्ष दिलें पाहिजे. पण कित्येक मंडळींचा क्रम तर अगदीं उलट असतो. भजनाचे योगानें तंटे माजून दुफळ्या होतात. त्यांत एक विशेष आश्चर्याची गोष्ट आमचे अनुभवास आली आहे ती ही कीं, कांहीं भजनी मंडळीनें साधारण तंट्या वरून एक देऊळच भजनास वर्ज केलें. ज्यांचे भजन ऐकण्यास देवहि पात्र नाहीं त्या भजनी भक्तांस व त्यांच्या भक्तिमार्गास काय ह्मणावें हें आह्मास समजत नाहीं. अस्तु, तेव्हां प्रस्तुत नामसंकीर्तन हा जो ईश्वरप्राप्तीचा सरळ व सोपा मार्ग आहे त्याचा असा चिवडा न करतां त्यांतील हेतु मनांत धरून तदनुरूप वागणें हें मनुष्यास योग्य होय.

# ब्रह्मद्वेष

न जात्या ब्राह्मणश्चात्र क्षत्रियो वैश्यएवच ॥
न शूद्रो नच वै म्लेंच्छो भेदिता गुणकर्मभिः ॥

(शुक्रनीति)

ब्राह्मणांचा द्वेष हा कोणत्याहि काळीं व कोणत्याहि ठिकाणीं कोणाला श्रेयस्कर झाला आहे असें आढळत नाहीं. मनुष्य जातींत गुणकर्मावरून जे भेद पडले आहेत त्या प्रमाणें त्या त्या लोकांकडूनच तीं कामें व्हावीं लागतात. असें न केलें तर व्यवहार व परमार्थ या उभय कार्यांसहि अडथळा येतो. ब्राह्मण ह्मटले ह्मणजे ते बहुत करून महा विद्वान, ज्ञानी, सारासार विचार जाणण्यांत निपुण, सदाचरणी, व्यवहार दक्ष, नीतिसंपन्न, परोपकार तत्पर, व राजाश्रयास/ न असतात. तेव्हां अशा ज्ञानी लोकांचा द्वेष करून त्यांच्या मदती वांचून आपण आपलीं कामे चालवूं ह्मटलें तर कसें चालेल? त्यांतून प्रजापालन करणारे जे राजे लोक त्यांस तर या ब्राह्मणांचे मदतीची फारच अवश्यकता असते. नीति शास्त्रानुरूप राजाकडून वर्तणूक करवून त्याचे योगानें प्रजेला संतोषित व अनुकूल ठेवणें आणि मुलांचें ज्या प्रमाणें आपल्या पित्यावर प्रेम असतें तद्वत प्रजेनें आपले राजाचे ठायीं प्रेम ठेवणें हीं कामें ब्राह्मणांचे हातून होणारीं असतात. तेव्हां राजाला सन्मार्ग दर्शविण्याविषयीं ज्या ब्राह्मणांचा उपयोग त्यांस घालवून किंवा त्यांचा अपमान व द्वेष करून राजा आपलीं कार्यें करूं ह्मणेल तर तीं कधींहि होणार नाहींत, सूर्याला लपवून ठेऊन प्रकाशाचीं कार्यें जर आपण दुसऱ्या यःकश्चित उजेडा पासून करून घेऊं ह्मटलें, तर तें जसें दुःसाध्य व वेडगळपणाचें कृत्य होईल तद्वतच वरील प्रकार होय: हरयेक कामांत ब्राह्मणाचा सल्ला अवश्य आहे. वृद्ध मनुष्याला ज्याप्रमाणें काठीचा आधार असतो तसा

राजाला ब्राह्मणांचा होय. ज्ञानी पुरोहित हे राजाचे नेत्र होत. ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व अनादि सिद्ध आहे. ब्राह्मण हे ज्ञानाची भांडारें होत. तेव्हां अशा जातीचा तिरस्कार करणें व त्यांस योग्य सन्मान देऊन त्यांचा गौरव करण्या कडे दुर्लक्ष करणें हें सर्वत्रांस आणि त्यांतहि विशेषें करून राजे लोकांस फार अश्लाघ्य होय. तेव्हां हरयेक कामांत ब्राह्मणांची सल्ला घेऊन त्यांच्या आज्ञेनुरूप वर्तन ठेवणें हें सूज्ञ पुरुषाचें कर्तव्य आहे.

आतां या लिहिण्या वरून सकृद्दर्शनीं कित्येकांची भलतीच समजूत होईल. त्यांतून प्रस्तुतच्या कालमानानें तर हा वरील लेख अगदीं निरुपयोगी व वेडेपणाचा वाटेल. कारण, हल्लीं ब्राम्हण लोक हे अज्ञानी, तेजहीन, स्वकर्मभ्रष्ट, व दुष्ट झाले आहेत असा दिवसें दिवस सिद्धांत ठरत आहे. तेव्हां त्या सिद्धांतास प्रतिकूल असा लेख लोकांस प्रथम चमत्कारिक वाटेल हें उघड आहे. पण त्यांणीं या विषयाचें संपूर्ण विवेचन मनांत आणून नंतर काय सिद्धांत करणें असेल तो करावा. अलीकडे लोकांची अशी समजूत झाली आहे कीं क्षत्रिय जाति मुळींच नाहींशी झाली. पूर्वी सूर्यवंशीय व सोमवंशीय राजे ज्या प्रमाणें शूर आणि सन्मार्ग वर्ती असत तो प्रकार आतां मुळींच राहिला नाहीं, आतां सर्व वर्णसंकर होऊन ब्राम्हणांचें श्रेष्ठत्व कमी झालें, पण ही चूक आहे. प्रस्तुत काळीं हि चारी वर्णाचे लोक आहेत आणि त्यांचें श्रेष्ठत्वहि त्यांच्या योग्यतेनुरूप चाललें आहे, ब्राम्हणांच्या मानापमानाचा प्रकारहि वर लिहिल्या प्रमाणें चालू आहेच व त्यांचा द्वेष करणारे अहितास पात्र होत आहेत.

ब्राह्मणांच्या प्रशंसनीय लेखावरून परभू, शेणवी, सोनार, कांसार, इत्यादिक जातींचे लोकांसही वाईट वाटतें. कारण, या जातींतील लोक राजदरबारीं राहून अनेक कामें बजावीत आहेत. ब्राह्मणांचा यथायोग्य सन्मान करणें तर एकीकडेसच राहिलें पण त्यांच्या सद्गुणांची नुसती

प्रशंसा केलेली देखील लोकांस आवडत नाहीं. याचें कारण, एकंदर लोकांचें अज्ञान होय. कारण, परभू, शेणवी या जाती प्रस्तुत काळीं जरी निराळच्या पडून ब्राह्मणांत व त्यांच्यांत उंच नीच पणाचे वाद आणि समजुती माजत चालल्या आहेत तथापि मूळ सर्वांचें एकच आहे· या जातीचे संबधानें आमच्या लोकांत हल्लीं फारच वेड माजून गेलें आहे. ब्राह्मण, परभू, शेणवी, कांसार, लोहार, तेली, वाणी, गुजर, मुसलमान इत्यादि अनेक जाती उत्पन्न होऊन त्या प्रत्येक जातींत शेंकडों पोटभेद झाले आहेत. त्या पोटभेदांतही श्रेष्ठकनिष्ठपणा मानून लोक एकमेकांचा द्वेष करितात, मग अनेक जाती परस्परांशीं अयोग्य रितीनें व द्वेषानें वागतील यांत नवल तें काय? वरील भेद हे फक्त स्वदेश संबंधानें झाले आहेत. या खेरीज इंग्रज, पारशी, यहुदी, चिनी, आरबी आफगणी इत्यादि परदेशी लोकांचे अनेक भेद आहेत. आतां याचा विचार करून पाहतां आपण जरी हे शेंकडोंशें भेद मानून सगळा विचका करून टाकिला आहे. तथापि या सर्व जाती महान विद्वानांनीं पूर्वी जे चार वर्ण करून ठेविले त्यांत येतात. हल्लींचे लक्षावधी जातीचे लोक या चार वर्णांचे बाहेर जात नाहींत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे मुख्य चार वर्ण होत. या चार वर्णांची उत्पत्ती परमेश्वरानें कशी केली हें सांगण्यांत तर विद्वान ऋषींनीं आपले चातुर्याची सीमा केली आहे. हे चार वर्ण आरंभीं पुढें सांगितल्या प्रमाणें उत्पन्न झाले आहेत:—

ब्राह्मणोस्य मुखमासीद्बाहू राज्यन्यः कृतः ।
ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ।

"परमेश्वराच्या मुखा पासून ब्राह्मण उत्पन्न झाले; बाहूपासून क्षत्रिय, ऊरूं पासून वैश्य, आणि पायांपासून शूद्र उत्पन्न झाले." असें पुरुषसूक्तांत सांगितलें आहे· आतां आमची एकेश्वरी पंथांतील मंडळी, प्रार्थना समाजांतील लोक, व ब्रह्मसमाजाचे अभिमानी हे हें सर्वच खोटें

मानितील. कारण परमेश्वराच्या सगुण रूपास ते मुळींच मानीत नसल्या मुळें निर्गुणापासून ही उत्पत्ती ते असंभवनीय समजतात.ब्राह्मणांनीं आपलें श्रेष्ठत्व दाखविण्या करितां हा प्रकार केला आहे असें कित्येकांचें मत आहे. पण या मता पासून वरील ऋचेचें त्यांस यथार्थ ज्ञान नाहीं असें ह्मणावें लागतें. वरील उल्लेख परमेश्वराच्या विराट् स्वरूपाचें वर्णन करतांना आला आहे. ब्राह्मणांची उत्पत्ती ईश्वराच्या मुखा पासून मानली हें यथार्थ आहे. ब्राह्मण हे विद्वान, पूज्य व ज्ञानी असून त्यांजकडे उपदेशकत्वाचा अधिकार अनादि चालत आलेला असल्यामुळें त्यांच्या" उत्पत्तीची योजना परमेश्वराच्या मुखापासून करण्यांत सूक्तकारांनीं किती मार्मिकता दाखविली आहे हें सहज लक्षांत येतें, आणि याच कारणा करितां "वर्णानां ब्राह्मण श्रेष्ठः" असा शेरा मारलेला आहे, सर्व गोष्टी ज्ञानाधीन असतात असा सिद्धांत आहे, आणि तें ज्ञान ब्राह्मणाच्या हृदयभांडारांत सांठविलें असल्यामुळें तेहि संपूर्ण लोकांत श्रेष्ठता पाव तात यांत आश्चर्य नाहीं· या करितां ब्राह्मणां कडे श्रेष्टपणा अनादि चालत अला असून त्यांचा द्वेष करणारे पश्ताऽयांत पडतात. सद्वर्तनाचे मार्ग दोन. एक स्वतः विद्यादिकांचे योगानें ज्ञानसंपन्न होऊन त्या पासून नीतीनें चालणें; किंवा विद्वान व ज्ञानी लोकांच्या उपदेशानें ते सांगतील तद्वत वर्तन करणें. या पैकीं ब्राह्मण लोक पहिल्या मार्गाचें अवलंबन करितात, आणि इतर तीन वर्ण ब्राह्मणांचे संगतीनें व उपदेशानें कोणतेंहि आचरण करितात. या प्रमाणें हा क्रम अनादि चालत आला आहे व असाच जगाचे शेवटा पर्यंत चालणार. याचे विरुद्ध कोणी वर्तन करूं लागला ह्मणजे तो आपलें अहित करून घेण्यास पात्र होतो. सदर विषया बद्दल अणखी बरेंच विवेचन करावयाचें असल्यामुळें स्थळ संकोचा स्तव पुढील खेपेस करूं,

---

# आख्यायिका.

## समर्पक उत्तर

एकदां हैद्राबादचे नबाब स्वारीसह रस्त्यांतून जात असतां दोहों बाजूनें पैसा उधळीत चालले होते व कंगाल लोक तो पैसा गोळा करीत होते. बादशाहास आपले औदार्याची धन्यता वाटून जवळ पेशव्यांचा वकील होता त्यास त्याणे गर्वानें विचारलें "वकील, तुमचे पुण्यांत अशी खैरात होते काय?" वकिलानें बादशाहाचा तो सगर्व प्रश्न ऐकून त्याणें त्याजवर योग्य जबाब दिला. तो ह्मणाला "सरकार, असा जमिनीवर टाकलेला पैसा उचलून घेण्या सारखी कंगाल रयतच पुण्यांत नाहीं" हें उत्तर ऐकून बादशाहा खजील झाला, व आपल्या गर्वाचा त्यास मोठा पश्चात्ताप वाटला.

## खरा खजीना व फौज.

एकदा बादशाहानें नाना फडणविसास विचारलें, तुमचे सरकारची फौज आणि खजिना किती आहे? बादशाहास आपले बळाचा आणि दौलतीचा गर्व झाला आहे हें मनांत आणून नानानें त्यास समर्पक उत्तर लिहिलें "आमची सर्व रयत एकदिल व राजभक्त असून सुखी आहे." हा जबाब पाहून आपले प्रश्नाशीं याचा मेळ कसा मिळतो हें बादशाहास समजेना, ह्मणून त्याणें आपल्या पदरच्या एका चतुर मुत्सद्यास विचारलें. तो ह्मणाला "सरकार, हें उत्तर समर्पक आहे. राजभक्त प्रजा हीच आमचें सैन्य आणि त्यांची संपत्ती हाच आमचा खजिना असें नानाचें ह्मणणें असून तें खरें आहे. प्रजा कंगाल असून जर बेदिल असेल तर राजा जवळ

कितीही सैन्य व पैसा असला तरी तो व्यर्थ होय. या करितां महाराज, आपण आपल्या रयतेची प्रीति संपादन करावी हेंच आपलें बळ होय."

## चमत्कारिक हिकमत.

एका राजाला आपल्या दरबारी मनुष्याचा लांच खाल्या बद्दल संशय आला. तेव्हां त्यास कचेरींत बलावून आणून त्याचे मागें त्याच्या घरीं जप्ती नेली व डागडागिना वगैरे सर्व चीजवस्त जप्त करून आणली. हें कृत्य त्या दरबारी पुरुषास माहीत पडलें तेव्हां तो ह्मणाला " सरकार, हा सर्व माल जप्त करून आणला असें वाटतें. ही जप्ती झाली तेव्हां मी घरीं असतों किंवा सरकारनें मलाच जप्ती करण्याचा हुकूम दिला असता, तर मी सरकारचा चांगला फायदा केला असता. कारण माझ्या घरची माहिती मला आहे तशी इतरास नाहीं "या बोलण्याचें राजास फारच आश्चर्य वाटून तो ह्मणाला " रावजी, तुह्मी-घरीं असल्यानें जप्तीला हरकत होऊन कांहीं तरी नुकसान झालें असतें, असें असून तुह्मी हें उलट कसें ह्मणतां?" तो दरबारी ह्मणाला "सरकार, हें कसें तें आतांच मजबरोबर आपण एक कारकून द्या ह्मणजे समजेल." असें सांगून घरीं गेला व एका तळ घरांत पन्नास हजार रुपये रोख ठेविलेले होते ते कारकुनापाशीं देऊन त्यास घेऊन कचेरींत आला. व राजाला ह्मणाला "सरकार, मी गेल्यानें हा आपला पन्नास हजारांचा जास्त फायदा केला आह्मा जवळ जें कांहीं आहे तें सरकारचें असें समजून त्याचें आह्मी रक्षण करीत असतों, महाराजांना वाटेल तेव्हां आज्ञा करावी ह्मणजे चरणाजवळ आणून हजर करीत जाऊं" हें ऐकून राजा फार खुष झाला व जप्त केलेलें सर्व सामान त्याणें त्यास परत दिलें.

## परत भेट

नाना फडणविसाचें शहाणपण पहाण्याकरितां टिपु सुलतानानें थोडेसे निवडक चांगले जोंधळे त्यास नजर पाठविले. नानांनीं ती भेट पाहून त्यास फार आश्चर्य वाटलें व या भेटींत कांहीं तरी मतलब असावा असा त्यास संशय येऊन लगेच त्याणें आपल्या एका आश्रितास बलाऊन आणलें आणि त्या जोंधळयांच्या लाह्या करून आलेले मनुष्याबरोबर सुलतानास परत पाठविल्या. टिपु सुलतान दरबारांत बसला असतां नानाकडून लाह्या घेऊन जासूद आला. नानानें परत पाठविलेली भेट पाहून दरबारी मंडळीस नानाचे वेडेपणाबद्दल वाईट वाटलें. पण याचा सुलतानास राग वगैरे न येतां तो उलट नानाचे शहाणपणाची तारीफ करूं लागला. पुढें मंडळीनें यांतला अर्थ काय ह्मणून विचारतां सुलतानानें सांगितलें कीं, मी नानास जोंधळे पाठऊन दिले त्यांत माझ्या पदरीं कसे निवडक लोक आहेत हें दर्शविण्याचा भाव होता तो जाणून नानानें लाह्या पाठविण्यांत मला असें दर्शित केलें कीं, त्या लोकांच्या मी क्षणांत लाह्या करून टाकीन.

---

## पाणिग्रहण.

शाहू माहाराज बादशाहाचे कैदेंत असतां एकदा बादशाहानें शाहूचे दोन्ही हात धरून ह्मणाला—शाहू, आतां तुझें संरक्षण कोण करील?---शाहू फार धूर्त व समयोचित भाषण करणारा होता. त्याणें सांगितलें—खाविंद, आजपर्यंत मला संरक्षणाची काळजी होती. पण आतां ती अगदीं दूर झाली. कारण स्त्रियेचा फक्त एक हात धरला तर पिचें जन्मपर्यंत संरक्षण करावें लागतें; आपण तर माझे दोनहि हात धरलेत' तेव्हां आतां मी निष्काळजी झालों. हें ऐकून बादशाहा फार खुष झाल व अशा चतुरस्र पणानेंच त्याची शाहूवर फार प्रीति बसली होती.

# भारत

एकदा बादशाहानें महाभारत श्रवण केलें. तें ऐकून त्यास फार संतोष झाला व आपल्या वर्णनाचाहि असाच एक ग्रंथ असावा असें त्यास वाटून आपलें भारत रचण्या विषयीं त्याणें बिरबलास हुकूम दिला. व त्या करितां पांच लक्ष रुपयें दिले. बिरबलानें कांहीं मुदत मागुन घेऊन घरीं गेला. कांहीं दिवस गेल्यावर बादशाहानें बिरबलास विचारलें बिरबल, अद्याप आमचें भारत तयार झाले कीं, नाहीं?—बिरबलानें सांगितलें—खुदावंत, सर्व तयार झालें आहे, पण त्यांत येक अडचण आहे. द्रौपदीला पांच पती होते आणि आमच्या राणी सरकारास खाविंद येकटेच आहेत, तेव्हां बाकीच्या चोहोंची कशी काय व्यवस्था करावी या विचारांत मी आहें.—बादशहास या गोष्टीनें राग आला व ह्मणाला —बिरबल, भारत हा ग्रंथ अनीतीचा आहे या करितां आमचें भारत करण्याची जरूर नाहीं.

---

# उंचीचें प्रमाण

एकदा दिल्लीचे बादषाहा तोंड धूत बसले असतां जवळ कांहीं खाजगितील मंडळी व पेशव्यांचा एक वकीलहि होता. बादषाहानें बोलतां बोलतां आपल्या पदरच्या दोन हुजऱ्यांकडे बोट दाखवून पेशव्यांचे वकिलास विचारलें—वकील, तुमचे खाविंद या हुजऱ्या येवढे आहेत किंवा या—वकिलानें तो झोंक मनांत आणून सांगितलें—सरकार; हल्लीं आपण या सुवर्ण चौकीवर तोंड धूत बसल्यानें जितके मोठे दिसत आहां त्या पेक्षां आमचे खाविंद चार बोटें उंच आहेत—हें ऐकून बादषाहा खिन्न झाला.

# स्वात्मानंद

( उल्हास १ ला. )

ओं नमो विघ्नहरा गणपति ॥ अद्वयानंदा जगत्पति ॥
प्रकाशावी निजमती ॥ निजात्म ग्रंथोक्ति रचनेसि ॥ १ ॥
नमूं आदि शक्ति मूळ ज्योति ॥ चारी वाचा जेथुनि स्फुरति ॥
प्रकृति पुरुष ऐक्यास्थिति ॥ समान गति निजबोध ॥ २ ॥
नमन संत सज्जनासी ॥ जे कृपाळू अति दिनासी ॥
जयांच्या अवलोकनें मानसीं ॥ मति भक्तिसी फांकतसे ॥३॥
आतां नमूं सद्गुरु परमात्मा देव ॥ जेथें नचलति भावाभाव ॥
जोकां विश्वव्यापक स्वयंमेव ॥ त्या पदीं सद्भाव नमनत्वें ॥ ४ ॥
नमों निजानंद आद्या ॥ प्रकाशरूपा स्वसंवेद्या ॥
अनंतरूपा जगद्वंद्या ॥ विद्या अविद्या रहित तूं ५ ॥
आद्यंतातीत आत्माराम ॥ सकळ योगीयां विश्राम ॥
अहंता गुणें देहधाम ॥ वसवी उत्तम परेश जो ॥ ६ ॥
तो संकोच चितीं भासत ॥ जैसें महदाकाश घटा आंत ॥
देह इंद्रियांतें जिवधोत ॥ ह्मणोनि ह्मणत जीव ऐसा ॥ ७ ॥
ज्ञानदृष्टीं निरखुनि पहातां ॥ तंव जगव्यापक तो तत्वतां ॥
विज्ञान स्वरूपीं तोचि पुरता ॥ गवसे आइता देहामाजि ॥८ ॥
सकळ घटां माजि आकाश ॥ व्यापुनि असे सावकाश ॥
तैसा जगव्यापुनि ऋषीकेश ॥ राहिला परेश निर्विकारी ॥९ ॥
पाणी कुंभांतरीं भरिलें जैसें ॥ चित्त चतुर्धा तनुमाजि तैसें ॥
त्या घटजळीं बिंबत असे ॥ सूर्येंदू आविसें तारांगणें ॥ १० ॥
महदाकाश जैसें त्यांत भासत ॥ तैसा विश्वात्मा सभ्रांभरीत ॥
लघुचित कोशीं बिंबत ॥ चतुष्टयांत अंतःकरणीं ॥ ११॥

आपुली आपणा स्वप्रतिती ॥ मनयोगें अनुभव घेती ॥
परि विश्वदेह क्रियेची स्थिती ॥ सर्वथा नेणती देहात्ममतें ॥१२॥
भोगप्रतिती स्वतनुची जाणे ॥ मन व्यापीत मनाचया गुणें ॥
एक देशीं मानुनि वर्तणें ॥ आपणा कारणे ह्मणोनियां ॥ १३ ॥
विश्वात्मक तेज जें कांहीं ॥ परि चित्त अभिमानीं गुंतलें पाहीं॥
सुख दुःख प्राप्त जेंजें देहीं ॥ आप आपलेंही जाणतसे ॥१४ ॥
परि विश्वयदेहींचें सुखदुःख ॥ न जाणे कांहींच कौतुक ॥
देहात्म वादें भुलला देख ॥ निजात्म सुख अंतरलें ॥१५॥
मोघाभरी पाणी भूमीं ओतिलें॥तेणें पृथ्वीचें सर्वांग न होय ओलें॥
तैसें एकदेशी आपणा कल्पिलें ॥तया कैसी कळे विश्वक्रिया॥१६॥
इच्छाही विषयांची धरी ॥ वळघतो इंद्रियांचे द्वारीं ॥
सेवीतसे नानापरी ॥एकचि अंतरीं आत्मसता ॥ १७ ॥
परि श्रोत्रविषय नेणति घ्राण ॥ घ्राणविषय नेणति नयन ॥
नयन विषयांसी त्वचा आपण ॥अनोळख पण तियेलागीं॥१८ ॥
त्वचा स्पर्श विषयासीं ॥ रसना नेणें परियेसीं ॥
रसनेच्या रस विषयासीं ॥ इतरें जाणती ना ॥ १९ ॥
तैसा एकचि आत्मा जगदांतरीं ॥ व्यापक असे चराचरीं ॥
परि परांचें सुख दुःख अंतरीं ॥ इंद्रियां परि नेणवे त्यां ॥२०॥
जिवत्व पणे देहाभिमानें ॥ विषयसुखा माजि वर्तणें ॥
तो काय विश्वकृतीतें जाणे ॥ सुख दुःख खुणे मूढमति ॥२१॥
स्वप्न अवस्थे मन जातां ॥ स्थूळ तनु भासे शवतुल्यता ॥
तेवीं आत्म्याविण मन बुद्धि चित्ता ॥आभासेजडता स्वप्रत्ययें ॥२२॥
चंद्रा आड आभाळ येतां ॥ द्रव स्फुरेना चंद्रकांत धरितां ॥
तेवि आत्म्या आड शुशुप्ति भासतां॥त्यातमेंतत्वतांमनबुद्धिलोपे २३
तेंवि चित्तामाजि चित्ताचा पडदा॥येउनी चित्तामाजि नुसता ॥
पाहीं अंधकार सर्वदा ॥ हितानुवादा न स्मरेचि ॥ २४ ॥

चिद्दीप्ति न पडे ह्मणोनि स्वभावें ॥ चोवीस तत्वीं जडता पावे ॥
तीं कोण कोण अनुभवें ॥ जाणिजे वैभवें सांगतसें ॥ २५ ॥
पंच भूतें तिनी गुण ॥ मिळोनि होती अष्ट जाण॥
दहा इंद्रियें अकरावें मन ॥ पंच विषय पूर्ण चोवीस तत्वें ॥२६॥
तेऽहां चिच्छक्ति वृद्धि स्तब्ध राहे॥स्वसुखें शुक्तीसी आलिंगिताहे॥
तेथें चित मुरे उजळताहे ॥ शाश्वतसमाधि हे चिदानंदु ॥ २७
आत्मा चित्स्फुरण प्रकाशमय ॥ हा तेजासि बिंबोनियां प्रत्यय ॥
स्वप्न अवस्थेचि सुख सोय ॥ प्रबोधिक स्वयें जाणतसे ॥ २८
कीं विश्वीं तयीं हा न बिंबांति॥ह्मणोनि सौख्य हें न स्मरत ॥
भोगप्राप्ति बिंबा प्रति घडत ॥ देहाभिमानार्थ जाण खरें ॥२९ ॥
सेवा इछितो धनार्थ नर ॥ तया हातीं दानधर्म अपार ॥
स्वामी करवितो निर्धार ॥ द्रव्यादि प्रकार अन्नवस्त्रें ॥३०॥
तरीं पुण्य लेश तया नाहीं ॥ उदारपणें वेंचितां पाहीं ॥
स्वामीस प्राप्त पुण्य तेंहि ॥ आपण स्वदेहीं रिकामाची ॥३१॥
माझें द्रव्य मी करितों दान ॥ ऐसा तया नाहीं अभिमान ॥
तेथें पुण्य इच्छा करी कोण ॥ निराभिमानें वर्ततसे ॥ ३२ ॥
कीं शब्दें प्रभुच्या आद्यंत क्रिया ॥ होतां न लिंपे पापें तया ॥
तेथेंविज्ञानिनिरआत्मानुभवियां ।अहंतागोलियानलिंपेपुण्यपापीं ३३
मी हें करितों आद्यंत कर्म ॥ हानधरी मनीं अहंता भ्रम ॥
जाणोनि प्रभुसत्तेचा धर्म ॥ आपण निष्काम जाणतसे ॥ ३४ ॥
सकळ सृष्टीतें विकासुनि ॥ रवी अलिप्त जैसा गगनीं ॥
तये प्रभेसी दृष्टी राहे लक्षुनि॥तरी हारपोनि जाय जग प्रभा ॥३५॥
तैसें चिद्रश्मी जाळावरी ॥ जग विलसे नानापरी ॥
धांवते वृत्ति तदाकारीं ॥ ते स्थिर करी निजरूपीं॥ ३६ ॥
तेवीं चित्सूर्यातें लक्षुनि बारे ॥ स्थिर करिसी वृत्ति एकसरें ॥
तरी जगद्भास स्फूर्ति बिंबीं मुरे ॥ एकाचि उरे निजतत्व॥ ३७॥

जरीं सूर्य प्रकाशी निश्चयेसी ॥ तरी भूमीगत द्रव्यें कां न प्रकाशी॥
तींच औषधी साधने परियेसीं ॥ दिव्यांजनेसी पहातसे ॥३८॥
रात्री जेवीं निशाचरांसीं ॥ प्रभायुक्त भासे तयांसीं ॥
ते एक स्वात्म प्रजा निश्चयेंसीं ॥ हें दृढ मानसीं अवलोकीं ॥३९॥
जैसे उपनेत्र लाविती ॥ तद्वत चंद्र सूर्य हे निश्चिती ॥
परि पहाण्याची जे निजगती ॥ ते सहजास्थिति आत्मप्रभा ॥४०॥
वन्हि जैसा कां सूक्ष्म स्थूळ ॥ इंधनाच्या गुणें केवळ ॥
परितो दृश्याकृती वेगळा ॥ असे निश्चळ उपाधितीत ॥ ४१ ॥
तैसा जीव प्रकाशक सर्वीं सर्व ॥ सूक्ष्म स्थूळीं भरिला अपूर्व ॥
व्यापुनितयातीत निजभाव ॥ अचूंत ठाव नसे जिवा ॥४२॥
वन्हि दाहक रूपें प्रभेसी ॥ रवीच्या व्यापुनि असे उष्मा कळेसी ॥
तोचि बिंबोनि सूर्यकांतेसी ॥ प्रकटे काष्टेसी परि वेगळा ॥४३॥
तैसा स्वात्म प्रकाश सर्वगत ॥ तो बुद्धि लक्षादि सूक्ष्म भासत ॥
प्रत्यक्षीं विकसुनियां त्यांत ॥ असे बिंबत विश्व सारें ॥४४॥
अधिष्टान पृथ्वी जैसी ॥ तदंशीच बिजें परियेसीं ॥
माती रूपें भासती कैसीं ॥ नये व्यक्तिसीं कोणासही ॥४५॥
आदि अंतीं बहु सूक्ष्म भासती ॥ तीं तरुरूपें मध्यें विस्तीर्ण होती
तैसीं ब्रह्मभूमींत बिजें निपजती ॥बुद्धि नेत्र गति मन सूक्ष्म॥४६॥
तोचि अग्नि बिज चंद्र भास्कर ॥ तरु वाढला दृश्याकृति थोर ॥
हे आत्मानुभवें जाणतां सार ॥ संसार सागर तरि जे पां ॥४७॥
वन्हिमाजि भासती दोन्ही गुण ॥ प्रकाश आणि स्वयें ऊष्ण ॥
ऐचयरूपें उभय आपण ॥ पावक गुण स्वाभाविक ॥४८ ॥
नेत्रीं दिप्ति विकासनी ॥ तत्काळ तम जाय निरसुनी ॥
यज्ञादिक क्रिया उष्णें करूनि ॥ होती जें जें मनीं योजितलें॥४९॥

# परमार्थबोधक जुनी कविता.

## पद

येरे येरे गोविंदा रामा ॥ ध्रु० ॥ विकसित पारिजात मंद मधुर हासारे ॥ सजल जलद भव्य निरा भासारे ॥ गोप गोधनादि गोपिका विलासा रे ॥ उडुपति मुखें जननि वदात दुडदुड गति झडकारि ये गोविंदा० ॥ १ ॥ विविधभूषणादि गोपिचालारे ॥ निबिडन कोमला विहाम बाला रे॥ मृदुल भाषणादि शोषणा कृपाला रे ॥ त्रिभुवन पाति तुजचि जपती विधि सुरपति अनुदिनि येरे येरे ॥ गोविंदा ॥ २ ॥ निजानंद ह्मणे तू चि पूर्ण ठेवारे ॥ व्रजानंददाई शेषशाई देवारे ॥ करी भावें आनंदतनय सेवारे ॥ नमुनि चरण ह्मणे शरण चुकवि मरण करि मग ये गोविंदा रामा ॥ येरे येरे गोविंदा० ॥ ३ ॥

## पद.

हरी नामकी नाव तावकुं संत चलावे ॥ उतारे भवपार प्रभुसें जाय मिलावे ॥ ध्रु० ॥ येक पलखमो कोट कोट लख जो जन चाले ॥ ऐशी तरे लेजाय पेटमे पाणि न हाले ॥ १ ॥ लेत नहि कछु दाम झाझमे ज्या बिठावे ॥ बैकुंठ धाम विच झाझकुं जाय छिपावे ॥ २ ॥ निर्भय भया जन सोहि जे वह झाझमे बैठे ॥ जे कृष्णदास उल्लासकम लके बीचमे पेठे ॥ हरि० ॥ ३ ॥

## पद

अरे मी भीष्म तरी श्रीहरी ॥ धरवीन चक्र करीं ॥ श्री

हरी० ॥ ध्रु०॥ यादव सायुध शस्त्र रहित तनु ॥ निश्चय करिशी तरीं ॥ सांप्रत आज कळों येईल या ॥ अनुपम समरीं ॥ श्रीहरी० ॥ १ ॥ क्षात्र तनुचा सुतशंतनूचा ॥ जन्मलों शुभजठरीं ॥ तवपदीं जन्मुनी शिवमौलीं वसे ॥ त्या गंगे उदरीं ॥ श्रीहरी० ॥ २ ॥ पार्थ हें बचडें बाळक अजुनी ॥ दुग्ध दिसे अधरीं ॥ या बुजवणियां पशुपक्षी भिती ॥ मी यातें नगणी ॥ श्री हरी० ॥३॥ हरीयुगीं हरी हयत हा हरी ॥ सारथी मुख्य हरी ॥ हरीमय रथ हा विजय श्रीहरी ॥ मी यातें प्रहरीं ॥ श्रीहरी०॥ ४ ॥ पोष्य शिष्य भार्गवरामाचा ॥कोपल्या नउरे उरी ॥ अमृत वचन हें सत्य प्रतिज्ञा ॥ ऐकिजे रणचतुरीं ॥ श्रीहरी धर विन चक्र करीं० ॥ ५ ॥

## पद

जेवीं ये सजणा ॥ सख्या हरी ॥ ध्रु० ॥ साय दुधावरी रायपुरी वरी ॥ कानवला चिमणा ॥ सख्या हरी० ॥ १ ॥ कालविला दधिभात आलें मिरें ॥ मेळविलें लवणा ॥ सख्या० ॥ २ ॥ उद्धव चिद्घन अद्वय मंचकीं ॥ गोपाळ सगुणा ॥ सख्या हरी जेवीं ये सजणा ॥ ३ ॥

## पद

हरिची मला लागली गोडी ॥ ध्रु० ॥ सुंदर रूप पाहूनी डोळां ॥ जालें मी वेडी ॥ हरिची० ॥१॥ गृह धन आशा सर्वहि त्यजुनी ॥ कृष्णपदीं जोडी॥ हरिची० ॥ २ ॥ मध्व मुनेश्वर स्वामी दयाघन ॥ चरणसरोज न सोडी ॥ हरिची मला लागली गोडी ॥ ३ ॥

# सुभाषित

भ्रमयति भवपितं चेत् भज भज नर सूतशेखरं कृष्णं ॥
सद्रसेन सहसित मनुतृटिकं सर्वथा त्यज स्नेहं ॥ १ ॥

" हे मानवा, संसाररूप पित्ता पासून जर तूं भ्रमित झाला असशील, तर धनपुत्रादिकांचा लोभ सर्वथा टाकून साधुजनांच्या वाणीपासून उत्पन्न झालेला जो ब्रह्मानंदरूप रस त्याशीं सहवर्तमान देवाधिदेव जो कृष्ण त्याचें भजन कर. " किंवा " व्यवहारिक पित्तानें जर तुला भोंवत असेल तर शर्करा व दुग्ध यांशीं सहवर्तमान कृष्ण वर्ण अशा सूतशेखर मात्रेचें सेवन करून तैलादिकांचा सर्वथा त्याग कर. " हा श्लोक व्यर्थ आहे.

प्रसन्नः कांतिहारिण्यो नानाश्लेषविचक्षणाः ॥
भवंति कस्यचित् पुण्यै मुखे वाचो गृहे स्त्रियः ॥ २ ॥

" उत्तानार्थ, भाषण गुणें करून मनोहर, व ज्याच्या मध्यें श्लेषार्थ आहे असी वाणी मुखाचे ठायीं असणें; आणि प्रसन्नवदन कांतीनें मनाचें हरण करणारी, आणि शृंगार कलेंत चतुर अशी स्त्री गृहाचे ठायीं असणें हीं महत्पुण्याचीं फळें होत.

गवादीनां पयोन्येद्युः सद्यो वाजायते दधि ॥
क्षिरदधेस्तु नाद्यापि महतां विकृतिः कुतः ॥ ३॥

गाई म्हशी इत्यादिकांचे दुधाचें लगेच किंवा काहीं वेळानें दहीं होतें. पण क्षीर समुद्र अद्यापहि थिजला नाहीं. तेव्हां महान आहेत त्यांना विकृती होत नाहीं हें खरें.

गुणायंते दोषाः सुजनवदने दुर्जनमुखे।
गुणा दोषायंते तदिदमपिनो विस्मयपदं ॥

महामेघ: क्षारं पिबति कुरुते वारि मधुरं ।
फणी क्षीरं पीत्वा वमति गरलं दु:सहतरं ॥४॥

"साधुजनांचे मुखांतून लोकांचे दोष असले तथापि ते गुणरूपानें बाहेर पडतात, आणि दुर्जनाचे तोंडांतून गुण दोषरूपानें बदले जातात यांत कांहीं विशेष आश्चर्य नाहीं. कारण, हा परस्परांचा धर्मच आहे मेघ समुद्राचें खारें पाणी पिऊन त्यापासून मधुर उदकातें देतो, आणि सर्प प्रत्यक्ष दुग्ध प्राशन करूनहि त्यापासून दु:सह असें गरळ टाकतो."

वनेपि सिंहा मृगमांस भक्षिणो ।
बुभुक्षिता नैव तृणे चरंति ॥
एवं कुलीना व्यसनानि भूता ।
न नीच कर्माणि समाचरंति ॥५॥

"आरण्याचे ठायीं मृगमांस भक्षण करणारे सिंह बुभुक्षित असले तथापि चारा खात नाहींत, तद्वत जे कुलीन आहेत ते विपत्तीग्रस्त झाले तथापि नीच कर्में आचरीत नाहींत."

य: प्रीणयेत् सुचरितै: पितरं स पुत्रो ।
यद्भर्तुरेव हितमिच्छति तत् कलत्रं ॥
तन्मित्रमापदि सुखे च समक्रियं यत् ।
एतत्त्रयं जगति पुण्यकृतो लभंते ॥६ ॥

" जो उत्तम आचरणानें पित्याला संतोषित करतो तोच पुत्र होय, पतीच्या सुखाची नेहमी काळजी वाहणारी तीच खरोखर स्त्री होय, आणि सुखप्रसंगीं व विपत्काळींहि सारखीच प्रीती करणारा तो खरा मित्र होय. हीं तीन या लोकीं पुण्यवंतासच मात्र प्राप्त होतात."

दुर्जनं प्रथमं वंदे सज्जनं तदनंतरं ॥
मुखप्रक्षालनात्पूर्वं गुदप्रक्षालनं यथा ॥ ७॥

"मुख प्रक्षालना पूर्वी ज्या प्रमाणें गुदप्रक्षालन करितात, तद्वत आरंभीं दुर्जनास वंदन करून तदनंतर सज्जनास नमस्कार करावा."

जलनिधौ जननं धवलं वपुः ।
मुररिपोरपि पाणितले स्थितिः ॥
इति समस्त गुणान्वित शंख भो ।
कुटिलता हृदये न निवारिता ॥ ८ ॥

"सागरामध्यें जन्म झाला आहे, शरीर स्वच्छ आहे, प्रत्यक्ष ईश्वराचे हस्तामध्यें वास आहे, इतक्या गोष्टी अनकूळ आहेत तथापि शंखानें आपल्या आंगचें कौटिल्य टाकलें नाहीं."

अहो दुर्जनसंसर्गा न्मानहानि पदे पदे ॥
पावको लोहसंगेन मुद्गरैरभिहन्यते ॥ ९ ॥

"अहो, दुर्जनाचे संगतीनें महतांना पदोपदीं मानहानी सोसावी लागते. लोखंडाचे संगतीने अग्नीला मुद्गराचे घाव सोसावे लागतात."

यस्य नास्ति स्वयं प्रज्ञा शास्त्रं तस्य करोति किं॥
लोचनाभ्यां विहिनस्य दर्पणः किं करिष्यति ॥ १०॥

"ज्याला स्वतः मुळींच अक्कल नाहीं अशा पुढें शास्त्रें काय करतील ? ज्याला डोळयांनीं दिसतच नाहीं त्याला आरसा दाखवून उपयोग काय?"

धैर्यं यस्य पिता क्षमा च जननी शांतिश्चिरं गेहिनी ।
सत्यं सूनुरयं दयाच भगिनी भ्राता मनः संयमः ॥
शय्या भूमितलं दिशोऽपि वसनं ज्ञानामृतं भोजनं ।
एते यस्य कुटुंबिनो वद सखे कस्माद्भयं योगिनः ॥ ११ ॥

"धैर्य हेंच ज्याचा पिता, क्षमा ही जननी, शांति हीच स्त्री, सत्य हाच पुत्र, दया ही भगिनी, आत्मसंयमन हा बंधु, पृथ्वीतल हीच ज्याची शय्या, दिशा ह्याच ज्याचें वस्त्र, आणि ज्ञानामृत प्राशन हेंच ज्याचें भोजन. असा जो कुटुंबवत्सल योगी त्यास हे सखे कोणाचें भय आहे?" कोणाचेंहि नाहीं हा भाव.

न विद्यया नैव कुलेन गौरवं ।
जनानुरागो धनिकेषु सर्वदा ॥
कपालिना मौलिधृतापि जान्हवी ।
प्रयाति रत्नाकरमेव सत्वरं ॥१२॥

"विद्या किंवा कुल याकडे न पाहातां लोक धनिकांचा सर्वदा गौरव करितात. शंकरानें गंगेला प्रत्यक्ष मस्तकाचे ठायीं धारण केली असून ती रत्नाकराकडे ( समुद्राकडे ) धांव मारते."

अहो कनकमाहात्म्यं वक्तुं केनापि शक्यते॥
नामसाम्यादहो चित्रं धत्तुरोऽपि मदप्रदः ॥१३॥

"कनकाचें महात्म्य व उन्माद कोण सांगूं शकेल? धोतऱ्याचे ठायीं त्याचें जें नाम सादृश्य आलें आहे, त्याचे योगानें त्यास किती मादकत्व प्राप्त झालें?"

हस्ती स्थूलतनुः सचांकुशवशः किं हस्तिमात्रोंऽकुशो ।
वज्रेणाभिहताः पतंति गिरयः किं शैलमात्रः पविः ॥

१४८(३)



दीपे प्रज्वलिते विनश्यति तमः किं दीपमात्रं तमः ।
तेजो यस्य विराजते स बलवान् स्थूलेषु कः प्रत्ययः ॥१४॥

" हत्ती मोठा स्थूलदेही असून तो अंकुशानें वश होता म्हणून अंकुश हत्ती येवढा आहे काय? पर्वतांचें चूर्ण करण्याची शक्ति वज्रामध्यें आहे म्हणून वज्र पर्वतरूप आहे काय? अगणित अंधकाराचा नाश करण्याविषयीं दीप समर्थ आहे म्हणून दीप अंधकाररूप आहे काय? नाहीं. तेव्हां तात्पर्य काय कीं, ज्याचे अंगीं तेज जास्त असेल तोच खरोखर बलवान होय. नुसत्या स्थूलपणाला काय करावयाचें आहे?"

तावत्सर्वगुणालयः पटुमतिः साधुः सतां वल्लभः ।
शूरः सच्चरितः कलंकरहितो मानी कृतज्ञः कविः॥
दक्षो धर्मरतः सुशील गुणवांस्तावत्प्रतिष्ठान्वितो ।
यावन्निष्ठुरवज्रपातसदृशं देहिति नो भाषते ॥ १५ ॥

" तावत्कालपर्यंतच सर्व गुणसंपन्नतेचें चीज होय, साधुजनांमध्यें मान्यताहि तावत्कालपर्यंतच मिळते; तावत्कालपर्यंतच मनुष्य शूर, सदाचारी, निष्कलंक, मानी, कृतज्ञ, दक्ष, धार्मिक, सुशील आणि गुणवान मानला जाऊन प्रतिष्ठा पावतो, जावत्कालपर्यंत तीव्र वज्राप्रमाणें 'दे हा शब्द उच्चारीत नाहीं."

दातव्यं भोक्तव्यं सति विभवे संग्रहो न कर्तव्यः ॥
पश्यामि मधुकरीणां संचितमर्थं हरंत्यन्ये ॥ १६ ॥

" लक्ष्मी प्राप्त झाली असतां तिचा उपभोग घ्यावा व दानादिक करावीं. संग्रह करणें उचित नाहीं. कारण, मधुमक्षिका

मद्याचा सांठा करून ठेवतात तो लोक हरण करून नेतात हें आपण पाहतों."

वक्त्रं चंद्रविकासिपंकजपरीहासक्षमे लोचने ।
वर्णः स्वर्णमपाकरिष्णु रलिनां जिष्णुः कचानां चयः ॥
वक्षोजाविभकुंभविभ्रमहरौ गुर्वी नितंबस्थली ।
वाचां हारिच मार्दवं युवतिषु स्वाभाविकं मंडनं ॥ १७ ॥

"प्रफुल्लीत चंद्रविकासिनी कमला प्रमाणें मुख, नेत्र चंचल, सुवर्णाभ तुच्छ करणारा असा शरीराचा वर्ण, भ्रमराचा गर्व परिहार करणारा असा कचसमुदाय, हत्तीच्या गंडस्थलाची शोभा हरण करणारे असे उरोज, स्थूल असा नितंब प्रदेश आणि भाषण मनोहर असून मार्दवयुक्त हीं स्त्रियांचीं स्वाभाविक भूषणें होत.

अस्याश्चेति सौंदुमार्य मधुना हंसस्य गर्वैरलं ।
संलापो यदि धार्यतां परभृतैर्वाचं यमत्वं व्रतं ॥
अंगाना मकठोरता यदि दृषत्प्रायेव सा मालति ।
कांतिश्चेत् कमला किमत्र बहुना काषायमालंब्यतां ॥१८॥

"जिची मंदगती पाहूं लागलें असतां हंसाचा गर्व व्यर्थ वाटतो. शब्द कानीं पडला म्हणजे कोकिलांचें स्वरमाधुर्य तुच्छ वाटतें. अंगाच्या मृदुत्वा पुढें मालतीपुष्पाहि पाषाणवत् भासतें आणि काषाय वस्त्र परिधान केलेल्या अशा तरुणीच्या कांती पुढें लक्ष्मीही उणी वाटते."

कस्तूरीतिलकं बाले भाले मा कुरु मा कुरु ॥
अयसाम्यं भजामीति जृंभते शशलांच्छनः ॥१९॥

"हे तरुणी, तूं ललाटाचे ठायीं कस्तूरीचा तिलक लाऊं नको. कारण, या योगानें तुझी साम्यता आपण पावलों असें चंद्राला वाटेल."

# अबलामित्र

या पुस्तकांत—प्रपंच संबंधी एक सुंदर नाटक—पतिव्रता स्त्रियांच्या मनोरंजक पौराणिक कथा—स्त्रीशिक्षणपर निबंध—पाकशास्त्र—जुनाट कवींचीं रसाळ व चित्तवेधक गाणी काहाण्या वगैरे २४ पृष्ठांत अवकाशानुसार समावेश होत असतो. मराठी भाषेंत स्त्रियां करितां ह्मणून हें एकत्र पुस्तक निघत आहे.

## वर्गणीचे दर.

| | |
|---|---|
| वर्षाची आगाऊ .... .... .... | १८८ |
| फुटकळ अंकास .... .... .... .... | ८४ |

या शिवाय टपाल खर्चाबद्दल ८६ जास्त पडतील, मागाहून वर्गणी दुप्पट पडेल.

'सद्धर्मदीप' मासिक पुस्तकाचे वर्गणीदारांस 'अबलामित्र' पुस्तकाची किंमत सालीना फक्त १ रुपया पडेल. टपालखर्च निराळा नको.

व्यवस्थापक अबलामित्र.

वर्ष आगाऊ किंमत वर्षाची १ रुपया दुसरें

सत्यं शांति सौख्य

# सद्धर्मदीप.

भाद्रपद शके १८०१

अंक २

मार्गे मार्गे निर्मलं साधुवृंदं । वृंदे वृंदे तत्वचिंतानुवादः
वादे वादे जायते तत्वबोधो । बोधे बोधे सच्चिदानंदभासः



अलीबाग
'सत्यसदन छापखान्यांत छापिलें

फुटकळ अंकाची किंमत चार आणे

आगाऊ किंमत, पहिला अंक पोंचल्यापासून एक महिन्याचे आंत दिली पाहिजे.

पुस्तकाचे किंमती शिवाय टपाल खर्चाबद्दल प्रत्येक अंकास अर्धा आणा जास्त पडेल

**विषय**—मृत्यु—पृष्ठ ३३, ब्रह्मद्वेष—पृष्ठ ४५, स्वात्मानंद—पृष्ठ ५५ सुभाषित—पृष्ठ ५९.

पुढील अंक आश्वीन शु० १ प्रतिपदेस निघेल. कारण मध्यें अधिक महिना आहे.

ज्यांणीं मुद्दाम हें पुस्तक मागविलें आहे त्यांजकडे दोन अंक रवाना झाले आश्वीनाचा अंक वर्गणी आल्यानंतर रवाना होईल.

## वसूल.

(आषाढ शके १८०२ अखेर.)

| | |
|---|---|
| (आषाढ शके १८०१ अखेर मागील) | |
| रा० श्रीनिवास रामचंद्र कुमठा | १८६ |
| ,, रघुनाथ बाळकृष्ण नेरूर | १८६ |
| ,, हणमंत अनाजी पाचोरा | १८६ |
| ,, काशिनाथ पांडुरंग मुंबई | १८६ |
| ,, गोविंद मोरोबा मुंबई | १८६ |
| ,, अनंत वासुदेव अमोदें | १८६ |
| ,, रामचंद्र चिंतामण कल्याण | १८६ |
| (आषाढ शके १८०२ अखेर) | |
| रा०रा० वामन धोंडदेव किहीम | १ |
| ,, शंकर विठ्ठल बडनेर | १८६ |
| ,, बाळकृष्ण केरू रेवदंडा | १८६ |
| ,, भास्कर भाऊ वासुदेव रेवदंडा | १८६ |
| ,, रामचंद्र बल्लाळ वरसई | १८६ |
| ,, त्रिंबक बाळकृष्ण चिपळूण | १८६ |
| ,, बाळाजी कृष्ण संगमेश्वर | १८६ |
| ,, कृष्णाजी हरी दुधगांव | १८३ |
| ,, बाळकृष्ण विश्वनाथ वसई | १८६ |
| ,, गणेश परशराम देवरुख | १८६ |
| ,, माहादेव नारायण धुळें | १८६ |
| ,, रामकृष्ण विनायक अलीबाग | १ |

| | |
|---|---|
| ,, श्रीपाद रघुनाथ कवठेपिरान | १८६ |
| ,, गोविंद केशव निजामपूर | १८६ |
| ,, त्रिविक्रम रामकृष्ण रत्नागिरी | १८६ |
| ,, मोरेश्वर गोविंद हातकणगलें | १८६ |
| ,, त्रिंबक बळवंत निफाड | १८६ |
| ,, नारायण गणेश मनमाड | १८६ |
| ,, सखाराम बापु शेट ठाणे | १ |
| ,, बळवंतराव कृष्णाजी मुंबई | १ |
| ,, धोंडो विनायक माहीम | |
| ,, गोपाळ बेचरदास माहीम | १८ |
| ,, रामचंद्र महीपत माहीम | १८६ |
| ,, मोरेश्वर बळवंत सोलापूर | १८६ |
| ,, रामचंद्र विनायक इंदूर | १८६ |
| ,, माहादेव सखाराम वांई | १८६ |
| ,, आर. एन्. पारखे निजामपूर | १८६ |
| ,, हेड मास्तर निजामपूर | १ |
| ,, गणेश गोविंद नगर | १८६ |
| ,, कृष्णाजी बाबाजी रेवदंडा | १८६ |
| ,, शंकर मार्तंड गोऱ्हें | १८६ |
| (वामन सखाराम माहाजन मार्फत. | |
| रा०रा० कृष्णाजी विष्णु बोरवाडी | १८६ |

टिळक ग्रंथसंग्रहालय
दा. क्र. 14783
वाई जि. सातारा

# सद्धर्मदीप.

अंक २

## मृत्यु

नरा कर्मयोगें जगीं जन्म झाला परी शेवटीं काळ घेवोनि गेला ॥
महा थोर ते मृत्युपंथेंचि गेले अकस्मात ते जन्मले आणि मेले ॥

(रामदास)

या जगामध्यें जो प्राणी उत्पन्न झाला त्याला मृत्यु आहेच. स्थिरचरादि वस्तुमात्रासहि या मृत्यूचा घाला आहे. जेवढें दृश्यमान तेवढें सर्वच नाशिवंत आहे, मग आपल्या सुकृतदुष्कृतानुरूप जन्ममरणाचे फेरे घालणारे मनुष्याला मृत्यु विसरेल कसा? ईश्वरांशीं म्हणून जे पुरुष या भूतलावर उत्पन्न झाले, व ज्यांची अलौकिक कीर्ती जगामध्यें अजरामर होऊन राहिली आहे, त्यांसहि मृत्यूच्या दरबारांत जावें लागलें. प्रत्येक अपायावर कांहींना कांहीं तरी रामबाण उपाय असतो, पण या मृत्युरूपी भयंकर अपायावर कोणाची मात्रा चालणार नाहीं. ज्यांच्या दर्शनानें त्रिजगत् कंपायमान होतें, असे शूर, क्रूर व महाबलाढ्य प्राणी मृत्यूचें बलावणें येतांच हीनतेज, निर्बल व दीन होऊन क्षणांत नाहींसे होतात. औरंगजेब बादशाहानें आपल्या पराक्रमानें अगणित संपत्ती मेळवून सर्व देशभर आपला दरारा बसविला होता, पण जेव्हां मृत्यूचे दरबारांतील वारंट आलें तेव्हां त्याची ती अगणित सेना, अलोट संपत्ती, इष्टमित्र, बायकापोरें, आणि सर्व राज्य जागच्या जागीं राहून त्यास आपल्या आवडत्या देहाचाहि त्याग करून जावें लागलें. हा पुरुष मरण समयीं

आपली सर्व संपती डोळ्यां समोर आणण्यास सांगून तिजकडे पाहून रडला. काय मूर्ख बेटा, अशा शूर व धैर्यशाली पुरुषानें मृत्यु समीप आला असतां रडावें हें त्याचा अज्ञानीपणा उघड करण्या सारखें आहे. मृत्यूचें स्वरूप पाहून ज्याला भीति उत्पन्न होते तो ज्ञानी नव्हे. कारण, ज्ञानी लोक या मृत्यूविषयीं बेपर्वा असतात. मृत्यूची वेळा कोणाच्यानेंहि टळावयाची नाहीं. त्याला रंक व राव, शूर व भित्रा, ज्ञानी व मूर्ख, दरिद्री व श्रीमान, सार्वभौम सत्ताधीश व यःकश्चित् भिकारी, आणि वृद्ध व बाल, हे सर्वच सारखे असतात. याचें स्वरूप मोठें भयंकर आहे. ज्याच्या चरणीं हजारों मांडलिक राजे वंदनार्थ आपले किरीट ठेवितात त्या सार्वभौम राजास त्याच्या सिंहासनावरून कडेकोट बंदोबस्तांतून एक दम आपले ताबेंत घेण्यास मृत्युवांचुन दुसरा कोण समर्थ आहे? मोठे मी मी ह्मणणारे वीर आणि अवतारी पुरुष यांची या मृत्युनें क्षणांत रांगोळी करून टाकिली व टाकीत आहे. इहलोकच्या प्रवासामध्यें भाल दार चोपदार ललकारत पुढें चालत आहेत, बाजूला परिचारिका वारा घालीत आहेत, दोहों बाजूला मंत्रीजन हितगुजाच्या गोष्टी बोलत चालले आहेत, पुढल्या बाजूला बंदीजन स्तुतिपाठ गात आहेत, व प्रजाजन मोठ्या आदबीनें लवून मुजरा करीत आहेत, अशा थाटानें हिंडणारी राजबहादरांची स्वारी मृत्युरूपी जो परलोक प्रवास त्यास उद्युक्त होते तेव्हां आपली सुकृत दुष्कृत रूपी गठडी डोकीवर घेऊन त्यास येकटेंच जावें लागतें.

धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे भार्या गृहद्वारि जनः स्मशाने ॥
देहश्चितायां परलोकमार्गे कर्मानुगो गच्छति जीव एकः ॥

" मोठ्या यत्नानें सत्यासत्याचा विचार न करितां संचित केलेलें द्रव्य जगाच्या जागीं राहतें, मोठ्या काळजीनें बाळगलेले पशु गोठ्यांतच राहतात, सर्व मालमत्तेची व शरीराची स्वामिणी बनवून ठेविलेली जी प्रीतिपात्र भार्या ती गृहद्वाराशींच राहते, अनेक तऱ्हेनें ज्यांचें

रंजन केलें असा जनसमुदाय स्मशाना पर्यंतच येतो, अनेक पौष्टिक औषधींनीं पुष्ट राखलेला व सुगंधित द्रव्यांनीं मर्दून सतेज ठेविलेला देह चितेमध्यें रहातो, आणि शेवटीं आपल्या पापपुण्यानुरूप सुख दुख: भोगण्या करितां जीवाला येवढेंच जावें लागतें." मोठे संपत्तीमान, तपोधन, दीर्घायुषी, पराक्रमी, भगवद्‌दंशी, व पुण्यश्लोक हे सर्व एकएकटेच गेले. एका कवीनें ह्मटलें आहे—

रावणा सारीखी कोणाची संपत्ती । तोहि गेला अंतीं येकलाची ॥
येकलाचि गेला वाळी तो वान्नर । कपि थोर थोर तेहि गेले ॥
थोर थोर गेले थोरा वैभवाचे । फार आयुष्याचे ऋषेश्वर ॥
ऋषेश्वर गेले मार्कंडेया सारीखे । इतरांचे लेखे कोण करी ॥
कोण करी तरी शाश्वत आपुलें । कौरवांचें गेलें राज्य सर्व ॥
कौरव निमाले पांडव गळाले । यादव ते गेले येकसरें ॥
येकसरें गेले एकामागें एक । हरिश्चंद्रादिक पुण्यलोक ॥
पुण्यशीळ गेले कीर्ती ठेवोनीयां । पापी गेले वायां अधोगती ॥

तेव्हां अशीं मोठमोठीं जबरदस्त पार्डीं हं हं ह्मणतां मृत्युच्या मुखांत आर्पण झालीं. जे मेले त्यांस स्मशानांत पोंचवून त्यांच्या आप्तादिकांनीं रडत मागें यावें व कांहीं दिवसांनीं त्यांणींहि तीच जागा शोधीत जावें असा क्रम आहे. रामदासांनीं ह्मटलें आहे.

मरे येक त्याचा दुजा शोक वाहे ॥
अकस्मात तो ही पुढें जात आहे ॥

तेव्हां हें मृत्यूचें राहाट गाडगेंच आहे. जो जन्मास आला तो मरणार व मेला तो पुन: जन्मास येणार अशी ही परंपरा आहे.

पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननीजठरे शयनं ॥

अशा तऱ्हेचे जन्ममरणाचे क्लेश प्राण्यास भोगलेंच पाहिजेत. हे चुकणें महत्पुण्याईचें फल होय. शुका सारखे ब्रह्मनिष्ट, वसिष्ट वामदेवा सारखे

तपोनिष्ठ, व्यास वाल्मीका सारखे त्रिकालज्ञ, इंद्रायमरां सारखे चिरंजीव, आणि प्रत्यक्ष ब्रह्माविष्णु महेशासारखे परमेश्वरांशी यांच्या मागेंही उत्पत्ति स्थिति, आणि लय याचा फेरा आहे. ज्यांणीं आपणास महान साधु ह्मणवून घेतलें, जे स्वधर्मरक्षक ह्मणून जगांत प्रसिद्धीस आले, ज्यांणीं आपणास देवाचे पुत्र असें ह्मणवून लोकांत दांडोरा पिटला, जे जुने सगळे धर्म मोडून नवा एक धर्म स्थापित करण्याकरितां ह्मणून ईश्वराची आज्ञा घेऊन आलों असें सांगून लोकांमध्यें रक्तपात व द्वेष यांचीं समृद्धी करण्यास कारण झाले, व जे अनेक मतांचे आणि पंथांचे उत्पादक व गुरु ह्मणवून घेऊन शिष्यवर्ग गोळा करून जगाचे तारक बनले, त्या सर्वांना मृत्यूनें आपले दरबारांत नेण्यास सोडलें नाहीं. मृत्यूचे दरबारचें बलावणें टाळण्यास आजपर्यंत कोणीहि समर्थ झाला नाहीं व पुढें होणार नाहीं हा सिद्धांत आहे. वरील सर्व बहादरांस मृत्यूनें पटापट गोळा करून नेले. आणि त्यांना न जाऊन परिणामही नाहीं. कारण—

पीर मरे पैगंबर मरगये मरगये जिंदा जोगी ।
जपी तपी संन्यासी मरगये मरगयें हकीम रोगी ॥
जमका अजब तडाकाबे ॥ तूं क्या जाने लडका बे ॥ ध्रु ॥

तेव्हां याजवरून यमाजीपंताचा तडाका चुकविण्यास कोणीहि समर्थ होणार नाहीं. सर्वांस मृत्युवश व्हावें लागतें. मोठा शूर, धीर, व गंभीर पुरुष असला तथापि मृत्यू पुढें त्याची अक्कल गुंग होऊन जाते. मृत्यूचें स्वरूप फार भयंकर आहे. पण जंगलांतील मांसभक्षक जीं श्वापदें त्या यःकश्चित प्राण्यास मनुष्य जेवढा भितो तेवढा या मृत्यूचें स्वरूप जाणीत असतांहि भीत नाहीं.

व्याघ्रीव तिष्ठति जरा परितर्जयंति ।
रोगाश्च शत्रव इव प्रहरंति देहं ॥
आयुः परिस्रवति भिन्नघटादिवांभो ।
लोकस्तथाप्यहितमाचरतीति चित्रं ॥

"जरा वाघिणीसारखी पुढें डोकावून मनुष्याला भेडसाविते, रोग हे तर निर्दय शत्रू प्रमाणें देहावर प्रहार करितात, आणि. आयुष्य तर फुट-क्या मडक्यांतील पाण्याप्रमाणें निश्चशः झुरून जातें, अशी स्थिति असतांहि लोक दुष्कर्मे करून आपलें अहित करून घेतात हें मोठें आश्चर्य होय." असें हें आयुष्य क्षणभंगुर असतां व मृत्यू दिवसांची गणती करीत असतांहि या मायिक खटपटींत गुंतलेला जीव त्यास जाणीत नाहीं. अभोग्य वस्तुचे भोगानें, असंगसंगतीनें, पापाचरणानें व विषयादिकांचे लालचीनें मनुष्य आपल्या अमोलिक आयुष्याचें चीज न करतां व ईश्वराविषयीं विचार मनांत न आणतां मृत्युचे मुखांत पडतो. जगाची राहटी कांहीं विलक्षण व मौजेची असते, आणि तशांतून या मायामोहानें तर हें जग असें कांहीं वेडावलें आहे कीं त्यामुळें लोकांस दुःसह गोष्टी सुसह वाटतात, ज्यागोष्टी विषयीं दुःख करावयाचें त्या विषयीं आनंद व उत्साह करितात, आणि ज्या विषयीं उत्साह करावयाचा त्या विषयीं दुःख करीत बसतात. या मृत्यू विषयींहि लोक कसे बेपर्वा वागतात पहा. पुत्र मुख दृष्टीस पडणें ही संसारांत मोठी भाग्याची गोष्ट होय असी बहुत लोकांची समजूत आहे. आतां या समजुती विषयींहि बहुत मतभेद आहेत. वंशोद्धाराकरितां वास्तविक पुत्राचा उपयोग आहे ह्मणून अनेक राजांनीं मोठीं अनुष्ठानें व घोर तपश्चर्या करून पुत्रप्राप्ती व्हावी ह्मणून ईश्वरापाशीं वर मागितल्याचीं उदाहरणें पुराणादिकांत आहेत. पण, ज्या पुत्रा करितां अनेक नवस सायास करून पुढें बालपणीं त्याचें लालनपालन करण्यास हाडाचीं काडें करावीं, त्याच पुत्रास पुढें त्याच्या ऐन तारुण्यांत विषयसुखाची गोडी लागली ह्मणजे आपलीं वृद्ध व खोकड झालेलीं आईबापें निरुपयोगी झालीं असें वाटून तो त्यांचा कंटाळा व द्वेष करितो, व ज्या मुलाचा त्याच्या आईबापांना वृद्धपणीं पालन पोषणाला व वंशोद्धाराला आधार होईल असा भरंवसा असतो तोच कृतघ्न पोरगा त्या ह्मातार्‍यांस घरांतून हांकून देण्यास व शिव्यांची पुष्पांजली वाहण्यास कारणी

होता. असो, तें कसेंहि असलें तथापि पुत्र व्हावा ही इच्छा विशेषतः बहुतेकांचे ठिकाणीं असून बाललीला ही साधारण सर्वांसहि प्रीय होय. आतां जें उत्पन्न झालें तें लयास जाणार असा सिद्धांत असल्यामुळें आईबापांचा पुत्रही मृत्यूचा अधिकारी व्हावयाचा असतो. प्रत्येक दिवशीं त्याचें आयुष्य क्षीण होत असतें. घटका, दिवस, महिना, वर्ष, दहा वर्षें असा आयुष्याचा काळ कमी होत असतो. मनुष्याचें जीवित मान साधारण १०० वर्षें किंवा अलीकडील लोकस्थितीचे मानानें ६०। ७० वर्षें होय. तेव्हां मूल उत्पन्न होऊन महिन्याचें झालें ह्मणजे त्याच्या आयुष्याचा महिना कमी होतो ही गोष्ट वास्तविक मोठ्या दुःखाची होय. पण लौकिकाचार याच्या अगदीं उलट आहे. जसजसें मूल वाढत जातें तसतसा त्याच्या आईबापांस व पालकांस मोठा आनंद होतो व तन्निमित्त यथाशक्ति ते मोठा उत्साह करतात. पुढें तो तारूण्यांत येऊन संसार पाहूं लागला ह्मणजे हा काल तर आनंदाचा कळस आहे अशी समजूत असते. पण जशी जशी रात्र जास्त होत जाते तसा तसा नाटकाचा भाग आटपत येतो. तद्वतच मनुष्याचें जीवित आहे, याच्या निरानिराळ्या अवस्था त्यास वेगवेगळया स्थितींत नेतात. उपज ल्यापासून तों मृत्यूचे भयंकर जबड्यांत पडे पर्यंत त्याचे सर्व व्यापार संसार संबंधीं असतात. यामुळें त्यास मृत्यूचें स्वरूप आहे काय? या जन्ममरणाचे फेरे चुकतील कशानें? हे फेरे घालवणारा व मृत्यूचा शास्ता कोणी आहे कीं नाहीं? तो भेटेल कसा? इत्यादि पारमार्थिक विचार करण्याचीच त्याला फुरसत होत नाहीं. त्याच्या आयुष्याची जशी काय संसाराकडे वांटणीच करून दिली असते:—

> बालपनोंमे खेल बताया । तारूनपनमों काम ॥
> बुड्ढेपनमों कांपन लागा । निकल गये अवसान ॥
> अबतुम कब सुमरोगे राम ॥

तेव्हां अशा तऱ्हेनें या मृत्यूनें सर्व जीवांना ग्रासून टाकिलें आहे. हे विषयोपभोग तर मनुष्याला सोडीत नाहींत. बरें मृत्यूची तरी तशी कांहीं ठरींव मुदत नाहीं, तर बुवा त्या प्रमाणें आपलें कांहीं दिवस संसारांत चैनीनें घालवून मग परमेश्वराकडे लक्ष लावून मृत्यूचें स्वरूप ओळखावें. हा मृत्यू तर गर्भांत देखील आपली सत्ता चालवतो. तेव्हां आतां पुढें कसें करावें, अशी या मृत्यूचा विचार करूं लागलें असतां सहजी काळजी उत्पन्न होते.

मृत्यूनें कोणाला सोडलें नाहीं ही गोष्ट तर निर्विवाद आहे. पण जसें जेवलें असून न जेवल्यासारखें, कांहीं कृत्य केलें असून न केल्या सारखें, अशी कांहीं तोडजोड असते तशी मृत्यू विषयींहि आहे. कांहीं पुरुष मेलेले असून न मेल्या सारखे आहेत असें आपण समजतों. देहाला चेतनारहित करावें येवढाच कायतो मृत्यूचा अधिकार, ह्मणून चेतना ह्मणजे जीव नाहींसा करण्यास मृत्यू समर्थ आहे काय? कधींही होणार नाहीं. देहांतर हेंच वास्तविक जन्ममरण होय. एका देहाला टाकणें हा मृत्यू आणि दुसऱ्या शरीराचा अंगिकार करणें हें जन्म. कल्पना करा, एखाद्या मनुष्याचें आंगावरील जवाहीर चोरांनीं लुटून नेलें. पुढें तो मनुष्य मला लुटून नेला असें ह्मणून जर रडत बसला तर त्यास मूर्ख कोण नाहीं ह्मणणार? कारण, तो जर शाबुद आहे तर आणखी पाहिजे तेवढें जवाहीर मिळवून अंगावर घालील. तद्वत मृत्यूनें देहावर घाला घातला ह्मणून ज्ञानी आहे तो मी मेलों असें ह्मणेल काय? कारण ज्ञात्याची देहावर मी देही ही भावना नसते. एक घर मोडलें पडलें, किंवा जळालें तर त्यांत राहणारा जसा दुसऱ्या घराचा अंगीकार करतो,किंवा विरागी होत्साता खुशाल दिगंबरवृत्ती धारण करून ईश्वरपदीं लीन होतो, तद्वत जीव या देहाचा त्याग करून आपल्या पापपुण्यानुसार अन्य शरीरांचा अंगीकार करतो, किंवा मुक्तहोत्साता ईश्वररूपीं लीन

होतो. परंतु अज्ञानानें मायेमध्यें गुंतून मी बाल, मी तरुण, व मी वृद्ध अशा या दैहिक आवस्था आपणावर कल्पून स्वतः अविनाशी असतांहि जन्ममरणाचे क्लेश मलाच होतात असें मानतो. या आवस्था जर जीवाच्या असत्या तर त्या सर्व काळ कायम राहत्या, पण तसें घडत नाहीं. देह जसा जसा जीर्ण होत जातो तसतशी विषयादि भोगांची इच्छा व अभिमान हे नष्ट होतात. पण जीवाचे व्यापार यत्किंचितहि कमी न होतां अज्ञानी पुरुषाचे तर ते फारच वृद्धींगत होतात. देहाच्या क्रिया राहात आल्या ह्मणजे अज्ञानी जीव मृत्युला भिऊं लागतो—

निवृत्ता भोगेच्छा बहुपुरुषमानो विगलितो ।
समाना स्वर्याताः सपदि सुहृदो जीवितसमाः ॥
शनैर्यष्ट्युत्थानं घनतिमिररुद्धे च नयने ।
अहो दुष्टः कायस्तदपि मरणापायचकितः ॥

"विषयादि भोगांची निरीच्छा झाली, पौरुषत्वाचा मोठा अभिमान होता तो गळून गेला, समवयस्क होते ते सर्व स्वर्गास निघून गेले, प्राणप्रिय जे मित्र तेहि नाहींसे झाले, काठीच्या आधारानेंहि उभें राहण्याची पंचाईत पडूं लागली, व डोळयां पुढें भयंकर अंधारी येऊं लागली, अशी या देहाची स्थिती झाली तथापि मरणाचा घात मानून जीवाला मोठी भांति वाटते" हें जीवाचें केवढें अज्ञान? जुनें मोडकळीस आलेलें घर, आतां पडेल किंवा घटकेंत तरी कोसळेल अशा स्थितींत आलें असूनहि तें सोडून जाण्या विषयीं जर एखाद्यास वाईट वाटलें, तर त्यास कोणी मूर्ख ह्मणणार नाहीं काय? आतां मनुष्याचा जर घरांतच राहण्याचा हेतु असेल तर त्यानें त्या जीर्ण घराचा त्याग करून नवीन सुखावह असें घर कोठें मिळेल याच्या तयारीस लागलें पाहिजे. तसेंच जीवानें जीर्ण झाले ल्या देहाचे मोहांत न पडून आपल्या पुढील सोयीचे मार्गास लागावें. तो मार्ग ह्मणजे पारमार्थिक विचार होय. आणि तो देह सतेज असतांच करावयास पाहिजे. नाहीं तर एक घर मोडल्या नंतर दुस

त्याचे तयारीस लागणारा मनुष्य जसा तें मिळे पर्यंत उन्हानें तापतो, थंडीनें कुडकुडतो, पावसानें भिजतो, व शेवटीं एखादे झोंपड्यांत कसा तरी निर्वाह करितो, तद्वत अज्ञानी जीव देहविसर्जना नंतर अनेक यातना भोगून शेवटीं पश्वादिकांचे देहाचा आश्रय करितो, साधारण प्रपंचामध्यें देखील जर अशी आगाऊ तजविज ठेवावी लागते तर मग परमार्थाचे मार्गांत तर तिज विषयीं किती सावध असलें पाहिजे हें सहज लक्षांत येतें. तेव्हां हे विचार ज्ञानी आहे तो नेहमी करीत असतो. ज्ञानी जीव देहावसाना नंतर ज्या गोष्टींची जरूर पडणार त्याची आगाऊ तयारी करीत असतो. तो मरण्याची वाटच पहात बसतो. मरण समयीं त्यास कांहीं करावयाचें नसतें. पण अज्ञानी जीवाला स्वतःचे देहाचीच काळजी असते. जसजशी वृद्धावस्था होत जाते तसतसे देहाचे व्यापार मंद पडून तो सर्व लोकांचे अप्रीतीस व तिरस्कारास पात्र होतो. पण अज्ञानी जीवाला तर त्याची फारच आसक्ति उत्पन्न होते, वृद्धावस्थेंत देहाची स्थिती कशी होते याविषयीं भर्तृहरीनें एके ठिकाणीं सांगितलें आहे:—

गात्रं संकुचितं गतिर्विगलिता भ्रष्टाच दंतावली ।
दृष्टिर्नश्यति वर्धते बधिरता वक्त्रं च लालायते ॥
वाक्यं नाद्रियते च बांधवजनैर्भार्या न सुश्रूषते ।
हा कष्टं पुरुषस्य जीर्णवयसः पुत्रोप्यमित्रायते ॥

“ देहास चिरम्या पडून तो विशोभित झाला, चालतांना पायांतपाय गुंतूं लागले, दंतपंक्ति पडून गेली, दृष्टी मंद झाली, कर्णांचे ठायीं बधिरता आली, तोंडांतून लाळ पडूं लागली, आप्तसोयरीं उपमर्द करूं लागलीं, भार्या कंटाळून सेवा करीनाशी झाली, व पुत्रहि शत्रू प्रमाणें वागूं लागले, तस्मात ही वृद्धावस्था फार दुःखकारक होय. ” अशी ही अवस्था तिरकृत असतांहि अज्ञानी जिवाला तिचा कंटाळा न येतां त्यास

संसार संबंधी गोष्टींचा जास्त हव्यास सुटतो. वृद्धावस्थेमध्यें देहावर आलेली मलीनता जीव आपल्यावर बळेंच ओढून घेतो; व आतां मी मरणार अशी धास्ती उत्पन्न होते. अशा काळजीनें तर त्याच्या ऐहिक व पारमार्थिक विचारांचा सर्वच गोंधळ होऊन जातो. त्यास चोहोंकडे मृत्यूचे भयंकर स्वरूपावांचून दुसरें कांहीं दिसत नाहींसें होतें, त्याला अन्न गोड लागत नाहीं, निद्रा येत नाहीं, बुद्धी भ्रष्ट होऊन जाते, व आतां काय करूं आणि कोठें जाऊं या विषयीं तो गूढांत पडतो. अशा वेळीं त्यास परमेश्वराचे अगाध शक्तीचें आणि पवित्रतेचें ज्ञान कोठून होणार? त्याला मरण समयीं काळजी काय ती सर्व ऐहिक पसारा पसरलेला असतो त्याचीच उत्पन्न होते. मरणसमय जवळ आला असतां अज्ञानी जीवाला पुढील विचार सुचूं लागतात—माझे मुलगे एक विचारानें कसे वागतील, माझ्या संपत्तीचें रक्षण कसें होईल, बायकोचें संरक्षण कोण करील, नातवंडांचीं लग्नें वगैरे कशीं पार पडतील, अपुरें राहिलेलें सातखणी इमारतीचें काम पुरें कसें होईल, नुकताच गाहाण घेतलेला पांच लक्षांचा गांव पदरांत कसा पडेल, हजार रुपयांस खरेदी केलेली आरबी घोड्यांची सुंदर जोडी गाडीला शिकवून कोण तयार करील, माझ्या मुलीचें माझ्या मागें कसें होईल, जांवई काय करील, बाप कोठें जाईल, इत्यादि गोष्टींचे काळजींत जीव अगदीं गढून व घाबरून जातो. यामुळें देहावसाना नंतरहि त्यास आपली इच्छा तृप्त करण्या करितां पुन: अन्य शरीर धारण करणें भाग पडतें. ह्मणजे अंतकाळीं ज्याप्रमाणें त्यास इच्छा होते तदनुसार त्यास गती व्हावयाची— "अंते मतिः सा गतिः"—असा सिद्धांत आहे. याजवर कित्येक लोकांचें असें ह्मणणें पडतें कीं, मरण समयींच्या इच्छेनुरूप जर मनुष्यास गती मिळते तर मग उगाच जन्मभर यातायात करून आणि ईश्वर भजनाचा निजध्यास धरून व्यर्थ क्लेश कां भोगावे? अंतकाळ येईपर्यंत विषयादि भोगांचा मनसोक्त उपभोग घ्यावा व शेवटीं मरण समयीं तेवढें ईश्वराकडे एकाग्रतेनें

मन लावावें व ईश्वरप्राप्तीची इच्छा धरावी ह्मणजे झालें. असा हा मुक्तीचा सिधा रस्ता असतां उगाच जपतपादि खटपटींत पडून देहाला श्रम काय ह्मणून द्यावे? तशांतून हा देहतर मृत्यूच्याच तोंडांत पडणार, सुगती किंवा दुर्गती यांचा भोगणारा ह्मटला ह्मणजे जीव, आणि तो तर इच्छेनुरूप मुक्त होणारा, तेव्हां त्या करितां व्यर्थ देहाचे भोग त्यास कां न भोगुं द्यावे? मृत्यु आला असतां देहाची रांगोळीच होणार, मग त्यांत सामर्थ्य आहे तों पावेतों विषय सुखाचा तरी यथेच्छ अनुभव घ्यावा. हे लोक बहुधा—

भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ॥
तस्मात् सर्व प्रयत्नेन ऋणं कृत्वा घृतं पिब ॥

अशा प्रकारच्या मतांचे असतात. पण त्यांचें हें मत फार चुकीचें असून दुनया जर अशाच झोंकावर जाईल तर थोडक्याच मुदतींत ब्रह्मदेवाला रिकामा बसण्याचा प्रसंग येईल. "अंते मतिः सा गतिः" हें वचन खरें आहे. पण अंतकाळीं तशी अनुकूल इच्छा होण्याला कांहीं तरी साधन पाहिजे. मनुष्याचें मन सर्वदा या संसारांत व्यग्र असतें, आजचें काम शिलक राहिल्यास तें उद्यां करीन असा भरंवसा असतांहि मनुष्यास ईश्वराकडे घटकाभर देखील वेळ खर्च करण्याची इच्छा होत नाहीं, मग जेव्हां हें सारें जग सोडून जावयाचा प्रसंग येणार व हरयेक प्रियकर वस्तूंचा वियोग होण्याचा समय येणार, तेव्हां त्यावेळीं या संसार संबंधीं गोष्टींत मनुष्याचें मन किती गुंतून जाईल बरें? ईश्वराकडे त्याचें चित्त एकाग्रतेनें लागणें हें तर राहूंद्या, पण त्यास त्याचें नुसतें स्मरण देखील होणें दुर्लभ होय. याकरितां नेहमी त्याचा अभ्यास ठेविला पाहिजे. नित्यशः ईश्वर भजना मध्यें कांहीं काल तरी अवश्य गेला पाहिजे. नित्यशः ज्ञानप्राप्तीकडे लक्ष देऊन त्या ज्ञानसंपादनानें विषयादि भोगांपासून मनाचें आकर्षण केलें पाहिजें मृत्युचा कांहीं नियम नाहीं. तो क्षणांत जीवाला घे

ऊन जाईल य.करितां जीवाचें कल्याण करण्या विषयीं विलंब करतां उपयोग नाहीं. जों पर्यन्त सर्व इंद्रियें सुदृढ आहेत, विचार शक्ती जागरूक आहे, सृष्टिजन्य अनेक चमत्कार अवलोकन करून त्या पासून ईश्वराचे अतर्क्य शक्तीची कल्पना करण्या विषयीं नेत्र आणि मन समर्थ आहेत, तों पावेतोंच आत्मिक कल्याणाच्या मार्गास लागलें पाहिजे. मनुष्यास मृत्यु हा केव्हां तरी येणारच, मग त्याची येवढी भीती ती कशाला? शरीर हें शुद्ध भाड्याचें घर आहे, त्याच्यावर स्वात्मत्व मानणें हा वेडेपणा होय. तसेंच तें मृत्यूधीन झालें म्हणून शोक करण्याचेंहि कांहीं कारण नाहीं. जगन्नियंत्यानें सर्व भाविक व पुण्यवान लोकां करितां आपलें स्वतःचें सुंदर व अविनाशी घर खुलें ठेविलें आहे. तें अफाट व अवर्णनीय आहे. ईश्वराचे प्रत्येक भक्ताची त्याजवर सत्ता आहे, ज्या पुण्यपुरुषास तें घर दिसूं लागेल तो या जडदेहाची पर्वा करणार नाहीं. त्याला मृत्यूची भिती वाटत नाहीं. कारण तो मृत्युरूपी अग्नीला आपल्या जड देहाची आहुती देऊन त्यास शांत करितो असा जो पुरुष तोच खरोखर धैर्यवान होय. पण अशी देहा विषयीं बुद्धी होण्यास इंद्रियांचें नियमन झालें पाहिजे. वृद्धपणीं हें करीन म्हटलें तर चालत नाहीं, इंद्रियें विगलित झालीं म्हणजे जीवाला त्यांपासून व्हावी तशी मदत होत नाहीं. मृत्यू तर केव्हां येईल याचा मुळींच नेम नाहीं. या करितां आत्मिक कल्याणाचे मार्ग शोधण्यास त्वरा केली पाहिजे. कारणः—

> यावत् स्वस्थमिदं शरीरमरुजं यावज्जरा दूरतो।
> यावच्चेंद्रियशक्तिरप्रतिहता यावत् क्षयो नायुषः ॥
> आत्मश्रेयसि तावदेव विदुषा कार्यः प्रयत्नो महान्।
> संदीप्ते भवने तु कूपखननं प्रत्युद्यमः कीदृशः ॥

"जेथपर्यन्त हें शरीर निरोगी व स्वच्छ आहे, जेथपर्यन्त वृद्धावस्था प्राप्त झाली नाहीं, इंद्रीयांची शक्ति कमी झाली नाहीं, व आयुष्याचा क्षय

झाला नाहीं, तों पर्यन्तच मनुष्यानें आत्मकल्याणाचा यत्न करावा. नाहीं पेक्षां घराला आग लागली असतां विहीर खणण्याचा यत्न जसा निष्फळ होतो तद्वत सर्व प्रयत्न होतील." यावरून मनुष्यानें मृत्यूची मुळींच पर्वा करून उपयोग नाहीं. सहजरीत्या जे भोग प्राप्त होतील ते भोगून सर्वदा आत्मकल्याणाचा मार्ग शोधीत असावें. तें आत्मकल्याण ईश्वरी ज्ञानावांचून व त्याच्या प्रसादा वांचून होणार नाहीं. या करितां सर्वदा ईश्वराचे ध्यानांत व सेवेंत निमग्न असावें हा मनुष्याचा धर्म होय. जो ज्ञानी आहे त्याणें मृत्यूची धास्ती काय ह्मणून बाळगावी? कारण तो उप जल्या प्राण्याचे पाठीस आहेच. सर्वदा सदाचरणानें वागून कीर्ति संपा दन करावी. ज्याची कीर्ति अजरामर आहे त्यास लोक जीवंत आहे असें मानतात. आणि जो दुराचरणानें वागतो तो जीवंत असून मृत होय "अद्यैव वा मरणमस्तु युगांतरेवा ॥ न्यायात् पथः प्रविचलंति पदं न धीराः", जे गंभीर मनाचे पुरुष असतात ते मरणाची पर्वा न करितां नीतीनें वागून कीर्ति संपादन करितात, समर्थांनीं ह्मटलें आहे—

> देह त्यागितां कीर्ति मागें उरावी॥
> मना सज्जना हेचि क्रीया करावी॥

देहावसानानंतर जगांत ज्याची सत्कीर्ति कायम राहते तो पुरुष चिरं जीव होय, त्याणें मृत्यूला जिंकिलें असें समजावें.

---

# ब्रह्मद्वेष

ब्राह्मणांचे श्रेष्ठत्वाबद्दल कित्येक लोकांचें असें ह्मणणें असतें कीं, पूर्वींचे ऋषी वगैरे विद्वान, तपोनिधी, परम दयाळू, ज्ञानसंपन्न, विरागी, व परोप कारी असून त्यांचे आंगीं " शापादपि शरादपि ,, असा पराक्रम असे. यामुळें ते पूज्य मानले जात असत. परंतु प्रस्तुतचे ब्राह्मण हे ज्ञानहीन कर्मभ्रष्ट व तेजहीन झाल्यामुळें त्यांस तसा मान देणें योग्य नाहीं. हल्लीं च्या ब्राह्मणांपेक्षां परभु, शेणवी, वाणी, वगैरे लोक जास्त विद्वान असून युरोपियन लोक तर शेंकडोंपट त्यांच्यापेक्षां जास्त ज्ञानी आहेत. तेव्हां आतां त्यांस पूर्वीप्रमाणें काय ह्मणून श्रेष्ठत्व द्यावें? असे उद्गार बहुधा सर्वत्र ऐकू येतात, आणि ब्राह्मणांचा उपमर्द होण्यास व ते दिवसें दिवस आश्रय रहित आणि दीन होण्यास हेंच कारण आहे अशी लोकांची समजूत झाली आहे. लोकांना असें वाटण्याचें कारण येवढेंच कीं, हिंदुस्थान देशांत ब्राह्मणकुलामध्यें उत्पन्न झालेले लोक तेवढे मात्र ब्राह्मण, आणि बा कीचे पृथ्वीवरील सर्व लोक नीच ह्मणजे ब्राह्मण नव्हत अशी साधारण समजूत आहे. पण हीच मोठी चूक आहे. या निबंधाचे आरंभींच गेल्या अंकांत आह्मी शुक्राचार्याचें हें पुढील मत दिलें आहे—

न जात्या ब्राह्मणश्चात्र क्षत्रियो वैश्यरेवन ॥
न शूद्रो नच वै म्लेंच्छो भेदिता गुणकर्मभिः ॥

"ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे कोणीहि जातीनें होत नाहींत. ह्मणजे ब्राह्मणाची संतती ते सर्व ब्राह्मण, क्षत्रिया पासून झालेले ते क्षत्रिय, वैश्या पासून उपजलेले ते वैश्य आणि शूद्रा पासून झालेले ते शूद्र, असा प्रकार नसून सर्व मनुष्यांमध्यें गुणकर्मावरून भेद झाले आहेत" आणि वास्त विक रीतीनें पाहिलें असतां हाच न्याय खरा आहे. अशा मार्गानें निव डलेले ब्राह्मणांचा अपमान करणें व त्यांचें तेज नष्ट करण्याचा यत्न करणें हें सूर्याचें पिलूं गवताचे गंजींत लिकवून ठेवण्या सारखें आहे. वरील

आचार्योक्ती वरून व गेल्या अंकांत पुरुष सूक्तांतील वचन दाखल केलें आहे त्याजवरून चार वर्णांतच सर्वांचा समावेश होतो. अनेक जाती व त्यांचे पोट भेद मानणें हा शुद्ध वादविषय आहे.वास्तविक रीतीनें या चार वर्णांचे बाहेर जातीसंबंधानें जावेंच लागत नाहीं. जो मनुष्य शांत, स्वधर्मनिष्ठ, शुचिर्भूत, दयाशील, व वेदशास्त्रपारंगत असतो त्यास ब्राह्मण ह्मणतात; शूर, महत्वा कांक्षी, पराक्रमी, साधूंचें पालन करण्या विषयीं तत्पर, दुष्टांचा शास्ता, गंभीर, उदार, राजकार्य धुरंधर; व मसलती पुरुषाचा क्षत्रिय ह्मणतात व्यापार धंदा करून उपजीविका करणारे, कृषिकर्म करणारे,धन धान्य संग्रहा विषयीं दक्ष, व स्वकर्मसक्त अशा पुरुषांस वैश्य ह्मणतात, केवळ दासपणा स्वीकारून उपजीवन करणारे, विद्याशून्य, व अज्ञानी लोकांस शूद्र ह्मणतात, आणि तामसी, निर्दय, स्वधर्मभ्रष्ट, दुराचारी, छलक, सारासारविचार रहित, जे पुरुष त्यांस म्लेंच्छ ह्मणतात. हा पांचवा वर्ग निंद्य गणलेला आहे. हे जे वर चार वर्ण सांगितले यां पैकीं ब्राह्मणांनी तीनहि, वर्णांस विद्यादिकांचे योगानें ज्ञानी करून न्याय नीति व वर्णव्यवस्था वगैरे संबंधानें पृथ्वीपतीचें सहाय करावें. क्षत्रियांनीं ब्राह्मणांचें पालन करून राज्यभार वहावा व अनेक परोपकाराचीं कृत्यें करून दुष्ट लोकां पासून सर्व प्रजेचें संरक्षण करावें. वैश्यांनीं क्रयविक्रयादिकांचे योगानें लोकांस मदत करावी. व शूद्रांनीं दासता स्वीकारून तीनहि वर्णांचे आज्ञेंत राहावें, आणि या चारी वर्णांनीं म्लेंच्छ लोकांचें निर्मूल करण्याविषयीं ऐक्यतेनें झटावें. ही वर्णव्यवस्था करण्याचें काम महान सत्ताधीश जो पृथ्वीपति त्याणें ब्राह्मणांचें सहायानें करावी. ज्या देशांमध्यें अशी व्यवस्था चालू असल तो देश व त्यांतील लोक खरोखर धन्य होत. या भरतखंडांतील महान ऋषी जेव्हां अशा व्यवस्थेनें आणि दक्षतेनें वागत होते, तेव्हां ते किती पराक्रमी आणि भाग्यशाली होते हें पुराणादिका वरून सर्वांस ठाऊक असेलच. पण ही व्यवस्था लक्षांत ठेऊन वागणें फार दुर्घट आहे. आणि याचमुळें ती मोडली गेली असावी. कारण, "बडे बापका

बडा बेटा" असा प्रकार सर्वांना अनुभूत आहे. तेव्हां वरील न्यायानें याचे उलट वागण्याचा प्रसंग येईल, इतकेंच नव्हे, पण तशी वर्ण व्यवस्था करावयाची झटली ह्मणजे राजपुत्राचे आंगीं राज्य चालविण्याची योग्यता असल्या वांचून त्यास गादीवर बसवितां येणार नाहीं. पण वैभवानें धुंद झालेल्या व पुत्र मोहानें वेडाळलेल्या किती राजे लोकांस बरें ही व्यवस्था पसंत पडेल? आमच्या मतें असा सत्याचा निःसीम भक्त जेथें उत्पन्न होईल तो खरोखर पुण्यभूमि होय. अस्तु, मिळून तात्पर्य काय कीं, अशाच योगानें पूर्वोक्त वर्णव्यवस्था ढांसळली.. आणि शेवटीं देशपरत्वें, आचार परत्वें, आणि धर्माभिमान परत्वें, लोकांमध्यें अनेक जाती व त्यांचे पोटभेद उत्पन्न होऊन सर्वच गोंधळ झाला. व त्या योगानें कलह वाढून लोक पराधीन, दरिद्री, व दीर्घद्वेषी झाले. हा प्रकार आमच्या देशांत फारच बळावला. आमच्या देशांत या चार वर्णां पैकीं प्रत्येक वर्णांत श्रेष्ठ कनिष्टपणा मानून लोक एकमेकांचा हेवा करतात. अस्तु.

प्रकृत विवेचनावरून ब्राह्मण कोणास ह्मणावें हें वाचकांचे लक्षांत आलेंच असेल. आतां याजवर कित्येक लोकांस अशी शंका येईल कीं, पूर्वोक्त गुणांनीं युक्त मनुष्य नसेल तर त्यास त्याच्या वर्णाप्रमाणें मान मिळू नये असें याजवरून सिद्ध होतें. पण ही चूक आहे. शंभर नंबरी सोनें असलें तरच त्यास सुवर्ण ह्मणतात. आणि त्यापेक्षां निरस असेल त्यास तांबें ह्मणतात असा प्रकार व्यवहारांत कधीं कोणी पाहिला आहे काय? सुवर्ण निरस झालें तथापि उत्तम चांदीच्या दरानें देखील मिळणार नाहीं, मग त्याहून कनिष्ट धातूंशीं तर त्याची बरोबरचि करावयास नको. मनुष्य कांहीं सर्वगुणसंपन्न नाहीं. याकरितां ज्याची जशी योग्यता असेल तद्वत त्यास मान देणें हें रास्त आहे. येथें हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, साखरलिंबाचे बीजापासून तज्जातीय झाड उत्पन्न होणें जितकें संभवनीय व सुलभ आहे तितकें इर्डीला मालमसाला घालून होणार नाहीं.

हाच प्रकार जाती संबंधानें. याच्या विरुद्ध कधीं कधीं एखादें उदाहरण मिळतें पण त्यास "तुळशींत भांग किंवा भांगेंत तुळस "असें ह्मणण्याचा परिपाठ आहे. अलीकडे ब्राह्मण लोक स्वधर्म भ्रष्ट, तेजहीन, निर्बल, व दुराचारी झाले असें बहुत लोकांचें ह्मणणें आहे पण तें अज्ञान मूलक होय. अ तां कदाचित् पूर्वींच्या मानानें तसे तेजस्वी व विद्वान तितके लोक सां प्रत नसतील, तथापि त्यास अनेक कारणें आहेत, व खेरीज हा प्रकार कालमहिम्याचाहि आहे. याकरितां उगाच ब्राह्मणांचा द्वेष करणें व त्यांस दूषण देणें हें सर्वथा अयोग्य होय.

अलीकडे आमच्या इंग्रज सरकारचे बडे अधिकाऱ्यांनीं व त्यांचे सजा तीयांनीं या देशांतील ब्राह्मणांवर बरेंच हातेर धरलें आहे. ब्राह्मणांचा यांस दिवसें दिवस जास्त कंटाळा येत चालला आहे . त्यांजवर अलीक डे राजद्रोहाचा वृथा आरोप आणून कित्येक मूर्ख विनाकारण त्यांस दूषण देत आहेत. नीच जातीच्या लोकांस शिक्षण देऊन त्यांस मोठाल्या जागा व अधिकार देण्याची सरकारचे अधिकाऱ्यांस हौस वाटते. हा प्रकार सत्ता वन सालापासून वाढत चालला आहे, आणि याचें कारण पाहूं लागलें असतां सत्तावन सालचें बंड. नानासाहेब हा ब्राह्मण असून त्याणें इंग्रज सरकारच्या विरुद्ध बंड केलें व सरकारला त्रास दिला हा प्रस्तुतच्या ब्र ह्मद्वेषाचा मुळ पाया, तेव्हांपासून हा प्रकार वाढत जाऊन प्रस्तुतच्या फड क्याचे धामधुमी पासून व पुण्याचे जुनाट भव्य वाड्यांस आग लाविल्या पासून तर हा ब्रह्मद्वेष बहुतेक शिखरास लागत आला आहे. या फडक्या नें लुटालूट करून रयतेला तर पुष्कळच नागविली, पण याहीपेक्षां त्याणें ब्राह्मणाचे मागें चांगलेंच सुदर्शन लावून दिलें. ब्राह्मणांनीं बंड केलें किंवा सरकारावर शस्त्र उचललें यामुळें ब्राह्मण जाती राजद्रोही झाली असें ज्यां स वाटतें व ते तसें ह्मणतात, त्यांस ब्राह्मण ह्मणजे काय हेंच समजत ना हीं असें आह्मी ह्मणतों. कारण, नानासाहेब व फडक्यादिक हे जरी ब्राह्म णांमध्यें व ब्राह्मणापासून उत्पन्न झाले आहेत, तथापि ते गुणकर्मावरून

खरोखर क्षत्रीय ठरतात. आणि क्षत्रियाचे कर्मा प्रमाणें त्यांणीं जी धामधूम केली व करीत आहेत ती निंद्य आहे असें ह्मणतां येत नाहीं. आतां त्यांच्या यःकश्चित् धामधुमीला सरकारनें जुमानिलें नाहीं, हल्लींहि जुमानीत नाहीं, व पुढें जुमानणार नाहीं हें उघड आहे. तसेंच सरकारनें त्यांची खोडहि चांगली मोडली हा अनुभव सर्वत्रांस आहे. परंतु आज या देशच्या कोट्यावधी ब्राह्मण जातींत तसे दहा पांच लोक निघाले ह्मणून तेवढे जमेस धरून सगळया जातीचा द्वेष करणें हें प्रस्तुतच्या न्यायी सरकारचे कामदारांस व त्यांच्यामुळें सरकारचे योग्यतेस अति निंद्य होय. क्षत्रियांनीं परस्परांवर शस्त्रें उचलावीं व ज्याच्यामध्यें अधीक सामर्थ्य असेल त्याणें दुसऱ्याची खोड मोडावी ही परंपराच आहे. मग असले पुरुष कोणत्याही जातींत असले तथापि ते लिकून राहात नाहींत. आतां ब्राह्मणामध्यें लुटारू लोक उत्पन्न झाले ह्मणून जर ती जातीच तिरस्काराला कारण होत असेल तर असलीं उदाहरणें सर्व जातींत मिळतील. खुद्द लंडनमध्यें राजघराण्यांतील पुरुषांवरहि तेथच्या लोकांनीं हात उचलून राजद्रोह दाखविलेला प्रसिद्ध आहे. मग तेहि सर्व लोक निंद्य ठरले जावे. पण असें उदाहरण कोठेंच मिळणार नाहीं. तें कशाला पण सतावन सालच्या वंडांत तरी सर्वच ब्राह्मण नवते. मग जितक्या जातीचे लोक ते वेळीं सरकारचे विरुद्ध होते त्या सर्वच जाती राजद्रोही ह्मणाव्या व मानाव्या. पण तसें मुळींच जालें नाहीं. तसेंच प्रस्तुतचा फडक्या• ब्राह्मण असून त्याचे योगानें हल्लीं ब्राह्मण जाती द्वेषास कारणी झाली आहे, याचा विचार करूं लागलें असतां, चालू धामधुमीचा मुख्य पुढारी हरी रामोशी होता हें मनांत येतें, व त्या मुळें ब्राह्मणांपेक्षां शूद्र लोक खरोखर राजद्रोही होत असें ह्मणण्याचा प्रसंग येतो. आणि तसें मानलें ह्मणजे शूद्र जातीचे सर्व लोक सरकारचे नौकरींतून आणि आश्रयांतून काढून टाकावे लागतील. पण अशा तजवीजीला लागल्यावर काय स्थिती होईल याचा विचार करण्याचें फारसें कठीण

नाहीं. तसेंच प्रस्तुत जो दरबारी पुरुषांनीं ब्रह्मद्वेष सुरू केला आहे, त्या वरून परभू शेणवी वगैरे लोकहि यां द्वेष्यमालिकेंत वास्तविक गणले गेले पाहिजेत. कारण, वर्णाश्रम धर्माचे मानानें ब्राह्मणांमध्यें मोडली जाणारी मंडळी आमच्या देशांत प्रस्तुत बरीच आहे. याचें कारण कालमहिमा होय. हल्लींचा काल एतद्देशीय लोकांस ब्रह्मज्ञानाचा विचार करण्यास व आत्मकल्याण करून घेण्यास फार अनुकूल आहे. कारण, आमचें सरकार सर्व जातीच्या लोकांकडून यथेच्छ विद्यामृतपान करवितें त्या योगानें त्यांचीं कर्मेंद्रियें गलित होऊन ज्ञानेंद्रियें ब्रह्मज्ञानांत अशीं तल्लीन होऊन गेलीं आहेत कीं, जसे सर्व लोक घटकेंत सायुज्यपदाला जातील अशा योग्यतेस आले आहेत असें कोणास वाटेल—

कस्यचित् किमपि नो हरणीयं मर्मवाक्यमपि नोच्चरणीयं ॥
श्रीपतेः पदयुगं स्मरणीयं लीलया भवजलं तरणीयं ॥

हा अनुभव हल्लीं आमच्या देशांत बराच पहावयास मिळेल. आतां या सुखांत दुःख ह्मणून इतकेंच कीं, अशा या अनुकूल कालामध्यें ब्राह्मणांचा द्वेष सरकार विनाकारण करीत आहे. जें सरकार लोकांना ज्ञानी करण्या विषयीं हजारों रुपये खर्च करितें त्याच सरकारनें ज्ञानी (ब्राह्मण) लोकांचा द्वेष करावा हें आश्चर्य होय. आणि या द्वेषाचें कारण काय तर ते राजद्रोही आहेत हा त्यांच्यावर आरोप. बरें, ब्राह्मणांचा द्वेष केल्यानें सरकारचें काम तरी सुरळीत चालेल किंवा नाहीं याचा थोडा विचार करूं. कारण, तसें असलें तर फक्त त्यामुळें आमच्या सरकारास ब्राह्मणांची दया नाहीं येवढेंच कायतें ह्मणावें लागेल. पण त्या पासून सरकारास किंवा त्याचे कामदारांस वेडेपणाचा व आत्मानहिताचा दोष तरी येणार नाहीं.

ब्रह्मण जातीची सरकारास जरूर असून त्यांच्या वांचून त्यांचें क्षणभर देखील चालणार नाहीं. ब्रह्मद्वेष हा अनहिताचा पाया आहे. आतां— ब्राह्मणांचें येथें नाहीं प्रयोजन ॥ यास हांकलून ज्योती म्हणे—असें जरी बाठ्या पाऱ्यांनीं धर्माभिमानानें म्हटलें आहे तथापि त्या पासून ब्राह्मणांची योग्यता कमी न होतां तसल्या पाऱ्यांचा अज्ञानीपणा मात्र व्यक्त होतो. आतां या सार्वत्रिक संबंधानें ब्राह्मण म्हणजे हिंदु लोकांतील पेशव्यांच्या जातीचेच पुरुष असा अर्थ घ्यावयाचा नाहीं. तर सर्व देशांतील ज्ञानी लोक हे त्या त्या देशांतील ब्राह्मण होत. तेव्हां आमच्या सरकारानें ब्राह्मणांचा द्वेष करून ते अविश्वासास पात्र आहेत असें म्हटलें म्हणजे प्रथम मोठीच अडचण पडणार आहे. कारण, सरकारनें आपले आश्रयांतून एतद्देशीय भटांस काढून टाकलें म्हणजे त्यांचीं कामें दुसरे कनिष्ट प्रतीचे लोकांकडून करवून घेईल हें खरें, पण तीं कामें करण्याची योग्यता त्या कनिष्ट जातीचे लोकांचे आंगीं येऊन ते ज्ञानी झाले म्हणजे त्यांसहि ब्राह्मणपणा येईल. तेव्हां मग पुढें कसें करावयाचें ही एक अडचण. आणि दुसरी मोठी अडचण अशी कीं, ब्रह्मण राजद्रोही आहेत असें म्हटलें म्हणजे सरकारचे सजातीय ब्राह्मण या देशांत आहेत तेही राजद्रोही ठरतील. आणि असें झाल्यानें त्यांसही सरकारनें राजकीय अधिकार देणें रास्त होणार नाहीं. पण अशी व्यवस्थ करावयाची म्हटली म्हणजे अगोदर नामदार गव्हर्नर जनरलापासून सेज धरून त्यांस, प्रत्येक इलाख्याचे गव्हरनरास, तसेंच सर्व कौन्सलदार, रेव्हिन्यु कमिशनर्स, न्यायासनावर बसून पंख्याचा झुळ झुळ वारा खाणारे जज्ज व त्यांचे मदतनीस, विद्या खात्यांतील प्रिन्सिपाल व डयरेक्टर्स, आणि कलेक्टर वगैरे बडे अधिकारी या सर्वांस विलायतेस पाठवून त्यांचे जागीं त्या देशांतील मोची, लोहार, घिसाडी, वगैरे मंडळी आणावी लागेल. आणि मग तशा राजभक्त लोकांच्या हाताखालीं आप ल्या देशांतील राजद्रोही ब्राह्मणांचे रिकामे पडलेले जाग्यांवर आमच्या

देशांतील कोळी, मुसलमान, चांभार, रामोशी व कातवडी या राजभक्त जातींतील लोक नेमून दिले ह्मणजे सर्व राज्याचा कारभार कसा सुरळीत चालेल याची कल्पना करण्याचें काम वाचकांवरच सोंपवितों. पण अशी व्यवस्था केव्हां होईल असा एक प्रश्न उत्पन्न होतो. आमच्या मतें जेव्हां शेवटल्या रावबाजी सारखें राजरत्न गादीवर विराजमान होतें तेव्हांच अशी गंमत उडते. प्रस्तुतच्या इंग्रज सरकारच्या दक्षतेच्या कारभारांत अशी बजबजपुरी होण्याचा फारसा संभव नाहीं, तथापि सरकारच्या जातीचेच लोक या ब्रह्मद्वेषास कारणी होऊन विनाकारण ओरड करीत आहेत, आतां सरकार जरी तसल्या लोकांच्या वेडगळ व निंद्य मतास अनुसरून वागत नाहीं, तथापि त्यांची मतें कान देऊन ऐकूं लागलें आहे व त्याच्या खरे खोटे पणाच्या भ्रांतींत पडून ब्राह्मण लोकां विषयीं केव्हां केव्हां शंकित झाल्या सारखें दाखवितें ह्मणून थोडें वाईट वाटतें. आतां हा प्रकार तरी खुद्द आमची राजकर्ती किंवा तिला सल्ला मसलत देणारे पार्लमेंटाचे सभासद यां पैकीं कोणाकडून घडलेला नसून या देशांतील कित्येक युरोपियन अधिकारी व तद्देशीय अविचारी लोक यांचे असे उद्गार निघतात, तेव्हां याचा विचार तद्देशीय ब्राह्मणांनीं (या देशांतील युरोपियन विद्वानांनीं) अवश्य केला पाहिजे. आतां प्रस्तुत निबंधांत विद्वान ते ब्राह्मण असें जें आह्मी साधारण मत दिलें आहे त्याजवरून कित्येकांस असें वाटेल कीं, युरोपियन लोकांतील विद्वान गृहस्थांस जर ब्राह्मण झटलें तर हिंदु ब्राह्मणांनीं त्यांचे पंक्तीस बसून त्यांच्याशीं शरीरसंबंधहि केले पाहिजेत. पण असा प्रकार मुळींच कधीं घडत नाहीं व घडण्याचा संभवहि नाहीं. हा प्रकार तर असो, पण या देशांतील ब्राह्मण लोक जर त्यांचा स्पर्श झाला तर विटाळ मानून स्नान करितात. तेव्हां त्यांस उगाच ब्राह्मणपणा देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. असें प्रथम मनांत येतें खरें, पण त्या ह्मणण्यात कांहीं अर्थ नाहीं. हा प्रकार आमच्या देशांतहि आहे. ह्मणजे आमच्या देशांतील ब्राह्मण लोकांतच असे

भेद पडले आहेत कीं, त्यांचा परस्परांशीं शरीरसंबंध तर होत नाहींच, पण अन्न व्यवहारहि बंद आहे. गुजराथी, दक्षणी, गौड, इत्यादि ब्राह्मण जातींत परस्पर अन्नव्यवहार होत नाहीं, हा प्रकार कदाचित् देशपरत्वें आहे असें ह्मणावें, तर वरील जातींतील प्रत्येक जातींतच अनेक भेद पडले असून त्या परस्परांचाहि शरीर संबंध किंवा अन्न व्यवहार होत नाहीं, ह्मणून ते लोक ब्राह्मण नव्हत काय? कोणताहि देश कां असेना, तेथें ब्राह्मण असल्या वांचून तो उच्च पदास चढावयाचा नाहीं. अगदीं रानटी देशांतील लोकांत जेव्हां कांहीं लोक ब्राह्मण (ज्ञानी) होतात तेव्हांच त्या देशांत सुधारणा होऊन तो रानटी स्थिती पासून मुक्त होतो. आपल्या राज्यकर्त्यांच्या देशाकडेच लक्ष पुरविलें ह्मणजे याचा अनुभव येतो. त्यास पर्णकुटींतील वास्तव्याचा वीट आणवून सुंदर सातखणीचे झरोक्यांतील हवा खाण्याच्या स्थितींत कोणी आणलें? जनावरांचीं कातडीं पांघरून जे आपला गुजारा करीत असत ते आतां छपरपलंगावरील नरम बिछान्यांत ऊर्णावस्त्रें पांघरून चैन मारीत आहेत, व अर्धें कच्चें मांस खाऊन निर्वाह करीत असत ते आतां पंचपक्वान्नीं षड्रस अन्नाची रुची घेऊं लागले आहेत, तेव्हां या सर्वांना कारणी कोण याचा विचार करूं लागलें ह्मणजे ब्राह्मण असेंच ठरतें. या सर्व कारणां वरून ब्रह्मद्वेष हा कोणत्याही देशांत व कोणत्याही काळीं श्रेयस्कर होणार नाहीं असें ह्मणावें लागतें. या करितां कित्येक अविचारी लोकांनीं जरी कितीही शिफारस केली तथापि आमचे सरकारनें या ब्रह्मद्वेषाचे भानगडींत पडूं नये हें त्यांस भूषणास्पद व श्रेयस्कर आहे. प्रकृत लेख हा कोणत्याही जातीच्या, धर्माच्या, व देशाच्या लोकांस प्रत्यक्ष अनुलक्षून नसून साधारण जे लोक पूज्य व ज्ञानी आहेत त्यांस यथायोग्य सन्मान देणें हें प्रत्येक व्यक्तीचें काम आहे हें दर्शवि याचा फक्त या लेखाचा उद्देश आहे.

# स्वात्मानंद.

(उल्हास १ ला.)

चतुर्विध दिव्यान्नें निपजती ॥ अग्नि एकीं द्वयकळा ऐशा रिती ॥
या लक्षणीं ब्रह्म तें निश्चिती ॥ जाणिजे सुमति शिष्यवर्या ॥ ५० ॥
जेथें लक्ष सरे एकसरें ॥ अनुत्तर महा बिंदुचि उरे ॥
निस्पंदात्मक स्वप्रकाश स्फुरे ॥ विकसत बारे विमर्श तो ॥ ५१ ॥
तो अकृत्रिम स्पंद ह्मणती ॥ त्यांत क्षीति तत्वें वर्णितो ॥
कळावर्णादिक विराजती ॥ निस्पंद होती तया माजि ॥ ५२ ॥
एवं आत्मप्रभे माझारीं ॥ स्फुरद्वयकळा ऐशा परि ॥
स्वबिंबींचि कीं निर्धारीं ॥ ऐसीया आकारीं जाणावें तें ॥ ५३ ॥
सिद्धांतीं द्वय विसर्गात्मक ॥ शिवशक्ति बिंदुतत्वें देव ॥
त्यांत पिंड ब्रह्मांड वर्तणूक ॥ होय प्रमाणिक सहज ते ॥ ५४ ॥
स्थितीलय तयाचेनि पाहें ॥ जैसा वट विस्तार वाढताहे ॥
स्वबिजेंचि होत आहे ॥ कौतुक तें हें अवलोकीं ॥ ५५ ॥
ऐसा हा पूर्ण बिंदु परशिव ॥ परमानंद स्वसुख गौरव ॥
प्रभात्मक चित्स्वरूप सर्व ॥ व्यापक अभाव मायातीत ॥ ५६ ॥
तो हृद्बिजार्थ जाणोनि घेइजे ॥ तदान्वयें त्याप्रति अनुभविजे ॥
ते नर शुद्ध विज्ञानरूपी ह्मणिजे ॥ निजात्मनिष्ठ जे ज्ञानी पुरते ॥ ५७ ॥
जैसी ते अग्निची सुरंगता ॥ स्वतनु शोभे तत्वता ॥
परि इंधनाचेनि गुणें पहातां ॥ नाना विचित्रता भासतसे ॥ ५८ ॥
तैसी पिंड ब्रह्मांडीं व्यापकता ॥ वस्तु एकचि असे तत्वता ॥
परि जैसी जैसी देहाकृतता ॥ तदनुसारता भासतसे ॥ ५९ ॥
तैसा शिवशक्ति युक्त गुरू ॥ पदद्वयीं बिंदुव्यापक निर्धारू ॥
पृथ्व्यादिक पंचभूतां आकारू ॥ विकसीत पद बिंदु सर्वान्वयीं ॥ ६० ॥
जो उत्कृष्ट त्रिबिंदु युक्त निश्चितीं ॥ विकसीत पंचवाचा प्रति ॥

निगमीं सिद्धांतीं अनुभवीती ॥ अनुत्तर ह्मणती महाबिंदु ॥ ६१ ॥
गायत्रीपद पंचमा माजि ॥ अंतरगत भरूनि सहजीं ॥
गुह्यार्थ बिजीं असे सर्वान्वयीं जी ॥ परिपूर्ण निजीं आपण जो ॥६२ ॥
शंभुस्थापितसे ये रिती ॥ तयाअनुभवीतो जो आत्म प्रतिती ॥
तो पूर्णब्रह्म स्वयें निश्चिती ॥ वदों काय किती महिमा त्याची ॥ ६३ ॥
हा अर्थ प्रणवांतीचा ॥ अनुभवतो तो जो बिजींचा ॥
तो दिक्षाश्रयी श्रीगुरूचा ॥ ह्मणोनि साचा तयासी वैं ॥ ६४ ॥
तयाच्या साक्षात् शिवदर्शनें ॥ भव तुटे चढिजे मोक्ष सोपानें ॥
मग प्रत्यक्ष कृपादिव्यांजनें ॥ सांगपां कवणे न तरिजे ॥ ६५ ॥
जन्मांतरीं जव तव निष्काम घडे ॥ तरीच निज गुह्यार्थ हा आतुडे ॥
उर्ध्व वाम्नाय अनुत्तरीं चढे ॥ तद्रूपता जोडे अमृत पदीं ॥ ६६ ॥
कुर्मीची दृष्टी प्रकाशीत ॥ अमृतमय अपत्यां होत ॥
तया योगें तृप्तता पावत ॥ आनंद भरित सर्वदां वैं ॥६७॥
तेवीं सर्वांसी बिंदु विकसुनि ॥ सूर्यातेंही प्रकाशुनि ॥
सकळ स्वादीं भरूनि ॥ स्वादामृतें मनीं जिववीत ॥ ६८ ॥
विश्वाचें बीज सर्वात्मक होत ॥ उत्कृष्ट बिंदु यास्तव ह्मणत ॥
उर्ध्वीं चंद्रप्रभा प्रसवत ॥ अमृतयुक्त सकळांसी ॥ ६९ ॥
तेवीं हा चित्सुखेंदु ॥ जो कां निजानंद कंदु ॥
सकळ आनंदा आनंदु ॥ विलसे गोविंदु परमात्मा ॥ ७० ॥
अलितत्वें बिंदु द्रवतो ॥ सुख दुःखातें विकासितो ॥
तोचि ऊर्ध्वीं प्रेमात्मक होतो ॥ प्रेमा प्रसवतो भक्तिरस ॥ ७१ ॥
अग्रंतातीत सहजें तरी ॥ तरीतो ध्वनिमय प्रभांतरीं ॥
स्फुरवितो ऐसिया परी ॥ जाण निजांतरीं अनुभवीं ॥ ७२ ॥
महा बिंदु ऐसा अनुभविती ॥ निर्लक्षमय जो कां जाणती ॥
ते जन्ममरणीं मुक्त होती ॥ निज घरा येती आपुलिया ॥ ७३ ॥

जैसी नेत्रीं दिसे प्रकाशुनी ॥ जगद्रूपातें विकासूनी ॥
अंतरगाति जाय मागुतेनी ॥ चमत्कार मनीं पहा कैसा ॥ ७४ ॥
त्या माजि लय दृश्य स्फूर्तीतें ॥ कवळुनी घे गुह्य दिसोतें ॥
वायु जैसा स्थूळ सूक्ष्म रूपातें ॥ वसोनी तेथें चाळवितो ॥ ७५ ॥
तैसी वृत्ति स्फुरत प्रभेतें ॥ पसरोनि नित्यानित्य मावळते ॥
प्रभेमाजि होत जाते ॥ लय अंत तेथें वृतिचा कीं ॥७६॥
चित्तातीत जगत्प्रकाश ॥ सहजीं असे सावकाश ॥
चित्ताविणें न लक्षे चित्तास ॥ यदर्थी परीस दृष्टांतातें ॥ ७७ ॥
काष्ठातीत अदृश्य जैसा ॥ पावक असे परीयेसा ॥
तोचि काष्ठाश्रयें पाहाणें आपैसा ॥ तया अनळसा जया परी ॥ ७८ ॥
त्या काष्ठाचा जड अंश जाळितां ॥ आयती सहजें अव्यक्तता ॥
तैसी कीं जडवृत्ती निरसितां ॥ चित्तीं चित्तता निजरूपीं ॥७९ ॥
एक्या बिंदूच्या ठायीं निश्चिती ॥ नादकळा आणि ज्योती ॥
बिंदूसत्ता पंच होती ॥ पंचभूतावृति तेथूनियां ॥ ८० ॥
नादें जाहलें आकाश ॥ कळा प्रसवली वायूस ॥
ज्योती पासाव उद्भव अग्नीस ॥ प्रकाश विलास आत्मयाचा ॥ ८१ ॥
बिंदू व्याला उदकासीं ॥ सत्ता प्रसवे पृथ्वीसीं ॥
ऐसा उद्भव भूतांसीं ॥ प्रसर सर्वांसीं जहाला पैं ॥ ८२ ॥
पुढां ऐकिजे श्रवणीं ॥ स्वस्थ मानस करूनी ॥
चित्त लागे अनुसंधानीं ॥ संसृती पासोन मुक्तता ते ॥ ८३ ॥
इति श्री स्वात्मानंद लिखीते ॥ श्री पूर्णदास विरचिते ॥
निजात्म स्वरूप वर्णन नाम प्रथमोल्हास. ॥ १ ॥

---

( उल्हास २ रा. )

ऐका संत सज्जन भगवन्मूर्ती ॥ तुमचीच कृपेची वचनोक्ती
निवेदितों तुमची तुम्हा प्रती ॥ निज बाळमतिसद्भावेंची ॥ १ ॥

जैसा उत्तम देश देखुनी ॥ पथीक राहे कार्यार्थ योजूनी ॥
परि आवडी वाहातसे मनीं ॥ स्वदेशा लागोनी जावयाची ॥ २ ॥
स्वगृह आठवी घडी घडी ॥ स्त्रीपुत्रीं लागलीसे गोडी ॥
केव्हां निघेन येथोनी तांतडी ॥ वाहात आवडी गृहाची पैं ॥ ३ ॥
तैसा तो तनुगृहामाजी पडिला ॥ भवपुरामध्यें प्रवास घडला ॥
योजीत स्वात्मगृहा जावयाला ॥ प्रीतीनें मनाला भावीतसे ॥४॥
नातरी हाटीं बाळ भुलत ॥ स्वगृह विसरूनी जात ॥
तैसा अज्ञान प्राणी होत ॥ स्वहीत नेणत आपुलें तो ॥ ५ ॥
तो विस्मृतीनें प्रपंच स्मरणी ॥ राहिला शाश्वत मानुनी ॥
त्याच हाटीं प्रौढ धन मिळवूनी ॥ निजगृहस्मरोनी असे जैसा ॥६॥
तैसा प्रपंचीं विचरत ॥ परि मनीं आत्म नित्य स्फुरत ॥
तो शुद्ध ज्ञानी ह्मणीजेत ॥ येर तो निश्चीत अज्ञानीया ॥ ७ ॥
मेघावृत नसोनी हेत ॥ जैशा उपजति गारा अनंत ॥
ब्रह्मीं स्फूर्तिविना जीव होत ॥ प्रकृति आंत उत्तम नाना ॥ ८ ॥
जैसीं संकल्पाविरहित नेत्रपातीं ॥ आपेंआप सहज लवती ॥
तैसी परब्रह्मीं मायेचि स्फूर्ति ॥ त्यांत उद्भवति जीवश्रेणी ॥ ९ ॥
गाराभिन्न जैशा दिसती ॥ दिसोनी मृषा आत्मप्रतीती ॥
सर्वी उदक एक निश्चितीं ॥ सुजन पाहाती अंतरदृष्टीं ॥ १० ॥
तैसे जीवचित्सिंधुचे तरंग ॥ क्षणएक भासला रंग ॥
ब्रह्मीं संसार नसे सांग ॥ ब्रह्म अभ्यंग एक येकलें ॥ ११ ॥
पाणी षड्रसरूप होऊनी ॥ रसस्वादासीं तें नाकळोनी ॥
असे जैसें आपुलेपणी ॥ सर्वांसीं भरोनी उरलेंसे ॥ १२ ॥
तया उदकासीं विवरितां ॥ तें षड्रसीं नाडलें तत्वतां ॥
तैसा आत्मा शुद्ध पाहतां ॥ असोनी पदार्थां नातळे ॥ १३ ॥
सूर्यकिरण न जाय कापिलें ॥ मृगजळीं वस्त्र नवचे भिजाविलें ॥
तैसें विषयरसें आत्मरूप भलें ॥ नशोय माखिलें निर्मळजें ॥ १४ ॥ पु.चा.

# सुभाषित

वन्हिस्तस्य जलायते जलनिधिः कुल्यायते तत्क्षणात् ।
मेरुः स्वल्पशिलायते मृगपतिःसंद्यः कुरंगायते ॥
व्यालो माल्यगुणायते विषरसः पियुष वर्षायते ।
यस्यांगे खिललोकवल्लभतमं शीलं समुन्मीलति ॥ २० ॥

" संपूर्ण लोकांची प्रीति संपादन करण्याजोगा ज्याचा स्वभाव आहे अशा पुरुषाला, अग्नि जलासारखा थंड वाटतो, सागर एखाद्या सामान्य नदीसारखा वाटतो, मेरु पर्वत यःकश्चित शिळेसारखा होतो, सिंहांचा समुदाय त्याच्याशीं मृगवत् वागतो, महाभुजग हा एखाद्या पुष्पमाले सारखा होतो, आणि प्रत्यक्ष कालकूट विष असलें तथापि तें त्याला अमृतवृष्टी सारखें वाटतें." सारांश लोकप्रीतीचे योगानें मनुष्य पाहिजे तें संकट आलें तरी त्यापासून सहज पार पडतो.

विभवोहि तथा लोके न शरीराणि देहिनां ॥
चांडालेपि नरः पूज्यो यस्यास्ति विपुलं धनं ॥ २१ ॥

" लोकांमध्यें मान्यता पावण्याला संपत्ती हेंच मुख्य साधन होय. जाती वगैरेचा कांहीं उपयोग नाहीं. ज्याच्या जवळ विपूल धन आहे असा चांडाल हि पूज्य मानला जातो." आकरमाशे, मराठे, धनगर, कोळी, मुसलमान, व सिद्दी या जातीचे लोकांस अधिकार व संपत्तीचे नात्यानें उंच वर्णाचे लोकहि तीन तीन वेळ लवून मुजरा करतात हा अनुभव सर्वांस आहेच.

क्षुद्राःसंति सहस्रशः स्वभरणव्यापारमात्रोद्यताः ।
स्वार्थो यस्य परार्थमात्र सपुमानेकः सतामग्रणिः ॥
दुष्पूरोदरपूरणाय पिबति स्रोतःपतिं वाडवो ।
जीमूतस्तु निदाघसंभृतजगत्संतापविच्छित्तये ॥ २२ ॥

"आपापल्या उदरपूरणा निमित्त व्यवहार करणारे असे क्षुद्र प्राणी हजारों आहेत, पण परोपकार करणें हाच ज्याचा स्वार्थ असा साधुजनां मध्यें श्रेष्ठ पुरुष एखादाच असतो. वडवानल केवळ आपल्या उदर पूरणार्थ सागराचें उदक पीत असतो, पण परोपकारी जो मेघ तो सागर शोषणानें ग्रीष्म ऋतु संबंधी लोकांचा ताप शांत करितो."

न चोरहार्यं नच राजहार्यं । न भ्रातृभाज्यं नच भारकारी ॥
व्यये कृते वर्धत एव नित्यं । विद्याधनं सर्व धनप्रधानं ॥ २३ ॥

"चोराच्यानें लुटून घेववत नाहीं, राजाच्यानें हरण करववत नाहीं, भाऊबंदांना वांटून घेतां येत नाहीं, व स्वतःलाहि ज्याचा भार होत-नाहीं, आणि जें खर्चिल्यानें आधीक होतें, असें सर्व धनांमध्यें विद्या-धन श्रेष्ठ होय."

आपद्गतं हससि किं द्रविणांध मूढ ।
लक्ष्मीः स्थिरा न भवतीति किमत्र चित्रं ॥
एतान् प्रपश्यसि घटान् जलयंत्रचक्रे ।
रिक्ता भवंति भरिता भरिताश्च रिक्ताः ॥ २४ ॥

"संपत्तीचे योगानें अंध झालेल्या मूढा, विपत्तिग्रस्त पुरुषास हांसतो स कां? बाबारे, लक्ष्मी कधिंहि स्थिर असत नाहीं. हे राहाटावरील घट पहा, क्षणांत भरलेले रिकामे होत आहेत व रिकामे झालेले पुनः उदकानें परिपूर्ण होत आहेत."श्रीमंताचा दरिद्री व दरिद्र्याचा श्रीमंत होणें, असें हें राहाटगाडगेंच आहे. या करितां धनवंतानें उन्मत्त होउन गरिबाला हांसू नये हा कवीचा भाव.

उपदेशोहि मूर्खाणां प्रकोपाय न शांतये ॥
पयःपानं भुजंगानां केवलं विषवर्धनं ॥ २५॥

"मूर्खाला सदुपदेश केला असतां त्यापासून त्याचें शांतपन न होतां तो उपदेश उलटा त्याच्या क्रोधाला कारण होतो. सर्पाला दुग्धपान करवणें हें केवळ विषवृद्धी करण्या सारखें आहे."

नलिनीदलगत जलवत्तरलं ।
तद्वज्जीवनमतिशय चपलं ॥
क्षणमपि सज्जनसंगति रेका ।
भवति भवार्णवतरणे नौका ॥ २६ ॥

"कमलपत्रावरील जलबिंदु प्रमाणें मनुष्याचें जीवित हें अतिशय चपल होय. आतां आहे आणि क्षणांत नाहीं असें होईल. याकरितां क्षणमात्र तरी सज्जनाची संगती करावी, हा भवसमुद्र तरून जाण्यास हीच नौका होय."

वीणेव श्रोत्रहीनस्य लोलाक्षीव विचक्षुषः ॥
व्यसोः कुसुममालेव विद्या स्तब्धस्य निष्फला ॥ २७ ॥

"बहिऱ्याला ज्या प्रमाणें वीणारव, अंधळयाला मृगनयना तरुणी, व प्रेताला पुष्पमाला व्यर्थ. तद्वत जो निरुद्योगी आहे त्याला विद्याहि निष्फल होय."

चांडालश्च दरिद्रश्च द्वावेतौ सदृशाविह ॥
चांडालोऽपि दारिद्रोऽपि सर्वकर्म सुनिंदितः ॥ २८ ॥

"लोकांमध्यें चांडाल आणि दरिद्री हे दोघेहि सारखेच मानले जातात. कारण, दोघेहि सर्व कर्माच्या ठायीं निंदित होत."

माता यस्य धराधरेंद्रदुहिता तातो महेश स्तथा ।
भ्राता विघ्नकुलांतकः पितृसखो देवो धनानां पतिः ॥
ख्यातः क्रौंचविदारणे सुरपतेः सेनाग्रगः षण्मुखः ।
तद्दुर्दैवबलेन कुत्र घटने नाद्यापि पाणिग्रहः ॥ २९ ॥

"हिमाचलाची कन्या पार्वती ही ज्याची माता, शंकर ज्याचा पिता, धनपती जो कुबेर हा ज्याच्या पित्याचा प्रियमित्र, विघ्ननाशक गजानन हा ज्याचा बंधु, स्वतः क्रौंचविदारणाविषयीं विख्यात, व इंद्राच्या सेनेचा अधिपती असा जो षडानन त्याचा विवाह होण्याची वेळा दुर्दैवानें अद्याप येत नाहीं."

रे चित्त चिंतय चिरं चरणौ मुरारेः ।
पारं गमिष्यति भवान् भवसागरस्य ॥
पुत्रः कलत्रमितरे सुहृदः सहायाः ।
सर्वं विलोकय सखे मृगतृष्णिकेव ॥ ३० ॥

"हे मना, सार्वकाल परमेश्वराच्या पायांचें चिंतन कर, तरच तूं या भवसमुद्रांतून तरून जाशील. स्त्री, पुत्र, व इतर सुहृदादिक हीं सर्व मृगजलवत् क्षणभंगुर होत."

द्वात्रिंशद्दशनद्वेषी मध्ये भ्रमसि नित्यशः ॥
तदिदं शिक्षिता केन जिह्वे संचार कौशलं ॥३१॥

"बत्तीस दांतांशीं वैर बाळगूनहि त्यांजमध्यें नेहमी फिरत असतेस. तर हे जिव्हे तूं हें कुशलत्व शिकलीस तरी कोठून?"

चिरं ध्याता रामा क्षणमपि न रामप्रतिकृतिः ।
परं पीतो रामाऽधर इह न रामांघ्रिसलिलं ॥
नता दृष्टा रामा यदरचिनरामाय विनतिः ।
गतं मे साम्राज्यं न दशरथजन्मापरिगत. ॥ ३२ ॥

"सार्वकाल मी स्त्रियेचेंच चिंतन केलें, पण परमेश्वर मूर्तीचें कधींहि ध्यान केलें नाहीं, स्त्रियेच्या अधरामृताचें पान केलें, पण परमेश्वराच्या चरणांचें तीर्थ कधींच प्राशन केलें नाहीं, तरुणी रागावली असतां तिला साष्टांग नमस्कार घातला, पण रामचरणाचें वंदनहि कधीं केलें नाहीं, अशा रीतीनें मी आपलें सार्वभौमत्व घालविलें पण परमेश्वराची कृपा संपादन केली नाहीं."

वैकल्यं धरणीपातमयथोचित जल्पनं ॥
सन्निपातस्य चिन्हानि मद्यं सर्वाणि दर्शयेत् ॥ ३३ ॥

"मद्यपानाचे योगानें शरीराला विकलता प्राप्त होते, जमिनीवर तोल जातो, आणि भाषणामध्यें चूक होते. सारांश, मद्याचे योगानें मनुष्यावर

सर्व त्रिदोषाचीं लक्षणें दिसूं लागतात. "

रेरे निर्दय दुर्निवार मदन प्रोत्फुल्ल पंकेरुहं ।
बाणं संवृणु संवृणु त्यज धनुः किं पौरुषं मां प्रति ॥
कांतासंगवियोगदुःखदहनज्वालावलीढं वपुः ।
शूराणां मृतमारणे नहि पुरा धर्म प्रयुक्तो बुधैः ॥३४॥

" हे निर्दया मदना, तूं आपला सुप्रकाशित बाण आवरून धनुष्य खालीं टाकून दे. कारण, प्रियस्त्रीच्या विरहदुःखाग्नीनें दग्धशरीर झालेला जो मी त्या मजवर बाणाची योजना केल्यानें तुझा पुरुषार्थ तो काय होणार? मृतावर शस्त्र टाकणें हा शूरांचा धर्म नव्हे असें बुधजन सांगत आले आहेत. "

तातः क्षीरनिधिः स्वसा जलधिजा भ्राता सुरेशद्रुमः ।
सौजन्यं सहकौस्तुभेन शुचिता यस्य द्विजेशादपि ॥
धिक्कर्माणि सएव कंबुरधुना पाखंडकांताकरे ।
विश्रांतः प्रतिवासरं प्रतिगृहं भैक्ष्येण कुक्षिं भरिः ॥ ३५ ॥

"रत्नाकर ज्याचा पिता, लक्ष्मी ज्याची भगिनी, कल्पवृक्ष ज्याचा बंधु कौस्तुभ मण्याशीं ज्याचें सौजन्य, आणि चंद्रासारखा स्वच्छ, असा शंख, सांप्रत जंगमस्त्रियेच्या हातांत बसून दररोज घरोघर भीक मागून पोट भरीत आहे. तस्मात् त्याच्या कर्माला धिःकार असो.,,

एणीदृशः पाणिपुटे निबद्धा । वेणी विरेजे शयनोत्स्थितायाः ॥
सरोजकोशादिव निष्पतंति । श्रेणी घनीभूत मधुव्रतानां ॥ ३६ ॥

"शयनस्थाना पासून उठलेली ही मृगनयना तरुणी जेव्हां हातांत वेणी धरून उभी राहिली, तेव्हां ती वेणी अवलोकन करून कमलकोशापासुन ही भ्रमरपंक्तिच खालीं पडत आहे कीं काय असा भास झाला"

अपूर्वं चौर्यमभ्यस्तं त्वया चंचललोचने ॥
दिवैव जाग्रतां पुंसां चेतो हरासि दूरत ॥ ३७ ॥

"हे चंचलनयने तरुणी, तूं हें अपूर्व चौर्यकर्म कोठें शिकलीस? कीं ज्याचे योगानें भरदिवसा जाग्रत अशा पुरुषांचें चित्त तूं सहज हरण करून नेतेस."

हरेः पदाहतिः श्लाघ्या न श्लाघ्यं खररोहण ॥
स्पर्धापि विदुषा युक्ता न युक्ता मूर्खमित्रता ॥३८॥

"सिंहाचा लताप्रहार बरा, पण गर्दभावर आरोहण करणेंहि निंद्य होय. जे सूज्ञ आहेत त्यांच्यांशीं वैर असलें तरी पतकरतें, पण मूर्खाचा स्नेहहि वाईट."

व्रजंति पद्मानि कदा विकासं ।
प्रिया गते भर्तरि किं करोति ॥
रात्रौच नित्यं विरहाकुला का ।
सूर्योदये रोदिती चक्रवाकी ॥ ३९ ॥

हा श्लोक अंतर्लापिकेंतील आहे. याच्या तीनहि चरणांतील प्रश्नांची उत्तरें शेवटल्या चरणांत अनुक्रमानें दिलीं आहेत—

"कमलें केव्हां प्रफुल्लित होतात? (सूर्योदये) सूर्योदय झाला असतां, पति गत झाला असतां स्त्री काय करते? (रोदिति) रडते, व रात्रीचे ठायीं नित्य विरहानें पीडित कोण असते? चक्रवाकी, चक्रवाक पक्षांचे मिथुनाची सर्वत्र प्रसिद्धी आहेच."

जामाता जठरं जाया जातवेदा जलाशयः ॥
पूरिता नैव पूर्यंते जकाराः पंच दुर्भराः ॥ ४० ॥

"जामाता (जांवई), जठर (पोट), जाया (स्त्री), जातवेद (अग्नी), आणि जलाशय, हे पांच जकार दुर्भर होत. ह्मणजे यांची पूर्तता कधीं होतच नाहीं."

| | | | |
|---|---|---|---|
| ,, नारायण गणेश तळें | १८६ | ,, वामन रामचंद्र ठाणे | १८६ |
| ,, वासुदेव नारायण तळें | १८६ | ,, गणेश लक्ष्मण ठाणे | १८६ |
| ,, अबाजी परशराम तळें | १८६ | ,, माहादेव नारायण ठाणे | १८६ |
| ,, चंद्रशेट पांडशेट तळें | १८६ | ,, रामचंद्र चिंतामण कल्याण | १८६ |
| —नेटिव लायब्ररी तळें | १८६ | ,, रामचंद्र दाजी कल्याण | १८६ |
| ,, पुरुषोतम रामचंद्र तळें | १८६ | ,, गोविंद बळवंत कल्याण | १८६ |
| ,, वामनाजी रामचंद्र तळें | १८६ | ,, नारायण बाजी कल्याण | १८६ |
| ,, हरी लक्ष्मण गोरेगांव | १८६ | ,, त्रिंबक जनार्दन कल्याण | १८६ |
| ,, भिकाजी बाळकृष्ण गोरेगांव | १८६ | ,, किला तुळसीदास कल्याण | १ |
| ,, रामचंद्र मार्तंड गोरेगांव | १८६ | ,, रामभाऊ बाबाजी शेट भिंवडी | १८६ |
| ,, पांडुरंग गोपाळ माहाड | १८६ | ,, विठल भिवा शेट भिंवडी | १८२ |
| ,, चिमणाजी नारायण माहाड | १८६ | ,, गोविंद हरी गोखले कल्याण | १८६ |
| ,, जयराम सदाशिव चिखला | १८६ | ,, रघुनाथ जयराम कल्याण | १८६ |
| ,, रामचंद्र भिकाजी नागोठणे | १८६ | —नेटिव लायब्ररी कल्याण | १८६ |
| ,, गोपाळ यशवंत धामणसई | १८६ | ,, बाळकृष्ण सुदामजी भिंवडी | १८६ |
| ,, हरी रघुनाथ रोहें | १८६ | ,, भास्कर बल्लाळ भिंवडी | १८६ |
| (सदाशीव साखाराम माहाजन मार्फत) | | ,, अपाजी वासुदेव भिंवडी | १८६ |
| रा॰ रा॰ काशीनाथ पांडुरंग मुंबई | १८६ | ,, गणेश रामचंद्र भिंवडी | ८९ |
| ,, काशीनाथ संभाजी मुंबई | १८६ | ,, मोरो रामचंद्र भिंवडी | ८९ |
| ,, बळवंत रामचंद्र मुंबई | १८६ | ,, शाबुदिन खतीबा भिंवडी | ८९ |
| ,, गोविंद मोरोबा मुंबई | १८६ | ,, बाकीरसाहेब फकी भिंवडी | ८९ |
| ,, रामकृष्ण बळवंत मुंबई | १८६ | ,, सदाशिव धोंडदेव कल्याण | १८६ |
| ,, त्रिंबक आत्माराम मुंबई | २८६ | ,, जयराम अबाजी नाशीक | १८६ |
| ,, त्रिंबक हरबाजी मुंबई | १८६ | ,, गंगाधर नरसिंह नाशीक | १८६ |
| ,, विष्णु भिकाजी मुंबई | १८६ | ,, दामोदर रघुनाथ नाशीक | १८६ |
| ,, वामन विष्णु मुंबई | १८६ | ,, बापूजी महिपत नाशीक | १८६ |
| ,, रघुनाथ त्रिंबक मुंबई | १८६ | ,, माधवराव जनार्दन नाशीक | १८६ |
| ,, लक्ष्मण नारायण मुंबई | १८६ | ,, नरहर पुरुषोत्तम नाशीक | १८६ |
| ,, गणपत भिकाजी मुंबई | १८६ | ,, द्वारकानाथ राघोबा नाशीक | १८६ |
| ,, नारायण मनोहर ठाणे | १८६ | ,, मोरेश्वर माहादेव नाशीक | १८६ |
| ,, रामचंद्र पद्माकर ठाणे | १८६ | ,, वासुदेव हरी नाशीक | १८६ |

,, काशीनाथ रामचंद्र नाशीक १८६
,, धोंडो व्यंकाजी नाशीक १८६
,, दाजी विष्णु नाशीक १८६
,, सखाराम पांडुरंग येवलें १८६
,, गोविंदराव नारायण येवलें १८६
,, लक्ष्मण नारायण येवलें १८६

( प्रभाकर गणेश भातखंडे मार्फत. )

रावसाहेब स. जज्ज पनवेल १८६
,, अंताजी कृष्ण पनवेल १८६
,, केशव पद्माकर पनवेल १८६
,, नारायण विनायक पनवेल १८६
,, माधवराव रघुनाथ उरण १८६
,, बाळकृष्ण गणेश उरण १८६
,, बाळकृष्ण मोरोबा उरण १८६
,, गोविंद मोरेश्वर कर्जें १८६
,, नारायण महीपत कर्जें १८६
,, बळवतराव विनायक कर्जें १८६
,, आबा व०दाऊद कर्जें १८६
,, बापूराव मार्तंड रेवस १८६
,, रामचंद्र वासुदे बेलापूर १८६
,, बुधाजी धर्माजी करावें १८६

( हरीसिंग खुमासिंग यांचे मार्फत )

रा०रा० माधवराव बल्लाळ वसई १८६
,, वासुदेवराव कृष्ण वसई १८६
,, गोविंद विनायक माहीम १८१॥
,, राघो हरी माहीम १८१॥
,, केशव गोविंद माहीम १८१॥
,, गोविंद बल्लाळ माहीम १८१॥
,, नारायण चिंतामण माहीम १८१॥

,, आत्माराम मोरेश्वर माहीम १८१॥
,, वासुदेव कृष्ण माहीम १[illegible]
,, वाचनगृहाचे चिटणीस माहीम १[illegible]
,, माधवराव सखाराम माहीम १[illegible]
,, कुवरजी शापूरजी तार[illegible]
,, पांडुरंग हरी डाहाणू [illegible]
,, त्रिंबक विष्णु उंबरगांव [illegible]
,, केशव मोरेश्वर उंबरगांव [illegible]
,, गोपाळ विठ्ठल उंबरगांव [illegible]
,, संतुराम जगन्नाथ उंबरगांव [illegible]
,, दिनकर सखाराम डाहाणू [illegible]
,, वासुदेव कृष्ण उंबरगांव [illegible]
,, बाळकृष्ण दाजी विलीमोरा [illegible]
, नागेशराव विनायक नवसरी [illegible]
,, सिताराम श्रीधर नवसरी [illegible]
,, कृष्णराव गोपाळ नवसरी [illegible]
,, अनंत गंगाधर नवसरी [illegible]
,, गणेश वासुदेव नवसरी [illegible]
,, सखाराम बापूजी नवसरी [illegible]
,, बापूजी नारायण अंजलें [illegible]
,, बापूसाहेब हवेलीवाले नवसरी [illegible]
,, रावजी विठ्ठल बडोदें [illegible]
,, चिंतामण गंगाधर बडोदें १[illegible]
,, चिंतामणराव नारायण बडोदें १[illegible]
,, केशवराव रामकृष्ण बडोदें १८६
,, रामराव केशव बडोदें १८६
,, धोंडो कचेश्वर बडोदें १८१॥
,, पुरुषोत्तम यशवंत बडोदें १८१॥
,, महादेव चिंतामण बडोदें १८[illegible]

---

( स्थलसंकोचास्तव राहिलेला वसूल पुढील अंकीं घेऊं )

वर्ष दुसरें

अगाऊ किंमत वर्षाची १ रुपया

सत्य शांति सौख्य

# सद्धर्मदीप.

आश्वीन शके १८०१

अंक ३

मार्गे मार्गे निर्मलं साधुवृंदं । वृंदे वृंदे तत्वचिंतानुवादः

वादे वादे जायते तत्वबोधो । बोधे बोधे सच्चिदानंदभासः



अलीबाग

'सत्यसदन' छापखान्यांत छापिलें

आगाऊ किंमत पुस्तक सुरू केल्यापासून एक महिन्याचे आंत दिली पाहिजे.

पुस्तकाचे किंमती शिवाय टपालखर्चाबद्दल प्रत्येक अंकास अर्धा आणा जास्त पडेल

फुटकळ अंकाची किंमत चार आणे

# विषयानुक्रम.


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| आत्मानुभव ....... ....... ... .... .... .... .... | ६५ |
| कलियुगाचा काल खराच निंद्य आहे कीं काय? .... .... | ७३ |
| काबूलचे लढाईचें पुनरुज्जीवन.... .... .... .... | ८५ |
| स्वात्मानंद ( कविता ).... .... ... .... .... | ८९ |
| सुभाषित .... .... ................ .... | ९३ |


# वसूल.

(आषाढ शके १८०१ अखेर)

रा.रा.माधवराव गंगाधर संगमनेर ३ ८६
,, दत्तो विनायक नागपूर १ ८६
,, माधवराव रामराव नगर १.
,, गणेश गोपाळ नगर १ ८६
,, शंकर आपाजी नगर १ ८३

(आषाढ शके १८०२ अखेर)

रा०रा० कृष्णाजी विठ्ठल वरधा १ ८६
,, नारायण त्रिंबक वाडें १ ८६
,, लक्ष्मण बाजी रोहें १ ८६
,, गणेश दिनकर चिपळूण १ ८६
,, कृष्णाजी सखाराम चिपळूण १ ८६
,, सेक्रेटरी ने. लायब्ररी तासगांव १ ८६
,, बळवंतराव लक्ष्मण धुळें १ ८६
,, दामोदर हरी बेलखेड १ ८६
,, वामन मनोहर मुंबई १ ८६
,, लक्ष्मण महादेव काले १ ८६
,, बापुजी भिकाजी पेण १ ८६
,, कृष्णाजी रामचंद्र बेळगांव १ ८६
,, भिकाजी बाबाजी नागांव १ ८६
,, रामचंद्र गुंडो चिकोडी १ ८६
,, कृष्णाजी श्रीनिवास बेळगांव १ ८६
,, भास्कर त्रिंबक बेंगळूर १ ८६
,, भास्कर हरी बेंगळूर १ ८६
सौ. विठाबाई सखाराम भावनगर १ ८६
,, प्रयागराज रामादिन बार्सी टा. १ ८६
,, बळवंतराव एशवंत चंदचूड १ ८६

( काशीनाथ सखाराम मार्फत )

रा. रा. श्रीधर दिनकर पेण १ ८६
,, सेक्रेटरी ने. ला. पेण १ ८६
,, केशव विश्वनाथ पेण १ ८६

( वामन सखाराम महाजन मार्फत )

रा. रा. शंकर बाळकृष्ण रेवदंडा १ ८६
,, श्रीधर पांडुरंग वासुदेव रेवदंडा १ ८६
,, नारायण वासुदेव रेवदंडा १ ८६
,, कृष्णाजी अनंत रेवदंडा १
,, आपाजी वामन रेवदंडा. १ ८६
,, दामोदर माणीकचंद रेवदंडा १ ८६
,, दिनकर भास्कर रेवदंडा १ ८६
,, विष्णु बाबा कोरलई १ ८६
,, श्रीनिवास कृष्ण सोलापूर १ ८६
,, रामचंद्र बहिरव सोलापूर १ ८६

# सद्धर्मदीप.

अंक ३

## आत्मानुभव

सर्व वेदांताचें श्रवण । तथापि नकळे आपण कोण ॥
अधीक वाढलें मीपण ॥ आत्मानुभव न घडतां ॥

( निगमसार )

कोणत्याहि गोष्टीचा अनुभव घडल्यावांचून त्या विषयाची सत्यासत्यता व सुख दुःख या विषयीं खात्री होत नाहीं. अनुभव हें सर्वात वरिष्ठ प्रमाण आहे. एखादा मनुष्य कांहीं विषयाचें प्रतिपादन करीत असला किंवा कांहीं हकीकत सांगत असला म्हणजे त्या प्रसंगीं " या विषयीं मी स्वतः अनुभव घेतला आहे, किंवा ही गोष्ट मी समक्ष पाहिली आहे" असें जेव्हां तो म्हणतो तेव्हां त्याविषयीं त्याची व त्याचे अनुयायी मंडळीचीहि खात्री होते. साधारण व्यवहारिक गोष्टीं विषयीं आपली खात्री होण्यासहि जर त्याचा अनुभव घडावा लागतो, तर मग ईश्वर विषयक गहन विचारांचा अनुभव घडणें किती अवश्यक आहे बरें? नुसती घटपटाची खटपट केल्यानें किंवा 'रज्जुसर्पवद्भास:' अशीं कोरडीं उदाहरणें दिल्यानें अज्ञानी प्रापंची मनुष्यास परमेश्वराचें ज्ञान होणें दुर्लभ होय. त्याला आत्मज्ञान होऊन त्याचा अनुभव घडला पाहिजे. असें समजा, कीं एक मुलगी आपली आई प्रति दिवसीं रात्रौ आपल्या पित्याकडे त्या मुलीस एकटी निजलेली टाकून जाते. कांहीं वेळानें मुलगी जागी होऊन पहाते तों जवळ आई नाहीं. पुढें तिला हांका मारण्याची सुरवात करते व आई आल्या नंतर तिला 'तूं कोठें गेली होतीस तें सांग' म्हणून हट्ट धरून बसते. आतां त्या अज्ञानी मुलीची तिच्या आईनें काय बरें समजूत करावी? एकदा, दोनदा, व पांचच्यार वेळ

ती कांहीं तरी सांगून तिची समजुत करील.पण रोजच्या रोज तिच्या प्रश्नाचें उत्तर तिणें कय द्यावें? असो ते वेळीं आई त्या मुलीला कांहीं तरी सांगते व तिची क्षणवर समजूत होते,पण तिच्या शंकेचे कारणा विषयीं तिचें खरें समाधान होत नाहीं. पुढें तीच मुलगी विवाहित होऊन वयांत अली व स्त्रीपुरुषांच्या संयोगानें आपले पतीनीं वागूं लागली ह्मणजे तिच्या शंकेचें खरेंसमाधान होतें. आईचे जाण्याचा जव्हां स्वतः तिला अनुभव घडतो तेव्हां ती आपले आईस पुढें याविषयीं विचारीत नाहींशीच होते. रज्जूवर ज्याप्रमाणें सर्पाचा भास होतो, तद्वत या संसारावर सत्यत्वाचा वृथा आरोप आहे असें नुसतें ह्मटल्यानें संसाराची असत्यता अंतःकरणावर ठसत नाहीं. तर ज्या प्रमाणें त्या सर्पारोपित रज्जूविषयीं ती रज्जूच आहे अशी आपण खात्री करून घेतों त्या प्रमाणें हा संसार मिथ्या आहे असा चित्तास अनुभव घडावा लागतो. आतां याजवर कोणी असें ह्मणेलकीं, या संसाराचे नश्वरतेचीं आपणास नेहमी प्रमाणें अनुभव होत असूनहि जर त्याविषयीं चित्ताची खात्री होत नाहीं तर मग आणखी अनुभव तो कसा घडावा? संसार मिथ्या आहे असें मनुष्यमात्रास वाटतें पण तो तसें समजून वागत नाहीं किंवा त्यास वागतांच येत नाहीं याचें कारण काय? वास्तविक पाहूं लागलें असतां याचें कारण चित्ताची अशुद्धता होय. जोंपर्यंत अंतःकरण शुद्ध झालें नाहीं तोंपर्यंत त्यांत पारमार्थिक विचाराचें बीजारोपण होत नाहीं. खडकाळ जमिनीवर पेरलेले धान्यास जसा अंकूर येत नाहीं,किंवा दूषित झालेल्या गर्भाशयतां गर्भ धारण होत नाहीं, तद्वत विषयादिक भोगांचे योगानें अपात्र झालेल्या अंतःकरणांत वेदांत मत ठरत नाहीं.

ज्यांच्या उपभोगानें अंतःकरणांत तिरस्कार उत्पन्न होऊन जे दुःख परिणामी असतात ते सर्व विषय नाशिवंत होत. निद्रा, आहार, मैथुनादिक हे सर्व दुःख परिणामी होत. परंतु यांत एक मोठा चमत्कार आहे तो हा कीं, त्यांच्या उपभोगानीं अंतःकरणांत उत्पन्न झालेला तिरस्कारही क्ष-

णिकच असतो.ह्मणजे कांहीं काल मध्यें गेल्यानें पुनः त्यात्या विषयांचे उपभोगाची इच्छा उत्पन्न होते यामुळें मनुष्य सर्वदा त्या विषयीं आसक्त असतो.क्षुधेनें पीडित झालेला मनुष्य अन्नविषयीं कितो उतावळा होतो व तें न मिळाल्यानें घाबरा होऊन तिच्या अतितम प्रसंगी तर त्याचा जठराग्नी असा प्रज्वलित होऊन जातो कीं,तो आपल्या ज्वालांनीं त्या पुरुषाची भीती, लज्जा,अभिमान, दया व सारासार विचार यांचे जाळून भस्म करितो. अशा क्षुधार्त मनुष्यांनीं नासके कुजके पदार्थ, मांस व झाडांचा पाला, आणि हें न मिळेल तर मेलेलीं जनावरें आणि सर्वांचे अमर्याद पोटचीं गोजीर वाणी मुलेंहि खाल्ल्याचें सर्वांनी ऐकून व पाहून ठाऊक असेल. आतां यांत चमत्कार हाच कीं,अशा तऱ्हेचे क्षुधेनें पीडित झालेल्या मनुष्यरूपी राक्षसास जर यथेच्छ जेऊं घातलें, आणि तो तृप्त झाल्या नंतर त्याच्या पुढें पंचपक्वान्नानें भरलेलें ताट आणून ठेवलें, तर मग तो त्या अन्नाकडे नुसतें पहाणारहि नाहीं. इतकेंच नव्हे पण त्या अन्ना विषयीं त्यास तिरस्कार उत्पन्न होईल. आणि जर कदाचित् तो तें अन्न जुलमानें खाऊं लागला तर त्यास वांती होईल. हाच प्रकार मैथुनादिकांविषयीं जाणावा. बरें त्या त्या भोग्य वस्तूंच्या उपभोगांनीं तृप्त झालेले पुरुषांचा तृप्तपणा तरी शाश्वत आहे काय? तसेंहि नाहीं, उपभोगा नंतर कांहीं काळ मध्यें गेला, कीं पुनः त्याची इच्छा होतेच. बरें, या इच्छेला कांहीं मर्यादाहि नाहीं. तसें असतें तर ती इच्छा तृप्त करून घेऊन नंतर मनुष्यास पारमार्थिक कल्याणाकडे वळतां आलें असतें. पण जों पर्यंत इंद्रियें सशक्त आहेत व जों पर्यंत देहामध्यें चलन वलन आहे तों पर्यंत विषयादिक भोगाची इच्छा जागरुक असतेच. ज्या प्रमाणें सर्पाच्या तोंडांत सांपलेला बेडूक आपलें तोंड उघडून माशा खातच असतो, तद्वत कालाचे तावडींत सांपडलेला मनुष्य विषयाचा उपभोग घेतच असतो. शुभ्र केशरूपी मृत्यूची पताका जों जों मनुष्याचे डोक्यावर फडकूं लागते, तों तों तर आत्मज्ञानहीन पुरुष अधीक विषयासक्त होतो. विषयाचा वीट येताच त्याजवरील आसक्ती कमी होत नाहीं.

असें नसतें तर सगळी दुनिया इंद्रियनियमन करून मुक्त झाली असती. पण असें कुठे आहे? हजारों वर्षें लोहपिष्ट खाऊन तपश्चर्या करावी तरी इंद्रियें स्वाधीन राहत नाहींत. संसाराची विरक्तता अंतःकरणांत केव्हां केव्हां जरी उत्पन्न होते, तथापि ती एखादे मानीव सुखांत कांहीं कमीपणा किंवा उणीव झाल्यानें येते. पण त्यापासून त्या पदार्थाचा तिरस्कार न करितां किंवा त्यापासून अलिप्त न राहतां आपणास सुखकारक होई अशा तऱ्हेचा तो पदार्थ बनविण्याची किंवा त्याचे ऐवजीं दुसरा मिळविण्याची मनुष्यास उमेद येते. यामुळें तो अधिकाधिक गुंतला जाऊन अधीक पस्तायांत पडतो. असें समजा, कीं एखादे मनुष्याचें घर लहान असून त्याचीं दारें ठेंगणीं आहेत. दाराला डोकें लागेल या भीतीनें तो मनुष्य जाणून व वांकून वागतो. पण अनेक व्यवहारिक उपाधींनीं आणि लगबगीनें त्या दाराची ठोकर लागून डोक्याला जखम पडली, कीं त्या घराचा तिरस्कार उत्पन्न होऊन लगेच तें मोडल्यावांचून जेवायचें नाहीं अशा हट्टानें मजूर बोलवून तें पाडण्याची सुरवात. बरें घरावरील रागानें याची घराविषयींची आसक्ती कमी होते काय? उलट नवी सातखणी बांधण्याचे यातातींत पडण्याचे तयारीस तो लागतो, याचप्रमाणे स्त्रीपुत्रादिक. स्त्री मनाजोगी किंवा अनुकूल नसली ह्मणजे मनुष्यास त्रास येतो पुत्र दुराचारी व मूर्ख असला ह्मणजे मनुष्य या संसारास कंटाळलासा दिसतो, मित्रानें विश्वासघात केला ह्मणजे यास मोठा तिरस्कार उत्पन्न होऊन या व्यवहारिक मायेस तो कंटाळतो, पण या कंटाळण्यानें संसारापासून त्यास पराङ्मुख होतां येत नाहीं, याचें कारण इतकेंच कीं, तो वरील उपाधींच्या संगतीस त्रासत नसून त्यापासून त्यास जें कांहीं अपेक्षित सुख मिळावें ह्मणून त्याची इच्छा असते तें न मिळाल्यानें किंवा ज्या गोष्टीस तो दुःख समजतो त्याची प्राप्ती प्रकृत उपाधीं पासून होऊं लागल्यानें तो कंटाळतो. पुत्र मूर्ख व दुराचारी निघाला तथापि त्याच्या बद्दल पित्याची संसारा विषयीं आसक्ती कमी होत नाहीं, आपण मिळवि

ठेल्या सर्व स्थावर जंगम मालमत्तेचा मालक आपल्या मागें आपला पुत्र होईल असें त्यास माहीत असतां, व तो पुत्र आपल्या दुर्वर्तनानें सर्व मालमत्तेची राख रांगोळी करील असी त्याची खात्री असतांहि म्हातारा अन्यायानें आणि अनितीनें धन संपादन करून तें दानादिकांत किंवा उपभोगांत न घालवितां सांचून ठेवितो. तो वृध्द मनुष्य संसारास त्रासलेला, दगदगलेला, व हरयेक गोष्टी विषयीं ज्यास तिरस्कार उत्पन्न झाला आहे असा दिसतो, पण धनार्जनादिकांविषयीं त्याची इच्छा विशेष जागरूक असते. आणि मरण लवकर प्राप्त होईल या भीतीनें तो फारच उतावळा होतो.

मनुष्यास संसाराविषयीं तिरस्कार उत्पन्न होत असूनहि त्या विषयींची त्याची आसक्ती कमी होत नाहीं, व त्या मुळें पारमार्थिक विचार करण्याची त्यास इच्छा होत नाहीं म्हणून वर सांगितलें, याचें कारण इतकेंच कीं, तो या संसाराची अशाश्वता ऐकतो व पहातो तथापि ती त्याचे चित्ताला अनुभूत नसते. त्याच्या अंत:करणावर संसाराचे अशाश्वतेचा चांगला ठसा उठला पाहिजे. पण असें होण्याला प्रथम चित्त शुध्धी व्हावी लागते. चित्तशुद्धी होण्याच्या मुख्य गोष्टी अशा आहेत कीं, सर्वत्र परमेश्वराचें आवलोकन, स्तुति, महापूजा, नमस्कार, स्मरण, आणि प्राणिमात्राचे ठायीं ईश्वराची व्यापकता आहे अशी बुद्धी असली पाहिजे. या खेरीज दुष्ट संगतीचा त्याग, सत्यभाषण, गुरूजनांचा बहुमान, दु:खितां विषयीं दया, स्वसमानांचे ठायीं मैत्री, प्राणायामादिक योगशास्त्रांतर्गत कृत्यांचा अभ्यास, श्रुतींचे शिरोभाग जीं उपनिषदें त्यांतील तत्वमस्यादि वाक्यांचें गुरूपासून श्रवण, परमेश्वराच्या नामाचें संकीर्तन, साधूंचा समागम, सरळपणा, अहंकाराचा त्याग, आणि सार्व काळ परमेश्वराच्या पूजादिकांची इच्छा येणे करून अंत:करणाची शुद्धी होते. अशा रीतीनें शुध्धचित्त होत्साता मनुष्य या संसारांत वागूं लागला म्हणजे त्याचे ऐहिक पाश स्वाभावीक तुटत जातात. तो जरी

तोजरी नेहमी संसार करीत असला तथापि त्याचें सर्व लक्ष ईश्वरा ठिकाणीं असतें. प्रवासांत गेलेल्या मनुष्याचें लक्ष ज्या प्रमाणे नेहमी घराकडे असतें, अरण्यांत चरणाऱ्या धेनूचें सर्व लक्ष तिच्या वांसराकडे असतें, आई घरकाम करीत असली तथापि तिचें सर्व लक्ष जसें तान्ह्या मुलावर असतें, अथवा विषयी पुरुषाचें चित्त सर्व काळ त्याच्या प्रीतिपात्र स्त्रीवर असतें, किंवा कृपणाचें लक्ष त्याच्या संचित धनावर असतें, त्या प्रमाणें पूर्वोक्त गुणांनीं ज्याचें अंतःकरण शुद्ध झालें आहे अशा मनुष्याचें सर्व लक्ष ईश्वराकडे असतें. चित्तशुद्धी वांचून इंद्रियनियमन होत नाहीं, आणि इंद्रियें स्वाधीन झाल्या वांचुन आत्म्याचा साक्षात्कार घडत नाहीं. आत्मानुभवी पुरुषहि संसार करीतच असतो, तथापि त्याचा संसाराशीं संबंध फार निराळे तऱ्हेचा असतो. अविरक्त मनुष्य विषयांचे स्वाधीन नेहमी रहातो, आणि विरक्त मनुष्य विषयास आपले स्वाधीन ठेवितो. जो विषयांचे स्वाधीन झाला त्यास परमार्थ सुखाची गोडी लागणार नाहीं, त्यास विषय अगदीं मोहित करून टाकतात; पण ज्याणें विषय स्वाधीन ठेविले आहेत, तो त्या विषयोपभोगानें उलट परमार्थास मदत करून घेतो. व मनास वाटेल तेव्हां त्यांचा त्याग करितो. याचें कारण इतकेंच कीं, त्यास ज्ञानाचे योगानें आत्म्याचा अनुभव घडलेला असतो, यामुळें दैहिक क्रियांची नश्वरता त्यास माहीत असते. त्यास वेदांत्याचें सोंग आणण्याची जरूर नसते. एका कवीनें ह्मटलें आहे:—

> संन्याशाचें सोंग आणितांति सांग ॥
> वैराग्याचें आंग आणितां नये ॥

या करितां आत्मसाक्षात्कार घडला पाहिजे. ह्मणजे वरकणी ढोंगांची कांहीं गरज नाहीं. ह्मटलें आहे.—

> आत्मअनुभवें चोखळिल्या वाटा ॥
> त्याच्या माथां जटा असो नसो ॥

# कलियुगाचा काल खराच निंद्य आहे कीं काय?

कृतयुगाहुनि उत्तम हा कली ॥ ह्मणुनि भागवतीं मुनि हाकली ॥

( वामन )

आर्य लोकांत पुरातन काळापासून कांहीं काळाचे साधारण साम्यतेवरून गणना केलेली आहे. असे काळ एकंदर ४ प्रकारचे मानतात. त्यास युगें ह्मणतात. कृतयुग, त्रेतायुग, द्वापरयुग, आणि कलियुग अशीं हीं चार युगें आहेत. या युगांचें कालमान फारच मोठें धरलेलें आहे. कृतयुगाचें प्रमाण १७२८०००, वर्षें, त्रेतायुगाचें १२९६००० वर्षें, द्वापरयुगाचें ८६४०००, आणि कलियुगाचें प्रमाण ४३२००० वर्षें ह्मणजे एकंदर चारी युगांचें प्रमाण ४३२०००० वर्षें ठरत. या चार युगांचे अनेक फेरे झाल्याचें पुराणांत वर्णिलें आहे. याजवरून कोट्यावधी वर्षांपूर्वीचें हें जग आहे असें होतें. असो, या चार युगांपैकीं तीनहि युगांचा काल श्रेष्ठ वर्णिला असून कलियुगाचा काल सर्वांत निंद्य गणला आहे. कृत त्रेत आणि द्वापर या तीन युगांतील लोक सदाचरणी व सद्धर्मशील मानिले असून कलियुगाचा काल फारच निंद्य आहे असें कवींनीं ठरविलें आहे. या कलियुगाचीं ४९८० वर्षें भरून गेलीं आहेत. आतां आज या युगाचे सत्यासत्यतेचा विचार करण्याचा नसून या युगांपैकीं कलियुगाचा व त्यांतील लोकांची जो आमच्या पुराण कर्त्यांनीं निर्भत्सना केलेली आहे ती खरी किंवा खोटी हें पहावयाचें आहे. याचा विचार करण्या पूर्वीं कलियुगांत कोणत्या गोष्टी निंद्य गणिल्या आहेत, व त्या पूर्वोक्त तीन युगांत होत्या किंवा नाहीं याचा विचार केला पाहिजे. हा विचार करतांना आमच्या पुराण कर्त्यांनीं व कवींनीं आपापल्या ग्रंथांत जे शेरे मारिले आहेत त्यांपैकीं कांहीं येथें दाखल करूं. रामायणांत असें सांगितलें आहे:—

प्राप्ते कलियुगे घोरे नराः । पुण्यविवर्जिताः ॥
दुराचाररताः सर्वे । सत्यवार्ता पराङ्मुखाः ॥
परापवादनिरताः । परद्रव्या भिलाषिणः ॥
परस्त्री सक्तमनसः । परहिंसा परायणाः ॥
देहात्मदृष्टयो मूढाः । नास्तिकाः पशुबुद्धयः ॥
मातापितृकृतद्वेषाः । स्त्रीदेवाः कामकिंकराः ॥
विप्रा लोभग्रहग्रस्ता । वेदविक्रय जीविनः ॥
धनार्जनार्थमभ्यस्त । विद्यामदविमोहिताः ॥
त्यक्त स्वजातिकर्माणः । प्रायशः परवंचकाः ॥
स्त्रियश्च प्रायशो भ्रष्टा । भर्तृवज्ञान निर्भयाः ॥
श्वशुरद्रोहकारिण्यो । भविष्यंति न संशयः ॥

"कलीयुग प्राप्त झालें असतां सर्व लोक पापी, दुराचारी, असत्यवादी परनिंदारत, दुसऱ्याचें वित्त हरण करण्याची इच्छा करणारे, परस्त्रीचे ठायीं कामासक्त, परहिंसारत, वेदांत विचाराविषयीं अज्ञानी, नास्तिक, मूर्ख, मातापित्यांचा द्वेष करणारे, स्त्रीजित, व विषयादिकांचे ठायीं सक्त होतील; ब्राह्मण लोक लोभानें ग्रस्त, व वेदविक्रयानें उपजीवन करणारे होतील स्त्रिया जारिणी होऊन भर्त्यांची आज्ञा मानणार नाहींत व श्वशुरादिकांचा द्वेष करतील." आशाच प्रकारचे शेरे ज्या त्या ग्रंथांत मिळतील. कोणत्याहि ग्रंथांत पहा, कलियुगाचा संबंध आला, कीं त्यास हीं विशेषणें आहेतच. कलियुगा सारखा दुसरा निंद्यकाल नाहीं, त्यांतील लोकांसारखे दुसरे कोणतेहि युगांत दुराचारी लोक नाहींत, या कालासारखें दुसऱ्या कोणत्याही युगांत पातक होत नाहीं, असे ज्या त्या ग्रंथांत ठरीव शेरे मिळतात. कित्येक ग्रंथांत 'कलिविडंबन' या सदराखालीं प्रस्तुत कालावर कवींनीं मोठें हतेरच धरलेलें दिसतें. आतां हे शेरे किंवा अभिप्राय पुरातन कवींचे आहेत तेव्हां त्यावेळीं त्यांणीं कांहीं तरी अनुमान करून लिहिलें असावें असें म्हणण्यास हरकत नाहीं. अथवा

असें ह्मणणें अलीकडे जरा चुकीचेंच वाटेल. कारण. त्या ग्रंथकारास त्रिकालज्ञान होतें. ह्मणजे त्यांस भूत भविष्य वर्तमान समजत असे असा लोकांचा समज आहे, तेव्हां अशा त्रिकालज्ञानी लोकांचे लेखाविरुद्ध आपलें मत प्रसिद्ध करणें हें मोठेंच धाडस आहे असें कोणास वाटेल. जे कोणी भोळे भाविक जन परंपरया आस्तिक बुद्धीनें वागत आले आहेत व ज्यांस आस्तिक आणि नास्तिक यांतील खरोखर भेद कळत नाहीं किंवा तो समजून घेण्याची ज्यांस इच्छा नाहीं, अशा लोकांस प्रकृत मत हें कदाचित नास्तिकपणाचेंहि वाटेल. व्यास वाल्मिकांनीं आपापले ग्रंथांत जें लिहून ठेविलें आहे तें खोटें किंवा निराधार असें ह्मणण्यास यांस अधिकार काय? व ज्यांच्या मतास अनुसरून तुकाराम रामदासादि अर्वाचीन कवींनीं व सत्पुरुषांनीं वरील ग्रंथच प्रमाण धरून कलियुगाची निर्भर्त्सना केली आहे, तेव्हां असें अनादि कालापासून सर्वमान्य ठरलेलें मत योग्य नाहीं, व तें मत देणारांचा समज चुकीचा आहे असें आह्मी प्रतिपादन केल्यास तें सद्दर्शनीं कोणास बरें वाटणार नाहीं. व हा विषय वाचण्याची सुरवात करतांच हा प्रतिपादनाचा झोंक जाणून असला नास्तिक निबंध कोणी वाचावा असें मनांत आणून कित्येक याचा कदाचित् तिरस्कार करतील. तसें न व्हावें ह्मणून या ठिकाणीं आह्मास प्रथमतः इतकें सांगणें अवश्य वाटतें कीं, आह्मी नास्तिक मतास मुळीच कधीं अनुसरत नाहीं. तसेंच व्यासवाल्मिकासारखे जे महान विद्वान व ज्ञानी सत्पुरुष त्यांस व त्यांच्या ग्रंथांस योग्य सन्मान देण्याची आमची मनापासून इच्छा आहे. जुनें तेवढें सब झूट आणि नवीन तेवढें चांगलें व खरें असें आह्मी उगाच ठाकळ मत आमच्या वाचकांपुढें मांडल्याचें आह्मास स्मरत नाहीं. डोळे मिटून समाजांत उभे राहणारे व आकाशांतले बापास हांका मारणारे लोकांत ज्या गोष्टी वेडेपणाच्या वाटतात त्या जशा आह्मी लोकांपुढें ठेवितों, त्याच प्रमाणें आमच्या वरील सर्वमान्य, पूज्य व विद्वान पुराण कर्त्यांनीं भावी युगा बद्दल जें

अनुमान लिहून ठेविलें आहे, तें खरें किंवा खोटें हें पहाण्याचा आज आम्हास प्रसंग आला असतां आम्ही तो फुकट दवडावा हें आम्हांस रास्त दिसत नाहीं. आतां तो प्रश्न हाच कीं, ज्या युगांतील काळा विषयीं त्यांस अनुमान करावें लागत असे व तशा अनुमाना वरूनच ज्यांणीं आपलीं मतें घसरडून दिलीं, त्या काळाचा आम्ही आज प्रत्यक्ष अनुभव घेत आहों. तेव्हां आमच्या पुराण कर्त्यांचें अनुमानिक मत आपल्यास ताडून पहाण्यास आज जो संधी आली आहे ती फुकट घालविणें रास्त होणार नाहीं असें जाणून या ठिकाणीं त्याज बद्दल चार शब्द लिहूं. वरतीं रामायणांतील एक उतारा आम्ही दाखल केला आहे तें ठोकळ अनुमान नारदानें ब्रह्मदेवाला सांगितलें आहे, असे अभिप्राय पुष्कळ कवींनीं दिले आहेत. कलियुगां विषयीं आणखी असें म्हटलेंलें आहे कीं —

न देवे देवत्वं कपट पटवस्तापसजनाः ॥
जनो मिथ्यावादी विरलतनु वृष्टि र्जलधरः ॥
प्रसंगो नीचाना मवनिपतयो दुष्ट मनसः ।
जना भ्रष्टा नष्टा अहह कलि कालः प्रभवति ॥
धर्मः प्रव्रजितस्तपः प्रचलितं सत्यं च दूरे गतं ।
पृथ्वी मंदफला नृपाश्च कुटिला लौल्यं गता ब्राह्मणाः ॥
लोकाः स्त्रीषु रताः स्त्रियश्च चपलाः पुत्राः पितुर्द्वेषिणः ।
साधुः सीदति दुर्जनः प्रभवती प्राप्ते कलौ दुर्युगे ॥
विद्वांसोपि न संती संति यदिवा मात्सर्ययुक्ताश्च ते ।
संतः क्वापि न संति संति यदिवा दुःखेन जीवंति ते ॥
राजानोपि न संति संति यदिवा तृष्णा धनग्राहिणो ।
दातारोपि न संति संति यदिवा सेवानुकूलाः कलौ ॥
नीचैर्दुर्वचनैः शुनीभिरपि वा निःशंकमालोकितं ।
भुक्तं पंक्तिविदूषकैः सहनरैरज्ञात वेदाक्षरैः ॥

मद्यास्वादनमत्तचित्तजनता मोहाय भीहानित ।
कर्माण्यारभते स्तुतिं स्मृतिरुचो दूराग्यसाराण्यहो ॥
परान्नेन मुखं दग्धं हस्तौ दग्धौ प्रतिग्रहात् ॥
परस्त्रीभि र्मनो दग्धं । कुतः शापः कलौ युगे ॥
विद्वत्ता वसुधातले विगलिता पांडित्य धर्मो गतः ।
श्रोतृणां हृदयेष्वबुद्धिरचिता ज्ञानं गतं चारणे ॥
गाथा गीतविनोदवाक्यरचना पुरुषा जनाऽर्जितं ।
ज्योतिर्वैद्य शास्त्रसारमखिलं क्षुद्रं जातं कलौ ॥

“ देवाच्या ठिकाणी देवपणा राहिला नाहीं, तपस्वी जन कपटी झाले, लोक असत्यवादी झाले, मेघ वृष्टी करीत नाहीसे झाले, दुष्ट लोकांना उत्तेजन आलें, राजे निर्दय झाले, संपूर्ण लोक भ्रष्ट झाले, जमिनींत उत्पन्न थोडें होऊं लागलें, ब्राह्मण हीनतेज झाले, लोक स्त्रीरत झाले, स्त्रिया जारिणी झाल्या, मुलगे बापाचा द्वेष करूं लागले, सज्जन दुःखित झाले, विद्वान मुळीं नाहींसेच झाले—व जे कुठे आहेत ते परस्परांशीं मत्सर करूं लागले, साधुजन अगोदर नाहींसेच झाले—व क्वचित् आहेत ते दुःखानें काळ क्रमणा करीत आहेत, दाते मुळींच नाहींसे झाले, व क्वचित् दृष्टीस पडतात पण ते सेवानुकूल झाले, म्हणजे त्यांची सेवा केल्यास ते प्रसन्न होतात, तसेंच राजेहि बहुधा नाहींसेच झाले—आणि जे आहेत ते केवळ द्रव्याची आस धरून प्रजेस नागविणारे झाले आहेत, सर्व लोक नीच दशेला आले, अंत्यक मनुष्याशीं अन्न व्यवहार करूं लागले, वेदार्था विषयीं अज्ञानी झाले, मद्यप्राशनानें मत्त होऊन लोक भीति मानीत नाहींसे झाले, वेदशास्त्रांतील आज्ञांचें उल्लंघन करूं लागले, परान्नानें दग्धमुख झाले, प्रतिग्रहानें दग्धहस्त असे झाले, व परस्त्रीचे अभिलाषानें ज्यांचे चित्त दग्ध झालें आहे अशा दशेला लोक पावले, विद्वत्ता समूळ नाहींशीच झाली, धर्म विगलित झाला, श्रोते अश्रद्धायुक्त झाले, नटादिकांचे ठिकाणीं ज्ञान दृष्टिगोचर होऊं लागलें, गाणे बजावणे

आणि थट्टामस्करी याणे लोकांचें मनरंजन होऊं लागलें, ज्योतिष, वैद्यक वगैरे शास्त्रांत नीच लोक प्रवीण झाले, असी या निंद्य कलियुगांत स्थिति झाली आहे. "

अशा तऱ्हेनें ज्याल्या ग्रंथांत या युगाची विटंबनाच दिसते. हा काल व यांतील लोक धर्मभ्रष्ट, दुष्ट, व निंद्य आहेत हें मत खरें किंवा खोटें याचा आतां विचार करूं. हा विचार करतांना दोन गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे. ह्मणजे एक ऐहिक आणि दुसरी पारमार्थिक. ह्मणजे इहलोक संबंधींच्या बऱ्या वाईट गोष्टी, आणि परलोक संबंधींच्या, ह्मणजे ईश्वरा विषयींच्या गोष्टी. या पैकीं प्रथम कलियुगांतील पारमार्थिक स्थिति विष यींचा विचार करूं इहलोकीं मनुष्यानें सदाचरणानें, नीतिनें, आणि मित्रभावानें वागून पातकाकडे मुळींच वळूं नये हाच वाटतो यथार्थ सा धनाचा मार्ग होय. पण कलियुगांतील लोकाचें आचरण वरील शिष्ट मार्गाच्या विरुद्ध आहे असा पुरातन त्रिकालज्ञांना शेरा आहे. बरें क लीयुग वर सांगितल्या प्रमाणें सर्व दुर्गुणांनीं युक्त आहे असें आपण क्षण भर मानूं. पण आतां हेंहि पाहिलें पाहिजे कीं, मागील युगें तरी सर्व प्रकारेंच स्तुत्य होतीं कीं काय? ज्या व्यास वाल्मिकासारख्या महान विद्वानांनीं कलियुगास व त्यांतील लोकांस दोष दिला त्यांणीं आपल्या समकालीन लोकांकडे तरी पाहिलें होतें काय? पाहिलें नाहीं ह्मणावें तर त्यावेळचे मोठ्या पूज्य लोकांचीं दुराचरणें त्यांच्या त्यांच्या ग्रंथांतून व- र्णिलीं आहेत. इतकेंच नव्हे पण त्यावेळच्या समजस पण दुराचारी लो- कांचे दुर्वर्तनाचें वर्णन करतांना त्या वर्णनाचे मोठे ग्रंथ होऊन गेले आ हेत. या निबंधाचे आरंभींच आह्मी रामायणांतील एक उतारा दाखल केला आहे त्याजवरून आणखी एक मोठा चमत्कार वाटतो तो हा कीं, ज्या ग्रंथांतील या उताऱ्यांत कलाचें व त्यांतील लोकांचें दुर्वर्तन व अज्ञा न दाखविलें आहे, तो सारा ग्रंथ रावणासारख्या ज्ञानी परंतु दुराचरणा- चा केवळ मुकुटमणी अशा पुरुषाच्या वर्णनानें भरून गेला आहे. आतां

पूर्व युगाची आज कोणास प्रत्यक्ष माहिती नाहीं, व जरी आम्ही त्या युगांत जन्मून नंतर चवऱ्यायशींच्या फेऱ्यांत सांपडून हें कलियुग पाहाण्यास आलों आहों असें मानलें, तथापि त्या वेळची साक्ष आज आम्हांस प्रतिज्ञेवर देतां येत नाहीं, तरी त्या युगांचें व त्यांतील लोकांचें ज्यांत वर्णन आहे असे अनेक ग्रंथ आज उपलब्ध आहेत. तेव्हां त्या ग्रंथांवरूनच जर विचार करूं लागलें तर पूर्व युगांत हि या युगाप्रमाणेंच लोक दुराचारी, धर्मभ्रष्ट, व अनीतिमान, असत असें ह्मणावें लागतें, इतकेंच नव्हे, पण त्या युगामध्यें प्रस्तुत कालापेक्षांहि लोकांचें आचरण निंद्य होतें असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. आतां त्या वेळीं सर्वच लोक ह्मणजे दुराचारी होते असें आम्ही ह्मणत नाहीं, त्याचप्रमाणें हल्लीं हो कित्येक आपापल्या सद्वर्तनानें जगास कित्ता घालून देतात हेंहि ह्मणण्यास आम्हाला शंका वाटत नाहीं. मग हा प्रकार उभययुगांत सारखाच दृष्टीस पडत असतां एकास चांगलें व दुसऱ्यास वाईट ह्मणण्यास काय अधिकार आहे तो आम्हांस समजत नाहीं.

चंद्रानें गुरुपत्नी जो तारा तिच्याशीं संभोग केला हा न्याय काय? सृष्टीचा उत्पन्न कर्ता जो ब्रह्मदेव याणें प्रत्यक्ष आपल्या कन्येवर पापदृष्टी ठेविली तेव्हां हें उत्तम काळाचें लक्षण काय? इंद्राचे उपभोगार्थ अप्सरांचा मोठा समुदाय आहे व कोणी तपश्चर्येला बसला ह्मणजे त्या अप्सरादिकांचे योगानें त्याच्या तपास नाश करण्याची तयारी इंद्र करितो, तेव्हां हा सज्जनपणा कोणता हें आम्हास समजत नाहीं. लोकांना पुण्यमार्गानें जाण्याविषयीं उपदेश करण्याचें ज्यांचें काम त्यांणींच लोकांस ते आपण होऊन सन्मार्गानें जात असतां त्या पासून भ्रष्ट करणें हें किती अनीतीचें काम आहे याची कल्पना करण्यास कोणी असमर्थ नसेल. बरें धर्माचरण पाहिलें, तर ते वेळीं दैत्य इतके अधर्मरत होते कीं, प्रत्यक्ष देवांना जर्जर करून जिकडे तिकडे सद्धर्माची विटंबना करीत. लोकांची संपत्ती हरण करण्याची त्यांस फार हौस असे. बरें ही गोष्ट फार पुरातन

ची व देवदानवांची आहे, तेव्हां ह्या थोरल्या जबरदस्त पारड्यांची बरोबरी करीत आपण कशाला बसावें असें कोणास वाटेल, तर त्याच्या अलीकडे वळूं. रावणा सारख्या ज्ञात्यासें जगन्माता जी जानकी तिचा अभिलाष धरून तिला पळवून नेली, दशरथ राजानें स्त्रीजित पणानें आपला ज्येष्ट पुत्र जो रामचंद्र त्यास प्रत्यक्ष परमेश्वराचा अवतार आहे असें जाणीत असतांहि अरण्यांत पाठवुन दिला. आतां वचनबद्ध झाल्या मुळें त्याला तें ऐकावें लागलें असें कोणी ह्मणेल, परंतु वचनबद्ध मनुष्य झाला तथापि मागणारे व्यक्तीची मागण्याची योग्यता पहावी लागते. असें समजा कीं, एका मनुष्यानें एका गृहस्थास तो मागेल तें देण्याचें व सांगेल तें करण्याचें अभिवचन दिलें· आतां तो जर त्याचें घरदार मागेल किंवा प्रत्यक्ष प्राण खर्ची घालण्यास सांगेल तर तें तो कसेंहि करील. पण त्या गृहस्थानें शंभर तान्हीं मुलें मारून त्यांचीं प्रेतें मला द्यावीं, शंभर स्त्रिया माराव्या, कांहीं ब्रह्महत्या कराव्या, कांहीं गोहत्या कराव्या, कांहीं गांव जाळावे असेंजर सांगू लागला तर त्या वचनबद्ध पुरुषानें ऐकावें काय? अशा मागणारा सच देहांत प्रायश्चित द्यावें असें कोणीहि ह्मणेल. त्याच प्रमाणें कैकेयीनें भरताला राज्याभिषेक होण्या विषयीं घेतलेला हट्ट दशरथानें पुरा करावयाचा होता, पण जानकी सहवर्तमान रामाला चवदा वर्षें आरण्यवासास पाठविण्याचा जेव्हां ती हट्ट धरून बसली तेव्हां तिला तोफेचे तोंडाशीं उभी केली असती ह्मणजे ती होऊनच नाकबूल झाली असती. बायकोचे लाड पुरविण्या करितां प्रत्यक्ष परमेश्वराचा वियोग सोसण्यास तयार होणें या पेक्षां जास्त स्त्रीजितपणा कोठचा? कलियुगांत इतका कोणी बाईल बुध्या बनलेला ऐकण्यांत नाहीं. आतां कित्येकांचें असें मत आहे कीं, रावणाचा नाश करण्या करितां रामाला गेलें पाहिजे होतें या करितां हें असें निमित्य मुद्दाम केलें. कारण एकदा रामाला राज्याभिषेक झाला असता ह्मणजे मग रावणाचा वध करण्याची पंचाईत पडती. हें मत आह्मास तर अगदीं वेडगळ पणाचें दिसतें. कारण, रामासारखा आवतारी

सर्वज्ञ पुरुष राज्यलोभाला गुंतून आपलें कर्तव्य विसरेल असें समजणें हाच वेडेपणा आहे. रामानें वनवासाला जाऊन जीं कृत्यें केलीं तीं त्यास लढाईला ह्मणून जाऊनहि करतां आलीं असतीं. आतां इतकें मात्र खरें कीं बायकोचे नादानें दशरथानें जितकें निंद्य काम केलें, त्या मानानें रामाचें आचरण फार स्तुत्य होय. त्याणें पितृभक्तीची सीमा केली. येवढ्या सार्वभौम पदावर लाथ मारून तें आपल्या कनिष्ट बंधूला देण्या विषयीं मोठ्या आनंदानें कबूल करणारा, व स्वत: वनवास भोगण्या विषयीं उद्युक्त होऊन जटा वल्कलें धारण करणारा पुत्र फार धन्य होय. अशी पितृ भक्ती विरळाच दृष्टीस पडेल. त्याच प्रमाणें सीतेचें पातिव्रत्य आणि लक्ष्मण भरतादिकांची भ्रातृ भक्ती हि अवर्णनीय होय. असो, यांत प्रकृत विषयाचे संबंधानें इतकेंच पहावयाचें कीं, दशरथानें स्त्रीजित पणाची सीमा केली. तेव्हां हें त्यावेळच्या प्रत्यक्ष राजाचें आचरण!! वालीनें प्रत्यक्ष आपल्या भावाची बायको जबरीनें आपले जवळ ठेऊन तिच्याशीं संभोग केला, हें करणें किती निंद्य आहे? असला प्रकार कलियुगांत कोठें झालेला प्रसिद्ध नाहीं. या गोष्टी त्रेतायुगांतल्या. द्वापर युगांतहि असे अनेक प्रकार होते. कंस व त्याची अनुयायी मंडळी यांचा स्वभाव किती दुष्ट होता? ज्यांणीं कृष्ण हा ईश्वरी अवतार आहे असें माहित असतांहि त्याचा किती छळ केला? ब्रह्महत्या व बालहत्या हीं पातकें ज्यांच्या खिसगणतींत नव्हतीं. जरासंध, कीचक शुशुपाळ वगैरे राजे कीती अनीति संपन्न आणि दुष्ट होते? साध्वी द्रौपदीचा कीचकानें किती छळ केला? पण त्या भेकड विराटाच्यानें त्यास प्रतिबंध करवला नाहीं. तसेच दुर्योधनादिक. जुगार खेळण्याचे हौशी, धनार्जना विषयीं प्रत्यक्ष भाऊ बंधांना ठार मारण्या पर्यंत व जिवंत जाळून टाकण्या पर्यंत तयार, परस्त्रियां विषयीं अभिलाषी, साध्वी स्त्रियांची विटंबना करण्या विषयीं तयार, आणि सत्यासत्याचा विचार ज्यांच्या स्वप्नींहि नाहीं, असी त्यांची स्थिती होती. धर्मराजाची स्त्री द्रौपदी जिला माते प्रमाणें मानावयाची तिचा भरसभेंत अपमान करून तिला नग्न

करण्या करितां तिची निरी धरून ओढणें ह्मणजे ही पातकाची सीमा नव्हे काय? असे प्रसंग ज्यांणीं आपले डोळ्यांनीं पाहिले त्यांणीं कलियुगांतील पातका विषयीं जें अनुमान केलें त्याज वरून वरील पातक हें त्यांस लहान वाटलें काय? आपल्या मतें द्रौपदी वस्त्रहरणा सारखें दुसरें पातकच श्रेष्ठ नाहीं. बरें पुढें पांडवांनीं तरी कसर केली काय? राज्यप्राप्ती करितां प्रत्यक्ष आपल्या भाऊबंदांची कत्तल उडवून सार्वभौमत्वाचा टिका कपाळीं लावून घेतला. पेशवाईंतील राघोबादादा आणि आनंदीबाई यांचे कृतींत व वरील भारती युद्धांत फरक कोणता? आतां हें कृत्य छोटें आणि तो बडा संग्राम येवढाच तफावत. बाकी दोहोंची जात येकच. रुक्मिणी स्वयंवर द्रौपदी स्वयंवर, सुभद्रा हरण, वत्सला हरण, यामध्यें कोण तंटे आणि काय विटंबना? तेव्हां अशा निंद्य गोष्टी आणि असे दुराचारी लोक ज्या युगांत होते तीं युगें तेवढीं श्रेष्ठ आणि त्यांच्या मानानें कलियुगांत कमी पातकें व दुराचरणें होत असून यास तेवढें निंद्य मानावयाचें हा पक्षपात नव्हे काय?

आतां वरील युगांत ज्याप्रमाणे पातकी व दुराचारी लोक होते ह्मणून सांगितलें त्याच प्रमाणें मोठे धर्मात्मा व पुण्यशील हि होतेच. शिबि राजा, बलि, व कर्ण यांचें दातृत्व अवर्णनीय होतें. धर्मराजासारखे पापभीरु व सहनशील; अर्जुनासारखे सत्यप्रतिज्ञ आणि शूर, राजाधिराज रामचंद्रा सारखे सदाचरणी, एक पत्नी एकवचनी व्रत पाळणारे; व्यास, वसिष्ठ, वाल्मीक, विश्वामित्र, यांसारखे तपोनिष्ठ व महान विद्वान, शुकासारखे ब्रह्मनिष्ठ; आणि उद्धव, अक्रूर, संजय, यां सारखे भगवद्भक्त, प्रसिद्ध आहेत. हा प्रकार कलियुगांतहि होता व आहे. रामदास, शंकराचार्य, तुकाराम, ज्ञानदेव, मुक्तेश्वर इत्यादि अनेक सत्पुरुष मोठे विद्वान, ज्ञानी, विरागी व भगवद्भक्त होऊन गेले व अद्यापहि आहेत. या खेरीज ईश्वर प्राप्तीचे मार्गहि या युगांत सुलभ झाले आहेत. हल्लीं प्रत्यक्ष परमेश्वराला अवतार घेऊन येण्यासारखें लोक फार पातक करीत

नाहींत. पूर्वयुगांतील लोकांच्या पातकानें भूमातेला त्रास व दुःख होऊन ती ब्रह्मदेवाजवळ दाद मागण्या करितां जात असे. तसा प्रकार आतां नाहीं. आतां यापुढें कदाचित् तो येणार नाहीं असें आमच्यानें ह्मणवत नाहीं. पण तसें झालें तरी पूर्व युगापेक्षां या युगास निंद्यता ती काय येणार? तसें घडलेंच तर 'सब्भाई सारखे' या ह्मणी प्रमाणें सर्व युगें एका योग्यतेचीं ठरतील. प्रस्तुत काळीं कोणी पुण्य मार्गानें जाऊं लागला तर त्यास अडथळा येत नाहीं. इंद्राचे सर्व रंभांनीं आतां राजी नामे दिलेसें वाटतें. पूर्वी प्रमाणें अघोर तपश्चर्या करून अगणित वर मिळवावे आणि नंतर आपल्या पराक्रमानें त्रिजगत् दणाणून जिकडे तिकडे पातकच पातक करून सोडावें अशी कुणास इच्छा होत नाहीं. फक्त इश्वरप्राप्तीकडे आतां लोकांचें विशेष लक्ष आहे. आणि त्याचा उपायहि सुलभ झाला आहे

कृते यध्यायते विष्णुं त्रेतायां यजते मखैः ॥
द्वापरे परिचर्यायां कलौ तद्धरिकीर्तनात् ॥

कृतयुगामध्यें ध्यानधारणा दिकानें, त्रेतायुगांत यज्ञ यागादिक कर्मानें, आणि द्वापार युगांत पूजादिकांनीं परमेश्वराची प्राप्ती होत असे, आणि या युगांत तर नामसंकीर्तनानेंच परमार्थ कल्याण होतें. अनेक लोक या कलियुगामध्यें नामकीर्तनानें तरले गेले व जात आहेत. पारमार्थिक संबंधानें पूर्वीच्या युगा पेक्षां हल्लीं कांहीं कमीपणा दिसत नाहीं. सर्व युगामध्यें लोकांचे बरे वाईट स्थितीचीं व आचरणाचीं उदाहरणें दिलीं तीं केवळ प्रसिद्ध पुरुषांचीं आहेत त्याजवरूनच साधारण लोक स्थितीचें अनुमान सहज होण्याजोगें आहे. प्रसिद्ध पुरुषां मध्यें जे गुणदोष असतात तेच सर्व लोकां मध्यें असतात. पण त्यांचे कोणत्याहि प्रकारचे गुणदोष असले तथापि ते लोक दृष्टीला येण्यास मार्ग नसतात. यामुळें प्रकृत संबंधानें उदाहरणें द्यावयाचीं तीं अशा थोर आणि नामांकित पुरुषांचीच देण्याचा पूर्वापार सांप्रदाय पडून गेलेला आहे. आतां वरील उदाहरणांत पूर्व युगांतील प्रसिद्ध पुरुषांचे जे गुणदोष आह्मी दाखविले आहेत, ते दाख

वितांना जर त्या व्यक्ती दोषहीन आहेत असें वाटतें तर त्या काळाच्या सर्व लोकांसहि आह्मी सदाचरणी समजून त्या युगांची व त्यांतील लोकांची मनापासून तारीफ केली असती, आणि त्यामुळें प्रस्तुत युगा विषयीं जें पुरातन कवींनीं मत लिहून ठेविलें आहे तें मान्य केलें असतें. पण हल्लीं च्या लोकां प्रमाणेंच त्या वेळच्या लोकांत सदाचरण आणि दुराचार दृष्टीस पडत होतें, पापी आणि पुण्यवान, सद्गुणी आणि दुर्गुणी, आस्तिक आणि नास्तिक,व स्तुत्य आणि निंदाई असे दोनही प्रकारचे लोक जसे हल्लीं आहेत त्याच प्रमाणें पूर्व युगांतहि होते. याजवरून या कलियुगास पूर्व युगां पेक्षां कोणत्याहि तऱ्हेनें निंद्य मानतां येत नाहीं. तशांतून परमार्थ संबंधानें तर प्रस्तुत युग हें विशेष सोयीवार व स्तुत्य आहे. आतां ऐहिक संबंधानें या युगांतील ह्मणजे प्रस्तुत कालचे लोकांची स्थिती कशी आहे याचा विचार करावयाचा. परंतु आज स्थलसंकोचास्तव तसें करतां येत नाहीं. ज्या प्रमाणें पारमार्थिक संबंधानें वर साम्य दर्शविलें त्याप्रमाणें ऐहिक संबंधानें प्रस्तुतचे युगांत व पूर्व युगांत जमीन अस्मानाचें अंतर दिसतें व ते दिवसें दिवस जास्त वाढत आहे. या संबंधें सविस्तर विवेचन करण्याचें ह्मटलें ह्मणजे हा स्वतंत्र निबंध लिहिला पाहिजे असून आज तसें करण्यास सवड नाहीं, याकरितां पुढील खेपेस "ऐहिक संबंधानें प्रस्तुत काळचे लोकांची स्थिती" या सदरा खालीं आह्मी या संबंधाचे विचार सादर करण्याचें कबूल करून प्रकृत विवेचन पुरे करितों.

# काबूलच्या लढाईचें पुनरुज्जीवन.

मागें इंग्रजसरकार आणि काबूलचे अमीर यांजमध्यें मातबर लढाई होऊन नंतर त्या उभयतांत तह झालेला सर्वांस माहित आहेच. यालढाई चें मूळ कारण फार महत्वाचें नवतें तथापि त्याचा परिणाम मोठा भयंकर होऊन अमीर आपले स्वतंत्रतेस आंचवला आणि त्यास इंग्रजसरकार ह्मणेल तसा तह लिहून द्यावा लागला. रशियानें आपला वकील काबूलांत पाठवला त्यास अमीरानें आश्रय देऊन त्याचा चांगला आदरसत्कार केला, आणि इंग्रजांचे वकीलास त्याणें हांकून लाविलें हें या लढाईचें मूळ कारण. इंग्रज सरकारास आपले वकीलाचा अमीरानें अपमान केला तो सहन न होऊन त्यांणीं अमीरास असें कळलें कीं, रशियाचे वकिलास आपले राज्यांत न राहूं देतां आमचा वकील मात्र काबूलांत राहील त्यास राहूं द्यावा, आणि असें न होईल तर लढाईस तयार व्हावें. अमीराला रशियाचा भरंवसा होता, आणि त्याचे जोरावर तो इंग्रज सरकाराबरोबर लढाई करण्यास तयार झाला.नंतर उभयतांची लढाई सुरू झाली, पण रशियानें काबुलवाल्याला तोंडघशी दिलें. त्या लढाईचा परिणाम कसा झाला हें वर सांगितलेंच आहे. असो, अमीर आपला अंकीत झाला असें समजून इंग्रज सरकारनें त्याचे हद्दींत आपला एक वकील आणि त्या वकीला बराबर पांच पन्नास लोक ठेऊन रेसिडें-न्सीचें ठाणें बसविलें.

अमीरानें जो तह केला त्याजबद्दल काबूलचे लोकफार कुरकुरतच होते. अगोदर मुसलमानी धर्माचे लोक ह्मटले ह्मणजे मोठे अभिमानी आणि हूड असतात. तशांतून ज्या काबूलचे लोकांस दुसऱ्याचा ताबा माहीत नव्हता ते परधर्मी- ह्मणजे ख्रिस्ती राष्ट्राचे अंकीत झाले. तेव्हां तर त्यांस जास्तच वाईट वाटलें. मुसलमानी धर्मावांचून अन्यधर्मी जेवढे लोक तेवढे सगळे काफर असें त्यांचें मत आहे, आणि या लोकांचीं

धर्ममतें किती वेडगळपणाचीं असतात व त्या मतांचा त्यांस केवढा दुरभिमान असतो हे आह्मी गुदस्तसालच्या १० वे अंकांत सांगितलेंच आहे असो, तेव्हां या काफर लोकांचा त्यांच्या देशास विटाळ झाला येवढेंच नव्हे, तर त्यांचें आपल्या देशावर वर्चस्व होऊन त्याचें कायमचें ठाणेंहि आपल्या देशांत बसलें असें काबुली लोकांस वाटलें तेव्हां त्यांचे मनांतील द्वेष अधीकच वाढत चालला. त्यांतून धर्माभिमानी जे काजी लोक त्यांणीं तर त्यांचे मनांत अनेक तऱ्हेने क्रूरपणा उत्पन्न करून त्यांस उत्तेजन दिलें असेल तेव्हां ते फारच चवताळले. आमच्या सरकारास हें मुसलमानी धर्माचें खूळ माहीत नाहीं असें आम्हांस आमच्यानें ह्मणवत नाहीं, मग वरील तऱ्हांत अमीराचे दोस्तीवर त्यांचा येवढा विश्वास असा बसला, व त्या विश्वासावर अवलंबून सरकारनें काबूलच्या दाढेंत सहज चुरडून जातील इतके थोडे लोकांनिशीं आपला वकील तेथें कसा ठेवला हे मोठें आश्चर्य वाटतें अमीराची दोस्ती कोणत्या प्रकारची आहे हें न समजण्या सारखें आमचें सरकार अविचारी दिसत नाहीं, मग हा प्रकार कसा झाला नकळे. आह्मी या पुस्तकाचे मागील ९ वे अंकांत मैत्री या विषया वरील निबंधांत अमीरास उद्देशून जें अनुमान केलें तें खरें ठरलें. ह्मणजे इंग्रज सरकार तिकडील सैन्याचा गाशा गुंडाळून परत येतांच काबूलचे लोकांनीं इंग्रजाचे रेसिडेंन्सीवर हल्ला करून त्यांची कत्तल उडविली. यासंबंधाची सर्व हकीकत वर्तमान पत्रां वरून वाचकांस माहीत झालीच आहे, असो याकृत्यानें आमच्या सरकारचा मोठा अपमान झाला, तेव्हां त्याचा सुड उगविण्या करितां सरकारनें लढाईची तयारी करून काबुल वर हल्लाहि सुरू केला आहे. मागील लढाई काबूलचे अमीराशीं होती, आणि सांप्रतची त्याच्या बिथरलेल्या प्रजेशीं आहे. यामुळें मागें ज्या प्रमाणें लढाईचे कामीं अमीर आपले लोकांस उत्तेजन देत असे तसें आतां करावें लागणार नाहीं. पण त्याच्या उलट हल्लीं अमीर आपल्या रयतेची समजूत करण्याचा प्रयत्न करितो. तेव्हां ही दुनयेची एक अजब करामत आहे.

आतां या लढाईचीं जीं वर्तमानें येतात तीं फारच चमत्कारिक असतात. ह्मणजे त्यांत कांहींच मेळ नसतो. हा सर्व बंडावा रयतेचा असून तिणें खुद्द अमीराला देखील कैदेंत घातलें आहे हें प्रसिद्ध झालेंच आहे, पण त्याबरोबर हीहि दाट बातमी येऊन ठेपली व अद्यापाहि येते कीं, अमीर इंग्लिशाना वारंवार लिहून कळवितो कीं, या कामीं माझा अगदीं निरुपाय आहे, लोक माझें ऐकत नाहींत, व स्वतःमजवर भयंकर प्रसंग येऊन गुजरला आहे. सर्वांत या बातमीच्या विरुद्धतेचें आह्मास फार आश्चर्य वाटतें. काबुलाची रयत इंग्रजां विरुद्ध उठली असून तिणें अमीराला जर कैदेंत घातला आहे, तर त्या अमीराचा आणि इंग्रजसरकारचा पत्रव्यवहार होण्यास अमीरास मोकळीक कशी मिळाली? तशांतून हा पत्रव्यवहार बिथरलेल्या रयतेच्या कांहीं हिताचा असता तर तसें कांहीं संभवतें, पण तो उलट अमीराला अनुकूल असून लोकांचे अगदीं विरुद्ध आहे. याजवरून असें अनुमान होतें कीं, अमीर स्वतः या बंडांत आहे व त्याच्याच सल्यानें ही सर्व धामधुम मातली आहे.

आतां ही लढाई उपस्थित होण्यास कारणो कोण व कोणाचे चुकीनें हा प्रसंग आला याचा विचार करूं. हा विचार करूं लागलें ह्मणजे या कामीं अमचे सरकारचाच ढिलेपणा, शत्रूवर वाजवी पक्षां फाजील विश्वास, मनुष्याची परीक्षा करण्याचे कामीं अप्रयोजकता, आणि स्वतःचे बळाची आणि वैभवाची घमंड हीच या प्रसंगाचीं मुख्य कारणें होत असें ह्मणावें लागतें. कारण, ज्या वेळीं अमीराशीं तह केला ते वेळीं तेथील पुष्कळ लोक त्या तहनाम्यास कबल नव्हते असें मागें प्रसिद्ध झालेलेंच आहे. आतां अमीराशीं केलेले तहास त्याची रयत अनुकूल नसली ह्मणून काय हरकत आहे असें कदाचित् कोणी ह्मणेल. परंतु याह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आणि त्यांत अर्थ नाहीं हें हल्लीं प्रत्ययासहि आलें आहे. राजा या नात्यानें आमचे सरकारा बरावर तहनामा करण्यास जरी अमीराला अधिकार होता, तथापि अमीराचा अमीरपणा उडवून दिला ह्मणजे त्या

तहावर अर्थातच हरताळ सारवला. जाण्यास उशीर नाहीं हें मनांत आणलें पाहिजे होतें. प्रजेच्या योगानें राजाला राजेपणा येतो, आणि राजेपणा नाहींसा करणेंहि प्रजेच्याच हातांत आहे. तोच प्रकार अमीराचा झाला, अमीराशीं इंग्रजसरकारनें तह केला त्यावेळीं कसें तरी अमीराचे अंगीं अमीरपण होतें तेव्हां त्याचा तह कबूल केला म्हणून इंग्रजसरकारास आमच्यानें विशेष दोष देववत नाहीं, तथापि त्या तहाचे योगानें आपण जिंकलों व अमीर आपला दोस्त झाला असें समजून इंग्रज सरकारनें त्याजवर फाजील विश्वास ठेवला म्हणण्यास हरकत नाहीं. वणवा लागून दग्ध झालेल्या आरण्यांत तो अग्नी सर्वथ शांत झाल्यावांचून घर बांधणें हें गैर; बरें तें बांधण्याची जरूरच वाटली तर निदान तें चांगलें चिरेबंदी मजबूद तरी बांधावें तसें न करतां एका ठिणगीनें भडका उडून खाक होण्याजोगें झोपडें बांधून तेथें राहणारे मनुष्यास अविचारी कोण नाहीं म्हणणार? तोच प्रकार इंग्रज सरकारनें केला. नुकताच जेरीस आलेला व निरुपायामुळें तहनामा लिहून मी तुमचा दोस्त आहें असें म्हणणारा जो अमीर त्याच्या मनांतील द्वेष व अपमान नाहींसा झाला नसेल तोंच इंग्रज सरकारानें त्याच्या व त्याच्या रयतेच्या द्वेषानलांत टाकण्या करितां तेथें आपला वकील व त्याचे सहायार्थ शेंपन्नास लोक ठेऊन त्या पांच पन्नास अहुतींनीं तो द्वेषाग्नी शांत करण्याचा आमचे सरकारनें प्रयत्न केला हा अगदीं वेडेपणा झाला. त्या चिमुटभर आहुती वरील द्वेषानळाच्या एका दाढेला देखील पुरल्या नाहींत. पण त्या पुरणार नाहींत असें समजून अगोदर त्याजवर खंडो गणती अन्न ( हजारों सैन्य) दडपून त्यों द्वेषानळाचा जबडा कोंदून टाकला पाहिजे होता. म्हणजे त्याचे दडप्यानें तो लवकरच विझून शांत झाला असता आणि त्यास एक देखील आहुती मिळतां आली नसती पण वराती मागून घोडें म्हणतात तशी गत आतां झाली. पुरातन काळीं तह झाले म्हणजे पराजित झालेले राजाचे हद्दींत त्याचे खर्चानें विजयी राजाचें

बरेंच सैन्य राहत असे यामुळें त्या पराजीत राजास किंवा त्याचे राज्यांतील लोकांस आपले पराजयाचा सूड उगविण्यास सांपडत नसे. पण हा प्रकार काबुलचे तहांत दृष्टीस पडला नाहीं. सरकारनें आपली ५।४ हजार फौज अमीराचे खर्चानें काबूलास ठेवण्याबद्दल तहनाम्यांत करार करून त्याप्रमाणें अंमल जारी ठेविला असता ह्मणजे सांप्रत जी बेवा उडाली आहे ती न उडतां विनाकारण, मोठ्या कष्टानें आणि जबर कर बसवून वसूल केलेले पैक्यानें भरलेली तिजारी आज उपसण्याचा प्रसंग आला नसता बरें हो व्यवस्था ते वेळीं जर अमीर नाकबूल करता तर त्याची चांगली खोड मोडण्याचें काम ते वेळीं हातासरसें उरकून टाकतां आलें असतें असो, आतां जी गोष्ट झाली ती तर परत येत नाहीं. आह्मा प्रजेचें दुर्दैवच ह्मणून ते वेळीं सरकारास तशी बुद्धी झाली नाहीं. पण आतां यापुढें तरी वेडगळ विश्वास ठेवूं नये ह्मणून सरकारास आमचें सांगणें आहे. हल्लीं जी लढाई चालू आहे त्यांत इंग्रज सरकारास जय येईल किंवा नाहीं याची शंकाच नको. जय तर इंग्रजांचा होणारच. पण पुढें कसें करावें याजबद्दल आमच्या सरकारास राजभक्त प्रजेनें योग्य त्या सूचना करणें अप्रशस्त होणार नाहीं असें आह्मास वाटतें. आतां अमीरावर किंवा त्याचे पदरचे लोकांवर बिलकूल विश्वास ठेवूं नये, या लढाईचे संबंधें होणारा खर्च अमीराचे तिजोरींतून घ्यावा, आमच्या इलाख्याचे नामदार गव्हर्नर साहेब व दुसरेहि कित्येक छोटे बडे कामदार जे सर्वांशीं किंवा कांहीं अंशीं या लढाईचे कामांत गुंतले आहेत त्यांचा लढाई संपे पर्यंतचा सर्व पगार लढाईचे खर्चांतीलच समजून तोहि अमीराचे तिजोरींतून आणून हिंदुस्थानचे तिजोरींत जमा करावा, या लढाई संबंधें हिंदुस्थानास एक पैशाचीहि तोशीस लागूं नये, अमीराला जिंकल्या नंतर सरकार पुन: त्यास गादीवर बसवो किंवा न बसवो परंतु त्या अमीराच्या मुलखावर आमच्या सरकारनें आपला पूर्ण ताबा व दरारा ठेवावा, रशियादिक कांहीं आगांतुक राष्ट्रें. काबूलची

कांहीं वाटणी मिळेल ह्मणून लाळ घोटीत आहेत त्यांचे तोंडाला चांगलीं पानें पुसावीं, त्यांस कोणत्याहि तऱ्हेनें त्या मुलखाला स्पर्श करूं देऊं नये, हल्लींचे घालमेलींत अमिराचा खरोखरच गुन्हा आहे कीं काय याचा चांगला तपास करून त्या प्रमाणेंच त्यास शासन मिळावें उगाच वड्याचें तेल वांग्यावर काढणेंहि न्याय होणार नाहीं. हल्लीं काबुलांतील जे लोक आमचे सरकारचे सैन्यास कोणत्याहि तऱ्हेनें अडथळा करीत नाहींत त्यांस आमचे लष्करी अंमलदार शत्रु समजत नाहींत हें न्यायशास्त्रास अनुसरूनच आहे पण त्यांस शत्रु मानले नाहींत तथापि ते शत्रु फडील आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे आमचे लष्करी कामदार यालढाईंत आपल्यास जय मिळेल अशा भरंवशांत आहेत व तसें आह्मासाहि वाटतें, तथापि काबुलचे लोकांचा दोन सभाळून असणे रास्त आहे आतां या कामांत कित्येक आपल्या चुका दुरुस्त करतील, कित्येकांस त्यांच्या चुकीचें प्रायश्चित भोगावें लागेल, हजारों लोक बकऱ्यां सारखे मरून जातील, व कित्येक लोक जयसंपादून बहादुरी आणि इनामें मिळवितील, कित्येकांस आपल्या चुकीचा पश्चात्ताप वाटेल,व कांहीं मौज पाहून नरोवा कुंजरोवा ह्मणतील, आणि कित्येक या घालमेलींतील बऱ्या वाईट गोष्टींची निवड करतील. हें सगळें खरें. पण या एकंदर चुकीनें व बेविश्वासानें आमच्या सरकार चा काबूलांतील वकील व त्याची अनुयायी मंडळी जी आकाशांतील बापा कडे गेली आहे ती मात्र परत येणार नाहीं. तेव्हां त्यांच्या मागें त्यांच्या मुलामाणसांचें योग्य संगोपन करणें हेंहि सरकारचें एक कर्तव्य होय असें कोणीहि ह्मणेल.

# स्वात्मानंद.

( मा. अं. व. पु. चा.)

मना आकाशा पवना ॥ अग्नी आणी जीवना ॥
पृथ्वी तत्वादीक नाना ॥ व्यापकपणा आत्मयाचा ॥१५॥
व्यापुनि उरला अतर्क्यपणी ॥ नगमे एकांशें वाचे बुद्धी लागोनी ॥
ऐसी आत्म स्थीति वळखोनी ॥ असाति ज्ञानि आत्मनिष्ठ ॥१६॥
उच्चार मत्राचा करितां ॥ बिंदु वर्णाश्रयीं धरितां ॥
तरि बीजासी ये सामर्थता ॥ फळप्राप्ती होता घाव्यासी ॥१७॥
ज्या वर्णी बींदु नाहीं निश्चीती ॥ बीजरहीत वाग्जल्प बोलीजेती ॥
स्वतंत्र बिंदु उच्चारण करीती ॥ तया मौन्य ह्मणती उचार तो ॥१८॥
तैसा आत्मा बुद्धी कारणे ॥ अनुभव येतो स्वतसिद्धपणें ॥
परी न बोलवे रूप लक्षणें ॥ वसोनी तेणे तया आंत ॥१९॥
दिपाग्नी प्रभा त्या अंतरगत ॥ विकासितां काळिमा भासत ॥
ब्रह्मीं तैसी अविद्या विलसत ॥ ज्ञान होतां जात नासोनियां ॥२०॥
अज्ञान काळीमेचें मुळ ॥ दहन होतां जैं समुळ ॥
बोध उष्ण वाढतां प्रबळ ॥ नचलेची बळ अविद्येचें ॥२१॥
तैसें युग्म प्रकाशात्मक ॥ गुरुभजनीं दिव्य दृष्टीद्योतक ॥
जोडतां गुरू कृपें सम्यक ॥ भावें येकायक तरीजे पां ॥२२॥
ज्या ठायासी वृत्ति जाते ॥ मन पवन वपु नेत तेथें ॥
सकळही इंद्रियांतें ॥ निजात्मसत्तें करूनियां ॥२३॥
जैसी चक्रीसी दोरी । फिरवितसे नानापरी ॥
अथवा बाहुलीं सूत्राकारी ॥ थाकताळे करिं खेळतीतीं ॥२४॥
किंवा देह इंद्रियें रथ ॥ मनपवन वारू होत ॥
रथीं जिवात्मा वर्तत ॥ अधऊर्ध्व जात द्वय गती ॥२५॥
सारथी हेतु नेतसे ॥ आपुलीये कर्मगती सरिसें ।
मग आर्जीत भोगीतसे ॥ विधि निषधासें फळप्राप्ती ॥२६॥

जैसा स्वप्नीं क्षिणार्धेसी ॥ क्षिती क्रमोनी जाय तिर्थासी ॥
तीर्थवासी मानी आपणासी ॥ तदनुसारेंसा वर्ततसे ॥ २७ ॥
तेथें सत्क्रिया करितो ॥ तया सारिखा वर्ततो ॥
स्थूळ विस्मृतिनें पावतो ॥ चमत्कार तो पाहा कैसा ॥ २८ ॥
तैसा हा विष्णु ध्यानीं ॥ इतर विषय सुखें त्यजुनी ॥
हेतु वाढतो बळें करूनि ॥ उत्कृष्ट मनीं जया ठायीं ॥ २९ ॥
त्या पूर्वाभ्यासें करूनि ॥ क्रमेची स्थुळ देह त्यजुनि ॥
पावतसे तया स्थानीं ॥ इच्छीत मनीं हेतु दिसे ॥ ३० ॥
इच्छा हे विषयीं न धरीत ॥ मोक्षपर तें ही न अंगीकारीत ॥
निष्कामता धर्माचारीं रत ॥ ऐसा वर्तत भक्ति भावें ॥ ३१ ॥
लक्षी स्वात्म प्रकाशातें ॥ रात्रंदीन निश्चितार्थातें॥
जाणोनि सर्व भूतांत रते ॥ आत्महितार्थ वर्ततसे ॥ ३२ ॥
कर्पूर अग्नि योग घडतां ॥ दोहींतें पावे येकात्मता ॥
तैसी आत्मज्योति ध्यानीं येतां ॥ सूक्ष्मकारणता तद्रूप वैं ॥३३ ॥
मोतीं गार जळीं उत्पन्न ॥ येकाचि जळा पासोन ॥
गार जाय जळीं विरोन ॥ न विरे आपण मोतीं जैसें ॥ ३४ ॥
तैसा ज्ञाता मूर्ख दोनी ब्रह्मरूप ॥ परी ज्ञाता होय ब्रह्मस्वरूप ॥
अज्ञानी न होय तद्रूप ॥ अहंता संकल्प न गळतां ॥ ३५ ॥
अर्चितो जो प्रतिमेतें ॥ उपासक विधीमतें ॥
करीत भूभूत शुद्धीतें ॥ श्रुति तदीतें संपादितो ॥ ३६ ॥
सत्ता अतीचो बीजोक्त ॥ भेद भ्रमें विघ्नें स्थापित ॥
अहं ानोनि पुन्हा विसर्जित ॥ सत्तेने करीत हृदयींचे ॥ ३७ ॥
देव असोनि हृदयांतरीं ॥ जो परमात्मा श्रीहरी ॥
स्वयें भुलला ऐसिया परी ॥ विस्मृतिनें करीं नेणोनियां ॥ ३८ ॥
ध्याता देव स्वयेंचि मन ॥ अवघें देवाकृति होय आपण ॥
यातें भजे मनचि निर्वाण ॥ तेव्हां भक्तपण भावीतसे ॥ ३९ ॥

प्रसन्नता मानी आपआपण ॥ बद्धमुक्तता कल्पी पूर्ण ॥
राहू नशके क्षीण ॥ कल्पना दारुण वाढवित ॥ ४० ॥
धातूच्या गुरुशिष्य मूर्ती ॥ येका हातींच्या निश्चिती ॥
ध्याता ध्येय रूपें क्रीडे ये रीतीं ॥ तैसें अद्वैत भक्तीं मन लावीं ॥ ४१ ॥
मनीं ध्यावा सर्वसाक्षी हरी ॥ तदाकारता होइजे निर्धारीं ॥
कीटका भृंगी ध्यानांतरीं ॥ भृंगत्व ज्यापरी पावीजेतें ॥ ४२ ॥
तैसा निजस्वरूप पावला ॥ हेचि साक्षी तयाला ॥
दीप मिळणी दिपची झाला ॥ अद्वैतकळा वातीकरवें ॥ ४३ ॥
देह हे संदुक जाण ॥ किल्ली तेचि गुरुवचन ॥
शब्दार्थ संपदा परीपूर्ण ॥ त्यांत भरोन ठेविलीसे ॥ ४४ ॥
च्यारी खण तयाअसती ॥ चतुर्विध गुणी ते निश्चिती ॥
न्यून नसे कोणत्या अर्थी ॥ सुज्ञ जाणती आत्मज्ञ जे ॥ ४५ ॥
स्वामी सद्गुरुचेनि करें ॥ स्वहेतु जीवाचेनि निर्धारें ॥
उभय योग विच्यारें ॥ निजकार्य कीरे साधतसे ॥ ४६ ॥
पेढी हेचि स्वशरीर ॥ पाहें करूनि विचार ॥
तरी आत्मलाभ थोर ॥ दुर्धर संसार तरसील ॥ ४७ ॥
दोनी खण जे कां असती ॥ त्यांत सत्व राजस तमाच्या संपती ॥
उघडूनी अवलोकिती ॥ ज्ञानी न थारती तयामाजी ॥ ४८ ॥
सत्वाचा खण तिसरा बळें ॥ भक्तिकरनें देखती विरळें ॥
त्याहुनी पलीकडे स्वात्ममेळें ॥ शुद्धज्ञानानळें चतुर्थ खण ॥ ४९ ॥
जो सर्वे परिपूर्ण भरित ॥ तयासीच कळे निभ्रांत ॥
इतरां जनासी अप्रात ॥ विषया रत अज्ञानी जे ॥ ५० ॥
निस्पंदस्पंद जेथ मिरवे ॥ समपर शिवतो स्वात्मानुभवें ॥
तेथ बिंदु शक्ति हे स्वभावें ॥ विलसे प्रभवे निजात्मता ॥ ५१ ॥
निर्लक्षात्मक महाअडें ॥ विकसुनी सकळ ब्रह्मांडें ॥
निवाराग्रवत उदंडें ॥ असे प्रचंडें सूक्ष्म शक्ती ॥ ५२ ॥

देहो कैवल्य सच्चिन्मये ॥ परम आवस्था निरुस्थान स्वयें॥
तेथें उत्थान लक्षस्फुरन्मये ॥ परा शक्तिद्वय बिंदु तेथें ॥ ५३ ॥
ते तुर्या उन्मेषरूपीं विराजे ॥ मसुरेयत तनु साजे ॥
अर्ध चंद्रीं विकासे सहजे ॥ साक्षीरूप जें आपणचि ॥ ५४ ॥
तये पासाव पर्वार्ध शुशुती ॥ अवस्थात्मक कारण देह निश्चिति ॥
निमिष्या माजीं दिसेना व्यक्ति ॥ सज्जन जाणती विचारेंची ॥५५॥
मग पर्वांगुष्टा शरीराकृति ॥ लिंग देह जयातें ह्मणती ॥
स्वप्न अवस्था निमिष्यार्थांत होति ॥ वीचिवाकृति भासतसे ॥५६॥
त्या उन्मेषांगीं निमीषात्मक ॥ तनु विलसे स्थूळ देख ॥
जाग्रत अवस्थाों सम्यक ॥ दशा समचोख विकासे ते ॥५७॥
मुर्ध्नीं तूर्या भ्रूस्थानीं निश्चिती ॥ वीलसे न्हृदई शुशुप्ती ॥
कंठस्थानीं शोडष स्थिती ॥ स्वप्न प्रतीति जाणावीते ॥ ५८ ॥
जाग्रन्मय अवस्था ॥ नेत्रस्थानींगा तत्वता ॥
सिध्धांती वेदमतें आतां ॥ तुज सर्वथा निरोपिलें ॥ ५९ ॥
श्रीगुरूच्या पदभजनें ॥ पूर्ण दीक्षा क्रमाने ॥
ऐक्यस्थानीं पाहणे ॥ निज प्रत्ययानें तनु आवस्था ॥६०॥
श्रीगुरूच्या भक्तिप्रसादें ॥ निज सुखाचेनि आनंदें ॥
अनुभवितां अशाश्वत पदें ॥ निरसुनि द्वंद्वें निवाला तो ॥६१॥
पचानंद दषध्वनिसम ॥ विकसीत जो आत्माराम ॥
ओंकार अग्र निजधाम ॥ निवार उत्तम सुक ह्मणती ॥ ६२ ॥
विषयानंद स्वप्नानंद ॥ निद्रानंद तूर्यानंद ॥
सकळा आनंदा आनंद ॥ तो ब्रह्मानंद पांचवा ॥ ६३ ॥
तनुवत् बिंदु स्फुरे सूक्ष्म ॥ तो देह ह्मणीजे पंचम ॥
ते समाधी परमधाम॥ आनंदैक्य मम निष्पद तो ॥६४॥
तेथें मसुरेवत प्रमाण ॥ तनु भासे बिंदुवरी जाण ॥
सद्गुरु सर्वज्ञ आपण ॥ शिष्य सुजाण त्या दावितीं ॥ ६५ ॥

# सुभाषित.

दाता बलिः प्रार्थयिताच विष्णु— ।
दानं मुखो वाजिमखस्य कालः ॥
नमोस्तु तस्यै भवितव्यतायै ।
यस्याः फलं बंधनमेव जातं ॥ ४१ ॥

" अश्वमेध समयीं बली सारख्या दात्यानें प्रत्यक्ष विष्णूला भूमिदान केलें असून त्याच्या फलें करून दुर्दैवानें त्यास बंधन प्राप्त झालें, तस्मात् अशा दैवाला नमस्कार असो. "

वृक्षाग्रवासी नच पक्षिराज— ।
त्रिनेत्रधारी नच शूलपाणिः ॥
त्वग्वस्त्रधारी नच सिद्धयोगी ।
जलंच बिभ्रन्न घटो न मेघः ॥४२॥

" वृक्षावर वास करितो परंतु पक्षी नव्हे, तीन डोळे असून जो शंकर नव्हे, दिगंबर वृत्तीनें राहत असूनही जो योगी नव्हे आणि उदक धारण करित असतांही जो घट किंवा मेघ नव्हे. ( असा कोण?—नारळ ) "

कस्येयं तरुणि प्रपा पथिक नः किं पेयमस्यां पयः ।
धेनूनामथ माहिषं बधिररे वारः कथं मंगलः ॥
सोमोवाथ शनैश्वरोथ ममतं तत्तेधरे दृश्यते ।
श्रीमत्पांथ विलाससुंदरसखे यद्रोचते तत्पिब ॥४३॥

कोणीएक पथिक मार्गांतील पाणवठ्यावर एक तरुणी उभी होती तिला पाहून प्रश्न करितो:—

" हे तरुणी, ही पाणपोई कोणाची? ती स्त्री उत्तर करते—माझी —पथिक विचारतो—यांत पिण्या जोगें काय आहे? स्त्री ह्मणते-पय ( पाणी )—पथिक विचारतो—गायीचें किंवा महिषीचें?—ह्मणे मां

गितलें—हे बहिऱ्या, वार ( उदक ) आहे—पथिक विचारतो. कोणता वार? सोमवार, मंगळवार किंवा शनवार? त्यानें सांगितलें—हें अमृत आहे. तें ऐकून पथिक ह्मणतो—हे तरुणी तुझ्या आधरोष्ठाचेठायीं दिसतें तेंच अमृत काय? त्या पथिकाचा चतुरस्त्रपणा पाहून तरुणी ह्मणते—हे सुंदर पुरुषा पांथा, तुला जें आवडेल तें घे. ”

धीर ध्वनिभिरलं ते नीरद मे मासिको गर्भः ॥
उन्मद वारणबुध्या मध्ये जठरं समुच्छलति ॥ ४४ ॥

मेघगर्जना ऐकून एक गर्भिणी सिंहीण ह्मणते —

“ हे मेघा, तूं हा गंभीर शब्द करूं नकोस. कारण मी गरोदर आहें तेव्हां तुझा ध्वनी श्रवण केल्यानें मदोन्मत्त हत्ती प्राप्त झाला कीं काय आशा बुद्धीनें गर्भ माझ्या उदरांतून उड्डाण करील. ”

केतकी कुसुमं भृंगः खंड्यमानोपि सेवते ॥
दोषाः किंनाम कुर्वंति गुणापहृतचेतसः ॥ ४५ ॥

“ केतकी पुष्पाचे कांटे आंगाला लागत असतांहि त्याच्या सुगंधास भुलून भ्रमर त्याजवर गुंजारव करितात. जे रसज्ञ आहेत ते एखाद्याचे गुणानें प्रसन्नचित्त झाले असतां त्याचे दोषाकडे पाहत नाहींत”

गंतव्या राजसभा द्रष्टव्या सजनवल्लभाः पुरुषाः ॥
यद्यपि न भवात्यर्थो भवत्यनर्थप्रतीकारः ॥ ४६ ॥

“ दरबारांत जाऊन राजाचे मर्जींतील जे कामदार असतील त्यांच्या भेटी घेत असावें. या पासून जरी कांहीं अर्थप्राप्ति झाली नाहीं, तथापि एखादा विकट प्रसंग आला असतां त्याचा प्रतिकार करण्याविषयीं ते उपयोगी पडतील.

सुकुलजन्म विभूति रनेकधा ।
प्रियसमागम सौख्य परंपरा ॥
नृपकुले गुरुता विमलं यशो ।
भवति पुण्यतरोः फलमीदृशं ॥ ४७ ॥

"उत्तम कुलामध्यें जन्म, अनेक प्रकारचें ऐश्वर्य, प्रियवस्तूंची संगति, सर्व सुखें अनुकूल, राजदरबारीं बहुमान, आणि सत्कीर्ति, हीं मिळणें मह त्पुण्याईचें फल होय."

मुरारिपदभक्तिश्चे त्तदा माघे रतिं कुरु ॥
मुरारिपदभक्तिश्चे त्तदा माघे रतिं कुरु ॥ ४८ ॥

"मुरारी नामा कवीच्या पदश्लेषाचा चमत्कार पहावयाचा असल्यास माघ काव्यावर प्रीती ठेव. ह्मणजे माघ काव्य आवलोकन कर. (दुसऱ्या अर्धश्लोचा अर्थ) मुरारी ह्मणजे विष्णु त्याच्या चरण सेवेची जर तुला इच्छा असेल तर पातकावर प्रीती करूं नको."

अशनं मे वसनं मे जाया मे बंधुवर्गो मे ॥
इति मेमे कुर्वाणं कालवृको हंति पुरुषाजं ॥ ४९ ॥.

"अन्न माझें, वस्त्र माझें, स्त्री माझी, बंधवर्ग माझा, याप्रमाणें मे मे करणारा जो पुरुषरूपी बोकड त्यास कालरूपी लांडगा पटकन घेऊन जातो."

वैष्णवाश्च पिशाचाश्च मत्कुणाश्च पिपीलिकाः ॥
भस्मदर्शन मात्रेण पलायंते दिशो दश ॥ ५० ॥

"वैष्णव, पिशाच, ढेंकूण, आणि मुंग्या, या भस्मदर्शनाने ह्मणजे आंगावर राखाडी फेंकल्यानें पळून जातात."

नास्ति क्षुधासमं दुःखं नास्ति रोगः क्षुधासमः ॥
नास्त्याहारसमं सौख्यं नास्ति क्रोधसमो रिपुः ॥९१॥

"क्षुधेसारखें दुसरें दुःख नाहीं, क्षुधेसारखा दुसरा रोग नाहीं, भोजना सारखें दुसरें सौख्य नाहीं, आणि क्रोधा सारखा दुसरा शत्रु नाहीं."

आदौ सत्ययुगे बलिस्तदनुच त्रेतायुगे राघवो ।
रामः सत्यपराक्रमोऽथ भगवान् धर्मस्तथा द्वापरे ॥
दाता कोपि नचास्ति संप्रति कलौ जीवंति केनार्थिनः ।
इत्येवं कृतनिश्चयेन विधिना व्यापारिणो निर्मिताः ॥९२॥

"पूर्वी सत्ययुगामध्यें बली मोठा दाता होऊन गेला, त्रेतायुगांत सत्य पराक्रमी असा राजाधिराज रामचंद्र दाता होता, आणि द्वापारयुगांत धर्मराजा मोठा दाता होऊन गेला, पण सांप्रत या कलियुगांत कोणी दाता नसल्यामुळें लोकांचा निर्वाह कसा होईल अशा काळजीनें ब्रह्मदेवानें हे व्यापारी उत्पन्न केले." अलीकडे चारी वर्णाचे लोक बहुधा व्यापारसक्त झाले असल्यामुळें कवीनें हें लिहिलें असावें. बाकी पूर्व युगांतही वैश्य जातीकडे तो अधिकार होता.

पत्रं नैव यदा करीर विटपे दोषो वसंतस्य किं ।
नो लूकेन विलोक्यते यदि दिवा सूर्यस्य किं दूषणं ॥
धारा नैव पतंति चातकमुखे मेघस्य किं दूषणं ।
यद्धात्रा निजभालपट्ट लिखितं तन्मार्जितुं कः क्षमः ॥९३॥

"नेपतीच्या झाडाला पल्लव फुटत नाहींत त्याचा दोष वसंतऋतुकडे काय आहे! दिवाभीताला दिवसा दिसत नाहीं पण हा दोष सूर्याचा नव्हे चातकाचे मुखामध्यें जलबिंदु पडत नाहीं हा दोष मेघाचा नव्हे, तर विधात्यानें आपल्या कपाळीं जें लिहून ठेविलें असेल तें चुकविण्यास कोणी समर्थ नाहीं."

,, काशिनाथ नारायण दहिवेली १८६
,, गणेश महादेव वेणगांव १८६
,, रामचंद्र गणेश दहिवेली १८६
,, दामोदर गणेश दहिवेली १८६
—नेटिव लायब्ररी तळेगांव १८६
,, सदाशिव भिंवराव चिंचवड १८६
,, माधवराव रामराव नगर १८३
,, आत्माराम हरी नगर १८३
,, रामचंद्र गोविंद नगर १८३
,, जयशंकर जेठाभाई नगर १८६
,, बाळाजी एशवंत नगर १८३
,, विष्णु महादेव नगर १८३
,, गोपाळ जगन्नाथ नगर १८३
,, नारायण बाळकृष्ण नगर १८३
,, सदाशिव एशवंत नगर १८३
,, गजानन दाजी नगर १८३
,, हरबाजी विठ्ठल नगर १८३
,, गणु बिन पिलु नगर १८३
,, जनार्दन श्रीधर नगर १८३
,, तुकाराम शिताराम नगर १८३
,, त्रिंबकराव बाबूराव नगर १८३
,, पुरूषोतम नारायण नगर १८३
,, जनार्दन एकनाथ नगर १८६
,, गणेश अनंत नगर १
,, मार्तंड लक्ष्मण नगर १८३
,, शंकर अप्पाजी नगर १८३
,, शालिग्राम रामचंद्र नगर १८३
—सिटी लायब्ररी नगर १८३
,, वामन पांडुरंग नगर १८३
,, गोपाळ केशव नगर १८३
,, पुरूषोत्तम गोपाळ नगर १८३

,, वामन काशीनाथ नगर १८३
,, गोपाळराव मास्तर नगर १८३
,, विश्वनाथ हरी नगर १८३
,, बाळकृष्ण धोंडो नगर १८३
,, एशवंत गोपाळ आगोदें १८३
,, गणेश पांडुरंग सातारा १८६

( हरीसिंग खुमानसिंग मार्फत )

रा. रा. भिकाजी बाळकृष्ण बडोदें १८६
श्री. सौ. कमाबाई साहेब राजे सीर्के बडोदें १८६
रा. रा. विनायकराव नारायण बडोदें १८६
,, बळवंतराव रघुनाथ बडोदें १८६
,, गंगाधर यादव बडोदें १८६
,, रामचंद्र सखाराम बडोदें १८६
,, काशीनाथ विष्णु बडोदें १८६
,, नारायण बळवंत बडोदें १८१॥
,, बाळकृष्ण हरी बडोदें १८१॥
,, बाळाजी विश्वनाथ बडोदें १८१॥
,, तात्याजी मार्तंड बडोदें १८१॥
,, मोरेश्वर कृष्ण बडोदें १८६
,, रामराव वामन बडोदें १८६
,, गंगाधर बाळकृष्ण बडोदें १८६
,, नारायण वामन बडोदें ८१४
,, नारायण रामचंद्र सिरवडें १८६
,, माधवराव हरी बडोदें १
,, सुंदरराव मोरोजी बडोदें १८६
,, नागरजी मोहनभाई बडोदें १

( सदाशिव सखाराम मार्फत )

रा.रा. अवाजी खंडेराव अकोला १८३
,, मार्तंड लक्ष्मण अकोला १८१॥
,, पुरूषोत्तम केशव धुळें १८१॥

,, लक्ष्मण भास्कर अकोला १८२
,, तात्याजी बळवंत अकोला १८६
,, सखाराम आनंदराव अकोला १८६
,, गोपाळ हरी अकोला १८६
,, तुकाराम गणेश अकोला १८६
,, कृष्णाजी हरी अकोला १८६
,, माधवराव अमृत अकोला १८६
,, तुकाराम रामचंद्र अकोला १८६
,, श्रीराम भिकाजी अकोला १८६
,, बजाबा रामचंद्र अकोला १८६
,, विश्वनाथ मोहनी अकोला १८६
,, सखाराम हनुमंत खामगांव १८६
,, गोविंद रामराव अकोला १८६
,, हरिहर काशीनाथ उमरावती १८६
,, विष्णु मोरेश्वर उमरावती १८६
,, केशव बापूजी भुसावळ १८६
,, गोविंद वामन भुसावळ १
,, विनायक रामचंद्र जळगांव १८६
,, नारायण रघुनाथ जळगांव १
,, सिताराम महादेव जळगांव १८३
,, रावजी सखाराम जळगांव १८३
,, कृष्णाजी विष्णु धुळें १८६
,, माधवराव रघुनाथ चाळीसगांव १८६
,, हिरालाल हेमचंद मायजी १८६
,, रावजी सखाराम जळगांव १८६
,, नारो धाकदेव जळगांव १८६
,, गणेश केशव जळगांव १८६
,, रामचंद्र बनाजी जळगांव १८६
,, केशव सदाशिव जळगांव १८६
,, शांताराम विनायक जळगांव १८६
,, बाळकृष्ण हनुमंत भुसावळ १
,, परशराम वामन भुसावळ १८६
,, श्रीधर धोंडदेव भुसावळ १८६
,, बाबाजी बाळकृष्ण भुसावळ १८६
,, पांडुरंग गोविंद अकोला १८६
,, लक्ष्मण खुशालराव बाळापूर १८६
,, गोपाळ विश्वनाथ अकोला १८६
,, विश्वनाथ नारायण उमरावती १८६
,, रामचंद्र भगवंत उमरावती १८६
,, बळवंत नारायण बडनेर १
,, एकनाथ लक्ष्मण उमरावती १८६
,, विश्राम मोजीराम नागपूर १८६
,, बळवंत वासुदेव नागपूर १८६
,, वामन दाजी नागपूर ४८६
,, हरी जनार्दन मोहोगांव १८६
,, चिंतो वासुदेव पाटणसांवगी १८६
,, श्री[illegible] त्रिंबक नागपूर १८६
,, अताबा जनार्दन नागपूर १८६
,, जगन्नाथ नारायण नागपूर १८६
,, बाळाजी माधवराव नागपूर १८६
,, दत्तो विनायक नागपूर १८६
,, बळवंतराव विनायक नागपूर १८६
,, बळवंतराव गोविंद नागपूर १८६
,, हरी माधव नागपूर १८६
,, विनायक दामोदर नागपूर १८१॥
,, मार्तंड बापूजी नागपूर १८१॥
,, यशवंतराव नारायण नागपूर १८६
,, रामाजी लक्ष्मण नागपूर १८६
,, शिवलाल मोहनलाल नागपूर १८६
,, वैजनाथ सदासीव नागपूर १८६
,, दलपतराम हरिवल्लभदास ना. १८६
,, मार्तंड रावजी नागपूर १८६

वर्ष आगाऊ किंमत वर्षाची १ रुपया दुसरें

सत्य शांति साह्य

# सद्धर्मदीप.

कार्तिक शके १८०१

अंक ४

मार्गे मार्गे निर्मलं साधुवृंदं । वृंदे वृंदे तत्वचित्तानुवादः ॥
वादे वादे जायते तत्व बोधो । बोधे बोधे सच्चिदानंदभासः ॥



अलीबाग
'सत्यसदन' छापखान्यांत छापिलें.

कुलकळ अंकाची किंमत चार आणे

आगाऊ किंमत पुस्तक सुरु केल्यापासून एक महिन्याचे आंत दिली पाहिजे.

पुस्तकाचे किंमती शिवाय टपालखर्चाबद्दल प्रत्येक अंकास अर्धा आणा आहत पडेल

**विषय**—१ दांभिक भक्ति पृष्ठ ९७—२ ऐहिक संबंधानें प्रस्तुत काळचे लोकांची स्थिती पृष्ट १०३—३नादब्रह्म पृष्ठ १११—४आत्मा नुभव (कविता) पृष्ठ १२१—५सुभाषित पृष्ठ १२५

---

## वर्गणीचा वसूल.

( आषाढ शके १८०२ अखेर. )

| | |
|---|---|
| रा० रा० गोपाळ बळवंत दांडेकर नाशीक .... .... .... | १८६ |
| रा० रा० बाजो गणेश जोगळेकर ग्वालेर.... .... .... | १८३ |
| रा० रा० रामचंद्र बळवंत आंग्रे ग्वालेर ... .... .... | १८३ |
| रा० रा० रामराव कृष्ण जठार ग्वालेर .... .... .... | १८६ |
| रा० रा० पांडुरंग जनार्दन पुराणिक डिकसाळ .... .... | १८६ |
| रा० रा० वासुदेव सदाशीव लेले नाशीक .... ... ... | १८६ |
| रा० रा० रामकृष्ण वासुदेव सिधये भिंवडी .... .... .... | १८६ |
| रा० रा० नारायण पुरुषोत्तम पो. मास्तर तुर्भें .... .... | १८६ |
| रा० रा० सिताराम सिवराम वैद्य उसगांव .... .... .... | १८६ |
| रा० रा० राघवेंद्र गोपाळ कितूरकर गदग .. .... .... | १८६ |
| रा० रा० परशराम काशीनाथ आंबडेकर पिंपळनेर .... .... | १८६ |
| रा० रा० बळवंतराव गणपतराव देशमुख पिंपळनेर.... .... | १८६ |
| श्री० रा० दामोदर जनार्दन पाटणकर शेंदुर्णी .. .... | १८६ |
| रा० रा० मोरेश्वर दिनकर जोशी वाशिद .. .... | १८६ |
| रा० रा० लक्ष्मण मुन्हारी मास्तर करडी .... .... | १८६ |
| रा० रा० त्रिंबक हरी आचार्य अलीबाग .... .... | १ |
| रा० रा० रामलिंग गणलिंग मामलेदार पेटलाद .... | १८६ |
| रा० रा० केशव रघुनाथ कोल्हटकर तासगांव .... .... | १८६ |
| रा० रा० गोविंद रामचंद्र नामजोशी तासगांव .... .... | १८६ |
| रा० रा० सिताराम महादेव जोगळेकर तासगांव .... .... | १८६ |
| रा० रा० नारायण विष्णु भिडे कटापेंडूर.... .... .... | १८६ |
| रा० रा० जनार्दन विठ्ठल गोगटे सावरगांव .... .... | १८६ |
| रा० रा० अनंत अपाजी वैद्य कुडाळ.... .... .... | १८३ |
| रा० रा० गोविंद भिकाजी सेक्रेटरी कुडाळ.... .... | १८३ |

# सद्धर्मदीप

अंक ४

## दांभिक भक्ति.

टिळे टोपी उंच दावी ॥ जनीं मी एक गोसावी ॥
अवघा वर रंग सारा ॥ पोटीं विषयांचा थारा ॥
मुद्रा लावितो कोरूनी ॥ मान व्हावयासीं जनीं ॥
तुकाह्मणे ऐसे किती ॥ नरका गेले पुढें जाती ॥

जगांतील अनेक दृश्यादृश्य वस्तूंवरून ईश्वराची अमानुष व अद्भुत शक्ति जाणणें आणि त्या जाणीव पणानें सर्व सत्तात्मक व जगदेक प्रभूचें मनोभावें करून चिंतन करणें हीच खरोखर ईश्वरभक्ति होय. पण लोकांमध्यें अभिमान व मत्सर वाढून ज्याप्रमाणें अनेक गोष्टींत मत भेद होतात, त्याच प्रमाणें या ईश्वर भक्तींतही झाले आहेत. हे अभिमान व मतभेद ईश्वरप्राप्ती विषयीं अनुकूल होण्याची तर आशा नाहींच, पण त्या योगानें अनेक लोक अधोगतीस गेले व जात आहेत. ईश्वरभक्ती ही मनोगामी आहे, आणि मन ज्ञानाधीन पडलें, तेव्हां त्यास मर्यादित मार्ग उपयोगी नाहीं. ईश्वराचे साक्षात्कारा विषयीं मनुष्याचें अंतःकरण जसें जसें जागृत होईल तदनुरूप तो त्याची भक्ति करतो. या करितां या भक्ती विषयीं एकच मार्ग करून ठेवतां येणार नाहीं. मनुष्य आपापले ज्ञानाचे योग्यतेनुरूप नऊ मार्गांनीं ईश्वर पदास पावतो. पण कांहीं अभिमानी लोक त्यांतील अमुक एक मार्ग खरा आणि बाकीचे सगळे खोटे असा आग्रह धरून आपण फसतात व त्यायोगानें अनेक भोळ्या बापड्यांस फशी पाडून त्यांस सन्मार्गापासून भ्रष्ट करितात.

धर्मा करितां लढाया, धर्मा करितां रक्तपात, धर्मा करितां राज्य संपादन, आणि धर्मा करितां अनेक गोष्टी करण्याचें लोक आवडंबर घालतात व यांत धर्म यांचा अर्थ तरी ईश्वर प्राप्तीचे मार्ग हाच असतो- आणि लोकांचे अनेक समजुतींचे योगानें त्यांत ऐहिक आचार व विचार जमवून हें धर्मांचें गाठोडें बाळसंतोषाचे विषयांचे बोचक्या प्रमाणें झालें आहे. मुसलमान लोक सर्वत्र आपला धर्म व्हावा म्हणून झटतात, हिंदू आपल्या अनादि धर्माला सर्वांनीं पूज्य मानावे म्हणून प्रयत्न करितात, इंग्रज आकाशांतल्या बापानें पाठविलेला जो खिस्त त्याच्या धर्माचा सर्वत्र प्रसार व्हावा असि इच्छा धरून गांवगन्ना फिरत असतात, मिळून ज्या त्या देशांतले लोक आपापला धर्म श्रेष्ठ असें समजून त्याप्रमाणेंच सर्व दुनियेनें वागावें ह्मणून यत्न करीत असतात. आतां या धर्मांचा हेतु वास्तविक ईश्वरविषयक असुन प्रस्तुत तो केवळ व्यवहार बनला आहे. आपला धर्म सर्वांनीं स्वीकारावा याचा अर्थ अलीकडे भलताच झाला आहे. याचीं उदाहरणें अलीकडे खिस्ती धर्मांचे संबंधानें दृष्टोत्पत्तीस येतात. हींदूंतील मूर्तिपूजादी ईश्वर प्राप्तीचे मार्ग खोटे असें समजणारे स्वयंभू व बाटे पाद्री जेव्हां एखाद्या मूर्ख मनुष्यास बातिस्मा देतात तेव्हां त्याचें जानवें तोडणें व त्यास अपक्क मनुष्याशीं अन्न व्यवहारादीक करणें इत्यादी निंद्य कर्मानें तो आपले धर्मांत आला असें मानतात. मिळून लोकांनीं आपले धर्माचा स्वीकार करावा याचा अर्थ- आपले प्रमाणें सर्वांनीं पेहराव करावे, मद्यमांसाचें सेवन करावें, ईश्वरानें सर्व प्राणी मनुष्याचे निर्वाहा करितां उत्पन्न केले आहेत तेव्हां त्यांतील मनास वाटेल तो व आवडेल तो प्राणी हिंस्र पशु सारखा भक्षण करावा, सर्वांनीं आपल्या रीती भाती अंगिकाराव्या, लग्नादि संस्कार सर्वांनीं आपल्या प्रमाणेंच करावे, आणि सर्व दुनियेनें आह्मी ज्या मार्गानें ईश्वराची सेवा व भक्ति करतों त्याच मार्गास अनुसरावें. प्रत्येक धर्मांतील मनुष्यास हेंच वाटत असतें. आणि तो नुसती

अशी इच्छाच करून स्वस्थ बसत नाहीं. तर त्याप्रमाणें लोकांस वागविण्याची संधी येण्याची तो मार्ग प्रतीक्षा करितो, आणि तशी संधी प्राप्त झाली ह्मणजे तो लोकांकडून जबरीनें, अन्यायानें, आणि तरवारीचे जोरानें तसें करवितो. हें कृत्य करीत असतां त्याचे हातून अनेक निंद्य गोष्टी, व दुष्कर्मे होतात त्याची तो मुळींच पर्वा न करितां भूतदया एकीकडे ठेऊन जसें हें निंद्य कर्म आपण ईश्वराचे आज्ञेवरूनच करीत आहों असें त्यास वाटतें. ईश्वर प्राप्ती होण्याचे मार्ग असे निंद्य, दुष्ट, व अधम असतील अशी कल्पना करणें देखील चुकीचें व मूर्खपणाचें कृत्य आहे. मग तशा मार्गास प्रवृत्त होणारा मनुष्य किती दुष्ट व दांभिक असला पाहिजे बरें? ईश्वर संबधानें लोकांत उत्पन्न झालेले अनेक धर्म व अनेक मतें हीं केवळ लोकांच्या मुर्खपणाचीं आणि दंभाचीं चिन्हें होत. हिंदुलोक यवनादिकांस नीच मानतात, मुसलमान लोक अन्यधर्मी लोकांस काफर समजतात, आणि ख्रिस्ती लोक अन्यधर्मी लोकांस पापी ह्मणतात, याच प्रमाणें प्रत्येक धर्मांतील लोकांत स्वधर्माचे चांगुलपणाचा मोठा अभिमान असून बाकीचे धर्म मार्गांस ते तुच्छ मानतात. आतां नीच, काफर, पापी व वाईट असें परस्परांस मानण्याचा वास्तविक हेतु ह्मटला ह्मणजे ईश्वर प्राप्तीच्या मार्गापासून पराङ्मुख झालेले हा होय. पण लोकांचे अज्ञानानें तो प्रकार व्यवहाराकडे वळला आहे मनुष्यानें दाढी राखावी, डोचकें भादरावें, सुंता करावी, इजार घालावी, आणि आंगावर बोटभर मळाचें पुठ बसलें तरी तसेच वर घामट कपडे चढवून एका थाळ्यामध्यें दाहापांच जणांनीं बसून जेवावें, आणि मशीदींत जाऊन निमाज पढावी, किंवा एखाद्या बड्या समुदाया बरोबर एखादे सुंदर मंदिरांत उभें राहून आकाशांतल्या बापाला डोळे मिटून हांका माराव्या, अथवा वेडे वांकडे दगड धोंडे किंवा तांब्या पितळेचीं चित्रें करून त्यांजवर चुना शेंदूर थापून त्यांस धूपदीप दाखवला व त्याच्या पुढें कोंबडीं बकरीं कापलीं तरच ईश्वर भेटेल हें मत मूर्खपणानें व दांभिक होय. अशा मतानें

ईश्वर प्राप्ती होण्याची मुळींच अशा नको. वरील अनेक प्रकार हे देश संबंधानें व धर्म संबंधानें झाले, पण प्रत्येक धर्मांत हे जे अनेक तऱ्हेचे पंथ उत्पन्न झाले असतात, त्या मध्येंहि विलक्षण तऱ्हेचे व आग्रहाचे आचार पडलेले असतात. याचा मासला जे लोक आपणास आर्यधर्मी ह्मणवितात अशा हिंदूंतही आहेत. शैव लोक शंकराचे भक्तीनें आणि पूजादिकानें ईश्वर प्राप्त होईल असें समजून भस्मलेपन व रुद्राक्षमाळांचे अलंकारादिक धारण करून तसा आचार परमेश्वराला प्रीय आहे असें मानतात. वैष्णव लोक विष्णुचे भक्तीनें परमार्थ कल्याण होईल असें समजतात व शैवांचा द्वेष करून भस्माचा स्पर्श होणें हा देखील ते विटाळ मानतात. शाक्त लोक ह्मणजे शक्ति उपासक, हे देवीची उपासना करतात. हा पंथ अलीकडे कमी झाला आहे, याजबद्दलची सविस्तर हकीकत आह्मी या पुस्तकाच्या गतवर्षाच्या सातवे अंकांत दिलेली आमच्या वाचकांस स्मरतच असेल. हा मार्ग इतका निंद्य आणि वेडगळ पणाचा आहे कीं, त्याचें आवलंबन करणारा मनुष्य दुराचारी, दुर्व्यसनी, नीतिभ्रष्ट, आणि विचारशून्य बनतो. पण त्या पंथांतील लोकांस तें सर्व सत्कृत्यच वाटतें. देवी हाच कायतो ईश्वर असें ते समजतात प्रकृत पंथांतलि लोकांचे भक्तीनें किंवा ज्या भक्तीला दुराचरण ह्मटलें असतां विशेष शोभेल,अशा त्या उपायानें ती संतुष्ट होऊन आपले भक्तांचें ऐहिक व पारमार्थिक कल्याण करिते असा त्यांचा पूर्ण भरंवसा आहे. ते लोक शंकर विष्णु इत्यादि देवांस खिशांत टाकून आपल्या शक्ती देवीसच कायतें श्रेष्ठत्व देतात. व तिची भक्ति न करणारे तेवढे सगळे दुर्गतीस जाणार अशी त्यांची समजूत असते. खिस्ती लोक असें समजतात कीं, आकाशांतील सर्व तरुणोपायरूपी भांडारगृहांच्या किल्या एशूच्या हातांत आहेत तेव्हां त्याची भक्ति केली ह्मणजे तो प्रसन्न होऊन तो त्या भांडारगृहांचीं दारें भडाभड खुलीं करून त्यांत

आपले भक्तांस लोटून देतो आणि बाकीचे लोकांस तो बाहेर रखडत ठेवतो. मुसलमान लोकाहि पैगंबराबद्दल असेंच समजतात. त्यांच्या समजुती प्रमाणें चालणारे लोक तेवढेच कायते पैगंबराचे भक्त ह्मणून ईश्वराप्तीस योग्य आणि बाकीचे सगळे ते पापी. आतां वास्तविक पाहूं लागलें असतां हीं सर्व मतें दांभिक होत. हे केवळ लोकांचे आग्रह आहेत. लोक अभिमानाला पडून ज्या प्रमाणे ऐहिक संबंधांत ह्मणजे विषयादिकांत स्वात्मत्व मिरवितात व सर्वकाळ आपलीच थोरवी लोकां मध्यें व्हावी ह्मणून यत्न करितात, तोच प्रकार या अनेक पंथांत आणि धर्मांत झाला आहे. ज्याचें मन शुद्ध नसून ज्यांस जगामध्यें केवळ दंभ माजवावयाचें असतें त्यास सर्वच मार्ग खोटे दिसतात. बाकी ईश्वर सर्वांचा येकच आहे. पण दुरभिमानानें अंध झालेले मनुष्यास तो दिसत नाहीं. एका कवीनें ह्मटलें आहे.

आंधळ्यासीं जन अवघेची आंधळे ॥
आपणासीं डोळे दृश्य नाहीं ॥
रोगीयासीं विषतुल्य तें मिष्टान्न ॥
तोंडासी कारण चवी नाहीं ॥
तुकाह्मणे शुद्ध नाहीं जो आपण ॥
तया त्रिभुवन अवघें खोटें ॥

तेव्हां एकंदरींत वरील सर्व दांभिक प्रकार सुरू होण्याचें कारण लोकांचा मत्सर व आग्रह होय. तेव्हां असे आग्रहाचे मार्ग ईश्वर प्राप्तीला कसे अनुकूळ होतील? सर्व पंथांतील व सर्व धर्मांतील लोकांना ईश्वर येकच आहे. ईश्वराकडे अनेक पंथ व मतें मुळींच नाहींत. लोकांनीं आग्रहास पडून आणि अभिमान धरून केवळ आपली प्रतिष्ठा आणि लौकिक होण्या करितांच वरील सर्व दांभिकभक्तीचे प्रकार उत्पन्न केले आहेत. आतां अभिमानानें प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणाचे कल भिन्न भिन्न होतात, तेव्हां त्याचीं मतेंहि अर्थात भिन्नच असावयाचीं.

तेव्हां यावरून हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, अशा या दांभिक भक्तीनें ईश्वराची प्राप्ती न होतां मनुष्य खरोखर अधोगतीस जाईल. ईश्वरभक्तीचे संबंधांत अहंता व दुरभिमान नष्ट झाला पाहिजे. ईश्वर भक्तीला खरोखर अंतःकरणांतील प्रेम पाहिजे. एका कवीनें ह्मटलें आहे.—

नेत्र झांकोनियां काय जपतोसी ।
जंव नाहीं मानसीं प्रेमभाव ॥
मंत्र तंत्र कांहीं करिसी जडीबुटी ।
तेणें भूतसृष्टी पावशील ॥
येणे पाप अंगीं घेतोसी जडून ।
नेणसी हें वर्म काय आहे ॥

वर जे जुलमाचे आणि अनीतीचे प्रकार सांगितले ते केवळ मनुष्याच्या अहंपणाचेच होत. ऐहिक संबंधानें आपला हेतु तडीस जावा व लोकांनीं आपल्या ह्मणण्या प्रमाणें चालावें ह्मणून धूर्त लोक आपले कृत्यांत ईश्वराचा संबंध दाखवून त्याचे योगानें अज्ञानी लोकांचा समुदाय आपले पक्षास मिळवितात. पण अशा या दुरभिमानानें आणि दंभानें ते लोकांस ईश्वराकडे पोंचविण्यास तर समर्थ होत नाहींतच, पण उलट आपले प्रमाणे सर्व दुनियेसहि ते अधोगतीस नेण्यास कारणी होतात. ज्याचे योगानें आत्मसाक्षात्कार घडेल तीच खरोखर भक्ति होय. बाकीचे सर्व मार्ग दांभिक आणि अज्ञानीपणाचे समजावे. मनुष्यानें सर्वकाळ हीच इच्छा धरावी—

स्वतत्व हृदया कळो दुरभिमान सारा गळो ॥
पुन्हा न मन हें मळो दुरित आत्मबोधें जळो ॥

———

# ऐहिक संबंधानें प्रस्तुतकाळचे लोकाची स्थिति.

या पुस्तकाचे मागिल अंकांत कलियुगाचे संबंधानें कांहीं विचार लिहून वाचकांस सादर केलेले आहेत. प्रकृत विवेचनाचे संबंधानें आह्मी दोन भाग केले होते. एक ऐहिक संबंधानें व दुसरा पारमार्थिक संबंधानें. यां पैकीं पारमार्थिक संबंधाचा भाग तेच वेळीं पुरा करून ऐहिक संबंधानें विचार करण्या विषयीं वाचकांस अभिवचन दिलें होतें त्या प्रमाणें प्रकृत विषयावर आज चार शब्द लिहूं.

प्रस्तुत काल ह्मणजे कलियुगांतील काल हें मागील विवेचनाचे धोरणा वरून वाचकांचे लक्षांत येईलच. तसेंच या काळचे लोकांचे स्थिती विषयीं विचार करतांना मागील तीन युगांमध्यें लोकांची ऐहिक स्थिती कशी होती हेंहि पाहिलें पाहिजे. याचा विचार करण्याचें साधन ह्मटलें ह्मणजे ऐतिहासिक व पौराणिक अशा कथा. आतां या ऐहिक स्थितिचे विवेचनांत लोकांचे आचार, त्यांची गृहस्थिती, त्यांचा पराक्रम, त्यांचे विवाहादि संस्कार, त्यांचा अभिमान, त्यांची बंधुप्रीती, त्यांच्यांतील रीती भाती, आणि देशाविषयीं अभिमान इत्यादि गोष्टींचा विचार केला पाहिजे. हे विचार करूं लागलें ह्मणजे पूर्वोक्त तीन युगांतील लोकांपेक्षां या कलि युगांतील लोकांची स्थिति फारच कनिष्ट व शोचनीय आहे असें ह्मणावें लागतें. पूर्वीचे लोकांमध्यें ज्याप्रणें पराक्रम, धैर्य, स्वदेशाभिमान होता तसा आतां मुळींच दृष्टीस पडत नाहीं. आपल्या देखत आपल्या देशबांधवांची, आतसोयऱ्यांची, आणि आपली माता व स्त्रि यांची मानहानी व उपमर्द होत असल्यास तो पूर्व युगामध्यें कोणास खपत नसे. तसेंच त्या वेळचे लोकांचे आंगीं महत्वाकांक्षा फार असे. लोकांतील रिती भाती व आचार हे सुखावह आणि शरीर व मन यांस हितकारक असत. लोक शरीरानें फार सुदृढ आणि

मनाचे दृढनिश्चयी असत. हातीं धरलेलें काम शेवटास नेण्याची त्यांस फार हुरूप असे. त्यांच्यांतील विवाहादि संस्कार हे स्त्रीपुरुषांतील प्रेम वाढविणारे, सुखावह आणि निरोगी अशी संतती उत्पन्न होण्यास अनुकूल असे असत. आपला हेतु सिद्धीस नेण्याचे कामीं ते कधीं कधीं ईश्वरांशी पुरुषांशी सामना करून त्यांस जेरीस आणीत असत. रावण, शिशूपाळ, कंस, हिरण्यकशिपू, कौरव पक्षाकडील कर्ण, भीष्म, द्रोण, आश्वत्थामा, यांच्या सारखे मोठे पराक्रमी आणि वीर पुरुष पुराण, प्रसिद्ध आहेत. आतां यांची वर्तणूक चांगली किंवा वाईट हें आपल्यास या ठिकाणीं पहावयाचें नाहीं. कारण, तो चांगले वाईटपणा केवळ पारमार्थिक संबधानें गणलेला आहे, आणि त्याचा विचार मागील अंकांत केलेला असून आजच्या प्रसंगीं फक्त त्यांचे शौर्यादि गुणच काय ते पहाणे आहेत. जसे हे पुरुष मोठे शूर, अभिमानी व पराक्रमी होते तद्वतच त्यांचे विरुद्धपक्षी पण कांहीं कमी नव्हते. राजाधिराज रामचंद्र, श्रीकृष्ण, परशराम, वामन, नारसिंह इत्यादि ईश्वरांशी व आवतारी पुरुष, आणि भीम, अर्जुन, बभ्रुवाहन, सुधन्वा, धर्म, द्रोण, भीष्माचार्य इत्यादि राजे, राजपुत्र व भगवद्भक्त मोठे रणधुरंधर आणि नीतिसंपन्न होते. सारांश त्यावेळीं कोणासहि आपला अपमान, आपलें नुकसान, किंवा आपला असंतोष मुळींच खपत नसे. यामुळें त्यांचे आंगीं मोठी तरतरी व हुरूप असून ते ऐहिक सर्व सुखानुभव घेत असत. आणि त्यांच्या मना जोगें कोणतेंहि कृत्य न झालें तर त्या प्रीत्यर्थ ते आपला प्राणाहि खर्ची घालीत. सारांश त्यांस दीन आवस्थेंत लोळत पडणें मुळींच आवडत नसे तसेंच त्यांचे अंगीं अलौकिक गुण असत. त्यांनीं कोणत्याहि कामीं एकादें ब्रीद धरलें ह्मणजे त्या प्रीत्यर्थ ते आपल्या प्रणांचीहि आहुती देण्यास तयार असत. मग त्यांचें तें ब्रीद किंवा कृतसंकल्प कोणत्याहि प्रकारचा असो. बली, कर्ण, शिबिराजा, यांणीं औदार्याचें ह्मणजे लोकांचीं संकटें दूर करण्याचें व ते मागतील तें देण्याचें

पत्करलें होतें. या योगानें त्यांजवर किती दुष्परिहार्य संकटें आली? तशा संकटांतून पार पडण्या विषयीं तेच समर्थ होत. बलिराजानें वामनाला प्रत्यक्ष ईश्वरी अवतार आहे असें जाणीत असतां व शुक्राचार्यंहि त्यास सावध करीत असतां त्याणें भूमिदानाचें दिलेलें वचन मोडलें नाहीं. आचार्य ह्मणाले—

आदितिच्या हृदयीं हरी जन्मला ॥ ह्मणुनि ये समयीं कळलें मला ॥
विभव राज्य समस्त हरीलरे ॥ यशहि होईल विस्तृत अस्तरे ॥
ह्मणुन सांगतसें तुज मी अगा ॥ बस तु मौन्यपणें अथवा उगा ॥
ह्मणसि देईन यापरी ही जरी ॥ निघसि दाटुनि पातक पांजरीं ॥
आधींच नेदीं ह्मणतां भला हो ॥ घेसी ह्मणी वैखरि मात्र लाहो ॥
सांगे तया शुक्र बहु प्रकारें ॥ बली वदे त्या समयानुसारें ॥

असा मागणारा आला असून त्याचे मागण्यानें आपला सर्वस्वापहार होणार असें जाणीत असतांहि त्याची इच्छा तृप्त करण्या विषयीं दिलेले वचना पासून भ्रष्ट न होणारा पुरुष धन्य होय. आमच्या अलीकडील लोकांत मागणाराचा हेतु असा वाईट आहे असें समजतांच त्याची इच्छा तृप्त होण्याचें तर एकीकडेसच राहील, पण त्याजवर लगेच 'पिनलकोडाचा' अंमल जारी होईल. मनुष्याचे आंगीं थोरपणा येण्यास औदार्य हा गुण प्राधान्य आहे. औदार्याचे योगानें त्याचा पराक्रम, नीतिमत्ता शौर्य आणि संपत्ती यांचें बीज होतें. आचार्यांचे ह्मणण्यावर बलीनें समर्पक उत्तर दिलें. तो ह्मणाला—

हे भूमि वेश्या इसि सर्व जाती ॥ भोगोनियां मृत्युपथासि जाती ॥
लोभें इच्या लंघुनि विप्रवाणी ॥ धिग् बोलती वैखरि दैन्यवाणी ॥

निगमविधि विधानें मांडुनी हे पसारे ॥
त्यजुनि विविध योगी वंदिती ज्यासि सारे ॥
वरद हरिच तोहा विप्र कोणीच हाजी ॥
कितितरि मज मागो भूमि देवों अहो जी ॥

असा निश्चय करून त्याणें वामनाचे हातावर दानोदक सोडलें. पुढें वामनानें दोन पायानें पृथिव्याकाशादि व्यापून तिसरा पाय ठेवण्यास जागा मागितली तेव्हां बलीनें आपले मस्तकावर तो देण्यास सांगितला. असो, तेव्हां तात्पर्य काय कीं अशा पुरुषांनींच खरोखर प्रपंच साधून परमार्थहि साधला असें ह्मणावें लागतें. ज्याणें आपल्या पराक्रमानें सार्वभौमपद मिळवून संपूर्ण राजांस व देवांस जर्जर केलें त्याणें प्रत्यक्ष आपला शत्रु मागण्यास आला असतां त्याची इच्छा तृप्त केली तेव्हां त्याची धन्यता किती वर्णन करावी? ते आपल्या पराक्रमानें अनेक प्रकारचें ऐश्वर्य संपादून औदार्यानें त्याचा विनियोग करीत. कर्णानें उदारपणानें आपले आंगांतील कवच दिलें. शिबिराजानें यःकश्चित् कपोताचे रक्षणार्थ आपल्या देहाचें मांस दिलें. श्रियाळानें प्रत्यक्ष आपल्या एकुलत्या लाडक्या मुलाचें मांस यतीस दिलें. असो, तेव्हां तात्पर्य काय कीं पूर्व युगामध्यें लोक असे उदार असत. आतां कोणी ह्मणेल कीं हल्लीं तसे उदार पुरुष नाहींत कीं काय? हल्लींहि तसे पुरुष आपले दृष्टीस पडतात, पण त्यांचे औदार्याचें वास्तविक चीज होण्यास अनुकूल असे जे दुसरे पराक्रमादि गुण ते हल्लीं लोकांचे आंगी नसल्यामुळें व त्याविषयीं लोकांची विशेष इच्छाहि नसल्यामुळें त्यांचें तें औदार्य विधवा स्त्रियेचे सौंदर्यासारखें दिसतें. कवीच्या वाग्विलासाचें चीज रसिक ज्ञात्यांच्या संगती वांचून होत नाहीं, तरुणीच्या दृग्विलासाची सार्थकता अनुरूप भर्त्याच्या सहवासा वांचून होत नाहीं, तद्वत महत्वाकांक्षा आणि पराक्रम हे आंगीं असल्या वांचून औदार्याचेंहि चीज होत नाहीं. असें समजा कीं, आरण्यांतील एकांत वासांत राहणारा एक जटेली—ज्याचे जवळ फाटकी लंगोटी आणि फुटका तुंबा या वांचून दुसरी कांहीं संपत्ति नाहीं—तो मोठा उदार आहे. पण त्याणें आपले औदार्यानें लोकांस संतोषित कसें करावें? कोरडी ठणठणीत झालेली एखादी नदी असते तिचा लोकांना जितका उपयोग तितकाच वरील प्रकारच्या औदार्य संपन्न जटेलोबुवां पासून

व्हावयाचा. लोकांवर उपकारस करणारांस ऐश्वर्यादिक अनुकूल पाहिजेत. आणि ऐश्वर्य संपादन करण्यास महत्वाकांक्षा, पराक्रम, आणि उत्साह हे गुण आंगीं पाहिजेत. वरील पुराण प्रसिद्ध पुरुषांनीं आपलें व पुत्राचें मांस दिलें तसें आतांहि दुष्काळ ग्रस्त एखाद्या मनुष्यानें आपल्या कुटुंबांतील सर्व मनुष्यांचें मांस एखाद्यास दिलें ह्मणून तो वरील उदार पुरुषांचें मालिकेंत येईल काय ऐश्वर्य असून व त्याचा उपभोग घेण्याचें आंगीं सामर्थ्य असून केवळ ज्ञानानें त्याचा तिरस्कार करून वैराग्य धारण करणारा पुरुषच धन्यता पावतो. पूर्वींचे राजेरजवाडे आपल्या बाहुबलानें राज्यें संपादून औदार्यानें सर्व लोकांस संतोषित व सुखी करीत आणि वृद्धापकाळीं केवळ आपल्या परार्थ कल्याणास्तव सर्व राज्याचा भार आपल्या पुत्रावर व मंत्रीजनावर टाकून आपण आरण्य वासास जात ते वेळीं त्याचा तो आरण्यवास प्रशंसनीय होत असे. प्रस्तुत काळीं सर्वच लोक आरण्यवासाला व चतुर्थाश्रम घेण्याला पात्र झालेले आहेत. कारण, ते गृहस्थाश्रमांत असून नसून सारखेच आहेत, बरें त्यांणीं चतुर्थाश्रम घेतला तरी तोहि त्यांस फलद्रूप होणार नाहीं. कारण प्रस्तुत काळीं लोकांचें सर्व लक्ष विषयादिकांकडे गुंतलेलें असतें. आतां प्राचीन काळीं ह्मणजे सर्वच लोक विषयां पासून पराङ्मुख झाले होते असा अर्थ नाहीं. आणि सर्व लोकांनीं विषयोभोगाची इच्छा धरूं नये असें ह्मणणें हाही गौणपक्ष आहे.'वेधा द्वेधा भ्रमं चक्रे कांतासु कनकेषुच' हें जरी खरें आहे तथापि सर्व लोकांनीं त्याचया ठायीं अनासक्त होणेंहि संभवणार नाहीं व सृष्टिनियमा प्रमाणें चालणार हि नाहीं. अशानें ब्रह्मदेवाची कामगिरी संपून लवकरच त्याची जागा कमी होईल. असो, मिळून तात्पर्य काय कीं जो ज्ञानी आहे तो या सृष्ट वस्तूंची योग्यता जाणून त्या मानानें त्यांचा उपभोग घेऊन त्यां पासून अलिप्त असतो. कनककांता हीं जर सर्वथास्त्याज्य आहेत तर जगाचे आरंभापासून पुरुषासीं त्यांचा सहवास असून मोठे मोठे ज्ञाते पुरुषहि त्याचा अंगिकार करतात हें कसें? वरील वे

दांति शक्य हें अलीकडे फार पुढें येतें याचें कारण आणखी असें आहे कीं, वरील वस्तूंचा उपभोग घेण्याचें मनांत आणलें ह्मणजे त्याकरितां अनेक शौर्याचीं, पराक्रमाचीं, आणि मेहनतीचीं कामें करावीं लागतात. भागूबाईपणा स्वीकारून स्वस्थ बसणारे पुरुषास त्यांची प्राप्ती होत नाहीं. पण प्रस्तुत काळीं लोकांची स्थिती कनिष्ट दशेस येऊन ते पंगू झाल्यामुळें त्यांनीं वरील वस्तूंची निंदा केली तरी ती शोभत नाहीं. मांडवावरील पक्क झालेलीं मधुर द्राक्षें कोल्ह्याचे हातीं न आल्यामुळें जशी त्या धूर्तानें त्या द्राक्षांची निंदा करून आपले जीवाचें समाधान केलें व तीं आंबट आणि हिरवीं आहेत अशी बडबड करून तेथून चालता झाला, त्याचप्रमाणें प्रस्तुत काळचे लोक हे आपला भागुबाई पणा झांकला जावा ह्मणून पूर्वोक्त ईश्वर नियमित वस्तूंची निंदा करतात. बरें अशी निंदा केल्यानें त्या वस्तूंचा त्यांच्यानें त्याग तरी होतो काय? तोंहि नाहीं. घरदार, अन्नवस्त्र, आणि कांता कनकादिक यांचा संग्रह तर करावा लागतो, आणि त्या पासून व्हावें तसें सुख होत नाहीं असें मानून त्यांची निंदा करण्याची तयारी. आतां ते पदार्थ खरोखर दुःखमूलकच असते तर ती गोष्ट निराळी, पण तसेंहि ह्मणतां येत नाहीं. त्यांचे पासून पुरुषांस जें दुःख होतें त्या दुःखाचें कारण काय हें पाहिलें पाहिजे. आणि त्याचा विचार करूं लागलें ह्मणजे तो दोष पुरुषांकडेसच येतो. जुने मोडकळीस आलेलें किंवा मुळींच कच्चे पायावर डळमळीत बांधलेलें घर त्या घरांत राहणारे मनुष्याचे डोचक्यावर पडलें तर त्यांत दोष कोणाचा? घराचा किंवा घरवाल्याचा. घरवाल्यानें तेंच घर चांगलें सुदृढ, सरेख, व सोयीवार बांधलें तर पासून त्यास दुःख न होतां तें सुखकर होईल. पण असें घर बांधण्यास सर्व प्रकारची अनुकूलता पाहिजे. आणि त्या अनुकूलतेस आंगीं सद्गुण पाहिजेत. पण अलीकडे इतकी खटपट करण्यास लोकांना उमेद नसल्यामुळें तोंडानें नुसतें बडबडण्याला सुलभ जें

वेदांतिमत त्याचा अंगीकार करून यांत काय आहे, त्यांत काय आहे, अशी उडवा उडव करण्याची लोकांस संवय लागली आहे. पण अशा या उडवा उडवीनें 'प्रपंच ना परमार्थ' अशी स्थिति होऊन दुःख व विटंबना मात्र प्राप्त होते. ही गोष्ट शौर्य, औदार्य व पराक्रम यां विषयीं झाली. हाच प्रकार विद्यादिकांचा. प्राचीनकाळीं अनेक विद्वान लोक असून ते नानातऱ्हेच्या उपयुक्त विषयांवर मोठमोठे ग्रंथ लिहून ठेवीत. असे ग्रंथ आज इतके आहेत कीं, त्यांची एक याद करूं ह्मटलें तर त्याचा एक थोरला ग्रंथ होईल. अलीकडे तसा प्रकार दृष्टोत्पत्तीस येतो काय? आतां एक दोन शतकां पूर्वी लोकांची उमेद कांहीं बळावल्या सारखी वाटली होती.पण तो प्रकार,अगदीं विझण्याचे बेतावर आलेले ज्योती सारखा झाला.दिव्याची जोत जशी विझत आली ह्मणजे तिचा प्रकाश मंद मंद होत जाऊन अखेरीस एकदांच थोडा जास्त प्रकाश होऊन पुनः अंधार होतो, तसा प्रकार प्रस्तुत दिसतो. दोन शतकांचे पूर्वी लोकांस जी उमेद आली होती त्याजवरून त्यांची ऊर्जित दशा येईल असा भरंवसा वाटत होता. पण या योगानें कलिराजानें आपला अपमान होईल असें मनांत आणून लोकांच्या बुद्धी भ्रष्ट केल्या व त्यांस थोड क्याच ऐश्वर्यांत गुंग करून त्यांची उत्साह बुद्धी नाहींशी केली. आणि राजघराण्यामध्यें मूर्ख व भेकड पुरुष उत्पन्न करून पुनः लोकांस पूर्व पदास आणलें. अलीकडे तर त्यांस ऐहिक सुखाचा जसा तिटकाराच आलेला दिसतो. पण तो नुसता दिसण्या पुरता मात्र. त्या तिरस्काराचें कारण तरी स्वतःची नाउमेद. द्राक्षांचा पक्क झालेला घड मांडवावर पाहिला ह्मणजे तोंडाला पाणी सुटतें, पण यत्न करून तो काढावा कोणी? यांचे प्रारब्धानें यांचें तोंड उघडून मांडवाला हात फुटावे व त्याणें तो घड आयताच यांचे तोंडांत आणून घालावा तर यांची इच्छा तृप्त होणार नाहीं तर नुसत्या आशेनें तोंडें मात्र कोरडी ठहावयाचीं पूर्व युगांमध्यें इच्छित वस्तूचे प्राप्ती करितां लोक प्राणहि खर्चीत असत.

तेव्हां याजवरून पूर्वयुगांत व प्रस्तुत काळांत लोकांचें ऐहिक स्थितींत किती ? धरें अंतर दिसतें? त्यांतून ही स्थिति उत्तरोत्तर कोणत्या थरास जाईल य ाचा विचार करूं लागलें ह्मणजे फारच वाईट वाटतें. लोकां मध्यें कोणताहि : कामाविषयीं उत्साह बुद्धी दिसत नाहीं, त्यांची सर्व उमेद खचल्य ा सारखी दिसते, विपन्न स्थितींत राहून माशा मारीत बसणें त्यांस ज ः ति आवडत नाहीं तथापि त्या पासून आपली सुटका करून घेण्याची ? यांची इच्छा दिसत नाहीं, सरासरी जो आपला निर्वाह करतो तो सुखी समजला जातो, हजार पांचशें रुपये जवळ असले ह्मणजे तो पैसेवा ल्य ठरतो, दाहापांच मनुष्यें पदरीं असलीं ह्मणजे तो श्रीमंतांत मोडतो, प ांच चार गांवांची वतनदारी असली ह्मणजे इनामदारांत आणि जाहागीरदारांत मोडला जातो, लोकांचे नफा नुकसानाची थोडी सत्ता हातांत असून दाहा वीस हजार रयत आणि शेंपन्नास घोडीं बिडीं संग्रहीं असलीं ह्मणजे तो राजा मानला जातो, मिळून सर्व लोक जसे अल्पसंतोषी आणि दुसऱ्याचें ऐश्वर्य व हिकमत पाहून आश्चर्य करणारे झाले आहेत.

आतां हा प्रस्तुत काळचा ह्मणजे कलियुगाचा संबंध फक्त आपले हिंदुस्थान देशासच लागू करतां येईल हें सांगावयास नको. कारण येकतर ही युगपरंपरा हिंदुलोकांनीं मानलेली असून त्याचा अनुभव प्रस्तुत त्यांसच आहे. यांची पूर्व युगांतील उत्तम स्थिती परद्वीपस्थांनीं हिरावून घेतली आहे. घोडे, गाड्या, तारायंत्रें, विमानें, अग्निरथ, इत्यादिकांनीं कलियुगाचा अंमल बसूं लागला तेव्हां या देशांत राहण्याचे राजीनामे दिले व देत आहेत. मिळून प्रस्तुतकाळीं लोकांची स्थिति दीन, तेजहीन, व विपन्न झाली आहे तेव्हां ते यांतून पार पडून उत्तम स्थितींत येतील तो सुदीन समजावयाचा.

---

# नादब्रह्म

यथा नयंति रागास्ते नरं गायनकोविदं ॥
तथा नयंति कैलासो न गंगा न सरस्वती ॥

जेथें ध्वनि उत्पन्न होतो तेथें या ब्रह्मसाक्षात्काराचा अनुभव आहे च. मनुष्याच्या व पशुपक्षादिकांच्या मुखांतून निघणारे शब्द, धातूंच्या तंत्वादिकां पासून उत्पन्न होणारा ध्वनि, आणि वृक्षवाटिकेंत किंवा गिरि गव्हरां मध्यें वायूचे संचारा पासून उत्पन्न होणारा ध्वनि, हे सर्व नाद होत. यांत कांहीं ध्वनि मधुर असतात आणि कांहीं कर्कश असतात. मनुष्यांनीं आपले ज्ञानानें अनेक विद्यांचा व वस्तूंचा शोध करून त्यांचा संगतवार संग्रह करून त्याजवर अनेक ग्रंथ केले, तद्वत या नादविद्येवर हि त्यांणीं बहुत शोध केला. आमच्या देशांत सर्व विद्यां प्रमाणें या विद्येवरहि प्राचीन ऋषींनीं अनेक विचार करून ग्रंथ करून ठेविले आहेत. गायन, नृत्य, आणि वाद्य हीं या नादब्रह्माचीं अधिष्ठानें होत, ह्मणजे पूर्वोक्त स्वरांची रचना करून ते कर्णेंद्रियास प्रिय वाटावे व त्या योगानें अंतःकरणास आनंद व्हावा अशी जी स्वर पद्धति त्यास संगीत ह्मणतात. संगीत शास्त्रा मध्यें पूर्वीं पुष्कळ लोक निपुण असत. सुस्वर हे मनुष्यास फार प्रिय आहेत. यामुळें या शास्त्रा पासून मनुष्याला जेवढा आनंद होतो तेवढा इतर कोणत्या गोष्टी पासून होत नाहीं. न्याय, व्याकरण,मीमांसा इत्यादि शास्त्रें विद्वानांची विद्वत्ता दाखविणारीं व विशेषें करून विद्वानांस प्रिय असतात. पण हें संगीत शास्त्र सर्व प्रिय होय. या शास्त्रानें ज्ञानी व अज्ञानी हे सर्व संतोषित होतात. फार तर काय, सर्व पशु पक्षादिकांसहि या शास्त्रा पासून आनंद होतो. या शास्त्राचा मूळ पाया स्वर होत. असें समजा कीं, कांहीं महा पंडित एके ठिकाणी व्याकरण शास्त्रावर भवति न भवति करीत आहेत. आतां त्या ठिकाणीं अविद्वान मनुष्याचें मन तर रमणार नाहींच. पण न्याय मीमांसादि

दुसऱ्या शास्त्रांतलि प्रवीण विद्वानांसहि तो अपरिचित विषय गोड लाग णार नाहीं. खेरीज यांत भाषेचे संबंधानें माहिती पाहिजे. एखादा पाश्चात्य पंडित एकादे विषयावर सुरस व्याख्यान देत असतां तो विषय उपयुक्त असल्यामुळें ऐकावासा वाटेल, पण कोणाला? ज्याला त्याच्या भाषेचें ज्ञान असेल त्याला, ज्यास ती भाषा येत नसेल त्यास तेथें बसा वेसें देखील वाटणारें नाहीं. पण या स्वरशास्त्राचा प्रकार तसा नाहीं. पाहिजेत्या देशांतला व पाहिजे त्या जातीचा मनुष्य कोणत्याहि भाषेंत कां गात असेना, सर्वांना त्याचें गाणें गोड लागेल. त्या मनुष्याचा आवाज मधुर असून खेरीज त्यास संगीत शास्त्राची जर चांगली माहिती असली तर सर्वांस त्याचे गाण्यापासून आनंद होईल. आतां त्याचें गाणें एखादे विषयास अनुसरून असलें तर ज्यांस ती भाषा समजत नसेल त्यांस त्या विषयाचें परिज्ञान होणार नाहीं, तथापि मनुष्याचे अंतःकरणास स्वरापासून होणारे आनंदांत कमीपणा येणार नाहीं. आतां ही गोष्ट मनुष्यांचे संबंधानें झाली. मयूर कोकिलादि मधुर स्वराचे प्राणी हे आरण्यामध्यें ओरडत असतां त्यांची भाषा तर आपणास कळत नाहींना? पण त्यांच्या स्वरमाधुर्यानें अंतःकरण सुप्रसन्न होतें. पुरुषां पेक्षा स्त्रियांचे शब्द कनाला फार गोड लागतात. या शिवाय तंतू पासून होणारा ध्वनि, हाहि कानाला फार गोड लागतो. चर्मा पासूनहि मधुर स्वर निघतात. कांहीं वाद्यें मनुष्यानें तोंडनें फुंकिली असतां त्या पासून मधुर ध्वनि निघतो. आघाता पासून होणारा ध्वनिहि गोड लागतो ह्मणून कांहीं धातूंचे वगैरे तुकडे हातांमध्यें धरून त्या पासून मनुष्यानीं स्वर पद्धति जुळली आहे. मिळून अनेक पदार्थां पासून अनेक प्रयासानें मनुष्यांनीं स्वर उत्पन्न करून त्यांची संगती केली व त्याच्या स्वरादिकां विषयीं नियम बांधून संगीत शास्त्राला भर घातली. वरील तंत्वादिक वाद्यांचे स्वर फार मधुर असतात. या वाद्यां पैकीं आपल्या देशांत असणारीं कांहीं वाद्यें खलीं लिहिलीं आहेत.—

## तंतुवाद्यें.

| | | |
|---|---|---|
| १ वीणा | ६ सतार | ११ रबाब |
| २ बीन | ७ सारमंडळ | १२ मदमंडळ |
| ३ रुद्रविणा | ८ तंबुरी | १३ ताऊस |
| ४ एकतारीवीणा | ९ सरोदें | १४ तुंतुणें |
| ५ सारंगी | १० कोंका | |

## चर्मवाद्यें.

| | | |
|---|---|---|
| १ मृदंग | ५ खंजीरी | ९ चौघडा |
| २ तबला | ६ नौबत | १० डंका |
| ३ डफ | ७ तासा | ११ ढोलकी |
| ४ सभेळ | ८ मर्फा | |

## कंठवाद्यें

| | | |
|---|---|---|
| १ पांवा | ४ कर्णा | ७ शीळ |
| २ अलगुजें | ५ सनई | ८ चंग |
| ३ शिंग | ६ शख | |

## हस्तवाद्यें.

| | | |
|---|---|---|
| १ झांज | ४ करताळ | ७ घागरी |
| २ टाळ | ५ जलतरंग | ८ घंटा |
| ३ चिपळ्या | ६ घुंगरू | ९ तास |

मनुष्यास ईश्वराविषयीं ज्ञान उत्पन्न होऊन त्याचा कांहीं साक्षात्कार घडला ह्मणजे जशी सर्व तर्‍ही तिकडेसच लागते, व परमेश्वराचे आराधनेंत आणि ब्रह्मसाक्षात्कारांत त्याचें चित्त व्यग्र होतें, तसाच या नादब्रह्माचा महिमा आहे. मधुर नाद कानीं आला ह्मणजे मनुष्याचें चित्त कसेंही बावरलेलें कां असे ना, लगेच तें शांत व स्थिर होतें. या ब्रह्माचा साक्षात्कार चित्ताला घडला ह्मणजे मनुष्यास समाधान वाटतें, मनाला उल्हास होतो, व कंटाळा आणि त्रास जाऊन विश्रांति व सुख वाटतें ऐहिक पीडेने दगदगलेल्या मनुष्याच्या चित्तवृत्ति संतोषित करण्यास यासारखें दुसरें रसायणच नाहीं. गाण्यानें अंतरात्मा सुप्रसन्न होतो. पूर्वयुगांत गायनादिकांचे योगानें परमेश्वराला त्याचे भक्तांनीं वश केल्याचीं उदाहरणें पुराणांत आहेत. या विद्येचा अंगीकार मोठमोठे लोक करीत. रावणानें गायनाचे योगानें शंकराला सुप्रसन्न करून घेऊन आत्मलिंग संपादिलें, देवऋषी जो नारद त्याची गायनाविषयीं प्रसिद्धीच आहे, गंधर्वादिक सुरगण हे गायनांत निष्णात असल्यावद्दल पुराणांत सांगितलेलें आहे आप्सरांनीं नृत्यगायनादिकाचे निपुणतेनें विश्वामित्रासारख्या तपोनिष्ठ मुनीसहि लुब्ध करून श्वानरूपानें आपले पाठीस लाविलें, आतां या गोष्टी पुराणांतच झाल्या, अलीकडे देखील याचा अनुभव लोकांना आहे. सदाचारी व सद्गुणी पुरुष केवळ गायनास लुब्ध होऊन वेश्यालंपट झाल्याचीं उदाहरणें अनेक मिळतील, बायकांचा स्वर पुरुषांपेक्षां स्वभावतः मधुर असतो, यामुळें त्यांचे गाण्यानें चित्त मोहित होतें. लहानपणीं ह्मणजे बाल्य दशेंत स्त्रिया व पुरुष यांचा स्वर सारखाच असतो, परंतु पुढें वयांत आल्यावर पुरुषाचा आवाज थोडा घोगरा होतो हा पालट बायकांचे आवाजांत होत नाहीं. संगीत शास्त्राचा जो मूळ पाया, तो स्वरावर असल्यामुळें पुरुषांपेक्षां बायकांचें गाणें स्वभाविक गोड लागतें त्या मध्यें त्यांस संगीतशास्त्राचें विशेष ज्ञान असेल तर फारच मजा उडते. गायन विद्येमध्यें निपूण असे कित्येक प्रसिद्ध गवयांहि विद्वतेचे

जोरावर आपल्या मर्दानी आवाजानेंहि लोकांची मनें संतोषित कारितात एखाद्याचा आवाज फार कर्कश असतो, व एखाद्याचा मधुर असतो. गवयाचा स्वर मधुर नसणें ही त्याच्या विद्येला मोठी उणीवच आहे. फक्त विद्येच्या योगानें होणारें समाधान थोडक्यांचें. मोठे विद्वांन गवय्येहि वारांगनांच्या स्वरमाधुर्यास लुब्ध होतात.

संगित शास्त्राचा मूळ पाया स्वर ह्मणून वर सांगितलेंच आहे. शास्त्रकारांनीं या स्वरांचे भेद सात केले आहेत. ह्मणजे पाहिजे तो स्वर असला तथापि तो या सातां पैकीं एकांत येतो. प्रस्तुत रूढीमध्यें त्या स्वरांची नावें आलीं आहेत तीं केवळ अपभ्रंशानें आलीं आहेत. असो हे मुख्य सप्तस्वर पुढें लिहिल्या प्रमाणें,—

| मूळ स्वर | अपभ्रंश | संक्षेप |
|---|---|---|
| १ षड्ज | १ खरज | १ सा |
| २ ऋषभ | २ रीखब | २ री |
| ३ गांधार | ३ गंधार | ३ ग |
| ४ मध्यम | ४ मधम | ४ म |
| ५ पंजम | ५ पंचम | ५ प |
| ६ धैवत | ६ धैवत | ६ ध |
| ७ नीषाद | ७ नीखाद | ७ नी |

या प्रमाणें स्वरांचे नियमित वर्ग केल्यामुळें त्यांची योजना करण्यास फार उपयोग आला. स्वरांच्या नियमित योजनेलाच राग असें ह्मणतात. बुदबळांचा पट चौसष्ट घरांचा असून जसा खेळतांना प्रत्येक डाव निराळा होतो. व या प्रमाणें लक्षावधी डाव झाले तथापि माहितगार आहे तो त्याहूनहि एखादा निराळा डाव काढूं शकेल. तसे हे स्वर जरी सातच आहेत तथापि त्यांचे निरनिराळे योजनेने अनेक राग उत्पन्न झाले आहेत, व त्या शास्त्रांतील विद्वान स्वराभिज्ञ पुरुष आणखीहि पाहिजेत तेवढे राग उत्पन्न करतील. पण प्राचीन विद्वान पुरुषांनीं याचा

पुष्कळ विचार केला असल्यामुळें त्याणीं लिहून ठेविलेले ग्रंथाचें अवलोकनही समग्र होत नाहीं,मग जास्त रागदाऱ्या उत्पन्न करण्याचें लांबच. असो, स्वरांच्या कांहीं नियमित जुळणीला राग ह्मणतात ह्मणून वर सांगितलें त्यांतील मुख्य राग खालीं लिहिल्या प्रमाणें:—

| | | |
|---|---|---|
| १ भैरव | ३ नाट | ५ गौडमालव |
| २ पंचम | ४ मल्हार | ६ देशाव |

या खेरीज याच्या पोटीं—आनंद बहिरवी, कल्याण, कानडा, काफी कांबोध, कालंगडा, केदार, खट, गांधार, गारा, गुजराथी, गुणकारी, गौडी, जंगल, जयजयवंती, जोगी, झिंझुटी, तोडी, देस, नाट, परज, पिलू, पूर्वी, वसंत, बहिरवी, बिभ्रल, बिलावल, व्याहाग, भोपाली, मल्हार, मालकौंस, माळवा, मुलतानी, यमन, रामकली, ललत, लिलारी, वराटी, विभास, शंकरा, श्री, शंकराभरण, सारग, सिंदी, सुवा, सोरट, सोहनी इत्यादि भेद आहेत. या शिवाय यांचेहि आणखी अनेक पोटभेद आहेत यांत राग, रागिण्या, जिल्हे, बहार वगैरे अनेक भेद आहेत. असो तेव्हां हें नादब्रह्म असें विस्तृत झालें आहे. अशा तऱ्हेनें या स्वर शास्त्रावर अनेक विचार व अनेक ग्रंथ झाले असून प्रस्तुत लोकांचे अज्ञानानें त्या शास्त्रांत फारशी कोणाची गतीही नाहीं. या गायनाला आपल्या प्राचीन ऋषींनीं वेदांत गणलें आहे 'गायनः पंचमो वेदः' असी व्यासोक्ति असल्याबद्दल लोकांस माहीत असतां या विद्ये विषयीं अज्ञानामुळें अशी समजूत झाली आहे कीं ही विद्या मुळीं आपलीच नाहीं.असें लोक ह्मणतात. मूळ गाण्याची विद्या मुसलमानांची असा लोकांचा वेडगळ समज झाला आहे. सारांश, ही विद्या अति उत्कृष्ट व मनाला उल्हास देणारी असून तिजबद्दल लोकांची विपरीत बुद्धी झाली. मनुष्य मोठे श्रम करीत असतांहि या स्वरशास्त्रापासून त्याला विश्रांति मिळून काम करण्याची उमेद येते. याचा अनुभव

सर्वांस आहे. अनेक प्रसंगी या संगीतशास्त्राचा संबध दिसण्यांत येतो. हें शास्त्र मोठें पवित्र आणि आनंद कारक आहे. देवळांत, यज्ञांत, लढाईत, शेतांत, जहाजांत, व सर्व प्रकारच्या मंगल संस्कारांत सर्व देशांतील लोक आपापले समजुती प्रमाणे गाणीं गातात. समाजांत व एकांतवासांतहि या शास्त्रा पासून मोठी विश्रांति मिळते. मधुर स्वराचे श्रवणानें मनुष्यास कसाहि क्रोध आला असला तथापि तो शांत होतो, निर्दयास दया उत्पन्न होते. व मनुष्य दुःखाने किंवा विपत्तींत कसाहि गांजलेला आणि त्रासलेला असला तथापि यापासून त्याचे चित्ताला कांही वेळ विश्रांति मिळते. आतां असें कां होतें हा प्रश्न करून उपयोग नाहीं, कारण, सुंदर पदार्थानें नेत्रांपासून सुवासानें घ्राणेंद्रिया पासून स्वरमाधुर्यानें कानांपासून आणि मधुर पदार्थानें जिभे पासून अंतरात्म्याला संतोष व समाधान होतें हा ईश्वरी नियमच आहे. ज्या पदार्थाचे योगानें वरील सर्व इंद्रियांचे द्वारानें अंतरात्मा प्रसन्न होतो त्या पदार्थाचे ठायीं मनुष्य अती लुब्ध होतो. खाण्याचा पदार्थ मधुर व रुचिकर असून खेरीज तो सुंदर आणि सुवासिक असेल तर तो मनुष्यास फारच प्रीय होतो. कलावंतीन संगीत शास्त्रांत निपुण असून स्वर माधुर्या प्रमाणेंच तिचें सौंदर्यहि उत्तम असेल तर तिच्या ठिकाणीं पुरुष फार लुब्ध होतात. मिळून सुंदर वस्तू आवलोकन केल्यानें व सुस्वरांचे श्रवणानें डोळे आणि कान या इंद्रियांची तृप्तता होणें हा इंद्रियधर्म आहे. ह्मणजे ज्याला हीं इंद्रियें आहेत त्याला त्या पासून सुखोत्पत्ती होईलच यांत संशय नाहीं श्रोत्रेंद्रिय द्वारा अंतरात्मा प्रसन्न होण्याजोगी या सुस्वरासारखी दुसरी कोणतीच वस्तु नाहीं. मनुष्याचें ज्ञान विस्तृत होऊन त्यास ईश्वरी साक्षात्कार घडण्यास जसें श्रोत्रेंद्रिय उपयोगी आहे त्याचप्रमाणें नादब्रह्माचा अनुभव होऊन चित्ताचा संतोष होण्यासहि वरील इंद्रियच अनुकूल आहे. या इंद्रियाचा मुख्य विषय स्वरशास्त्र होय.

या स्वरशास्त्राची गोडी आबाल वृद्धांना असून तें सर्वदेशांत व सर्व जातींतील लोकांत आहे. मनुष्य विद्वान असो किंवा मूर्ख असो, तसेंच तो सुधारलेल्या देशांतील असो किंवा एखाद्या जंगली मुलखांतला असो, त्यास या स्वरशास्त्राची गोडी असून खेरीज स्वतः त्याला कांहीं गातांनाहि येत असेल. भाषेमध्यें गद्य व पद्य असे दोन भेद आहेत. यां पैकीं भाषेचें पद्य स्वरूप या संगीत शास्त्रांत मोडतें. पद्यांत श्लोक, आर्या, अभंग, ओवी, कटिबंध, इत्यादि भेद आहेत. तसेंच या प्रत्येकांचे आणखी पोट भेद होऊन त्यांत मात्रादिकांचे नियम बांधले गेले आहेत, व त्या प्रीत्यर्थ छंदशास्त्रच बनलें आहे. पद्य बहुधा चालीवर म्हणजे संगीत शास्त्राचे नियमानें म्हणण्याचा सांप्रदाय आहे. स्वरांचे निबंधा-वरून जे राग, रागिण्या वगैरे उत्पन्न झाले आहेत ते म्हणून दाखविण्या करितां शब्द मालिका तयार करतात. त्या शब्द मालिकेस प्रस्तुत रूढींत चीज म्हणतात. या शब्द समूहानें अनेक पद्यें झालीं आहेत, त्यांत धृपद, ख्याल, टप्पा, प्रबंध, तराणा, पद, अष्टपदी, इत्यादि भेद आहेत. साधारणतः भाषेचें पद्यस्वरूप, सुरस व सुंदर असतें, त्यांत त्यास संगीत शास्त्राची अनुकूलता झाली म्हणजे तो शब्द समुदाय फार मधुर वाटून चित्ताला आनंद होतो. संस्कृतांतील सर्व ग्रंथ बहुधा पद्यरूप आहेत. परमेश्वराचीं सर्व स्तोत्रें हीं पद्यरूपांत असतात. पद्यें हीं पाठ करण्यास व ध्यानांत ठेवण्यास सुलभ असून खेरीज त्याचे योगानें मनरंजन होतें. सुस्वरापासून अज्ञानी प्राण्यासहि आनंद होतो. गाणें म्हणूं लागलें म्हणजे लहान मूल रडत असलें तर उगाच राहतें. रानांतील गुरांचा कळप गुराख्यानें वाजविलेल्या पाव्याचा नाद ऐकून चारा खाण्याचें सोडून स्वस्थ उभा राहतो. सारांश या स्वरशास्त्रानें मोहित न होणारा प्राणी फारच विरळा. या नादानें निर्जीव पदार्थांनाही द्रव उत्पन्न झाल्याचें पुराणांत वर्णन आहे.

अशी या विद्येची योग्यता असून सांप्रत तिजकडे लोकांचें दुर्लक्ष झालें आहे. जो विद्या पूर्वी मोठ्या कुलीन व नामांकित घराण्यांत दृष्टीस पडत असे ती हल्लीं नीच लोकांमध्यें जाऊन चांगले लोकांचे तिरस्काराला पात्र झाली आहे. पण हें लोकांचें केवळ अज्ञान होय. हिरा केरांत टाकला तथापि तो आपल्या तेजानें मोठ्या सार्वभौम राजाचे डोळे दिपविण्यास सोडणार नाहीं. तद्वत ही सद्विद्या नीच लोकांचे घरांत पडली आहे तथापि तेथूनही ती मोठ्या विद्वान व कुलीन पुरुषांचें चित्त आपणाकडे ओढून घेण्यास सोडीत नाहीं. नृत्यगायनादि कला अलीकडे निंद्य मानल्या जातात हा किती वेडेपणा आहे? पूर्वीतर स्त्रियांसही या कला मोठ्या आवडीनें शिकवीत असत, विराटाकडे स्त्रियांस शिकविण्यास बृहन्नडेला ठेविली होती हें सर्वांस ठाऊक असेलच. परंतु अलीकडे याजबद्दल लोकांची भलतीच समजुत झाली. क्वचित् गाणें, वाद्यें वाजविणें व नर्तनादिक दृष्टीस पडतात पण ते केवळ उदरनिर्वाचे व याचकपणाचे धंदे बनले आहेत. कुलीन, विद्वान, व संपन्न लोकांत याच्या अभ्यासाची प्रवृत्ति नाहीं. गायला शिकल्यानें मुलगा रंडीबाज होतो, तबला वाजविण्यास शिकल्यानें तबलजी होतो, व सारंगी बाजवूं लागल्यानें छाकटा होतो, अशी लोकांची वेडगळ समजूत झाली आहे. यामुळें ही विद्या तशा प्रतीचे लोकांतच क्वचित दृष्टीस पडते. आतां ही विद्या संपादन करणारे लोक जे वर सांगितले ते श्रीमंत नसल्यामुळें पोटाचे नादीं लागतात, या योगानें तिचा पूर्ण अभ्यास होत नाहीं. खेरीज या देशांत परद्वीपस्थ व परधर्मी लोकांची राज्यसत्ता असल्यामुळें आणि त्या लोकांस या विद्येची असावी तशी अभिरुची नसल्यामुळें तिला कोणत्याहि तऱ्हेनें राजाश्रयहि मिळत नाहीं. आणि श्रीमंत व विद्वान लोक तर आपल्यास तिचा वाराहि लागूं देत नाहींत. पण ही गोष्ट शिक्षणाचे संबंधानें मात्र, बाकी ते त्या विद्येस लुब्ध होत नाहींत असें नव्हे. दरमहा शेंकडों रुपये खर्च करून आपले आश्रयीं ते वेश्यादिकांस ठेवतात व

त्यांचे गायनानें संतोषितादि होतात, पण ती आनंद दायक विद्या आपणास किंवा आपले मुलाबाळांस यावी असी इच्छा करीत नाहींत. याचें कारण त्या विद्येनें मनुष्यें बिघडतात अशी लोकांची समजूत आहे. आतां लोकांना असें वाटण्याचें कारण इतकेंच कीं, या गायनादि विद्येंत माहितगार लोक बहुधा दुर्व्यसनी असतात असी समजूत आहे, आणि दुसरें कारण असें कीं या विद्येचा नाद वेश्यांस फार असतो ह्मणून त्या विद्येचें मर्म जाणणारे पुरुषांस त्या विशेष मोहांत घालतात. वेश्यांना तरी या विद्येचा अंगीकार करण्याचें कारण इतकेंच आहे कीं, त्यांचा धंदा ह्मटला ह्मणजे केवळ दुसऱ्याचें मनरंजन करणें हा होय.तेव्हां त्या धंद्याला प्रकृत गुण हा उपयोगी असल्यामुळें त्या तो शिकतात. लोकांचें या विद्ये विषयीं दुर्लक्ष होण्याचें कारण हेंच आहे दुर्व्यसनी लोकांत ही विद्या दृष्टीस पडते यांत या विद्येचा दोष कोणता? तशांतूनही विद्या केवळ निर्दोषी आणि शुद्ध असल्यामुळें तिजपासून दुर्व्यसन लागेल अशी कल्पना करणें देखील चुकीचें आहे कारण, यास वेदाची उपमा देणारे व गायनविद्येच्या संगतीनें वेदांतील ऋचा ह्मणणारे ऋषी यांचें वर्तन कोणत्या प्रकारचें होतें हें मनांत आणलें ह्मणजे या विद्येची योग्यता लक्षांत येते. पण हें मनांत न आणतां तिची उत्पत्ती यवनादिकां पासून कल्पून आपला वेडेपणा व्यक्त करणें, आणि त्यामुळें या सद्विद्येपासून होणाऱ्या अनेक लाभांस मुकणे हें सुज्ञ मनुष्यास योग्य नाहीं. याचा विचार सर्वांनीं करावा.

# स्वात्मानंद.

(भा० अं० न०पु० चा०)

ते उत्थानसमाधी शुद्ध ॥ तुर्या बिंदुद्वय साध्य प्रसिद्ध ॥
सर्वज्ञादी अनंत सिद्ध ॥ शक्ती षड्विध ऐश्वर्यता ॥ ६६ ॥
तेथें कारण नादरूप ॥ तनु ते अंगुष्ठपर्यंत स्वरूप ॥
भासे कुंडलाकार दीप ॥ येथे संक्षेप न धरावा ॥ ६७ ॥
द्वितीय ते दंडाकृती ॥ सूक्ष्म देह जया बोलती ॥
हे उमजतां आदी अंतीं ॥ स्वात्मस्थिति न ढळेची ॥ ६८ ॥
व्यापी सर्व प्रमाणासी ॥ चत्वार तनुदेहाकृतिसी ॥
संयोगें स्थूळ देह तारकासी ॥ तरावयासी निर्मिलें तें ॥ ६९ ॥
एवं हा प्रणवस्वरूप हर ॥ देहाकृति वर्णिला साचार ॥
जाणावया स्वतसिद्ध निर्धार ॥ अद्वयसार पूर्णबिंदु ॥ ७० ॥
प्राणापानसमानहंस ॥ विकसी जो यथावस्था सावकाश ॥
अर्धेंदूत उदान भास ॥ होय समरस तुर्यांतरीं ॥ ७१ ॥
तेव्हां हा अपराविमर्श सरे ॥ सकळ तो सुक्ष्म नादीं विरे ॥
ते स्वज्योतिविमर्शपरा वारे ॥ निजध्वनि उरे बिंदुद्वयीं ॥ ७२ ॥
लक्षामाजी प्रकाश पूर्ण ॥ प्रणवामध्यें विमर्ष स्फुरण ॥
द्वयबिंदुशक्ति द्वयीं वसे जाण ॥ विस्तारे आपण ज्ञानक्रियाः ॥ ७३ ॥
ऊर्ध्वीं अर्धांश शीतबिंदु ॥ परमानंदैक्य तो निस्पंदु ॥
व्यानोदान मिळे प्रभेंदु ॥ नीललक्ष चंद्र तेथ ध्वनि स्फुरे ॥ ७४ ॥
या पांचें तनु सद्य तेथ असती ॥ पंचप्रणवान्वयें निश्चिती ॥
होती वास्तव वेगळाली प्रतीति ॥ अवस्था वर्तती स्वयें तनुमाजी ॥ ७५ ॥
देहाची परिमितता न जोडे ॥ न कळतां कैसी मुक्ति घडे ॥
तनुप्रमाण जयाचे लक्षीं आतुडे ॥ तो स्वरूपीं बुडे या अलक्षीं ॥ ७६ ॥
स्थूळ देहभासी क्षेत्राप्रती ॥ जे कां जीवमात्र त्यागिती ॥
तयां व्हावया मोक्षप्राप्ती ॥ तारक निश्चिती उपदेश ॥ ७७ ॥

सांगे जो गुह्य साक्षात ॥ परशीव स्वमुखें निश्चित ॥
दक्षगश्रोत्रांतरीं भावयुक्त ॥ दोनां उद्धरीत निजांगें जो ॥ ७८ ॥
उर्ध्व याम्नाय तें हें बिज ॥ अनुभव प्रणवींचा सहज ॥
पंचदेहाकृतीचें चोज ॥ दावी निजभोज निजानंदें ॥ ७९ ॥
ऐसा हा गुह्यार्थ देविप्रती ॥ शिव वदला स्पष्ट निश्चिती ॥
हृतकमळींचया अनुभव युक्ती ॥ भक्तजनाप्रती तरावया ॥८० ॥
हें निश्चयें श्रवण करितां ॥ भक्ति ज्ञान वैराग्य ये हाता ॥
मोक्ष पावे सहज आइता ॥ गुरु आश्रयता मार्ग करुनी ॥ ८१ ॥
इति श्री स्वात्मानंद लिखिते ॥ श्री पूर्णदास विरचिते ॥
निजात्मस्वरूपवर्णनन्नाम ॥ द्वितीयोल्हासः ॥ ॥ २ ॥ ॥ २ ॥

---

# उल्हास ३ रा.

मी नेणे संस्कृत काव्य व्युत्पत्ति ॥ न कळे महाप्राकृत भाषेची गती ॥
माझा सद्गुरु कृपाळमूर्ति ॥ परमार्थस्फूर्ति देत ग्रंथीं ॥ १ ॥
पापवर्यायें क्रमें हें गुरुपद ॥ उपजे पंचब्रह्मस्वरूप आद ॥
तो आत्माराम वाराणसीं प्रसिद्ध ॥ तनु स्वतःसिद्ध तयाची जाण ॥ २ ॥
भागीरथी ज्ञानरूपी होत ॥ सच्छंदा भवानी निश्चित ॥
अनुभव अति उत्कृष्ट तेथ ॥ निजात्म साक्षात ईश्वराचा ॥ ३॥
वर्ते जो या स्थितिप्रकारें ॥ शिव वदतो त्याचा खरें ॥
उद्धरीं मी वंश निर्धारें ॥ जन्मांतरफेरे चुकऊनी ॥ ४ ॥
भूताचा स्थुळ देह निश्चित ॥ विषय तमरूपें भाजनावत ॥
त्या मध्यें स्नेहबाह्य इंद्रियें होत ॥ मन वायु समस्त रजोगुण ॥५॥
वृत्तीतें शुद्ध सत्वादीक ॥ मूळकरणे दीपतो प्रत्येक ॥

त्यापुनि सर्वसाक्षी तदुपरी देव ॥ निर्लक्ष भौमेक निजात्मा तो ॥ ६॥
पंचब्रह्मविकाशमूर्तिमंता ॥ शिवतो ओंकाररूपी पिता ॥
गायत्री जे सकळ वाच्या स्फुरविता ॥ तेचि तत्वता माता होय ॥७॥
तिचा पंचम पाद त्यांत साचार ॥ अपरोक्षत्वें स्वात्म निर्धार ॥
शंभु स्थापीतसे तयांतर ॥ अनुभवी विप्र ब्रह्मज्ञ तो ॥ ८ ॥
जन्म जालीया शूद्रत्व गती ॥ मुंजीबंधनें द्विजत्व प्राप्ती ॥
वेदाभ्यासें विप्र ह्मणती ॥ ब्रह्म जाणती ते ब्राह्मण ॥ ९ ॥
ओंकारांतीं जो का सुबिंदु ॥ परशिव विकसीत स्वतसिध्दु ॥
स्वप्रकाश स्वयें परमानंदु ॥ आनंदकंदु निजात्मा जो ॥ १० ॥
तत्प्राप्ती ते दुरावे ॥ अनुभव कथितां बोलवे ॥
वर्म नेणोनि स्वभावें ॥ देहबुद्धी गोवें पडताती ॥ ११ ॥
पंच अवस्था कशा कीं तत्वता ॥ प्रतितनुप्रति घडती विचारतां ॥
पंचप्रमाणें जाणतां ॥ निजात्महोता प्राप्ती पावे ॥ १२ ॥
प्रत्यक्ष जे लक्षिती ॥ अनुभव अपरोक्षिचा निश्चिती ॥
तोचि जाणे स्वरतिति ॥ निजात्मगती अविनाश ॥ १३ ॥
वाचा पांच द्विधा असती ॥ अध ऊर्ध्व त्यांची गती ॥
ज्ञान क्रियारूप प्रकासिती ॥ द्वयप्रकार स्थिती जाण खरें ॥ १४ ॥
स्थाने भिन्नही तैसींची ॥ असती तनुप्रमाणेंची ॥
प्रणवीं मात्रांतरींचीं ॥ वेगळालींचि सर्वथावें ॥ १५ ॥
वाचेतीत परेपर ॥ ऐक्य जे ह्मणती साचार ॥
त्यातें पावणे निर्धार ॥ जें अगोचर मना वाचे ॥ १६ ॥
वाचा पांच तनुप्रती ॥ प्रमाण विवरावें निश्चिती ॥
हें कारण कां जाणती ॥ पुनरागती चुके तयां ॥ १७ ॥
वन्ही आणी सूर्य शशी ॥ सीतोष्णमय तेजोरासी ॥
त्यातीत दिव्यप्रभा विकासी ॥ पिंडब्रह्मांडासी प्रकाशकर ॥ १८ ॥

समरसें प्राप्त ॥ नभासी सरोनि सर्वगत ॥
सर्वी सर्व तपादी यज्ञांत ॥ येथ्या फळप्रात ध्यानाश्रयें ॥१९॥
ब्रह्मेंद्रादी ह्मणोनि यजिती ॥ सर्व विषयकामनें रमती ॥
दिव्य प्रकाशान्वयें परि नेणती ॥ व्यर्थ भुलती अज्ञानता ॥२०॥
शास्त्रमतें शोध घेतां ॥ लाभ न त्या वरुषें दशशता ॥
स्वप्रभा अनुभव तत्वता ॥ दुरिप्रापता दुरावे ते ॥२१॥
अल्पायुषी मनुष्य बापुडें ॥ येवढी सामर्थता कैची जोडे ॥
निजतनु शोधाविणें मोक्ष न घडे ॥ व्यर्थ कां वेडे शिणताती ॥२२॥
यालागीं सर्वशास्त्रात्मक ॥ अनुभव सारांश घ्यावा देख ॥
सर्वज्ञ जे निजस्वरूपप्रापक ॥ तिहीं निःष्कामीक विचरावें ॥ २३ ॥
जैसा कां तो राजहंस ॥ दुग्धांतील निवडी जलांश ॥
त्यजुनी नीर सावकाश ॥ पावे तृप्ततेस क्षीरपानें ॥ २४ ॥
वाचा पांचही जेथुनी ॥ विकसीति निजप्रभेंकरूनि ॥
तें पूर्णब्रह्म स्वयें जाणुनी ॥ निजात्मचिंतनीं असावें तें ॥२५ ॥
त्याची जे अपरोक्षता ॥ ते अनुभवें बोलेन तत्वता ॥
निश्चयेंकरूनि पाहतां ॥ परब्रह्म हाता येत असे ॥ २६ ॥
पिंडीं उतम ब्रह्मरंध्र बोलत ॥ विलसे निर्धार अग्रवत ॥
सद्गुरुकृपा जन्मार्जीत ॥ निज फळप्रात पावीजेतें ॥२७ ॥
हें वर्म ठावें जयासी ॥ तोचि अनुभवी ब्रह्मासी ॥
आपुला आपण निश्चयेसी ॥ जो का दुजें नसी येकलाची ॥ २८ ॥
द्वारें विषयात्मक नव ॥ त्याहूनि उर्ध्व जे का स्वयमेव ॥
तेथें ब्रह्मींचा अनुभव ॥ जो का अपूर्व न वर्णवे ॥ २९ ॥
तेथ स्वात्मप्रकाश नीट ॥ खुण दशमद्वार सभापीठ ॥
उतमा उतम श्रेष्ट ॥ भक्त वरिष्ट जाणताती ॥ ३० ॥
नेत्राविणें जे अंधमती ॥ तयां जगत्प्रकाशक गभस्ती ॥
लक्षा नयेचि निश्चिती ॥ अज्ञानमती अंधकळें ॥ ३१ ॥ (पु०चा०)

# सुभाषित.

त्रिलोकेश: शार्ङ्गी शबरशरलक्ष्यत्वमगम — ।
द्विधाता लोकानामलभत शिर:कृंतनविधिं ॥
प्रयातौ तौ राहोर्दिनकरशशांकौ कवलतां ।
प्रभुर्नग्न: शंभु: शिरसि लिखितं लंघयति क: ॥ ५४ ॥

"त्रैलोक्याचा स्वामी जो विष्णु त्याला य:कश्चित् भिल्लानें आपल्या बाणानें विद्ध केला. संपूर्ण लोकांचा उत्पन्न कर्ता जो ब्रह्मदेव त्यास शिर च्छेदाचें प्रायश्चित भोगावें लागलें, चंद्र आणि सूर्य यांना राहू मुखामध्यें पडण्याचा प्रसंग येतो, आणि प्रत्यक्ष शंकर जगाचे प्रभु असतां त्यांस दिगंबर वृत्तीनें राहवें लागतें, तस्मात् ब्रह्म लिखित कोणाच्यानेंहि टळत नाहीं".

एष वंध्यासुतो याति खपुष्प कृतशेखर: ॥
मृगतृष्णांभसि स्नात: शशशृंगधनुर्धर: ॥ ५५ ॥

"मृगजळामध्यें स्नान केलेला, आकाशाचे पुष्पांचीं भूषणें ज्यानें मस्तकावर धारण केलीं आहेत, आणि सशाचे शिंगाचें धनुष्य धारण करणारा असा हा वंध्यापुत्र चालला आहे" ही अघटितघटना होय. ह्मणजे यांतील प्रत्येक गोष्ट असंभवनीय व अघटित आहे.

वरं वनं वरं भैक्ष्यं वरं भारोपजीवनं ॥
पुंसां विवेकहीनानां सेवया न धनार्जनं ॥२६॥

"विवेकशून्य पुरुषांची सेवा करून संपत्ती मिळविण्या पेक्षां एखादे आरण्यांत राहणें, भिक्षा वृत्तीनें निर्वाह करणें, किंवा मोलमजुरी करून चरितार्थ चालवणेंही बरें."

अपि ललित सुगुणवेणिः ।
सालंकारापि या सुवर्णापि ॥
रघुतिलकविहीना चेत् ।
वाणी रमणीय नैव कल्याणी ॥ ५७ ॥

हा श्लोक द्व्यर्थ असून याचा एक अर्थ वाणीला व दुसरा रूपवती स्त्रियेस अनुलक्षून आहे—

"वाणी (गद्यपद्यात्मक भाषणपंक्ति) जरी आलंकारिक शब्दांनीं पूरित असली (स्त्रीपक्षीं) सुंदर वेणी घातलेली असली, (वाणीपक्षीं) त्यामध्यें अनेक श्लेषार्थ असले (स्त्रीपक्षीं) ती अलंकारांनी भूषित असली, (वाणीपक्षीं) त्यांतील वर्णरचना फार सरस असली (स्त्रीपक्षीं) ती वर्णानें गौर असली, तथापि ती (वाणीपक्षीं) रघुवंश श्रेष्ठ जो रामचंद्र त्याचे नाम गुणाविरहित असेल (स्त्रीपक्षीं— र आणि ल यांचे सावर्ण्यानें) कुंकुम तिलक रहित ह्मणजे विधवा असेल, तर ती कल्याण दायक होत नाहीं."

असारे खलु संसारे सारमेतच्चतुष्टयं ॥
काश्यां वासः सतां संगो गंगांभः शंभुसेवनं ॥ ५८ ॥

"या निःसार संसारांत, काशिक्षेत्रामध्यें वास, संतांची संगती, गंगोदकाचें स्नान पानादि, आणि शंकराची सेवा, या चारगोष्टीच खरोखर श्रेयस्कर होत."

स्वयमप्रात दुःखोयः स दुनोती न विस्मयः ॥
त्वं स्मर प्रातदाहोपि दहसीति किमुच्यते ॥ ५९ ॥

"ज्याला स्वतः कोणतेंहि दुःख माहित नाहीं, तो दुसऱ्यास संताप देतो यांत फारसें आश्चर्य नाहीं. परंतु हे मदना, तूं स्वतः अग्नीनें पोळून निघालेला असूनाहि दुसऱ्यास जाळतोस तेव्हां तुला काय ह्मणावें!"

यत्पादाः शिरसा न केन विधृताः पृथ्वीभृतां मध्यतः ।
तस्मिन् भास्वति राहुणा कवलिते लोकत्रयी चक्षुषि ॥
खद्योतैः स्फुरितं तमोभिरुदितं ताराभिरुज्जृंभितं ॥
घूकैरुत्थितमाः किमत्र करवै किं किं न कैश्चेष्टितं ॥६०॥

"ज्याचे किरण मोठच्या सार्वभौम राजांनीं किंवा मोठच्या पर्वतांनीं आपल्या मस्तकीं धारण केले, असा त्रैलोक्यास प्रकाश देणारा जो सूर्य तो राहुग्रस्त झाला असतां काजवे चमकूं लागतात, अंधकार पुढें सरसावतो, नक्षत्रें प्रकाशमान होतात, आणि दिवाभीतें हिंडूं लागतात, यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं," ही अन्योक्ति आहे.

जीर्णोपि क्रमहीनोपि कृशोपि यदि केसरी ॥
तथापि यूथनाथस्य शंका तंक्राय कल्पते ॥६१॥

"सिंह वृद्ध झाला, बलहीन झाला, व अगदीं कृश झाला तथापि तो मदोन्मत्त गजाच्या गंडस्थळाचें विदारण करण्याची इच्छा करितो."

गंधेनाढ्या भुवनविदिता केतकी स्वर्णवर्णा ।
पुष्पभ्रांत्या क्षुधित मधुपः पुष्पमध्ये पपात ॥
अंधीभूतस्तदनुरजसा कण्टकैः छिन्नपक्षः ।
स्थातुं गंतुं क्षणमपि सखे नैव शक्तो द्विरेफः ॥६२॥

"केतकी पुष्पाचे जगप्रसिद्ध सुगंधास व सुंदर वर्णास भुलून हें प्रफुल्लित पुष्प आहे अशा भ्रांतीनें भ्रमर क्षुधार्त होऊन त्याजवर बसला. पण त्याचे योगानें त्या केतकींतील रजःकण त्याचे डोळयांत जाऊन अंध झाला व त्याचे कांट्यानें त्याचे पंखहि फाटून गेले यामुळें त्यास तेथें बसतांहि येईना व उडून जातांहि येईना अशा संकटांत तो पडला." ही अन्योक्ति होय.

किं खलु रत्नैरेतैः किं खलु रत्नायितेन वपुषा ते॥
सलिलमपि यन्नतावकमर्णव वदनं प्रयाति तृषितानां॥६३॥

" हे सागरा, तृषित झालेले मनुष्याचे तोंडांत घालण्यास तुझें उदकाचा एक थेंबहि उपयोगी पडत नाहीं, मग तुझ्या जवळ पुष्कळ रत्नें असलीं किंवा तुझें सगळें शरीर रत्नमय असलें ह्मणून त्याचा उपयोग काय?"

नीराग्निमर्लतो जनिर्मधुरता रामामुखस्पर्धिनी।
वासो यस्य हरेः करे परिमलो गीर्वाणचेतो हरः॥
सर्वस्वं तदहो महाकविगिरां कामस्य चांभोसह।
त्वं चेत् प्रीतिमुरीकरोषि मधुपे किं त्वांप्रति ब्रूमहे॥६४॥

" हे कमला, स्वच्छ उदकामध्यें तुझें जनन आहे, सुंदर स्त्रियांच्या मुखास लाजविणारें असें तुझें सौंदर्य आहे, विष्णूच्या हस्ताचे ठायीं तुझें वास्तव्य आहे.देवांचे चित्ताचें हरण करणारा असा तुझ्या ठायीं सुगंध आहे, असें असून तूं त्या यःकश्चित् भ्रमरावर प्रीती करतेस तेव्हां तुला काय ह्मणावें? "

संत्येव गिलिताकाशा महीयांसो महीरुहः॥
तथापि जनचित्तानाऽऽनंदनश्चंदनद्रुमः॥ ६५॥

" गगनचुंबित असे पृथ्वीवर अनेक वृक्ष आहेत, तथापि त्या सर्वांमध्यें लोकांचे चित्ताला अनंद देणारा असा एक चंदन वृक्षच होय. "

लक्ष्मीर्वसति जिव्हाग्रे जिव्हाग्रे मित्रबांधवाः॥
जिव्हाग्रे बंधनें प्राप्तं जिव्हाग्रे मरणं ध्रुवं॥६६॥

"जिभेच्या अग्राचे ठायीं लक्ष्मी राहते, मित्र बांधवहि तेथेंच असतात, बंधन प्राप्त होण्याचें साधनहि तेथेंच आहे, आणि मरणहि त्या ठिकाणीच असतें, ह्मणजे या सर्व गोष्टी जिभे पासून (शब्दापासून) होतात."

रा॰रा॰ सिवराम राजाराम कोमटी तळोधी .... .... १८६

रा॰रा॰ माधवराव केशव कोठारी इंदूर .... .... .... १८६

रा॰रा॰ विष्णु अपाजी फौजदार सावळी .... .... १८३

( श्रीपत सखाराम यांचे मार्फत. )

रा॰रा॰ बळवंत केशव कोटस्थाने पुणे .... .... १८६

रा॰रा॰ गोविंद केशव शेंदुर्णीकर अकोला .... १८६

(सदाशिव सखाराम महाजन यांचे मार्फत.)

रा॰रा॰ सिवराम एशवंत पोतनीस मुरूड .... .... १८६

रा॰रा॰ केशव वामन जोशी मुरूड.... .... .... १८६

रा॰रा॰ गणपतराव रामचंद्र मुरूड .... .... .... १

रा॰रा॰ रामचंद्र तानाजी नांदगांवकर मुरूड.... .... १

( रामचंद्र नारायण फडणीस यांचे मार्फत )

रा॰रा॰ गणेश हरी आपटे धुळें .... .... ....१८६

रा॰रा॰ गोविंदराव कृष्णराव धारवाडकर विंचूर .... १८६

श्री.रा॰रा॰ आण्णा साहेब विंचूरकर सं. विंचूर.... .... १८६

रा॰रा॰ बळवंत त्रिंबक टकले धुळें .... .... १८६

रा॰रा॰ वामन नारायण वकील धुळें .... .... १८६

रा॰रा॰ रामचंद्र भिकाजी वाखरकर धुळें .... .... १८६

रा॰रा॰ माधवराव गोविंद रानडे धुळें .... १८६

रा॰रा॰ शामलाल रामलाल वकील धुळे .... .... १८६

रा॰रा॰ संगापा रायापा लिंगाईत धुळें .... .... १८६

रा॰रा॰ गोविंद गणेश सहस्रबुधे धुळें .... ....१८६

रा॰रा॰ नारायण हरि मोकाशी धुळें .... १८६

रा॰सा॰ नथु बापुजी इन्स्पेक्टर पो. धुळें.... .... १८६

रा॰रा॰ केशवलाल हिरालाल धुळें .... .... १८६

रा॰रा॰ लक्ष्मण शामराव क्लार्क धुळें .... .... .... १८६

रा॰रा॰एशवंतराव बाळकृष्ण देशमुख धुळें .... .... १८६

रा॰रा॰ बाळाजी दामोदर सावदेकर धुळें.... .... १८६

रा॰रा॰सिताराम आत्माराम वकील धुळें .... .... १८६

रा॰रा॰शंकर कृष्ण चिटणीस धुळें .... .... १८६

रा॰रा॰ डि. बी. केमकर स्टोरकीपर धुळें .... .... १८६

रा०रा० गोपाळ बाबाजी ढोरपाटक धुळें .... .... १८६

रा०रा० महादेव बाळकृष्ण वैद्य धुळें .... .... १८६

रा०रा० त्रिंबक परशराम रानडे धुळें .... .... .... १८६

रा०रा० मार्तंड लक्ष्मण नागर धुळें .... .... १ ६

(वामन सखाराम महाजन यांचे मार्फत)

रा० रा० आत्माराम तुकाजी सोलापूरकर बडदें .... .... १८६

रा०रा० विष्णु दिनकर कानिटकर पंढरपूर .... .... १८६

रा० नारायण करंदीकर पंढरपूर .... .... १८६ [। किंवा]

रा०रा० बाळकृष्ण सोहनी पंढरपूर .... .... १८६

रा०रा० पांडुरंगराव बिन रामचंद्रराव अकोलें .... .... १८६

रा०रा० नारायण विश्वनाथ भट सांगोलें .... .... १८६

रा०रा० गोविंद गणेश रास्ते वेळापूर .... .... .... १८६

रा०रा० नारायण अनंत सरजन पंढरपूर .... .... .... १८६

रा०रा० जमनादास प्रेमचंद नानावटी वेळापूर .... .... १८६

( प्रभाकर गणेश मातखंडे यांचे मार्फत. )

रा०रा० रंगो रावजी पानसे वांई .... .... .... १८६

रा०रा० लक्ष्मण धोंडदेव कातरे वांई .... .... १८६

रा०रा० विष्णु महादेव पाटणकर वांई.... .... .... १८३

रा०रा० बाळाजी रामचंद्र महाबळेश्वरकर सरिवळ.... .... १८६

रा०रा० काशिनाथ केशव दिवेकर भोर.... .... ....१८३

रा०रा० वासुदेव सदाशिव वर्वे भोर .... .... .... १८३

रा०रा० बाळाजी बहिरव निमकर भोर .... .... ....१८६

रा०रा० रामराव त्रिंबक बापसे भोर.... .... .... १८६

रा०रा० बाळकृष्ण भास्कर गोखले सातारा .... .... १८६

श्री०रा०रा० पंत सचिव संस्थान भोर .... .... १८६

रा०रा० नारायण विनायक जोशी भोर.... .... .... १८३

रा०रा० कृष्णाजी मोरेश्वर वकील भोर .... .... १८६

श्री०रा०रा० कृष्णराव माधवराव नेरकर भोर .... .... १८६

रा०रा० माधवराव भगवंत प्रभुवेकर खंडाळें बावडें .... .... १८६

रा०रा० सखाराम गोपाळ वकील भोर.... .... .... १८६

(राहिलेला वसूल पुढील अंकांत घेण्यांत येईल.)

वर्ष आगाऊ किंमत वर्षाची १ रुपया दुसरें

सत्य शांति सौख्य

# सद्धर्मदीप

मार्गशीर्ष पौष शके १८०१

अंक ५—६

मार्गें मार्गें निर्मलं साधुवृंदं । वृंदे वृंदे तत्वचिंतानुवादः ॥
वादे वादे जायते तत्वबोधो । बोधे बोधे सच्चिदानंदभासः ॥



मल्लीबाग
'संपादन' छापखान्यांत छापिलें

आगाऊ किंमत पुढचा अंक येवढ्यापासून एक महिन्याचे आंत दिली पाहिजे.

पुस्तकाचे पुढील किंमतीचे प्रत्येक अंकास मास आखेर येईल

एकेक अंकाची किंमत चार आणे

# विषयाची अनुक्रमणिका

अंक ७


१ भोगवत्रिहाम — १२९
२ आहित, स्वदेशहित, आणि सार्वजनिकहित — १४२
३ आख्यायिका — १५३
४ सुभाषित — १५७


---

अंक ८


१ ज्ञानाधीन कामांभिमान — १६१
२ स्वात्मानंद ( कविता ) — १७०
३ परमार्थ बोधक जुनी कविता .. .. .. .. .. .. .. १८५
४ सुभाषित : .. .. .. .. .. .. .. .. .. .. १८९


---

## वसूल.

( आषाढ शके १८०२ अखेर )

| | |
|---|---|
| रा० रा० बळाराम दादाजी पराजपे दापोली .... .... .... | १८९ |
| रा० रा० नारायण सखाराम अ. मा. दापोली .... .... | १८३ |
| रा० रा० कृष्णाजी सदाशिव तांबे मेहकर .... .... .... | १८९ |
| रा० रा० बापजी गणेश मोरगांवकर मेहकर .... .... .... | १८९ |
| रा० रा० नारायण माहादेव बोरजकर अ, जगांव .... .... | १८९ |
| रा० रा० पांडुरंग आपाजी इंग्रजी कारकून वेंगुर्ले .... .... | १८९ |
| रा० रा० अनंतराव खंडेराव बडोदा .... .... .... .... | १ |
| रा० रा० वासुदेवराव लक्ष्मण वेवळेकर बडोदा .... .... | १ |
| रा० रा० केशव नारायण कारकून रत्नागिरी .... .... | ३ |
| रा० रा० रामचंद्र हरी अभ्यंकर पुसद .... .... .... | १८९ |
| रा० रा० नारायण गणेश मंडलीक पेण .... .... .... | १८९ |
| रा० रा० बापजी जगन्नाथ वैद्य उमगांव .... .... .... | १८९ |
| रा० रा० विष्णु गोपाळ वकील कोर्ट शिरोळ .... .... .... | १८९ |
| रा० रा० रमाजीराव महाडीक नागपूर .... .... .... | १८९ |
| रा० रा० कृष्णराव व्यंकटेश वकील बेळगांव .... .... .... | १८९ |
| रा० रा० हरी पांडुरंग मुंजे नागपूर .... .... .... | १८९ |

# सद्धर्मदीप.

अंक १

## भोगपरिज्ञान.

परिज्ञायोपभुक्तो हि भोगो भवति तुष्टये ॥
विज्ञायसेवितश्चोरो मैत्रीमेति न चोरतां ॥

मनुष्य जन्मादारभ्य अनेक यत्न करून नानातऱ्हेचे उपभोग घेऊं इच्छि तो व ती इच्छा प्रारब्धानुसार सर्वथैव किंवा अंशत सिद्धीसहि जाते. जेव्हां एखाद्या भोग्य वस्तूची त्यास प्राप्ति होते तेव्हां त्यास किंचीत आनंद हो तो, परंतु तो जेव्हां त्याचा यत्न निष्फळ होतो किंवा प्राप्त भोगांमध्यें कां हीं उणीव पडते तेव्हां तो दुःख करितो. या भोगास कांहीं परिमित नां हीं. भोग हे अनेक जातीचे, अनेक रूपाचे आणि अनेक तऱ्हेचे असता त, आणि त्यांचा उपभोगहि मनुष्य अनेक द्वारानें करून घेतो, कांहीं भो ग तो शरीरद्वारा उपभोगितो, कांहीं दृष्टि द्वारानें, कांही कर्णद्वारा, आ णि कांहीं केवळ मनाचे साक्षित्वानें तो भोगितो. ऐहिक सर्व भोग हे नश्व र असल्या मुळें त्या पासून मनुष्यास क्षणोक्षणी सुख दुःखाचा भास हो तो. मृगजळापासून जशी तृषिताची तृषा शांत होत नाहीं, चित्रांतिल त रुणीच्या दृग्विलासानें जशी कामी मनुष्याची पिडा दूर होत नाहीं, प्रपंच, मध्यें गढून गलेले अज्ञानी जीवाला जसा ब्रह्मानंदाचा अनुभव घडत नाहीं आणि पाखंड्याला जसा वेदांत विचारा पासून आनंद होत नाहीं, तद्वत या भोग्य वस्तूंच्या सत्यासत्यतेविषयीं जो अज्ञानी आहे त्याला सुखानुभव घडत नाहीं. अज्ञानाचे योगानें तो नेहमी ऐहिक भोग्यवस्तूंचे उपभोगानें दुःखितच दिसतो. त्यास सुखसंपादनाचे खरोखर मार्ग माहित नसतात. केवळ ऐहिक सुखदुःखाचे भासांत जीवानें फेऱ्या घालाव्या हेंच कायतें परब्रह्म

असें अज्ञानी मनुष्य समजतो. त्याचीं सर्व मतें व विचार पाखंडी असतात. त्याला ईश्वरा विषयीं विचार होत नाहीं. तंटेबखेडे करून आणि अनेक पाखंडी मतें उभारून तो ऐहिक उपभोग घेण्या विषयीं उतावळा होतो. एका कवीनें ह्मटलें आहे.—

जीव तेचि देव भोजन ते भक्ति ॥ मरणते मुक्ती पाखंड्याची
पिंडाच्या पोषणीं नागवले जन ॥ लटिकें पुराण केले वेद
मना आला तैसा करिती विचार ॥ ह्मणती संसार नाहीं पुन्हा
आपुले मनींचें करूनी पाखंड ॥ जना मध्यें भांड पोट भरी

तेव्हां एकदा असें पाखंड स्वीकारून मनुष्य या ऐहीक सुख संपादनाचे नादीं लागला व वस्तुमात्राचे लोभाला गुंतून 'माझें आणि मला' या षडाक्षरी मंत्राच्या जपाला तो लागला ह्मणजे त्याचें ज्ञान कुंठित होतें. धनधान्यादिक संपादन करणें व त्याची उमृद्धी असणें हेंच काय तें सुखाचें भांडार अशा समजुतीनें तो अनेक यत्न करूं लागतो. अशा यत्नानें त्यास जरी अनेक संकटें भोगावीं लागलीं व अनेक अडचणी आल्या तथापि पुढें सुख आहे अशा आशेवर तो ते सर्व भार वाहात असतो. पण त्याच्या सुख प्राप्तीला मर्यादा किंवा मुदत नसते, या मुळें अशा भार वाहण्यामें अनेक जन्म फेरे घातले तथापि त्याची सुटका होऊन त्यास सुखानुभव घडत नाहीं. त्याच्या डोकीवरील हा प्रपंच भार कोठपर्यंत नेऊन पोंचवावयाचा आहे याची त्यास अटकळ नसते. ती अटकळ समजण्याला आत्मज्ञान पाहिजे. ज्याला ती अटकळ समजते त्यास तो भार दुःसह न वाटून त्याची उमेदहि खचत नाहीं पण ज्याला तो पल्ला माहित नसतो त्याची स्थिती वेठीस धरलेले बिगाऱ्या प्रमाणें होते. वेठीला धरलेला बिगारी आपल्या डोकीवरील बोज्या कोठपर्यंत न्यावा लागेल या विषयी गैर माहित असल्या मुळें जसा दगदगून व त्रासून जातो तसा ठरीव हेलकरी त्रासत नाहीं. दोघांचे डोकीवरील बोजा जरी सारख्याच वजनाचा असला किंवा वेठीला धरलेले मनुष्या पेक्षां ठरीव बि

गारी जस्त बोजानें लादला असला तथापि तो उमेदींत व आनंदांत अ सतो. कारण, त्यास पक्कें माहित असतें कीं, एकदा ठरलेले जागेवर आ पण जाऊन पोंचलों ह्मणजे आपास विश्रांति मिळेल, व आपल्या परि श्रमाचा आपल्यास योग्य मोबदलाहि घेण्यास सांपडेल. ही आशा वे ठीचे बिगाऱ्याला नसते. ही गोष्ट मनुष्या विषयीं व साधारण कामगि रीचे संबंधांत झाली. पश्वादिकांतहि याचा अनुभव दृष्टीस पडतो. गा-डीला जोडलेले बैल यजमानाचे घरून गाडी घेऊन निघाले ह्मणजे ओळखिचे ठिकाणा पर्यंत मोठ्या हौशीनें व उमेदीनें चालत जातात पण तेंच ओळखीचें ठिकाण चुकून त्यांस अपरिचित रस्त्यानें जर १० कदम पुढें न्यावयाचें असलें तर ते अडतात व नाखुष होतात. या चें कारण ज्ञान आणि अज्ञान. मनुष्यास कामाची अटकळ कळली ह्मण जे तो मोठ्या उमेदीनें तें केव्हांच फटकारून टाकतो. पण त्याचे अ धंता विषयीं तो गैरहित असला ह्मणजे त्यास घाण्याचे बैला प्रमाणें सर्व दिवसभर काबाड कष्ट करावे लागतात. आणि अशा कष्टापासून त्यास यत्किंचितही सुख होत नाहीं. सारांश व्यवहारांत मनुष्यास जशी त्या च्या कामाची त्याला अटकळ असली ह्मणजे तें करण्यांत त्याला दुःख वाटत नाहीं. व कांहीं वेळानें तो आपलें काम उरकून मोकळा होतो, तद्व त जो ज्ञानी आहे तो या विषयांची योग्यता जाणून त्यांचा उपभोग घे तो. यामुळें ते त्यास दुःखपरिणामी होत नाहींत. आतां याजवरून को णास अशी शंका येईल कीं, विषयादिक दुःखमूलक असल्यामुळें भो क्ता कोणत्याहि योग्यतेचा असला तथापि त्या विषयांचा परिणाम सार खाचा व्हावयाचा. असें असतां त्या पासून अज्ञान्यास दुःख आणि ज्ञात्यास सुख कसें होईल? ज्ञानी व अज्ञानी यांनीं हातांत अग्नी घेतला ह्मणजे तो अग्नी उभयतांचेहि हात पोळील, जलाशय उभयतांसहि बुडवील, शस्त्र उभयतांचाहि छेद करील, आणि सोमलादि विषारी पदार्थ हे ज्ञात्यानें किंवा अज्ञानी मनुष्यानें सेवन केले असतां ते उभयतां

चेहि प्राणांचे हरण करतील, तद्वत विषयादिक भोगांचे नादीं लागल्यानें ज्ञानी व अज्ञानी हे सारखेंच दुःख भोगतील असें सकृद्दर्शनीं वाटतें. पण पूर्वोक्त शस्त्रादिकांची क्रिया ज्ञानी व अज्ञानी या उभयतांचे संबंधांत भिन्न दिसते. अग्नी व जल यांची योग्यता जाणल्यानें मनुष्यानें त्यांची सम्यक् योजना करून त्यापासून आपणास अनेक तऱ्हेचे फायदे करून घेतले आहेत हें अलीकडे आगगाड्या व आगबोटीं वरून लोकांस अनुभूत आहे. तसेंच सोमलादी विषारी पदार्थ जे मनुष्यास अपकार करून त्याच्या प्राणाचीहि हानी करण्यास समर्थ आहेत, त्यांस ज्ञात्या पुरुषानें त्यांची योग्यता जाणून अशा तऱ्हेनें आपले ताबेंत ठेविले आहेत कीं, त्यांची अपाय कारक स्थिती नष्ट होऊन उलट ते अनेक भयंकर रोगांवर गुणावह झाले आहेत. तेव्हां हा परिणाम कसला? पदार्थांची योग्यता जाणण्याचा ह्मणजे ज्ञानाचा हें कबूल करणें भाग आहे, कारण ज्ञानी लोकांत वरील वस्तूंचे उपभोग नाहींत. तेव्हां ज्ञानानें मनुष्य जर पदार्थांचे गुणदोष असे बदलण्यास समर्थ आहे तर ऐहिक उपभोगांस तो अशा खुबीन आणि धूर्ततेनें वागवील कीं, त्यांपासून त्यास दुःख न होतां सुखोत्पत्तीच होईल.

अनेक प्रयत्न केले असतांहि ज्यांत सुखानुभव घडत नाहीं, अशा या प्रपंचाचे नादीं लागून मायामोहांत गुंतण्या पेक्षां हा दुःखमय व क्षणिक प्रपंच सोडून द्यावा असें मनांत येतें, पण तें घडणें दुर्घट आहे याचें कारण हे विषयादिक मनुष्यास प्रारब्धानुसार भोगावेच लागतात, मग तो मनुष्य ज्ञानी असो किंवा अज्ञानी असो. विषयांविषयीं अंतःकरणास खरोखर तिरस्कार उत्पन्न होण्यास फार जबरदस्त पुण्याई पाहिजे. आतां प्रारब्धानुसार भोग भोगावे लागतात. याजवरून कोणास असें वाटेल कीं जर विषयभोगाविषयीं इच्छा धरली तर दुःख हें भोगलेंच पाहिजे तर विषयभोगेच्छाच नसावी हें बरें, पण असें ह्मणणें हें अज्ञान आहे. राजाला जगांत अनेक शत्रु असतात, ते वारंवार त्याजवर हल्ला करून

त्यास पदच्युत करूं पहातात, तेव्हां राजा होणेंच गैर आहे असें कोणी म्ह णेल काय? कधींही म्हणणार नाहीं. तर राजा होण्याविषयीं मनुष्यानें उमेद धरून राज्यसंपादन करावें आणि शत्रूपासून अपाय होऊं नये म्हणून अनेक शस्त्रास्त्रें आपले संग्रहीं ठेवून त्याचे योगानें आपल्या शत्रूंचा ना श करावा. त्याचप्रमाणें परमेश्वरानें या जगामध्यें ज्या नानाविध वस्तु निर्माण केल्या आहेत त्या जरी क्षणिक व भ्रांतिमुलक आहेत, तथापि मनु ष्यांनीं त्याचा उपभोग घेऊं नये असाच इश्वरी संकेत आहे असें मानणें हा न्याय होणार नाहीं. गारोडी जादूचे बळानें अनेक पदार्थ उत्पन्न करतो. 'फुकमारूं मट्टी लगाऊं' असें म्हणून तो शेंकडो पदार्थ उत्पन्न करितो व नाहींसे करतो. आतां आपण ती सगळी जादू आहे असें जा णतों, त्याणें उत्पन्न केलेले पदार्थ पहातों, हातांत घेतों, व खातों. जरी आपण त्या पदार्थांचा असा अनुभव घेत असतों, तथापि तें सर्व खोटें आहे असा आपले मनाचा पक्का निश्चय असतो. आतां ज्यादुचा तमाशा हा खोटा आहे म्हणून तो करूं नये व पाहूं नये असें म्हणतां येईल काय? तसेंच तो खोटा असल्या मुळें तो करणारास व पाहाणारास आपण मूर्ख म्हणतों काय? हा प्रकार मुळींच नाहीं. उलट अशा जादुकाराची प्रशंसा होते व तो पहाण्यांत प्रेक्षकांला आनंद होतो. याचप्रमाणें हा प्रपंच मिथ्या आहे असें वाटलें म्हणून त्याज विषयीं अनासक्ति उत्पन्न होणार नाहीं. तो मिथ्या आहे असें समजुन त्यांत असणारे ज्ञाते सुख व आनंद पावतात आणि अज्ञानी लो कांस त्याचें मिथ्यात्वें न कळून ते फशी पडतात. या गोष्टी विषयीं विशेष खात्रीहोण्यास आमच्या मतें मयसभेचें उदाहरण बस आहे. या मयसभेची हकीकत सर्वांस माहित असेलच. या सभामंडपांत कारागिरानें आपल्या चातुर्याची सीमा केली होती. त्यांत त्याणें एक विलक्षण प्रकार केला होता. जमीनीवर घोटीव पाषाण बसवून असा चमत्कारिक देखावा केला होता कीं तो एक जलाशय आहे असा भास होत असे, नुसता भास नव्हे, पण

तेथें पाणीच आहे असें निःसंशय वाटे. त्याच प्रमाणें कांहीं ठिकाणीं जमीनींत पाण्याचा सांठा करून ठेविला होता तेथें ती जमीन आहे असें वाटे. व्यासादिक माहितगार व ज्ञानी लोक जेव्हां त्या सभा मंडपांतून जाऊं लागले तेव्हां ते नीटपणें गेले. पण दुर्योधन व त्याचे संगती जेव्हां तेथून जाऊं लागले तेव्हां तेथें दिसण्यांत पाण्याप्रमाणें केलेले जमीनीस तें पाणीच आहे अशा बुद्धीनें ते आपलीं वस्त्रादिक सावरूं लागले व त्या जमीनीवर पाय टाकतात तों तें पाणी नसून जमीनच आहे असा अनुभव आला व आजूबाजूचे लोक हांसले तेव्हां त्यांस मोठी शरम आली पुढें तेव्हां खरोखर पाण्याचा भाग आला तेव्हां पाण्यासारखी दिसणारी ती जमीनच असेल अशा समजुतीनें वस्त्रें वगैरे न सांवरतां सहज रीतीनें तेथे पाय टाकतांच अडखळून पडले व कपडेलत्ते भिजून जाऊन फजित पावले. आतां याचें कारण काय, केवळ, अज्ञान, असें नाहीं कोण ह्मणेल? प्रपंच ही ईश्वर नियमित सभा आहे, यांत अनेक सुख दुःखाचीं व सोयीचीं आणि अडचणीचीं स्थळे आहेत. जो ज्ञाता आहे तो तीं स्थळें जाणतो. आणि त्या त्या स्थळीं योग्य रीतीनें वागून पार पडतो पण जो अज्ञानी आहे, तो त्यांतील सुख दुःखा विषयीं गैरमाहित असल्यामुळें ज्यापासून सुख होण्यासारखें असेल तें ठिकाण दुःखमूल आहे असें समजून त्याच्या त्यागानें दुःख पावतो व ज्यापासून खरोखर दुःखच होणार अशा वस्तूचे ठिकाणीं सुखाचा भास जाणून त्याचा स्वीकार करतो, अर्थात त्यामुळेंहि तो दुःखच पावतो. तेव्हां ज्ञानी आणि अज्ञानी यांजमध्यें असा भेद आहे. आणखी ही एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, पूर्वोक्त मय सभेंत सर्व लोक गेले नसतील व त्यांना जाण्याचें हि कारण पडलें नसेल; पण या ईश्वरनियमित प्रपंचरूपी मयसभेचा प्रकार तसा नाहीं. मनुष्यमात्रास या प्रपंचांत आलेंच पाहिजे. आणि त्यांतील ठिकाणे व देखावे पहाण्यासाठीं प्रारब्धानुसार हिंडलें पाहिजे.

आतां प्रारब्धानुसार ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं, कांहीं गोष्टी

खरोखर घातक व दुःखमूलक आहेत. व त्या करणें हा अगदीं वेडेपणा आहे असें मनुष्य जाणीत असतांहि तें करण्यास प्रवृत्त होतो व शेवटीं तें करून पस्ताव्यांत पडतो, तेव्हां याला प्रारब्ध न ह्मणावें काय? हें प्रारब्ध तीन प्रकारचें आहे:—

इच्छाप्रारब्ध, अनिच्छाप्रारब्ध, आणि परेच्छा प्रारब्ध,असे प्रारब्धाचे तीन प्रकार आहेत. एखादें कृत्य घातक व दुःखमूलक आहे असें मनुष्य जाणीत असतां, व तशा प्रकारचीं कृत्यें ज्यांचे हातून झालीं ते पुरुष व्यसनांतच पडले असीं उदाहरणें डोळया देखत घडत असतां हि मनुष्य इच्छा बलानें तें कार्य करण्यास प्रवृत्त होतो तेव्हां त्यास इच्छा प्रारब्ध असें ह्मणतात. कुपथ्य करणारा रोगी, चोर, आणि राजपत्नीचा जार, हे आपण जें कृत्य करतों त्या पासून आपला नाश होईल असें जाणीत असतांहि इच्छा प्रारब्धाचे योगानें तें कृत्य करण्यास प्रवृत्त होतात. स्वभावतःच स्वप्रारब्धानें बद्ध झालेला पुरुष जें कृत्य करावयास इच्छित नसतो, व जें करण्यांत महत्पाप आहे असें जाणून लोकांसहि उपदेश करतो, असा पुरुष रजतमादि गुणांपासून उत्पन्न झालेले जे काम क्रोधादिक त्यांच्या प्राबल्यानें अविवेकी व पराधीन होत्साता इच्छा नसतांहि एखादें कृत्य करण्यास प्रवृत्त होतो तेव्हां त्यास अनिच्छा प्रारब्ध असें ह्मणतात. इच्छा करून अथवा इच्छा न करतां प्राप्त झालेल्या दुःखाप्रत भोगीत नाहीं, तर केवळ दुसऱ्याच्या इच्छेनें बद्ध होऊन त्याप्रीत्यर्थच दुःख भोगण्यास प्रवृत्त होतो,अशा प्रसंगास परेच्छा प्रारब्ध असें ह्मणतात. तेव्हां असें हें तीन प्रकारचें प्रारब्ध आहे. या प्रारब्ध रज्जूनें सर्व लोक बांधले गेले आहेत. आतां याजवर कदाचित् अशी शंका येईल कीं, ज्ञानी आणि अज्ञानी यांज मध्यें वर जें महदंतर सांगितलें त्यास या प्रारब्ध बलतरपणाचे योगानें विरोध येतो. कारण, प्रारब्धानुसार सुकृत दुष्कृतें करण्यास किंवा सुखदुःख भोगण्यास जर सर्व जीव सारखेच पात्र आहेत तर मग आज्ञान्यापेक्षां ज्ञाप्याकडे श्रेष्ठत्व कां असावें? ज्ञानी

जर अज्ञान्यापेक्षां श्रेष्ठ आहे, तर त्याणें निग्रह करून आपल्या ज्ञानश स्त्रानें प्रारब्धरज्जूचा छेद करून टाकावा असें मनांत येतें, परंतु ही भ्रांती आहे. कारण संपूर्ण भूतें हीं प्रारब्धानुरोधानें वागणारीं अ सल्यामुळें आणि प्रारब्ध हें ईश्वर नियमितच असल्यामुळें त्याचा परि हार करण्यास मनुष्य असमर्थ आहे. नळ, धर्मराजा, आणि रामचंद्र हे महान पराक्रमी आणि ज्ञानी असतांहि अवश्य भाविनेचा प्रतिकार करण्यास समर्थ झाले नाहींत.

आतां यावरून असें मात्र कोणी समजूं नये, किं ज्ञानी आणि अज्ञानी हे प्रारब्धाचा परिहार करण्यास सारखेच असमर्थ आहेत, तर मग ज्ञान संपादन करण्याच्या भानगडींत विनाकारण कां पडावें? अशा प्रकारची समजूत ही वेडेपणाची आहे. कारण, ज्ञानी आणि अज्ञानी यांचे मागें जरी प्रारब्धाचा फेरा सारखाच आहे,तथापि ज्ञानी हा सारासार विचारानें वागत असल्यामुळें 'मी कर्म कर्ता मी भोक्ता' इत्यादि दुःखास अधिष्ठान रूपी जो अहंपणा त्याच्या त्यागानें प्रारब्धजन्य व्यसनास भोगीत नाहीं. तसेंच इच्छानिच्छादि प्रारब्धाचे योगानें तो जरी एखाद्या अयुक्त कर्मास प्रवृत्त झाला अथवा व्यसनांत सांपडला तथापि विवेक शक्ती मुळें त्याचे हातून निंद्य कर्म होत नाहीं. अर्थात् तज्जन्य दुःखातेंहि तो पावत नाहीं. नल, धर्मराजादि,हे व्यसनांत सांपडले असतांहि ते अपल्या सत्वा पासून भ्रष्ट झाले नाहींत. प्रकृत प्रसंगास अनुकूल अशी एक गोष्ट आह्मी ऐकलेली स्मरत—एक चांगला विद्वान ब्राह्मण एका श्रीमंताचे घरीं उतरण्यास गेला असतां त्या श्रीमान भल्या गृहस्थानें या विद्वानाची चांगली उठवस करून त्यास आपले येथें आठचार दिवस रा- हवून घेतलें. ब्राह्मण चांगला ज्ञाता व विचारी होता, परंतु प्रारब्ध योगानें त्या श्रीमंताचे घरची संपत्ती पाहून त्याचे चित्ताला मोह उत्पन्न झाला, व या पैकीं कांहीं संपत्ती यजमानास न कळत रात्रीं पसार कर ण्याचा वरील विद्वान गृहस्थांनीं निश्चय केला. पुढें रात्रीं घरांतील सर्व

मनुष्यें निजून जिकडे तिकडे सामसूम झाल्यावर या राजश्रीनीं घरांतील पेट्या बिट्या ढांढूळण्याची सुरवात केली. हा ब्राह्मण त्या श्रीमंताचे घरीं आठचार दिवस घरच्या सारखा राहिला होता त्यामुळें त्यास घरां लि बहुतेक माहिती होऊन वरील प्रसंगीं तो घरभेद्या चोर बनला असो जेव्हां त्याच्या हातांत सोन्या रुप्याचे एक एक दागिनें येऊं लागले तेव्हां त्यास हर्ष वाटला. परंतु पुनः त्यास असें वाटे कीं, आपण जें कृत्य करी त आहों तें निंद्य असून सुवर्ण चोरल्या पासून अमक पातक लागतें असा शास्त्रार्थ त्याच्या पुढें मूर्तिमंत उभा राहिला. पुढें रुपें, तांबें, पितळ, हिरे, माणकें, वगैरे सर्व वस्तु विषयीं त्यास पातकाचाच आधार दिसूं लागला. मिळून "वेधा द्वेधा भ्रमं चक्रे कांतासु कनकेषुच" या न्यायानें संपत्तीविषयीं त्यास मोह उत्पन्न होई आणि ज्ञान दृष्टीनें पुनः तें कर्म निंद्य आहे असी त्याच्या चिताची खात्री होऊन हातांत घेतलेली एक एक वस्तु तो टाकून देई. असें करतां करतां त्यास चोरून नेण्यासारखें कांहींच सांपडेना. तसेंच ज्या घरधन्यानें त्याचें आठ दिवसपर्यंत आदरातिथ्य केलें त्याचेंच घरीं चोरी करून कृतघ्नपणा स्वीकारणे हि त्यास बरें वाटेना. पण ज्या प्रारब्धेच्छेनें त्यास हें कर्म करण्यास प्रवृत्त केलें तो तर रिकाम्या हातांनीं परत जाण्या विषयीं त्यास अनुमोदन देईना. मिळून तो गोंधळांत पडून पुढें काय करावें या विषयीं त्याणें कांहीं वेळ विचार केल्यावर जवळच भाताचा कांहीं कोंडा पडलेला होता त्याजवर त्याची दृष्टी गेली, तेव्हां तो नेण्यास फारसें पातक नाहीं असें वाटून त्याणें त्या पैकीं थोडासा कोंडा धोतरांत बांधून घेतला व आपले ठिकाणीं जाऊन निजला. पण त्यास झोंप कोठून येणार? कारण, केलेलें कृत्य त्याच्या अंतःकरणांत सलत होतें. असा विचार करतां करतां सूर्योदय झाला. ब्राह्मणास केलेले कर्माचा पश्चात्ताप होऊन ही सर्व हकीकत यजमानास सांगावी असा त्याणें निश्चय केला. नंतर यजमान उठून बाहेर येतांच त्याणें ही कोंड्याची पुरचुंडी त्याचे पुढें ठेऊन साष्टांग नमस्कार घातला. त्या

विद्वान ब्राह्मणाचें हें कृत्य पाहून यजमानास आश्चर्य व दुःखहि वाटलें आणि आपले हातून याचा कांहीं अपमान झाला कीं काय असी त्यास शंका आली. यजमानानें असें करण्याचें कारण काय ह्मणून विचारतांच त्या विद्वानानें रात्रीची सर्व हकीकत सांगितली व शेवटीं पश्चात्तापपूर्वक क्षमाहि मागितली. प्रारब्ध योगानें त्या ब्राह्मणास जी विपरीत इच्छा झाली त्याचें यजमानास फार आश्चर्य वाटलें, व तो ज्ञानी असल्यामुळें त्याचे स्वतःचे कीर्तीचा आणि आपल्या संपत्तीचाहि बचाव केला ह्मणून त्या यजमानास फार समाधान वाटलें. नंतर त्या विद्वानास आणखी कांहीं दिवस यजमानानें आपले येथें ठेऊन घेऊन द्रव्यादिकानें त्याचा बहुमान केला व त्यास घरीं पोंचतें केलें. तेव्हां यावरून हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, ज्ञानी आणि अज्ञानी या उभयतांसहि प्रारब्धेच्छा जरी एकादे कामीं प्रवृत्त करिते तथापि ज्ञानी आहे तो त्या कार्याची योग्यता जाणीत असल्या मुळें तज्जन्य दुःख भोगण्यास पात्र होत नाहीं, केवळ दैवबलानेंच आपले हातून तें कृत्य घडत आहे अशी त्याची खात्री असते. परंतु अज्ञानी मनुष्याला कर्माचा अहंपणा असल्यामुळें तो जें कृत्य करितो तें जरी निंद्य असलें तथापि त्यांत विजयी होण्याचा त्यास मोठा अभिमान असतो, या योगानें त्यास सारासार विचार न होतां तो परिणामी दुःख भोगितो. भोग्यवस्तूची योग्यता माहित असल्यावांचून भोक्त्यास त्या पासून सुखोत्पत्ती होत नाहीं. असें समजा कीं, एकाद्या रूपसंपन्न व तरुण स्त्रियेची एका पुरुषाशीं एकांतांत गांठ पडली. पण ती स्त्री परदेशांतील असल्यामुळें तिची भाषा, तिचा पेहेराव, तिच्या रीतीभाती, वगैरे सर्व प्रकार भिन्न असून त्या पुरुषास तिच्या रीतीभातींची वगैरे मुळींच माहिती नाहीं. तेव्हां अशा प्रसंगीं त्यांस परस्परांपासून होणारा विषयादि सुखाचा अनुभव कसा घडाव? खरोखर घडणार नाहीं!! याचें कारण त्या परस्परांविषयीं परस्परांचें अज्ञान होय. गतवर्षाच्या पहिल्या अंकांत "एलीमेली हरीसत्ता" या सदरा

खालीं आह्मी एक अख्यायिका दिलेली वाचकांस स्मरत असेलच. त्या तरुण स्त्रीपुरुषांस जें वरील प्रसंगीं दुःख उत्पन्न झालें त्याचें कारण परस्परांतील अज्ञान होय. तेव्हां भोग्य वस्तू विषयीं भोक्ता माहितगार असला तरच त्या उपभोगापासून त्यास सुखप्राप्त होतें. तेव्हां यावरून वस्तुमात्रा विषयीं ज्ञान असलें पाहिजे हें उघड आहे.

जगांतील वस्तुमात्र जर सुखकरच असत्या तर मग मनुष्यास त्या विषयीं इतकी खबरदारी घेण्याचें कारण नवतें. तसेंच यावज्जीव तेवढे सगळेच जर सज्जन असते तर त्यां विषयींहि मनुष्यानें सारासार विचारानें वागण्याचें कारण नवतें परंतु जगांतील कित्येक पदार्थ असे आहेत कीं ते मनुष्याचे प्राण वांचवितात, व कांहीं त्याच्या प्राणाचें हरण करितात. तसेंच कांहीं पश्वादिक मनुष्याचे संरक्षणाचे उपयोगी पडतात व काहीं त्यास फाडून खाण्यास तत्पर असतात, हाच प्रकार मनुष्यांतहि आहे, कांहीं व्यक्तीचे योगानें मनुष्य संकटांतुन पार पडतो, व कांहींचे संगतीनें तो संकटांत पडतो. तेव्हां असें हें जग नानाविध पडलें. बरें या वस्तुमात्राचा त्याग करावा असें कदाचित् कोणी ह्मणेल तर तसें करण्यास मनुष्य असमर्थ आहे. कारण, प्रारब्ध क्रमानें त्याणें या जगांत आलें पाहिजे व त्यांतील भोग भोगलेच पाहिजेत. असें जरी आहे तथापि मनुष्य ज्ञानाचे योगानें वस्तुमात्राशीं संगती ठेऊनहि त्यांजपासून आपलें हित होईल तवढेंच करून घेतो. सर्व लोक कांहीं सज्जन नसतात. जे सज्जन असतात त्यांचा स्वभाव चंदना सारखा असतो. एका कवीनें ह्मटलें आहे:—

सुजनो न याति वैरं परहितकार्ये विनाशकालेपि ॥
छेदेपि चंदनतरुः सुरभयति मुखं कुठारस्य ॥

"जे सुजन आहेत ते विपती ग्रस्त झाले असताहि परहित कार्या विषयीं वैर बाळगीत नाहींत. त्यांची वृत्ती चंदन वृक्षा प्रमाणें असते.

चंदनवृक्षाला छेदून टाकणारा जो कुठार त्या कुठाराचें मुखाहि तो आपल्या सुगंधानें सुवासित करतो." तेव्हां असे जे पुरुष असतात त्यांजपासून जगावर सर्वदा उपकृतीच होत असते, पण याहून विरुद्धाचरणी जे लोक त्यांचें आचरण फार भयंकर असतें:—

संवर्धितोपि भुजगः पयसा न वश्य ।
स्तत्पालकानपि निहंति बलेन सिंहः ॥
दुष्टः परैरुपकृतस्तदनिष्टकारी ।
विश्वासलेश इहनैव बुधैर्विधेयः ॥

"सर्पाला दूध पाजून पाळला असला तथापि तो जसा पाळणारास दंश केल्या वांचून राहत नाहीं, अथवा सिंह आपल्या पालकाचा घात करण्यास कसर करीत नाहीं, तद्वत दुष्टावर जरी उपकार केले असले तथापि त्याच्या अंतःकरणांत कृतज्ञता उत्पन्न होत नाहीं. या करितां सूज्ञ पुरुषानें दुष्ट मनुष्यावर विश्वास ठेऊं नये." तेव्हां यांत तात्पर्य मिळून इतकेंच कीं, जगांतील वस्तुमात्रा विषयीं मनुष्यास ज्ञान असलें पाहिजे. ज्ञाना वांचून त्याचे भोग दुःख परिणामी होतात. आतां कित्येकांस कदाचित् अशी शंका येईल कीं, प्रारब्धानुसार मनुष्यास भोगेच्छाहि होते, तेव्हां त्याणें भोग्य वस्तूची योग्यता जाणली किंवा न जाणली, तथापि तो इच्छाजनित दोषाचा तर अधिकारी झाला ना? मग त्याची इच्छा सफळ होवो किंवा न होवो. आतां या शंकेचे संबंधानें वर अह्मी एका विद्वान गृहस्थाची जी ऐकींव गोष्ट सांगितली आहे त्याज वरून इच्छा प्रारब्धानें बद्ध झालेला ज्ञानी पुरुष कोणतेहि कार्यास प्रवर्तला तथापि त्यांत किती सारासार विचार करतो हें लक्षांत येण्याजोगें आहे. खेरीज, जो ज्ञानी आहे त्याच्या आणि अज्ञानी पुरुषाच्या इच्छेंतहि महदंतर असतें. ज्ञानी पुरुषांची इच्छा भर्जित बीजा प्रमाणें असते. भाजलेलें बीं जमिनींत टाकलें तथापि त्या

पासून जसें अंकुरादि कार्य होत नाहीं, तद्वत जो ज्ञानी आहे त्याच्या अंतःकरणांत जरी प्रारब्धानुसार विषय भोगेच्छा उत्पन्न झाली तथापि त्या इच्छेचा परिणाम जें व्यसन त्या व्यसनाप्रत तो ज्ञानी पावत नाहीं. ज्ञाता पुरुष विषयांचा सत्यत्वानें अंगीकार करीत नसल्यामुळें केवळ भोक्तव्य संबंधानेंच त्यांचा अंगीकार करतो. या योगानें त्याच्या प्रारब्ध कर्माचा क्षय होऊन विषयजन्य दुःख त्यास होत नाहीं. प्रारब्धानुसार विषयादिकांचा उपभोग घेणें आणि विषयोपभोगां विषयीं संकल्प करणें हेंच कायतें ज्ञानी आणि अज्ञानी या परस्परां मध्यें अंतर होय. विषयोपभोगांची इच्छा, प्राप्ती, समृद्धी आणि शाश्वती या विषयींचे जे संकल्प आणि यत्न त्यास भ्रम असें ह्मणतात. हा भ्रम व्यसनाप्रत उत्पन्न करितो. ज्ञानी पुरुष या भ्रमांत पडत नसल्यामुळें तो त्या पासून होणारे दुःखाचाहि अधिकारी होत नाहीं. आणि अज्ञानी पुरुष अशक्य व अप्राप्य विषयांच्या संकल्पानें भ्रमांत पडून दुःख पावतो. तेव्हां ज्ञानी व अज्ञानी यांच्यामध्यें असा भेद आहे. दोघेहि विषयोपभोगाचे अधिकारी सारखेच असून ज्ञात्याला दुःख न होण्याचें कारण केवळ भोगपरिज्ञान होय हें प्रकृत विवेचनावरून वाचकांचे लक्षांत येईलच. या भोगपरिज्ञानाला सदसद्विचार शक्ति पाहिजे. सदसद्विचाराचे योगानें मनुष्यास बरें वाईट कळतें. या सदसद्विचारा विषयींहि चार शब्द लिहून वाचकांस सादर करण्याचें मनांत आहे. परंतु आज स्थलसंकोचास्तव सवड नसल्यामुळें प्रकृत विवेचन येथे पुरें करतों.

# स्वहित, स्वदेशहित आणि सार्वजनिकहित.

हित दोन प्रकारचें आहे. ऐहिक आणि पारमार्थिक. स्त्रीपुत्र, धन धान्य, व राज्य संपादन, हीं ऐहिकसुखाचीं अधिष्ठानें होत, आणि हें सर्व नाशिवंत व मायिक आहे असें जाणून त्यापासून अलित राहण्याविषयींचे जे योगमार्गादि यत्न ते सर्व परत्रसुखाचीं अधिष्ठानें. ऐहिक सुखाची सीमा ह्मटली ह्मणजे सार्वभौमपदप्राप्ति, आणि परत्रहिताची सीमा ईश्वराची सरूपता. असो, प्रस्तुत प्रसंगीं आपणास ऐहिक हिताविषयीं विचार करणें आहे. प्रथमतः मनुष्याचे यत्न स्वहिता विषयीं असतात, तें साधून तो स्वदेशाचें हित करण्याविषयीं यत्न करीत असतो, आणि तेंहि साधल्यास तो सार्वजनिक हिताचे पाठीस लागतो. कित्येक लोक सार्वजनिक व स्वदेशहिताचीच केवळ कळकळ दाखवून आपले सर्व यत्न त्या प्रीत्यर्थच आहेत व त्यांत आत्महिताचा संबंध मुळींच नाहीं असें दाखवून 'सार्वजनिक हितचिंतक' ह्मणून मोठें भव्य उदाहरण आपले नांवास जोडून घेतात, पण आह्मांस अशा लोकांचें आचरण व त्यांचा बाणा दांभिक दिसतो. कारण केवळ पारमार्थिक हिताचे मागें लागणारे पुरुषांचा कल देखील स्वहिताकडे असतो, मग जो नेहमी व्यवहारांत गुंतलेलाच असतो व ज्याच्यावर प्रापंचीक अनेक कृत्यांचा भार असतो तो मनुष्य केवळ सार्वजनिक हिताचीच कळकळ बाळगून सदैव यत्न करीत आहे असें ह्मणणें ह्मणजे वाजवीपेक्षां त्याची जास्त स्तुती करण्यासारखें आहे. आतां हें मात्र खरें आहे कीं, सज्जन असतात त्यांच्या स्वहिताचे मार्ग असे योग्य असतात कीं, ते आपलें स्वहित साधीत असतां सहजी त्यांत सार्वजनिक कल्याणाचे व सोयीचे रस्ते ते लोकांस खुले करून दाखवितात.

अलीकडे आपल्या देशांत सार्वजनिक हिताची फार चळवळ दिसते. आपल्या देशांतील संपत्ती नष्ट होऊन लोक दरिद्री झाले, व्यापारधंदा बुडून लोक रिकामे बसले, व अनेक प्रकारच्या दुष्काळादिक घाल्यानें लोक अन्नास मोताद होऊन पटापट मरूं लागले. या देशावर प्रस्तुत परद्वीपस्थांचा अम्मल असल्या मुळें कित्येक तद्देशी कामदार लोकांवर जुलूम करून त्यांची दाद घेत नाहींसे झाले व आमचें दयाळू सरकार फार दूर असल्यामुळें आमच्या हालअपेष्टा त्यास कळतना, तेव्हां अशी ही दीनावस्था अवलोकन करून कित्येकांनीं सार्वजनिक वकिलीपत करली. आणि हे स्वतःसिद्ध मुखत्यार वकील, सरकार व रयत यांस शास्त्रार्थाच्या आणि समजुतीच्या गोष्टी सांगून बयाणा, कमिशन, व इनाम वगैरे मिळवूं लागले. वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, त्रैमासिकें, सार्वजनिक सभा, लवादकोर्टें, वक्तृत्वोत्तेजक सभा, वगैरे हीं या वकिलांचीं कोर्टें होत. वरील सर्व कृत्यांचा उद्देश सार्वजनिक हित संपादण्याचाच होय. तेव्हा आतां सार्वजनिक हित कोणतें, तें संपादण्यास उपाय काय, व प्रस्तुतच्या चळवळीनें तें संपादिलें जाईल किंवा नाहीं याचा विचार करूं.

सर्व लोकांचें जें हित तें सार्वजनिक हें कोणीही कबूल करील. पण सर्व लोक यांत कोणाचा समावेश होतो हें पाहिलें पाहिजे. साधारण शब्दार्था प्रमाणें ह्मटलें असतां सर्व लोक ह्मणजे दुनियेंतील सर्व मनुष्यें असा अर्थ ध्वनित होतो. तेव्हां आपल्या देशांत सार्वजनिक कल्याणाची जी चळवळ चालु आहे ती आपल्या देशांतील लोकां करितां किंवा दुनियेंतील लोकांचे कल्याणासाठीं हें पाहिलें पाहिजे. याचा विचार करूं लागलें असतां आपल्यादेशांतील सार्वजनिक हित चिंतकांचे सर्व यत्न केवळ स्वदेशहितार्थ आहेत असें ह्मणावें लागतें. म्याचेस्टर वगैरे परदेशांतले व्यापारी अनेक तऱ्हेचें कापड तयार करून या देशांत स्वस्त भावानें आणून विकतात, यामुळें या देशांतील माग वगैरे बंद होऊन लोक

उपाशीं मरूं लागले, त्याचप्रमाणें विलायतेंतील लोक अनेक तऱ्हेचे पदार्थ या देशांत आणून विकतात व त्या कुशळ व्यापाऱ्यांच्या छानछोक मालास आमच्या देशांतील लोक भुलून भराभर अनेक जिनसा खरेदी करतात. अशी तद्देशीय व्यापाऱ्यांनीं तऱ्हेतऱ्हेचे मालाची अगदीं रेलचेल करून दिल्यामुळें आपल्या या हिंदुस्थान देशांतील व्यापार मंदावून कारागीर लोक अन्नास मोताद झाले. या सर्व गोष्टी मनांत आणून कित्येक मेहनती, दूरदर्शी, व विद्वान लोकांनीं स्वहिताचे उद्योग क्षणभर एकीकडे कडे ठेऊन सार्वजनिक कल्याणाकरितां म्हणून त्यांणीं कंबरा बांधल्या. कित्येकांनीं वरील निकृष्ट स्थिती व तिचीं कारणें याचे इत्थंभूत वर्णनानें भरलेले असे अनेक लेख आपल्या देश बांधवांपुढें मांडण्याची सुरवात केली, कित्येकांनीं गांवगन्ना हिंडून वरील स्थिती आपल्या देश बांधवांचे अंतःकरणांत ठसावी म्हणून कांनीं कपाळीं ओरडून त्यांची समजूत घालण्याची सुरवात केली, या देशांतील लोकांची ही अशी चळवळ पाहून मांचेस्टर वगैरे कडील व्यापारी मंडळी भावी नुकसाना विषयीं शंकित होऊन त्यांनीं सरकार मार्फत आपले व्यापारास सोईवार अशा कांहीं गोष्टी करून घेऊं लागली हें पाहून कित्येकांनीं सार्वजनिक सभा वगैरे करून तद्द्वारा या देशांतील व्यापारास उत्तेजन यावें म्हणून सरकारास नम्रतापूर्वक अर्ज वगैरे करण्याचे खटपटीस लागले. अशा धांदलींत कित्येक लोक स्वदेशी कपडा वापरण्याच्या शपता घेऊं लागले, कित्येक विलायती साबु झुगारून देशी वापरूं लागले, कित्येकांनीं विलायती वस्तऱ्यानें हजामती न करण्याचा निश्चय केला, मिळून कोणी कांहीं कोणी कांहीं असा जो तो 'सार्वजनिक' हिताचे कामांत घुसूं लागला. आतां या एकंदर चळवळीकडे लक्ष दिलें म्हणजे हा सर्व प्रकार सार्वजनिक कल्याणाचा नसून स्वदेश हिताचा आहे असें प्रथमतः कोणीहि कबूल करील, आतां स्वदेश हिताचा आहे असें म्हटलें म्हणजे ज्या प्रमाणें आम्ही आपल्या देशाचे हिताकरितां झटत आहों किंवा झटण्याचा प्रयत्न

या प्रमाणें सर्व देशांतील लोकांनीं ह्मणें हें त्यांचें कर्तव्य कर्म आहे असें कोणीहि कबूल करील. तेव्हां या न्यायानें म्याचेस्टर वगैरे कडील व्यापारी जे आपला व्यापार वाढविण्यास अनेक तऱ्हेचे दीर्घ प्रयत्न करीत आहेत, व इकडील लोकांनीं गिरण्या वगैरे सुरू करून परदेशी व्यापाऱ्यांचे मालाची मंदी करण्याचा यत्न करतात त्यांचे ते यत्न निष्फळ करण्याच्या हेतूनें म्यांचेस्टरचे व्यापारी सरकारचे कानाशीं ओरड करून आपला कार्यभाग करून घेत आहेत हे स्वदेश हित वर्तु त्याचे नात्यानें त्यांस भूषणच आहे.

आतां आमचे देशबांधव जर सार्वजनिक हिताचीच कळकळ बाळगीत आहेत तर त्यांणीं परदेशीयांस प्रतिबंध न करतां ते या देशांतील संपत्ती युक्तीप्रयुक्तीनें लुटीत आहेत ती त्यांस खुशाल लुटूं द्यावी. आतां याजवर कोणी असें ह्मणेल कीं, जों पावेतों आमच्या देशांत संपत्तीची समृद्धि होती तों पर्यंत आह्मी या परदेशीयांस कोणत्याही तऱ्हेनें प्रतिबंध केला नाहीं, पण आतां आह्मीच जर कंगाल होऊन लंगोटी नेसण्याचे पयास येऊन पोंचलों तर आतां आह्मास दुसऱ्याची काळजी करून उपयोग काय? आपल्या देशांतील लोक अनुद्योगी व भिकारी होऊन अन्नास मोताद झाले असतां परदेशांतले लोक येऊन पंचपक्वान्नानें ढेकर देऊं लागले तर आह्मास ज्याप्रमाणें युरोपियन लोकांना कोमट चा राग येतो तद्वत, किंबहुना त्यापेक्षां जास्त राग येण्याचा संभव नाहीं काय? आतां असा प्रकार होईल खरा! पण तो केव्हां? स्वहिताचे नदांत मनुष्य असतां, सार्वजनीक हिताकडे ज्याचें लक्ष आहे त्याच्या मनांत असा विकल्प मुळींच येणार नाहीं. कारण अशा हितचिंतकांस सज्जनही पदवी शोभते. आणि सज्जनाचे कर्तव्या बद्दल एका कवीनें ह्मटलें आहे:—

मज्जंतोपि विपत्पयोधिगहने निःशंकधैर्यांवृता: ॥
कुर्वंत्येव परोपकारमनिशं संतो यथा शक्ति वै ॥

राहोरुग्रकराल वक्त्रकुहर ग्रासाभिभूतो प्यलं ॥
चंद्रः किं न जनं करोति सुखिनं ग्रासावशेषैः करैः ॥

"सज्जन आहेत ते विपत्तिग्रस्त झाले असताहि धैर्य धरून यथाशक्ति परोपकारच करीत असतात, चंद्राला राहूनें ग्रस्त केला असताहि तो आपल्या अशेष किरणांनीं लोकांस संतोषित करितो" तेव्हां आमच्या हितचिंतकांनीं वास्तविक या रीतीनें वागलें पाहिजे. पण असें वागण्यानें प्रस्तुतचे स्थितीचे मानानें पाहिलें असतां पुढें आमचा परिणाम काय होईल हा एक महत्वाचा प्रश्न उत्पन्न होतो, व त्याचा विचार करूं लागलें असतां अशा सज्जन पणानें आह्मास इह लोकीं दरिद्र आणि दुःख हीं निःसंशय प्राप्त होतील असा सिद्धांत ठरतो. मनुष्यास सुख दुःख किंवा संपन्न आणि विपन्न स्थिती हीं प्रारब्धानुसार प्राप्त होतात असा जरी सिद्धांत आहे, तथापि मनुष्य सर्वदा सुखाकरितां आणि संपत्ती करितांच यत्न करितो. दरिद्री होण्या विषयीं कोणी कधीं तपश्चर्या व नवस केल्याचें कोणास ठाऊक आहे काय? तसेंच मला दुःख प्राप्त व्हावें अशी परमेश्वराची प्रार्थना करणारा भक्त तरी कोणी आढळेल काय. असे मुळींच होणार नाहीं, कारण मनुष्यास सर्वदा सुखाची आणि संपत्तीची अपेक्षा असते, आणि त्या प्रीत्यर्थ तो जरी यत्न करीत नसला तथापि इच्छा करीत असतो. तेव्हां या न्यायानें आमच्या देशाची राजसत्ता परदेशीयांचे हातांत गेली, देशांतील व्यापारधंदा बुडून परदेशी व्यापाऱ्याचे जिनसावर गुजारा करण्याचा प्रसंग आला, संपत्ती नाहींशी होऊन लोखंडाचीं भांडीं, खोटीं मोत्यें, आणि सोनपितळ वापरण्याची स्थिति आली, आणि दिवसें दिवस लोक अन्नास मोताद होऊन वार्षिक दुष्काळाचे सपाट्यांत सांपडत चालले, तेव्हां ही स्थिति कोणास तरी पसंत वाटेल काय? कधींहि वाटणार नाहीं. बरें न वाटून तरी कांहीं उपयोग आहे-काय? विचार करून पाहतां हें वाटणेंहि निरर्थक आहे. कारण काल चक्राचे सपाट्यांत सांपडून प्रत्येक मनुष्य, प्रत्येक घराणें, प्रत्येक गांव,

प्रत्येक प्रांत, प्रत्येक देश, आणि प्रत्येक राष्ट्र संपन्न व विपन्न स्थितींत येत असतें, त्या प्रमाणें प्रस्तुत याहि देशावर काल प्रतिकूलतेची छाया पडली आहे. "येत्रा द्वेया भ्रमं चक्रे कांतासु कनकेषु च" हें वेदांती वाक्य आबाल वृद्धांस माहित असतां किंबहुना तोंडपाठ असतांहि ज्याप्रमाणें प्रत्येक मनुष्य सुंदर स्त्री आणि संपत्ती प्रात व्हावी ह्मणून यत्न करीत असतो व त्याचा यत्न सफळ झाल्याचें जरी अनुभवास येत नाहीं, तथापि वरील दोन्ही गोष्टींचे संग्रहाची जशी त्यास सर्वकाळ इच्छा असते, त्या चप्रमाणें देशाची समृद्धी आणि निकृष्टावस्था हीं जरी कालानुरायानें होणारीं आहेत, तथापि प्रत्येक देश निकृष्ट स्थितीस आला असतां तत्त-द्देशीयांस वाईट वाटणें आणि आपल्या देशास उन्नत स्थिती प्रात व्हावी ह्मणून त्यांणीं प्रयत्न करणें हें स्वाभाविक आहे. तेव्हां या न्यायानें आमच्या देशांतील लोकांत स्वहिताची व स्वदेश हिताची जी प्रस्तुत चळवळ चालू झाली आहे ती योग्यच आहे. आतां या चळवळींत सार्व जनिक हिताचा संबंध आहे असें ह्मणणें मात्र मुळींच शोभणार नाहीं. कारण, आमच्या देशाच्या प्रस्तुतच्या स्थितीच्या मानानें आह्मी आपल्या देशाचें हित करण्याचें मनांत आणल्या बरोबर या देशाशीं निकट संबंध असलेल्या अन्य देशांचें अहित करणें आह्मास भाग आहे. कारण, या देशाच्या अहितावरच ज्यांचें हित अवलंबून आहे असे देश या देशाचे कल्याणाची वेळ आली असतां अर्थातच विपन्न स्थितीस पोंचतील. आणि असें झालें ह्मणजे सार्वजनिक हितकर्तृत्वाचा बाणा फुकट जाईल. तेव्हां आपल्या देशांत देशोन्नतीची प्रस्तुत जी चळवळ चालू आहे ती सार्वज निक हिताची नसून केवळ स्वहिताची व स्वदेश हिताची आहे असें को णीहि कबूल करील. आतां आमचा हिंदुस्थान देश हा जर सर्व पृथ्वीचे ठिकाणीं मानला तर मात्र आमच्या देशबंधुंचे यत्न सार्वजनीक आहेत असें ह्मणतां येईल, परंतु भुगोल संबंधी हल्लीं लाकांचें ज्ञान विस्तृत झा ल्या मुळें उंबराचे फुलांतील किड्या प्रमाणें आपल्या सभोंवरची जागा ते व

हेंच कायतें जर असें मानण्या सारखी लोकांची प्रस्तुत स्थिती नाहीं. तेव्हां आमचे यत्न स्वदेशहिताचे होत हें उघड आहे. आतां अशा प्रकारचे यत्न करणें हें आमचें कर्तव्य होय म्हणून वर सांगितलेंच आहे, परंतु आम्ही हें कर्तव्य कर्म कोणत्या रितीनें बजाविलें पाहिजे याचा विचार करणें रास्त आहे.

हल्लीं आपला देश विपन्न स्थितींत आला आहे असा सर्वतो मुखीं पुकारा आहे. देशांतील संपत्ती नाहींशी होऊन लोक भिकारी झाले हिच कायती विपत्ती. आतां देशांतील संपत्ती नाहींशी होण्याच्या कारणांचा विचार करूं लागलें असतां, परदेशी लोकांची या देशावरील अप्रतिहत सत्ता हेंच कायतें संपत्ती नाहींशी होण्याचें मुख्य कारण होय असा सिद्धांत ठरतो. संपत्ती परदेशीं जाण्याचीं दोन द्वारें आहेत, एक राजसत्ता आणि दुसरें व्यापार. राजकिय संबंधें परदेशी लोक या देशांतील मोठाल्या हुद्यांवर येऊन हजारों रूपये पगार विलायतेस घेऊन जातात व या देशाचा राज्यकारभार चालविणारी विलायतेस जी मंडळी आहे तिच्या खर्चाकरितां आणि राजघराण्यांतील मनुष्यांचें खर्चाकरितां या देशांतील संपत्ती जाते. हा खर्च इतका जबर आहे कीं, त्या योगानें कामधेनू सारखा जो आपला देश त्याच्यांतील कोट्यावधी रुपयांचें उत्पन्न खलास होऊन खेरीज त्याजवर कर्जाची रकम बसली आहे व हें कर्ज दर वर्षांत वाढत आहे. आमचे प्रस्तुतचे राजकर्ते हे शहाणे, धूर्त, विचारी, आणि दूरदर्शी असतां त्यांच्या राज्यावर — आणि नशांपून हिंदुस्थान सारख्या सुपीक प्रदेशावर — कर्जाचे हुजनुसाट होणें आणि त्या कर्जाची रकम दरवर्षास वाढत असतां आमच्या शहाण्या सरकारास स्वस्थ झोंप येणें हें त्यांच्या शहाणपणास आणि सार्वभौम सत्तेस फारच लाजीरवाणें होय. सन १८७६।१८७७ आणि १८७८ या तीन सालांत सरकारास हिंदुस्थान देशाचें ५१३१००६३० रुपये, ५६०२२०००० रुपये, आणि ५८३८२०००० रु० अनुक्रमानें उत्पन्न झालें. या देशास कर्ज असतां

व दरसाल उत्पन्नाची रकम वाढती असतां तें कर्ज फेडण्याची काळजी सरकारास असती तर कर्जाचा कधींच निकाल झाला असता.- पण सरकारचा बादशाही खर्च किंवा ज्याला उघड लूट ह्मटली असतांहि शोभेल अशी उधळपट्टी ही या देशास लवकरच भिकेस लावील हें उघड आहे. सरकारास झालेले कर्जापासून सरकारच भिकारी व्हाव याचें असें असतां हा देश भिकारी होईल असें ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं, या देशाचें उत्पन्न खर्चास पुरत नाहींसें होऊन कर्जाची रकम फार वाढली व ती आदमासाचे बाहेर गेली ह्मणजे मग या देशाचा राज्यकारभार करण्यांत -आमच्या सरकारास फायदा तो कोणता? कारण झालेले उत्पन्नात जर व्य जहि भागत नाहींसें झालें तर मग या देशाचा राज्यकारभार हांकणारे लोकांस पोटबांधून नौकरी करावी लागेल. पण बादशाहि इतमामानें आजपर्यन्त वागलेले लोकांस थोड्या पगारानें कामगिरी बजावणें आवडेल काय? कधींहि आवडणार नाहीं. तेव्हां मग अशा कर्जबाजारी राज्यांत ते येतात तरी कशाला? तेव्हां अशा वेळीं हिंदुस्थानांतील लोकांचे हातीं राज्य देण्यास कांहीं हरकत नाहीं असें सरकारास वाटेल. पण मग वाटून उपयोग काय? कारण सरकारचें कर्ज फेडल्या वांचून तर एतद्देशीयांस राज्य मिळणार नाहीं. आणि मग कर्जाची रकम फेडणें ह्मणजे या देशाचे शक्तीपलीकडे होईल. तेव्हां या कर्जाचा परिणाम काय होईल याचें अनुमान करणें देखील मोठें बिकट आहे. आतां हें कर्ज एकादे व्यक्ति संबंधें असतें ह्मणजे त्यास मुंबईचा इन्सालव्हंट कायदा लागू करून कर्जमुक्त होतां आलें असतें, पण हा संबंध राष्ट्राचा असल्यामुळें तसेंहि होणार नाहीं. असो मिळून असे विचार आणि अनुमान करण्याचा प्रसंग न यावा हेंच रास्त आहे. आणि त्याचा उपाय ह्मटला ह्मणजे कर्ज फेडून टाकणें हा होय. आमचें सरकार जर या देशाचें सर्वस्वी कल्याण करण्या करितां ह्मणून या देशांत आलें आहे तर " तळें राखील तो पाणी

घाखील" या ह्मणी प्रमाणें नौकरीचे वगैरे संबंधानें या देशांतील संपत्ती तें सजातीय लोकांकडून आपल्या देशांत नेववितें त्यास आमच्यानें विशेष दोष देवत नाहीं. परंतु या देशास कर्जबाजारी करण्यांत देशाचें कल्याण कोणतें तें आह्मांस समजत नाहीं. वर जो तिमाली उत्पन्नाचा आकार दाखविला तो दरसाल वाढता आहे हें वाचकांचे लक्षांत येईलच, पण ज्या मानानें उत्पन्न वाढलें त्या मानानें खर्चही वाढला. ह्मणजे सन १८७६ सालांत ५३ ९१ १७ ४७०रु०, १८७७ सालांत ५८२०५०९५० रु० आणि १८७८त ६२११३० ००० रुपये याप्रमाणें खर्चाचें मानहि वाढत गेलें. ह्मणजे पाहिल्या दोन वर्षांत उत्पन्ना पेक्षां दोन दोन कोटी जास्त व तिसऱ्या वर्षांत उत्पन्ना पेक्षां ४ कोटी रु० जास्त खर्च वाढला. ज्याप्रमाणें उत्पन्न आणि खर्च वाढत गेलें त्या मानानें वाढलेलें उत्पन्न खर्चांत जाऊन निदान कर्जाची रकम तरी वाढली जाऊं नये हें साधारण अकलेच्या पुरुषाचें कर्तव्य आहे. पण आमच्या राजकार्य धुरंधर राजकर्त्यांचें कर्जहि वाढतच जातें. सन १८७६ सालांत १२२५७००१४० रु० कर्ज होतें, सन १८७७ सालांत १२६२२४४००० रु० व १८७८ त १३४५४६७५३० रुपये पर्यंत पेऊन पोंचलें. आतां सन १८७८ सालांत खर्चाची रकम सुमारें ४ कोटी जास्त वाढली. त्यांत उत्पन्नाची वाढलेली रकम सुमारें २ कोटी वजा जातां बाकी दोन कोटी रुपये कर्ज व्हावें, पण कर्जाची रकम ८ कोट रुपये जास्त वाढली तेव्हां याला मेळ कसा बसतो हें समजण्याला तरी राजकार्य धुरंधरपणाच अंगीं पाहिजे. आतां कर्जाची रकम अशी वाढत असल्यामुळें व्याजाची रकम वाढती असावयाचीच. ती रकम सन १८७६ सालांत ५४१२०५५० रु०, १८७७ सालांत ५४५३८००० रु० झाली व १८७८सालांत ६७८१०२६० रु० याप्रमाणें वाढत गेली. सुधारलेले देशांतील राजकर्त्यांस ही गोष्ट फार अश्लाघ्य होय, असो, या देशांतील संपत्ती जाण्याचीं जीं दोन द्वारें सांगि

तली त्यांपैकीं ही राजसत्ता मुख्य दरवाजा होय. या द्वारानें जाणारी संपत्ती लोकांच्या खुषीची किंवा मोबदल्याची मुळींच पर्वा करीत नाहीं. व हा सर्व साधारण नियमही आहे.

आतां दुसरा मार्ग व्यापार. या मार्गानेंहि या देशाची अगणित संपत्ती प्रती वर्षी परदेशीं जाते. युरोपखंडांतील लोक अनेक तऱ्हेचे पदार्थ तयार करून या देशांत आणतात आणि त्यामुळें ते आपल्या देशास इकडील धान्य व पैसा घेऊन जातात. राजकीय आणि व्यापार या दोन संबंधानें या देशातील संपत्ती परदेशीं जाते ह्मणून सांगितलें परंतु या दोन संबंधांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. राजकीय संबंध हा केवळ सत्तेचा प्रकार आहे ह्मणून वर सांगितलें, पण व्यापाराचा संबंध तसा नाहीं. तो इकडील लोकांच्या खुषीचा सौदा आहे. एक तर त्या संबंधानें या देशांतील लोकांस कांहीं तरी मोबदला द्यावा लागतो. आणि दुसरें असें कीं, जो माल तयार करून या देशांत आणावयाचा तो इकडील लोकांस पसंत पडेल व किंमतीनें सस्ता पडेल असा असला पाहिजे. तिकडील व्यापारी कोट्यावधी रुपयांचा तऱ्हतऱ्हेचा माल तयार करून या देशांत आणतात परंतु ते 'आमचा माल घ्या' ह्मणून पाठीस लागत नाहींत, तथापि त्यांच्या मालावर गिराइकांच्या झुंडी पडतात, आणि आमचे कित्येक स्वदेशाभिमानी लोक "या देशांत उत्पन्न झालेला माल वापरा" ह्मणून पाठीस लागत असतां व लोकांकडून शपता घेववीत असतांहि त्यास कोणी विचारीत नाहीं, तेव्हां याचें कारण काय? उघडच आहे. परदेशस्थ व्यापारी जर तऱ्हेतऱ्हेचा सुरेख, स्वच्छ, आणि स्वस्त माल लोकांपुढें मांडीत आहेत तर त्यांणीं महागाईचा आणि कमी पुरवठ्याचा देशी माल काय ह्मणून घ्यावा? व्यापाराचे कामांत कधीं आग्रह चालत नाहीं. तो मोबदला केवळ लोकांच्या खुषीचा आहे. तेव्हां परदेशी व्यापारी व्यापाराचे नात्यानें या देशांतील संपत्ती नेतात ती ते केवळ जुलमानें किंवा लबाडीनें नेतात असा प्रकार मुळींच नाहीं. त्याजबद्दल ते य

देशास योग्य मोबदलाहि देतात. पण त्यांचा मोबदला "देखनेमे ढबू और चलनेमे शिपराई" अशा तऱ्हेचा असतो.

वस्तूचा सुरेखपणा आणि सुलभपणा या दोन गोष्टी त्याच्या खपाचा मुख्य कारण असतात, खेरीज अर्थशास्त्रा प्रमाणें लोकांस त्या वस्तूची गरजहि असली पाहिजे. हरेक वस्तु लोकांचे फार उपयोगाची असून खेरीज सुरेख, स्वच्छ आणि किंमतीनें सस्ती असली म्हणजे तिचा खप अतीशय होतो. म्यांचेस्टर व इंग्लिश व्यापारी लोकांच्या मनांत अर्थ शास्त्राचीं तत्वें पूर्णपणें भिनून गेलीं आहेत आणि त्यामुळें ते आपल्यास व्यापारापासून अगणित फायदे करून घेत आहेत. आतां त्या व्यापाऱ्यांचे संबंधानें आमचा देश भिकारी झाला असें जें म्हणावें यातलें मुख्य बीज येवढेंच कीं, ते आमच्या देशांतील पैसा घेऊन जातात, आणि तो पैसा गेल्या मुळें देशाचें नुकसान होतें हें एक; आणि दुसरें असें कीं, ते लोक जरी आमच्या देशांतील लोकांस जिनसाचा योग्य मोबदला देतात तथापि ते जिन्नस उत्पन्न करण्याचे सर्व कारखाने तिकडील देशात असल्यामुळें आमचे इकडील कारागिरी ही बुडाली, यामुळें या देशांतील लक्षावधि लोक रिकामें बसून अन्नास मोताद झाले आहेत, असें दुसरें या देशाचें नुकसान होतें. आतां हें एकंदरींत या देशास नुकसान तर खरेंच, पण तें होण्यास कारणी कोण हेंहि पाहिलें पाहिजे. म्हणजे म्यांचेस्टर वगैरे परदेशी व्यापारी या देशाचें नुकसान करतात किंवा या देशांतील लोकच आपलें नुकसान करून घेतात याजबद्दल विचार केला पाहिजे.

(पु० चा०)

# आख्यायिका

## बोलण्यांत चूक.

एका गृहस्थाचें मूल फार रडूं लागलें ह्मणून त्यास थान पाजण्या विषयीं त्याणें आपल्या बायकोस सांगितलें. बायको ह्मणाली—याला काय झालें तें समजत नाहीं, मगा पासून याच प्रमाणें रडत आहे व पाजूं लागलें तर पीत नाहीं—गृहस्थ जरा रागाऊन ह्मणाला—पाज तर खरी, नाहीं पीत ह्मणजे काय, त्याचा बाप पिईल!!

## उपमाच नाहीं

एका परदेशानें दोन प्रहरचे वेळीं चौका तयार करून जागाबिगा चांगली सारवून स्वच्छ केली, व चूल पेटवून आपण नदीवर पाण्याला गेला. तो परत येतो इतक्यांत एक गर्दभाची स्वारी त्या चौकांत उभी होती. त्याला पाहून परदेशीबुवांना मोठा घुस्सा तर आलाच, पण त्याणें मनांत आणलें कीं आतां या जनावराला ह्मणावें तरी काय? पुढें त्याणे त्या गर्दभास हांकून दिलें व हांकतांना चुटपुटत ह्मणाला—किं हें दुसरें कुणी असतें तर त्याला मी गाढव ह्मटलें असतें, पण ते राजश्री स्वतःच जर इथे आहेत तर आतां यांना उपमा तरी द्यावी कोणाची!!

## न्यायाधीश

एका खेड्यांत एक सत्यस्थ ब्राह्मण सुखवस्तु राहत असे. तेथील एका खटपटी मनुष्यानें, ज्या घरांत तो ब्राह्मण राहात असे तें घर माझे मालकीचें आहे व तें मी या ब्राह्मणास राहण्या करितां भाड्यानें दिलें आहे, तेव्हां तें माझें माझ्या ताब्यांत मिळावें ह्मणून न्यायाधिशाकडे फिर्याद केली. न्यायाधिशानें त्या ब्राह्मणासहि बलावून आणून सर्व

हकीकत विचारली. ब्राह्मण ह्मणाला या घरांत मी आज तीन पिढ्या राहत आहें, व हें घर माझ्या मालकीचें आहे. त्या खटपटी मनुष्यानें आपल्याला अनुकूल असे कांहीं साक्षीदार तयार केले व प्रत्यंतराला कांहीं कागद पत्रहि बनवले आणि एक दिवस त्यारी न्यायाधिशाचे भेटीला जाऊन बोलतां बोलतां त्याणें आपल्या मनांतील सर्व हेतु न्यायाधीशास सूचित केले. न्यायाधीश मोठा धूर्त आणि निस्पृही होता. त्याणें त्या मनुष्याच्या बोलण्याच्या सर्व झोंकावरून खरा प्रकार जाणला, परंतु तें कांहीं एक न दर्शवितां ह्मणाला—अहो, आह्माला एक ऊंस, एक कांदा आणि एक नारळ पाहिजे ते द्या मिळवून द्याल काय? त्याणें ती गोष्ट कबूल केली व लगेच सर्व जिनसा आणून हजर केल्या. पुढें न्यायाचे वेळीं फिर्यादीचा सर्व पुरावा झाल्यावर "तुझा कांहीं पुरावा आहे काय?,, ह्मणून न्यायाधिशानें त्या ब्राह्मणास विचारलें. ब्राह्मणानें नाहीं ह्मणतांच न्यायाधीश ह्मणाला "अरे नाहीं कां ह्मणतोस, तुझ्या तर्फे साक्ष देणे करितां खुद्द वादी कडून माझ्या इथे सकाळीं तीन साक्षीदार आले आहेत व ते या कज्यांत साक्ष देस तयार आहेत" असें ह्मणून त्या जिनसा आणण्या विषयीं त्याणें आपल्या मनुष्यास सांगितलें. त्या जिनसा आणल्यावर न्यायाधीश वादीकडे पाहून ह्मणाला "तुझा दावा अगदीं खोटा आहे व तूं त्या ब्राह्मणावर विनाकारण हें कुभांड रचलें आहेस असे हे साक्षीदार मला खात्रीपूर्वक सांगतात या करतां तुझा दावा मी रद्द करतों." असें ह्मणून त्याणें कज्याचा निकाल केला. न्यायाधिशाची ही निस्पृहता व धूर्तता पाहून सर्व लोकांत आश्चर्य वाटलें व त्या खटपटी मनुष्यास मोठा पश्चात्ताप होऊन त्याणें झालेले गोष्टी बद्दल न्यायाधिशाची क्षमा मागितली.

---

## ऐश्वर्याचा कळस

एकदा दिल्लीचे बादशाहा अंबारींत, बसून लवाजम्यासह मोठ्या थाटानें

शहरांतून फिरत असतां जवळ पेशव्यांचे वकील होते त्यांस विचारलें—वकील, आह्मी मोठे किंवा तुमचे पेशवे मोठे?—बादशाहास आपले ऐश्वर्याचा गर्व झाला आहे असें जाणून वकिलानें मोठ्या खोचीनें उत्तर दिलें. तो ह्मणाला—सरकार, आपण पौर्णिमेच्या चंद्रासारखे आहां आणि आमचे पेशवे सरकार द्वितीयेच्या चंद्रासारखे आहेत. बादशाहानें त्याचें तें समर्पक उत्तर ऐकून तो खजिल झाला.

# शेताचा सारा.

एक राजा शिकारीस गेला असतां एका रानडुकराच्या मागें लागून फार दूर गेला. दोन प्रहरची वेळ झाल्यामुळें तो फार तृषाक्रांत होऊन एका उसाच्या शेतांत शिरला. शेतकरी आपल्या झोंपडींत बसला होता त्याणें राजास पाहून हा कोणी भला मनुष्य आहे असें जाणून त्याचा आदर सत्कार केला. व राजाला एक ऊंस पिळून त्यांतून तांब्याभर रस काढून पिण्यास दिला. राजा श्रमित झाला होता त्यास रस पिऊन समाधान वाटलें, व त्या एका ऊंसावरून सर्व शेताचे उत्पन्नाचें मान लक्षांत आणून त्याणें शेतकऱ्यास विचारलें—किं या शेताला सारा काय पडतो.—त्याणे दर बिघ्यास दोन रुपये पडतात असें सांगतांच—याच्या चौपट तरी सारा बसला पाहिजे असें राजाचे मनांत येऊन राजधानींत गेल्यावर त्याचा ठराव करण्याचा त्याणें निश्चय केला. नंतर कांहीं वेळ विश्रांति घेऊन पुनः त्या शेतकऱ्या जवळ त्याणें ऊंसाचा थोडा रस मागितला. शेतकऱ्यानें पुनः शेतांतून एक ऊंस काढून आणला व पिळूं लागला तों पंचपाळीभरहि रस निघेना. हें पाहून त्यास व राजासहि आश्चर्य वाटलें. राजानें असें होण्याचें कारण त्यास विचारतांच त्याणें थोडा विचार करून सांगितलें—महाराज, आमच्या राजाची कांहीं तरी दानत बिघडली असेल ह्मणून असें झालें—राजा हें ऐकून खजिल झाला व त्याणें सारा वाढविण्या विषयीं मनांत धरलेला हेतु सोडून देऊन तेथून निघून गेला.

# प्रत्यक्ष पुरावा

एक कोतवाल खोटेनाटे पुरावे तयार करून लोकांस शिक्षा देत असे त्याची लबाडी उघडकीस आणावी ह्मणून दोन चतुर पुरुषांनीं एक युक्ति योजिली. त्या दोघांनीं एक दिवस भररस्त्यावर मोठा तंटा करून त्याच रात्रीं एक इसम दडून राहिला व तो नाहींसा झाल्या बद्दल त्या च्या स्नेह्यानें गांवांत कंडी उठवून त्याच्या सोबत्यांकडून तो मारला गेला अशी कोतवालास खबर देवविली. कोतवालानें "तुह्मास कोणाचा वहीम आहे काय?" असें विचारताच त्यांणीं वरील इसमाचें नांव घेतलें. नंतर कोतवालानें त्यास मार देऊन कबूल करवलें व सर्व पुरा व्याचे साधनांची सामुग्री जमविली. पुढें न्यायाधिशासमोर वरील इसमावर खुनाची शाबिती झाली. ते वेळीं न्यायाधिश आरोपि तास ह्मणाला—तुला कांहीं पुरावा देणें आहे काय?—आरोपी ह्मणाला मी पुरावा देईन, पण हल्लींच्या पुराव्या वरून जी शिक्षा मला मिळ ण्याजोगी असेल तीच शिक्षा मझा पुरावा घेतल्यानंतर या कोतवालास दि ली पाहिजे— हें ऐकून न्यायाधिशास व सर्व लोकांस मोठें आश्चर्य वाट लें. पुढें तुझा पुरावा काय आहे तो घेऊन ये— असें न्यायाधिशानें सांग तांच ज्या इसमाचा खुन केल्याबद्दल त्याजवर पूर्ण शाबिता झाली त्या आप ल्या मित्रास त्याणें न्यायाधिशा समोर आणून उभा केला, व याची साक्ष घ्या ह्मणून सांगितलें. त्यास पाहातांच सर्व लोकांस, न्यायाधिशास व कोत वालास मोठें आश्चर्य वाटून कोतवाल व त्याची अनुयायी मंडळी घाबा घूम झाली. न्यायाधिशानें त्याची सर्व हकीकत मनास आणून कोतवा लास देहांत शिक्षा दिली व वरील दोन्ही इसमांची मोठी तारीफ केली.

# सुभाषित

निर्धनं पुरुषं वेश्या प्रजा भग्नं नृपं त्यजेत् ॥
खगा वीतफलं वृक्षं भुक्त्वाच्चभ्यागता गृहं ॥

"पुरुष निर्धन झाला असतां वेश्या त्याचा त्याग करिते, पालन करण्य विषयीं असमर्थ अशा राजाला प्रजा सोडिते, वृक्ष फलहीन झाला असतां त्यास पक्षी सोडून जातात, आणि अभ्यागत भोजनानंतर गृहाचा त्याग करितात."

उत्साह संपन्न मदीर्घसुत्रं ।
क्रिया विधिज्ञं व्यसने ष्वसक्तं ॥
शूरं कृतज्ञं दृढसौहृदंच ।
लक्ष्मीः स्वयं याति निवासहेतोः ॥

"जो पुरुष सर्वदा आनंदी, सरळ मार्गानें वागणारा, सत्कर्मांची विधिवाक्यता जाणणारा, दुर्व्यसनांचे ठायीं अनासक्त, शूर, कृतज्ञ, व सज्जनाशीं मैत्री करणारा, असा असतो त्याच्या सन्निध वास करण्याकरितां लक्ष्मी आपण होऊन येते."

अव्यवसायिनमलसं दैवपरं साहसाच्च परिहीनं ॥
प्रमदा पतिमिव वृद्धं नेच्छति लक्ष्मी ह्युपस्यातुं ॥

"तरुण स्त्री वृद्ध पतीच्या जवळ जाण्यास जशी इच्छित नाहीं, तद्वत निरुद्योगी, आळशी, व दैवावर हवाला ठेऊन स्वस्थ बसणाऱ्या पुरुषाच्या समीप लक्ष्मी जात नाहीं."

वेपथुर्मलिनं वक्त्रं दीनवाग्गद्गद स्वरः ॥

मरणे यानि चिन्हानि तानि चिन्हानि याचके ॥

"आंग कंपीत होणें, मुख निस्तेज होणे, वाणीला दीनत्व येणें, आणि कंठांतून गद्गद स्वर निघणें, हीं जीं मरण काळचीं चिन्हें तीं याचकाचे ठिकाणीं दृष्टीस पडतात."

अनंकुरित कूर्चक:सतु सितोपलाढ्य पय: ॥
स एव धृत कूर्चक: सलवणांबुतक्रोपम: ॥
स एव सितकूर्चक: कथित गुग्गुलोद्वेगकृत ॥
भवंती हरिणीदृशां प्रियतमेषु भावास्त्रय: ॥

मृगनयना ज्या तरुणी त्यांस प्रियतम पुरुषा विषयीं तीन प्रकारचे भाव उत्पन्न होतात—ज्याच्या मुखावर केश उत्पन्न झाले नाहींत, असा पुरुष त्यांस शर्करामिश्रित दुधासारखा वाटतो, मुखावर केस आले असतां तो त्यांस मीठ आणि पाणी यांनीं मिश्रित तक्रा प्रमाणें वाटतो, अणि शुभ्र केश झालेला पुरुष तर गुग्गुळाच्या का-धासारखा तरुणीच्या मनास संताप देतो.

संमोहयंति मदयंति विडंबयंति ॥
निर्भत्सयंति रमयंति विषादियंति
एता: प्रविश्य सदयं हृदयं नराणां ॥
किंनाम वामनयना न समाचरंति ॥

" मृगनयना ज्या तरुणी त्या पुरुषाच्या अंत:करणांत प्रवेश असून त्याला मोहित करितात, त्यास मद उत्पन्न करितात, त्याची विटंबना करितात, निर्भत्सना करितात, त्याच्या चित्ताचें रंजन करितात व त्यास विषाद उत्पन्न करितात. "

कोशातः शिशवः सवारिसदनं पंकावृतंचांगणं ।
शय्या दंशवतीच रूक्षमशनं धूमेन पूर्णं गृहं ॥
भार्या निष्ठुरभाषिणी प्रभुरपि क्रोधेन पूर्णःसदा ॥
स्नानं शीतलवारिणाहि सततं धिग्धिग् गृहस्थाश्रमं ॥

"घरामध्यें पोरांची रडारड, ओलानें भरलेलें घर, अंगणांत खस्तपड केलें, ढेंकूण पिसवादिकांनीं युक्त शय्यास्थान, रूक्षभोजन, घरांत धूर कोंड केला, कर्कश भाषण करणारी स्त्री, यजमान सर्वदा रागावलेला, आणि नेहमी शातोदकाचें स्नान, अशा प्रकारच्या गृहस्थाश्रमाला धिक्कार असो"

असाधुः साधुर्वा भवति खलु जात्यैव पुरुषो ॥
नसंगाद्दौर्जन्यं नहि सुजनता कस्याचिदपि ॥
प्ररूढे संसर्गे मणि भुजगयोर्जन्म जनिते ॥
मणिर्नाहेर्दोषान् स्पृशति नाहिसर्पो मणिगुणवान् ॥

"पुरुषाचे आंगीं साधुता किंवा असाधुत्व हें स्वभावतःच असतें. हे गुण केवळ संगतीनें येतातच असें नाहीं. सर्प आणि त्याच्या मस्तकावरील मणी यांची जन्मतःच संगती असतांहि मण्याचे आंगीं सर्पाचे दोष किंवा सर्पाचे अंगीं मण्याचे गुण येत नाहींत."

अर्थी करोति दैन्यं लब्धार्थो गर्वपरितोषं
नष्टधनश्च सुशोकःसुखमास्ते निस्पृहःपुरुषः

"ज्याला द्रव्यार्जनाची इच्छा असते तो दीन होतो, द्रव्य प्राप्त झालें असतां तो गर्विष्ठ होतो आणि तेंच धन नष्ट झालें असतां शोक करतो तस्मात् निस्पृही पुरुषच खरोखर सुखी होय."

सन्मार्गे तावदास्ते प्रभवतिच नरस्तावदेवेंद्रियाणां ॥
लज्जां तावद्विधत्ते विनयमपि चमालंबते तावदेव ॥
भ्रूचाप कृष्टमुक्ताः श्रवणपथगता नीलपक्ष्माण एते ॥
यावल्लीलावतीनां न हृदि धृति मुषो दृष्टिबाणाः पतंति ॥

"पुरुष तोंपर्यंतच सन्मार्गानें वागतो, इंद्रियदमनहि तोंपर्यंतच करतो, लज्जेचा अंगीकारहि तों पावेतोंच करतो, व तोंपर्यंतच विनययुक्त असतो, किं जों पावेतों भ्रुकुटीरूप धनुष्यानें आकर्षण करून सोडलेलें आकर्ण नीलवर्ण पिसाऱ्यांनीं युक्त- तरुण स्त्रियांचे दृष्टिबाण त्याजवर पडत नाहींत.,,

शूरश्च कृतविद्यश्च रूपवत्यश्च योषितः ॥
यत्र यत्र गमिष्यंति तत्र तत्र कृतादराः ॥

" शूर आणि विद्वान पुरुष, व रूपसंपन्न तरुण स्त्रिया जेथें जेथें जातात तेथें त्यांचा बहुमान होतो. "

गुणै रुत्तुंगतां याति नोच्चैरासन संस्थितः ॥
प्रासादशिखरारूढः काकः किं गरुडायते ॥

"केवळ उच्चासनी बसल्यानेंच श्रेष्टता येत नाहीं, त्यास गुणांची अवश्यता आहे. प्रासादशिखरावर कावळा बसला तथापि त्यास कोणी गरुड ह्मणणार नाहींत."

नकश्चिदपि जानाति किं कस्यश्वो भविष्यति ॥
अतःश्वः करणीयानि कुर्यादद्यैव बुद्धिमान् ॥

" उद्यां कोणाचें काय होईल तें कांहीं सांगतां येत नाहीं, याकरितां बुद्धिमान पुरुषानें उद्यां करावयाचें कार्य आजच करून द्यावें"

# सद्धर्मदीप

अंक ६

## ज्ञानहीन कर्माभिमान.

अहंता गुणें सर्वही दुःख होतें ॥ मुखें बोलिलें ज्ञान तें व्यर्थ जातें ॥
सुखें राहतां सर्वही सूख आहे ॥ अहंता तुझी तूंचि शोधूनि पाहे ॥

(रामदास.)

ज्ञानावांचून कर्म व्यर्थ होय. अशा प्रकारचें कर्म केवळ दुःखासच कारण होतें कर्म करणारास त्याच्या कर्माचें ज्ञान अवश्य पाहिजे. मी कोण व जें कर्म करतों त्याचा हेतु काय, हें समजल्या वांचुन त्या कर्माचें फल होत नाहीं. कर्म मार्ग आणि ज्ञान मार्ग हे परार्थ संपादनांतील दोन भेद आहेत, कर्ममार्गापेक्षां ज्ञान मार्ग श्रेष्ठ मणला आहे. विचार करून पाहिलें असतां कर्म मार्ग हे ज्ञानोत्पत्तीस कारण असल्यामुळें ज्ञान प्राप्त झाल्या नंतर त्याचा लोप व्हावा हें उक्त आहे. ज्ञानी मनुष्यानें कर्म मार्गांत आपला अमुल्य वेळ फुकट दवडणें हें योग्य नाहीं. असो, हा कर्ममार्ग परमार्थ संबंधांतील एक भाग आहे म्हणुन वर म्हटलें, परंतु ऐहिक संबंधांत म्हणजे व्यवहारांतहि त्याचा पूर्णपणें प्रवेश दिसतो. परंतु ज्याप्रमाणें वरील प्रसंगीं तो ज्ञानावांचून व्यर्थ होतो, त्याच प्रमाणें व्यवहारांतहि ज्ञानावांचून कर्में सुखद होत नाहींत. ऐहिक संबंधानें हें कर्म कांड आपल्या जेवणाखाण्यांत, पेहेरावांत व लग्न मुंज इत्यादिकांत शिरलें आहे. अता याचा हेतु वाईट आहे असें नाहीं, परंतु त्याचें ज्ञान नसल्यामुळें या कर्माशीं मनुष्याचा संबंध केवळ भारवाहका प्रमाणें असतो. याविषयीं खात्री होण्याकरितां प्रथम विवाहा विषयीं थोडी माहिती देऊं. विवाह म्हणजे स्त्रीपुरुषांतील निकट संबंध जोडून देणारा

मार्ग होय. परंतु या कर्ममार्गांत आणि त्यासंबंधें लोकांमध्यें जो प्रचार पडला आहे त्यांत किती अंतर आहे तें पहा. या संबंधाची कांहीं माहिती लो. हि. निबंधांत सांगितली आहे ती घेऊन नंतर त्याजवर आम्ही आपले विचार सादर करूं:—

आतां धर्मशास्त्रामध्यें विवाह आठ प्रकारचे सांगितले आहेत ते:—

ब्राह्मोदैवस्तथैवार्षः प्राजापत्यस्तथासुरः ॥
गांधर्वोराक्षसश्चैव । पैशाचश्चाष्टतमोधम ॥ १॥

संस्कारकौस्तुभ.

अर्थ— १ ब्रह्मविवाह, २ देवविवाह, ३ आर्षविवाह, ४ प्रजापतिविवाह, ५ असुरविवाह, ६ गांधर्वविवाह, ७ राक्षसविवाह, ८ पिशाचविवाह यां पैकीं राक्षस व पिशाच विवाह हे कलीमध्यें वर्ज्य असून बाकीचे मान्य आहेत गांधर्व विवाहामध्यें संस्कार वगैरे नसून तो स्त्रीपुरुषांच्या फक्त अनुमतानें व परस्पर प्रीतीनें होतो. सांप्रत काळीं जो लोकांमध्ये विवाहाचा रूढी पडली आहे तिला ब्राह्मविवाह ह्मणतात.

आतां जन्मकाळीं ग्रह नक्षत्र वाईट अमल्याच्या वगैरे कारणानें नवरानवरीस त्यापासून अशुभ फलप्राप्ति असेल तर विवाहापूर्वी कांहीं संस्कार करीत असतात:—

कन्येच्या जन्मकाळीं ग्रह किंवा नक्षत्र वाईट असले, आणि त्यापासून तिचा नवरा जगणार नाहीं असें ज्योतिषमत असेल तर पहिल्यानें तिचा कुंभविवाह करावा असें शास्त्र व वहिवाट आहे. त्याचा प्रकार संस्कार कौस्तुभांत लिहिला आहे तो असा:—

विवाहोक्त यथा लग्ने ॥ कन्यां कुंभेन चोद्वहेत् ॥
सूत्रेण वेष्टयेत् पश्चात् ॥ दशतंतुविधानतः ॥ १ ॥
ततः कुंभेच नि ार्यं ॥ प्रभज्य सलिलाशये ॥

अर्थ — विवाहाचे अदले दिवशी कन्येनें मातीच्या घागरीं लग्न करावें, आणि उभयतांस विधिपूर्वक सुतानें बांधावें. नंतर तो कुंभ उ

दकामध्यें पोहून टाकावा. याचामात्र इतकाच कीं, तिचा पहिला नवरा मरून गेला तेव्हां आतां दुसरा करावयाचा तो जगेल. या कुंभविवाहामध्यें गणपती पूजन, नांदीश्राद्ध वगैरे झालें म्हणजे कन्यादानाचे वेळेस कर्ता खालीं लिहल्या प्रमाणें संकल्प करतो:—

वैधव्यहरकुंभविवाहकरिष्ये विष्णुरूपिणे कुंभाय
इमां आत्मजां कन्यां समर्पयामि

अर्थ — विष्णुरूपी जो कुंभ त्यास ही लक्ष्मीरूप कन्या अर्पण करितों. असा संकल्प करून!—

चंदन पुष्पादिक अलंकृतं कुंभं कन्यादेहंच वेष्टयेत्
ततःकुंभं सलिलाशये प्रभजेत् कन्या अभिषेच
समुद्रज्येष्ठा इति मंत्रेण ब्राह्मणान् भोजयेत्

अर्थ — चंदन पुष्पादिकांनीं अलंकृत अशा कुंभाला व कन्यादेहाचें वेष्टन करून नंतर तो कुंभ पाण्यामध्यें टाकून द्यावा. तो फोडिल्यावर समुद्र ज्येष्ठा या मंत्रे करून कन्येला अभिषेक करावा. नंतर ब्राह्मणभोजन घालावें. या प्रमाणें हा कुंभविवाह करितात. कर्मविपाकामध्यें वैधव्य हरण करणारा दुसरा उपाय सांगितला आहे तो श्रीविष्णूची प्रतिमा करून ती दान करावी, हा होय. हा प्रकार बायकोचा नवरा जगणार नाहीं असा जर योग असेल तर झाला.

आतां नवऱ्याची बायको जगणार नाहीं असा त्याच्या जन्मकालीं ग्रहनक्षत्रादिकांच्या अनुरोधानें योग असेल तर त्यास अशुभ होत सांगितला आहे. आतां नवऱ्याचें तिसरें लग्न असलें तर त्याचा उपाय असा सांगितला आहे कीं, रुईच्या झाडाशीं त्याचें लग्न लावावें. व नंतर स्त्रियेशीं विवाह करावा. म्हणजे तो चवथा विवाह झाला. रुईच्या झाडाशीं लग्न लावावयाचें त्याचा संकल्प:—

आदित्यस्य प्रपौत्रीं सवितुः पौत्रीं

अर्कस्य पुत्रीं काश्यपगोत्रां इमां अर्ककन्या
यथाशक्ति विभूषितां नारायण शर्मणे तुभ्यं दत्तां

**अर्थ**—ही आदित्याची पणती, सवित्याची नात, सूर्याची कन्या, हिजवर यथाशक्ति अलंकार घालून नारायण नावाचे जे तुह्मी त्या तुह्मास देतों. या प्रमाणे रुईशीं विवाह झाल्यावर प्रार्थना करावयाची ती:—

तृतीये द्वाहजं दोषं । निवारय सुखं कुरु॥

ह्मणजे आतां या तिसऱ्या लग्नाचा दोष निवारण करून सुख द्यावें. असो, हे प्रसंग विशेषीं करावयाचे संस्कार झाले.

आतां प्रस्तुतच्या विवाहा मध्यें संस्कार काय काय करावे लागतात, त्यांचा उद्देश काय, व त्यां पासून स्त्री पुरुषांमध्यें कोण कोणते करार होतात याजबद्दलची माहिती देऊं. विवाहाचे आरंभा पासून तों विवाहविधी समाप्त होई पर्यंत खालीं लिहिलेलीं कर्में करावीं लागतात.

१ वाग्निश्चय, (मागणी)

२ घाणा ह्मणून एक वृद्धाचार आहे त्यांत इतकेंच आहे कीं, दाणें कांडाव याचीं मुसळें व दळावयाचीं जातीं हीं एकीकडे ठेवितात.

३ उष्टी हळद, रुखवत, तेलफळ, हेही वृद्धाचारच आहेत.

४ सीमांतपूजन.

५ मधुपर्क.

६ गणेशपूजन.

७ स्वस्तिवाचन किंवा पुण्याहवनच.

१० नंदिन्यादि मंडप देवता प्रतिष्ठा, (देव देवक.)

११ कन्यादान

१२ मंगलसूत्रबंधन.

१३ नवऱ्यास दानें.

१४ पाणीग्रहण.

१५ लाजाहोम (विवाहहोम.)

१६ सप्तपदी.

८ मातृकापूजन.
९ नांदीश्राद्ध.
१७ उपासना.
१८ ऐरणीदान.
१९ गृहप्रवेश (मुलीला पहिल्यानें सासऱ्यास नेणे.)

या खेरीज दांतवण, रासन्हाणी, सुनमुख, पायघड्या वगैरे मानापमानाचीं अनेक कृत्यें वरील विवाहकर्मांत सारखींच प्रमुख बनून राहिलीं आहेत. परंतु त्यांस शास्त्राधार नसून तो केवळ शिष्टाचार आहे. असो, वर जीं विवाह कर्में सांगितलीं त्याची क्रिया खालीं अनुक्रमानें दिली आहे.——

वाग्निश्चय- ( मागणी ) हें लग्नाचे दिवशीं करतात. गुजराथी लोकांमध्यें याचा प्रचार आहे. त्यांच्यांत लग्नाचे पूर्वीं पुष्कळ दिवस मागणी करून ठेवितात व पुढें नवरा नवरी चांगलीं समजुतींत व वयांत आलीं म्हणजे विवाह करितात. आपल्या लोकांत याचा संप्रदाय नाहीं. वास्तविक पाहिलें असतां ही चाल फार जलदीची व सोईची आहे. या विधीचे योगानें नवरानवरीचा विवाह करण्या विषयीं त्यांचे पालनकर्ते परस्परांस वाचादत्त होतात. कितीही घाईने लग्न ठरलें व तें तावडतोब व्हावयाचें असलें तथापि हा वाग्दानविधि व्हावाच लागतो.

घाणा——हा एक वृद्धाचार आहे म्हणून वर सांगितलेंच आहे. तसेंच उष्टी हाळद म्हणजे नवऱ्यास लावलेली हळद शिल्लक ठेऊन ती नवरीला लावण्या करितां न्यावयाची, रुखवत म्हणजे वरास विवाहा करितां आपले घरांतून निघण्यापूर्वीं कन्येचे आईनें द्यावयाचें जेवण, वगैरे हेही वृद्धाचार म्हणून पूर्वीं सांगितलें आहेच.

मधुपर्क——कात्यायन सूत्रांत लिहिलें आहे कीं, गुरु, यज्ञास बलाविलेला ब्राह्मण, जांवई, राजा, मित्र व ब्रह्मचारी, यांची मधुपर्क पूजा करावी. ही पूजा दरसाल करावी, असेंही कात्यायनाचें मत आहे

धुपर्का विषयीं संस्कारकौस्तुभांत असें सांगितलें आहे कीं.

आश्वलायनोक्त मधुपर्क

गृहागतं स्नातकं वरं मधुपर्केणार्हयिष्ये
इति संकल्पयेत्। पाद्यं दत्वा। दधिमधु
सर्पिःप्राश्नीयात शेषं ब्राह्मणाय दद्यात् गौ
गौर्गौः। गोप्रतिनिधित्वेन छाग आलभ्यते,
उत्सर्जनपक्षे छाग एव निवेदनीयं। यदा
छागस्य प्रतिनिधित्वात निष्क्रायोदेयः।
ततः गंधमाल्यैः अभ्यर्चयेद्वरं॥

ह्मणजे वर घरीं येतांच त्यास पायधुण्यास पाणी देऊन दहीं, मध, व तूप, हीं एकत्र करून त्यास खाण्यास द्यावें. शेष राहिल तें ब्राह्मणास द्यावें. नंतर गाय, गाय, गाय, ह्मणून तिचा वध करावा किंवा गाईच्या बदला बकऱ्याचा करावा. उत्सर्जन पक्ष करणें असेल तर त्याची किंमत द्यावी. ह्मणजे मधुपर्काचे दोन प्रकार आहेत एक आलंभन ह्मणजे जनावराला ठार मारणें, आणि दुसरा उत्सर्जन ह्मणजे सोडून देणें किंवा त्याची किंमत देणें. असो वरील विधि आटोपल्यावर वराची गंधपुष्पांनीं पुजा करावी. वर जे दोन पक्ष सांगितले, त्यां पैकीं कात्यायन सूत्रांत आलंभन पक्षच लिहिला आहे. आश्वलायन सूत्रांत हि त्याचेंच ग्रहण केलें आहे.—

आचांतोदकाय शासमादाय (कात्यायनसुत्रे.(

गौरीतित्रिःप्राह याजवर गदाधराचें भाष्य —

असिखंडमादाय गांमानीय गौरित्युर्दयिता त्रि प्राह आलभ्यतां॥

ह्मणजे तरवार आणून गाईला उभी करून तीन वेळ गाय, गाय, गाय, असें ह्मणून तिला मारावी. आणि—

ममचामुष्यच पाप्मानं हनोमीति यद्यालभेत्॥

ह्मणजे कलियुगांमध्यें पाराशरानें गाईस मारणें निषेधिलें आहे या क

रितां त्याच्या ऐवजीं बकरें मारावें. याजवरूनच लग्नांमध्यें विहिणीचा भेट बकरा, व जमिदाराचा नेः बकरा ही चाल पडली असें दिसतें. प्राचिन काळीं अतिथीचे पुढें जनावर मारलें ह्मणजे त्याचा मोठा सन्मान झाला अशी समजुत होती व हा मान राजे, जांवई यांसच मिळत होता. ते व्हां त्याचा हा अंश राहिला आहे असें सिद्ध होतें. अस्तु. कौस्तुभकारानें ह्मटलें आहे कीं—

मांसेन भोजनंदानं

इतिमांसप्रतिनिधित्वेन माषविकारी भोजनो देयः

विनायकशांत्यादौ मांसप्रतिनिधित्वेन.

ह्मणजे ज्याची पुजा करावयाची त्याला मांसाचें भोजन द्यावें. परंतु त्याला प्रतिनिधी ह्मणजे मोंदला उडिदाचें अन्न केलें असतांहि होती असें धरिलें आहे. विनायकशांतीमध्यें मांस लिहिलें आहे तेथेंहि असाच प्रतिनिधि करतात.

कुळंबी वगैरे नवऱ्या पुढें प्रत्यक्ष बकरा मारितात, हें सर्वांस ठाऊकच आहे. परंतु वगैरेहि असेंच करितात. आणि पूर्वीं ब्राह्मण गायच मारीत होते याजविषयीं मनुचें वचन असें आहे कीं——

यज्ञार्थं पशवः सृष्टा ॥ स्वयमेव स्वयंभुवः ॥

मधुपर्केच यज्ञेच पितृदैवतकर्मणि ॥

अत्रैव पशवो हिंस्या नान्यत्रेत्यब्रवीन्मनुः

अध्याय ५ श्लोक ३९।४०

याचा अर्थ असा आहे कीं, देवानें जनावरें यज्ञा करितां निर्माण केलीं आहेत. यास्तव मधुपर्कांत, यज्ञामध्यें व श्राद्धादिकांत त्यांस मारल्याचा दोष नाहीं. उगीच मात्र मारूं नयेत.

या प्रमाणें पूर्वीं हा दुर्घट विधी सुश्लोक सांगितला होता. परंतु अलीकडे कलियुगा मध्यें मान्य जे पराशर ऋषि यांणीं आरंभीं लिहिलेंल्य

वाक्यानें त्याचा निषेध केला आहे. याच प्रमाणें हेमाद्रि निर्णयसिंधुंत स्कंदपुराणांतील एक वचन आहे—

गोत्रान् मातृसपिंडाच्च ॥ विवाहो गोवधस्तथा ॥
नराश्वमेधौ मद्यंच ॥ कलौ वर्ज्यं द्विजातिभिः ॥ १ ॥

ह्मणजे कलीमध्यें मामासीं सोयरगत, गोवध, नरमेध, अश्वमेध, आणि मद्यपान हीं ब्राह्मणांनीं करूं नयेत.

असो, याजवरून असें दिसतें कीं, राजा, जांवई, यांचा घरांत प्रवेश होतांना गाय किंवा बकरें मारण्याचा जो विधि आहे तो फार प्राचीन आहे. व हा अद्याप इराणामध्यें चालतो. मामलेदार व सुभेदार इराणचे मुलखांत फिरत असतां गांवकरी त्यांस मधुपर्क करितात, असें इराणच्या रहिवासी लोकानीं लिहिलें आहे, याजवरून ब्राह्मणांनीं ही चाल तिकडून आणली असावी पुढें फार वाईट आणि निर्दयपणाची दिसूं लागली ह्मणून बंद केली असावी असें दिसतें. या प्रमाणें या मधुपर्काचा पूर्वीं विधि चालू होता. प्रस्तुत त्याची खूण मात्र राहिली आहे.

गणेशपूजन—हा पुराणोक्त विधि आहे. गणपती ही विघ्नांचा नाश करणारी देवता मानलेली आहे. यास्तव कोणत्याही कार्याचे आरंभीं तांदुळांवर एक सुपारी मांडून तिला गणपती असें समजून ध्यात्वाति मंत्रानें तिची पूजा करितात. आतां विवाह हें मंगलकार्य असल्यामुळें हा एक आरंभींचा मुख्य विधीच आहे.

पुण्याहवाचन— कोणतेंहीं मंगल कार्य ब्राह्मणांचा आशिर्वाद घेतल्यावांचून किंवा त्याची संमती मिळविल्यावांचून आरंभूं नये, या विषयीं स्मृतींत सांगितलें आहे.

संपूज्य गंधमाल्याद्यै ॥ र्ब्राह्मणान् स्वस्तिवाचयेत्
धर्मकर्मणि मांगल्ये ॥ संग्रामे ऽद्भुत दर्शने ॥ व्या. ॥
वैदिके तांत्रिके चादौ ॥ ततःपुण्याह इष्यते ॥ शौनक ॥

अर्थ — कांहीं धर्मकर्म आरंभिलें असतां, मंगल कार्याचे ठायीं, पुत्रास जावयाचें असतां किंवा कांहीं अद्भुत दर्शन झालें असतां ब्राह्मणांची माल्यगंधादिकांनीं पूजा करावी. आणि त्यांच्या कडून आशीर्वाद घ्यावा. या प्रमाणें सर्व कर्मांत चार ब्राह्मणास बलावून आणून त्यांची प्रार्थना करून त्यांच्या तोंडानें पुण्याह असें ह्मणवितात. या शिवाय पुष्कळ वाक्यें योजिलीं आहेत. तीं हि ह्मणतात. त्यांत पुत्रास पैका मिळो, आयुष्य असो, ऋद्धिसिद्धि असो, अशा अनेक इष्ट पदार्थांचीं नावें घेऊन आशीर्वाद देतात. या कर्माचें नांव पुण्याहवाचन किंवा स्वस्तिवाचन ह्मणजे बरें ह्मणून घेणें.

नांदीश्राद्ध — मंगलकार्यामध्यें हें श्राद्ध प्रथम करावें असें आहे. हें दुर्वांनीं पवित्रक घालून करितात. यांत नांदीमुख हे देव मुख्य आहेत. इतर श्राद्धांमध्यें धुरिलोचन देव मुख्य आहेत. यांत नांदीमुखाः विश्वेदेवाः ह्मणजे चांगले तोंडाचे तुह्मी देव आहां असा संकल्प आहे आणि पितरांस द्राक्षें व आवळे द्यावे असा यांचा विधि आहे.

देवदेव — या मध्यें कितीएक देवांचे नांवें समिधा व आंब्याचीं पानें मढून त्या त्या देवता या मंगलकार्यांत मदत करतील ह्मणून त्यांची पूजा करून त्या घरांत ठेवितात. व लग्न झाल्या नंतर त्यांस उठवितात.

या नंतर कन्यादान ह्मणजे मुलगी नवऱ्यास द्यावयाची;

मुलीचें वर्णन.

आरोगिणीं भ्रातृमतीं । असमानार्षगोत्रजां ॥
अनन्यपूर्विकां कांतां । असपिंडायवीयसी ॥ १ ॥

अर्थ — प्रकृतीनें चांगली, जिला भाऊ आहेत, नवऱ्याचे प्रवरांतील व गोत्रांतील नव्हे, कुमारी, सुंदर, लहान, अशी ही मुलगी —

नवऱ्याचें वर्णन.

अव्यंगे पतिते क्लीबे ॥ दशदोषविवर्जिते ॥

इमांकन्यां प्रदास्यामि देवाग्निद्विजसन्निधौ ॥ १ ॥

अर्थ---हातापायांनीं धड, भ्रष्ट झालेला नव्हे, नपूंसक नाहीं, व दाहा दोष ज्यास नाहींत, अशा ह्या पुरुषास देव, अग्नि, व ब्राह्मण, यांच्या साक्षीनें ही कन्या देतों.

मम समस्त पितृणां निरतिशयसानंदब्रह्मलोकावाप्त्यादि
कन्यादानकल्पोक्तफलवाप्तये अनेन वरेण अस्यां कन्यां
यामुत्पादयिष्यमाणसंतत्या द्वादशवरान्द्वादशपरान्पुरुषान्पवित्रीकर्तुं
आत्मनश्चश्रीलक्ष्मीनारायणप्रीतये ब्राह्मविवाहविधिना
कन्यादानमहंकरिष्ये

अर्थ—माझे सर्व पितरांस निरवधि आनंद व ब्रह्मलोक प्राप्त व्हावा या करितां कन्यादान संकल्पाचें जें उक्त फल तें प्राप्त होण्यासाठीं या कन्येच्या ठायीं या वरापासून जी संतती होईल तणेंकरून माझे पितृपक्षाकडील १२ व मातृपक्षाकडील १२ पुरुष पवित्र व्हावे यासाठीं व श्रीलक्ष्मीनारायणाचे प्रीतीसाठीं मी ब्रह्मविवाहविधीनें आपले कन्येचें दान करितों.

## दान करण्याचा संकल्प.

आद्य वासिष्टगोत्रस्य त्रिप्रवरान्वित, रामचंद्र शर्मणे प्रपौत्राय
नारायण शर्मणे पौत्राय, गणेश शर्मणे पुत्राय
गोविंद शर्मणे श्रीधररूपिणे कन्यार्थिने स्नातकाय वराय,
भारद्वाज गोत्रस्य एकप्रवरान्विन, भास्कर शर्मणे प्रपौत्रीं,
वासुदेव शर्मणे पौत्रीं, जगन्नाथ शर्मणः पुत्रीं,
गंगाभिदां श्रीरूपां वरार्थिनीं, इमां कन्यां सालंकृतां प्रजापतिदेवत्यां
धर्मप्रजांसृजस्तुभ्यमहं संप्रददे

अर्थ—वसिष्ट गोत्रांतील त्रिप्रवरी रामचंद्र पंताचा पणतु, नारायणरावाचा नातु, गणेश पंताचा पुत्र गोविंदराव. श्रीधरस्वरूपी कन्यार्थी स्नातक म्हणजे उपनयन झालेला यास, भारद्वाज गोत्रांतील एक प्रवरी

भास्करपंताची पणती, वासुदेवरावाची नात, जगन्नाथपंताची मुलगी, गंगा—लक्ष्मीरूप—अलंकार घातलेली, जिचें प्रजापति दैवत, धर्म आणि प्रजा यांतें वाढवील अशी, मी तुजकारणें दान करितों.

याजवर वराचें उत्तर. कन्या प्रतिगृण्हामि.

अर्थ — या कन्येचें मी ग्रहण करितों.

नंतर सासरा जांवयास ह्मणतो:--

विश्वंभर: सर्वभूता: साक्षिण्य: सर्व देवता:॥
इमां कन्यांप्रदास्यामि पितृणां तारणायच ॥
तुभ्यं विप्र मया दत्तां पुत्रपौत्र प्रवर्धिनीं ॥
धर्मेच अर्थेच कामेच नातिचरितव्या त्वयेयं

अर्थ—हे ब्राह्मणा, परमेश्वर, तशींच पंच महाभूतें, व सर्व देवता, यांच्या साक्षीनें पुत्रपौत्रातें वाढविणारी अशी ही मी आपली कन्या पितरांच्या तारणा प्रीत्यर्थ तुला दिली. आतां तूं इला धर्माविषयीं, व अर्थाविषयीं, व कामाविषयीं, अतंर देऊं नको.

याजवर जांवयाचें उत्तर.

नातिचरामि, नातिचरामि, नातिचरामि.

“अंतर देणार नाहीं.” असें त्रिवार ह्मणावयाचें.

ओं स्वस्ति ( शुभ असो. )

याप्रमाणे दान झाल्यावर मुलीचे गळ्यांत मंगळसूत्र बांधितात, व नवऱ्यास दानें देऊन त्याचा बहुमान करितात. नंतर पाणी ग्रहण ह्मणजे मुलीचा हात मुलाचें हातीं देतात. व शेवटीं लाह्या आणि तूप यांचा थोडासा होम करितात. त्यांतील मुख्य देवता:—

अग्नि पवमानं, अग्नि प्रजापतिं, वरुणाग्निं, पुरुषाग्नि, अर्यमाग्निं, या आहेत. नंतर तांदुळाच्या राशी करून त्याजवरून नवरीस सात पावलें चालवितात. हीं ७ पावलें नवऱ्याबरोबर आयुष्य मर्यादेपर्यन्त राहावयाचीं सूचक आहेत. या ठिकाणीं विवाह संस्कार समाप्त होतो,

नंतर स्मार्ताग्नि सिद्ध करावा, हा सायंप्रातर उपासना. नंतर दुसरे दिवशीं ऐरणी दान, गौरीहराची पूजा, वगैरे सामान्य व्रतविधि आहेत. या प्रमाणें हा एकदर विवाहविधि झाला.

आतां प्रस्तुतकाळी होणारे सर्व विवाहामध्यें जरी वरील प्रमाणेंच विधि होतो, तथापि त्याचा मूळ हेतु, त्याजबद्दल नवरा नवरीचे मनाची समजूत, कन्यादान करणारास आपले कर्तव्याची माहिती, आणि वर व वधु यांजमध्यें होणारे परस्पर करार, यांचें त्यांस कितपत ज्ञान असतें हें प्रत्येकानें आपल्या मनाशीं ताडून पाहिलें असतां त्याचे लक्षांत येईल. ज्या प्रमाणे नवऱ्यानें कोणतेहि कामास आरंभ केला ह्मणजे बायकोनें त्याच्या हाताला हात लाविला असतां तिचें अनुमोदन मिळालें असें समजतात. त्याच प्रमाणें भटजीनें मंत्र ह्मणून त्या प्रमाणें कन्या दान कर्ते व नवरानवरी यांणीं तत्रकेलें ह्मणजेझालेंसर्वकाम झालें असें मानतात, परंतु आपण करार करावयास सांगतों काय, व आपले यजमान करार करतात काय याची उपाध्ये बुवा व कार्य कर्ते यजमान याउभयतांसहि दाद नसते, एकाद्या न्यायाच्या कोर्टापढें प्रतिज्ञेवर एक अक्षर खोटें सांगा वयाचें झालें तर ज्यांना अवघड वाटतें, असे पापभिरु लोक देखील वरील विधींमध्यें "गतानुगतिको लोकः" या न्यायास अनुसरून चालतात. व केवळ खोट्या शपता जाणून बुजून घेतात. या पेक्षां हा विवाह विधि न करितां मुलीचें उघड लिलांव किंवा फरोक्त खत केलें असतां चांगलें. करण, साठ वर्षांच्या ह्मातारड्याला सात वर्षांची सुकुमार कन्या हजार पांचशें रुपये घेऊन द्यावयाची ठरली तथापि उपाध्ये बुवा यजमाना कडून खालीं लिहिल्या प्रमाणे संकल्प करवितात, व यजमान तो करतात:—

अव्यंगे पतिते क्लीबे॥ दशदोष विवर्जिते॥
इमां कन्यां प्रदास्यामि॥ देवाग्निद्विजसन्निधौ॥ १॥

अर्थ— हातापायांनीं सुदृढ, भ्रष्ट झालेला नव्हे, नपुंसक नाहीं, व

दाहा दोष ज्याला नाहींत, अशा पुरुषास देव, अग्नि, व ब्राह्मण यांच्या साक्षीनें ही कन्या देतों.

आतां देव, अग्नि, व ब्राह्मण, यांच्या समक्ष उघड खोटी शपत घेणारे व घेविणारे यजमान आणि उपाध्ये यांस कोणत्या नरक लोकाची वाट शोधावी लागेल याचें अनुमान त्यांणींच करावें. तसेंच कन्यादानाचा संकल्प करावयाचा आणि आचार सर्व कन्या विक्रयाचा चालवावयाचा तेव्हां यला काय ह्मणावें? कन्यादानाचे वेळचे प्रसंगीं हा मुलीचे बापाला ऐवज पटला नसेल तर तो आपला हात आटकुन धरितो, तसेंच पुत्रविक्रय ह्मणजे हुंड्याची जी चाल प्रस्तुत पडली आहे त्यास अनुसरून झालेले करारांची रकम जर मुलीचे बापाकडुन मुलाचे बापास पावली नसेल तर तोही मध्यें काहीं तरी बखेडा घालून कार्य अटकून धरितो. तेव्हां अशा या घप्याघोळाचे विधीला ह्मणावें तरी काय? विवाह किंवा बाजारचा सट्टा?

आतां कन्यादानाचे प्रसंगीं मुलीचा बाप जांवयास जें ह्मणतो कीं— हे ब्राह्मणा, परमेश्वर, तशींच पंचमहाभूतें, व सर्व देवता, यांच्या साक्षीनें पुत्रपौत्रातें वढविणारी अशी ही मी अपली कन्या पितरांच्या तारणा प्रीत्यर्थ तुला दिली. आतां तूं हिला धर्माविषयीं, अर्थाविषयीं, व कामाविषयीं अंतर देऊं नको.

कन्यादान करणाराच्या अशा प्रार्थनेस जांवईबोवांचेंही ठरींव उत्तर असतें, मग तें जांवयास समजत असो किंवा नसो,परतु आमच्या उपाध्येबुवांस कांहीं तें पाठ येत असल्यामुळें ते त्याच्याकडून एकदां चुकत माकत वसें तरी ह्मणवितात. तें उत्तर आह्मी वरतीं दर्शविलेंच आहे त्याचें तात्पर्य हेंच कीं, मी क्वचित क्वाचित अंतर देणार नाहीं. आतां मुलीचा बाप जो देव ब्राह्मणाच्या समक्ष संकल्प करितो कीं, मी आपली कन्या पितरांच्या तारणा प्रीत्यर्थ तुला दिली. परतु या संकल्पाची सत्यता सालोसालीं होणार हजारों कन्या दानामध्यें कितीचे ठि

वाणी असेल वरें! कित्येक विवाहप्रसंग किंवा ज्या मध्यें केवळ कन्या व वर विक्रयाचा निवळ धंदा दृष्टीस पडतो त्या मध्यें तर आमच्या मतें "पितरांच्या तारणाप्रीत्यर्थ" याच्या ऐवजीं "उदरपोषणाप्रीत्यर्थ" असा संकल्प केला असतां फार बरें होईल. कारण त्या पासून असत्यपणाचा तरी दोष लागणार नाहीं. एका पातका करितां आणखी दुसरें पातक करणें आणि तें धार्मिक कृत्य व मोठा आवश्यकतेचा विधि आहे असें मानणें याहून आणखी वेडगळपणा तो कोणता? असो, तेव्हां तात्पर्य काय कीं आपल्या प्रस्तुत विवाह विधीचा असा फार्स होऊन गेला आहे हल्लीं ज्या विधीनें विवाह होतो त्याला ब्रह्म विवाह ह्मणतात हें वर सांगितलें असून याचा प्रकारही सांगितला आहे. परंतु त्या वरकमीं विधीमध्यें आणि विवाहाचा जो प्रचार पडत चालला आहे त्या मध्यें जें जमीन अस्मानाचें अंतर दृष्टीस पडतें त्याज वरून प्रस्तुतचे विवाहाला विवाह ही तरी संज्ञा लागू करतां येईल किंवा नाहीं हाच आरंभीं एक मोठा प्रश्न उत्पन्न होतो. तेव्हां या प्रश्नाचा सर्वांनीं आपल्या अंत: करणांत उलगडा करून या निंद्य प्रचाराचा प्रसार न होऊं देतां विवाह विधीचे खऱ्या हेतुच्या सिद्धीकरितां होईल तोंपर्यंत त्यांणीं झटावें, हें कर्तव्य होय. या विवाह विधीची अशी निकृष्टावस्था होण्याचें कारण विशेषें करून बालविवाह होय. या विवाहा पासून शेंकडों प्रकारचीं नुकसानें होत आहेत हें अनेक वेळा सिद्ध केलें गेलें असून याचा अनुभवही पुष्कळांस आलेला आहे. तेव्हां या सर्व गोष्टींचा प्रत्येक हितेच्छूनें विचार करावा.

वर जो विवाहविधी सांगितला त्यांत विवाहसंबंधीं कर्में कमी होतात असें मुळींच नाहीं. कर्में सर्व होतात. परंतु त्या कर्मांचें कर्त्यास ज्ञान नसल्यामुळें त्या कर्मांचे हेतुशीं आणि कर्त्यांचे आचरणाशीं मुळींच मेळ नसतो. याचप्रमाणें व्यवहारांत अनेक कर्में आहेत. हें कर्म कांब मोठें

जगड्व्याळ आहे. स्नानसंध्या, देवपूजा, यज्ञयाग, तीर्थयात्रा, होमहवन, कथा पुराण यांचें श्रवण, आणि जपतपादि सर्व मार्ग कर्मकांडाचे होत या कर्म मार्गाचा मुख्य हेतु ज्ञानप्राप्ति आणि चित्तशुद्धी होय. चित्ताची मलीनता दूर झाली नाहीं व ज्ञानप्राप्ति झाली नाहीं तर अनेक वर्षें पर्यंत हीं कर्मं केलीं तरी व्यर्थ होत. मनुष्य जें कर्म करतो त्यास त्याचे कर्माचें ज्ञान असल्यावांचून तें कर्म त्याच्या हिताहिताविषयीं कारणीभूत धरलें जात नाहीं व जाऊं नये हा न्यायहि आहे. ज्ञानसहित केलेलें कर्म सफल होतें, कर्माच्या योग्या योग्यपणा विषयीं कर्ता अज्ञानी असेल तर कर्म यथा सांग होत नाहीं, आणि यथासांग कर्म झाल्यावांचून तें कर्त्याला श्रेयस्कर होत नाहीं. आतां याजवरून कदाचित् कोणास अशी शंका येइल कीं, कर्माचें ज्ञान नसलें म्हणून तें कर्म सर्वथैव निर्फलच होईल हें कशावरून? असें समजा कीं आपण कांहीं झाडांच्या बिया जमिनींत पुरल्या, आतां त्या पुरतांना आपल्यास त्या कोणकोणते झाडाच्या बिया आहेत हें माहित नाहीं. म्हणून रुजते वेळेस त्या बियां पासून सजातीय अंकूर उत्पन्न होणार नाहीं काय? तसेंच त्या बियां पासून वृक्षांवर फळें येणार नाहींत काय! अर्थात् तें कर्म सफल होईल व ज्ञान नसल्यमुळें त्यांत कांहीं विपर्यासहि होणार नाहीं. मग अशी स्थिति अहे तर कर्म सोडून उगाच ज्ञानाचे मार्ग धुंडाळीत बसण्यांत व ज्ञानजन्य विचारानें आपल्या माथ्याचा मेंदू बिघडवण्यांत अर्थ काय? आतां प्रथमतः ही शंका खरी आहे असें मनांत येईल व या व्यवहारिक अनुभवा वरून परमार्था विषयींहि लोकांची अशी समजूत होते. आणि याचमुळें केवळ नामसंकीर्तनादि मार्गांत लोकांनीं शिरून ज्ञानाकडे दुर्लक्ष केलें आहे. एखाद्या विद्वानाच्या ग्रंथांत आपल्या कर्मास अनुकूल असा एखादा लेख पाहिला ह्मणजे त्याच्या पूर्वापार संबंधाकडे लक्ष नदेतां लोक मनसोक्त आचरण करूं लागतात. एखादे ठिकाणीं कर्म मार्गाकडे श्रेष्ठत्व दिलें असलें ह्मणजे लोक ज्ञानाकडे दुर्लक्ष करून कर्मेंच करीत बस

तात. कीं ज्ञात्याला कर्म अवश्य नाहींत असा कुठें आधार मिळाला ह्मणजे पाखंडी कर्मठ लोकांची थट्टा करून उगाच मी ज्ञानी अशा घमेंडीनें बडबड करीत असतात. परंतु ज्ञानावांचून कर्माचा अभिमान बाळगणारे दांभिक आणि सत्कर्मानें चित्तशुद्धी न झालेले 'मी ज्ञानी' असा अभिमान बाळगणारे पाखंडी हे दोघेहि मुर्ख होत. नुसता नामसंकीर्तनाचा टाहो फोडल्यानें आपणांस स्वर्गांवरून विमान येईल व त्यांत बसून आपण तुकारामाप्रमाणे अगल सदेह स्वर्गसुख भोगण्यास जाऊं अशा समजुतीनें लोक पुढील एक एक आधार दाखवितात:—

मोठा कलिचा गुण हा कीं केशव कीर्तनेंचि सर्व तरे ॥
वैकुंठ पेठ मोठी नामावर होत दीन खट पटती ॥
राजा हरिचरितांचें गाणें हें वज्र पाप पर्वत रे ॥

( मोरोपंत )

अजित नाम वदो भलत्या मिसें ॥
सकल पातक भस्म करीतसे ॥
शर्वकंठ विषगर्व हराया ॥ शक्त नामचि तुझें रघुराया ॥
सेतुसागर कपी उतराया ॥ नामसेतु भवसिंधु तराया ॥
न कळतहि पडे हा विष्णुनामाग्नि जेथें ॥
दुरिततृणगृहाचें भस्म होणार तेथें ॥

[ वामन ]

नामसंकीर्तन साधन हें सोपें ।
जळतील पापें जन्मांतरींचीं ॥
मलत्याकाळीं नामावळी ॥ सुलभ भोळ्या भाविकां ॥
नामेंचि तारीले कोट्यानहि कोटी ॥ नामेंचि वैकुंठीं बैसविले ॥
नामापरतें सार नाहीं त्रिभुवनीं ॥ तें कां तुह्मी मनीं आठवाना ॥
तुका ह्मणे नाम वेदांसीं आगळें ॥ तें दिलें गोपाळें फुकासाठीं ॥

( पु० चा० ) ( तुकाराम )

# स्वात्मानंद

(मा० अं०७० पु० चा०)

तैसा हा ब्रह्मप्रकाश जाणणे ॥ तो अनुभवें ना ब्रह्मप्रेरणाविजे ॥
सद्गुरुकृपें अनुभवणें ॥ निवांत धरणे चरणासीं ॥ ३२ ॥
एवं जें हृदयाब्रह्मणति ॥ श्रुति वदे बाळाग्र निश्चिति ॥
सूक्ष्माहोनि सूक्ष्म जाणती ॥ योगी रमती जयाठाईं ॥ ३३ ॥
सच्छास्त्रांतरीं निर्धार ॥ ब्रह्मरंध्र तें दावावें द्वार ।
तो हा बोलिला विचार ॥ अनुभवसार जीवींचा जो ॥३४ ॥
वाचा चारी तेथूनि उठती ॥ तनु प्रमाणे तैशाच रीति ॥
अवस्था हो उद्भवती ॥ तेथूनि निघती जाण खरें ॥ ३५ ॥
त त्यादीक जे का स्वर ॥ व्यंजनें अजपाजप साचार ॥
हृद्बिंदु विसांश्व निर्धार ॥ निज मारासार समजणे ॥ ३६ ॥
अष्ट अब्जें जीं बोलती ॥ दोना पादकमळें होती ॥
दोनी हस्तपद्में जाणती ॥ चतुर्थ ये रीती सांगीतली ॥ ३७ ॥
नाभीपद्म हृदयपद्म जाण ॥ दोनी पद्में दोनी नयन ॥
अष्टपद्माचें विवरण ॥ केलें कथन तुजलागीं ॥ ३८ ॥
या अष्ट आब्जांपरतें ॥ हृदयांबुज तयाच्या अंतरीं तें ॥
विश्वसतें न वागतें ॥सत्ता येक ते निजात्मता ॥ ३९ ॥
रक्त श्वेत शामवर्ण ॥ मात्र त्रय शोभती जाण ॥
अग्नी चंद्र रवि पूर्ण ॥ ऐसे त्रय वर्ण शोभताती ॥ ४० ॥
बिंदूचे आंत विलसती ॥ तो कोश त्रिकोण निश्चिती ॥
नीळ सुनीळ जो का प्रभोक्ति ॥ पीतमय मध्य अति श्वेत ते ॥ ४१ ॥
त्यानाजी हृदयाचि ॥ त्या अनुभावजे बिंदुरूपासि ॥
बिंडांडाति व्यापूनि सर्वास ॥ तेहीं विलास बाळाग्रवत ॥ ४२ ॥
तें षोडश जीवशीवमयें ॥ ते ग्रंथी भेदीज स्वयें ॥
तेव्हां स्वात्मसुखाब्धीचा अन्वयें ॥ अनुभव होय आत्मत्वेंसी ॥ ४३ ॥

जो श्रुतिशास्त्रस्वरूप सम्यकें ॥ आपुल्या हृदयातें नोळखे ॥
प्रकाश मूर्ती स्वात्मा तेयें कौतुकें ॥ कैसा वोळखे विलसे त्यातें ॥ ४४ ॥
शब्दज्ञान समग्र श्रवणीं ॥ श्रवणरंध्राविरहित नायके कोणी ॥
तैसें या हृदया न जाणुनी ॥ कैसी त्या लागुनी कळे स्वज्योती ॥ ४५ ॥
कर्णद्वारें निरोधितां ॥ ध्वनी अनुभवीतो तत्वतां ॥
सर्वअंतरनाळीच्या आइत्या ॥ निःशब्द पर त्या सहजींच्या ॥ ४६ ॥
तींच छिद्रें मुक्त करितां ॥ तेव्हां बाह्य शब्दार्थ होय परिमिता ॥
एवं हा हृदय हृद्यामय ध्वनिता ॥ होय विकसिता श्रोत्ररंध्रीं ॥ ४७ ॥
तैसा ब्रह्माब्धीं विश्वात्मक ॥ निज हृदयीं लक्षितां आकळे देख ॥
जैसा कां अव्यक्त पावक ॥ अनुभव सम्यक लक्षवेना ॥ ४८ ॥
तोचि काष्टाच्या आवृतीनें ॥ परामित होतां इंधनें ॥
कळायुक्त भासे तेणें ॥ तोचि व्यक्तपणें दिसे तेव्हां ॥ ४९ ॥
काष्ठत्यागेंची पुन्हा तो ॥ न दिसोनि स्वयें निघतो ॥
तेवी स्थुळाश्रयीं आत्मा भासतो ॥ प्रत्यया येतो चलनयोगें ॥ ५० ॥
जैशा त्रयतनुच्या आकृति ॥ जडतनु त्यजितां अदृष्ट निश्चिती ॥
न दिसे अव्यक्त गती ॥ आत्मप्रतिती तथापरी ॥ ५१ ॥
तुर्या ज्योतिप्रकाशात्मक तनु ॥ विकसी कालिमा सुषुप्ती कारणु ॥
ऊष्मा ते लिंगदेहप्रमाणु ॥ जड स्थूळ जाण काष्टात्मक ॥ ५२ ॥
स्थूळतनूवांचानि निश्चिति ॥ न भासति त्रयतनुच्या आकृति ॥
अनुभव तो स्थुळींहीं प्रतिति ॥ सुजन जाणति भक्त साचे ॥ ५३ ॥
म्हणोनी स्थुळदेह कारण ॥ भक्तां रसात्मक प्रमाण ॥
ज्ञान वैराग्य आपण ॥ निःसीम जाण स्वरूपप्राप्ती ॥ ५४ ॥
सहज जो कां या तनुचें ॥ परिमीत पहातां साचें ॥
अधिष्ठान बोलिलों याचें ॥ बंधन जीवाचें तुटावया ॥ ५५ ॥
पंचभूतें कारण होती ॥ कार्यरूप तनु या निश्चिती ॥
तयाची द्विविधा आकृति ॥ निज सूक्ष्ममती पाहाणें ते ॥ ५६

मूर्तें सर्वही व्याप्य होती ॥ परी परिछिन्नत्वें देहस्थिति ॥
मतांमाजीं द्विविधाकृति ॥ भासे या रीतीं प्रमाणता ॥५७॥
वायु दाहक मूर्तिमंत ॥ जलधी सर्वोत्तमा भेदत ॥
जावया परतीरासीं सेतु रचित ॥ तरुणोपायार्थ बोलिला जो ॥५८॥
जागृतभूमीं स्वरूप निश्चित ॥ स्वप्न जडरूप भासत ॥
सुषुप्तत्वावस्था व ही होत ॥ त्यामाजि मारुत तुरिया ते ॥ ५९ ॥
स्वरूपीं उन्मनि अन्वयबोध ॥ आकाशात्मक ह्मणोनि द्विविध ॥
तनु भासती प्रसिद्ध ॥ निजात्म आद जाणावी ते ॥६० ॥
हे पृथिव्यात्मक स्थूळ देह ॥ त्या यातें व्यापूनि असति निःसंदेह ॥
ऐसें त्रय देहात्मक गेह ॥ अवस्था सहज सेजे कां ॥ ६१ ॥
पर्वांगुष्टा प्रमाण निर्धारी ॥ तेथें सूक्ष्म तनु स्वप्नअवस्था खरी ॥
एवंव्यातितुरीये उन्मनी माझारी घडे प्रमाणांतरीं देहाचय ॥ ६२॥
या सर्व तनुचा प्रत्यय ॥ अनुभविजे ज्यागृति माजी स्वयें ॥
भोगीजे पूर्ण समाधीचो सोय ॥ उन्मनिमय ब्रह्म किं तो ॥ ६३॥
सर्वोत्कृष्ट महाबिंदु-अचला ॥ ओंकारबिंदु प्रति भला ॥
तेथें मौन्यगिरा ध्वनि प्रसरला ॥ ऊर्ध्व कमळाहुनि वरितें ॥ ६४
त्याहुनि दशनादयुक्त ॥ अधःस्वरूपीं अर्धेंदुपरे आंत ॥
हंसस्थान विकासुनि तेथ ॥ गीरा विकासीत श्रोत्रांतरीं ॥ ६५॥
पश्यंति द्विदळाहूनि अध ॥ विशुद्धहुनि उर्ध्वी असे प्रसिद्ध ॥
सर्वार्थाप्रति लक्षुनि बोध ॥ विचार विविध होत असे ॥ ६६ ॥
प्रणवीच्या कुंडलस्थाने वसे ॥ हंसाचा जप मध्यमे होतसे ॥
ओंकार दंडका पुरि मिळे ॥ पुढा प्रवेशे वैसा पाहा ॥ ६७ ॥
चारी वर्ण विनादयुक्त ॥ वरान दावि स्वयें वैखरीत ॥
ऐसा हा तुज मथितार्थ ॥ वाचेचा अर्थ निरोपीला ॥ ६८ ॥
तेलाचि धार उर्ध्वी जैसी ॥ अधोहुनि गळते निश्चयेसा ॥
ते अविछिन्न परियेसी ॥ ॥ पाहा दृष्टांतेसी वदतसे ॥ ६९ ॥

तेथें अग्र ऊर्ध्व विंधुहुनी ॥ भानि श्रवते ऐश्वर्यरूपें करुनी ॥
हे अनाहतचक्र घेरें ध्यानीं ॥ सुचवीं उन्मनीने श्रीगुरूच्या ॥ ७० ॥
मग तेथुनि नाद क्रिया शक्तिसी ॥ जनन घडे मूळचाचा परेसी ॥
फर्शांते अर्थ सुषुम्नक विकासी ॥ दशदळेसी अक्षरें वदवी ॥ ७१ ॥
नाभिस्थानाहुनी द्वादशदळ ॥ व्यापुनियां ते ग्रीवा मूळ ॥
मात्रांचा घोष गोचर सकळ ॥ स्फुट श्रोतें बव्हळ मध्यमाते ॥ ७२ ॥
कंठ पोठ अक्षर गतीसी ॥ तिच्या विकसुनि स्वरांसी ॥
मग वर्णादी वैखरिसी ॥ उच्चार सरसी होत असे ॥ ७३ ॥
एवं ज्ञान क्रियात्मक ॥ अनुमित निजात्मा येक ॥
स्वयें लक्षीति ते ज्ञानसम्यक ॥ देव मूर्तिमत शिवात्मा तो ॥ ७४ ॥
त्याची काय वानिजे महिमा ॥ तो स्वात्मसुखेंचि निजात्मा ॥
निवोनियां आत्मयारामा ॥ निजात्मधामा पावला तो ॥ ७५ ॥
श्रीसद्गुरुकृपेची अक्षरें ॥ येकाकि निघती येक सरें ॥
जैसी रवितेजाचेनि कल्हारें ॥ विकसीत बारे शोभीवतें ॥ ७६ ॥
पुढील ग्रंथीं अवधान ॥ संतसज्जनीं द्यावें आपण ॥
विनवी दासानुदास पूर्ण ॥ पदरजरेण तुमचा मी ॥ ७७ ॥
इति श्रीस्वात्मानंदार्चिते ॥ श्रीपूर्णदासविरचिते ॥
निजात्मस्वरूपवर्णनं नाम ॥ तृतीय उल्हासः ॥ ३ ॥

---

## उल्हास ४ था.

श्रीमद्गुरुचारूपादपद्मकर ॥ ज्याच्या पडे मस्तकावर ॥
तया दुर्गम तें सुगमकर ॥ होत साचार भाविका ॥ १ ॥
जो लक्षात्मक निर्विकल्प ॥ स्फुरतो सदा स्वानंद स्वयंसंकल्प ॥
तो देहप्राणमनइंद्रियें साक्षेप ॥ जीवादि स्वरूप स्फुरविता ॥ २ ॥

विकसे विश्रामस्वरूप आपण ॥ अविश्रम तोचि परिपूर्ण ॥
निजानंद कारणा कारण ॥ भक्ततारण निजात्मा जो ॥ ३ ॥
ते विश्रातारिग श्रीनाथता ॥ गमतो कल्पांत बुद्धींद्रिया तत्वता ॥
तो सर्वात्मक मोद स्वानुभविता ॥ लक्षोनी सर्वाधता अनुभाविजे ॥ ४ ॥
तुर्येचीणें स्फुरणप्रमेत निश्चितें ॥ जग भासे क्षुद्र निर्लक्ष तें ॥
दइया [illegible] वि सुनि लक्षतें ॥ विलसे ज्ञानातें व्यापुनियां ॥ ५ ॥
नीरीं फेंस जैसा कां दिसे ॥ प्रभांतरीं जग तैसें भासे ॥
स्वलक्षार्थीं फळ प्राप्त ऐसें ॥ होत अद्वैतें निजानंदीं ॥ ६ ॥
एवं सर्व अलक्ष लक्ष ॥ अवघा लक्षार्थ आत्माची दक्ष ॥
हें स्वानुभवें आपण प्रत्यक्ष ॥ होऊनि स्वसाक्ष असणे जें ॥ ७ ॥
ओंकारा परतें निरीक्षण ॥ जयाचे अंतरदृष्टीचें जाण ॥
शुद्ध प्रकाशरूप दावी आपण॥ अर्जुना श्रीकृष्ण दिव्यदृष्टी ॥८॥
मुद्रा द्वादश लक्षूनि पाहातां ॥ त्रैलोक्य दावी दिशा तत्वता ॥
तैसें ब्रह्मनिरीक्षणीं अनंतता ॥ असती सत्ता अंतरगतो ॥ ९ ॥
ओंकारावरी तें निरीक्षण ॥ स्वसत्ताज्ञप्ती रूपांतरीं जाण ॥
विज्ञानात्मक योगज्ञान ॥त्रिधा दृष्टि खुण जयाभीतरीं ॥१०॥
ज्ञानांजनरूप अंजन असा ॥ जड ही या दृष्टीचा जो ठसा ॥
सर्वी ब्रह्म निरीक्षणांतरीं ऐसा॥ अनंत जैशा गति सत्ता ॥ ११ ॥
जैसी गर्भासी ते गर्भिणी ॥ धरूनि वर्ते अभिन्नपणीं ॥
ऐक्यत्वें या प्रकारें करूनि ॥ सर्वत्र नयनीं देखतीते ॥१२॥
तैसा परशाब्दमय शक्तितें ॥ सक्ष्म असे हृदयव्यापक तेथें॥
तीं आदि वर्णतत्वें जग सर्व तें ॥ अवघ्या कर्मे नें बोधालेंपे ॥ १३ ॥
येका तंतुमाजी जैसीं ॥ सकळही सुमने गुंफिलीं एसीं ॥
तोष स्थिरचर पहा विश्वयेंसी ॥ येकात्मतेसी वर्ततसे ॥ १४ ॥
विश्वात्मा विश्व भरीत ॥ पिपोलिका श्रेष्ठादी समस्त ॥
व्याप्यव्यापकपणें तोची होत ॥ येकचि अद्वैत परमात्मा ॥१५॥

सूर्याचें बिंब जैसें परिमित ॥ परि त्याची प्रभा असंख्यात ॥
तेवि बिंदुस्वरूपीं बीजयुक्त ॥ अति सूक्ष्मवत पद्म आहे ॥१६॥
बालाग्रतुल्य बिंबांतरीं ॥ सकळ प्रभा ब्रह्म रंध्राभीतरीं॥
स्वयें असे व्या निर्धारीं ॥ आत्मसाक्षात्कारी जाणती॥१७॥
त्याच्या रश्मिभिंतावरी ॥ जग विलसे चित्राकारीं ॥
मृगजळप्राय निर्धारीं ॥ तथा नानापरी भासतसे ॥१८॥
जैसें कां गंधर्व नगर ॥ कीं आकाशा निळीमा साचार ॥
जैसी जळामाजी दिसे गार ॥ तैसा जगविस्तार ब्रह्मीं दिसे ॥१९॥
आरंभीं तोनी अग्रात्मक ॥ प्रणव स्वयें वर्ततो देख ॥
स्थूळदेहीं याचें कौतुक ॥ पाहा सम्यक विचारूनि ॥२०॥
उत्पत्ति मृत्यु जरादीक देहीं ॥ त्रय अवस्था त्रयताप पाहीं ॥
कफवात पित्तादि सर्वही ॥ तनुत्रयतेही स्थूळ ऐसी ॥२१॥
जैसी घटीकायंत्री छिद्रीं येक ॥ त्यांत भरत हळुचा उदक॥
मग अकस्मात तव बुडत देख ॥ नवल कौतुक पाहा कैसें ॥२२॥
नव छिद्रें या देहासी ॥ संकल्प जळ विकल्प जळ विषयरसीं ॥
क्षणक्षीणाभरे त्रिगुणेसी ॥ बुडतां तयासी वेळ काय ॥ २३॥
त्रयधातु शरीर होत ॥ अच्युत हें अशाश्वत॥
तेथे देहात्मक बुद्धी कल्पित ॥ मीचि म्हणत भुलोनियां ॥२४॥
मग पुत्र कलत्र समस्त ॥ स्वजन परीवार मानी आप्त ॥
पशु भूमा जं जें निपजत ॥ आवडी धरीत तया ठायीं ॥२५॥
पृथ्वीपा व स्वयमेव ॥ उत्पन्न दगड मानी देव ॥
जो कां जगदात्मा देवाधिदेव ॥ सर्वगतभाव जाणेचि ना ॥ २६ ॥
येकचि परब्रह्म निश्चिती ॥ पिपीलिकाब्रह्मादी अंतीं ॥
जैसी गंगा यमुना भागीरथी ॥ तीर्थप्रतिति एक नीर ॥२७॥
भेददृष्टी जें का पाहणें ॥ तें पशुपक्षादिकांचें जीणें ॥
वास्तव येकात्मकते करूनि वर्तणे ॥ परब्रह्मपणें निज दृष्टी ॥२८॥

न तरे या भवप्रवाहीं ॥ ह्मणोनि आद्यांति पाहीं ॥
स्थापिलें तारक पद तें ही ॥ याविणें नाहीं तरणोपाय ॥२९ ॥
हा श्रेष्ट मंत्रराज तारक ॥ भवार्णवीं नवकाचि देख ॥
अर्थविशेषें करूनिं चोख ॥ निजात्मसुख पावावें तें ॥ ३०॥
मंत्रा माजी थोर मंत्रबीज ॥ जो का तारक मंत्रराज ॥
जपतां हरे विषयभोज ॥ उद्धरी सहज भावीकांसी ॥ ३१ ॥
जैसें शरीर गात्रीं शीर प्रधान ॥ जें का परांशवाचें निजस्थान ॥
ब्रह्मरंध्रीं करितां गमन ॥ तरीजे आपण अनायासें ॥ ३२ ॥
जैसें कां नदी माजी चालतां ॥ आकंठपर्यंत उदक येतां ॥
धरणीचे चरण तत्वता ॥ नुचलती सर्वथा स्थीर होती ॥ ३३ ॥
तेंचि उदक मस्तकापरियेत ॥ वाढतां आपेआप निश्चित ॥
सहज चरण उचलत ॥ पाय न धारत धरणीतें ॥ ३४ ॥
हें काय नवल ह्मणसी जरी ॥ तरी अधराखालीं पीठ निर्धारी ॥
वरी तारक ब्रह्मांडविवरीं ॥ सुजना उद्धरो परशीर ॥ ३५ ॥
तो आपण न बुडे भवसागरीं ॥ संगें परमात्मा जीवा उद्धरी ॥
हा बुजावया दृष्टांत विवरीं ॥ भावें मन धरीं निजरूपीं ॥ ३६ ॥
ओंकारीं पंचमात्रात्मक तनु ही ॥ अनुभवितां ब्रह्मची देहीं ॥
येथें संशयची नाहीं ॥ पाहा आन कांहीं न बोलवे ॥ ३७ ॥
जैसा त्या दों चक्रें करूनी ॥ गाडा चाले वेगें करूनी ॥
तैसें प्रारब्ध प्रयत्न दोनी मिळोनी ॥ शरीर जनीं प्रतिपाळीता ॥ ३८ ॥
बीजा ऐसीं धान्यें पिकती ॥ जळ संयोग मिळतां तीं ॥
तैसीं भोगीं प्रारब्धीक फळें येती ॥ क्वचित् निश्चिति यत्न करितां ॥ ३९ ॥
नद्यांलागीं जलधीनें तत्वतां ॥ उदासीनपणा धरितां ॥
तरी त्या नद्यांसी गमनता ॥ तेथेंचि सर्वथा घडतसे ॥ ४० ॥
तैसी दात्या घरीं प्राप्ती घडत ॥ अथवा कांहीं न घडत ॥
तरी त्या साधुचें गमन तेथ ॥ घडे निश्चित सहजता ॥ ४१ ॥

ज्याचा पुत्र परमात्माश्रीहरी ॥ त्याणे प्राण शोकें दिधला शिर्यारी ॥
ज्याचा बाळक श्रीमुरारी ॥ त्यापदीं साचारी शृंखळा ते ॥ ४२ ॥
ज्याचा सारथी विश्वपाळ हरी ॥ तो वसतसे नीच्या विराट घरीं ॥
नीचत्व सेवा अंगिकारी ॥ प्रारब्ध सर्वापरी न चुकेचि ॥ ४३ ॥
जरी आत्मनिष्ठ सत्य जाहला ॥ तरीं प्रारब्ध भोगितसे उगला ॥
न गुंते देहाभिमानें बांधिला ॥ स्वरूपीं मनाला राखीतसे ॥ ४४ ॥
जैसा सूर्य आपुल्या स्वदेहासीं ॥ दिसुनिया दृश्य विश्वा विकासी ॥
तैसा स्वात्मा स्वरूपीं जग विलसी ॥ स्वयें प्रकासी आपणातें ॥ ४५ ॥
ल्क्षी ल्क्षार्थ नाहीं स्थिती ॥ म्हणोनि वदती तया श्रुती ॥
स्वसंवेद्य ऐशा रिती ॥ आत्मप्रतितीचेनि योगें ॥ ४६ ॥
वाचा वर्णी स्वज्ञानेतें ॥ दूषण गाळुनि जें का उरतें ॥
तोंचि स्वदशान निरुतें ॥ कल्पनेतीत तें स्वस्तरगें ॥ ४७ ॥
जैसा आपुलीया मुखेचि वदतो ॥ लोक प्रयधासि पाहतो ॥
त्याचा आपणाचि अर्थ घेतो ॥ विश्रांति पावतो श्रवणें महा ॥४८॥
श्रोते वक्तेपणीं येक ॥ अद्वय आपणचो देख ॥
तैसा विश्वात्मा प्रकाशक ॥ असे सम्यक सर्वदा तो ॥४९॥
ल्क्षी स्वात्माचो स्वांगीं निर्वाण ॥ जग विलसवोनि आपण ॥
नासुनि द्वैतलेश भान ॥ स्वयें चिद्घन विराजीत ॥५०॥
अग्नी चंद्र रवि व्हाउनि विशेष ॥ सोज्वळ महा ब्रह्मप्रकाश ॥
स्वयें असे सावकाश ॥ निजात्मा परेश निर्मळ जो ॥५१॥
पंचानंद अनुहत ध्वनी ॥ स्फुरे तयेंचि अन्वयेंकरूनी ॥
ऐसें सद्गुरुरूपें जाणुनी ॥ निरंतर मनीं रमवितें ॥५२॥
एवं सूक्ष्म हृदयांबुजांत ॥ विलसे जरी हें चित्त ॥
तेथ जडे तरी निभ्रांत ॥ एकत्वें द्वैत निरसुनी जाय ॥५३॥
पूर्वीचीं सुकृतें निश्चिता ॥ जरी अंमळयें केलीं असतां ॥
तोंचे फळें फळा येती ॥ स्वअंतरीं चित्तीं ध्यान जडे ॥ ५४ ॥ पु० चा०

# परमार्थबोधक जुनी कविता

## पद

कोणे एके दिवसीं प्रातःसमयीं होतें माहेरीं ॥
तेथें एक योगी आला त्याची काय सांगू थोरी ॥
दिशा वस्त्र परिधान करूनियां माझेग शेजारीं ॥
एका एकी येऊनी बसला मज धरिलें पदरीं ॥
चाल ॥ ह्मणे चाल तुला मी नेतो निज ठायां ॥
तुझी करुणा पाहून आलों धावुनियां ॥
भवताप हरील श्री गुरु करील छाया ॥
भय मानुनी कष्टी होऊं नको वायां ॥
ऐसें बोलुनी कानीं लागुनी मग मी न करी बोभाट ॥
प्रपंच रुचेना ह्मणुनि धरिलो मुळ घरची वाट ॥ १ ॥
गुज सांगितलें हृदय मंदिरीं प्रवेशलें वेगें ॥
तूतें ह्मणतां वेड्या वाणी झालें मजलागीं ॥
लज्जा सोडुनि शिघ्र चालली केवळ अनुरागी ॥
बोधगर्भ मम हृदयीं राहिला त्याचेग संयोगी ॥
चाल ॥ आतां लोक निंदिती मम धाईट करणी ॥
माय ह्मणे बहकली लेक कशी नवी तरणी ॥
श्वानाच्या समुदायांत जशी ग हरणी ॥
मी रत झालें बाई सद्गुरूच्या चरणीं ॥
इत्यादिक योग साच्या चालवि वाट ॥२॥
संकल्पाचें लुगडें फेडुनि मी झालें उघडी ॥
गुणत्रयाची वेणी उकलुनि काय चुडा फोडी ॥
सुसंग पाहुनी निसंग झालें त्रिगुण सुत्र तोडी ॥
मी माझें हें मी पण विसरुनी झालें हो वेडी ॥

मला गोडी लागली उत्तम संगतीची ॥
मी अंकित झालें बाई सद्गुरु चरणाची ॥
आतां वाट मोडली येण्या ग जाण्याची ॥
मला मूर्ति भेटली केवळ करुणेची
देह बुद्धि हे दुष्ट कल्पना केली हो सपाट ॥
शेण मानी काट ग गोट टाकिती धुरवासी ॥
परपुरषाची संगत पाहूनि मजला उपहासी ॥
कुळ बुडवी हे रांड जन्मली चांदणीचे कुशीं ॥
ऐकुनि कानीं हे जन वाणी मजला हासी ॥
चाल ॥ मी गरजांत एकाडीच अनुसरलें ॥
त्या योगें ग माझें सकळ कार्य घडलें ॥
हें माझें ग बाई मजला अनुभवलें ॥
सद्गुरु कृपावरदान मला फळलें ॥
देवनाथ हा गुरु सुताचा केवळ घनदाट ॥ ४ ॥

## पद

लागला रे उंदीर हें तनु विषयाचें घर ॥ ध्रु० ॥
काम, क्रोध, मद, मत्सर ॥ आणि दोन्ही दंभ अहंकार ॥
मिळून सहाजण उंदीर ॥ लागी कातर लावी कातर ॥ १ ॥
आशा, मनशा तृष्णा कल्पना ॥ माया इनक्या घुशी जाणा ॥
माझ्या घरची केली दैना ॥ उकरला केर ॥ २ ॥
मग मी गुरुला गेलें शरण ॥ मजवर गुरुनें कृपा करून ॥
अनुग्रहाचो दिला मज खुण ॥ मांजर बोका ॥ ३ ॥
शांति विवेक मांजर बोका ॥ त्या दोघांशीं आणिलें देखा ॥
उंदीर घुशी पळाल्या धाका ॥ उडाला केर ॥ ४ ॥

## पद

खोज करो कोई ये तन आंदर ॥ चली आजपकी माला रे ॥
दसवे मंदीर तारा लागे ॥ झुला नाथ गोपाळारे ॥ ध्रु० ॥
सहज समाधी मुद्रा लागी ॥ लीया प्रेमरस प्याला रे ॥
जात पात कुल भेद नजाने ॥ लीया प्रेम नीवाला रे ॥ १ ॥
लाल पिलपर सफेद चोखा ॥ तापर शाम सलोनारे ॥
उसके आंदर शाम सलोचन ॥ निकसत चंदा बालारे ॥ २ ॥
निपठ निरंजन चरपट मौला ॥ गले मोतनकी मालारे ॥
आसन पाद दिलपाक नगीना ॥ ले खांदे मृग छालारे ॥ ३ ॥
नाथ नबीके दास गोपाला ॥ सचा पिलाया प्यालारे ॥
रंग भई सब तनमन आखिया ॥ तीन लोक उजियालारे ॥
खोज करो कोई ये तन आंदर ॥ ४ ॥

## पद

बोलोरे भया गोविंद राम हरी ॥ ध्रु० ॥
हरीनाम कहते कछु नहि लागत ॥
छुटत नही गठडी ॥ बोलोरे भया० ॥ १ ॥
तन धन हे सब सुखके कारण ॥
तब ते भूल परी ॥ बोलोरे भया० ॥ २ ॥
कहत कबीरा नाम न मुखमो ॥
उस मुखमो धूल परी ॥ बोलोरे भया० ॥ ३ ॥

## पद

पिहुकी बोले न बोल ॥ पपैया प्यारे ॥ ध्रु० ॥
तै खोलना मेरा जीय डरत है ॥ तन मन डाया डोल ॥ पपै० ॥ १ ॥
तोरे बिना मोकूं पीर आवत है ॥ जीयरा करूंगी मै मोल ॥ प० ॥ २ ॥
मीराके प्रभु गिरीधर नागर ॥ कामनकी करत किलोल ॥ प० ॥ ३ ॥

## पद

काय कराचा योग ॥ साजणी काय कराचा योग ॥ ध्रु ० ॥
यादवरायें कागद लिहिला ॥ कळहदा अमुचा भोग सा० ॥ १ ॥
रेचक पूरक कुंभक करितां ॥ आगीं जडतो रोग ॥ सा ० ॥ २ ॥
प्रभु पुष्पेश्वर म्हणतो याचा ॥ कोणाला उपयोग ॥ सा ० ॥ ३ ॥

## पद

तो ध्याई गिरिधारी मना ॥ तो ध्याई ०॥ ध्रु ० ॥
माधव मुरारी ॥ ज्याचें वंदी त्रिपुरारी ॥ तो ध्या ० ॥ १ ॥
यमुनेच्या तिरीं खालों ॥ हुतुतु हुंबरी ॥ तो ध्या० ॥ २ ॥
नंदाचा खल्लारी ॥ गाई वृंदावनीं चारी ॥ तो ध्या ० ॥ ३॥
भक्तांचा कैवारी ॥ रक्षी गोपाळां पाचारी ॥ तो ध्या ० ॥४ ॥
गोळ्यायांच्या नारी ॥ करवी कैवल्याचीकारी ॥ तो ध्या ० ॥५
येऊनी संसारा ॥ प्राण्या मज तू कौमारी ॥ तो ध्या ० ॥ ६ ॥
पूर्ण अवतारी ॥ जयराम सुत तारी ॥ तो ध्या ० ॥ ७ ॥

## पद

या घोर संसारीं सुख कैसें बापा ॥ या घोर ० ॥ ध्रु ० ॥
गर्भमाळतरीं अर्भक होऊनी ॥
दुर्धर पावसी तापा ॥ या घोर ० ॥ १ ॥
बाळपणीं मूढ चाळक यौवनीं ॥
भाळती त्या समचापा ॥ या घोर ० ॥ २ ॥
वार्धिकीं राग विवर्धित दुस्तर ॥
वृद्ध हाणी यम थापा । या घोर ० ॥ ३ ॥
आनंद नंदन साधन जाणुनी ॥
मागती भक्ति प्रतापा ॥ या घोरसं ० ॥ ४ ॥

# सुभाषित.

मित्रं प्रीतिरसायनं नयनयोरानंदनं चेतसः ।
पात्रं यत् सुखदुःखयोः सहभवेन्मित्रेण तद्दुर्लभं ॥
येचान्ये सुहृदः समृद्धिसमये द्रव्याभिलाषाकुला ।
स्ते सर्वत्र मिलंति तत्त्वनिकषग्रावातु तेषां विपत् ॥ ६७ ॥

"सन्मित्राचें दर्शन हें प्रीतिवर्धक आणि चित्ताला आनंद देणारें आहे. सुख दुःखसमयीं अनुकूल असणारा मित्र दुर्लभ होय. सुहृदादिक हे तर चालत्या काळांत द्रव्यादिकाचे इच्छेनें सहज गोळा होतात परंतु विपत्ती प्राप्त झाली असतां ते सर्व दूर होतात."

इहलोकेऽपि धनिनां परोपी स्वजनायते ॥
स्वजनोऽपि दरिद्राणां तत्क्षणाद्दुर्जनायते ॥ ६८ ॥

"जे श्रीमंत आहेत त्यांजवळ परकी लोकहि आप्तपणानें वागतात पण जे दरिद्री आहेत त्यांचे आप्तजनहि त्यांचा द्वेष करितात."

शशिनीव हिमार्तानां घर्मार्तानां यथा रवौ ॥
मनो न रमते स्त्रीणां जराजीर्णेंद्रिये पतौ ॥ ६९ ॥

"थंडीनें काकडलेला मनुष्य ज्या प्रमाणें चंद्राचा तिरस्कार करितो व उन्हानें घामाघूम झालेला मनुष्य ज्या प्रमाणें सूर्या विषयीं तिरस्कृत होतो, तद्वत असें ज्याचीं सर्व इंद्रियें गलित झालीं आहेत अशा पतीशीं तरुण स्त्रियेची गांठ पडली असतां ती त्याचा तिरस्कार करिते."

नैर्मल्यं वपुषः तवास्ति वसतिः पद्माकरे जायते ॥
मंदं याहि मनोरमां वद गिरं मौनं नसंपादय ॥
धन्यस्त्वं बक राजहंसपदवीं प्राप्तो सि किं तैर्गुणैः॥
नीरक्षीरविभागकर्मनिपुणा शक्तिः कथं लभ्यते ॥ ७० ॥

" हे बका तुझें शरीर स्वच्छ आहे, सरोवरांत तुझी वस्ती आहे तुझी गती मंद आहे, या शिवाय तूं मौन सोडून मधूर शब्दहि करी तोस, तथापि या सर्व गुणांनीं तुला हंसता कशी प्राप्त होईल? कारण, एकत्र झालेलें पाणी आणि दूध यांस पुनः निरनिराळें करण्याची जी हंसाची अलौकिक शक्ति ती तुला कशानें प्राप्त होईल? " तेव्हां बाह्य गुणानें केवळ श्रेष्ठता मिळत नाहीं हा भाव.

कस्यापि कोप्यतिशयोस्ति सते नलोके
ख्यातीं प्रयाति नहि सर्वविदस्तु सर्वे
किं केतकी फलति किं पनसः सुपुष्पः
किं नागवल्ल्यपिच पुष्पफलैरुपेते ॥ ७१ ॥

" अमुक एक प्रकारचे पुष्कळ गुण अंगीं असले तरच लोकांमध्यें प्रसिद्धी होते असें नाहीं. कारण सर्व वस्तूंचे ठिकाणीं कांहीं सर्वज्ञता नाहीं. केतकी वृक्षाची लोकांत सर्वमान्य कीर्ति आहे ती केवळ सुगंधित पुष्पाचे योगानें, त्याला कांहीं फळें येत नाहींत, फणसाला सुगंधी पुष्पें येत नाहींत, आणि नागवेलीला तर पुष्पें आणि फळें हीं दोन्हीहि येत नाहींत. "

तृणं ब्रह्मविदः स्वर्गस्तृणं शूरस्य जीवितं ॥
जिताक्षस्य तृणं नारी निस्पृहस्य तृणं जगत् ॥

"ब्रह्मज्ञानी आहे त्याला स्वर्ग तुच्छ होय, शूराला जिवित तुच्छ होय, इंद्रिय निग्रह केला आहे अशा पुरुषाला स्त्री तृणवत होय, आणि निस्पृह मनुष्याला तर सर्व जग तुच्छ होय"

अन्यानि शास्त्राणि विनोदमात्रं ।
प्राप्तेषु कालेषु न तैश्च किंचित् ॥
चिकित्सत ज्योतिषमंत्रवादाः ।
पदे पदे प्रत्ययमावहति ॥ ७४ ॥

"अनेक प्रकारचीं जरी शास्त्रें आहेत तथापि तीं केवळ विनोदमात्र होत, तीं लोकानुभवाला येण्याचा कधीं प्रसंगच येत नाहीं. सर्व शास्त्रामध्यें वैद्यशास्त्र, ज्योतिष, आणि मंत्रशास्त्र, हीं मात्र यथार्थ होत, कारण मनुष्याला त्याचा पदोपदीं प्रत्यय येतो."

कौपीनं भस्मना लेपो दर्भा रुद्राक्षमालिका ॥
मौनमेकांतिका चेति मूर्खसंजीवनानि षट् ॥ ७५ ॥

"कौपीन, भस्मधारण, दर्भ, रुद्राक्षमाळा, मौन आणि एकांत वास, हीं मूर्खाच्या उपजीवनाचीं साधनें होत. म्हणजे पूर्वोक्त वस्तूंच्या धारणादिकानें मूर्ख मनुष्य ढोंग माजवून आपला उदरनिर्वाह करितो."

शशी दिवसधूसरो गलितयौवना कामिनी ।
सरो विगतवारिजं मुखमनक्षरं स्वाकृतेः ॥
प्रभुर्धनपरायणः सततदुर्गतः सज्जनो ॥
नृपांगणगतः खलो मनसि सप्त शल्यानि मे ॥ ७६ ॥

"दिवसा निस्तेज झालेला असा चंद्र, जिचें तारुण्य गत झालें आहे अशी स्त्री, कमलानीं रहित असें सरोवर, ज्यांतून शब्द निघत नाहीं असें मुख, द्रव्यलोभी राजा, सर्वदा दरिद्री असा विद्वान, आणि राजाच्या प्रीतींतला खळ मनुष्य, हीं मनुष्याच्या अंतःकरणांतील सप्तशल्यें होत. म्हणजे या गोष्टी लोकाला दुःखित करितात.

वधंत्यरण्येषु चरंति दुर्वां पिबंति यो यान्यपरिग्रहाणि ॥
तथापि वध्या हरिणा नराणां को लोकमाराधयितुं समर्थः ॥ ७७ ॥

"अरण्यामध्यें राहून दुर्वांकुरांवर उपजीवन करणारे मृगांचादि लोक वध करितात, यावरून लोकां पासून अपकृति न होण्या सारखें वागणें फार कठीण आहे."

यद्यपि चंदन विटपी विधिना फलकुसुमवर्जितोऽहिकृतः ॥
निज वपुषैव परेषां तथापि संतापमपनयति ॥ ७८ ॥

"चंदन वृक्षाला जरी पुष्पें किंवा फळें येत नाहीत, तथापि तो स्वतःचा देह झिजवून लोकांच्या तापाचें शांतवन करितो." ही अर्थात् अन्योक्ति आहे. खरोखर ज्याला लोक कल्याणाचीच इच्छा आहे त्यास द्रव्यादिक अनुकूळ नसलीं तरी तो तें यथाशक्ति करितोच.

अनुचित कर्मारंभः स्वजनविरोधो बलीयासि स्पर्धा ॥
प्रमदाजनविश्वासो मृत्युद्वाराणि चत्वारि ॥ ७९ ॥

अनुचित कार्याला आरंभ करणें, स्वजनाशीं विरोध करणें, बलवान मनुष्याशीं स्पर्धा करणें, आणि स्त्रिजनावर विश्वास ठेवणें हीं चार मृत्यूचीं द्वारें होत."

सुलभः पुरुषा राजन् सततं प्रियवादिनः ॥
अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः ॥ ८० ॥

"हे राजा, तोंडा पुरतें गोड बोलणारे असे पुरुष पुष्कळ असतात, परंतु अप्रिय असून हितकर असें भाषण करणारा वक्ता व तें ऐकून घेणारा श्रोताहि दुर्लभ होय."

| | |
|---|---|
| रा॰ रा॰ काशीनाथ विष्णु ग्यानेश्वर इकलकरंजी .... .... | १८९ |
| मि॰ दुलाजी बंधुजी कानस्टेबल वेड .... .... .... | १८९ |
| रा॰ रा॰ लक्ष्मणराव कृष्णाजी देवरी .... .... .... | १८९ |
| रा॰ रा॰ राजाराम शंकर मोरो तासगांव .... .... .... | १८९ |
| रा॰ रा॰ शंकर अवाजी फडके अकोट .... .... .... | १८९ |
| रा॰ रा॰ बाळाजी कृष्ण ठाकूर बेळगांव .... .... .... | १८९ |
| रा॰ रा॰ गणेश रामचंद्र पराजे दुधेवन .... .... .... | १८९ |
| रा॰ रा॰ केशव आबाजी कुळकर्णी संकेश्वर .... .... .... | १ |
| रा॰ रा॰ नरसिंगराव देशपांडये शिरसंगी ... .... .... | १ |
| रा॰ रा॰ गोविंदराव दिनाजी डाक्टर बडोदा .... .... | १८९ |
| रा॰ रा॰ दिनकर गणेश धारप उमरावती .... .... | १८९ |

( सदाशीव मल्हारराव माहाजन यांचे मार्फत )

| | |
|---|---|
| रा॰ रा॰ भास्कर गोविंद आठवले श्रीवर्धन .... .... .... | १८९ |
| रा॰ रा॰ नारायण विनायक साठे रत्नागिरी .... .... | १८९ |
| रा॰ रा॰ आत्माराम कृष्ण घोंड रत्नागिरी .... .... .... | १८९ |
| रा॰ रा॰ कृष्णाजी बापुजी मालवण .... .... .... | १८९ |
| रा॰ रा॰ केशव बाळकृष्ण रानडे रत्नागिरी .... .... .... | १८९ |
| रा॰ रा॰ येशवंत लिंगोशेट वकील रत्नागिरी .... .... | १८९ |
| रा॰ रा॰ रामचंद्र गणेश बापट रत्नागिरी | १८९ |
| रा॰ रा॰ शिताराम भगवंत सुळे रत्नागिरी | १८९ |
| रा॰ रा॰ बाळाजी गोविंद नेने रत्नागिरी | १८९ |

( हरीसिंग खुमासिंग यांचे मार्फत )

| | |
|---|---|
| रा॰ रा॰ रावजी गणेश घायाळ चांदोद | १८९ |
| रा॰ रा॰ खंडेराव जनार्दन भ इ॰ बडोदा | १८९ |
| रा॰ रा॰ जनार्दन मल्हारराव गाडगीळ बडोदा | १८९ |
| रा॰ रा॰ हरी नारायण मास्तर बडोदा | १८९ |
| रा॰ रा॰ विनायकराव बन्याबा बडोदा | १८९ |
| रा॰ रा॰ पुरुषोत्तम गोविंद रोडे बडोदा | १८९ |

बामन सखाराम महाजन यांचे मार्फत )

| | |
|---|---|
| रा॰ रा॰ भवानी वि॰ शेटी पाटील करकंब . . . . . . | १८९ |
| रा॰ रा॰ गणेश सदाशिव अक्कलकोटकर कुरुडवाडी . . . | १८९ |

रा० रा० गोपाळ पांडुरंग दिवेकर वैराग . . . . . . . १८९
रा० रा० गणेश रामचंद्र भारगीळ कुडुवाची वाडी . . . . १८९
रा० रा० दामोदर रामचंद्र गोखले कुडुवाची वाडी १८९
रा० रा० श्रीधर नारायण कुळकर्णी कडलास १८९
रा० रा० दामोदर एकनाथ शिमलर सोलापुर १८९

(रामचंद्र नारायण फडणीस यांचे मार्फत)

रा. रा. आत्माराम गणेश पटवर्धन धुळें .... .... .... १८९
रा. रा. वासुदेव पांडुरंग पिंपळखरे धुळें .... .... .... १८९
मे० केशोशिंग बक्षी वकील इंदूर .... .... .... .... १८९
श्री. रा. नारायणराव होळकर इंदूर .... .... .... ....१८१
—नेटिव लायब्ररी इंदूर .... .... .... .... १८५
रा. रा. गोपाळ पांडुरंग इंदूर .... .... .... १८९
रा. रा. रावजी बळवंत फाटक इंदूर .... .... .... १८९
ए० श्रीनिवासराव जज्ज इंदूर .... .... .... १८९
रा. रा. विठ्ठल अनंदराव कारकून इंदूर .... .... १८९
रा. रा. नारायणराव रंगोबा इंदूर .... .... १८९
रा. रा. विष्णु विनायक चितळे इंदूर .... .... १८९
रा० रा० गणपतराव शिवाजी इंदूर १८९
रा० रा० बळवंत त्रिंबक उर्फ [illegible] इंदूर १८९

( प्रभाकर गणेश मालखंडे यांचे मार्फत )

श्री० रा० गुजाबा राजे [illegible] .... .... .... .... १ ०
रा० रा० सखाराम महादेव पंडित वाई .... .... .... १८९
रा० रा० हरी विठ्ठल फाटक सातारा .... .... .... १८२
रा० रा० बळवंत वासुदेव जोगळेकर सातारा .... .... १८२
रा० रा० केशव वामन महाजनी सातारा .... .... .... १८२
" गणपतराव त्रिंबक [illegible] पळशें .... .... १८९
" त्रिंबक दाजी जोशी पळशें .... .... .... .... १८९
— नेटीव लायब्ररी कर्जत .... .... ... .... .... १८९
रा० रा० विनायक रामचंद्र [illegible] पळशें .... .... .... १८९
रा० रा० गणेश हरी गोडबोले नेरें .... .... .... .... १८९
रा० रा० महादेव मोरेश्वर जोशी [illegible] .... .... .... १८९

( राहिलेला मजकूर पुढील अंकात येईल )

वर्ष अगाऊ किंमत वर्षाची १ रुपया दुसरें

सत्य शांति सौख्य

# सद्धर्मदीप

माघ शके १८०१

अंक ७

मार्गे मार्गे निर्मलं साधुवृंदं । वृंदे वृंदे तत्वचिंतानुवादः ॥
वादे वादे जायते तत्वबोधो । बोधे बोधे सच्चिदानंदभासः ॥



अहीबाग

'सत्यसदन' छापखान्यांत छापिलें

फुटकळ अंकाची किंमत चार आणे

आगाऊ किंमत पुस्तक सुरू केल्यापासून एक महिन्याचे आंत दिली पाहिजे.

पुस्तकाचे किंमती शिवाय टपाल खर्चाबद्दल प्रत्येक अंकास आर्धा आणा जास्त पडेल

# विषयांची अनुक्रमणिका


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १ सदसद्विचार .... .... .... .... | १९३ |
| २ स्वहित, स्वदेशहित, आणि सार्वजनिक हित .... .... .... | २०२ |
| ३ स्वात्मानंद ( कवित्व ) .... .... .... | २१७ |
| ४ सुभाषित. .... .... .... .... | २२१ |


## वसूल

(आषाढ शके १८०२अखेर)

| | |
|---|---|
| रा०रा०श्रीपाद बाळकृष्ण भिडे नारंगी .... .... .... | १८६ |
| रा०रा०विठ्ठल आबाजी गडकरी वाकळ .... . . . . . . . | १८६ |
| रा०रा०दादा सठवाजी माळी मुखेडे .... . . . . . . . . . | १८६ |
| रा०रा० व्यंकाजी गणेश कोलगुडकर चिकोडी .... . . . . | १८६ |
| रा०रा०पांडुरंग नारायण वागळे सतवास .... . . . . . . . | १ |
| रा०रा०विष्णु पांडुरंग कुळकर्णी अकोट .... . . . . . . . | १८६ |

(प्रभाकर गणेश भातखंडे यांचे मार्फत)

| | |
|---|---|
| रा० रा० रामचंद्र व्यंकटेश पतकी रहिमतपूर .... .... .... | १८६ |
| शे० आबा वल्द बापुभाई रहिमतपूर .... .... .... .... | १ |

( रामचंद्र नारायण फडणिस यांचे मार्फत. )

| | |
|---|---|
| रा० रा० कृष्णराव गोपाळ पाटक देवास .... .... | १८६ |
| श्रि० रा० व० पांडुरंग तात्या गोरे देवास .... .... .... | १८६ |
| रा० रा० रामराव गोविंद पंडित सारंगपूर .... .... .... | १८६ |
| रा० रा० अमृतराव बाबा सा० दिवाण देवास .... .... .... | १८६ |
| रा० रा० त्रिंबक गणेश आपटे देवास .... .... .... .... | १८६ |
| श्री० राजे नारायणराव दादा सा० देवास .... .... .... | १८६ |
| रा० रा० कृष्णराव रामचंद्र दांडेकर देवास .... .... .... | १८३ |

# सद्धर्म दीप

अंक ७

## सदसद्विचार.

जगीं सर्वसुखी असा कोण आहे ॥
विचारी मना तूंचि शोधोनि पाहे ॥

( रामदास )

सारासार विचारानें केलेली कोणतीहि गोष्ट सुखपरिणामी होते असा शास्त्र सिद्धांत आहे. विचाराची अवश्यकता हरयेक प्रसंगीं आहे. स्वाभाविक एखादी गोष्ट करणें आणि विचारपूर्वक करणें यांत महदंतर आहे सद्विचार हा मनुष्याच्या अंतःकरणांतिल न्यायाधीश आहे. विचार हा हरयेक कामांत पाहिजे. खाणें, पिणें, निजणें, बसणें, बोलणें, चालणें, हसणें, लिहिणें, वाचणें, वगैरे अगदीं नित्यांतल्या गोष्टी; आणि राज्यकारण, लढाया, तहनामे, तंटा, सल्ला, मसलत वगैरे सर्व गोष्टींत विचार प्राधान्य आहे, आपण एखादा पदार्थ चांगला स्वादिष्ट लागला ह्मणून खात आहों असें समजा, त्या पदार्थाचे गुण दोष आपल्यास माहित नाहींत, पण आपण तो खात असतां एक वैद्य आला आणि त्याणें सहज ह्मटलें कीं, " पहा हो बुवा, हा पदार्थ जरा मादक आहे आणि पित्तप्रादि तो उत्तेजक आहे, या करितां विचार करून खा " असें त्याणें ह्मणतांच आपले मनांत "स्वतःच्या प्रकृतीचें मान, शरीर संबंधानें प्रसंगवशात् होणारी हानी, त्या पदार्थाचे सेवनाची अवश्यकता, आणि त्याचे गुणदोष यां विषयीं आपले मनांत अनेक कल्पना येऊन आपण लगेच तो पदार्थ स्वादिष्ट व आवडता असला तथापि खाण्याचें बंद करितों. याचें कारण विचार. विचा

रांतीं पदार्थादिकांची योग्यायोग्यता अंतःकरणांत पूर्ण पणें बिंबते आणि ती योग्यता एकदां समजून आली ह्मणजे मग मनुष्य तदनुसार त्या त्या वस्तुचा अंगिकार अथवा त्याग करतो. एखादा मनुष्य रागाचें तमांत आपले प्रतिपक्षास पटकन कांहीं अपशब्द बोलून जातो. समोरचा मनुष्य जर शांत आणि विचारी असला ह्मणजे एकदम तेरीमेरीवर न येतां प्रथमतः त्या रागावलेल्या गृहस्थास विचार करण्यास जरा फुरसत देतो पहिली सूचना ही कीं "पहा तूं मला शब्द बोलत आहेस तें नीट विचार करून बोल, नाहीं तर शेवटीं जड जातील." अशा समजावणीनें तो न उमजला तर पुनः "विचार कर, विचार कर" ह्मणून त्यास सूचना केली ह्मणजे तो गृहस्थ राग सोडून ताळयावर येतो. आणि नंतर तो जे अपशब्द बोलला ते चुकीचे आहेत असें त्याचें त्यालाच वाटूं लागतें. पण हें केव्हां वरील दोन गृहस्थांपैकीं एकजण जर विचारी असेल तर, आणि दोघेहि अविचारीच असले ह्मणजे त्याचा परिणाम काय होतो, ह्याचा अनुभव वाचकांस पुष्कळ प्रसंगीं आलाच असेल. तेव्हां तात्पर्य काय कीं, मनुष्य जर विचारानें वागेल तर त्याचें कधींहि अनहित होणार नाहीं, व तो असन्मार्गानें चालणारहि नाहीं. मनुष्याचे अंगीं विचारशक्ति असतांहि तोही नसल्या प्रमाणें वागतो असें वरील विवेचना वरून सिद्ध होतें, ह्मणजे जो मनुष्य निंद्य कर्म करितो तोच कांहीं वेळानें विचारांतीं केलेलें कर्म निंद्य आहे असें जाणून पश्चात्ताप पावतो. यावरून जेव्हां तो तें निंद्य कर्म करितो तेव्हां त्याची विचारशक्ति कोणीकडे जाते? असी एक शंका उत्पन्न होते. कारण, विचार आणि अविचार या दोहोंचें आस्तिक्य एका मनाचे ठायीं अविभक्तित आहे असें प्रकृत विवेचना वरून सिद्ध होतें, पण असें होणें असंभवनीय आहे असें कोणीहि ह्मणेल. कारण, काळोख आणि उजेड, शत्रुत्व आणि मैत्री, सत्य आणि असत्य आस्तिक्य बुद्धि आणि नास्तिकपणा व पाप आणि पुण्य

या दोहोंचें अस्तित्व एकाच प्रसंगीं कधींहि असणार नाहीं. आतां सकृद्दर्शनीं आपणास हा विरोध दिसतो खरा, परंतु तो तसा मुळींच नाहीं. असें समजा कीं, आपण दिवाणखान्यांत दिवा लावून ठेविला आहे, परंतु आच्छादन घातल्यामुळें त्याचा प्रकाश दृष्टीस पडत नसून जिकडे तिकडे काळोखच आला. आतां त्या ठिकाणीं दिवा असतांहि त्यापासून प्रकाशादि कार्य घडत नाहीं, तद्वत मनुष्याचे अंतःकरणांत विचारशक्ति आहेच, पण त्याजवर काम क्रोधादि साहा प्रकारचीं आच्छादनें पडून ती तांबेनें खाल्लेल्या खड्गासारखी निस्तेज आणि मलीन दिसते. आतां विचारशक्ति ही मानसिक असल्यामुळें त्याजवरील अच्छानेंहि अर्थात् मानसीकच असणार. बाहेरच्या आच्छादनानें त्यास प्रतिबंध होणार नाहीं. हिंवताप येणारे मनुष्याची सर्वांस माहिती आहेच. चैत्र वैशाखांतील ऐन गरमीचे दिवसांतहि एकाद्यास जर हिंवताप आला, तर त्यास बाहेरून कितीहि पांघरुणें घातलीं तथापि त्याची थंडी कमी न होतां, तो थंडीनें एकसारखा उडतच असतो. हेमंत ऋतूंतील अति कडाक्याचे थंडीनें एक दोन दुलया किंवा एखादें ऊर्णावस्त्र घेतलें ह्मणजे थंडी पळते; आणि वर लिहिलेल्या तापकरी मनुष्यानें भर उन्हाळ्यांत कितीहि पांघरूणें घेतलीं तरी थंडी यत्किंचितहि कमी होत नाहीं. याचें कारण इतकेंच कीं, थंडीचे दिवसांतील थंडी ही बाह्यद्वारा शरीरास स्पर्श करिते या मुळें बाह्य उपचारांनीं तिचें निवारण करतां येतें. आणि वरील मनुष्यास आंतूनच थंडी भरत येते या मुळें बाहेरचे पांघरुणानें त्याचें निवारण कसें होणार? हिंवतापाचे मनुष्यास पुष्कळ पांघरूणें घालणें ह्मणजे केवळ त्याचे मनाची समजूत करण्या सारखें आहे असें एका अनुभविक वैद्याचे तोंडून आह्मी ऐकलें आहे. सारांश ज्या तऱ्हेचा प्रतिबंध असतो तशाच तऱ्हेनें त्याचा प्रतिकार करावा लागतो. या करितां वर जीं विचार शक्ती वरील मानसीक आच्छादनें सांगितलीं

तीं दूर करण्यास सत्संगती आणि सद्बोध हीं साधनें होत. मनुष्य मात्रा जवळ विचार आहे खरा, पण त्याचा त्यानें उपयोग केला पाहिजे. कोणत्याही वस्तूचें नुसतें अस्तित्व आणि त्याचा उपयोग यांत अंतर आहे. घरामध्यें डाळ, तांदूळ, भाजीपाला वगैरे सर्व गोष्टी अनुकूळ आहेत पण त्या शिजवून खाल्या वांचून क्षुधेचें शांतवन होत नाहीं, किंवा घरामध्यें भाराभर तरवारी पडल्या आहेत असें समजा, पण त्याचा उपयोग करण्याचें माहित नसलें तर त्या आपण होऊन शत्रु पासून जसें रक्षण करीत नाहींत, तद्वत अंतःकरणांत विचार जरी असला तथापि त्याचे योगानें हरएक वस्तूची योग्यायोग्यता जाणल्या वांचून त्या विचारा पासून होणारे सुखाचा लाभ होत नाहीं.

या विचाराचे योगानें मनुष्याला बरें वाईट कळूं लागतें. कोणती गोष्ट केल्यानें सुख होईल व कोणती दुःख परिणामी आहे याचा निवाडा करण्याचें साधन विचार होय. जगांतील अनेक तऱ्हेच्या वस्तूंशीं मनुष्याचा संबंध असतो. कांहीं वस्तूंचे संगतीनें त्यास सुख होतें, आणि कांहींचे संगतीनें तो दुःखांत पडतो. आतां ज्या वस्तूचा जो परिणाम व्हावयाचा तो ह्मणजे विचाराचें योगानें अजीबात टळतो असें नाहीं, पण विचाराचा मोठा उपयोग हा कीं, कोणत्या वस्तुची कशा प्रकारची योग्यता आहे हें पूर्वींच कळतें. ह्मणजे कोणत्या वस्तूचे संगतीनें सुख होईल व कोणतीचे संगतीनें दुःख होईल याचा निर्णय आगाऊ होतो. या योगानें ज्या पासून सुख होईल अशाच वस्तूशीं मनुष्य संगती ठेवितो. व बाकीच्या विषयीं तो निःसंग होतो. भोग परिज्ञाना विषयीं मागील अंकांत कांहीं विचार दर्शित केल्याचें वाचकांचे लक्षांत असेलच. भोगां विषयीं परिज्ञान होण्याला मुख्य कारण विचार आहे. आतां याजवर आणखी येक शंका येण्या जोगी आहे, ती ही कीं, विचाराचे योगानें पदार्थ मात्राची योग्यता समजली ह्मणजे

त्या योग्यते प्रमाणें मनुष्य त्या पदार्थाचा उपभोग घेण्यास किंवा त्याग करण्यास समर्थ होतो. हें खरें, परन्तु असे विचारी आणि ज्ञानी पुरुष आपल्या ज्ञानानें आणि विचार शक्तीनें वस्तुमात्राचा बरे वाईट पणा जाणीत असतां व त्या विषयीं लोकांस सदुपदेश करीत असतांहि स्वत: कित्येक निंद्य आणि दु:खपरिणामी कृत्यांस अनुसरतात, हें कसें? व्यभिचार, चोरी, कपट, विश्वासघात वगैरे गोष्टी निंद्य आहेत असा आजपर्यंत जेवढे विद्वान व ज्ञानी झाले त्यांणीं विचार करून सिद्धांत ठरविला आहे व त्या प्रमाणें सर्व लोकांचाहि ग्रह आहे असें असतां कित्येक विद्वानच वरील कृत्यास अनुसरतात हें कसें? या संबंधानें खात्री होण्यास विश्वामित्रादि सत्पुरुषांचीं अनेक उदाहरणेंहि देतां येतील. ह्मणून अशा शंकांनीं किंवा उदाहरणांनीं विचाराची किंवा विचारी मनुष्याची योग्यता कमी ठरते कीं काय? कंद्याचे उजेडांत सड केवरून चालणारे मनुष्यासहि कधीं कधीं ठेंच लागते ह्मणून त्यामुळें दिव्याची योग्यता किंवा सडकेचा सोयीवारपणा कमी होतो कीं काय? काळोखांतून गल्लीगुचीनें चालणारा मनुष्य ठेंचळतो आणि वरील राज रस्त्यानें उजेडांतून चालणारे मनुष्यासहि ठेंच लागते, मग हजारों रुपये खर्चून सडका बांधणें व उजेडाची सोयी करणें यांत अर्थ नाहीं असें ह्मणणें सयुक्तिक दिसेल काय. कित्येक विद्वान लोकहि चोरी, शिन ळकी आणि लबाडी करतात, आणि अविद्वानाहि अशाच तऱ्हेचीं कामें करतात, मग विद्या संपादन करण्यांत अर्थ काय असें एखाद्या विद्वानाचें विरुद्धाचरण पहाण्यांत आलें ह्मणजे वाटतें खरें, पण तें भ्रांतिमूलक आहे. असें वाटण्याचे कारणांचा विचार करूं लागलें असतां विद्वान आणि अविद्वान यांजमध्यें महदंतर आहे असें लक्षांत आल्या वांचून राहणार नाहीं. विद्वानाची विचार शक्ति जागृत असल्यामुळें तो जें कृत्य करितो त्याचे अंतां विषयीं तो जाणता असल्यामुळें फसला जात नाहीं; पण अविद्वानाची गोष्ट याहून

वेगळी आहे. महान् तपोनिधी जे विश्वामित्रादि समर्थ ऋषी ते अप्सरेच्या दृष्टिपातास मोहित होऊन तपापासून भ्रष्ट झाले, हीं व अशाच प्रकारचीं दुसरीं उदाहरणें दाखवून अविचारी आणि अविद्वान लोक तसें करूं पहातील तर तें मात्र उपयोगी नाहीं. एखादा श्रीमंत लाखो रुपये खर्च करितो ह्मणून दरिद्र्यानेंहि त्याची बरोबरी करण्याचें मनांत आणलें तर उपयोग होईल काय! त्या योगानें त्याचें दिवाळें वाजून तो अन्नास मोताद व लोकोपहासास मात्र पात्र होईल. त्याप्रमाणें पारमार्थिक वित्तानें समृद्ध जे विश्वामित्रादिक त्यांस वरील प्रकारच्या तपभ्रष्टतेची खिसगणती नसते आतां यावरून वरील कृत्य स्तुत्य आहे व त्या प्रमाणेंच सर्व थोरांनीं वागावें असें आह्मी ह्मणत नाहीं, परंतु तसें निंद्य वर्तन एखाद्या मान्य विद्वानाकडून झालें ह्मणून आह्मासहि तसें करण्यास प्रत्यवाय नाहीं असें किंचिज्ज्ञ मनुष्यांनीं मनांत आणूं नये.

वर दर्शविलेलीं कित्येक उदाहरणें अनुभवास येतात खरीं पण त्यांतील प्रमाणांतहि अंतर आहे. ह्मणजे वरिल कृत्यें करणारे जितके विद्वान सांपडतील त्याच्या सहस्रपट किंबहुना त्याहि पेक्षां जास्त अविद्वान आढळतील. आतां हें प्रमाण असें असणेंहि रास्तच आहे. कारण काळोखांतून आडचणींचे रस्त्यानें चालणारा मनुष्य ठेंचळल्या वांचून पार पडण्याचा फारसा संभव नाहीं, ह्मणजे तो ठेंचा खाईलच, त्याचप्रमाणें सडकेच्या रस्त्यानें उजेडांतून चालणारे मनुष्यास ठेंच लागण्याचाहि विशेष संभव नाहीं, ह्मणजे त्यास बहुधा ठेंच लागणार नाहीं. या प्रमाणें हा लोकांस अनुभवहि आहे. विचारी मनुष्य निंद्य मार्गास प्रवृत्त होणें हा केवळ प्रारब्ध योग होय. पण तो आपले विचारशक्तेचे योगानें त्या निंद्य कृत्या पासून अविचारी मनुष्या प्रमाणें दुःख पावत नाहीं.

हरयेक भोग्य वस्तू विषयीं मनुष्यानें विचार केला पाहिजे ह्मणून वर सांगितलें आहे. हा विचार करण्याचें प्रस्तुत काळीं फारसें अवघड नाहीं. कारण वस्तुमात्राचा योग्यायोग्यपणा दर्शविणारीं अशीं

अनेक विद्वान लोकांचीं लिखित मतें आज आपले संग्रहीं आहेत, हें विचार शक्तीला मोठेंच साधन आहे. जन्मास आलेल्या प्रत्येक मनुष्यास स्वतःचे विचारानेंच जर वस्तुमात्राची योग्यता जाणावयाची असती तर त्याचे जन्माचें बहुधा मातेरेंच बनलें असतें. याचा अनुभव पहाणें अस त्यास वैद्य शास्त्राविषयीं थोडा विचार करावा. असें समजा कीं, उपलब्ध असलेले सर्व वैद्यकग्रंथ नाहींसे होऊन त्या ग्रंथाधारें माहितगार झालेले सर्व वैद्य औषधोपचार वगैरे विसरून गेले.असें झाल्यावर एखादे मनुष्यास जर रोग झाला तर त्यास बरें करण्याचा मार्ग किती दुर्घट आहे बरें. औषधांच्या गुणदोष विवेचनाविषयींचे ग्रंथ लोकांचे संग्रहीं असतांही वैद्याची जर दुर्मिळता आहे, तर त्या गुणदोषांचें यथार्थ परीक्षण करून आपली विचारशक्ती परिपक्व दशेस आणणारा पुरुष प्रस्तुतकाळीं फारच विरळा.कांहीं वनस्पती रोगाचा उपशम करणाऱ्या असतात. आणि कांहीं रोग वृद्धिंगत करून त्यापासून मनुष्याचे प्रायाणाची हानी करणाऱ्या असतात. तेव्हां त्यांची योग्यता जाणणें किती अवश्य आहे बरें? कुवैद्यापासून अनेक अपाय घडल्याचेंहि लोकांचे अनुभवास आहे, रोगाचें यथार्थ परीक्षण होऊन त्याजवर औषधाची विचारानें योजना झाली तरच तो रोग दूर होईल, नाहींपेक्षां कांहीं तरी अनुमानानें केलेली औषधाची योजना रोग्याचे नाशास कारण होते. या औषधीं प्रमाणेंच जगांतील हरयेक वस्तुविषयीं मनुष्यास ज्ञान पाहिजे. ह्मणजे हरयेक गोष्टी विषयीं त्यानें विचार केला पाहिजे. हा विचार करण्याविषयींहि विद्वान आणि विचारी लोकांचे मताची आणि लोक सहवासाची मदत आहे. या मदतीचे योगानें मनुष्यास यत्नावांचून कित्येक साधारण पदार्थांची योग्यता कळते. व त्यामुळें त्यास महत्वाचे कामीं विचार करण्याची सवड होते, ह्मणजे साधारण गोष्टींत हा सहवास त्यास पदार्थांचे भोग्याभोग्य निर्णया विषयीं फार उपयोगी पडतो. आतां हा सहवास सज्जनाचा पाहिजे ह्मणजे उत्तम,

कित्येक वस्तूंशीं त्या त्या वस्तूंचे योग्यते प्रमाणें वागण्याचा मनुष्यास जन्मापासूनच अभ्यास असतो. आणि हा अभ्यास सुरू होण्यास कारण त्याचे वाडवडील होत. अशा वस्तू विषयीं मनुष्यानें कधींच विचार केलेला नसतो. तथापि त्यांच्या योग्यते प्रमाणेंच त्यांचा उपभोग घेतला जातो. यांत कधीं चूक पडत नाहीं. छानदार रंगीत जोडा, गोलाचें पैठणी पागोटें, आणि हातांतील सुवर्णाचें पवित्रक या तिनहि वस्तु मनुष्याच्या आवडीच्या असतात. ह्मणजे तिहींवरही त्याची प्रीति सारखीच असते, पण स्वारी बाहेरून आली ह्मणजे जोडा ओटीवर राहतो, पागोटें खुंटीवर बसतें, आणि पवित्रक जेवतांना व निजतांना वगैरे सर्व काळ जवळ असतें. आतां वास्तविक पहातां याला जितकी जोड्याची आवड असते तितकीच पवित्रकाची असते. शिवाय उपयोगाचे व सुखाचे मानानें पहातां पवित्रकापेक्षां जोड्याची योग्यता जास्त आहे असें तो जाणीतहि असतो आणि तें वास्तविक खरें आहे.. ह्मणून बिछान्यावर निजतांना जोडा उशाला घेतला तर शोभेल काय अथवा जोड्यावर आपली कितीहि प्रीति असली तथापि त्यास आपण बिछा-न्यावर ठेऊं काय. कधींहि ठेवणार नाहीं. याचें कारण त्याची योग्यता. एकाद्या वस्तूचा लोकांना फार उपयोग असला किंवा त्याजवर त्यांची प्रीति असली ह्मणजे तेवढ्या वरूनच त्या पदार्थाचे अंगीं श्रेष्ठपणा येतो असें नाहीं. बाजारांतील वेश्येवर एखादे गृहस्थाची फार प्रीति असते, ह्मणून लग्न, मुंज, वगैरे गृहस्थाश्रम संबंधीं संस्कारांत त्या वेश्येचा उपयोग होतो काय. कधींही होत नाहीं. अशा मंगल समारंभांत विवाहित स्त्रियेचीच गरज लागते व तिलाच तो मान देणें भाग पडतें. ज्या प्रमाणें वस्तुमात्राची योग्यता मनुष्य सहवासानें, अभ्यासानें व विचारानें जाणतो त्याच प्रमाणें आपलीहि योग्यता तो जाणित असतो. एखाद्या सभेमध्यें विद्वान आणि अविद्वान अशा दोनहि प्रकारचे लोकांचा समुदाय जमतो तेव्हां अविद्वान कधीं लोकांशीं जाऊन बसतो काय,

कधींहि बसत नाहीं; लोकहि त्यास बसण्या विषयीं आग्रह करीत नाहींत आणि या संबंधानें त्या गृहस्थासही वाईट वाटत नाहीं. एखादा आगांतुक जेवणावळींत घुसत असतो, लोक त्यास नको नको ह्मणत असतातच, परंतु तो तें कांहींएक नऐकतां एकाद्या पानावर जाऊन बसतो. शेवटीं एखादा गृहस्थ त्यास पानावरून हात धरून उठवून लावितो व शेवटीं हो नाहीं ह्मणून त्यास एकादे कोपऱ्यांत बसण्याची किंवा आमंत्रणाचे लोक जेवल्यानंतर मागाहून जेवण्याची परवानगी होते पण हाच प्रकार ज्याच्या करितां भोजन समारंभ होतो त्याचे संबधांत फारच भिन्न असतो. त्याला आमंत्रणावर आमंत्रणें पाठवावीं तरी स्वारी निघण्याची तयारी करीत नाहीं. शेवटीं एकदां येऊन दाखल झाले ह्मणजे त्यांची किती तरतूद ठेवावी लागते. ते गृहस्थ संतुष्ट झाले ह्मणजे मेजवानी करणाराचे मेहनतीची सार्थकता झाली असें तो समजतो. आतां वरील दोन व्यक्तींमध्यें मानापमानाचे संबंधांत जें महदंतर दृष्टीस पडतें, त्याचें कारण त्या परस्परांतील योग्यायोग्यपणा होय. ही योग्यता ज्या प्रमाणें लोक जाणतात त्याच प्रमाणें त्या उभय व्यक्तीहि जाणीत असतात. आतां आगांतुकाचा अपमान झाल्याबद्दल त्याचा त्याला मुळींच राग येत नाहीं. कारण, अशा प्रकारचाच मान राहाण्या जोगी आपली योग्यता आहे असें तो जाणीत असतो. मनुष्याचे अंगीं योग्यता, किंवा श्रेष्ठता येण्यास दोन कारणें असतात. एक विद्वत्ता आणि दुसरें अधिकार. विद्वान मनुष्यास लोक स्वसंतोषानें श्रेष्टपणा देतात आणि अधिकारी असतो त्यास श्रेष्ठ मानणें भाग पडतें. पण हा प्रकार अविद्वान असा अधिकारी असेल त्याच्या संबंधानें होय. जो विद्वान असून अधिकारी असतो त्याची योग्यता विशेष असते. सारासार विचारशक्ति ज्याचे अंगीं जास्ती असते तोच खरोखर विद्वान होय. ज्ञान विवेक शून्य असे पाठक हे विद्वान या विशेषणास पात्र नसतात. कारण विद्वत्तेचे योगानें

वस्तु मात्रादिकांचे योग्यायोग्यपणा विषयीं ज्ञान झालें पाहिजे, नाहीं तर गर्व, अभिमान, आणि वादविवादेच्छा हेंच काय तें आपल्या ज्ञानी पणाचें सार्थक असें समजणारे विद्वान पुष्कळ असतात. ज्यांस विद्येचे योगानें विचारशक्ति पूर्णतेस आणून भोग्य वस्तूंचें पारिज्ञान करून घेण्याची इच्छा असते त्यांस अभिमानादि उत्पन्न होण्या जोगें अध्ययन पसंत पडत नाहीं. समर्थांनीं ह्मटलें आहे:—

नको शास्त्र अभ्यास व्युत्पत्ति मोठी ॥
जडे गर्व ताठा अभीमान पोटीं ॥

बरें कोणतें, वाईट कोणतें, कोणत्या वस्तुचा उपभोग सुखकारक आहे व कोणता दुःख मूलक आहे, इत्यादि विचार करून त्याचा निर्णय ठरविण्या पुरतें सामर्थ्य अंगीं आलें ह्मणजे तो विद्वान झाला. मग यापेक्षां मोठी व्युत्पत्ती त्याला नको. कारण पुढील व्युत्पत्ती ही वाद विषयक आहे. वस्तु मात्राची सदसज्ज्ञापकता अंगीं आली ह्मणजे विद्येचें पर्यवसान झालें असें समजावें. विद्यासायासाचा वास्तविक हेतुहि तोच आहे. ज्ञानजनित सद्विचाराचे योगानें वस्तुमात्रांशीं संगती ठेवून ज्या त्या वस्तूचे योग्यतेनुरूप तिचा उपभोग घेणें किंवा त्याग करणें हेंच ऐहिक सुखाचें साधन होय. ह्मणजे विषयांचे स्वाधीन न होतां त्यांचा उपभोग घेणें हें ज्ञात्यानें धोरण होय. "खेळ खेळुनी डाई न सांपडे तो एक खेळिया शाहाणा हो" असें एका कवीनें ह्मटलें आहे तें यथार्थ आहे. मुळींच खेळ न खेळणें हा कांहीं शहाणपणा किंवा पुण्याई नव्हे, तर अनेक तऱ्हेचे खेळ खेळावे पण डाव करून न घेणें हेंच चतुरस्र पणाचें काम आहे. मनुष्यास ज्ञान असल्यामुळें तो विषयादि सुखात निमग्न होऊन चोरी, कपट, व्यभिचारादि अनेक पातकें करतो, तेव्हां यापेक्षां पशु किंवा पक्षी होणें बरें, कारण ते मनुष्यासारखीं पातकें करीत नाहींत, असें ह्मटलें तर शोभेल काय? कधींहि शोभणार नाहीं. कारण, पशु पक्षी जर ज्ञानहीनच आहेत तर त्यांस चांगलें किंवा वाईट या दोहों-

हून कांहींच समजत नाहीं. ते फक्त निद्रा, आहार, आणि मैथुन यांचे अधिकारी होत. ते ज्या प्रमाणें चोरी, कपट, व्यभिचारादि निंद्य कर्मे करीत नाहींत, त्याचप्रमाणें त्यांचे हातून परोपकार, भूतदया, व ईश्वर सेवादि सत्कर्मेंहि घडत नाहींत व घडण्याचा संभवही नाहीं. एकादा श्रीमंत आपली दौलत खुशालींत व दुर्व्यसनांत उडवून टाकतो ह्मणून श्रीमंत होणें हेंच निंद्य आहे असें ह्मणणें शोभेल काय? कधींहि शोभणार नाहीं. कारण वरील निंद्यपणा संपत्तीचा नसून त्या श्रीमंताचे अविचाराचा होय. त्याच श्रीमंत जर विचारी असेल तर आपली दौलत सत्कर्मांत खर्च करून त्या पासून लौकिक आणि सुख संपादन करील. पण ज्याचे उदरीं आठरा विश्वे दरिद्र आहे त्याचे हातून दानादिक होण्याचा संभव आहे काय? त्याला स्वतःचें पोट भरण्याचेंच जर सामर्थ्य नाहीं, तर तो दुसऱ्या बुभुक्षित लोकांना शांत कसे करणार? तेव्हां तात्पर्य काय कीं, वरील संपत्यादिक हीं मनुष्याच्या निंद्य पणास मुळींच कारणी नाहींत. तर मनुष्याच्या दुःखाला आणि निंदेला कारण अविचार आहे. ज्याला विचार शक्ति नाहीं तो एखादा सावकार असो, जमीनदार असो, इनामदार असो, जहागीरदार असो, एखादा संस्थानिक असो, किंवा सार्वभौम समाधिश असो, त्याला नेहमीं दुःखच व्हावयाचें. सुखाचा लेशहि त्याला मिळणार नाहीं. पण तेच जर प्रकृत पुरुष विचारी असतील तर त्यांस संपत्यादिकांचे भोगानें किती सुख होईल? जेवणें ही आपली अगदीं नित्यांतली क्रिया आहे. अन्ना पासून नेहमीं सुखच होणार असा सिद्धांत आहे. पण तें नियमीत सेवन केलें पाहिजे. थोडें जास्त खाल्लें ह्मणजे लगेच अजीर्णांशाचा विकार होऊन त्यापासून मनुष्यास दुःख होतें. याचें कारण अविचार. विचारानें सेवन केलें असता जें अन्न शरीराचे पोषणाला व सुखाला कारण होतें तेंच अन्न अविचारानें खाल्यास त्यापासून शरीराची हानी व दुःख होतें. यावरून वस्तुमात्राचे भोगाविषयीं विचार हा अवश्य आहे. विषयादिकांचा त्याग

करण्याचे नादीं लागण्यापेक्षां विचारानें त्याचा उपभोग घेऊन त्यां पासून अलिप्त असणें श्रेयस्कर होय. अतां विषयांचा त्याग करणें हें तरी फार दुर्घट आहे. एक तर मनुष्याची उत्पत्तीच विषयजनित आहे, ह्मणजे तो विषयांपासून उत्पन्न होतो, विषयांतच उत्पन्न होतो, आणि विषयच त्याचें जीवन आहे. तेव्हां असा विषयांशीं याचा अद्वितीय संबंध आहे ह्मणजे मनुष्य केवळ विषयरूपच बनलेला आहे. तेव्हां अशा अती निकट संबंधापासून एकाकीं सुटका कशी होणार? कधींच होणार नाहीं. तथापि कमला प्रमाणें त्या विषयांपासून अलिप्त असणें हेंच मनुष्याचें कर्तव्य होय. आणि तें बजाविण्यास सद्विचाराची अवश्यकता आहे. कमलाची उत्पत्ती कर्दमापासून आहे, त्याचें वास्तव्यहि कर्दमांतच, आणि कर्दमापासूनच त्याचें जीवन आहे. आतां कर्दमाचे व कमलाचे योग्यतेंत जमीन अस्मानाचें अंतर आहे. कर्दम दुर्गंधी युक्त व मलीन असून तो सर्वांचे तिरस्कारास पात्र आहे; पण कमलाचे गुण याहून अगदींच भिन्न आहेत. ह्मणजे कमल सुंदर, स्वच्छ, सुवासीक आणि पूज्य आहे. तेव्हा परस्परां मध्यें असा अप्रतिम विरोध असण्याचें कारण काय, याचा विचार करूं लागलें असतां कर्दमा पासून कमलाची अलिप्तता हेंच याचें मुख्य कारण असें ह्मणणें भाग पडतें. विषयां विषयीं जे पुरुष आसक्त अस तात त्यांची स्थिति बेडका प्रमाणें होय. बेडूक ज्या प्रमाणें चिखलाचे डबक्यांत डुड्या मारून मारून शेवटीं त्यांतच संपतो, तद्वत विषय सक्त पुरुष कृमी प्रमाणें विषयांत लोळत राहून त्यांतच अंत पावतात. विषयासक्त आणि विषयांचे ठायीं अलिप्त अशा पुरुषांमध्यें, कमल आणि बेडूक यांचे प्रमाणें अंतर आहे. हे दोन्ही पुरुष विषयापासून उत्पन्न होतात, विषयांतच राहतात, आणि विषयांचाच उपभोग घेतात, पण एक विषयाचे ठिकाणीं आसक्त होतो, आणि दुसरा त्यांचा उपभोग घेत असतांहि त्यांत लिप्त होत नाहीं. विषयांचा उपभोग

घेऊन त्यांत लिप्त न होणें हें सामर्थ्य विचारी पुरुषाचें आहे. असो मिळून विचारावांचून सर्व भोग दुःखदायक होत हें प्रकृत विवेचना वरून वाचकांचे लक्षांत आलेंच असेल. तेव्हां ज्यांस सुखाची इच्छा असेल त्यांणीं सद्विचारानें वागलें पाहिजे हें उघड आहे.

विचाराचे संबंधानें वर जें विवेचन केलें आहे त्याजवरून वाचकां चे लक्षांत आलेंच असेल कीं, हरयेक वस्तूच्याभोग्या भोग्य निर्णया विषयीं विचाराची अवश्यकता फार आहे. विचारावांचून मनुष्यास सुख होणार नाहीं. जेवढें ह्मणून चांगलें व सुखकारक तितकें सगळें विचारा पासून प्राप्त होतें. सदसद्विविचार हा मनुष्य मात्रास आवश्य आहे. प्रकृत विचार हा केवळ ऐहिक संबंधाचा होय. सरासार विचारानें व बाताबेतानें वागून प्रपंच नावालौकिकास आणला ह्मणजे विचारा चा भाग आटपतो असें नाहीं. कारण प्राधान्य व श्रेष्ठ विचार पुढेंच आहे. जो ऐहिक संबंधांत नेहमी प्रकृत विवेचना नुरूप वागत असतो त्यास पुढील विचाराचे मार्ग सुलभ वाटतात. जगांतील वस्तुमात्राचे चांगले वाईटपणा बद्दल जो विचार करावयाचा तो ऐहि क आणि त्या वस्तुमात्राचे उत्पादका विषयींचा जो विचार तो पारमा र्थिक होय, पारमार्थिक विचारांत ऐहिक विचाराचें परिगणन सहज होऊ न जातें. पण पारमार्थिक विचार फारच गहन आणि दुर्गम असल्यामुळें त्यांत प्रवेश होण्यास ऐहिक विचार हें द्वार होय. पारमार्थिक संबंधानें पुढील गोष्टीं विषयीं विचार करावयाचा असतो:—

कोहं कथमिदं जातं कोवा कर्त्तास्य विद्यते ॥
उपादानं किमस्तीह विचारः सोयमीदृशः ॥

"मी कोण, हें जग कसें उत्पन्न झालें, याचा कर्ता कोण असावा, हें उत्पन्न करण्याचें कारण काय" इत्यादि विचार हे पारमार्थिक

होत. हे विचार करण्याला मनुष्याचें ज्ञान विस्तृत झालें पाहिजे. तसेंच त्याच्या अंगीं सारासार विचाराविषयीं निर्णायक शक्ती तर पाहिजेच. प्रथमतः मी कोण हा विचार केला पाहिजे हा विचार करूं लागलें म्हणजे देहाचा व जिवाचा संबंध आणि वस्तुमात्रा वरील जीवाचें स्वत्व या विषयीं मनुष्याच्या अंतःकरणावर अनेक तऱ्हेचे तरंग उठूं लागतात. देहाचे ठिकाणीं जर आत्मत्व मानावें तर देहाचें क्षयवृध्यादिकांचें योगानें जीवाला न्यूनाधिकपणा घडत नाहीं. म्हणजे परिमित जो देह तोच मी असें म्हणण्यास अडचण पडते. कारण देहाचा एक पाय तुटून गेला तथापि त्यापासून "मी तुटलों" असें जीव जाणीत नाहीं, व म्हणतहि नाहीं. याच प्रमाणें कान, हात, डोळे यां विषयीं जाणावें. म्हणजे प्रकृत इंद्रियें नष्ट झालीं तर त्यापासून जीवाला मी किंवा मदंश नष्ट झाला असें वाटत नाहीं. तर माझा पाय मोडला, माझा हात मोडला, माझा कान तुटला, माझा डोळा फुटला, इत्यादि स्वत्वनिर्देश केला जातो म्हणजे ज्या प्रमाणें माझें घर मोडलें, माझी बायको मेली, माझी संपत्ती चोरांनीं लुटली इत्यादि आपलें स्वामित्व असलेल्या वस्तूं विषयीं आपण बोलतों, त्या प्रमाणें देहा विषयींही आपली समजूत असते. आतां जीवाशीं देहाचा संबंध फारच निकट पडतो यामुळें इतर वस्तुमात्रादिकांपेक्षां देहा विषयीं मनुष्यास ज्यास्त प्रीति व काळजी असते. देहाचे ठिकाणीं इतर पदार्थां प्रमाणें जीवाचें केवळ स्वत्वच असून जीवाचा व देहाचा अद्वितीय पणा नाहीं म्हणजे देह आणि जीव एकरूप नाहींत असें म्हटल्यास संपूर्ण देह नष्ट झाला म्हणजे जीवाची वाट काय होते असा एक प्रश्न उत्पन्न होतो. व देहा बरोबर जीवही नष्ट होतो असें आपल्यास वाटतें. पण सुक्ष्म विचार करून पाहिलें असतां जीव हा अनेक तऱ्हेच्या भोग्यवस्तूंप्रमाणें देहाचाहि त्याग करूं न जातो असा आपल्यास अनुभव आहे. पण अज्ञानाचे योगानें

देहावर मीपणाची भ्रांती झाल्यामुळें दैहिक सर्व क्रिया मी करतों असें जिवास वाटतें. या योगानें देह संबंधीं सुखदुःखाचा अधिकारी मीच झालों अशी अज्ञानी जीवाची समजूत होते. पण ज्ञान दृष्टीनें पाहूं लागलें असतां जीवाशीं देहाचा संबंध केवळ भाड्याचे घरा प्रमाणें आहे असें दिसून येतें. असो अशा रीतीनें स्वतः विषयीं व वस्तुमात्रा विषयीं विचार करूं लागलें असतां त्यांच्या उत्पत्ती स्थितीलयाविषयीं अंतःकरणांत अनेक तऱ्हेचे विचार उत्पन्न होतात हे पदार्थ नियमित रीतीनें उत्पन्न होतात, कांहीं दिवस जगांत अनुभूत असतात, व शेवटीं लय पावतात, तेव्हां जादूसारखा हा सर्व प्रकार होतो कसा या विषयीं मन घोटाळ्यांत पडतें.

पदार्थ मात्रांच्या स्थिति स्थापकतेचा विचार करूं लागलें असतां हें जें सर्व राहाटगाडगें चालू आहे याचा कोणी तरी चालक असावा अशी कल्पना होते त्या चालकाचा विचार करूं लागलें ह्मणजे त्याची अद्भुत शक्ती, अतर्क्य कल्पना, आणि अमानुष सामर्थ्य, याविषयीं अनेक विचार मनांत येऊन अशा सर्वश्रेष्ठ व कल्पनासिद्ध देवाविषयीं अंतःकरणामध्यें पूज्यभाव उत्पन्न होतो, व त्यास सन्मान देऊन आभार पूर्वक त्या सर्वेशाचा गौरव करणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे असें वाटूं लागतें. आतां "भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः" अशा मताचे जरी कांहीं लोक असले तथापि त्यांसहि आपल्या मताचे स्थापने विषयीं विचाराची अवश्यकता आहे. आणि अशा तऱ्हेचे मताचा पुरुष ज्ञानी असेल तर त्यास विचार करतां करतां असेंहि कळून येईल कीं, सर्व जगाची चालक शक्ती ज्याच्या हातीं आहे, व सार्वभौम राजासहि शासन करण्याचें ज्याचें सामर्थ्य आहे अशी कांहीं तरी व्यक्ति मानणें हें सुखकारक व सोयीवार आहे. पण याचा निर्णय ठरविण्यासहि विचाराचीच अवश्यकता आहे. ह्मणजे विचारावांचून कांहीं समजणार नाहीं. ज्या त्या कामांत विचार प्राधान्य आहे.

प्रकृत विवेचनावरून विचाराचें महत्व वाचकांचे लक्षांत आलेंच असेल. ज्यास इहलोकीं सुखानें आणि आनंदानें राहावें अशी इच्छा असेल, लौकिक आणि सन्मान मिळावा अशी ज्यास उत्कंठा असेल, संपत्तीचा सद्व्यय होऊन स्वार्थ आणि परोपकार दोन्हीहि साधावे असें ज्यांच्या मनांत असेल, आणि स्त्रीपुत्र व इष्टमित्रादिकां पासून आपणास व आपल्या पासून त्यांस सुख होऊन सर्वत्रांनीं एकोनें व आनंदानें राहवें असाच ज्याचा हेतु असेल, त्याणें सदसद्विचारानें वागलें पाहिजे. शत्रूशीं शत्रुत्वानें आणि मित्राशीं मित्रत्वानें वागणें हा सद्विचार होय. आपण होऊन लोकांशीं शत्रुत्व संपादन करूं नये हें खरें पण जग नानाविध आहे, यामुळें मनुष्य कोणत्याहि रीतीनें कां वागेना, त्याची स्तुती करणारे व त्याचा मत्सर करणारे असे दोनही प्रकारचे लोक असतातच. तेव्हां जगाशीं व्यवहार ठेवावयाचा तो सारासार विचारानें ठेवला पाहिजे हें उघड आहे. शत्रूवर विश्वास ठेवणें आणि मित्राचा द्रोह करणें हा अविचार होय. अशा अविचारानें सुख व कल्याण होणार नाहीं. याकरितां वस्तुमात्रा ची योग्यता जाणून तदनुसार त्याच्याशीं संबंध ठेवावा. अशा रीती नें वागुन खेरीज "कोहं कथमिदं जातं" इत्यादि परार्थ सुखा विष यींहि नेहमी विचार करीत असावें. अशा वर्तनानें मनुष्यजन्माचें सार्थक होतें. सदसद्विचारानें वागणारे साधारण मनुष्यास ऐहिक व प रार्थ संबंधानें जें सुख आणि जो आनंद होतो, तें सुख आणि तो आनंद विचारशून्य अशा सार्वभौम बादशहासहि होणार नाहीं.

---

# स्वहित, स्वदेशहित आणि सार्वजनिक हित.

या विषयावर मागील अंकांत कांहीं विचार वाचकांस सादर केले आहेत. त्यावरून आपल्या देशांतील सार्वजनिक हिताचा बाणा बाळगणारी मंडळी ही सार्वजनिक हिताकरितां मुळींच झटत नसून त्यांचे सर्व यत्न स्वहितार्थ व स्वदेश हितार्थ आहेत असें प्रतिपादन केल्याचें वाचकांस आठवत असेलच. आतां अशा प्रकारचे यत्न करणें हें मानवी प्राण्याच्या स्वाभाविक मनोधर्मास अनुसरून असल्यामुळें त्याजबद्दल आमच्या देशबांधवांस दूषण देतां येत नाहीं. तथापि त्यांणीं सार्वजनिक हिता करितां आमचे यत्न आहेत असें मात्र ह्मणूं नये. आमच्या देशाचें अहित झालें व होत आहे ह्मणजे आमचा देश भिकारी झाला व होत आहे असें समजावें, आणि त्याचें हित करणें ह्मणजे त्यास संपन्न करणें. आतां देशाला संपन्न करणें ह्मणजे त्यांतील लोक संपत्तीमान व्हावे ह्मणून यत्न करणें होय. आपलां देश भिकारी होण्याला मुख्य कारणें दोन ह्मणून मागें सांगितलेंच आहे. ह्मणजे पहिलें कारण परदेशी राजसत्ता आणि दुसरें व्यापार. राजसत्तेच्या योगानें हा देश कसा भिकारी होत चालला व त्याजवर कर्जाच्या गोणी कशा लादत चालल्या आहेत हें मागील अंकांत सांगितलेंच आहे. या कर्जाची हकीकत ऐकून खरोखरच नवल वाटण्याजोगें आहे. सर्व पृथ्वींत सुपीक व संपत्तीमान अशी ज्या देशाची कीर्ती त्याचा राज्यकारभार करण्यांत कर्ज व्हावें व तें दरवर्षास वाढत जावें ही फारच आश्चर्याची गोष्ट आहे. या योगानें राजकर्त्यांचा उधळेपणा, अविचार, आणि बेपर्वाई उघड दिसून येते. राज्य करण्यांत आमचें सरकार फार दक्ष ह्मणून जो लौकीक आहे त्यास प्रकृत कर्जबाजारी स्थितीमुळें उणीव येते. किंवा या

उधळेपणामुळें, हिंदुस्थानांतील संपत्ती कशातरी रीतीनें स्वदेशीं न्यावी ह्मणूनच आमचे राजकर्ते इकडे आले आहेत अशी जी लोकांची समजूत आहे ती दृढ होते. मिळून इंग्रज सरकार कोणत्याही तऱ्हेनें यादेशांतील संपत्ति नेवो, किंवा त्याजबद्दल लोकांची पाहिजे ती समजूत असो. एकंदरींत प्रस्तुतचे राजसत्तेनें या देशाचें संपत्तीचे संबंधानें नुकसान होतें ही गोष्ट निर्विवाद आहे. आतां राजसत्ता हा काहीं लोकांचे खुषीचा प्रकार नाहीं यामुळें त्यासंबंधें मतभिन्नता करण्यांत अर्थ काय असें कदाचित् कोणास वाटेल. व असे उद्गार ऐकूंहि येतात. परंतु याविषयीं येथें विचार करण्याचें कारण इतकेंच कीं देशाचें कल्याण किंवा अकल्याण होणें हें विशेषें करून राजकर्त्यांच्या हातांत असतें. तेव्हां प्रस्तुतच्या राजकर्त्यांचें लक्ष या देशाचे कल्याणाकडे कितपत आहे याचा विचार करणें हें अप्रासंगिक होणार नाहीं असें जाणून त्यासंबंधें चार शब्द लिहिले आहेत. या वरून राजसत्तेच्या संबंधानें आपल्या देशास धुपणीच लागली आहे व हा प्रकार प्रतिवर्षीं वाढत आहे हें कोणीहि सहज कबूल करील.आतां दुसरें कारण व्यापार. आतां व्यापार संबंधें वास्तविक देशाचा उत्कर्ष व्हावयाचा. ह्मणजे दोन देशांमध्यें व्यापार चालू असेल तर उभयतांच्या समृद्धीस कारणी व्हावयाचा असें असतां हिंदुस्थानाशीं व्यापार करणारें जे म्यांचेस्टर वगैरे देश ते या देशाच्या अहितास कारणी होतात हें कसें,ह्मणजे साधारण सिद्धांताविरुद्ध अशी ही शंका येते. आतां दोन देशांमधील व्यापाराचे योगानें पडलेलें दळणवळण हें उभय देशास हितकारक व्हावें असा सिद्धांत खरा. पण तो केव्हां. दोनहि देश व्यापारांत सारखे कुशल असतील तर. नाहींपेक्षां एका देशानें अनेक तऱ्हेचा माल तयार करून दुसऱ्यास पुरवावा आणि दुसऱ्या देशानें जवळ पैसा आहे तों पावेतों तो माल खरेदी करून खुशाल पडून राहवें, अशी स्थिति असल्यास एक देश चांगला संपन्न होऊन दुसरा अगदीं कंगाल होईल. तोच प्रकार हिंदुस्थान आणि म्यांचेस्टर

वगैरे देशांत आहे. म्हणजे म्यांचेस्टर वगैरे देशांतील लोक हे तऱ्हे तऱ्हेचा माल तयार करून या देशांत आणतात, पण त्याच्या मोबदल्यांत ते या देशाचा जर मालच घेऊन जाते तर मग दोन्ही देशांचें कल्याणच झालें असतें. पण हिंदुस्थानांतून बहुतेक रोकड पैसा आणि कांहीं खाण्याचे वगैरे पदार्थ हाच बाहेर गांवीं जाणारा माल. आतां ते लोक या देशाचा माल नेत नाहींत यांत त्यांची चूक नाहीं. कारण एक तर त्यांच्या देशांत जसा तऱ्हे तऱ्हेचा माल तयार होतो तसा हिंदुस्थानांत होत नाहीं. आणि खेरीज त्यांना माला पेक्षां पैशाची जरूर फार यामुळें सांपडेल तों पर्यंत ते रोख पैसा नेतात हें रास्तच आहे. आणखी या व्यापाराचे संबंधानें आपले देशास निकृष्ट स्थिती येण्याचें कारण असें आहे कीं, वरील व्यापारी जो माल तयार करीत असतात तो दिसण्यांत जितका सुरेख व भपकेशीर असतो त्या मानानें टिकाऊ नसल्यामुळें लोकांस वारंवार त्या मध्यें पैसा घालावा लागतो, हें उघड आहे. याचा अनुभव लोकांस आहेच. आणखी त्या लोकांचा व्यापार सुरळीत चालण्यास या देशांतील त्यांची सजातीय राजसत्ता ही कारण होय. खेरीज यांत्रिक साधनानें ते जो माल तयार करितात तो सुरेख होऊन स्वस्तहि देण्यास सांपडतो. या योगानें त्यांच्याशीं इकडील व्यापाऱ्यांच्यानें सामना करवत नाहीं. या देशांत कोळसा असून व कांहीं खटपट केल्यास तो उपयोगांत येण्या सारखा असूनहि या देशांतील आगगाड्या, आगबोटी, व दुसरीं अनेक यंत्रें चालविण्यास विलायती कोळशाचा उपयोग केला जातो. या योगानें यादेशांतील लाखों रुपये परदेशांत जाऊन तद्देशी व्यापाऱ्यांस चांगली किफायत होते. तेव्हां हा प्रकार व्यापारांत मिश्र झालेल्या राजसत्तेचा होय. म्यांचेस्टर वगैरे व्यापारी या देशांतील पैसा लुबाडून नेतात तो योग्यच आहे. अशी संधी आली असतां प्रयत्न न करणें हा वेडेपणा आहे.

व्यापाराला राजसत्तेची मदत असली ह्मणजे तो व्यापार सुयंत्र घालून फायदेशीर होतो. म्यांचेस्टर वगैरे कडील व्यापाऱ्यांचे हिता करितां इंग्रज सरकार कसें कायावाचामनें करून झटतें हा अनुभव सर्वत्रांस आहेच. तेव्हां अगोदर परदेशी व्यापारी व्यापाराचे कामांत वाकबगार, अर्थ शास्त्राचीं तत्वें पूर्ण पणें जाणणारे, दुसऱ्याचे व्यापाराचा पाडाव करून त्यांजवर आपलें वर्चस्व कसें राखावें या विषयीं कुशळ, ज्यांणीं आपणांस बेपारी ह्मणवून आणि व्यापाराचें मिष करून हिंदुस्थानचे सार्वभौम सत्तेला हात घातला, बरें स्वतः व्यापारांत प्रवीण असून पुनः मालाचा सांठाहि पुष्कळ, माल तरी नाजकाकुजका नसून ज्याचा भपका पाहतांच गिराइकांच्या झुंडी पडाव्या, प्रत्येक खेपेला जो माल तयार करणार त्याची नवी फ्याशन ( तऱ्हा ) तेव्हां अशा सर्व गोष्टी अनुकूळ असून खेरीज व्यापाऱ्यांचे धोरणानें वागणारे राजकार्यधुरंधर पुरुष.· तेव्हां असें सगळेंच मेथकूट जमलें ह्मणजे मग त्या व्यापाराची तेजी काय पुसावी? ते लोक हिंदुस्थानांतून कसा पैसा नेतात याचा अनुभव सर्वत्रांस आहे. इकडील संपत्तीनें त्यांणीं आपले देशास रावणाची लंका करून ठेविली आहे. अनेक तऱ्हेचे कारखानें, अनेक तऱ्हेचीं यंत्रें, अनेक तऱ्हेचीं कलाकौशल्यें आणि अनेक तऱ्हेचे सुंदर व मिजाशीचे पदार्थ यांचे योगानें त्यांणीं आपला देश भरून टाकला आहे.

वरील व्यापाऱ्यांस सरकारची मदत आहे ह्मणून वर सांगितलें, त्यास अनेक कारणें आहेत. पहिलें कारण हें कीं इंग्रजी राज्य मूळींच व्यापाराचे पद्धतीवर व व्यापाराचे उद्देशानें स्थापित झालें आहे; दुसरें कारण— स्वदेशी व्यापारी हे आमच्या सरकारचे देश बांधव व जातिबांधव पडले, तिसरें कारण—सदरील व्यापारी मंडळीचें आमचे राजकर्त्यांच्या मूळ ठिकाणीं वजन मोठें आहे त्या मुळें त्यांचें ह्मणणें सरकारच्यानें सहसा नाकबूल करववत नाहीं, आणि चवथें कारण— आमच्या सरकारनें

या देशाचें राज्य केवळ अगणीत संपत्ती मिळवावी याच उद्देशानें संपादन केलें असल्यामुळें साधारण राजकीय पद्धतीनें या देशांतील जेवढी संपत्ती त्यांच्या देशीं जाईल तेवढी त्यांस हितावहच आहे. मग ती राजकीय संबंधानें जावो किंवा व्यापाराचे द्वारानें जावो. अशा तऱ्हेचीं तद्देशी व्यापाऱ्यांना सर्व प्रकारचीं साधनें खरोखर अनुकूळ आहेत.

आमच्या लोकांच्या संबंधानें या साधनाविषयीं विचार करूं लागलें असतां सर्व तऱ्हेची प्रतिकूळता आहे. आरंभीं व्यापार करण्यास मुख्य साधनीभूत जी एकी, ह्मणजे अनेक व्यापारी मिळून भागीदारीनें एक धंदा करावयाचा तो प्रकार आमच्यांत मुळींच नाहीं. त्यांच्यांतील कंपन्यांचे व्यापार शेंकडों वर्षे अव्याहत चालले आहेत, आमच्या लोकांची कंपनी साडेतीन दिवसहि टिकण्याची मारामार तेव्हां एकीच्या संबंधानें आमच्या लोकांची अशी स्थिती आहे. दुसरें साधन पैसा. जवळ पैसा पुष्कळ असला ह्मणजे हव्यात्या रीतीनें एखादा धंदा करतां येतो. पण पैशाचे संबंधानें तर या देशांतील लोक अती निकृष्ट स्थितीस पोंचले आहेत. एखादा श्रीमंत गृहस्थ संपतीच्या मदानें धुंद होऊन आळशी बनतो. जेव्हां संपतीरूप मद उतरून जातो तेव्हां शुद्धीवर येऊन त्याचे डोळे उघडतात आणि मग आपली स्थिती सुधारण्याचा तो यत्न करूं लागतो. पण अशा वेळीं त्याची स्थिती सुधारण्याचें त्यास बिकट वाटतें. एकादें जहाज तुफानांत सांपडून त्याचीं अवजारें फाटलीं, डोलकाटी तुटून गेली व सुकाणु मोडून जाऊन तें जहाज एकदा वाहुटळी खालीं पडलें ह्मणजे तें आवरून पुर्वस्थितीवर आणणें महा प्रयासाचें काम आहे. तीच स्थिती आपल्या देशांतील व्यापाराची झाली आहे. ह्मणजे एकी व पैसा या दोनाहि गोष्टी अनुकूळ नाहींत. ज्यांचे जवळ आजपर्यंत पैसा होता व हल्लींहि आहे त्यांस

व्यापार करावासा वाटला नाहीं व वाटत नाहीं. जे कफल्लक झाले ते व्यापाराला आरंभ करणार. पण मग त्याचे हातून व्यापार सिद्धीस जावा कसा. बरें जे श्रीमंत आहेत त्यांस देशाची निकृष्ट स्थिति झाली हें समजणार तरी कशानें, आतां श्रीमंत लोकांना स्वतः चे झालेले निकृष्ट स्थितिचीच जर दाद नसते, व लोकांनीं सांगूनहि समजत नाहीं, तर त्यांचें लक्ष देशहिताकडे लागणें ह्मणजे असंभवनीय होय. तेव्हां त्यांचे घरांत आठरा विश्वे दरिद्राचा प्रवेश झाल्यावर मग त्यांचे डोळे उघडणार. पण मग उघडून उपयोग काय? कारण अशा वेळीं देशाचे व्यपाराची वृद्धी करण्याचा यत्न करणें ह्मणजे कफक्षयानें झिजलेले मनुष्यानें लढाईस जाण्या विषयीं कंबर बांधण्यासारखें आहे. आतां स्वदेशवृध्यर्थ यत्न करणारी मंडळी जो सार्वजनिक कल्याणाचा कळवळा दाखविते, तिचे यत्न सार्वजनिक हिताचे नव्हत हें वर सांगितलेंच आहे. आतां स्वदेशहिता विषयीं तरी प्रस्तुत मंडळीचे यत्न कितपत फलद्रूप होण्याचा संभव आहे याचा विचार करूं. हा विचार करते वेळीं प्रथम एक गोष्ट लक्षांत आणली पाहिजे. ती ही कीं प्रस्तुत मंडळी ही स्वदेश सुखवर्धनाचे यत्न करणारी असते किंवा ते करण्याविषयीं नुस्ता उपदेश करिते. याचा विचार करूं लागलें असतां वरील मंडळी ही नुस्ता उपदेश करणारी असल्याचा अनुभव सर्वत्रांस आहे तेव्हां त्यांची उपदेशीत गोष्ट सिद्धित नेण्याला दुसरा वर्ग पाहिजे, त्यांच्या वांचून कार्यभाग होत नाहीं. तो वर्ग व्यापारी लोकांचा. या व्यापारी लोकांत जे पैसेवाले असतात त्यांच्या हातून कदाचित् वरील गोष्ट घडण्याचा संभव असतो. पण त्यांच्या मनाचे ग्रह कांहीं निराळया तऱ्हेचे असल्यामुळें प्रस्तुत मंडळीच्या विचाराशीं त्यांची एकेयता होत नाहीं. आणि दुसरें असें कीं सार्वजनिक हिताची साक्षात्कारी कळ कळ दाखवून ही मंडळी जशी स्वदेशहितसाधना विषयीं झटते, याचप्रमाणें स्वदेशहिताचे उपाय योजीत असतां त्यांत स्वहित साधण्याकडे त्यांचा कटाक्ष बहुधा विशेष असतो

आतां स्वहित अनेक तऱ्हेनें असतें. कोणाचें लक्ष पैशाकडे असतें, व कोणाचें नुसतें "येन केन प्रकारेण" या न्यायानें प्रसिद्धीस येण्याकडे असतें. मिळून आपल्या उपदेशा पासून लोकांचें कल्याण होवो, किंवा न होवो देशांतील व्यापाराची वृद्धी होवो किंवा न होवो, व आपला यत्न प्रस्तुत कालास अनुकूल असो, किंवा नसो तो कांहीं एक विचार मनांत न आणतां लोकांना उपदेश करीत सुटावयाचें व कोणत्या तरी रीतीनें आपल्यास सार्वजनिक हितचिंतकांचे माळेंत ओवून घ्यावयाचें इतकाच प्रस्तुत यत्न असतो. बहुधा सर्व व्याख्यानें याच वर्गांत मोडतात, आर्यावर्त, आर्य जननी, आर्यबांधव, आर्यविद्या, यांचे कल्याणार्थ सर्व आर्य कायावाचा मनें करून झटत आहेत असें सकृद्दर्शनी कोणासहि वाटेल. आणखी हें सगळें सार्वजनिक म्हणून डंका वाजवायाचा, एका देशा करितां यत्न करीत असून तो सिद्धीस जावा या करितां अन्य देशांशीं मत्सर करावयाचा आणि अशा कृत्यास सार्वजनिक कृत्य म्हणावयाचें हें मोठें आश्चर्य होय. साधारण रीतीनें मनुष्याच्या यत्नांत प्राधान्य भाग स्वहिताचा असतो, तें साधून सवड होईल तर स्वदेशहित, आणि तेंहि साधल्यास मग सार्वजनिक हित. फक्त सार्वजनिक हिताची कळकळ दुर्मीळच. बहुधा स्वहिताची कळकळ फार. अनेक तऱ्हेच्या सभा, अनेक तऱ्हेचे समाज, अनेक तऱ्हेचे क्लब, वर्तमान पत्रें, मासीक पुस्तकें, त्रैमासिकें, व्याख्यानें वगैरे सर्व गोष्टींत मुख्य स्वहित, आणि तें साधण्या करितां स्वदेशहिताचें सोंग बनविलेलें असतें. आतां याजबद्दल लोकांना आम्ही केवळ दूषण देतों असें नाहीं. 'आधीं पोटोबा आणि मग विठोबा' ही म्हण पूर्वापार आहे. मनुष्यमात्र स्वहिततत्पर असतात. त्यांत जे महान आहेत त्यांचे हातून मात्र स्वहित साधून खेरीज स्वदेशहिताची सेवाहि केली जाते. बाकी सार्वजनिक हितकर्ते दृष्टीस पडणें कठीणच, आणि त्या विषयीं कोणी व्यर्थ वल्गनाहि करूं नये. कारण विचारी पुरुषाला तें खरें वाटणार नाहीं.

प्रकृत विवेचनावरून वाचकांचे लक्षांत आलेंच असेल कीं आपल्या लोकांचे वरील सर्व यत्न हे स्वदेशहितार्थ व स्वहितार्थ आहेत. यांत सार्वजनिकपणाचा कांहींच संबंध नाहीं, तथापि हे यत्न करणें साधारण रीतीनें आपल्या लोकांस इष्ट आहे, इतकेंच नाहीं पण त्यांनें तें कर्तव्य आहे. आतां प्रस्तुतचे कालमानानें हें सिद्धीस जाणें दुर्घट मात्र खरें. कारण, व्यापार सुरळीत चालण्यास व्यापाऱ्यांचा यत्न आणि त्यांस राजाची अनुकूलता पाहिजे. आपले प्रस्तुतचे राजकर्ते हे जरी आपल्या लोकांच्या व्यापारादिकांस प्रतिबंध करीत नाहींत, तथापि त्यां[illegible]पासून व्हावी तशी मदतहि होत नाहीं. आणि ती होण्याचा संभवहि नाहीं. कारण स्वदेशबांधवांच्या कल्याणार्थ आमच्या राजकर्त्यांचें लक्ष लागण्याचा जेवढा संभव आहे, व त्यांचे संबधानें त्यांस जेवढी काळजी लागेल तितकी आपल्या लोकांच्या कल्याणार्थ ते घेतील असें वाटत नाहीं. मिळून आपल्या राजकर्त्यांपासून स्वदेशहितार्थ आपणास मदत मिळण्याची आशा नाहीं. आतां कदाचित् असें मात्र होऊं शकेल कीं आपल्या लोकांच्या दीर्घ प्रयत्नानें परदेशी व्यापाऱ्यांचे कल्याणास धक्का बसण्याचा प्रसंग आला तर मात्र कदाचित् आपणावर एखादें संकट येण्याचा संभव आहे. मग तें संकट उघड रीतीनें येवो किंवा एखादे कायद्याच्या रस्त्यानें येवो. तेव्हां अशा स्थितींत आमचा स्वदेशहितवर्धना विषयीं यत्न करणाऱ्या मंडळीचे हेतु सफळ होण्यास किती गोष्टी प्रतिकूळ आहेत हें वाचकांचे लक्षांत आलेंच असेल. आतां जरी अशी स्थिती आहे, तथापि आपल्या लोकांनीं उमेद सोडून उपयोग नाहीं. "यत्ने कृते यदि न सिध्यति कोत्र दोषः" हें वाक्य लक्षांत धरून सतत यत्न करणें हें कर्तव्य होय.

---

# स्वात्मानंद.

(मा. अं. व. पु. चा.)

अष्टाब्जावर निश्चिति ॥ पंचवर्णमय दीप्ति ॥
त्या हृदयपद्मपीठावरती ॥ प्रकाश स्वज्योती पूर्णरूप ॥ ५५॥
परमात्मा दिव्य क्रीडा करी ॥ त्याच्या दिव्य प्रभांतरीं ॥
विलसे कीं हें विश्व निर्धारीं ॥ ऐक्यत्वें भीतरीं शोभतसे ॥ ५६ ॥
लक्षीं ईश्वर तो तत्वता ॥ ऐक्यपणेचि तदात्मता ॥
तैं तुज ब्रह्मसायुज्यता ॥ अनयासें हाता प्राप्त होय ॥ ५७ ॥
सहज ब्रह्मरूप आहेसी ॥ विचार मात्र करीं मानसीं ॥
आपुला आपणचि होसी ॥ ऐक्य अनायासी निजरूप ॥ ५८ ॥
मुद्रेनें दिव्य लक्ष करीतें ॥ पसरे नाद क्रमेंची तें ॥
तुर्या व्यतिरेक शुद्ध परतें ॥ परमानंदातें रमावें त्या ॥ ५९ ॥
जागृति स्वप्न सुषुप्तिमाजी स्फुरे ॥ तें ध्यान आत्माश्रयीं निर्धारें ॥
त्यासी प्रतिती करूनि कीरे ॥ पाहावें तें खरें तुर्यान्वयें ॥ ६० ॥
ते तुर्या प्रकाशात्मक जोती ॥ त्रयदेहीं अवस्था जाणती ॥
तेचि स्वरूपान्वयें सुखस्थिती ॥ रमे स्वात्मगती निजरूपीं ॥ ६१ ॥
स्वात्मा हा अपरोक्ष किं तो ॥अनुभवे ब्रह्मरंध्रीं दीसतो ॥
ओंकारात्मक पंचदेह भासतो ॥ शुद्ध लक्षिजेतो व्यतिरेकें ॥ ६२ ॥
त्याच्या प्रतितीनें लक्षितीं ॥ तनुप्रमाणे विश्व हे पाहाती ॥
जैसी बिंबप्रकाशें येक ज्योति ॥ जळ मिथ्याकृति भास भासे ॥ ६३ ॥
ब्रह्मरंध्रज्योतिर्सी ब्रह्मरंध्र निश्चिती ॥ हृदयाधिष्ठान नेमी श्रुति॥
त्याचा प्रत्यय तो न पाहाती ॥ वृथा बोलती नानापरी ॥ ६४ ॥
चक्षुहीन असतां चंद्र निश्चिती ॥ जैसा पूर्णेंदु बिंबाप्रती ॥
देखे ना परदीप्तीच्या अनुभवोक्ति ॥ अभासरीति भास भासे ॥ ६५ ॥
जैसीं तीं इंद्रियें अनाकृति ॥ परी आकार भेदान्वयें निश्चिती ॥
प्रत्यक्षीं परमितता पावती ॥ स्थूळदेहाश्रयें तीं अन्वयेंचि ॥ ६६ ॥

तैशा या भितनु अनाकृति ॥ परी जाहाली तया आकृति ॥
भोगाव्या सुखदुःख सर्व प्रतिती ॥ अवस्छारूप होती निश्चयेसी ॥६७॥
भूतें व्यतिरेक अन्वयस्छिती ॥ द्विधारूपें स्वयेंची वर्तती ॥
त्याच्या प्रत्ययें सर्व व्याप्त होती ॥ परी तयांप्रती परिच्छिन्नता ॥६८॥
तत्कार्यें ह्मणोनि चतुर्विधता ॥ त्याही तशा तनू भासती तत्वता ॥
आत्मानात्मविचारितां ॥ सुखस्वरूपता निजरूपीं ॥६९॥
त्या त्रय तनु साकारही होती ॥ कीं नीराकृतिविणें स्छूळा व्यापिती ॥
ऐसा खेळ कौतुक जाणती ॥ ते स्वयें न येती गर्भवासा ॥७०॥
तत्वें भूततनूसीं कारण ॥ स्वयें आत्मा परंज्योति जाण ॥
त्याची जे अपरोक्षता आपण ॥ तनुप्रमाणें सुज्ञ जाणती ॥७१॥
दृश्यत्वें निरसुनी शुद्ध ॥ व्यतिरेक ब्रह्म शाश्वत पद ॥
उरे जो का निजानंद ॥ आनंदकंद अक्षयीं ते ॥ ७२ ॥
तें पद लक्षी तयास ॥ प्रपंच लटिका दिसे भास ॥
ब्रह्मान्वयीं या निश्चयास ॥ स्वयें प्रतितीस पावला तो ॥७३॥
जैसा अंध केवळ आंधळा ॥ तो रविप्रकाश केवी देखे डोळां ॥
त्याचा प्रत्यय तो तयाला ॥ केवी कळला ह्मणो येईल ॥ ७४ ॥
परी उष्मा व्यापक देहीं ॥ होय तनुतें या प्रत्ययीं पाहीं ॥
जाणत असे तो कांहीं ॥ दृष्टि सूक्ष्मही योग्यतेनें ॥ ७५ ॥
तैसें सूक्ष्म हृदयाब्ज ज्ञान ॥ नव्हतां न लक्षे आत्मा जाण ॥
तत्वानुक्रम मात्र जाणोन ॥ प्रत्यय आपण पुरा जाणिजे ॥७६॥
जैसीं सूत्रें मणी गुंफोनी ॥ अग्रें वर्तती तदुपरी दोनी ॥
तैसीं सोहं हंस ये रितीं निर्वाणीं ॥ वर्ण विकसुनी तत्वें समग्रें ॥ ७७ ॥
तीं दोनी अग्रें निश्चिती ॥ जीवजंतुमाजी वर्तती ॥
तयायोगें प्राणी जीती ॥ तैसे संव्हरतो तयाचेनी ॥ ७८ ॥
एवं शुद्धप्रकाश अंतरगत ॥ अजपारूप हें विश्व साजत ॥
सुज्ञ जाणती सिद्धांत ॥ अज्ञाना प्राप्त केवि होय ॥ ७९ ॥

सोहं देव स्वयें तयाप्रती ॥ अनुभवितां स्वात्मानुभूतीं ॥
अद्वयानंद माजे निश्चिती ॥ स्वयें विश्व प्रतिती मावळे ते ॥८०॥
आधारीं शक्ति बीजावरी॥ विलसती वर्णादि तत्वें सान थोरीं ॥
भूमध्यें बीज सर्वात्मकपरी ॥ शिवमय विस्तारी भास खलुता ॥८१॥
ऊर्ध्वीं लक्षांश येरिती ॥ उभयानंदाविरहीत निश्चिती ॥
बिंदुस्वरूपाची स्थिती ॥ मावें तुजप्रति दाविलीसे ॥ ८२ ॥
एवं शुद्ध प्रकाशात्मक ॥ परशीव तो आदिमध्यादिका ॥
स्वरूपीं भासे तोचि एक ॥ भवतारक कृपाळू तो ॥८३॥
आधाराहुनी सहस्रदळ ॥ तीं हीं सतस्थानें केवळ ॥
तुज सांगतसें निश्चळ ॥ आईक निर्मळ चित देईं ॥ ८४ ॥
आधार आणि स्वाधिष्टान ॥ मणीपूर अनुहत जाण ॥
विशुद्ध अग्नीचक्र पूर्ण ॥ सातवें आपण सहस्रदळ ॥ ८५॥
तैसींच ब्रह्मांडो सत आइक ॥ त्रिकुट श्रीहट गोल्हाट देख ॥
औटपीठ पत्रमरगुंफा प्रकाशात्मक ॥ उल्हेख आलेख सत होती ॥८६॥
सर्वातीत हो उत्तम ॥ अष्टपत्रमय हें हृदयपद्म ॥
त्यावरी रचनेचा उगम ॥ ऐसा अनुक्रम निरोपिला ॥ ८७॥
संक्षेपें करूनि समस्त ॥ तुज दावितों इत्यर्थ ॥
जो तूं परिपूर्ण भावयुक्त ॥ ह्मणोनि बोलत तुजला पैं ॥८८॥
आत्मयाचा सर्व पदार्थ ॥ स्वानुभवितां इत्थंभूत ॥
ह्मणों ये तो स्वध्यानयुक्त ॥ निगम निश्चित वानी तया ॥ ८९ ॥
तोचि ब्रह्मविद ब्रह्ममूर्ती ॥ तया दर्शनें भावीक तरती ॥
तयाची महिमा काय किर्ती ॥ स्वयें वाचे प्रति न बोलवे ॥ ९० ॥
आतां ऐकिजे पंचम उल्हास ॥ जेणें स्वरूपीं स्थिरे मानस ॥
ये निजात्मा प्रत्ययास ॥ मनन ध्यास श्रवणेंची ॥ ९१ ॥
इति श्री स्वात्मानंद लिखिते ॥ श्री पूर्णदास विरचिते ॥
निजात्मस्वरूपवर्णनन्नाम ॥ चतुर्थोल्हासः ॥ ॥ ६ ॥

# उल्हास ५ वा

नमन निजात्मया हरिसीं ॥ आदि अंतीं तूंचि होसी ॥
मध्यें तूंचि विकासकी ॥ निजात्मसत्तेसीं आपुलीये ॥ १ ॥
ब्रह्मीं शुद्ध अनुहात ॥ ध्यानीं स्फुरे जे कां नितांत ॥
ते बिंदुरूपें गिरा ह्मणत ॥ अनुभवयुक्त वेदांती जे ॥ २ ॥
येथें सूक्ष्म हृदयाब्जमूळ ॥ विकसीत जें कां प्रबळ ॥
तेथूनि परा जाहली केवळ ॥ विस्तार सकळ जेथुनियां ॥३॥
ती तूर्या स्फुरणें विसर्गमय ॥ प्रभा हृत्पद्मीचें पीठ तिये ॥
येष्टी तीस सुषुप्ती स्वयें ॥ रूप अपराशयें तेथुनि प्रकृति ॥ ४ ॥
मग अष्टविधा भूतें होती ॥ मन अहंकार बुद्धीरूप कोशाप्रति ॥
त्या सर्वां स्वयें प्रकृति ॥ स्वप्न विस्तारिती प्रसरोनी ॥ ५ ॥
तें हें स्वप्न सुखकर्णिकेंत. ॥ विकसे त्या केशरा अंतरगत ॥
जागृति अष्टपत्र होत ॥ येकाकी दावीत विश्वाकृति ॥ ६ ॥
नवचक्रें नवद्वारें होत ॥ दशम द्वार त्या विरहित ॥
अष्ट पाकोळिका सुशोभित ॥ हृदईच्या येथ असती पैं ॥ ७ ॥
येथें हंसस्वरूप तें मन ॥ फिरे वायुवरी बैसका धरून ॥
तेथें नित्य निवसोनि आपण ॥ कैसें वर्तन होत असे ॥ ८ ॥
अष्टदिग्देवाच्या जैशा प्रकृति ॥ वृत्ति होत तैसीच निश्चिति ॥
मनेंद्रियें जैसीं का निघती ॥ दळांतरगती ज्या ज्या दळीं ॥ ९ ॥
पूर्वपुण्यें मति वाढते ॥ बहुत स्फुरद्रूप होते ॥
अग्नी त्रिकोणांतरिं ते ॥ निद्रालस्यातें अधिकता ॥ १०
दक्षण दळीं कापट्च नानापरी ॥ नैऋत्य कोणीं हिंसा लोभ धरी॥
मोहो जाळ स्मरत अंतरीं ॥ विचार दुरिं दुरावला ॥ ११ ॥
नाना सौख्य विलास स्फूर्ति ॥ उठे त्या पश्चिमांतरगती ॥
मन जातां वायव्य कोणाप्रति ॥ गमन तिर्थीं इतर स्थळीं ॥ १२ ॥

(पु० चा०)

# सुभाषित.

किंचिदाश्रयसौंदर्या द्धत्ते शोभा मसाध्वपि ॥
कांताविलोचने न्यस्तं मलीमसमिवांजनं ॥ ८१ ॥

"सुन्दर वस्तुचे आश्रयानें यःकश्चित् पदार्थहि शोभा पावतो; काजळ निस्तेज असतांहि तरुणीच्या नेत्रसंयोगानें त्यास अतीशय शोभा येते."

असज्जनः सज्जन संगि संगात् ।
करोति दुःसाध्य मपीह साध्यं ॥
पुष्पाश्रया च्छंभुशिरोधिरूढा ।
पिपीलिका चुंबती चंद्रबिंबं ॥ ८२ ॥

"सज्जनाचे संगतीनें असज्जन पुरुषहि दुःसाध्य वस्तुप्रत पावतो. पुष्पाचा आश्रय केल्यानें मुंगी शंकराचे मस्तकावर जाऊन चंद्र बिंबाचें चुंबन करिते."

आहारे वडवानलश्च शयने यः कुंभकर्णायते ।
संदेशे बधिरः पलायनविधौ सिंहः सृगालो रणे ॥
अंधो वस्तु निरीक्षणेऽथगमने खंजः पटुः क्रंदने ।
भाग्येनैवहि लभ्यते पुनरसौ सर्वोत्तमः सेवकः ॥ ८३ ॥

"आहारा विषयीं वडवानला सारखा, निद्रे विषयीं कुंभकर्ण, निरोप ऐकून घेण्या विषयीं बहिरा, जलदीचे कामाला सिंहगती, रणांगणीं कोल्ह्या सारखा पलायन करणारा, एखादी वस्तु पहाण्यास सांगितलें असतां अंध, प्रवासाचे ठायीं लंगडा, आणि सदासर्वदा रडवा, असा सर्वगुणसंपन्न सेवक मिळणें हें महद्भाग्यच होय!!"

उपनिषदः परिपीता गीताऽपिच हंत मति पथं नीता ॥
तदपि न हा विधुवदनामानससदनाद् बहिर्याति ॥ ८४ ॥

" ब्रह्मज्ञानाचा अभ्यास करून व भगवद्गीता पठण करून ज्यांची मति सन्मार्गाकडे वळली आहे असे वेदांतीही, चंद्रवदना ज्या तरुणी त्यांच्या मानसरूपी ग्रहांतुन बाहेर येत नाहींत."

हेमंते बहुदोषाढ्ये द्वौ गुणौ सर्व संमतौ॥
अयत्नशीतलं वारि सुरतं स्वेद वर्जितम् ॥ ८५ ॥

" दोषयुक्त असा जो हेमंत ऋतु त्यामध्यें सर्व लोकांस पसंत पडण्या सारखे असे दोन गुण मात्र दिसतात खरे. ते हे कीं,— प्रयत्ना वांचून थंडगार पाणी मिळतें आणि स्वेदविरहित सुरत प्रसंग घडतो. "

हृदि विलसितो हारो नायं भुजंगम नायकः ।
कुवलयदलश्रेणी कंठे न सा गरलद्युतिः ॥
मलयजरजो नेदं भस्म प्रियारहिते मयि ।
प्रहर न हरभ्रांत्याऽनंग क्रुधा किमु धावसि ॥ ८६ ॥

कोणीएक तरुणी काम पीडित होऊन मदनास उद्देशून म्हणते— " हे मदना, माझ्या हृदयावर हा रत्नाचा हार आहे, सर्प नव्हे; कंठा मध्यें कमलांची माला आहे, विषकांती नव्हे; अंगाला हें भस्म नव्हे, चंदन चर्चित केला आहे. या करितां शंकराचे भ्रांतीनें मला पीडा करूं नको, " मदनाचा आणि शंकराचा वैरभाव लोक विश्रुत आहे.

यैस्त्वं गुणगणवानपि सतां द्विजिव्हैरसेव्यतां नीतः ॥
तानपि वहसि पटीरज किं कथयामस्त्वदीय मौन्नत्यं ॥ ८७ ॥

"हे चंदना, तू उत्तम गुणवान खरा, परंतु सर्पांचे संगतीनें सज्जनांच्या असेव्यतेस पात्र झाला आहेस, असें असून तू त्यांची संगती न सोडतां त्यांस आपले डोक्यावर चढिवले आहेस तेव्हां तुझ्या या वेडेपणाला काय ह्मणावें."

ब्राह्मणा गणका वेश्या: सारमेयाश्च कुक्कुटा: ॥
दृष्टेष्वन्येषु कुप्यंति न जाने तस्य कारणं ॥ ८८ ॥

"ब्राह्मण, गणक, वेश्या, श्वान आणि कोंबडे हे, दुसरा सजातीय गृहस्थ भेटला ह्मणजे लगेच तंट्यावर येतात, मग याचें कारण काय असेल तें नकळे,"

शत्रोरपि गुणा वाच्या दोषा वाच्या गुरोरपि ॥
सर्वदा सर्वयत्नेन पुत्रे शिष्ये हितं वदेत् ॥ ८९ ॥

"शत्रूचे गुणांची प्रशंसा करावी, व प्रत्यक्ष गुरूचे दोष असले तथापि ते त्यास सांगावे, आणि सार्वकाळ शिष्यवर्ग व पुत्र यांस हितोपदेश करावा."

ऊर्जितं सज्जनं दृष्ट्वा द्वेष्टि नीच: पुन: पुन: ॥
कथली कुरुते स्वास्थं विधुं दिवि विधुंतुद: ॥ ९० ॥

"सज्जनाचा उत्कर्ष पाहून नीच मनुष्य वारंवार त्याचा द्वेश करितो. आकाशांत राहू चंद्राला वारंवार ग्रासून टाकण्याचा यत्न करीत असतो."

आगाधहृदयाभूपाः कूपाइव दुरासदाः ॥
घटीका गुणिनो नोचेत् कथं लभ्येत जीवनं॥ ९१ ॥

"मानी राजे हे कूपा प्रमाणें दुरापस्त होत. रज्जूनें युक्त अशा घटिके वांचून कूपांतील उदक जसें हस्तगत होत नाहीं, तद्वत गुणवान् कार्यसाधकां वांचून राजाचे हातून द्रव्यादिक मिळत नाहीं."

रे राजहंस किमिति त्वमिहा ऽऽ गतोसि ।
यो ऽ सौ बकः स इह हंस इति प्रतीतः ॥
तद्गम्यतामनुपदेन पुनः स्वभूमौ ।
यावद्वदंति न बकं खलु मूढलोकाः ॥ ९२ ॥

"हे राजहंसा, तूं या ठिकाणीं कशाकरितां आलास? येथें सर्व लोक बकालाच हंस मानणारे आहेत, याकरितां तू स्वस्थानीं जा. कारण मूढ लोकांत तुझी प्रशंसा होणार नाहीं."

पद्मिनि किमिति क्रीडसि मधुपैर्लज्जा लवोपि नाहि किं ते ॥
हर हर विस्मृत्योक्तं क नु लज्जा सवितृरक्तायाः ॥ ९३ ॥

"हे पद्मिनी, भ्रमरां बरोबर पक्षीं मद्यपी लोकां बरोबर क्रीडा करण्यास तुला लज्जा वाटत नाहीं काय? हर हर!! किंवा तुला दूषण देतांना आह्मासच विस्मृति झाली असें ह्मटलें तरी चालेल. कारण; 'सवितृरक्त' ह्मणजे सूर्यावर प्रीति करणारी पक्षीं पितृ गामिनी अशी जी तूं त्या तुला लज्जा कसली वाटणार?"

यदि रामा यदिच रमा यदि तनयो विनयगुणोपेतः ॥
तनये तनयोत्पत्तिः सुरवरनगरे किमाधिक्यं ॥ ९४ ॥

"जर स्त्री आणि लक्ष्मी हीं अनुकूल असतील, पुत्र विनयादि गुणांनीं संपन्न असेल, व पुत्राचे ठायींहि पुत्रोत्पत्ति होईल, तर मग या पेक्षां इंद्रपुरीमध्यें विशेष तें काय आहे! अशा ऐहिक सुखापुढें स्वर्गसुख केवळ तुच्छ होय."

रा० रा० गोविंद पुरुषोत्तम वहिवाटदार अलबारपूर .... .... १८३
रा० रा० विश्वनाथ बापुजी टिकेर देवास .... .... .... १८६
रा० रा० हरी वामन जोशी सं. इंदूर .... .... .... १८६
रा० रा० कृष्णाजी त्रिंबक सायर नायव सं. इंदूर .... .... १८६
— मुखत्यार वेद शाळा कृष्णपुरा सं. इंदर .... .... १८६
रा० रा० सखाराम रामचंद्र नाझर इंदूर .... .... .... १८६
रा० रा० बाळकृष्ण मल्हार वकील सं. इंदूर .... .... १८६
रा० रा० कृष्णाजी आणाजी खेंचे इंदूर .... .... .... १८६
रा० रा० गोविंद गोपाळ करंदीकर सं. धार .... .... १८६
रा० रा० ठाकूर सा० परमानंद कानगो धार .... .... .... १८६
रा० रा० ठाकूर सा० बाकीरचंद प्रतापचंद धार .... .... .... १८६
रा० रा० श्रीधर नारायण सं० धार .... .... .... .... १८६
— नेटीव्हलायब्ररी सं० धार .... .... .... .... .... १८६
मे. बापाजी बन्याजी बक्षी सं. धार .... .... .... .... १८६
श्री० सरकार महाराज अनंदराव सा० पवार सं. धार .... .... १८६
रा. रा. रामचंद्र मार्तंड कमाविसदार सं. धार .... .... .... १५६
रा, रा. काशिनाथ पांडुरंग ओक सं. धार .... .... .... .... १८६
रा. रा. रामचंद्र चिंतामण जज्ज सं. धार .... .... .... १८६
श्रीमंत संभाजीराव आबा सा० सं. धार .... .... .... .... १८६
रा. रा. वासुदेव त्रिंबक कापशे सं. इंदूर .... .... .... .... १५६
रा. रा. नारायण जनार्दन क्लार्क इंदूर .... .... .... .... .... १८६
रा. रा. बळवंत कमळाकर कारकून इंदूर .... .... .... .... १५६

( सदाशीव सखाराम माहाजन यांचे मार्फत )

रा० रा० रघुनाथ गोविंद वाघळे रत्नागिरी .... .... .... १८६
रा० रा० माहादेव सखाराम काशीकर रत्नागिरी .... .... .... १८६
रा० रा० गोपाळ लक्ष्मण वऱ्हाडकर वऱ्हाड .... .... .... १८३
रा० रा० नेटिव लायब्ररीचे सेक्रेटरी राजापूर .... .... .... १८६

रा० रा० शिताराम नरहर ढवळे राजापूर .... .... .... १८६

रा० रा० गोविंद मोतीराम सांपळे राजापूर .... .... .... १८६

रा० रा० शिवराम नारायण हरडीकर राजापूर .... .... १८६

वि० शारंग पाणी आव्या मर्चंट शिताबर्डी .... .... .... १८६

रा० रा० नारायण गोविंद काकनकर मालवण .... .... .... १८६

रा० रा० बाळाजी धोंडशेट विनितकर मालवण .... .... .... १८४

रा० रा० माहादेव लक्ष्मण शेट नेवगी मालवण .... .... .... १८३

रा० रा० दामोदर हंसराजशेट मालवण .... .... .... १८३

रा. रा. गोविंद रामचंद्रशेट मालवण .... .... .... .... १८६

रा. रा. शिवराम अर्जुन मुणगीकर मालवण .... .... .... १८६

रा. रा. पांडोबा विठोजी चव्हाण मालवण ... .... .... १८६

रा. रा. नारायण विठोबाशेट मालवण .... .... .... .... १८६

रा. रा. कृष्णाजी भास्कर कारकून चिंचिणी .... .... १८६

रा. रा. बापुजी केशव गोरे मालवण .... .... .... १८६

रा० रा० रामचंद्र माहादेव वैद्य वेंगुर्लें .... .... .... १८६

रा० रा० बाळाजी शिताराम नाईक वेंगुर्लें .... .... १८६

रा० रा० अंताजी नारायण कोटनीस वेंगुर्लें .... .... .... १८६

रा० रा० शिताराम मैराळ वेंगुर्लें .... .... .... १८६

रा० रा० काळबा येशो प्रभु गोडकर वेंगुर्लें .... .... १८६

रा० रा० अंताजी जगनाथ माहाजन वेंगुर्लें .... १८६

रा. रा. पांडुरंग आणाजी माहाजन वेंगुर्लें .... .... १८६

रा. रा. परशराम बल्लाळ जोशी वेंगुर्लें .... .... .... .... १८६

रा. रा. येशवंत विठ्ठल परुळेकर रत्नागिरी .... .... .... १८६

रा. रा. केशव विष्णु घैसास रत्नागिरी .... .... .... १८६

रा. रा. मल्हार कृष्ण भिडे रत्नागिरी .... .... .... १८६

रा. रा. भास्कर आत्माराम भाडारकर रत्नागिरी .... .... १८६

रा. रा. बाळकृष्ण महादेव चितळे रत्नागिरी .... .... १८६

(राहिलेला वसूल पुढील अंकांत येईल.)

वर्ष आगाऊ किंमत वर्षाची १ रुपया दुसरें

सत्य शांति सौख्य

# सद्धर्मदीप

फाल्गुन चैत्र शके १८०१

अंक ८—९

मार्गे मार्गे निर्मलं साधुवृंदं । वृंदे वृंदे तत्वचिंतानुवादः ॥
वादे वादे जायते तत्वबोधो । बोधे बोधे सच्चिदानंदभासः ॥



अष्टीवाग
'सत्यसदन' छापखान्यांत छापिलें

आगाऊ किंमत पुस्तक घेण्यापास[illegible] आंत दिली पाहिजे

पुस्तकाचे किंमती शिवाय टपाल खर्चाबद्दल प्रत्येक अंकास आर्धा आणा जास्त पडेल

फुटकळ अंकाची किंमत चार आणे

# विषयांची अनुक्रमणिका

अंक ८ वा

१ राजा विषयीं पात्रापात्र विचार .... .... .... २२६
२ सत्ते पुढें शहाणपण नाहीं. .... .... .. २४१
३ स्वात्मानंद .... .... .... .... .. २४२
४ सुभाषित .... .... .... .. .... २५३

अंक ९ वा

१ अंतः शुद्धि .... .... .... .... २५७
२ इस्पातां विषयीं सामान्य विचार .... .... २५९
३ काकूळशी कढाई .... .... .... २७६
४ मासपत्रिका. .... .... .... .... २८५

---

## वसूल.

( आषाढ शके १८०९ अखेर )

रा. रा. नारायण काशिनाथ वागूळ रत्नागिरी .... .... ६
रा. रा. पंढरीनाथ गणेश कमिशनर मुंबई .... .... १८
रा. रा. मोरो विश्वनाथ ओक साखरणें .... .... .... १८
रा. रा. बाळकृष्ण रामचंद्र बापट कामार्ले .... .... .... १
रा. रा. विनायक चिंतामण जोगळेकर खानदेश .... .... १८
रा. रा. निळकंठ गोविंद सबनीस बेळगांव .... .... .... १८

( सदाशीव सखाराम माहाजन मार्फत )

रा. रा. शंकर विश्राम घुग्ये वेंगुर्लें .... .... .... १८
रा. रा. वामन सखाराम जोशी वेंगुर्लें .... .... .... १८
रा. रा. आनंददास द्वारकादास शेट गुजर वेंगुर्लें .... १८
रा. रा. पांडुरंग बाबाजी हिंदळकर वेंगुर्लें .... .... .... १८

# सद्धर्मदीप

अंक ८

---

## दानाविषयीं पात्रापात्र विचार.

सर्वांभूतीं द्यावें अन्न ॥ द्रव्य पात्र विचारून ॥
उपतिष्टे कारण ॥ तेथें विज पेरिजे ॥

(तुकाराम.)

हरयेक गोष्टींत विचार प्राधान्य आहे ह्मणून आह्मी अनेकवेळा प्रतिपादन केलें आहे, त्याच प्रमाणें दानाविषयींहि विचार प्राधान्य होय. आतां येथें अशी एक शंका येण्याजोगी आहे कीं, सर्व देशांत व सर्व काळीं दान हें मुख्य पुण्य कर्म गणलें असल्यामुळें त्याविषयीं विचार तो काय करावयाचा? दानाचे योगानें कधींहि अहित व्हावयाचें नाहीं असा सिद्धांत असल्या विषयीं लोकांची समजूत दिसते. दान ह्मणजे जीवाला संकटांतून मुक्त करण्याविषयीं केलेली मदत. साधारण लोकांची अशी समजूत आहे कीं, ब्राह्मणादिकांस द्रव्य वगैरे देणें आणि अन्नशांति करणें हेंच मुख्य दान होय. ह्मणजे द्रव्य आणि अन्न दुसऱ्यास देणें हेंच मुख्य दान असें लोक समजतात. पण खालीं लिहिलेल्या सर्व गोष्टी दानांत येतात:—

क्षुधितासीं अन्न द्यावें जल तृषितालाहि अभय भीताला ॥
बुडत्यासि हात द्यावा घाबरल्या धीर ताल गीताला ॥

भुकेनें व्याकुळ झालेल्या प्राण्याला अन्न द्यावें, तृषिताला पाणी, एखाद्या अपरिहार्य संकटामुळें ज्याला भीति उत्पन्न झाली असेल त्यास अभय द्यावें, कोणी बुडत असल्यास त्यास हात देऊन वर काढावा,

घाबरला असेल त्याला धीर द्यावा, व गाणारा चुकूं लागल्यास ताला मध्यें त्यास सांवरून घ्यावा. हे सर्व प्रकार वास्तविक दानाचे होत. आतां सर्वांमध्यें अन्न पाणी हें प्राण्याच्या जीवनास मुख्य असल्यामुळें त्याच्याच दानाचा प्रघात फार आहे, यामुळें तेच पदार्थ कायते दान करण्यास योग्य होत असें लोक मानतात. वास्तविक पाहिलें असतां अन्नवस्त्र आणि मधुर भाषण याच कायत्या जगांतील अमोल्य वस्तु होत. एका कवीनें या त्रयाला रत्नाची उपमा दिली आहे:—

पृथिव्यां त्रीणि रत्नानि जलमन्नं सुभाषितं ॥
मूर्खैः पाषाणखंडेषु रत्नसंज्ञा ऽपभिधीयते ॥

पृथ्वी मध्यें जल, अन्न आणि सुभाषित हीं तिनच कायतीं रत्नें होत. मूर्ख लोक पाषाणाच्या तुकड्यांना ह्मणजे हिरे, पाच, इत्यादिकांना रत्नें ह्मणतात हा भ्रम आहे. वास्तविक पाहिलें असतां हिरे, पाच, इत्यादिकांचे ठायीं जो रत्नपणा अधिष्ठित दिसतो तो ईश्वरकृत नसून मनुष्यकृत होय ह्मणजे मनुष्यांनीं त्यांस कित्येक गुणांवरून रत्नें मानलीं आहेत. आतां लोक त्यांना जो श्रेष्ठपणा देतात तो केवळ त्यांचे सौंदार्या वरून व बहुमोलपणा वरून देतात. ह्मणजे ते पदार्थ दिसण्यांत सुंदर असून त्यांस किंमत फार पडते हेंच त्याना रत्नें मानण्याचें कारण होय. पण या गुणांवरून त्यांस रत्नें ह्मणणें गौण आहे, कांच, स्फटिक, इत्यादिक दिसण्यांत सुंदर व तेजदार दिसतात पण त्यांना कोणी रत्नें ह्मणत नाहीं, तसेंच प्रस्तुतच्या नोटी या हजारों रुपये किंमतीच्या असून यांचे योगानें पाहिजेत तेवढे हिरे, पाच, व मोतीं खरेदी करितां येतील ह्मणून त्या कागदांचे तुकड्यांस कोणी रत्नें ह्मणतात काय? कोणी हि ह्मणत नाहीं. याचें कारण इतकेंच कीं, ज्या गुण समुदायांचे योगानें पदार्थांचे अंगीं रत्नपणा येतो अशी मनुष्याची समजूत आहे त्या गुणा पैकीं एखादा गुण त्या पदार्थाचे अंगीं कमी असला ह्मणजे तो रत्न पदवीस पावत नाहीं. या संबंधें विशेष विचार करावयाचा ह्मणजे एक

स्वतंत्र लेखच होईल व हल्लींच्या विवेचनांत तसें केल्यास विषयांतर होईल जाणून प्रस्तुत विषयाकडे वळूं.

अन्न, उदक, आणि व्यवहारिक द्रव्य हेच पदार्थ दानांत मोडत अस ण्याचें कारण, ते मनुष्याच्या उपजीविकेला मुख्य व साधनीभूत आहेत. दाना पासून प्राण्याला अनेक तऱ्हेची मदत होते या मुळें प्रत्येक मनुष्यानें दान करणें अवश्य आहे. संपत्तीचें सार्थक दान होय असा विद्वज्जनांचा सिद्धांत आहे. संपत्ती ही क्षणिक आणि नाशिवंत अस- ल्यामुळें तिच्या पासून मनुष्यानें ऐहिक भोग आणि दान या दोन गोष्टीच संपादन करून तिचा सद्व्यय करावा. या व्यतिरिक्त तिचा संचय करूं लागल्यास तिचा अंगभूत गुण जो नाश तो परिणामी अनु भवास येईलच. एका कवीनें ह्मटलें आहे:—

"दानं भोगो नाशः तिस्रो गतयो भवंति वित्तस्य"
"यो न ददाति न भुंक्ते तस्य त्रतीया गति भवति"

दान, भोग, आणि नाश, असे संपत्तीचे तीन उपयोग होत. पण जो आपले संपत्तीचा स्वतः उपभोग घेत नाहीं, व दानादिकाहि करीत नाहीं, त्याची संपत्ती लयास जाते, नाशिवंत वस्तूचा नाश होणार हा सिद्धांत तर आहेच. भोग्य वस्तू व भोक्ता हीं दोन्हींहि नाशिवंतच आहेत. पण भोग्यवस्तूचा भोक्त्यानें उपभोग घेऊन तिचा नाश व्हावा असा ईश्वरी संकेत दिसतो. ऐश्वर्य प्राप्त झालें असतांहि कार्प ण्यानें राहणारे मनुष्याला एका कवीनें मधुमक्षिकेची उपमा दिली आहे:—

"दातव्यं भोक्तव्यं सति विभवे संचयो न कर्तव्यः"
"पश्येह मधुकरीणां संचितमर्थं हरंत्यन्ये"

ऐश्वर्य प्राप्त झालें असतांहि जो ऐहिक भोग भोगून दानादिक करीत नाहीं, त्याची स्थिती मधुमक्षिकेसारखी होते, मधुमक्षिका आरण्यामध्यें

हिंडून अनेक पुष्पांतील थेंब थेंब मध गोळा करून पोळ्यामध्यें तिचा संचय करिते. पण त्या मधापैकीं स्वत: एक बिंदुही खात नाहीं व दुसरा कोणी त्या पोळ्याजवळ गेला तर त्यास दंश करिते. पण शेवटीं अशा संचित मधाचा परिणाम काय होतो हें लोकांचे अनुभवास आहे. पोळें मधानें भरून तयार झालें ह्मणजे लोक त्या माशाना हांकून देऊन त्या पोळयांतील मध काढून घेतात. व माशा तडफडून आणि हात चोळून मरून जातात. त्याचप्रमाणें वित्ताचा संचय करून ठेवणारे कृपणांची दशा होते. लक्षावधी रुपये जवळ असतांहि आजन्मांत ज्यांनीं अन्नवस्त्राचा उपभोग न घेतां रूक्ष अन्न व लज्जानिवारणार्थ जाडेंभरडें मलिन वस्त्र यांजवर निर्वाह केला, परोपकार आणि भूतदया यांप्रीत्यर्थ ज्यांनीं आपले संपत्तीपैकीं फुटकी कवडी देखील खर्च केली नाहीं, लोकोपयोगी कामांकडे आपल्या पैशाचा विनियोग न करण्याची ज्यांनीं शपतच घेतली, व लग्नाचे बायकोस किंवा पोटचे मुलास अथवा आईबापासहि ज्याणें आपले पैशाचा उपभोग घेऊं दिला नाहीं, अशा धनरक्षक कृपणाचे संपत्तीची कशी नासधूळ उडून जाते याचीं उदाहरणें जगांत अनेक आहेत. एकाद्या मनुष्यानें पैसा पैसा जोडून द्रव्याचा संचय करून ठेवावा आणि त्याचे मुलानें त्या कृपण मनुष्याचे देखतच दुर्व्यसनांत त्या पैशाची वाताहत करावी, अशीं उदाहरणें आपले पहाण्यांत येतात. असो, मिळून तात्पर्य काय कीं, संपत्तीचा उपभोग घेऊन दानादिकांत तिचा व्यय करावा. एका कवीनें संपत्तीचे चार दायाद ठरविले आहेत:—

"चत्वारो धनदायादा धर्माग्नि नृपतस्कराः"

"तेषां ज्येष्ठावमानेन त्रयः कुप्यंति बांधवाः"

धर्म, अग्नि, राजा, आणि चोर, हे संपत्तीचे चार दायाद होत. यांत ज्येष्ठ जो धर्म त्याचा अपमान केला, ह्मणजे धर्म केला नाहीं तर बाकीचे तीन असामींस राग येऊन ते त्याची लगेच वांटणी करून टाकतात. सारांश, दान करणें हें सर्व देशांत व सर्व कालीं मुख्य पुण्यकर्म गणलें

असल्यामुळें त्याविषयीं विचार करण्याचें कारण काय? अशी जी आह्मी विषयारंभी एक शंका घेतली त्यास प्रस्तुत विवेचनावरून पुष्टीकरण येतें असें कदाचित् वाचकांस वाटेल. कारण दान करणें हें पुण्यकर्म आहे तर मनुष्यानें बिनदिकत तें करावें हा श्रेष्ठ मार्ग होय असें सकृद्दर्शनीं आपल्यास वाटतें खरें, पण त्या दानाविषयीं जर सारासार विचार केला नाहीं तर तें दान पुण्यफलापासून दानकर्त्यास पराङ्मुख तर करतेंच, पण प्रसंगविशेषीं दानकर्ता उलट पापांत पडण्याचा संभव असतो. दानाविषयीं पात्रापात्र विचार अवश्य आहे. या दानाविषयीं एका कवीनें असें ह्मटलें आहे कीं, दान करणें तें जर कुपात्रीं झालें तर पातकास नाशास कारण होतें:—

पुण्य करितां होय पाप ॥ दूध पाजोनी पोशिला साप ॥
करोनी आघोराचा जप ॥ दुःख विकत घेतलें ॥

क्षुधिताला अन्न देणें हें दान खरें, पण तें दान करतांना क्षुधिताची योग्यता, क्षुधेचें कारण आणि क्षुधिताची क्षुधा शांत झाल्या पासून होणारा बरा वाईट परिणाम या विषयीं विचार केला पाहिजे. वास्तविक पाहिलें असतां प्राणिमात्र तेवढे क्षुधार्त होत. राजा पासून तों रंका पर्यन्त सर्व मनुष्यें आणि कीड मुंगी पासून तों गज सिंहा पर्यन्त प्राणिमात्र यांस क्षुधेची पीडा आहेच. सज्जन असो किंवा दुर्जन असो, तसेंच पुण्यवान असो किंवा पापी असो, श्रीमंत असो किंवा दरिद्री असो, साधु असो किंवा दुष्ट असो, धार्मिक असो किंवा पाखंडी असो, वेदांति असो किंवा संसारी असो, बाल असो किंवा वृद्ध असो, पुरुष असो अथवा स्त्री असो, हिंसा कर्म प्रवर्तक असो किंवा हिंसा निषेधक असो, आणि मूर्ख असो अथवा पंडित असो प्राणिमात्रास क्षुधेची पीडा आहेच, तेव्हां सर्वच अन्नदानास योग्य आहेत असें “क्षुधितासीं अन्न द्यावें” या न्यायानें ह्मणणें भाग पडतें. पण विचार करून दान

करणें असेल तर ही मंडळी अन्न दानास पात्र नाहीं. सर्पाचीं पोरें दूध पाजून मोठीं केलीं व गांवांत सोडून दिलीं तर परिणाम काय होईल? वाघाचीं पिलें पोसून मोठीं झालीं म्हणजे सोडून द्यावीं, परिणाम काय होईल? चोर, जुगारी, दुर्जन, यांस फुकाचें खावयाला मिळालें म्हणजे ते त्या अन्नदानाचा काय बरें परिणाम करतील? अशा मंडळीला अन्नदान करणें म्हणजे चांगल्या सुपीक जमीनीमध्यें कडू कारंड्याची लागवड करून त्यास पाणी शिंपण्यासारखें आहे. यांवरून या अन्न दानाविषयीं किती बरें विचार करावयास पाहिजे. बाल, रोगी, पंगू निराश्रित, विद्यार्थी, सर्वसंग परित्याग केलेले वेदांती, ब्रह्मचारी, परोपकारी, आणि विद्वान हेच खरोखर अन्नदानास मुख्य धरले आहेत, पण ते ब्राह्मण किंवा धर्मगुरु वडिलोपार्जित सनदेचे उपयोगी नाहींत, तर चालू सालच्या पहिल्या व दुसऱ्या अंकांत सांगितल्या प्रकारचे ब्राह्मण पाहिजेत. व तसेच धर्मगुरु तरी बंडखोर उपयोगाचे नाहींत. तर ते सरळ मनाचे, द्वेष रहित, सत्यासत्य जाणणारे, पापभीरु, दयाशील, आणि आस्तिक पाहिजेत. धर्मा करितां लढाया, रक्तपात, इत्यादिकास उत्तेजन देऊन गुरुदक्षिणेवर केवळ ऐषआराम भोगणारे धर्मगुरु नसावे. या दानाचें ढोंग धर्मसंबंधानें फार असतें. धर्मकार्यांत जें दान करावयाचें तें बहुधा त्या त्या धर्मांतील धर्म गुरूस द्यावयाचें असतें. हें धार्मिक दानाचं ढोंग सर्वांत आहे. हिंदू असो, मुसलमान असो, यहुदी असो. अथवा ख्रिस्ती आसो, ज्यांच्या मध्यें धर्माचें म्हणून वेड आहे, ज्यांना संपत्तीचा अभिमान असून त्याचे वृध्यर्थ जे उपदेशानें व तरवारीनें नेहमी यत्न करितात, व जे आमचा धर्म आणि आमचीं मतें खरीं म्हणून मोठ्या आग्रहानें तंटचास येतात, अशा सर्व धर्म मतामध्यें दानाविषयीं विचार केलेला आहेच.पण अशा प्रकारच्या मताचे स्थापने करितां किंवा त्यामतवाल्याचे उपजीविकेकरितां जें दान द्यावयाचें तें दान तरी कामानिक होय. या दानानें लोभ, द्वेष, दुराग्रह, आणि ऐक्यभंग याची मात्र वृद्धी

होते. ह्मणून अशा प्रकारचीं दानें अपात्रीं होत. आतां कित्येकांचें असें ह्मणणें असतें कीं, ज्यास दान करावयाचें त्याचे योग्यतेकडे पाहावयाचें आपणास कारण नाहीं. आपण जो धर्म करणार त्याचें फल आपणास मिळेल. साखरेच्या गोणी वाहून नेण्यास सुंदर घोडा असो, बैल असो, किंवा गर्दभ असो, आपणास वाहनाकडे पाहण्याचें कारण नाहीं. आपली साखर नेमल्या ठिकाणीं जाऊन पोंचली ह्मणजे झालें, वाहनादिकांपासून साखरेंत स्थित्यंतर होत नाहीं. आतां हें ह्मणणें भोळे भाविकांना प्रथम जरी खरें वाटतें तथापि वरील उदाहरण विचार दृष्टीच्या दानाला मुळींच लागू पडत नाहीं, दान हें उपजीविकेचें व संरक्षणाचें मुख्य साधन होय. त्यापासून व्यक्तीवर बरा वाईट परिणाम घडणारा असतो. दुष्टास व हिंस्र पशूस अन्नदान केल्यानें काय परिणाम होईल.

सारांश जें अन्नदान करावयाचें त्या अन्नदानाविषयीं दानाधिकारी अशा योग्यतेचा असला पाहिजे कीं, त्याला अन्नदान केलें असतां त्यापासून जगाचें कांहीं तरी कल्याण होऊन लोकांवर त्याचे हातून उपकृती होईल. निदान त्याजपासून कोणतीहि अपकृति होण्याचा तरी संभव नसावा. या अन्नदानाप्रीत्यर्थ पूर्वापार अन्नछत्रें घालण्याचा सांप्रदाय आपल्या देशांत फार आहे. अशा अन्नछत्राचे आसपास जे क्षुधित ब्राह्मण असतील त्यांस या छत्रांत अन्न मिळतें. अन्नछत्रें ब्राह्मण लोकां करितां असतात. तसेच जे साधु व प्रवासी लोक यात्रा मिषानें देशाटण करितात त्यांच्या करितां सदावर्तें ठेवण्याचा सांप्रदाय हि आपले देशांत फार आहे. संपतीमान लोक व राजेरजवाडे हे हीं अन्नछत्रें आणि सदावर्तें घालतात, व त्या योगानें आपणास फार पुण्य लागेल असी त्यांची समजूत असते. आतां ही समजूत एका अर्थीं खरी आहे, ह्मणजे वरील कृत्यें हीं पुण्यकर्मांत गणलीं गेल्यामुळें व त्यामध्यें भूतदयेचा आणि परोपकाराचा हेतु असल्यामुळें त्यापासून पुण्य लागेल हें उघड आहे,

पण पुण्य लागण्या जोगी त्या कृत्यांची योजना पाहिजे. नाहीं पेक्षां " पुण्य करितां होय पाप " असा त्याचा परिणाम होतो. प्रस्तुतचीं अन्न छत्रें व सदावर्तें हीं अशाच तऱ्हेचीं आहेत ह्मटलें तरी चालेल. ह्मणजे त्या पासून देशांत आळसाची वृद्धी होत आहे. वरील छत्रें व सदावर्तें हीं आळशी, दुराचारी, अज्ञानी व उनाड लोकांना आश्रयस्थानें झालीं आहेत, ह्मणजे अशा लोकांचाच भरणा त्याठिकाणीं बहुधा असतो. तेव्हां तात्पर्य काय कीं, या अन्न दाना विषयीं पात्रापात्र विचार न केल्यामुळें वर सांगितल्या प्रमाणें त्याचा परिणाम होतो.

संकट प्रसंगीं प्राणिमात्रास मदत करणें हेंच खरोखर दान होय ह्मणून आह्मी वर ह्मटलें, त्या दानांत अन्नदान प्राधान्य होय. या अन्न दाना विषयीं वर सांगितलेंच आहे. जो भीति पावला असेल त्याला अभय द्यावें ह्मणून वर सांगितलें. पण हें अभय देण्याचे कामीं, ही सारासार विचार करावयास पाहिजे. पात्रापात्र विचार केल्यावांचून एखाद्या भीताला अभय दिलें तर त्या अभय वचनाचे योगानें अभय देणारा व ज्याला अभय द्यावें तो असे दोघेहि संकटांत पडतील. असें समजा कीं, एक चोर चोरी करून आला. पुढें तपासा अंतीं त्या चोरावर चोरी केल्याची शाबिदी होऊन आपणास आतां राजदंड होईल अशा भीतीनें तो अगदीं गांगरून गेला. आतां अशा चोरास अभय देऊन पाठीशीं घालावा काय? आमच्या मतें अशा चोराचा बचाव करण्यास अंतःकरणापासून उद्युक्त होणारा सज्जन फारच दुर्मीळ होय. आतां हें मात्र खरें कीं, त्या चोराचे आप्त संबंधी असतील, त्या चोरास शिक्षा झाल्या पासून इहलोकीं ज्यांस दुःख होण्याजोगें असेल व ज्याचें त्या चोरास शिक्षा झाल्यानें अनहित होण्यासारखें असेल अशी मंडळी त्या चोराचा बचाव करण्या करितां उद्युक्त होईल. पण ते ही खटपट त्या चोरा करितां करितात असें लौकीक रीतीनें जरी दिसतें तथापि सुक्ष्मविचार केला असतां ते ती खटपट आपले करितांच

करितात. या योगानें त्यांची ती मदत अपात्रीं होते हें तर खरेंच, आणि खेरीज ती मदत जरी सत्पात्रीं असली, ह्मणजे त्या चोरानें चोरी न केल्यामुळें त्यास ते मदत करीत असले तरी देखील ती मदत दानांत मोडणार नाहीं. कारण, त्यांची ती मदत आपापले हिता करितां असते. निरपेक्ष बुद्धीनें जी मदत करावयाची तेंच खरोखर दान होय आणि तें दान सत्पात्रीं झालें तर त्याचें सार्थक होतें.

गतवर्षी फडक्यानें दरोड्यांची धामधूम उडवली होती हें महशूर आहे. सरकारनें त्याच्या बंदोबस्ता करितां अधिकारी व लष्करी लोक पाठवून त्यास पकडण्याची सुरवात केली. आतां ते वेळची फडक्याची संकटावस्था, आणि अडचण मनांत आणली ह्मणजे "अभय भीताला" या शिष्टवचना प्रमाणें त्यास मदत करणें रास्त दिसतें. पण त्याणें लोकांना दिलेला त्रास, त्याची लुटालुट करण्याची इच्छा, मारझोड करून लोकांचे वित्त हरण करण्याची धामधूम, आणि त्याचा राजद्रोहीपणा या सर्व गोष्टी मनांत आणल्या ह्मणजे त्यास संकटांतून सोडवणें रास्त किंवा त्यास जास्त संकटांत पाडणें हें रास्त याचा निर्णय करणें फारसें कठीण नाहीं. आतां ज्यांणीं त्यास मदत केली त्यांचें तें दान अपात्रीं झाल्यामुळें त्यांसही फडक्या बरोबर कारागृह वास करावा लागला हें सर्वांस ठाऊक आहेच. तेव्हां कुपात्रीं दान केल्याचा परिणाम असा होतो. सत्पात्रीं केलेले दानाची वृद्धी होऊन त्या पासून लोकांचे परंपरेनें हित होतें.

प्रकृत विवेचनावरून वाचकांचे हें हि लक्षांत आलें असेल कीं, दान करणें ही गोष्ट दान कर्त्याचे खुषीची असून तो दयेचा प्रकार आहे. लोकांनीं आपल्यास दान केलेंच पाहिजे असा वास्तविक कोणाचा हक्क नाहीं. या दाना विषयीं हि कित्येक धूर्त व मतलबी लोकांनीं अनेक ग्रंथ रचून त्यास मर्यादा केली आहे. अशा ग्रंथांतून दाना विषयीं पात्रापात्र विचार केला आहे हें खरें, तरी त्यांत दानाधिकारी मंडळी वतनदार

ठरवून टाकली आहे. या लिहिण्याचा ओंक ब्राह्मणास अनुलक्षून असावा असें सहज कोणाच्याहि लक्षांत येईल या करितां दानाधिकारी मंडळी विषयीं चार शब्द लिहिणें रास्त दिसतें. आतां ब्राह्मण लोकांनीं आपणाकडे दानाधिकार घेतला आहे ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं, व यामुळें अलीकडील काळांत ब्राह्मण लोकांवर वाक्शस्त्राचा पाहिजे तसा प्रहारहि होत आहे. या दानाधिकारी मंडळींत साधारणतः भिक्षुक मंडळी ज्यांना 'भटें' हें उपहासास्पद विशेषण अलीकडे देण्यांत येतें ते मोडतात आणि त्यांजवर तीक्ष्ण वाक्शस्त्राचा प्रहार करण्याचें कारण काय तर तें आमच्या बापदादांच्या श्राद्धपक्षादि क्रिया व अनेक तऱ्हेचे उपवास आणि व्रतें करवून ते आमच्या परमार्थिक सुखाचे हामीदार होतात. या हमी बद्दल त्यांस येथें कांहीं तरी दक्षणा पटवावी लागते. ह्मणजे त्यांस येथें दिलें तें दान कर्त्यास स्वर्गावर मिळेल असा भरवसा असतो. आतां ब्राह्मणलोकां बद्दल कनिष्ट जाती कदाचित् पात्रापात्र विचार वगैरे करून "लहान तोंडीं मोठा घास" या न्यायानें ब्राह्मणांचा अपमान करतील आणि त्या निवडानिवडींत अमुक ब्राह्मण श्रेष्ट ह्मणून दानास योग्य व अमुक दुर्व्यसनीं ह्मणून दानास अयोग्य समजून "न कर्त्याचा वार शनवार" या ह्मणी प्रमाणें सत्कर्माचरण न करण्यास कांहीं तरी कारण काढील ह्मणून ब्राह्मणांनीं त्याची आगाऊच तयारी करून ग्रंथातरीं वचनें दाखल केलीं आहेत. ब्राह्मणांनीं आपणाकडे कसें श्रेष्ठत्व घेतलें आहे पहाः—

"देवाधीनं जगत् सर्वं मंत्राधीनंच दैवतं"
"ते मंत्रा ब्राह्मणाधीना ब्राह्मणो मम दैवतं"

सर्व जग हें देवाचे स्वाधीन आहे, आणि तो देव मंत्राधीन आहे, पण मंत्र हे ब्राह्मणांचे स्वाधीन असल्यामुळें ब्राह्मण हे माझें दैवत असी इश्वरोक्ति आहे. या वचना वरून देवापेक्षांहि ब्राह्मण श्रेष्ट ठरतात. पण याजवरहि कोणी कांहीं शंका घेईल, ह्मणजे ज्या ब्राह्मणाचें

स्वाधीन मंत्र आहेत त्या ब्राह्मणास ह्मणजे विद्वानास आह्मी श्रेष्ठ मानूं असें कदाचित् कोणी ह्मणेल, किंवा शूद्रादिकांनीं मंत्राध्ययन केलें तर तें ब्राह्मणाचा श्रेष्ठपणा आपणाकडेहि ओढून घेण्यास कसर करणार नाहींत हें जाणून आणखीहि ब्राह्मणाचे श्रेष्ठपणा बद्दल एक वज्रलेप वचन दाखल केलें आहे:—

"दुःशीलोऽपि द्विजः पूज्यो नच शूद्रो जितेंद्रियः"

"दुःशीलापि दुहेद्गावो न खरीं शीलवर्तिनीं"

ब्राह्मण जरी सुशील नसला तथापि तो पूज्य होय. पण शुद्र मोठा जितेंद्रिय असला तथापि त्यास पूज्यत्व नाहीं. खोडचाळ आणि लाथाळ गाय असली तरी ती दूध देण्यास योग्य असते, पण गरीब गाढवीचा दोहना विषयीं कांहीं उपयोग नाहीं. लग्न कार्यं आणि श्राद्धादिक व यज्ञयागादिक नित्य आणि नैमित्तीक कर्मे यांचे ठिकाणीं दान संबंधानें ब्राह्मणांचे हक्क आहेत. तसेंच यात्रादिकांचे ठायीं व तीर्थविधिचे प्रसंगींहि दान विषयीं कित्येक हक्कदार प्रसिद्ध आहेत. पंढरपूरचे बडवे व प्रयागचे गयावळ हे दानाचे हक्कदार होत. आतां हे हक्क उपास्थित होण्याचीं कारणें, व ते आजपर्यंत अबाधित चालत आले याचा विचार करूं लागलें असतां या कामीं ब्राह्मणादिकांचा आपमतलबीपणा सकृद्दर्शनी जरी दिसतो तथापि ब्राह्मणांचा तो मतलब समजण्याम आतांचे लोकच अक्कलवान झाले आणि पूर्वींचे ज्ञानी व पराक्रमी राजे लोकांस वगैरे समजत नवतें असा अर्थ नाहीं. तर ते वेळचे लोकस्थितीचे मानानें असे दानाचे हक्क उत्पन्न होणे व ते लोकांनीं कबूल करणें रास्त होतें. तथापि त्या संबंधाचा कोणावर जुलुम होता असा अर्थ नाहीं. तीर्थादिकांचे ठिकाणचे गयावळ वगैरे हेहि जरी हक्कदार आहेत तथापि त्यांचा जुलूम आहे असें नाहीं. आतां त्यांचे तोंडून "तेरे पितर सरग भयो" असें आपण ह्मणून घेतलेंच पाहिजे असा ज्या अर्थी आपला आग्रह असतो, त्या अर्थीं ते मागतील ती दक्षणा त्यांस देणेंहि रास्त आहे.

आतां वर जो दानांचा प्रकार सांगितला तो वास्तविक दानांत मोडत नाहीं. ह्मणजे हा प्रकार ब्राह्मणादिकांचे जुलमाचा असला किंवा लोकांचे खुषीचा असला तथापि तो सकाम असल्यामुळें मोब दल्यांत किंवा व्यापारांत मोडला जातो. दान कर्त्यानें जें कांहीं द्यावयाचें त्याप्रीत्यर्थ आपणास कांहीं मोबदला मिळण्याची अशा ठेऊं नये. निष्काम बुद्धीनें केलेलें दानच खरोखर परमार्थ कल्याणास उपयोगी पडेल. "मम कायिक वाचिक मानसिक सांसर्गिक सकल दोष परिहारार्थं × × दानं करिष्ये" असा संकल्प करून जें दान करावयाचें त्यांत दानाचें पुण्य दान कर्त्यास काय ह्मणून लागावें? कारण, कोणा मनुष्यावर दया करावी किंवा परोपकार बुद्धीनें दुसऱ्याचे उपयोगी पडावें ह्मणून प्रस्तुत दानकर्ता जर दान करीत नाहीं तर त्या पासून त्यास पुण्य लागणार नाहींच. कदाचित् त्याणें केलेले दानानें शास्त्र संमतीनें त्याचे पापाचें क्षालन होईल. पण अशा दानांत पुण्याचा किंवा भूतदयेचा अंश मुळींच असणार नाहीं. निष्काम बुद्धीनें दान करणारा दाता दुर्मीळ होय. लौकिक संपादन आणि परार्थ कल्याण हे दानाचे दोन मुख्य हेतु होत. दान करणें तें पाप क्षालनार्थ करायाचें नसल्यास "अस्माकं सकल कुटुंबीनां क्षेमशांत्यर्थं, यद्वा श्रुतिस्मृतिपुराणोक्तफल प्राप्त्यर्थं" अशा तऱ्हेचा संकल्प असतो, मिळून जें दान करावयाचें तें संकल्प केल्याशिवाय होत नाहीं. आशां प्रकारच्या व्रतादिकांचे ठायीं ब्राह्मणादिकास जें द्रव्य वगैरे द्यावयाचें किंवा त्या कर्माचे सांगते करितां जें ब्राह्मण भोजन वगैरे घालावयाचें त्यांत ब्राह्मणावर उपकार किंवा दया मुळींच होत नाहीं. कारण दान कर्ता तें दान ब्राह्मणा करितां करीत नसून आपल्या अभीष्ट सिध्यर्थ त्याचा खटाटोप असतो.

आतां दुसरें लौकीकदान, ज्या दानापासून दानकर्त्यास आपला लौकीक वाढावा, भिक्षुक व आश्रित लोकांपासून आपले गुणानुवाद वर्णिले जावे,

व दाता आणि उदार या विशेषणानें आपण संपन्न व्हावें असें वाटतें व त्याच्या सिद्धी करितां ह्मणून तो जें दान करितो त्यास लौकीक दान असें ह्मणावें. आतां येथें जे भिक्षुक सांगितले ते वेदाची संहिता घोंकून श्राद्ध पक्ष झोडणारे किंवा यज्ञयागादि वैदीक कर्मे करणारे व चालवणारे ब्राह्मण असें मात्र समजूं नये. तर संपत्तीमान लोकांचें स्तौय किंवा मनरंजन करून त्यांज पासून पैसा काढणारे जेवढे लोक तेवढे सगळे लौकिक दानाधिकारी भिक्षुक होत. रंका पासून तों राजा पर्यंत प्रत्येक मनुष्य कांहींना कांहीं तरी दान करतो. दान करणें व दान घेणें या दोन ही क्रिया मनुष्य करितो. कामनिक दान करावयाचें असतां ज्या मनुष्यास दान करावयाचें त्याजवर त्या दाना पासून मुळींच उपकार होत नाहीं. कारण, दान घेणारा पुरुष दान कर्त्यास अभीष्ट फलाची प्राप्ती करून देणारा दलाल होय. तेव्हां त्याच्या प्रीत्यर्थ त्यास जें द्रव्यादिक द्यावयाचें तें दानांत गणलें जाईल काय? असो, मिळून दानाचे हे असे दोन प्रकार आहेत. आतां या पैकीं, परार्थ कल्याणा प्रीत्यर्थ जें दान करावयाचें तें बहुधा वैदिककर्मांगभूत असतें. आणि तें दान घेणारे मुख्यत्वें करून वैदीक लोक होत. आतां लौकीक दानाचे अधिकारी मात्र जगांत फार आहेत. त्यांत दोन पक्ष आहेत. एका पक्षांतील मंडळी गरीब स्थितींतील असते व दुसऱ्यांत राजेरजवाडे व सरदार लोक मोडले जातात. या पैकीं पहिल्या पक्षास जें दान करावयाचें त्यांत दाता व याचक यांचे खुषीचा प्रकार असून दुसऱ्या पक्षीं सत्तेचा प्रकार दृष्टीस पडतो. पहिल्या पक्षांत हरिदास, पुराणीक, शास्त्री, नैय्यायीक ज्योतिषी, कवी, नाटकवाले, तमासगीर, भाट वगैरे मंडळी मोडते. आणि दुसऱ्या वर्गांत जांवई, योद्धे व सरदार मंडळी मोडली जाते. या वर्गांतील मंडळीस जें दान करावयाचें तें आपला दुर्लौकीक न व्हावा व आपणास अडचण न पडावी ह्मणून करावें लागतें. तहनामे वगैरे प्रकार या पैकींच होत या संबंधें थोरले बाजीराव साहेब पेशवे यांची एक

आख्यायिका या ठिकाणीं देणें योग्य वाटतें.—

शिवाजी राजानें मोठ्या पराक्रमानें आणि शहाणपणानें संपादन केलेल्या राज्याचें पुनरुज्जीवन करून पेशवाईचा अंमल ऐन भरभराटीस व तेजीस आणणारा पुरुष बाजीराव बल्लाळ हा होय. या पुरुषानें हिंदुस्थानांत मराठी राज्याची सार्वभौमसत्ता गाजविली. कालानुकूलते मुळें या विक्रमशाली व विजयी पुरुषापुढें कोणीहि शत्रु युद्ध करण्यास तगत नसे. जिकडे या पेशव्याचा हात पडावा तिकडे फत्तेच व्हावी असा कांहीं याचे नशिबाचा सतारा होता. याला पेशवाईचा डामडौल मुळींच नवता याला लढाईची फार हौस असे. तो साधारण शिले-दारा प्रमाणें तोबरा, मेखा, पायबंद वगैरे घोड्याचे पिच्छाडीस बांधून व हातांत भाला घेऊन लढाईंत जात असे. संपत्ती मिळवणारा पुरुष व वडिलार्जित संपत्तिमान यांजमध्यें किती अंतर असतें हें पहिले व पुढचे या दोन बाजीरावांचे इतिहासावरून चांगलें समजतें. बाजीरावाच्या शौर्याची आणि पराक्रमाची किर्ती ऐकून त्याची मूर्ती एक वेळ पहावी असें दिल्लीच्या बादषाहास वाटलें. पण बदषाहा व बाजी-राव हे उभयतां हाडवैरी पडले तेव्हां त्यांची भेट होणें दुर्लभ. याकरित बादषाहानें आपले चितान्यास असें सांगितलें कीं, पेशव्यांचे लष्करांत जाऊन बाजीरावाची तसवीर काढून आणावी. बादषहाची आज्ञा झाल्यावरून चितारी बाजीरावाचे लष्करांत आला व पहातो तों हा विक्रमशाली पेशवा घोड्यावर बसला आहे, घोड्याची अनी मानेवर टाकली आहे, एक पाय घोड्यावर आडवा टाकलेला आहे, खांद्यावर भाला आहे, व घोडा चालत असतां शेतांतील कणसें तोडून तीं हातानें चोळून दाणें तोंडांत टाकीत आहे. चितान्यानें तशास्थितींत बाजीरावाची तसबीर काढून घेतली व ती नेऊन बादशहास दाखविली. ती तसबीर पाहून बादषहाचे आंगावर शहारे उठले व तो ह्मणाला "एतो सैतान है" असो, लढाईचे संबंधानें त्याची अशी कडी तयारी असे.

एकदा बाजीराव साहेब यांची स्वारी माळवा प्रांत काबीज करण्या करितां निघाली असतां तो प्रदेश घेत स्वारी उज्जनीस गेली. ते वेळीं

उज्जन जयपूरवाले सवाई जयसिंग यांचे ताबेंत होती. जयसिंग राजा हा विद्वान, पराक्रमी व धार्मिक होता, याणें अश्वमेध यज्ञ करून अनेक ब्राह्मणभोजनें घातलीं होतीं. बाजीराव उज्जनविर स्वारी करण्या करितां आले हें जाणून जयसिंगानेंहि फौजेची तयारी केली व उभयतां मध्यें लढाईची सुरवात झाली. दोघेही पराक्रमी आणि शूर असून फौजेची तयारीहि उभय पक्षांकडे सारखी होती यामुळें कोणीहि जेरीस येईना. बाजीरावास वाटलें कीं, जयसिंगाचा मोड होणें कठीण आहे, व जयसिंगासहि वाटलें कीं, बाजीराव आपल्यास कांहीं केल्यानें आटपत नाहीं. हें पाहून जयसिंग राजानें तह करण्याचा निश्चय ठरवून पेशव्यांकडे आपला वकील पाठविला. वकीलाचे मार्फत जयसिंग राजानें बाजीराव पेशव्यांस असें सांगून पाठविलें कीं, "तुह्मास उज्जन पाहिजे असल्यास ती अशा लढाईनें मिळण्याची आशा ठेऊं नका. पण तुह्मी जर ती दान घेत असाल तर मात्र तुह्मास देतों" श्रीमंतांनीं प्रसंगास अनुसरून वागलें पाहिजें असा विचार करून विजयशिंग राजास सांगून पाठविलें कीं, आह्मी ब्राह्मण आहों, त्या अर्थीं आह्मास दान घेण्यास प्रत्यवाय नाहीं. तुह्मी उज्जन दान देत असल्यास आह्मी ती घेण्यास कबूल आहों. नंतर बाजीरावसाहेब यांणीं उज्जन दान घेतली व परस्परांची सल्ला झाली. आतां हें दान कोणत्या प्रकारचें असावें हें वाचकांचे लक्षांत येईलच. यांत दान घेण्याचा हक्क संबंध किंवा कांहीं विशेष प्रसंग नसून वरील दान हें केवळ, सत्तेच्या जोराचें होय. दूध सांडलें ह्मणजे कृष्णार्पण ह्मणण्यासारखा वरील दानाचा प्रकार झाला उज्जन आपले हातांतून जाणार असें जेव्हां जयसिंगास वाटलें तेव्हां त्याणें वाहते पाण्यांत हात धुऊन घेतला. तेव्हां हें दान नाहीं सकाम आणि नाहीं निष्काम. तथापि हें दान मात्र खरें, ह्मणजे दान शब्दाचा अर्थ देणें असल्यामुळें जें दिलें तें दान, या न्यायानें वरील प्रसंग दान शब्दाचे अर्थ संगतीस जुळेल, व तो लौकिक दानांतहि मोडेल, पण यांत दयेचा अंश नाहीं हें उघड आहे.

प्रस्तुत विवेचना वरून दान करण्याचे दाना विषयीं हेतु, दानाची अवश्यकता व योग्यता, दाना विषयींचे अधिकारी आणि दान करण्याचे संबंधानें पात्रा पात्र विचार या विषयीं वाचकांस बरीच माहिती होईल असें वाटतें. कुपात्रीं दान करणें हें किती भयावह आहे व सत्पात्रीं दान करणें किती सुखावह व कल्याण दायक आहे, हेंहि प्रस्तुत हकीकती वरून लक्षांत येईलच. सकाम साधनें व तन्निमित्त कामनिक दानें हीं लौकिकादिकाचीं साधनें होत. निष्काम बुद्धीनें दान करावें तेंच खरोखर दान होय. परोपकारादि कार्यें या पासुनच होतात. त्या व्यतिरिक्त जीं दानें ते सर्व व्यवहार. लौकिक संपादनार्थ दानें करण्याकडे मनुष्याचा कल स्वाभाविक असतो, पण निष्काम बुद्धीनें दान करणारे विरळा. कामनिक दानामध्येंहि सत्पात्रीं दान करणारे थोडे, कुपात्रीं दान करण्याची प्रवृत्ती कालप्रतिकूलतेनें फार वाढली आहे. ज्या दाना पासून दान घेणाऱ्या व्यतिरिक्त कुणाचें कल्याण होत नाहीं तें दान सत्पात्रीं झालें असें समजूं नये. सत्पात्रीं केलेले दानापासून सार्वजनिक हित झालें पाहिजे. या करितां मनुष्यमात्रानें दान करावयाचें तें पात्रापात्र विचार करून करावें, अशा दानानें दान करणाराचें व सर्व लोकाचें हित होतें. भूतमात्रास अन्नादिकाचें दान करावें हें खरें परंतु दान प्रसंगीं पात्रापात्र विचार अवश्य केला पाहिजे.

# सत्तेपुढें शहाणपण नाहीं.

यस्य प्रसादे पद्मा ऽस्ते विजयश्च पराक्रमे ॥
मृत्युश्च वसति क्रोधे सर्व तेजोमयो हि सः ॥

( समातंग )

विद्या, संपत्ति, पराक्रम वगैरे गोष्टींपेक्षां सत्ता ही कांहीं अमोलिक चीज आहे विद्वान, संपत्तीमान आणि पराक्रमी असे सर्व गुणी पुरुष सत्तेच्या आधीन असतात. लोकांमध्यें संपत्तीची मोठी प्रशंसा होते. ह्मणजे ऐहिक सुखें व भोग हीं संपत्तीचे आधीन असून विद्वान व सन्मान्य पुरुषही संपत्तीमानाचे घरीं घिरट्या घालितात असी लोकांची समजूत आहे एका कवीनें ह्मटलें आहे:—

धिगभ्यस्तां विद्यां धिगपि कवितां धिक् सुजनतां ॥
वयो रूपं धिक् धिक् धिगपिच यशो निर्धनवतः ॥
असौ जीयादेकः सकल गुणहीनोपि धनवान् ॥
बहिर्यस्य द्वारे तृणलवनिभाः संति गुणिनः ॥

यावरून सर्व गुणांचा लोक धिक्कार करून संपत्तीला श्रेष्ठत्व देतात. संपत्तीमान पुरुषाचा लोक बहुमान करतात हें तर प्रसिद्धच आहे. आतां या संपत्तीचें श्रेष्ठत्व आपल्यास दिसतें खरें. पण विचार करून पाहिलें असतां सत्तेपुढें संपत्तीचें श्रेष्ठत्व नाहीं अनेक श्रीमान लोक सत्ताधिशा पुढें हात जोडून उभे असतात हा अनुभव जगांत पुष्कळ आहे. संपत्तीमानाची प्रशंसा त्याचे अनुयायी मंडळींत किंवा त्याजपासून आपल्यास चार पैसे मिळावे असें जे लोक इच्छितात त्याच्यांत होते पण सत्तेचा प्रकार तसा नाहीं. सत्ताधीशाचें ह्मणणें लोकांना कबूल करणें भाग पडतें व संपत्तीमानाचें कबूल करणें लोकांचे खुशीवर असतें.

यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः स पण्डितः स श्रुतवान् गुणज्ञः ॥
स एव वक्ता स च दर्शनीयः सर्वे गुणाः कांचनमाश्रयंति ॥

ज्याचे जवळ संपत्ती आहे तोच पुरुष कुलीन, पण्डित, बहुश्रुत, गुणज्ञ, वक्ता व दर्शनीय होय असें जे हांजी हांजी करणारे असतात तेच कबूल करतील. पण इतरांस तसें मानण्याचें कांहीं कारण नसतें. किंवा पैसेवाला मनुष्य जर मूर्ख व दुराचारी असला तर त्यास राज दरबारीं देखील मान मिळणार नाहीं. आतां याजवरून ज्यांस राज दरबारीं किंवा लौकिकांत मान मिळतो असें आपण पहातों, ते सर्वच श्रीमंत शहाणें असतात असें नाहीं. त्यांचा प्रकार वर लिहिल्याप्रमाणें असतो. ह्मणजे श्रीमंत लोक आपले पदरचे पैसे खर्चून वगैरे लोकांत बरें ह्मणवून घेतात, ह्मणजे त्यांस मान देणें किंवा त्यांची आज्ञा मानणें हा खुषीचा भाग असतो. पण सत्तेचा प्रकार तसा नाहीं. सत्ताधीश शहाणा असो किंवा मूर्ख असो, त्याचा हुकुम न्याय्य असो किंवा अन्यायाचा असो, लोकांस तो मानावा लागतो. याचीं उदाहरणें राजे लोकांचे दुर्वर्तनाचे प्रकारा वरून लोकांचे अनुभवास येतातच. मनुष्य विद्वान व शाहाणा असला तरी ज्याचे हातीं सत्ता आहे त्या पुढें त्याचें शहाणपण चालत नाहीं. पेशवाईतील नाना फडणीस व सखाराम बापू यांच्या विषयीं लोकांस माहिती असेलच. सखाराम बापू साडेतीन शहाण्यां पैकीं सगळा शहाणा असून नाना फडणीस अर्धा शहाणा होता पण राज्याचें सूत्र नाना फडणीसाचे हातीं असल्यामुळें सखाराम बापूचें कांहीं तेज पडेना. राजकीय संबंधांत आपला हात शिरावा ह्मणून बापूंनीं अनेक राजकारणें केलीं पण त्या धूर्त फडणीसाचे विलक्षण बातमीनें आणि अप्रतिम कारस्थानी पणानें तीं सर्व व्यर्थ गेलीं. नाना फडणीसाची बातमी ठेवण्याची फार विलक्षण खुबी होती. आतां या संबंधानें कित्येकांचें असें ह्मणणें पडतें कीं, कोण केव्हां जेवला, कोण केव्हां पाणी प्यायला, कोण कुणाशीं काय बोलला, इत्यादि सूक्ष्म

गोष्टींचा तपास ठेवण्यांत कांहीं विशेष नाहीं, पण त्याचा तपास असा धारण असे. अगदीं साधारण गोष्टी पासून तों मोठ्या महत्वाचे कामा पर्यंत त्याची बारीक बातमी असे, एखादे सभेंत किंवा कांहीं मसलतींत किंवा स्त्रीपुरुषांचे एकांतांतहि काय बोलणीं झालीं याची तो बातमी ठेवीत असे. या बातम्या लोकांचीं कुत्सितें जाणण्या करितांच केवळ नसून त्यांत राजकारण असे.

सवाई माधवरावाचे कारकीर्दीत इंग्रजसरकारनें "आमचा एक वकील पुण्यास असावा" असें बोलणें लाविलें, ही गोष्ट नानाचे पसंतीस येऊन वकील ठेवण्या विषयीं इंग्रजांस परवानगी मिळाली. वकील राहिल्या नंतर पुढें कांहीं दिवसांनीं त्याणें सरकारांत असें बोलणें लावलें कीं, "आमचे खाण्यापिण्याचे जिन्नस नेहमी मुंबईहून येतील त्यांस बोरघाटावर अटकाव न होण्या विषयीं सरकारची आज्ञा असावी." नानांनीं या गोष्टीस रुकार दिला व तीन म्याने येऊं देत जावे अशी बोरघाटचे रखवालदार यांस आज्ञा झाली. परंतु या कामांत दगा वगैरे झाल्यास क्षमा होणार नाहीं ह्मणून नानांनीं वकीलास निक्षून ताकीद दिली होती.

एकदां असें झालें. आपणापाशीं कांहीं तोफा असाव्या असें वरील इंग्रज याचे मनांत येऊन मुंबईहून दोन जंबुरे आणविले. वरील जंबुरे आणविण्याची तजवीज त्यानें अशी केली, कीं मुंबईहून तीन म्याने खाण्याचे येत असत त्यांपैकीं एका तांबड्या म्यानांत दोन जंबुरे भरून रीतीप्रमाणें कुलपें वगैरे ठोकून म्याने मुंबईहून रवाना झालें. पुढें ही बातमी नानास कशी कळली असेल ती असो, पण त्यानें बोरघाटचे जकातास तांबडा म्याना अडकावून ठेवण्याविषयीं ताकीद दिली. त्याप्रमाणें जकातदार याणें दोन मेण्यांस परवानगी देऊन एक मेणा अटकाविला. ही गोष्ट वकील यांस कळतांच त्यांस अर्थात भय वाटलें असेल हें उघड आहे. पुढें त्याणें हें प्रकर्ण नानापर्यंत

पोंचविलें. परंतु नानांनीं आपल्यास या संबंधाची बातमी लागल्या बद्दल कांहीं ओळख न देतां "आजपर्यंत त्याने कधीं अटकावले नाहींत आणि आतांच कां अटकाविले?" ह्मणून इंग्रजांस कित्येक वेळा तोच सवाल केला. या एकंदर हकीकतीवरून आपला गुप्त बेत नानाला खचित कळला असें समजून "आजपासून अशी गोष्ट आह्मांपासून होणार नाहीं, झाली तेवढी सरकारनें आह्मास माफ करावी" अशी नानास विनंति केली. तेव्हां नानांनीं सांगितलें कीं मेणा माघारा जाईल, व पुनः अशी गोष्ट झाल्यास त्याजबद्दल सरकारांतून तजवीज करण्यांत येईल." याप्रमाणें इंग्रजी वकीलाचा गुप्त बेत नानास कळून त्यानें तोफा व मेणा मुंबईस परत पाठविला.

एकदां नाना फडणीस व हरिपंत तात्या वगैरे मंडळी टिपूवर स्वारी करण्यास गेली होती. तेव्हां हैदराबादचे नबावहि पेशव्यांस मदत करण्यास होते. लढाईमध्यें पेशव्यांचा जय झाला. लढाई संपल्या-वर एक दिवस रात्रीं नबाबाची स्वारी जनानखान्यामध्यें असतां खप्पा होऊन दिलगिरीत होती. तेव्हां वडी बेगम यांणीं त्या गोष्टीचें कारण विचारलें. नबाबांनीं आपले दिलगिरीचें कारण सांगण्यास पुष्कळ हरकती घेतल्या, पण शेवटीं बेगमच्या आग्रहावरून ते ह्मणाले, कीं माझ्या पदरीं कोणी शाहाणा व धूर्त मनुष्य नाहीं यामुळें मी फार दिलगिर आहें. नंतर ती गोष्ट तशीच राहिली. पुनः दुसरे दिवशीं रात्रींहि नित्याप्रमाणें नबाब आपल्या जनानखान्यांत असतां नाना कडून एक फारसी भाषेंत लिहिलेली चिठ्ठी आली, त्यांत नानांनीं लिहिलें होतें कीं, "आपली मर्जी नाखुष होऊं देण्याचें कांहीं कारण नाहीं. कां कीं आह्मी जरी पेशव्यांचे नौकर आहों तरी पेशव्यांस व आपणास निराळे मानीत नाहीं. याकरितां आह्मास काय आज्ञा करणें असेल ती करावी." हें पत्र वाचून नबाब बेगम यांस ह्मणाले—काल तूं आणि मी उभयतांच येथें असून या ठिकाणीं जी हकीकत घडली ती नानानें मोठ्या शाहाणपणानें

समजून घेतली. तेव्हां असे शहाणे लोक आपले दरबारीं नाहींत."
असो, पुढें दुसरे दिवशीं नबाब यांणीं नानास बलावून आणलें व त्यास
"मदाहुलमहा" असा किताब दिला.

सदरील हकीकती वरून नानाचे शहाणपणाची व धूर्ततेची कशी
कडेकोट तयारी होती हें कोणाचेंहि लक्षांत येईल. नानाचे आंगीं
इतकें शहाणपण होतें तथापि तो ते वेळचे साडे तीन शहाण्यांमध्यें अ-
र्धा शहाणा ह्मणून गणला जात असे. सखाराम बापू हा सगळा शहाणा
होता. नाना फडणीस ज्या प्रमाणें लोकांच्या बातम्या काढण्यांत
व गुप्त गोष्टी माहीत करून घेण्यांत कुशळ होता त्याच प्रमाणें सखारा-
म बापूहि होता. ह्यास नानाचे घरची सर्वी हकीकत रोज समजत
असे. राज कारण, युक्ति, व धूर्तता या कामांत बापूची कडी नानावर
असे. पण उपयोग काय? नानाचे हातांत सत्ता असल्यामुळें तो
आपलीं कारस्थानें शेवटास नेऊन सखारामबापू वगैरे मुत्सदी
मंडळीस तो आपले तांत ठेवित असे. सगळे शहाण्यांचे शहाणप-
णाचें तेज सत्तेचे योगानें नाना अर्धा शहाणा असतांहि त्याचे पुढें
पडत असे. तेव्हां असा सत्तेचा महिमा आहे. एखाद्या गुन्ह्या
बद्दल राजा आपले प्रजेस शासन करतो. व तोच गुन्हा राजाहि
करितो. पण त्यास शिक्षा नाहीं. कारण तो सत्ताधीश आहे. मल्हा-
रराव महाराज येथे छ वर्तन करून अनेक तऱ्हेचे अप्रयोजक खेळ
व दुराचार करीत असत. पण त्यांचे राज्यांतील प्रजेस यत्किंचित्
अपराधा बद्दलहि शासन मिळत असे. आता या प्रजेनें मल्हाररावाचे
दुर्वर्तनाचा विचार करून कांहीं उपयोग होता काय? पण तीच जेव्हां इंग्रज
सरकाराशीं गांठ पडली तेव्हां मल्हाररावाचे गुन्ह्याची चवकशी होऊन
त्यास राज्यभ्रष्ट करून मद्रासेस पोंचविलें. याचें कारण इंग्रजसरकारची
सार्वभौम सत्ता होय. तेव्हां ज्याची सत्ता जास्त त्याचें ह्मणणें सगळ्यांनीं
ऐकावें हा न्याय ठरला. आणि हा न्याय आहे किंवा नाहीं याची वाटाघाट

करण्यांत अर्थ ही नाहीं. कारण सत्ताधीशांचे दुर्वर्तनाची अन्यायाचे कोटींत गणना केली तथापि त्यांस शासन कोण करणार? आतां या प्रश्नालाही एक समर्पक व सत्य जबाब आहे पण तो तात्कालिक नसून जरी कालेंकरून अनुभवही होतो, तथापि मानीवच समजावा लागतो.'

कुटुंबांतील मुख्य मनुष्य हा कुटुंबाचा सत्ताधीश होय. ह्मणजे कुटुंबांत त्याचें प्राबल्य असतें. त्याच्यावर ग्रामाधिपती, त्याजवर देशाधिपति, आणि त्याच्यावर सार्वभौम सत्ताधीश. सर्वांत सार्वभौम राजा सर्वांवर सत्ता चालवितो. आतां याजवरून कोणासहि वाटेल कीं, सार्वभौम राजावर कोणाची सत्ता नाहीं. पण असें वाटणें हा भ्रम आहे. कारण, सर्वांवर परमेश्वराची सत्ता अप्रतिहत आहे, त्याच्यापुढें मात्र कोणाचें शहाणपण चालत नाहीं. सार्वभौम राज्याची सत्ता कालें करून नष्ट होते, याचा अनुभव इतिहासादिकांवरून सर्वांस आहे. 'सत्ते पुढें शहाणपण नाहीं' याचा अर्थ सत्ताधीश ह्मणेल तो कायदा व करील ती पूर्वदशा असें लोकांस ह्मणावें लागतें आतां हें मात्र खरें कीं, सत्ताधीश जर सद्वर्तनानें वागेल, सच्छास्त्रास अनुसरून आपल्या ताबेंतील लोकांपासून करभारादिक ग्रहण करील, सुजनाचा प्रतिपाळ व दुर्जनास दंड करील, आणि स्वतः नीतीनें वागून लोकांसहि त्या प्रमाणेंच वागवील, तो सत्ताधीश मात्र सत्तेचा चिरें काल उपभोग घेईल. पण जो आपले ताबेंतील लोकांचा छळ करील, अन्यायानें त्यांच्या पासून द्रव्यादिक घेईल, अयोग्य व अपक्षपाती लोकांचे हातीं न्यायाधिकार देईल, व शास्त्र मर्यादेचें उल्लंघन करून मनसोक्त वर्तन करील, त्याची सत्ता क्षीण होत जाऊन तो लवकरच पराधीन होत जाईल. मग तो मोठा सत्ताधीश मांडलीक असो. अथवा सार्वभौम असो. आतां हें मात्र खरें कि राजाचें वर्तन न्यायाला अनुसरून असलें किंवा नसलें, आणि तें प्रजेस आवडलें किंवा न आवडलें तथापि त्याचे ह्मणण्यास रुकार देणें, तो आज्ञा करील ती शिरसा वंद्य करणें, आणि तो दाखवील त्या मार्गानें जाणें भाग आहे. पण अशा दुराचरणी

राजाची सत्ता नष्ट करण्यास त्याची प्रजाच कारण होते. ह्मणजे राज सत्तेच्या योगानें होणारा अन्याय प्रजेस दुःसह झाला ह्मणजे ती राजा ह्मेच उपमर्द करून राज्यांत बंडावा उत्पन्न करते व त्या योगानें राजसत्ता नष्ट होते.

आतां राज्यसंपादन हा तरी एक सत्तेचाच प्रकार आहे. ह्मणजे राजेलोक हे बहुधा आपलें राज्य मोठें व्हावें आणि आपलें उत्पन्न वाढावें ह्मणून आपल्यापेक्षां जे दुर्बल राजे असतील त्यांच्या राज्यावर हल्ला करून त्यांचा प्रदेश आपले राज्यास जोडतात, किंवा त्यांजवर आपली सत्ता ठेऊन त्यांजपासून करभारादिक घेतात, नेहमी राज्यक्रांतीचे संबंधानें हाच प्रकार दृष्टीस पडतो. राज्यप्राप्तीला मनगटाचे जोराचाच न्याय लागू पडतो. तेथें "कस्यचित्किमपिनो हरणीयं मर्म वाक्य मपिनो चरणीयं" हें वेदांतवचन कांहीं उपयोगाचें नाहीं. आतां एका अर्थी हें खरेंहि आहे. कारण, एखादे प्रदेशांतील लोकांना जाऊन सांगितलें, कि आमचे मनातून तुमच्या देशांत राज्य करणें आहे तेव्हां आह्मास प्रतिबंध न करतां तुह्मी तें करूं द्या. आतां असा जोगवा मागितल्यानें राज्य प्राप्ति होण्याचा मुळींच संभव नाहीं. आपले दाराशीं मूठभर दाणे मागण्या करितां कोणी भिकारी येऊन त्याणें मोठें आर्जव केलं तरी त्यास दाणे मिळण्याची देखील जर पंचाईत पडते, तर मग आपल्यावर सत्ता चालविण्याची जर कुणी भिक्षा मागितली तर त्यास ती मिळण्याची कितपत आशा आहे याचें अनुमान करणें फारसें कठीण नाहीं. तेव्हां राज्यप्राप्तीस मनगटाचें जोरच पाहिजे हें निर्विवाद आहे.

तेव्हां राज्यप्राप्ती होण्यास मनमानेल तो कायदा व मर्जीस पडेल तो न्याय असा प्रकार असावयाचाच. आतां त्यामध्यें इतकेंच लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, अशा रीतीनें प्राप्त झालेले सत्तेचा पुष्कळ दिवस पर्यंत उपभोग घेण्यास सांपडावा असें ज्या राजे लोकांचे मनांत असेल त्यांणीं प्राप्त राज्य नीतीनें चालवून प्रजेस संतोषित ठेविली पाहिजे, वर जो मन-

गटाचें जोराचा न्याय सांगितला तो केवळ राज्यप्राप्ती करितां होय. तो सर्व काळ उपयोगी नाहीं. तसें झाल्यास तो राज्यभ्रष्टतेस कारणी होतो. तेव्हां सत्ते पुढें शहाणपण नाहीं हा प्रकार न्यायाचा नाहीं हें उघड आहे. आणि न्यायाचा नसल्यामुळें अर्थात् तो कोणासहि हितावह नाहीं. पण जे सत्ताधीश सत्ता बळानें आपल्या ताबेंतील लोकांवर जुलूम वगैरे करितात त्यांच्या विषयीं लोकांनीं व्यर्थ वल्गना करीत बसून जास्त नाखूषी करून घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें उघड आहे. तसेंच मोठ्या गुळमट अर्ज वगैरेंदिकांनीं न्यायाचीं तत्वें गात बसणेंहि व्यर्थ असून "सत्ते पुढें शहाणपण नाहीं" या म्हणीकडे लक्ष देऊन आपली विद्वत्ता, निस्पृहता, सत्याभिमान, आणि न्यायीपणा यांची प्रौढी सत्ताधीशापुढें न मिरवतां स्वस्थ बसावें हें चांगलें. पण जे राजे वगैरे न्यायानें वागून लोकमत जाणण्याची इच्छा करीत असतील तशा प्रसंगीं मात्र त्यांस सामोपचारानें वरील गोष्टी समजवाव्या. सारांश "सत्तेपुढें शहाणपण नाहीं" हें अपूर्व वाक्य सर्वांनीं चांगलें लक्षांत ठेऊन वागावें हें योग्य होय.

# स्वात्मानंद.

( मा० अं० ३० पु० चा० )

उत्तर दळीं त्या सुखाची रती ॥ चित्त इच्छि अधीक सुखप्राप्ती ॥
नावडे निजात्मनिजभक्ती ॥ विषयासक्ति भुलोनियां ॥ १३ ॥
ईशान्यें बहु द्रव्य मिळवावें ॥ दान करणें मनिं उद्भवे ॥
सहजवृत्तीस आठवे ॥ लीला संभवे ऐशापरी ॥ १४ ॥
सर्व पाकोळ्या त्यजुनि राहतां ॥ विरक्तीतें मन पावे तत्वता ॥
सर्वस्व विवळं उदासता ॥ नेघे आठवता कांहीं मग ॥ १५ ॥
ऐसा अष्टदळपद्माचा खेळ ॥ तुज निरोपिला सकळ ॥
यास्तव स्वरूपीं निजनिश्चळ ॥ राहावें निर्मळ सर्वदा बा ॥ १६ ॥
एवं जागृति केशरीत ॥ स्वप्न विलसे कर्णिकांत ॥
दोहींचें अधिष्टान सुषुप्ति होत ॥ करी चित्त स्वस्त स्वरूपीं तें ॥ १७ ॥
सुषुप्ती अंतरगत सरोसी ॥ त्याहुनि पुढें जरी पाहासी ॥
कोशांतरीं बैसका परीयेसी ॥ उमज मानसीं धरावा तो ॥ १८ ॥
त्या कोशामाजी अति सूक्ष्म ॥ पीठ बरवें सच्चिन्मय धाम ॥
तें स्थान असे अति उत्तम ॥ जें कां दुर्गम अज्ञानियां ॥ १९ ॥
तूर्या तेथें व्यतिरेक ॥ अन्वयपणेंचि देख ॥
तीयेलागीं नांदणुक ॥ असें कौतुक पाहा कैसें ॥ २० ॥
ऐसा सूक्ष्म अनुतरा आद्य ॥ हृदईंचा विश्वविस्तार सद्य ॥
तुज कथिला आद्य मध्य ॥ अंत ही वंद्य जयाचेनि ॥ २१ ॥
सर्व जाणोनि आपण ॥ ब्रह्मरंध्रमय तो बिंदु पूर्ण ॥
सुनादीं पाहावा लक्षोन ॥ गमनागमन चुके जेणें ॥ २२ ॥
दिव्यांजन स्फुरन्मय ॥ प्रकाश स्वयें अप्रमेय ॥
तें हें ब्रह्म पाहा निश्चयें ॥ जेथें क्षय होय जन्ममृत्या ॥ २३ ॥
तेथें मिथ्या हें जग जाणीजे ॥ सत्य ब्रह्म तेंचि गुरुदीक्षे घेईजे ॥
निजात्म कर्मेंची लक्षिजे ॥ लक्षचि होईजे आपण तें ॥ २४ ॥

ऐसा हा ब्रह्मविचार ॥ सूक्ष्म कथिला तुज सावार ॥
वेदांत सिद्धांतीचें निज सार ॥ निजात्मजिव्हार जीवींचें जें ॥ २५ ॥
ज्याला हे अपरोक्ष ज्ञान ॥ प्राप्त अनुभव सद्गुरुकृपेन ॥
त्याचे संदेहग्रंथीचें छेदन ॥ आपेआपण होत असे ॥ २६ ॥
सर्व छेदुनि संशय ॥ असंग परमात्माचि होय ॥
लक्षीं लक्षार्थ सहज ये ॥ आयता निश्चय परिपूर्ण ॥ २७ ॥
जें कां हें हृदयपद्म ॥ दशदळात्मीक उत्तम ॥
यथान्यायें स्वयें उगम ॥ ध्याता सर्वोत्तम आणचि ॥ २८ ॥
हें नवविध भक्तिचेनियोगें ॥ आपणची होइजे स्वांगें ॥
जन्ममरण पडे मागें ॥ निज ज्ञान लागे संशय जाती ॥ २९ ॥
ते भक्ति जाणीजे नवविध ॥ प्राप्त होतां विषय बाध ॥
कदां न सीवती प्रसिद्ध ॥ निजात्माबोध करीं लाभे ॥ ३० ॥
श्रवण किर्तन विष्णुस्मरण ॥ पादसेवन आर्चन वंदन ॥
दास्य सख्य आत्मनिवेदन ॥ नवविध जाण भक्तिभाव ॥ ३१ ॥
श्रवण करावें निजात्म सार । तेंचि घडे किर्तनप्रकार ॥
विष्णुस्मरण तें निरंतर ॥ दिवसरात्र असों दीजे ॥ ३२ ॥
पादसेवन रात्रदिन ॥ मनीं स्वरूप आठवण ॥
तयाचि भावें आर्चन ॥ मनीं मनन चालवावें ॥ ३३ ॥
सर्वभूतीं आत्मा जाणुनी ॥ वंदन कीजे आत्मानुसंधानीं ॥
दास्य सद्गुरु संतसज्जनीं ॥ सप्रेम मनीं असों द्यावें ॥ ३४ ॥
सख्यआत्माची सख्य जाणिजे ॥ येर असत्य सर्वत्यजीजे ॥
आत्मनिवेदन निवेदीजे ॥ भूतभाव जे प्रकृतिचे ॥ ३५ ॥
चारीदेह चारी अवस्था ॥ चारी अभिमानी गुण चत्वारता ॥
आटमात्रा भोग चारी तत्वता ॥ हेतु सर्वथा नव्हसीच ॥ ३६ ॥
चारी वाचा चारी वर्ण ॥ पंचवृत्ति मिळोंनि अंतःकर्ण ॥
तैसेचि पंचही प्राण ॥ ते तूं आपण नव्हसीच ॥ ३७ ॥

तैसीं ज्ञानेंद्रियें निश्चिति ॥ कर्मेंद्रियें पंचकश्रुति ॥
विषयपंचक कृति ॥ पाहां अंतरगति तूं नव्हसी ॥ ३८ ॥
पृथ्वीचे पंच गुण ॥ आप पंचक प्रमाण ॥
अग्नीचे पंच गुण जाण ॥ ते तूं आपण नव्हसीच ॥ ३९ ॥
वायु पंचक कृति ॥ तैसा आकाश पंचक स्थिति ॥
हे स्थूळ देहप्रकृति ॥ कदापी निश्चितीं नव्हसीच ॥ ४० ॥
दिशा वायु दैवत ॥ सूर्य वरुण आश्वीनीकुमर होत ॥
अग्नी इंद्र उपेंद्र निश्चित । दैवतें समस्त तूं नव्हसी ॥ ४१ ॥
दाहा इंद्रियें दाहा देव होती ॥ सत्व रज तम त्रय मूर्ति ॥
नैरूत्य आणि प्रजापती ॥ ते तूं निश्चितीं नव्हसीच ॥ ४२ ॥
पंच ज्ञानेंद्रियें जीं कां ह्मणती ॥ तैशीच कर्मेंद्रियांची गती ॥
श्रोत्र त्वचा चक्षु निश्चितीं ॥ जिव्हा घ्राण होती पांचही ॥ ४३ ॥
वाचा पाणी पाद ॥ शिश्न पांचवें गुद ॥
हीं दश इंद्रियें विविध ॥ तूं तीं प्रसिद्ध नव्हसीच ॥ ४४ ॥
अंतःकर्ण विष्णु चंद्रमा मन ॥ बुद्धी ब्रह्मदेव आपण ॥
चित्त तेंचि नारायण ॥ अहंकार जाण रुद्र नव्हसी ॥ ४५ ॥
आधारादीतिनिबंध ॥ सप्त चक्रें दशनाद ॥
मातृकावर्णादीविविध ॥ जप प्रसिद्ध नव्हसी तूं ॥४६॥
त्रिकुट श्रीहट गोल्हाट ॥ औटपीठ भ्रमरगुमट ॥
ब्रह्मरंध्र योगपीठ ॥ पाहा तूं हें स्पष्ट नव्हसीच ॥ ४७ ॥
तालुका ऊर्ध्व लंबिक ॥ कुंभक रेचक पूरक ॥
नवद्वारें नवांक ॥ हे तव मारक नव्हसी तूं ॥ ४८ ॥
जेथें देहाची नास्तिक्यता ॥ तेथें कैंची हे माइकता ॥
तूं अनादिसिद्ध तत्वता ॥ परे परता आत्माराम ॥ ४९ ॥
ऐसें हें आत्मनिवेदन ॥ निवेदावें आपणा आपण ॥
जेथें गलित देहाभिमान ॥ निजानंद घन पाविजे तो ॥ ५० ॥

एकचि भक्ति नवविध ॥ नव मिळोनि एक प्रसिद्ध ॥
सत्ता प्रकाश निजबोध ॥ भक्ति अभेद निजात्मता ॥५१॥
भक्तियोगेंचि जाणणें ॥ ज्ञानाधिकार पावणें ॥
मग विवेक वैराग्याचें ठाणें ॥ अढळपणें ढळेना तें ॥५२॥
चतुर्थ देहाचा शोध घ्यावा ॥ अज्ञान पणाचा नपडे गोवा ॥
मग आपेआप तरावा ॥ संसार अवघा भक्तियोगें ॥ ५३॥
ब्रह्मीं संसारचि नाहीं ॥ ऐसें दृढ कळलें जया पाहीं ॥
तो देही असोनि विदेही ॥ परब्रह्म तेंही जाणोतलें ॥ ५४ ॥
जाणण्याविरहीत जाणणें ॥ ते अनुभव खुण पावणें ॥
कांहीं नसोनि असणे ॥ अद्वैतपणे निजानंदें ॥ ५५ ॥
ऐसें भक्तियुक्त ज्ञानें ॥ पाविजे आत्मज्ञान खुणें ॥
तें हें आत्मनिवेदन ह्मणणे ॥ अधीक बोलणें काय काज ॥ ५६ ॥
तुजपासुनि हें सकळ जालें ॥ परि तुवां नाहींच केलें ॥
तुझीये सत्तेने प्रकटलें ॥ दिसोनि आलें माइकत्वें ॥ ५७ ॥
साचार निर्धारें पाहातां ॥ तूं अकर्ता असमी गा तत्वता ॥
नाथिली घेऊनि अहंता ॥ मीचि स्वयें कर्त्ता मानिसी तूं ॥ ५८ ॥
तो टाकि अभिमान ॥ तूं कल्पनेतीत आपण ॥
तुज जाणता नसे कवण ॥ तूंचि परिपूर्ण येकलाची ॥ ५९ ॥
हें मायाचक्र भेदुनि जावें ॥ निजात्मस्वरूपीं स्थिरावें ॥
तेथें कांहींचि न संभवे ॥ नीरे स्वभावें मृगजळत्वें ॥ ६०॥
ऐसा हा माइक खेळ ॥ तुझा तूं असंगा निर्मळ ।
व्यर्थ होसी कां बरळ ॥ निजात्म खेळ नेणतांचि ॥ ६१ ॥
जयासी आत्मानुभव जाहाला ॥ तो नवचेच कीं कांहीं लपविला ॥
स्थिति गति अनुभव बोला ॥ जाय वोळखिला आत्मज्ञानी ॥ ६२ ॥
तो आत्मज्ञानिया कैसा ॥ निराभिमान जयाचा ठसा ॥
निर्विकार निःसंग दशा ॥ कोठें सहसा न गुंतेची ॥ ६३ ॥ पु० चा०

# सुभाषित.

मातेव रक्षति पितेव हिते नियुंक्ते ।
कांतेव चापि रमयत्यपनीय खेदं ॥
लक्ष्मी तनोति वितनोति च दिक्षु कीर्तिः ।
किं किं न साधयाति कल्पलतेव विद्या ॥ ९५ ॥

"विद्या ही मातेप्रमाणें पुरुषाचें संरक्षण करिते, पित्या प्रमाणें हितवाद सांगते, कांते प्रमाणें दुःखाचें निवारण करून चित्ताचें रंजन करिते, लक्ष्मी प्राप्त करून देते, व दिगंतरास कीर्ती पोंचविते, सारांश विद्येचे योगानें सर्व गोष्टी अनुकूल होतात. विद्या ही केवळ कल्पलताच होय." कल्पलते पासून ज्या प्रमाणें सर्व इच्छित गोष्टी सफल होतात तद्वतच विद्येपासूनहि होतात.

बधिरयति कर्णविवरं वाचं मूकयति नयनमंधयति ॥
विकृतयति गात्रयष्टिं संपद्रोगोऽयमद्भुतो राजन् ॥ ९६ ॥

"हे राजा, संपत्तिरूप रोग फार विलक्षण आहे. हा कान असतां पुरुषास बहिरा करतो, वाचा असतांहि मुका करतो, डोळे असतांहि अंध करतो, व शरीराचीं संपूर्ण गात्रें सतेज व सदृढ असतांहि त्यांस विकृति उत्पन्न करितो."

येषां न विद्या न तपो न दानं ।
ज्ञानं न शीलं न गुणो न धर्मः॥
ते मृत्युलोके भुवि भारभूता ।
मनुष्य रूपेण मृगाश्चरंति ॥ ९७ ॥

"ज्या पुरुषांला विद्या नाहीं, ज्यांचे हातून तप व दान होत नाहीं, ज्यांला ज्ञान नाहीं, सुशीलपणा ज्यांचे आंगीं नाहीं, जे गुणवान नाहींत आणि धर्मज्ञहि नाहींत. असे पुरुष या मर्त्यलोकीं पृथ्वीला केवळ भारभूत

होत. ते मनुष्य असतांहि वन्य मृगां प्रमाणें आयुष्याचे दिवस घालवितात."

दायादाः स्पृहयंति तस्करगणा मुष्णंति भूमीभुजो ।
दूरेगच्छलमाकलय्य हुतभुग्भस्मीकरोति क्षणात् ॥
अंभः प्लावयते क्षितौ विनिहितं यक्षा हरंति ध्रुवं ।
दुर्वृत्तास्तनया नयंति निधनं धिग्धिग्धनं तद्बहु ॥ ९८ ॥

"दायाद असतात ते धनाचा द्वेष करितात, चोर तें चोरून नेतात, राजे लोक कपटादिक करून त्याचें हरण करितात, अग्नि त्यास जाळून टाकितो, पाण्यानें तें वाहून जातें, आणि दुर्वृत्त असे पुत्रादिक धना करितां पित्याचाहि नाश करितात, तस्मात अशा धनाला धिक्कार असो."

विकृतीं नैव गच्छंति संगदोषेण साधवः ॥
आवेष्टितं महासर्पैश्चंदनं न विषायते ॥९९॥

"जे सत्पुरुष आहेत त्यांना दुर्जनाचा सहवास घडला तथापि ते आपला अंगभूत सज्जनपणा टाकुन दुसऱ्यास अपकार करीत नाहींत. चंदन वृक्ष सर्पांनीं वेष्टित असतांहि तो विषकारक होत नाहीं."

भगवंतौ जगन्नेत्रे सूर्यचंद्रमसावपि ॥
पश्य गच्छत एवाऽस्तं नियतिः केन लंघ्यते ॥ १०० ॥

"सर्व जगास नेत्ररूपी जे महान चंद्र आणि सूर्य तेहि अस्ता प्रत पावतात. तस्मात् दैवाचा प्रतिकार करण्यास कोणीहि समर्थ नाहीत"

विद्या नाऽधिगता कलंकरहिता वित्तंच नोपार्जितं ॥
सुश्रूषाऽपि समाहितेन मनसा पित्रोर्नसंपादिता ॥
आलोलायतलोचना युवतयः स्वप्नेपि नाऽऽलिंगिताः ॥
कालोऽयं परपिंड लोलुपतया काकैरिव प्रेषितः ॥ १०१ ॥

"जन्मास येऊन सच्छास्त्राचा अभ्यास केलानाहीं, द्रव्य संपादन केलेंनाहीं, स्वस्थ चित्तानें मातापित्यांची सेवाहि केली नाहीं, आणि

चंचल दृष्टीच्या ज्या तरुण स्त्रिया त्यांस स्वप्नामध्येंहि आलिंगन दिलें नाहीं, अशा रीतीनें कावळ्याप्रमाणें केवळ परपिंड भक्षक होऊन आयुष्य व्यर्थ दवडिलें."

यशः पुण्यं कलत्राणि पुत्रोत्पत्तिर्निधि स्तथा ॥
सुकृता देव लभ्यंते नच पार्थ पराक्रमात् ॥ १०२ ॥

"अर्जुना यश, पुण्य, स्त्री, पुत्र, आणि संपत्ती हीं केवळ पूर्वकर्मानेंच प्राप्त होतात, पराक्रमानें मिळत नाहीं."

परोपि हितवान् बंधुर्बंधुरप्यहितः परः ॥
अहितो देहजो व्याधिर्हितमारण्यमौषधं ॥ १०३ ॥

"अहित करणारा पुरुष सख्खा बंधु असला तथापि तो शत्रु होय. आणि हित करणारा पुरुष परकी असला तथापि त्यास बंधु मानावा; शरीराशीं अति सन्निध असणारे व्याधि दूर करण्यास हितकर अशा वनौषधींचें मनुष्य सेवन करितो."

पुष्पेषु माता पुरुषायमाणा लज्जावती विश्वसृजं विलोक्य ॥
नाभीसरोजे नयनं मुरारे र्वामेतरं वारयतिस्म चित्रं ॥ १०४ ॥

"मदनाची माता लक्ष्मी ही आपला पती जो विष्णु त्याशीं विपरीत रतिप्रसंगास उद्युक्त झाली असतां पतीच्या नाभीकमलस्थ ब्रह्मदेवास आवलोकन करून लज्जित झाली. तेव्हां तिणें पतीच्या दक्षिण नेत्रावर हात ठेविला." दक्षिण नेत्रावर हात ठेविला हें सांगण्यात कवीचें इद्गत फार खोल आहे. ह्मणजे परमेश्वराचा दक्षिण नेत्र सूर्य असल्यामुळें त्याजवर आच्छादन घातल्यानें प्रफुल्लित असलेलीं कमलें मिटून जातील. तेव्हां लक्ष्मीपतीचें नाभीकमलहि मिटेल, अर्थात् त्या नाभि कमलामध्यें असलेला ब्रह्मदेवहि अंतर्हित होईल.

देयं भो अधने धनं सुकृतिभिर्नो संचितं सर्वदा ॥
श्रीकर्णस्य बलेश्च विक्रमपतेरद्यापि कीर्तिःस्थिता ॥

आश्चर्यं मधुदानभोगरहितं नष्टं चिरात् संचितं ।
निर्वाणादपि पाणिपादयुगलं घर्षंत्यहो मक्षिकाः ॥ १०५ ॥

"बाबारे, सत्कृत्यांनीं संपत्तीचा सद्व्यय करून ती गोरगरीबांस देत जा. म्हणजे दाताहोत्साता परोपकारादि कृत्यें कर. कारण कर्ण बलि राजा इत्यादिकांची कीर्ति अद्याप लौकिकांत आहे. या करितां धनाचा व्यर्थ संचय करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. मधुमक्षिका आपले संचित मधाचा स्वतः उपभोग घेत नाहीं व दुसऱ्यासहि तो देत नाहीं, या योगानें प्राणावर पाळी येऊन शेवटीं सर्व संचिताचा नाश होतो व अखेरीस ती मक्षिका हातपाय चोळीत बसते."

मधुकरगण श्चूतं त्यक्त्वा गतो नवमल्लिकां ॥
पुनरपि गतो रक्ताशोकं कदंबवनं ततः ॥
तदपि सुचिरं स्थित्वा तेभ्यःप्रयाति सरोरुहं ॥
परिचितजनद्वेषी लोको नवं नवमीहते ॥ १०६ ॥

"भ्रमरसमुदाय आम्रवृक्षा वरील मोहोराचा आमोद कांहीं दिवस घेतल्या नंतर त्याचा त्याग करून नवमल्लिकेचा अंगिकार करितो, तेथून आशोक वृक्षावर जातो, तेथून कदंब वनांत व पुनः तिथून कमलाचे ठिकाणीं जाऊन आसक्त होतो. तेव्हां वस्तूचा अति परिचय झाला असतां त्या विषयीं अनासक्ति उत्पन्न होऊन नवीन वस्तूची भोगेच्छा लोकांस होते"

यत्नादपि कः पश्यति शिखिनामाहारनिर्गमस्थानं ॥
यदि जलदनिनदमुदिता स्तएव मूढा न नृत्येयुः ॥१०७॥

"हा मूर्ख मयूर मेघनादानें आनंदित होऊन जर नृत्य न करता तर त्याचें गुदद्वार कोणास मोठा यत्न केल्यानेंहि दृष्टीस पडलें नसतें." ही अन्योक्ति आहे. कांहीं लोकांचे दुर्गुण, स्वाभाविक लोकांत प्रगट होतात.

# सद्धर्मदीप

## अंक ९

## अंतःशुद्धि

अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ ॥ त्याचे गळां माळ असो नसो ॥
आत्मा अनुभवीं चोखाळीलया वाटा ॥ त्याचे माथां जटा असो नसो ॥
परस्त्रीचे ठायीं जो कां नपुंसक ॥ त्याचे आंगा राख असो नसो ॥
परद्रव्या अंध निंदेसी जो मुका ॥ तोचि संत देखा तुका ह्मणे ॥

अंतःकरणाची शुद्धी झाल्या वांचून मनुष्याला कधींहि सज्जनपणा येत नाहीं. बाह्य कर्मांनीं लोकांना जरी सज्जन वाटतो तथापि अनुभवा तीं त्याच्या सज्जन पणाचा भ्रम फुटतो. आतां स्नान संध्या, तीर्थयात्रा व जपतपादि कर्ममार्ग हे फुकट आहेत असा अर्थ नाहीं, पण या कर्म करून जर अंतःकरणाची शुद्धी झाली नाहीं तर ती सर्व खटपट व्यर्थ जाते. जें कर्म करावयाचें तें लोकांनीं आली प्रशंसा करावी व आपल्या स साधु ह्मणावें याचकरितां करून उपयोग नाहीं. कर्माचे योगानें आंग चे दुर्गुण जाऊन वृत्तींत पालट झाला पाहिजे. भक्तिपुरःसर कर्म न केलें तर त्यापासून जीवाला त्रास मात्र होतो. तुकाराम बुवांनी ह्मटलें आहेः —

आली सिंहस्थ पर्वणी ॥ न्हाव्या भटां झाली धणी ॥
अंतरीं पापाच्या कोडी ॥ वरी बोडी डोयी दाढी ॥
जें बोडिलें तें निघालें ॥ सांग काय पालटलें ॥
पाप गेल्याची खूण ॥ नाहीं पालटले अवगुण ॥
भक्ति भावें वीण ॥ तुका ह्मणे अवघा शीण ॥

तेव्हां जें कर्म करावयाचें त्या पासून अंतःशुद्धी झाली पाहिजे. कित्येक लोक बाह्य कर्माचें दंभ माजवून आपणास साधु ह्मणवितात. व कित्येक आमचें अंतःकरण शुद्ध आहे, असा डौल मिरवून बाह्य कर्माची निंदा करीत होत्साते निंद्य आचरण करितात. कर्माचे योगानें अंतःशुद्धी व्हावी लागते व अंतःशुद्धीचे योगानें मनुष्य सन्मार्गानें वागला पाहिजे, तरच त्याच्या कर्माची सांगता झाली ह्मणून समजावयाचें. कर्ममार्ग व ज्ञानमार्ग हीं आत्मिक कल्याणाचीं साधनें होत. तीं लौकिकार्थ करून उपयोग नाहीं. मनुष्य अंतर्यामीं दगाबाज असला तरी वरपंकी साच पणा मिरवून लोकांत पत वाढवितो. या वर्तनानें त्यास व्यापारांत. मदत होऊन त्याचे पतीवर लोक त्यास चार पैसे देतात.आणि अशा रीतीनें पत वाढवीत वाढवीत एकदम लाख पन्नास हजारांचा डल्ला मारता येतो, हें मुंबईचे. व्यापाऱ्यांकडे पाहिलें असतां लक्षांत येईल, पण हा प्रकार कर्ममार्गांत चालणार नाहीं, त्याची परीक्षा करणारा परमेश्वर आहे. तिथे लबाडी छपविण्यास रस्ता नाहीं. बाह्यत्कारीं कितीहि कर्मठपणा मिरवीला आणि अंतर्यामी भक्तिभावाचा ढोल वाजत असला तर लोकांनीं जरी त्यास साधु ह्मटलें तथापि त्याचें तें ढोंग आत्मिक कल्याणास उपयोग पडणार नाहीं. तसेंच अंतःकरण शुद्ध आहे असें ह्मणून कर्म मार्गापासून भ्रष्ट होऊन परमहंस दीक्षेचा डौल मारीत मनुष्य यथेच्छ वर्तन करील तर तोहि आत्मिक कल्याणास मुकेल. याकरिता जें कर्म करणें तें भक्ति पुरःसर करावें ह्मणजे त्यापासून अंतःकरणाची शुद्धि होऊन इहपरत्र सुखाचा लाभ होईल. अंतःशुद्धीवांचून ब्रह्मकर्में हीं परार्थ कल्याणास उपयोगी नाहींत. भक्तिपुरःसर कर्मे करण्यानेंच अंतःशुद्धि होते. परमार्थिक सुखरूपी भांडाराची अंतःशुद्धि ही किल्ली होय, याकरितां मनुष्यानें सत्कर्माचरणानें ती किल्ली प्राप्त करून घेण्याविषयीं अवश्य झटलें पाहिजे.

---

# गेल्या नवंबर महिन्यांत वांई तालुक्यांतील कालंबी गांवीं आकाशांतून पडलेला दगड व तत्संबंधानें आकाशांतून पृथ्वीवर पडणारे तारे, उल्का आणि पाषाण ह्या दिव्य उत्पातांविषयीं सामान्य विचार.

सर्वरत्नमयो मेरुः सर्वाश्चर्यमयं नभः ।
सर्वतीर्थमयी गंगा सर्वदेवमयो हरिः ॥

महाभारत.

आकाशामध्यें परमेश्वरानें अगणित पदार्थ उत्पन्न केले असून त्या पदार्थांचे योगानें आपणास नेहमी अद्भुत चमत्कार दृष्टीस पडतात. चंद्र, सूर्य, पृथ्वी वगैरे कोट्यावधी गोल या आकाशांत भ्रमण करीत आहेत. त्या परस्परांची आकर्षणशक्ति, त्यांचें तेज, त्यांची विलक्षण आकृति आणि त्या परस्परांतील महदंतर, या सर्व गोष्टीं विषयीं विचार करूं लागलें ह्मणजे चित्ताला मोठा विस्मय वाटतो. तसेंच या अति विस्तृत आकाशांतून जे पाषाणादिक पडतात त्यां विषयींहि मनुष्याचें अंतःकरण चकित होऊन या चमत्कारांविषयीं कांहीं माहिती मिळाल्यास कळण्या विषयीं कोणाचेही मनास उत्सुकता उत्पन्न होईल हें उघड आहे. या उत्पातांची स्थिती, त्याचें स्वरूप आणि या उत्पातांची करणें या विषयीं वि० ज्ञा० वि० मासिक पुस्तकाचे १२ अंकांत कांहीं माहिती दिली आहे ती प्रथम घेऊन नंतर त्याप्रमाणें ज्ञानादिकांचे योगानें मनुष्यानें परमेश्वराविषयीं विचार करणें किती अवश्य आहे वगैरे संबंधानें चार शब्द लिहूं:—

रायल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई येथील शाखेची मासिक सभा गेल्या जानेवारी महिन्यांत भरली होती. त्यावेळीं मंडळीचे चिटणीस यांणीं मुंबई सरकाराकडून मंडळीला आलेलें पत्र वाचिलें. त्यांत पुढें लिहिल्याप्रमाणें हकीकत साताराचे कलेक्टर यांनीं मध्यभागाचे रेव्हिन्यु कमिशनर ह्यांस लिहिलेली आढळते.

“सलाम दिगर आपणास व सरकारास मालूम होण्या करितां रिपोर्ट करितों ऐसाजे: वांइ तालुक्यांतील कळंबी गांवीं ता० ४ मीनहू (नवंबर) रोजीं सकाळचे नऊ वाजतां एक पक्के पांचशेर वजनाचा दगड आकाशांतून पडला. त्या प्रसंगीं एक मनुष्य शेतांत काम करीत होता त्यानें तो पाहिला. फर्स्ट असिस्टंट कलेक्टर मि० म्युअर ह्यांनीं ह्या गोष्टीचे संबंधानें सदरहू इसमाची जबानी घेऊन पुढें लिहिल्या प्रमाणें तिजवर शेरा लिहिला आहे:— “ही जबानी आमचे समक्ष झाली. जबानी देणारा मनुष्य हुषार असून भरंवसा ठेवण्या सारखा दिसतो. तो तरुण आहे. भाग कारकून व हा मनुष्य ज्या विलक्षण आवाजा विषयीं सांगत आहेत ते आवाज मी स्वत: ऐकिले. त्यावेळीं आमचा मुक्काम वडुत येथें होता. जेथें हा दगड पडला तेथून सदरहू गांव सुमारें साडेतीन कोस आहे. त्यादिवशीं मंगळवार असून नवंबरची ४ ता० होती. त्यावेळीं सुमारें सकाळचे आठ किंवा नऊ वाजले असावे. आकाश निरभ्र होतें. मी तंबूच्या बाहेर उभा होतों. ढग नसतां गडगडाटा सारखा आवाज ऐकिला तेव्हां मला मोठें आश्चर्य वाटलें. बंदूकीच्या आवाजा सारखा आवाज ऐकूं आला, परंतु साताऱ्या कडून सदरहू आवाज न आल्यामुळें हा आवाज कोठें होत आहे या विषयीं मी मोठ्या बुचकळ्यांत पडलों. हा दगड आवड धोबड आहे. हा गुळगुळीत असून ह्याचा रंग काळा करडा ह्मणजे काळसर आहे. आह्मी ह्याचे कांहीं कळपे काढिले. ज्या ठिकाणीं आह्मी हा फोडून पाहिला तेथला फुटलेला भाग ग्रनायट् दगडा सारखा दिसतो. परंतु फुटलेल्या भागा खेरीज

बाकीचा सर्व भाग प्राय: संगमरवरी दगडा सारखा दिसतो. ह्याच्या महत्वाच्या संबंधानें पाहिलें तर ह्याचें वजन असावें त्याहून जास्ती आहे. मुंबईतील कोणत्या तरी पदार्थसंग्रहालयांत हा दगड पाठवावा असें आह्मा स वाटतें.

"२रें कलम. सदरहू दगड आमचे ताब्यांत आहे आपण (रेव्हिन्यु कमिशनर) किंवा सरकार ह्यांची आज्ञा होईल तदनुरूप त्याची व्यवस्था करीन"

इतकी हकीकत वाचून झाल्यावर मंडळीनें रसायन शास्त्रोक्त पृथक्करण करणाऱ्या सरकारी कामगारांस सदरहू दगडाचा एक तुकडा घेऊन त्याचें पृथक्करण करण्याविषयीं सुचना केली. तेव्हां पृथकरण करण्याकरितां सदरहू दगडाचा तुकडा पाडण्या पूर्वी पारिसच्या लेपाच्या योगानें सदरहू दगडा चा एक नमुना तयार करून ठेवावा अशी डॉक्टर पिंकरटन ह्यानीं सूचना केली. ती मंडळीनें मान्य केली.

तारे, उल्का व पाषाण असे तीन प्रकारचे पदार्थ आकाशांतुन पृथ्वी वर पडत असतात. तारे, सुर्य, त्याचे भोंवतालीं फिरणारे ग्रह, धुम केतु व ग्रहां भोंती फिरणारे उपग्रह हे सर्व जडद्रव्य घटित आहेत. त्याप्रमाणें च हे तिन्ही प्रकारचे पदार्थ जडद्रव्य घटित आहेत. ह्या प्रत्येका विषयीं आतां अनुक्रमें विचार करूं.

रात्रीस घटका दोन घटका मोकळ्या जागेंत उभें राहिलें असतां निदान पांचचार तारे पडलेले आपल्या दृष्टीस पडल्या खेरीज राहत नाहींत. प्रत्यहीं दर तासास सुमारें ७ किंवा ८ तारे पडतात असें पुष्कळ दिवस सूक्ष्म रीतीनें ह्या चमत्काराचें अवलोकन करून ज्योतिषांनीं ठरविलें आहे. तसेंच सकाळीं सहा वाजण्याचे सुमारास नियमित वेळांत जितके तारे पडतात त्यांहून मध्यरात्रीचे सुमारास कमी पडतात. व संध्याकाळचे सहा वाजण्याचे सुमारास फारच कमी पडतात. तसेंच दर महिन्यांत सारखे पडत नाहींत. एकाद्यांत अधिक

पडतात. व एकाद्यांत कमी पडतात. विशेषें करून आगष्ट व नवंबर ह्या दोन महिन्यांत फारच पडतात. सन १८६६ चे नवंबर महिन्यांत तर ताऱ्यांचा पाऊसच पडला. ह्या प्रकारचा ताऱ्यांचा पाऊस प्रति तेहतीस वर्षांनीं एकदां पडतो असें ज्योतिष्यांचें मत आहे त्या वरून पाहतां पुढें इ० स० १९०० चे सुमारास पुनरपि तारका वृष्टी होण्याचा संभव दिसतो.

जडद्रव्याच्या ज्या पिंडांचे हे तारे बनून खालीं पडल्याचा भास होतो ते पिंड सूर्य मालेंतील आवकाशांत सर्वत्र सारख्या प्रमाणानें पसरलेले नाहींत, तर ह्या पिंडांचे थवेच्या थवे कित्येक ठिकाणीं असून ते ग्रहां प्रमाणेंच सूर्याभोंवतीं जुटीनें फिरत असतात. त्यामुळें पृथ्वी आपल्या कक्षेंत फिरत असतांना ह्या थव्यांपैकीं एकाद्या थव्या मधून जाऊं लागली ह्मणजे नेहमीं प्रमाणें थोडे तारे न पडतां त्यावेळीं ताऱ्यांचा मोठा पाऊस पडतो. ह्या थव्यां पैकीं एका थव्याचे कक्षेला भूकक्षा जेथें कापिते तेथें पृथ्वी ऑगष्ट महिन्यांत येते व दुसऱ्या थव्याचे कक्षेला जेथें कापिते तेथें ती नवंबर महिन्यांत येते. यामुळें ह्या छेद बिंदु जवळ थवा असतो तेव्हां मात्र तारकावृष्टी होण्याचा संभव असतो. नवंबरांतील वृष्टि ज्या थव्यापासून होते त्याला सूर्याभोंवतीं प्रदक्षणा करण्यास सुमारें सवा तेहतीस वर्षे लागतात. यामुळें एकदां ताऱ्यांचा पाऊस पडला ह्मणजे पुन: तेहतीस वर्षे पर्यन्त पडण्याचा संभव नसतो. सन १८६६ त नवंबर महिन्यांत वृष्टि झाली तेव्हां सर्व तारे सिंहराशींतील ग्यामा ताऱ्याच्या जवळच्या भागापासून पृथ्वीकडे येत आहेत असें दिसत होतें. ह्या थव्यांतील ताऱ्यांची कक्षा दीर्घवर्तुलाकार असून तिचा नीच बिंदु ( सूर्याच्या अति समीप असणारा बिंदु ) भूकक्षेवर आहे व उच्च ( सूर्या पासून अति दूरचा ) बिंदु प्रजापतीच्या कक्षेपलीकडे आहे, ह्या कक्षे

चा क्रांतिवृत्ताचे पातळीशीं १७ चा कोन पडतो. ह्या थव्यांतील ताऱ्यां ची गति वक्र ह्मणजे पूर्वेकडून पश्चिमेकडे आहे.

अगष्ट महिन्यांतील वृष्टीचे तारे ययाति नामक तारका पुंजांतील आल् गोल् नामक ताऱ्या जवळच्या भागा पासून येतात. ह्या दोहों खेरीज आणखी चौपन वृष्टितारकानिष्क्रमण स्थानें ठरलीं आहेत. ह्यां वरून एकंदर छपन थव्यांचा आजपर्यंत शोध लागला आहे असें होतें.

आतां पतन पावणारे तारे अति तेजस्वी कां दिसतात ह्याचा विचार करूं. पृथ्वी ह्या जडद्रव्याचे पिंडांच्या समुदा मधून जाऊं लागते तेव्हां तिचे आंगीं दरताशास हजार मैल (कारण २४ तासांत पृथ्वी च्या पंचवीस हजार मैल परिघाच्या विषुव वृत्ताचा तिच्या आंसा भोंवतीं एक फेरा पुरा होतो ह्मणून सरासरी तासास एक हजार मैल पडतात) चालण्याची गति असते व सदरहू पतन पावणाऱ्या ताऱ्याच्या आंगींही तितकीच गति असते. पुढें ही गति पृथ्वीचे आकर्षणाचे योगानें दरमिनि टास १२०० मैल इतक्या मर्यादे पर्यन्त वाढते. त्यामुळें पतन पावणारा तारा बनणारा जडद्रव्यकण सुमारामानानें दर सेकंडास २० मैल (कारण-- १ मिनिट = ६० सेकंड व १२०० ÷ ६० = २०) इतक्या मोठ्या वेगानें शिरतो तेव्हां त्याच्या गतीस वातावर्णाचा प्रतिबंध होऊं लागला ह्मणजे घर्षण उत्पन्न होऊन ह्याच्या योगानें तो कण तप्त होतो. पुढें तो अति उष्णतेच्या योगानें तेजस्वी होतो तेव्हां आपणास दिसूं लागतो. अखेरीस उष्णतेची परमावधी झाली ह्मणजे तो कण वितुळून त्याची वाफ होते तेव्हां आपणास तेजोमय धाकेची एक रेषा त्या ताऱ्याच्या मागें आहे असा भास होतो.

ज्या जडद्रव्यकणा पासून नवंबरांतील वृष्टीचे तारे बनतात, ते फार लहान असतात असें समजलें आहे. त्यां पैकीं कांहींचें वजन तर दोन ग्रेन ह्मणजे तीन गुंजा असतें. हे कण पृथ्वी पासुन ७४ मैल ह्मणजे ३७ कोस उंच वर असतात. तेव्हां जळूं लागतात व ५४ मैल ह्मणजे २७ कोस उंचीवर येत तों पर्यंत जळून खाक झाल्या-मुळें आपणास दिसेनासे होतात. प्रत्येक तारा दिसूं लागल्या पासून दिसेनासा होई पर्यंत सरासरीच्या मानानें पाहिलें तर सुमारें ८२ मैल मार्ग क्रमितो.

नवंबरांतील ताऱ्यां विषयीं वर जें लिहिलें आहे तें इतर महिन्यांतील ताऱ्यांस व विशेषतः आगष्ट व एप्रील ह्या महिन्यांतील ताऱ्यांस लागू आहे नवंबरांतील समूहा प्रमाणें हे दोन थवेही सूर्या भोंवतीं वक्र गतीनें फिरत असतात.

ज्या पासून हे तारे बनतात ते जडद्रव्यकण अति सूक्ष्म असल्या मुळें ते समग्र वितळून त्यांची वाफ झाली ह्मणजे फुटतात. त्या वेळीं आवाज मुळींच न होतां ते अदृश्य होतात. परतु कांहीं तारे चेंडू येवढे मोठे असून पिस्तवाच्या गोळयां सारखे दिसतात व ते फुटून नष्ट होते वेळीं मोठा आवाज होतो. अशा ताऱ्यांना अग्निकंदुक ह्मणजे उल्का असें ह्मणतात. ता० १५ नवंबर सन १८५९ इसवी रोजीं अशा प्रकारची एक उल्का न्युजरशी येथें दिसली. ती दिवसाढ-वळया ऊन पडलें असतांनाच दिसूं लागली आणि नंतर लागलीच हजारों तोफा सुटाव्या त्या प्रमाणें भयंकर गडगडाट होऊं लागला. काहीं उल्का इतक्या मोठ्या असतात कीं, त्या वितळून अगदीं नष्ट होऊन जाण्या पूर्वीच पृथ्वीवर येऊन पोंचतात. पृथ्वीवर येऊन पोंचल्या अशा प्रकारच्या उल्कांस "आकाशांतून पडलेला दगड" असें ह्मणतात. हे दगड पडतांनाही मोठमोठे आवाज होत असतात.

वरील कलमाच्या शेवटीं सांगितलेल्या दगडांत तीन प्रकार आढळून येतात. पहिला प्रकार "शुद्ध पाषाण" दुसरा लोहपिंड व तिसरा पाषाण व लोहपिंड यांचें मिश्रण ह्यानें घटित असतो. पतन पावणारे तारे जसे नियमित वेळीं पडतात तसे हे दगड पडत नाहींत त्या वरून हे पाषाण व साधारणतः नेहमी पडतांना दृष्टीस पडणारे तारे हे परस्परा पासून भिन्न असावे असें दिसतें.

आतां अर्वाचीनकाळीं झालेल्या कांहीं प्रसिद्ध पाषाण वृष्टयांची संक्षिप्त हकीकत सांगतों. ता० २६ एप्रील इ० स० १८०३ रोजीं दोनप्रहरीं दोन वाजतां फ्रान्स देशांतील नॉर्मंडी प्रांता पैकीं लैगल् गांवीं मोठा गडगडाट ऐकूं येऊं लागला. तो ऐकूं येऊं लागण्या पूर्वीं थोडीं मिनिटें असतांना एक मोठी तेजस्वी उल्का मोठ्या वेगानें हवेंत शिरत आहे असें दिसून आलें. ह्या प्रसंगीं दोन हजार दगड पडले. ते इतके तप्त होते कीं, त्यांना हात लाविला तर भाजत असे. ह्या प्रसंगीं एका मनुष्याला एका दगडाच्या योगानें बाहूवर जखम झाली. नऊ मैल ह्मणजे साडेचार कोस लांब व सहा मैल ह्मणजे तीन कोस रुंद एवढ्या क्षेत्रा-वर ही पाषाणवृष्टी झाली. ह्या क्षेत्राचे एका टोंकाजवळ सर्वांत अति मोठा पाषाण पडलेला आढळला. ता० २२ मे इ० स० १८१२ रोजीं व्हियेना व प्रेग ह्या शहरांच्या दरम्यान अशा प्रका-रचीच पाषाणवृष्टि झाली तेव्हां आठ मैल लांब व चार मैल रुंद एवढ्या क्षेत्रावर २०० दगड पडले, वरील वृष्टि प्रमाणें ह्या वृष्टीच्या वेळीं ही दीर्घ वर्तुळाकार क्षेत्राच्या उत्तरे कडील टोंका जवळ मोठाले दगड पडले ले आढळले. ता० १४ मे इ० स० १८६४ रोजीं सायंकाळीं फ्रान्साच्या दक्षिण भागांतील ओरग्वेल गांवीं पाषाण वृष्टि झाली. त्यावेळीं आठरा मैल लांब व पांच मैल रुंद येवढ्या क्षेत्रावर दगड पडले. ता० ९

जून इ० स० १८६६ रोजीं हंगारी प्रांतांतील कथा हिंजा गावीं एक तेजस्वी उल्का दिसूं लागली. त्यावेळीं सहा हंड्रेडवेट ह्मणजे पक्के ८$\frac{२}{५}$ मण (३३६ पक्के शेर) वजनाचा एक मोठा पाषाण व सुमारें एक हजार लहान दगड दहा मैल लांब व चार मैल रुंद एवढ्या क्षेत्रावर पडले. इतर वृष्ट्यांप्रमाणें हिचे प्रसंगींही मोठा दगड दीर्घ वर्तुळाकार क्षेत्राच्या एका टोंकास पडलेला आढळला. ह्या वृष्टीचे पाठोपाठ मोठा गडगडाट झाला आणि सुमारें अर्धा तासपर्यंत आकाशांत धुराचा लोळ दिसत होता १३ नवंबर इ० स० १८३५ रोजीं सायंकाळीं फ्रान्सांतील एक्स प्रांतांत एक तेजःपुंज उल्का दिसुं लागली. ती ईशान्य दिशेनें देशांतील मुलखावरून गेली व लॉझियरीज किल्या जवळ फुटली. तेव्हां तेथील धान्याची कोठी व पागा आंतील धान्य व घोडे यांसह थोडेशा मिनिटांत जळून खाक झाल्या. सदरहू ठिकाणीं एक दगड पडलेला मागाहून आढळला. पंजाबांतील जहलिंदु गांवीं इ०स०१६२०त एक लोहपिंड पडला. त्याची दिल्लीचा बादशाह जहांगीर (जगाद्विजयी) यानें आपल्या करितां तरवार करविली असें एके ठिकाणीं आढळलें आहे. ट्रॉय येथील प्यालास् उर्फ मिनर्व्हा" ह्मणजे सरस्वती देवी हिची मूर्ती, एकीसस् येथील कुमारीची मूर्ति, व रोमच्या न्यूमा राजाची ढाल दिव्य (आकाशांतून पडलेल्या) पाषाणांच्या बनविलेल्या होत्या असा प्राचिनांचा लेख पाहून अज्ञ लोक त्याचा उपहास करितात. तथापि अर्वाचीन कालीं झालेल्या वरील पाषाण वृष्ट्यां वरून सदरहू उपहास निराधार आहे असें सिद्धपदार्थशास्त्रज्ञांस कबूल करणें भाग पडतें. शुभ वर्तमान वाहक ह्मणजे ग्याब्रिअल् नामक देवदूतानें महंमदास एक दगड दिला तो मक्केतील देवालयांत आहे असें ह्मणतात. विजापूर शहरांतील गोल घुमट नामक सुंदर इमारतीचे दरवाजावर ह्याप्रकारचाच एक दगड टांगलेला आहे.

पुढील यादींत प्राचीन काळापासून तों अर्वाचीन काळापर्यंत झालेले

ह्या प्रकारचे मुख्यमुख्य उत्पात दाखल केले आहेत:—

| अंक. | पदार्थ. | काल. | स्थल. |
|---|---|---|---|
| १ | पाषाणवृष्टी | इ० स० पूर्वी सुमारें ६५० | रोम. |
| २ | एक मोठा पाषाण | इ० स० पूर्वी ४६५ | नेगोस् नदी. ( थेस् प्रांतांतील ) |
| ३ | तीन मोठे दगड | इ० स० पूर्वी ४५२ | थेस् प्रांत |
| ४ | पाषाणवृष्टि | इ० स० पूर्वी ३४३ | रोम |
| ५ | लोहवृष्टि | इ० स० पूर्वी ५४ | ल्युकेनिया |
| ६ | पारदवृष्टि ह्मणजे पाऱ्याचा पाऊस | अज्ञात | इटाली |
| ७ | चवदा किंटल ह्मणजे पक्के साडेसतरामण वजनाचा एक लोहपिंड. | अज्ञात | अबाकौक्, प्रांत सिबिरिया |
| ८ | पक्के सवातीन मण वजनाचा एक मोठा दगड | ता० ७ नवंबर स० १४९२ | ऱ्हैन नदीच्या वरील प्रदेशांत, एन्सिशेम्. |
| ९ | पक्क्या अच्छेरापासून पक्का दीड मण पर्यंत वजनाचे सुमारें १२०० दगड व एक पाऊण मण वजनाचा | इ० स० १५१० | प्याडुआ, इटाली |

| अंक | पदार्थ | काल | स्थल. |
|---|---|---|---|
| १०. | पक्के साडेएकूणतीस शेर वजनाचा एक दगड. | ता० २७ नवंबर सन १६२७ | व्हैन नदीच्या वरील प्रदेशांत एन् सिशेम् |
| ११ | गंधकवृष्टि | इ० स० १६४६ | कोपेन हेगेन |
| १२ | गंधकवृष्टि | इ० स० १६५८ | डची आफ् मान्स्फील्ड |
| १३ | अज्ञात पदार्थाची वृष्टि | इ० स० १६९५ | ऐर्लंड |
| १४ | पक्के ३६ शेर वजनाचा एक दगड | जानेवारी २० स० १७०६ | ल्यारिसा, म्यासिडोनिआ. |
| १५ | अग्नि वृष्टि | ता० ४ जानेवारी इ० स० १७१७ | केन्वाय. |
| १६ | सिकता वृष्टि ह्मणजे वाळवेचा पाऊस पंधरा तास पर्यंत | ता० ६ एप्रिल इ० स० १७१९. | अट्लांटिक महासागरांत |
| १७ | गंधक वृष्टि | आक्टोबर इ० स० १७२१ | ब्रन्स्विक |
| १८ | पाषाण पिंड | इ०स०१७५० | निओर्ट, नारमंडी. |
| १९. | पाषाण वृष्टी | ता०३ जुलै इ० स० १७५३ | प्लान बोहेमिया |
| २० | पक्का धडा भर वजनाचे दोन दगड | सप्टेंबर इ० स० १७५३ | लिपोनास, ब्रेस्ट मधील |
| २१ | पक्के शंभरव दीडशें शेर. वजनाचे दोन दगड | इ०स०१७६२ | व्हेरोना जवळ |
| २२ | पक्के पावणेचार शेर वजनाचा एक दगड | ता०१३ सप्टेंबर स०१७६८ | ल्यूसी, लीमेन |
| २३ | एक दगड | इ०स०१७६८ | एअर, आर्टाइस |

| अंक | पदार्थ | काल | स्थल. |
| --- | --- | --- | --- |
| २४ | एक दगड | इ० स० १७६८ | ली कोटेंटीन |
| २५ | पाषाण वृष्टी | जुलै इ० स० १७८९ | बाबैंटन, रोकी कोर्ट नजीक |
| २६ | विस्तृत पाषाण वृष्टी | ता० १४जुलै इ० स० १७९० | एजन नजीक |
| २७ | सुमारें १२ दगड | ता० १६जुलै इ० स० १७९४ | सी एना, टस्कनी |
| २८ | पक्के २८ शेर वजनाचा एक दगड | ता० १३ डिसेंबर सन १७९५ | वोल्ड झोंपडी, यॉर्कशायर |
| २९ | पक्की पांसरी वजनाचा एक दगड | ता० १९ फेब्रुवारी सन १७९६ | पोर्तुगाल देशांत |
| ३० | पक्का धडा वजनाचा एक दगड | ता० १२ मार्च सन १७९८ | सुरीज जिल्हे फ्रानशे नजीक |
| ३१ | सुमारें पक्का एक धडा वजनाचा दगड | ता० १७ मार्च सन १७९८ | साले, न्होन प्रांत |
| ३२ | पाषाणवृष्टि | ता० १९ डिसेंबर सन १७९८ | बनारस ऊर्फ श्रीक्षेत्र काशी. |
| ३३ | सत्तर घनफूट लोह पिंड. | ता० ५ एप्रिल सन १८०० | अमेरिका. |
| ३४ | पक्के पांच पासून साडेआठ शेर वजनाचे अनेक दगड, | ता० २६ एप्रिल सन १८०३ | लैगल नजीक नॉर्मंडी |
| ३५ | पाषाणवृष्टि | ता० १४ डिसेंबर सन १८०७ | वेस्टन, कनेक्टिकट, युनैटेड स्टेटस. |
| ३६ | पक्की एक खंडी २६॥ शेर वजनाचा एक दगड | सन १८१० | सान्ता रोसा, न्यू ग्रेनडा |

| अंक | पदार्थ | काल | स्थल |
|---|---|---|---|
| ३७ | पक्के अडीच मण दीडशेर वजनाचा एक दगड. | ता० १५ जून सन १८२१ | जुनीनास, आर्देशी. |
| ३८ | एक मोठा दगड. | ता० १६ संतबर सन १८४३ | क्लिनवेन्डेन, युरिंग्पारिया |
| ३९ | पाषाणवृष्टि. | ता० १५ मे. | फ्रान्स. |

अर्वाचीन रसायनशास्त्रज्ञांनीं आकाशांतून पडलेल्या दगडांचें व लोह-पिंडांचें पृथक्करण करून त्यांत भुपृष्ठस्थ ६५ तत्वांपैकीं पुढें लिहिलेलीं तत्वें आढळतात असें ठरविलें आहे:—

धातुकल्प.

| | | |
|---|---|---|
| १ प्राणवायु | २ गंधक | ३ प्रकाशद. |
| ४ अंगार | ५ गारेचा दगड | |

धातु.

| | |
|---|---|
| १ लोखंड. | २ निकेल. |
| ३ क्रोमियम्. | ४ कथील. |
| ५ म्याग्नेशियम्, | ६ आल्युमिनियम्. |
| ७ चूर्णद. | ८ रक्षाबीज. |
| ९ लवणद. | १० कोबाल्ट. |
| ११ मांगानीज. | १२ तांबें. |
| १३ टिटेनियम्. | १४ शिसें. |
| १५ लिथिचम्. | १६ स्ट्रांटियम्. |

आकाशांतून पडलेल्या लोहपिंडांत शेंकडा ९५ भाग लोखंड असतें. खेरीज निकेल धातु व कधींमधीं कोबाल्ट, तांबें, कथील, व क्रोमियम धातुही त्यांत आढळतात.

वरील शोध हे मानवी ज्ञानाच्या परिपक्व दशेचे दर्शक होत. ईश्वरानें जगामध्यें जे जे नानाविध चमत्कार करून ठेविले आहेत त्यांचा शोध लावण्यास मनुष्याचें ज्ञान विस्तृत पाहिजे. मनुष्यजातीला परमेश्वरानें ज्ञान दिलें आहे हें खरें, परंतु त्या ज्ञानाचा त्यास उपयोग करतां आला पाहिजे. ज्या देशांत विद्वान लोक असून खेरीज सर्व लोकांस विद्येची अभिरुची असते, पदार्थमात्राचे स्थितीचा विचार करण्याची ज्या लोकांस आवड असते, कोणत्याही वस्तूच्या उत्पत्यादिकाचें कारण जाणण्याची ज्यांस जिज्ञासा असते, व अशाप्रकारचे शोध लावणारांचा ज्या देशांत बहुमान केला जातो त्या देशांतील लोकांचे ज्ञानाची वृद्धि होऊन तें परिपक्व दशेस येते. आपल्या या भरतखंडांतहि पूर्वी अशाच प्रकारचे शोधक लोक होते, पण जेव्हां मत्सर आणि आलस्य यांचें बिजारोपण झालें, राजे लोक मूर्ख व चैनी निघाले, विद्वान लोकांचा कोणी पोशिंदा राहिला नाहीं, व वरील शोधक लोकांची निर्भत्सना होऊं लागली, तेव्हां लोकांचें ज्ञान नष्ट होऊन पदार्थमात्रां विषयीं त्यांच्या भलभलत्याच समजुती झाल्या. एखादा अद्भुत चमत्कार दृष्टीस पडला, म्हणजे तो कशाचे योगानें झाला हें कळण्याची जिज्ञासा सर्वांना होते. त्यांत जे विद्यासंपन्न असतात ते त्याच्या कारणाचा शोध लावण्याचे यत्नास प्रवर्ततात. पण जे मूर्ख आणि आळशी असतात ते आपल्या विचार शक्तीस तसदी न देतां घर बसल्याच त्याविषयीं कांहीं तरी तर्काचें जाळें बनवितात. हे तर्क पदार्थां विषयीं तर अनेक तऱ्हेनें माजले आहेतच, परंतु परमेश्वरा विषयींहि आळशी लोकांनीं नाना तऱ्हेचे तर्क करून आपल्या तर्क जाळांत लोकांस थक्क करून टाकले आहेत. अलीकडे विद्या, तर्क, व ज्ञान यांस पुनः पालवी फुटून जुन्या ग्रंथांचे आश्रयानें किंवा तर्क बलानें किल्येक अद्भुत चमत्कारां बद्दल जे शोध लागत आहेत त्यांपैकींच वरील शोध होय.

या सर्व गोष्टी ठीक आहेत. पण या सर्वांमध्यें महत्वाचा शोध कोणता बरें? पदार्थ मात्र, त्यांची अद्भुत शक्ति, व त्यांची योजना करण्याविषयीं समर्थ अशी मनुष्य जाती, हीं जाणें उत्पन्न केलीं, त्याचा शोध करणें अती अवश्य आहे? असा उत्पादक किती शक्तीमान असावा बरें? त्याची कल्पना, त्याचें सामर्थ्य, त्याची युक्ती, त्याची धूर्तता आणि त्याची योजना किती बरें अघड असावी? सर्व प्राण्यांमध्यें मनुष्य श्रेष्ठ हा सिद्धांत आहे. पण त्या मनुष्यास अनेक वर्षे परिश्रम केले तथापि पदार्थांचे गुण दोष आणि शक्ति हीं कळण्याची मारामार पडते, मग त्यांचे अंगीं तशी शक्ति उत्पन्न करणें किती दुर्घट आहे बरें? आणि खरोखर हें काम मनुष्याच्या शक्तीचे पलीकडे आहे. हें काम करण्याची शक्ति एका परमेश्वरावांचून दुसऱ्यास नाहीं. ह्मणून या पदार्थ मात्रांच्या विलक्षण रचनेचे योगानें आणि अगम्य अशा शक्तीचे अनुभवानें ते पदार्थ उत्पन्न करणारा जो परमेश्वर त्यास अंत:करणांत आठवून आणि त्याचा यथाशक्ती शोध करून अनन्य भावानें त्यास शरण जाणें हें मनुष्याचें कर्तव्य होय. वरील उत्पात हे किती भयंकर आहेत. मनुष्य आपल्या ज्ञानशक्तीनें त्या उत्पातांच्या घटित द्रव्यादिकां विषयीं शोध लावूं शकेल, त्या द्रव्यांचे संयोगानें आणि वियोगानें कसे चमत्कार होतात हें सांगूं व दाखवूं शकेल, त्यांची स्थिती स्थापकता, त्यांची शक्ती त्यांचे तेज व त्यांचे गमनागमनाचा मार्ग इत्यादिका विषयीं शोध करून त्याचा सिद्धांतही ठरवूं शकेल, पण हे गुण त्यांचे आंगीं कां उत्पन्न झाले हें मनुष्य सांगूं शकणार नाहीं. फार दूर नको. वरील सर्व गोष्टींचा शोध मनुष्यास कसा लागतो ह्मणून कोणी प्रश्न केल्यास, मनुष्यास ज्ञान आहे त्याचे योगानें त्यास हें सर्व समजतें असें कोणीहि ह्मणेल. परंतु मनुष्यास ज्ञान कां आहे आणि पशुपक्षादिकांस मनुष्या सारखें ज्ञान कां नाहीं याचें उत्तर देतां येईल काय? परमेश्वरानें मनुष्यास ज्ञान दिलें आहे ह्मणून तें त्यास आहे व, पश्वादिकांस दिलें नाहीं ह्मणून नाहीं,

इतकें ह्मणून स्वस्थ बसणें भ्रम आहे. इश्वराचे कृतीची मनुष्य बरोबरी करूं शकणार नाहीं. तसेंच ज्या गोष्टी इश्वरेच्छेनेंच घडणाऱ्या असतात त्यांचा प्रतिकार करण्यास मनुष्य समर्थ नाहीं. आपल्यांत एक साधारण समजूत अशी आहे कीं, मनुष्यानें पाहिजे त्याचें नुकसान करण्याचें मनांत आणलें तथापि तो करूं शकतो, पण एकाद्याचें हित करण्याचें मात्र कठीण असतें. आतां ही समजूत व्यवहार दृष्ट्या खरी वाटते. ह्मणजे मनुष्य अनेक तऱ्हेच्या लबाड्या करून एखाद्याचें अहित करतो किंवा हित होण्या जोगें असेल त्यांत आडकाठी आणतो, पण हें कृत्य मनुष्य कृतीच्या संबंधांत लागू होईल. वर सांगितलेले उत्पात करण्यास मनुष्य समर्थ आहे काय? किंवा ते उत्पात न घेऊं देण्या विषयीं तरी मनुष्याचे आंगांत सामर्थ्य आहे काय? मनुष्य कृतीचे अपकार असतात त्यांचा प्रतिकार होण्या जोगा असतो. एकादे मनुष्यानें कोणास मारण्याचा बेत केला तर त्या मनुष्याचे संरक्षणार्थ अनेक तजविजी करतां येतील, एकाद्यानें एखादे ग्रहास अग्नी लावावयाचें मनांत आणलें तर तशा विघ्नसंतोषी मनुष्यास राजा कडून प्रतिबंधांत ठेवण्याची तजवीज करतां येईल. पण ईश्वराचा क्षोभ होऊन त्याणें मनुष्यांचा संहार करण्याचें मनांत आणलें ह्मणजे तेथें कोणाचा इलाज चालत नाहीं. तसेंच अशीं अपरिहार्य संकटें आणण्यास मनुष्य समर्थाहि नाहीं. मच्छलीपट्टण येथें समुद्राचें पाणी वाढून जो अनर्थ झाला तो सर्वांस माहीत आहेच. त्या जळ प्रळयाचे योगानें हजारों मनुष्याचे प्राण सागराला अर्पण झाले. असा प्रळय करण्याचें मनुष्यानें मनांत आणलें ह्मणून तो तें करूं शकेल काय? किंवा तो न व्हावा ह्मणून त्याणें अनेक प्रयत्न जरी केले तथापि तेहि सर्व व्यर्थ जातील. याचें कारण हे अपघात मनुष्याच्या शक्तीच्या व कल्पनेच्या पलीकडील होत येथें मनुष्याची जर कांहीं अक्कलच चालत नाहीं, तर मग त्यास उत्तेजित करण्यास किंवा त्याचा प्रतीकार कर

ज्यास मनुष्या सारखा कुठ प्राणी किसीवरें समर्थ होणार आहे? सूर्य चंद्रादि अनेक गोल आकाशांत भ्रमण करीत आहेत, त्या परस्परांची आकर्षणशक्ति त्या त्या गोलांचें तेज, त्यांतील हवापाणी उद्भिजें, आणि जाग विषयीं पदार्थमात्राचे ठिकाणी पाचक शक्ति हीं ज्याणें उत्पन्न केली त्याची शक्ति किती दुर्घट असाव बरें? त्याच्यासारखा केवळ तोच होय. त्यास उपमा देण्या सारखा पदार्थ या जगांत नाहीं. जो इच्छा मात्रें करून सर्व जग उत्पन्न करितो, इच्छेस येई पर्यन्त तें सुयंत्र चालवितो, व इच्छामात्रें करून या जगाचा किंचित् किंवा सर्वांशीं नाश करितो. तेव्हां असा जो परमेश्वर त्याची अद्भुत शक्ति वरील उत्पातादिकांचे योगानें जाणून त्या उत्पातादिकांचे योगानें मनुष्याची हानी न होतां तो त्याचें संरक्षण करितो, व त्या उत्पातांचीं कारणें आणि त्यांचा कर्ता यां विषयीं विचार करण्यास परमेश्वरानें मनुष्यांस ज्ञान दिलें आहे तेव्हां त्या ज्ञानाचे योगानें तो परमेश्वरास जाणतो. तेव्हां या जाणीवपणाचें सार्थक व्हावें म्हणून मनुष्यानें कृतज्ञतापूर्वक ईश्वराचें स्तोत्र करून त्यास अनन्यभावानें शरण जावें हें मनुष्याचें मुख्य कर्तव्य होय.

# काबूलची लढाई.

या लढाईची ज्याला माहिती नाहीं असा इंग्रजी राज्यांत बहुधा एकहि मनुष्य आढळणार नाहीं अलीकडे लोक चौकस, व माहितगार व विद्यासंपन्न होत चालल्यामुळें साधारण खेड्यांतील एखादे लंगोट्यासहि अनेक तऱ्हेचे गोष्टींत आपण माहितगार असावें असें वाटतें, आणि यामुळें तो साधारण गोष्टी पासून तों मोठ्या राजकारणा पर्यंतहि चौकशी करीत असतो. आतां अशा प्रकारची माहिती साधारण सर्वांस होणें हें जरा अवघड खरें पण आमच्या राजकर्त्यांच्या देशी पद्धतीस अनुसरूनच या देशांतहि वर्तमानपत्रांचा जो प्रघात पडला आहे, त्यामुळें अशा तऱ्हेच्या माहितीची लोकांस स्वाभाविक माहिती होते. या देशांत वर्तमानपत्रें नसतीं तर प्रस्तुतची काबूलची लढाई ती उपस्थित होण्याचीं कारणें, आणि ती चालू असतां मध्यंतरीं घडणाऱ्या महत्वाच्या गोष्टी याविषयीं लोकांस माहिती, या विषयीं बहुत लोकांस माहिती होण्याचा विशेष संभव नवता. असो.

ही लढाई उपस्थित होण्याचें कारण प्रथमतः आपल्या सरकारा कडूनच उपस्थित झालें हें प्रसिद्ध आहे. ह्मणजे आपल्या सरकारचा वकील काबुलांत असावा ह्मणून सरकारचें जें ह्मणणें होतें ते अमीरानें नाकबूल केलें, इतकेंच नव्हे तर आपले सरकारची प्रतिस्पर्धी जी रशिया तिच्या वकीलास अमीरानें आश्रय दिला. यावरून आपले सरकारास राग येणें स्वाभाविक आहे. आता कित्येकांचें असें ह्मणणें आहेकी, अमिरानें पाहिजे त्याच्या वकीलास आपले राज्यांत येऊं देणें आणि मर्जीस येईल त्यास मनाई करणें ही गोष्ट अमीराचे स्वाधीनचीं होती. ह्मणजे तो आपले राज्याचा मालक असल्यामुळें त्याजवर कोणाहि राजाची सत्ता चालणें रास्त नाहीं. तेव्हां या न्यायानें पाहिलें असतां इंग्रज सर

कारनें अमिराचे राज्यांत आपला वकील ठेवण्याविषयीं जो आग्रह धरिला तो न्यायास अनुसरून नव्हता, यामुळें या कारणानेंच जी लढाई जुंफली तीहि धर्म युद्धांत गणतां येत नाहीं. आतां एका अर्थी पाहिलें असतां हें ह्मणणें युक्ती सिद्ध व न्यायास अनुसरून दिसतें. पण नुसता व्यवहार संबंध आणि राज कारण यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. अमीराचें राज्य आपले सरकारचे हद्दीशीं जोडून आहे ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. आतां रशिया जर आपले सरकाराशीं शत्रुत्वानें वागते, आणि नुसती शत्रुत्वानें वागते इतकेंच नव्हे तर हिंदुस्थान देशाची सत्ता आपले हातांत यावी असा जर रशियेचा उघड मनोदय दिसतो तर रशियाचा संबंध, हिंदुस्थानाशीं लागून असणारें जें काबुलचें राज्य त्याच्याशीं होऊं न देणें हें आपल्या सरकारचें कर्तव्य होय. ह्मणजे रशियेचा आणि काबूलचे अमिराचा स्नेहसंबंध आपले राज्यास अपाय कारक होईल अशी भीति बाळगण्यास सरकारास सबळ कारणें असल्यामुळें. तसें न करण्या विषयीं सरकारनें अमीरास सूचना करणें आणि ती सूचना अमीरानें अमान्य करण्यास त्यास तसें करण्याविषयीं भाग पडणें हा राजकीय न्यायच आहे असें कोणीहि कबूल करील व शेवटीं तसाच परिणाम झाला हें अनुभव सिद्ध आहे. आतां अमीर आपले राज्यांत पाहिजे त्यास येऊं देण्यास व पाहिजे त्यास मनाई करण्यास मुखत्यार होता हें खरें, परंतु तो आपले मुखत्यारीनें आपले सरकारचे राज्यास धोका येण्या सारखें जर वर्तन करील तर त्याची मुखत्यारी दूर करण्याच्या यत्नास लागणें इंग्रजसरकारास भाग पडलें यांत कांहीं अन्याय नाहीं. कारण "बळी तो कान पिळी" हा न्याय राजसत्तें पूर्वापार दृष्टीस पडतो. राज्यक्रांतीच्या उलाढाली या वेदांत सूत्रांवर अवलंबून नसतात हें सर्वांस माहित आहे. असो.

वरील हकीकत सांगून गत गोष्टींची पुनरुक्ति करण्याचें कारण इतकेंच कीं, वरील लढाई आमचे सरकारनें उपस्थित केली ह्मणून

सरकारास कित्येक दोष देतात तो यथार्थ नाहीं हें या हकीकतीवरून वाचकांचे लक्षांत येईल. तेव्हां सरकारनें आरंभीं अमीराशीं जें लढा ईचें तोंड दिलें तें यथायोग्य असून त्याप्रमाणें सरकारनें अमीराची चांगली खोडहि जिरवली होती हें उघड आहे. परंतु सरकारनें पराजित जे काबुली लोक त्यांजवर वाजवी पेक्षां फाजील विश्वास ठेऊन आपले वकीलाचे जीवास धोका करून घेतला यामुळें हल्लींचे लढाईचा प्रसंग आला आहे. हल्लींचे लढाईस मात्र सरकाची अपोक्त वर्तणूक कारण आहे असें आह्मी निखालस ह्मणतों. पराजित आणि विजयी लोकांमधील अंतर लक्षांत ठेवण्याजोगें असतें. सर्वच देशांत हिंदुस्थानांतील रयतेसारखे गरीब लोक असतात असा अर्थ नाहीं. यामुळें एक कायदा सगळेकडे सारखा लागू करतां येणार नाहीं. काबूलचे लोक जातीनें व धर्मानें मुसलमान असून खेरीज शरीरानें सदृढ व मनाचे खुनशी असल्यामुळें त्यांस पराजयाचा सूड उगाविण्याची अति उत्कंठा असणें साहजीक आहे. आणि त्याप्रमाणेंच त्यांणीं सवड सांपडली तेव्हां कांहीं कसर केली नाहीं. आतां आमच्या सरकारच्या सदीच्या जोरापुढें व पराक्रमापुढें वरील अशिक्षित काबुली लोकांची धामधूमफार दिवस टिकणार नाहीं हें उघड आहे. तरी पण सरकारास आणीं बरेंच जेरीस आणलें आहे. हल्लींच्या काबुलच्या लढाईंत काबुली लोकांचे संबंधानें मात्र विचारकरण्यासारखी एक गोष्ट आहे, ती ही कीं, काबूलचा अमीर हा आपण होऊन आपले सरकारचे ताबेंत झाला असतां तेथील रयतच जोर धरून सामना देत आहे. आतां हे लोक उघड सामन्याला उभे राहते तर आपल्या सरकारच्या शूर व विजयी सरदारांनीं त्यांचा फडशा उडवून टाकला असता परंतु ते लोक छापे घालीत असल्यामुळें आपल्या सैन्याची अक्कल चालत नाहीं. आतां या लढाईचे संबंधानें ज्या तारायंत्रद्वारा बातम्या येतात त्याजवरून प्रस्तुत लढाई संपल्या सारखी असून आमचे सरकारचें सैन्य विजयी झालें असा मजकूर असतो

खरा, तथापि गेलेल्या सैन्यांतून अजून कोणी परत येत नसून आणखी सैन्याची भरती करून तिकडे पाठविण्याची जरूर पडते यावरून लढाईचा परिणाम आपले सरकारास व्हावा तसा अद्याप हितावह झाला नाहीं असें दिसतें. आतां या लढाईचे संबंधानें आपले सरकारास बऱ्याच गोष्टी प्रतिकूळही आहेत. एक तर तिकडील मुलखाची आपले गेलेले सैन्यास माहिती नाहीं, खेरीज तिकडील हवापाणी या लोकांस चांगलें मानवत नाहीं, आणि काबूली लोक समरांगणामध्यें उघड रीतीनें सामन्यास न येतां आडून छापे घालून व आपलें सैन्य बेसावध असतां त्याजवर हल्ला करून त्यांचा नाश करितात, यामुळें लढाईचें काम इतके दिवस लांबलें. काबूलप्रांत पूर्णपणें ताब्यांत येऊन तेथें आपले सरकारचा पक्का अंमल बसल्यावांचून व तेथील लोकांस जेरीस आणून सर्वत्र शांतता झाल्यावांचून लढाई बंद होत नाहीं हें उघड आहे आणि लढाई अगदीं बंद झाल्या वांचून आपले सैन्याचा मोर्चाहि फिरलेला दिसत नाहीं काबूलचा अमीर आपले सरकारचे ताब्यांत येऊन खिचडी खात बसल्यामुळें काबुलांत सध्या श्रियाळ शेटी राज्य सुरू आहे. एखादा सरदार हजार पांचशें लोक आपल्याजवळ जमवून, एखादे प्रांताचा आपल्यास सत्ताधीश ह्मणवतो व कांहीं दिवस इकडे तिकडे धामधूम करीत आहे इतक्यांत सरकारचे फौजेचा मार त्याजवर पोंचला ह्मणजे त्याची कारकीर्द संपते. आतां अशी धादलीची कारकार्द देशाचे छिन्न स्थितीस कारण आहे. सत्तावन सालचे बंडाची सर्वांस माहिती आहेच. ते वेळीं जसे सर्वच सरदार आणि सर्वच मानकरी झाल्यामुळें हुकूम कोणाचा नाहींसा झाला व कोणाचा पायपोस कोणाचे पायांत नाहीं अशी बेबंदशाही होऊन सगळी नेवा झाली, तसाच प्रकार प्रस्तुत काबुलांत आहे, ह्मणजे काबुलांतील प्रत्येक गांवांतले लोक हे स्वतंत्र पेंढखोर आहेत. तेव्हां अशा गावकुटाळ पेंढखोरांनीं राज्यस्थापनेचा यत्न केल्यास तो कितपत सिद्धीस जाईल याचें अनुमान करणें फारसें कठीण नाहीं. दरोडेखोरांनीं गांव वसविलें जात नाहींत अशी आपल्यांत ह्मण आहे,

त्याच प्रमाणें वरच्या सारख्या गांवगुंडाळ बंडखोरांनी राज्य संपादन केलें जात नाहीं. तसेंच काबुलांतील लोकस्थितीची आणखी एक मोठी उणीव आहे, ती ही कीं, त्या प्रांतांत हल्लीं राजा नसल्यामुळें सर्वत्र बजबजपुरी झाली आहे. ज्याचे अंगीं थोडी अक्कल किंवा हुशारी असेल तो आपल्यास सरदार ह्मणवून कांहीं लोकांची टोळी जमा करतो, व सरकारास त्रास देण्यास तयार होतो. काबूलचा अमीर हा एकदम आपले सरकारचे ताबेंत आला, तेव्हां हें चिन्ह नीट दिसलें खरें, पण आमच्या मतें अमीर जर कांहीं दिवस रयतेचा पक्ष धरून आपले सरकाराशीं लढला असता व शेवटीं तहावर येऊन आपले सरकारचे ताबेंत झाला असता तर हल्लीं काबुलांत जी बंडाळी माजली आहे ती सुरू झाली नसती. पण सरकारचे वकिलाचा खून झाला तेच वेळीं अमीरानें हातपाय गाळून आपले रयतेशींच त्याणें विघाड करून घेतला त्या योगानें स्वतः रयतेनेंच आमचे सरकाराशीं लढण्याची कंबर बांधली. आतां अमीराचे मनांत इंग्रज सरकारशीं जो संबंध झाला होता तो कायम राखून तंटा करण्याची त्याची इच्छा नव्हती, तर त्याणें तो आपला बेत मनांत ठेऊन आपले रयतेस नाखुष करावयाची नव्हती. आतां अमीराचा रयतेशीं विघाड झाल्यामुळें स्वतः तो तर राज्य भ्रष्ट होऊन काबूल सोडून त्यास हिंदुस्थानांत यावें लागलेंच पण त्याच्या अविचाराचें व उतावळेपणाचें फळ आमच्या सरकारास प्रस्तुत भोगावें लागत आहे. ह्मणजे काबुलांतील रयत जी एकदां बिथरली गेली ती अद्यापि त्याच स्थितींत असल्यामुळें तिचें प्रायश्चित करण्यास सरकारचें पुष्कळ माणूस खर्ची पडलें व पडत आहे, आणि पुढें किती पडतील याचें निश्चयानें अनुमान करवत नाहीं.

आतां ही लढाई किती दिवस जरी लांबली तथापि अखेरीस आमचीं सैन्यें विजयी होतील हें निःसंशय आहे, लढाईमध्यें अमुकांचा जय होईल आणि अमुक पराजित होतील असें जें अनुमान

करावें त्याच्या विरुद्ध, केव्हां केव्हां परिणाम होतो असा अनुभव येतो खरा, तथापि वरील कामीं केलेलें अनुमान खोटें होण्यास कारण नाहीं अशीं जेव्हां उभय सैन्यें सारखे योग्यतेचीं असतात तेव्हां अनुमान विरुद्ध जयापराजयाचे परिणाम फारच वाईट घडतात, परंतु प्रस्तुत लढाईंत आमचे इंग्रज सरकारचा पक्ष खरोखरच सरशीचा आहे हें आजपर्यंन्त जे हल्ले झाले त्यांजवरून आपल्यास माहीत झालें आहे. आणि शत्रूकडचे लोकांची स्थिती पाहिली तर ते अडून गोळी मारणारे, चोरून छापा घालणारे, आणि पळपुटे आहेत. त्यांची उघड सामना करण्याची ताकद नाहीं. तेव्हां अशा चोरट्या माऱ्याचा निभाव कोठपर्यंत लागणार? सध्या इतकें मात्र खरें, कीं आमचे सरकारास फार त्रास सोसावा लागत आहे. आतां या हकीकतीवरून आमचे सरकारास जयप्राप्ती होण्याविषयीं आह्मी जें अनुमान केलें तें यथार्थ असून सर्व लोकहि असेंच ह्मणतात. पण आमचें सरकार विजयी झाल्यानंतर मात्र त्यांणीं काबुलांत कोणत्या तऱ्हेनें वागलें पाहिजे या संबंधें चार शब्द लिहिल्यास ते प्रासंगिक होतील असें वाटतें.

काबुलचे लोक जेव्हां अगदीं जेरीस येतील तेव्हांच ते आपला हेका सोडून आमचे सरकारचे ह्मणण्या प्रमाणें वागण्यास कबूल होतील. पण ते जरी आपला दुरभिमान सोडून सरकारचे अंकीत झाले तथापि ते विश्वासास पात्र होणार नाहींत. हिंदुस्थानची राज्यसत्ता इंग्रजांचे हातांत जातांच जसे सर्व लोक सरकार ह्मणेल त्या प्रमाणें वागण्यास कबूल झाले व त्यांणीं दंगा धोपा न करतां सरकारचा अंमल सुरळीतपणें चालावा ह्मणून ते सरकारास उलट मदत करूं लागले तसा प्रकार काबुलांत अनुभवास येण्याची आशा नाहीं. आतां हिंदुस्थानचे लोकांचे राजभक्तपणास व गरीब स्वभावास दूषण देण्या करितां कित्येक अल्पविचारी लोक सत्तावन सालचें बंड पुढें आणतात.

| | | | |
|---|---|---|---|
| रा० रा० हणमंत सुबराव जतकर वाशीम .... .... | १ | ६ |
| रा० रा० खंडेराव वासुदेव रास्ते जमखिंडी .... .... | १ | ६ |
| रा० रा० मोरेश्वर गोविंद मोघे भावनगर ..... .... | १ | ६ |
| रा० रा० रूपगीर नारायणगीर अमळेनर ..... ..... .... | १ | ६ |
| रा० रा० गोकूळदास खेमजी शेट अलीबाग ..... ..... .... ... | १ | ० |
| रा० रा० कानजी कमळाकर भट अलीबाग .... .... .... | १ | ० |
| रा० रा० आणाजी वैजनाथ भातखंडे बेळगांव .... .... .... | १ | ६ |
| रा० रा० गुंडोश्रीनिवास मिरज .... .... .... .... | १ | ६ |

( रामचंद्र नारायण फडणीस यांचे मार्फत)

| | | | |
|---|---|---|---|
| रा० रा० गोपाळ गणेश ढापरे इंदूर .... .... .... .... | १ | ६ |
| रा० रा० विष्णुपंत हुंटे इंदूर .... .... .... .... .... | १ | ६ |

(गोपाळ जयराम कारकून यांचे मार्फत)

| | | | |
|---|---|---|---|
| रा० रा० विनायक बाळकृष्ण तलाठी वेळासें .... .... | १ | ६ |
| रा० रा० रामचंद्र बल्लाळ बापट वेळासें .... .... | १ | ६ |
| रा० रा० विष्णु बावाजी वेळासें .... .... .... .... | १ | ६ |
| रा० रा० रामचंद्र अनंत वेळासें .... .... .... | १ | ६ |
| रा० रा० शिवराम गणेश बाळ वेळासें .... .... .... .... | १ | ६ |
| रा० रा० कृष्णराव वामन तलाठी वेळासें .... .... .... | १ | ६ |
| रा० रा० गणेश विनायक वेळासें .... .... .... .... | १ | ६ |

( राहिलेला वसूल पुढील सालच्या अंकांत येईल. )

---

| | | |
|---|---|---|
| रा० रा० बाळकृष्ण आपाजी पुरोहित भंडारा | १ | ३ |
| रा० रा० वासुदेव रघुनाथ प्रधान कामरेज | १ | ६ |
| रा० रा० माधवराव नारायण कनोद | १ | ६ |
| —नेटिव लायब्ररी महू | १ | ६ |
| श्री० रा० रा० शंकरराव दादा सा० इंदूर | १ | ६ |
| रा० रा० मल्हार हणमंत कुळकर्णी नातेंपुतें | १ | ६ |
| रा० रा० भिकाजी वामन जोशी माहाड | १ | ६ |
| रा० रा० वासुदेव विनायक आगाशे साकळी | १ | ६ |
| रा० रा० रामचंद्र धोंडदेव बापट कोल्हापूर | १ | ६ |
| रा० रा० बळवंत तात्याजी गोल्हे पाचोरें | १ | ६ |
| रा० रा० रावजी सखाराम खोले पिंपरी | १ | ६ |
| रा० रा० माधवराव सखाराम तरटे रामपुरा | १ | ६ |
| रा० रा० गोपाळ रघुनाथ मोहोळकर शिंदखेड | १ | ६ |
| भाऊ सा० हरी माहादेव तारे वकील इंदूर | १ | ६ |
| रा० रा० विनायक वामन सहस्रबुधे उमरावती | १ | ६ |
| रा० रा० केशवराव धोंडदेव वकील अलीबाग | १ | ० |
| रा० रा० गणेश बल्लाळ माहाले चिकसागर | १ | ० |
| रा० रा० गोविंद रघुनाथ दाभोळकर केळवेमाहिम | १ | ६ |
| रा० रा० विष्णु गंगाधर फडके नागांव | १ | ० |
| रा० रा० मारुती रंगोबा पावडे उमरावती | १ | ६ |
| रा० रा० गोपाळ जनार्दन भातखंडे सातारा | १ | ६ |
| रा० रा० सर्जेराव रावजी कुळकर्णी संकेश्वर | १ | ६ |
| रा० रा० विष्णु गोविंद ओक अहमदनगर | १ | ६ |
| रा० रा० नारायण वामन जोशी शितावर्डी | १ | ६ |
| रा० रा० हरी सदाशिव दामले नागपूर | १ | ६ |
| रा० रा० घंटया नावडू जबलपूर | १ | ६ |
| रा० रा० भाऊ नागनाथ कुळकर्णी सोनगीर | १ | ६ |
| रा० रा० विठ्ठल वामन गंधे येरंडोल | १ | ६ |

पण आमच्या मतें तो दोष तरी सर्वस्वी रयतेच्याच माथीं मारणें हाही न्याय होणार नाहीं. मऊ लागलें ह्मणून कोपरानें खणूं नये असी एक ह्मण आहे, तसें हिंदुस्थानची रयत गरीब खरी ह्मणून ती कांहीं जनावरांपेक्षां कम अक्कल नाहीं. बिचाऱ्या जनावरांस देखील चिरड येण्यासारखा कांहीं प्रकार केला तर तीं रागास येतात मग मनुष्यास ज्ञान असून खेरीज त्यांस हिताहित व बरें वाईट समजणें साहजीक आहे. तसेंच हित करणारावर प्रिती करणें व अहितकर असतील त्यांचा द्वेष करणें हे स्वाभाविक मनोधर्म आहेत. आतां ज्या लोकांचा स्वभाव सौम्य आहे ते आपलें एखाद्यानें थोडें अहित केलें तथापि एक दम घे सुरी आणि घाल उरीं असा प्रकार करीत नाहींत पण जे अविचारी आणि दांडगे असतात ते लगेच समशेरीवर येतात. त्या पैकीं हिंदुस्थानचे लोक पहिले प्रकारांत मोडतात. ह्मणजे ते एकदम तंट्यावर न येतां सामोपचाराचे मार्गास प्रवृत्त होतात. आतां हें मात्र खरें, किं कोणत्याहि देशांत सर्वच लोक चांगले किंवा सर्वच वाईट असा प्रकार कधीं दृष्टीस पडत नाहीं. तर चांगलें आणि वाईट दोनाहि प्रकारचे लोक देशांत असावयाचे हा सिद्धांत आहे ह्मणून वर सांगितलेंच आहे. पण ज्या देशांत सद्गुणी लोकांचा बहुत समुदाय असतो त्या देशांतील सर्व लोक गुणी आहेत असें ह्मणण्याचा प्रघात आहे, त्याच प्रमाणें ज्या देशांत सौम्य प्रकृतीचे लोकांची संख्या जास्त असते त्या देशांतील लोकांस गरीब ह्मणतात. सत्तावन सालचे बंडानें हिंदुस्थानचे रयतेस राजद्रोही ह्मणणें हें अगदीं अप्रशस्त होय असें आह्मांस वाटतें. असो, मिळून तात्पर्य येवढेंच कीं, या देशांतील लोकांशीं आमचें सरकार ज्या रीतीनें वागतें त्या पेक्षां काबुली लोकांशीं फार सावध रीतीनें व विचारानें वागलें पाहिजे.

आतां या लढाई पासून आपल्या सरकारचें नफा नुकसान कितपत

आहे याचा विचार करूं लागलें असतां या लढाईंत सरकारास जय प्राप्ति होऊन काबूल हस्तगत झालें ह्मणजे काबूलचा प्रदेश या राज्यास जोडला जाईल हा एक प्रत्यक्ष नफा, शिवाय रशियाचा आणि काबूलचे अमीराशीं स्नेहसंबंध ठेऊन हिंदुस्थानाशीं निकट संबंध जोडण्याचें जें कारस्थान करीत होता तें वरील जयप्राप्ती पासून सिद्धीस जाणार नाहीं. तेव्हां रशियाचे शत्रुत्वाची सरकारास जी भीति होती ती काबूल हस्तगत झाल्या पासून नाहींशी होईल हाहि सरकारचा फायदाच आहे. परंतु हे फायदे काबूल नुसतें हस्तगत झाल्या पासून होणार नाहींत. त्यामध्यें सरकारचा अंमल कायम बसून तेथें शांतता सुरू झाली पाहिजे, असें होण्यास हल्लीं लढाई ज्या पद्धतीनें चालत आहे त्या मानानें बरेच दिवस लागतील असें वाटतें. काबूलचे लोकांचे मनांत इंग्रजांबद्दल जो रोष आलेला आहे तो प्रथमतः नाहींसा झाला पाहिजे. पण तो लढाई बंद झाल्यावांचून दूर होणार नाहीं? आतां लढाई बंद होण्यास दोन उपाय आहेत. एक उभय पक्षांत सल्ला होणें किंवा एका पक्षाचा जय होऊन दुसऱ्याचा अपजय होणें, या पैकीं सल्ला होण्याचा तर रंग दिसत नाहीं. कारण, काबूलचा अमीर स्वतः जर इंग्रजसरकारचे ताबेंत आला आहे, तर मग आतां सल्ला करावयाचा तरी कुणाशीं? बरें अमीर इकडे आल्यानंतर काबूलांत जर कोणी अमीराचे गादीवर बसून सर्व राज्याचा व सेनेचा भार वाहणारा असता आणि तो जर नेट धरून प्रस्तुतची लढाई करता तर सल्ला करण्यास एक ठिकाण झालें असतें; पण हल्लीं काबूलांत बारभाई अंमल चालल्यामुळें सल्ला होण्याची आशा नाहींच. आतां या लढाईनेंच कांहीं तरी शेवट लावणें भाग आहे. समरांगणामध्यें उभय सैन्याची गांठ पडून जर युद्धप्रसंग पडता तर कांहीं तरी निकाल लागला असता, पण वर सांगितल्या प्रमाणें काबुली लोक आडून गोळी मारीत असल्यामुळें लढाई कधीं संपेल हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. सध्याच्या प्रसंगीं या लढाई पासून इंग्रजी

राज्यांतील सर्व लोकांस नुकसान व त्रासच आहे. हल्लीं या लढाई प्रीत्यर्थ खर्च किती होत आहे व त्यामुळें दुष्काळादिक आडचणीचे योगानें क्षयाची भावना झालेले सरकारचे तिजोरीस किती आडचण पडत आहे हें पुष्कळांस माहीत आहेच. या लढाईचा खर्च इंग्लंडानें सोसावा किंवा तो हिंदुस्थानावर पडावा या वादाची कित्येक वेळा पार्लमेंट सभेंत मोठी लढाई जुंपली होती. आतां वरील कोणत्याहि देशावर जरी हा लढाईचा खर्च बसला तथापि हे दोनी देश इंग्रजी अमला खालींच मोडत असल्यामुळें इंग्रज सरकारावर तो पडणार हें उघड आहे. तेव्हां एकंदरींत ही लढाई सुद्धा आपले सरकारास नुकसानांतच टाकीत आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आतां लढाईचे संबंधाच्या गोष्टी तोंडानें सांगण्यापेक्षां लढाईचे प्रसंगीं रण मैदानांत उभें राहणें फार बिकट आहे. पण हातांत नुसती समशेर घेऊन लढाईंत धांव मारण्यानेंच जय येतो असाहि अर्थ नाहीं. लढाईचे कामीं अनेक युक्ति प्रयुक्ति लढवाव्या लागतात आतां युक्ती लढविण्याचे कामीं व पडून घर घेण्यांत आमचे सरकारचा कात्रा जगप्रसिद्ध आहे, तेव्हां त्या मानानें काबूलाशीं हल्लीं जी लढाई चालली आहे ती इतके दिवस चालावी व त्यामुळें सरकारचे तिजोरीची आणि सैन्याची खराबी व्हावी हें चमत्कारिक वाटतें. पण सर्वच ठिकाणीं पडून काम होत नाहीं कधीं कधीं तीक्ष्ण शस्त्राचा उपयोग करावा लागतो. काबूलचे संबंधानें हल्लीं तोच प्रसंग आलेला आहे. लढाई करण्यांत कांहीं परमार्थ किंवा मोक्षसाधन नाहीं. त्यांत केवळ पैसा आणि लौकिक मिळविण्याचा हेतु असतो. तेव्हां ती करणारानें आपला फायदा किती होईल हें पहावें लागतें आतां या गोष्टी आमचे सरकारास समजत नाहींत असें नव्हे. पण प्रसंगीं शहाण्याची अक्कलहि कमी होते, तेव्हां अशा वेळीं केलेली सूचना मान्य असल्यास गृहण करावी. लढाईचें सूत लांबत चाललें तेव्हां शेवटीं केलेले श्रमाचें सार्थक झालें ह्मणजे ठीक. डोंगर पोखरून

उंदीर काढल्या प्रमाणें मात्र न व्हावें. हल्लीं लढाई लांबत चालल्यामुळें अशा प्रकारचे विचार करण्याचा प्रसंग येतो. ही लढाई काबुलाशीं प्रथमच करावयाची असती ह्मणजे त्याजबद्दल हल्लीं लागलेले दिवस जास्त आहेत असें वाटलें नसतें. पण काबुलचे अमीराशीं पहिल्यानें लढाई होऊन तहानें इंग्रज सरकारचा तो अंकित होऊन त्याणें आपले सरकारचा वकील काबुलांत ठेवण्याचें कबूल केलें, आणि त्या वकीलाचा जीव घेतल्यामुळें ही पुनः लढाई करण्याचा प्रसंग आला तेव्हा पूर्वींच्या लढाईंत आणि हल्लींचे लढाईंत इतकें अंतर असून खेरीज हल्लींचें प्रसंगीं अमीर यांचे तावेंत आला आहे, असें असूनहि अद्याप लढाई संपत नसून सरकारास त्रास सोसावा लागत आहे तेव्हां इतका त्रास सोसून आणि पैसा खर्च करून या लढाई पासून हित काय? असा एक प्रश्न उत्पन्न होतो, व काबूल हस्तगत झाल्यास इंग्रजी राज्यांतील ज्या देशावर हल्लींचे लढाईचा खर्च पडेल त्या देशाचा कांहींतरी लाभ होईल किंवा नाहीं हाहि विचार करण्यास कारण होतें. तेव्हां हें सगळें सरकारनें मनांत आणून काय करणें तें करावें.

# आख्यायिका.

## योग्य तयारी.

एकदा निजामन्मुलुख यांस कैद करून [illegible]ण्याविषयीं दिल्लीचे बादशाहा यांजकडून फौज रवाना झाली. तेव्हां त्या संकटांतून आपलें संरक्षण व्हावें याकरितां निजामन्मुलुख नबाब याणें शाहू महाराज यांजकडे मदत मागितली. शाहू महाराजांनीं बाजीराव बल्लाळ पेशवे यांस नबाबाचे मदतीस जाण्याविषयीं आज्ञा केली. त्यावरून बाजीराव साहेब हे नबाबचे मदतीस गेले. औरंगाबादेजवळ बाजीरावाचे लष्कराचा तळ पडला. बाजीराव हा फार देखणा व उमदा पुरुष होता नबाबाच्या जनानखान्यांत जेव्हां ही गोष्ट समजली तेव्हां बाजीरावास एकवेळ दृष्टीनें पहावें असें नबाबाच्या बायकांचे मनांत येऊन त्यांनीं ती गोष्ट नबाबास कळवली. नबाबाचे मनांतहि बाजीराव साहेबांची भेट व्हावी असें होतेंच तेव्हां त्याणें या गोष्टीस रुकार देऊन पेशव्यांचे गोटांत वकील पाठविला व गांवा बाहेर जागा तयार करून तेथें उभयतांची भेट होण्याचा विचार ठरला. भेटीचे जागीं नबाबाचा जनानखाना बसण्याचीहि सोय केली होती. बाजीराव साहेब यांणीं सडे पांच खिजमतगारानिशीं भेटीस यावें असें ठरलें होतें त्या प्रमाणें बाजीराव यांणीं निवडक पांच सरदारांस खिजमतगारांचा पोषाख देऊन त्यांस बराबर घेतलें. नंतर नबाबांनीं डेरे दिले होते त्या ठिकाणीं येऊन उभयतांच्या भेटी झाल्या. नबाबाच्या बायकांनीं बाजीराव साहेब यांस पाहून त्या फार खुश झाल्या व त्यांणीं पेशव्यांवर दोन पायली मोत्यें उधळलीं. नंतर उभयतांचीं बोलणीं झालीं त्यांत नबाब पेशव्यांस ह्मणाले "आतां कसें काय? हल्लीं आमचे हातांत सापडला. या वेळीं आह्मीं एखादा दगा केला तर कसें होईल? तुमचे होळकर शिंदे

वगैरे सरदार आतां कुठे आहेत?" हें ऐकून बाजीराव साहेब ह्मणाले जेथें आह्मी तेथेंच आमची सरदार मंडळी आहे असें ह्मणून नेलेले खिजमतगारांस त्यांनी नेत्र संकेत करतांच ते आवेशानें उठून उभे राहिले, व ते सरदार आहेत असें नबाबास समजतांच बाजीरावाची हिकमत आणि तयारी पाहून तो फार खुष झाला. निजामन्मुलुख हा स्पष्टवक्ता होता त्याणें पेशव्यांस सांगितलें "आह्मास या वेळीं तुमची गरज आहे तेव्हां दगा करणार नाहीं, परंतु तसा प्रसंग आल्यास आह्मी दगा करण्यास चुकणार नाहीं. याकरितां आपण आमचेवर कधीं विश्वास ठेऊं नये." नबाब बाजीरावाची धूर्तता पाहून ह्मणाला "एक बाजी और सब पाजी" बाजीरावहि नबाबाची निस्पृहता पाहून "एक निजाम और सब हजाम" असें ह्मणाले व परस्परांचीं आणखी कांहीं बोलणी होऊन पेशवे परत आले.

---

## हुकमत.

हिंदुस्थानांत होळकर, शिंदे व बिनीवाले असे पेशव्यांचे मोठे सरदार होते. त्यां पैकीं बिनीवाले यांचें होळकर व शिंदे यांशीं कांहीं कारणानें वैमनस्य पडलें. ही गोष्ट बिनीवाले यांणीं पुण्यास कळविली. तेवेळीं पेशवाईचा अधिकार माधवराव बल्लाळ पेशवे यांजकडे होता. बिनीवाले यांजकडील हकीकत कळतांच पेशव्यांनीं होळकर व शिंदे यांस पत्रें लिहून तीं चार शिपायां बरोबर पाठविलीं. शिपाई पोंचण्या पूर्वीं वरील त्रिवर्ग सरदारांची सल्ला झाली होती. दिल्लीचे बादशाहा यांणीं वरील सरदारांस भेटीस बलाविल्या वरून त्यांनीं फौज तयार करून ते निघाले व कांहीं अंतरावर गेले, इतक्यांत पेशव्या कडील शिपायी आले तेहि स्वारींत गेले, यजमानाचे शिपायांस पहातांच महादजी शिंदे व तुकोजी होळकर हे अंबारींतून खालीं उतरून त्यांणीं त्या शिपायां जवळील पत्रें घेतलीं व वाचुन पाहिलीं, आणि शिपायांस सांगितलें कीं, आह्मी आज बाद

षाहा यांचे भेटीस जात आहों, याकरितां तुह्मी आज मुक्काम करावा. उदईक तुह्मास रवाना करूं." शिपाई ह्मणाले "मुक्काम करण्याविषयीं आह्मास सरकारचा हुकूम नाहीं, याकरितां तुह्मास आह्मी जाऊं देणार नाहीं. आजचे आज आमची रवानगी करून तुह्मी उदईक पाहिजे तर बादषाहाचे भेटीस जावें." वरील सरदारांनीं याविषयीं शिपायां जवळ फार रदबदली केली परंतु ते ऐकेनात, यामुळें निरुपाय होऊन त्यांणीं दिल्लीस वकील पाठवून बादषाहास कळविलें कीं, आमचे खावंदांचीं पत्रें आलीं आहेत त्यांचा जबाब आज पाठविला पाहिजे, याकरितां आज आमचें येणें होत नाहीं. उदईक आपले भेटीस येऊं. नंतर त्रिवर्ग सरदार मागें परतले व पत्राचीं उत्तरें लिहून आलेले शिपायांस पोषाग देऊन मार्गस्थ केले. हा मजकूर दिल्लीचे बादषहा शाहा आलम यांस समजला तेव्हां ते ह्मणाले "धन्य आहे. नुसते शिपाई आले त्यांणीं दोन लाख फौज फिरवून माघारी नेली हा ज्याचा हुकूम तो खावंद तरी कसा असेल!!" असें ह्मणून माधवराव पेशवे यांच्या हुकुमतीचा त्यास मोठा विस्मय वाटला.

---

## वचक

माधवराव बल्लाळ पेशवे यांस सर्व सरदार मंडळी फार वचकत असे. कारभार करण्याची शैली, सरदार लोकांवर हुकमत, मनुष्याची पारख, आणि विद्वानावर प्रीति हे गुण माधवरावाचे अंगीं असून खेरीज तो जातीनें शूर आणि हिम्मतदार व हिकमतदार असल्यामुळें राज्यांत त्याचें मोठें वजन असे. एक वेळ होळकर, शिंदे, वगैरे सरदार मंडळीस हिंदुस्थानांत जाण्या विषयीं हुकुम झाला. त्या प्रमाणें सर्व सरदार ताबडतोब निघून गेले. परंतु महादजी शिंदे मात्र आपलेवर पेशव्यांची कृपा आहे व आपण सर्वांत शूर आहों अशा घमेंडींत ताबडतोब जाण्याचा बेत न करतां टंगळमंगळ करीत राहिले. एक दिवस माधवराव साहेब

यांची स्वारी घोड्यावर बसून थेऊरास जात असतां शिंद्याचें लष्कर दृष्टीस पडलें. तेव्हां त्यांची जाण्याची तयारी देखील नाहीं हें पाहून माधवरावास फार राग आला व त्यांनीं महादजी शिंदे यांस बलावून आणून म्हटलें "महादजी, तुमचें हें अवज्ञेचें व धिटाईचें वर्तन पाहून मी फार थक्क होत आहें!! थेऊराहून परत येतांना जर या ठिकाणीं एक तंबू किंवा एक माणूस माझ्या दृष्टीस पडला, तर तुमची छावणी लुटून फस्त करीन आणि जाहागीर हिसकावून घेईन याची याद राखा" हें जरबेचें भाषण ऐकून महादजी निमूट परत गेले व लगेच गोट मोडून चालते झाले.

रा. रा. रामचंद्र सदाशिव सरदेसाई वेंगुर्लें .... .... १८६
रा. रा. नारायण बाळाजी गोडबोले वेंगुर्लें .... .... १८६
रा. रा. गोविंद फटसेणई बाणाऊलीकर हिरलें .... .... .... १८६
रा० रा० सदाशीव विठ्ठल पाठणकर मसुरें .... .... .... १८६
रा० रा० दामोदर केशव प्रभु देसाई कुडाळ .... .... .... १८४
रा० रा०. येशवंत कृष्णाजी अजगांवकर कुडाळ .... .... .... १८२
रा० रा० बाळाजी माहादेव कमावीसदार कुडाळ .... .... १८६
रा०रा० विठ्ठल पुरुषोत्तम पिंगुळकर सावंतवाडी .... .... १८६
रा०रा० विष्णु विठ्ठल नाडकर्णी सावंतवाडी .... .. .... १८४
रा०रा० सखाराम बाजी बावडेकर सावंतवाडी .... .... १८२
रा०रा० धानगृहाचे चिटणीस सावंतवाडी .... .... १८३
रा०रा०वासुदेव जनार्दन सबनीस सावंतवाडी .... .. १८२
रा०रा०शिवराम हरी पडळेकर सावंतवाडी .. .... १८४
रा०रा०चिंतामण मोरेश्वर लेले सावंतवाडी .. .. १८२
रा०रा०विष्णु आत्माराम वकील सावंतवाडी .. .... १८२
—नेटिव लायब्ररी बेळगांव .... .... .... १८६
रा०रा०विष्णु गोविंद चिपळूणकर बेळगांव .... .... १८६
रा०रा०शिवराम गोपाळ वडेकर बेळगांव .... .... १८५
रा०रा भास्कर जयंत सबनीस बेळगांव .... .... .... १८६
रा० रा० श्रीपाद अनंत छत्र बेळगांव .... .... .... .... .... १८६
रा० रा० रामचंद्र केशव गुनजेकर बेळगांव .... .... .... .... ३
रा० रा० गंगाधर पांडुरंग गद्रे कोल्हापूर .... .... .... १८४
—नेटिव लायब्ररी कोल्हापूर .... .... .... .... १८६
रा० रा० वासुदेव भास्कर भावे कोल्हापूर .... .... .... १८६
रा० रा० नारायण भिकाजी रानडे कोल्हापूर .... .... .... १८६
रा० रा० कृष्णाजी भिकाजी सेक्रेटरी कागल .... .... १८६
रा० रा० दत्तात्रय वासुदेव करमरकर कागल .... .. .... १८६
रा० रा० कृष्णाजी शिवराम दिवाण कोल्हापूर .... .. .. १८६

रा० रा० विद्याधर यज्ञेश्वर जोशी कोल्हापूर .... .... .... १८६
रा० रा० येशवंत गंगाधर अभ्यंकर कोल्हापूर .... .... १८६
रा० रा० आत्माराम रावजी करवीर .... .... .... .... १८६
रा० रा० वासुदेव कृष्ण मुळे सातारा .... .... .... .... १८६
रा० रा० गोविंद लक्ष्मण मोडक सातारा .... .... १
रा० रा० बाळाजी प्रभाकर मोडक कोल्हापूर .... .... १८६
रा० रा० दादो हनुमंत दिवाण कोल्हापूर .... .... ... १८६

( प्रभाकर गणेश भातखंडे यांचे मार्फत )

—नेटिव लायब्ररी सातारें .... .... .... .... .... १८६
—नेटिव लायब्ररी कऱ्हाड .... .... .... .... १८६
रा० रा० गणपतराव विठ्ठल देशमुख चिकुर्डे .... .... .... १८६
—नेटिव लायब्ररी आष्टें ... .... .... .... .... १८६
रा० रा० येशवंत पांडुरंग गोडबोले सं० सांगली .... .... .... १८६
श्रीमंत विनायकराव बाबा सा० पटवर्धन मिरज .... .... १८६
तपोनिधी भगवानगीर गुरु गणेशगीर मिरज.... .... .... १८६
रा० रा० महादेव रामचंद्र भातखंडे मिरज .... .... ....१८६
रा० रा० लक्ष्मण दाजी चिवलकर सांगली .... .... .... १८६
रा० रा० गोपाळ विनायक विध्वंस सांगली .... .... .. ....१८६
रा० रा० येशवंत मोरेश्वर केळकर मिरज .... .... .... १८६
श्रीमंत विठूजीराव चव्हाण डिगरज .... .... .... .... १८६

( रामचंद्र नारायण फडणीस यांचे मार्फत. )

रा० रा० गोपाळ लक्ष्मण बर्वे वकील देवास .... .... .... १८६
रा० रा० गणपत शिंग डाक्तर इंदूर .... .... .... .... १८६
रा० रा० एकनाथ रामचंद्र इंदूर .... .... .... .... १८६
श्रीमंत विनायकराव गणेश इंदूर .... .... .... .... १८६
रा० रा० गोपाळराव नवरे हेडक्लार्क इंदूर .... .... .... ....१८६

(राहिलेला वसूल पुढील अंकांत घेण्यांत येईल )

वर्ष अगाऊ किंमत वर्षाची १ रुपया दुसरें

सम शांति बोधप

# सद्धर्मदीप

वैशाख, ज्येष्ठ, आपाढ. शके १८०२

अंक १०, ११, १२.

मार्गे मार्गे निर्मलं साधुवृंदं । वृंदे वृंदे तत्वचिंतानुवादः ॥
वादे वादे जायते तत्वबोधो । बोधे बोधे सच्चिदानंदभासः ॥



मळीवाग
'सत्यसदन' छापखान्यांत छापिलें

फुटकळ अंकाची किंमत चार आणे.

आगाऊ किंमत पुस्तक सुरू केल्यापासून एक महिन्याचे आंत दिली पाहिजे.

पुस्तकाचे किंमती शिवाय टपाल खर्चाबद्दल प्रत्येक अंकास आर्धा आणा जास्त पडेल.

# सूचना

——००——

पुढील सालीं जे लोक या पुस्तकास वर्गणीदार होऊं इच्छीत असतील त्यांणीं कृपा करून पाव आण्याच्या चकतीवर लिहून कळवावें ह्मणजे त्यांजकडे येत्या श्रावण महिन्याचा पहिला अंक तावडतोब रवाना करण्यांत येईल. सालाबाद प्रमाणें एजंट लोक रवाना झाले आहेत त्यांजपाशीं वर्गणीचा पैसा भरला असतांहि इकडून अंक रवाना केले जातील

व्यवस्थापक स० दी०

——

# विषयानुक्रम.

(अंक १०) अध्यात्मविचार, पृष्ठ २८९— परमार्थ बोधक जुनी कविता, पृष्ठ ३१३—सुभाषित, पृष्ठ ३१९—( अंक ११ ) अष्टादश पुराणें, पृष्ठ ३२१—(अंक १२) साल अखेर, पृष्ठ ३५३— परोपकार, पृष्ठ ३६०— वक्तृत्व, पृष्ठ ३६९— स्वात्मानंद. पृ० ३८१ — परमार्थ बोधक जुनी कविता, पृष्ठ ३८३

# वसूल

| (आषाढ शके १८०२ अखेर) | रु० | आ० |
|---|---|---|
| रा० रा० नागेश सदाशीव रायकर अलीबाग .... .... | १ | ० |
| रा० रा० आत्माराम नारायण कांबळी ठाणें .... .... .... | १ | ३ |
| रा० रा० अनंत रावजी कावळे शिन्नर .... .... .... | १ | ६ |
| रा० रा० विठ्ठल भगवंत लेंभे पाकनी .... .... .... | १ | ६ |
| —नेटिव लायब्ररी गगनबावडा .... .... .... .... | १ | ६ |
| रा० सा० कृष्णाजी रामचंद्र दांडेकर धुळें .... .... .... | १ | ६ |
| रा० रा० शेषगीर राघवेंद्र चिकोडी .... .... .... .... | १ | ६ |

# सद्धर्मदीप

अंक १०

## अध्यात्म विचार.

प्रापंच्या मध्यें मनुष्यास अनेक तऱ्हेचे उपाधी असतात. संसारा मध्यें सुख आहे असें जाणून मनुष्य सर्वदां त्या सुखप्राप्तीकरितां जरी यत्न करीत असतो, तथापि सुखी प्राणी आपल्या फारच थोडा दृष्टीस पडेल कारण ज्या वस्तूचे संगतीनें आपण सुखाची इच्छा करणार त्यां पैकीं अनेक वस्तू केवळ दुःख दर्शनीयच असतात. पण या सुख प्राप्तीचें मनुष्यास असें कांहीं विलक्षण वेड आहे कीं, सुख मिळावें ह्मणून तो आपल्यास मुद्दाम दुःखांत पाडून घेतो. राज्य सुखाचा आपल्यास लाभ व्हावा ह्मणून मनुष्य लढाया वगैरे करून प्राणाची पर्वा नकरतां तीक्ष्ण शस्त्रांचे घाय सोसून भूक तहान मनांत न आणतां अनेक लोकांशीं वैर संपादन करतो. सुखाला मर्यादा असती तर मनुष्याचे यत्नहि मर्यादित राहून तेवढें अपेक्षीत ऐहिक सुख मिळालें ह्मणजे त्यास अध्यात्मविचारा कडे लागतां आलें असतें. पण सुखेच्छाही अमर्यादित असल्यामुळें मनुष्याचे यत्नांसहि कांहीं सीमा नसते. आणि हे यत्न करतांना तो असा भ्रमिष्ट होतो कीं, जास्त सुखाचे आशेनें असलेले सुखाचा समजून उमजून तो त्याग करतो. व आपण होऊन दुःख भोगूं लागतो. पण शेवटीं त्यास प्राप्त व इच्छित दोन्ही सुखांसहि मुकावें लागतें.

थोडे दिवसांपूर्वी मुंबईस शेरबाजाराला जो ऊत आला होता त्याची हकीकत आमचे वाचकांस माहितअसेलच. त्यावेळीं शंभर रुपये शेरांत घातल्यास त्याचे हजार व हजाराचे दाहा हजार होऊं लागल्यामुळें

लोकांना आपली संपत्ती वाढण्याची इतकी उत्कंठेच्छा झाली का, शेरांत पैसा घालण्या करितां ते जवळची मालमत्ता तर संपवूं लागलेच परंतु लोकांचें कर्ज काढुनहि त्यांणीं शेर विकत घेतले. शेराचा व्यापार हा बोलून चालून जुगारा सारखा व गारोड्याचे तमाशा सारखा होता, त्यामुळें लोक त्यापासुन असे भ्रमांत पडले कीं, हा शेर बाजार आपल्यास काय लक्षाधीश करील, किंवा कोटयाधीश करील किंवा प्रत्यक्ष कुबेरानें स्पर्धा करण्याजोगें आपल्यास संपत्तीमान करून टाकील याचा लोकांस अदमासच समजेना. पण त्यांचे हे विचार संपत्तीच्या वृद्धीकडे गुंतले तेव्हां त्यापासून नुकसानहि होण्यासारखें आहे कीं नाहीं याचा विचार करण्याचें त्यांस भानच राहिलें नाहीं. या दोहों विषयींहि त्यांणीं विचार केला असता ह्मणजे लाखों लोक व बाया बापड्या ज्या आपलीं घरें दारें व लोकांचें दळण कांडण करून आणि मोलमजुरी करून संचित केलेलें द्रव्य त्या गारोडी बाजाराचे भरीस घालून कफल्लक व अन्नास मोताद झाल्या तशीस्थिती होतीना.

मनुष्यास एकदां ठेंच लागली ह्मणजे तो जपून चालतो, इतकेंच नव्हे तर "पुढल्यास ठेंच मागला शहाणा" अशी एक मराठी भाषेंत ह्मण आहे. या ह्मणीचें तात्पर्य इतकेंच कीं, ज्या गोष्टीपासून मनुष्याचें नुकसान होतें ती गोष्ट सूज्ञ आहेत ते दुसऱ्याच्या उदाहरणावरूनच सोडून देतात. एकाद्या अडचणीचे मार्गानें जाण्याचा प्रसंग आला असतां सूज्ञ आहे तो आपले पुढें चाललेले दुसरे लोकांचे चालीवरून रस्त्याचे बरे वाईट पणाचें धोरण बांधतो. व त्याअनुरोधानेंच तो मग जपून चालतो. परंतु या संसाररूपी दुर्गम मार्गामध्यें विषयादि अनेक तऱ्हेचे कांटे व धोंडे असून आणि मनुष्यास पदोपदीं त्यांच्या ठेंचा वगैरे लागत असूनहि तो सावध होत नाहीं याचें कारण सुखेच्छा व विषयांवरील आसक्ति होय. एखादा मोठा

विद्वान, शहाणा व अनूदार अधिकारी किंवा श्रीमान गृहस्थ एखाद्या वेश्येच्या नादीं लागला ह्मणजे जसा अपरात्रीं काळोखांतून ठेंचा खात तिच्या घरीं जातो, अथवा एखादा राज्यलोभी रणधुरंधर व शूर सरदार भूक तहान मनांत न आणतां हातांत समशेर घेऊन प्रतिपक्षाच्या लोकांच्या हातांतील शस्त्रांचे घाय आंगावर सोशीत रणांगणांत घुसतो, किंवा लोभी मनुष्य एकादे ठिकाणीं लाभाचा सुगावा असला ह्मणजे रात्रीचा दिवस करून अनवाणी रखडत जातो, तद्वत प्रापंचामध्यें गर्क झालेला जीव सुखाकरितां सैरावैरा भटकत फिरतो. आतां यावर अशी शंका येईल कीं, वरील उदाहरणें हीं प्रापंचीक असल्यामुळें तीं प्रपंचासच लागू करून त्यांत स्पष्टार्थ तो काय झाला? या शंकेचें समाधान इतकेंच कीं, प्रपंच हें अगणित विषयांचें संमेलन होय. त्यापैकीं, कांहीं उदाहरणें वर दिलीं तेवढीं पुरे आहेत. वरील उदाहरणामध्यें विषयाचें प्रतिपादन केलें. त्यांत विषय ह्मणजे सर्व ऐहिक भोग. या भोगभ्रमांत मनुष्य गुंतून त्याणें आपल्या ज्ञानदृष्टीवर मुद्दाम पटलें ओढून घेतलीं आहेत. यामुळें यावज्जीव त्यास प्रपंच दिसतो. अध्यात्मविचाराकडे त्याच्या चित्ताची प्रवृत्ति होतच नाहीं. मनुष्यास सुखाची इच्छा ही स्वाभाविक आहे व त्या करितांच त्याचे सदैव यत्न असतात ह्मणून वर सांगितलें, पण त्या सुख प्राप्तीचा मार्ग चुकला आहे. प्रपंच्यावरील आसक्ति ही दुःखमूलक असून प्रपंच्यावरील अनासक्ति ह्मणजे त्याविषयीं तिरस्कृत बुद्धी हीच सुखाला कारण आहे. प्रपंच्याविषयीं अंतःकरणांत तिरस्कार उत्पन्न होण्याला अध्यात्म विचाराचें प्राबल्य पाहिजे. या प्राबल्यास ज्ञान प्राधान्य आहे. यामुळेंच जे ज्ञानी आहेत ते सर्वदा सुखी असतात. ते प्रपंच करोत किंवा न करोत, ते श्रीमंत असोत किंवा दरिद्री असोत, त्यांना राजदरबारीं मान मिळो किंवा त्यांचा अपमान होवो, कांहीं झालें तथापि ते सर्वदा

सुखी असतात. याचें कारण त्यांचा आनंद ज्ञानाधीन असतो. आणि मनुष्यास परमेश्वरानें ज्ञानरूपी देणगी अशी कांहीं चमत्कारिक दिली आहे कीं, ती एकाद्या दरिद्र्या जवळ असली तथापि त्याच्यापासून मोठ्या सार्वभौम राजाच्यानेंही ती जाणार नाहीं. किंवा राजानें कुणाला लाख पंन्नास हजार रूपये दिले तरीहि ती संपादन केली जाणार नाहीं. आतां याजवर कोणी अशी शंका घेईल कीं जर ज्ञानरूपी देणगी ईश्वरानें मनुष्यमात्रास दिली आहे तर मग ती कांहीं मनुष्यांचे ठिकाणीं दृष्टीगोचर होते व कांहींचे ठिकाणीं दिसत नाहीं याचें कारण काय? याचें कारण इतकेंच कीं, ईश्वारानें ती देणगी जरी सर्वत्रांला दिली आहे तथापि त्या देणगीचा मनुष्यास उपयोग घडण्याला आध्यात्म विचाराचें सहाय लागतें. अध्यात्म विचार करण्यानें मनुष्याचें ज्ञान प्रज्वलित होतें. व्यवहारांतहि आपल्यास याचा अनुभव आहे. मनुष्यमात्रास डोळे आहेत तेव्हां त्यास सर्व वेळ दिसावें पण काळोखांत त्यास दिवा लावल्यावांचून दिसत नाहीं. आतां दिवा नसला ह्मणून मनुष्याचे डोळे नाहींसे होत नाहींत, ते शाबूद असतातच. पण त्याला तेजाची अपेक्षा आहे. तें तेज मिळाल्यावांचून पाहणें ही क्रिया डोळ्यांपासून होत नाहीं. तद्वत अध्यात्म विचारावांचून मनुष्यास ज्ञानाचा उपयोग होत नाहीं.

आतां अध्यात्म विचाराचा ज्ञानाशीं येवढा निकट संबध असण्याचें कारण, आत्मा हें ज्ञानाचें अधिष्टान आहे. ह्मणजे ज्ञान आत्म्याचे ठायीं राहतें. आतां याजवर कोणी अशी शंका घेईल कीं, ज्ञान आत्म्याचे ठिकाणींच जर राहतें तरमग पंचज्ञानेंद्रियें मनुष्यास आहेत त्या त्या इंद्रियांचे योगानें होणारें ज्ञान तें कोणतें? आत्माधिष्ठित जें ज्ञान तेंच ज्ञानेंद्रियाचे योगानें होतें. पण इंद्रियें कांहीं ज्ञानाचें अधिकरण नाहींत. सृष्ट पदार्थांचा जाणता व भोक्ता जो आत्मा त्या आत्म्याचे ठिकाणीं पदार्थादिकांचा जाणीवपणा उत्पन्न

होण्याचें इंद्रिय हें द्वार आहे. यामुळें त्या ठिकाणीं ज्ञानाची अविर्भूती नाहीं. आत्मा अनुकूल नसल्यास इंद्रियांना पदार्थादिकांचें ज्ञान होत नाहीं. पण इंद्रियांचे साह्यावांचूनहि आत्म्याचे ठिकाणीं ज्ञान आविर्भूत असतें. यावरून आत्मा ज्ञानाचें अधिष्टान होय हें उघड होतें.

कर्ण, नेत्र, त्वचा, जिव्हा, आणि नासिका हीं पंच ज्ञानेंद्रियें होत. हीं आत्म्याला पदार्थमात्राचें ज्ञान उत्पन्न करितात. ऐकणें हा व्यापार कर्णेंद्रियाचा होय. विचारकरून पाहिलें असतां या ऐकण्याची व्याप्ति इतकी विलक्षण आहे कीं यावच्छब्दब्रह्म हा या इंद्रियाचा विषय होय. ज्यास कर्णेंद्रिय नाहीं किंवा नुसतें दृष्ट इंद्रिय असून त्यापासून कांहीं व्यापार घडत नाहीं, ह्मणजे कान असून ऐकूं येत नाहीं, तो मनुष्य मोठा दैवहीन होय. एखादा शब्द कानीं पडला ह्मणजे आत्म्याला कोणा एका वस्तूचें, एखाद्याजीवाचें, एखाद्या जातीचें किंवा एखाद्या देशाचें अगर अवाढव्य विश्वविस्ताराचेंहि ज्ञान होतें. हा ज्ञान साक्षात्कार इतका शीघ्र आहे कीं, शब्दोच्चाराबरोबर त्याचें यथासांग परिज्ञान होतें. घोडा हा शब्द कानीं पडतांच त्या शब्दानें एके जातीच्या जनावराचा तात्काळ बोध होतो. आतां "घोडा" शब्दानें हें एक प्रकारचें जनावर आहे इतकाच बोध होऊन त्या शब्दजन्य ज्ञानाचें पर्यवसान होत नाहीं. तर लगेच त्या घोड्याची आकृति, त्याचे गुण, व त्याचे भेद या सर्वांचें ज्ञान होतें. आतां आकृत्यादिकाचें ज्ञान जरी शब्दोच्चार होण्याबरोबर श्रोत्रेंद्रिय द्वारा होतें, तथापि त्याविषयीं प्रथमतः दृगेंद्रीयद्वारा त्या ज्ञानाचा आत्म्यास साक्षात्कार घडलेला असला पाहिजे. ह्मणजे मनुष्यानें ती वस्तु पूर्वीं पाहिलेली पाहिजे. कोणतीहि वस्तु पूर्वीं पाहिल्या वांचून नुसत्या शब्दोच्चारानें आत्म्यावर तिच्या आकृतीचें प्रतिबिंब उठणार

नाहीं. आतां एकाद्या वस्तूचें पूर्ण वर्णन वाचलें असलें ह्मणजे तिचे अवयव आपले लक्षांत येतात हें खरें, तथापि नेत्रांना तिचा अनुभव घडल्यावांचून त्या आकृतीचें खरें चित्र आत्म्यावर रेखलें जाणार नाहीं. मुंबई शहर न पाहिलेले लोक अलीकडे बाहेर प्रांतीं जरी फार नाहींत, तरी बरेच आहेत. मुंबई शहराचे रचनासौंदर्याची वगैरे पुष्कळ प्रशंसा आणि वर्णन त्यांणीं लोकांचे तोंडून ऐकिलेलें असतें. त्या ऐकीव ज्ञानापासून मुंबई शहरच्या आकृतीचा त्याच्या अंतःकरणांत जो नकाशा उठलेला असतो त्यांत आणि मुंबई शहर पाहातांच त्यांच्या अंतःकरणास आकृतीचा जो अनुभव घडतो त्यांत जमीन अस्मानाचें अंतर असतें. पण कोणतीहि वस्तु एकदां आवलोकनांत येऊन गेली ह्मणजे मग त्या वस्तुचें नुसतें नाव ऐकण्याबरोबर तिचें स्वरूप अंतःकरणांत बिंबून जातें व ती वस्तु आपण जशी प्रत्यक्ष पहातच आहों असा आत्म्याला त्याचा साक्षात्कार होतो. तेव्हां श्रोत्रेंद्रियाचे ठिकाणीं ज्ञान नाहीं. फक्त हवेमध्यें उत्पन्न झालेला ध्वनी आत्म्याला कळण्याचें तें द्वार आहे. कळणें ही क्रिया आत्म्या-वांचून घडत नाहीं. ह्मणजे ज्ञान आत्म्याचे ठिकाणीं आहे. आतां श्रोत्रेंद्रियाला ज्ञानेंद्रिय ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं तें इंद्रिय शब्द द्वारा आत्माधिष्ठित ज्ञानास जागृत करतें. आतां येथें अशी एक शंका घेण्याजोगी आहे कीं, ज्ञान हें सर्वदा जागृत स्वरूपच आहे. त्याची जागृदावस्था नष्ट झाल्यास तें ज्ञानच नव्हे असें ह्मणतां येईल असें असून ज्ञानाला कर्णेंद्रिय शब्दद्वारा जागृत करतें असें ह्मणणें कसें शोभेल. आतां ही शंका एका अर्थी खरी वाटते. पण थोडा विचार केला असतां कळून येईल कीं, ज्ञान हें जरी शुद्ध, शाश्वत व जाग्रदावस्थित आहे तथापि अनेक मानसिक उपाधींनीं त्याचें स्थित्यंतर झालेलें दिसतें. पाणी स्वच्छ व एकरंगी आहे असें कोणीही ह्मणेल, परंतु त्यांत रंग मिश्रित झाल्यामुळें तें पिवळें, हिरवें, पांढरें, तांबडें,

अस्मानी, काळें, वगैरे अनेक तऱ्हेच्या रंगाचें दिसतें. आतां तें असें दिसण्याचें कारण उपाधी होय. तेंच मिश्रण दूर केलें असतां पाणी आपल्या पूर्व रूपास येऊन त्याचे बाह्य रंग नाहींतसे होतात. तद्वत ज्ञान शुद्ध असतांहि यांत अनेक मनोविकारांचें मिश्रण झाल्यामुळें त्याचें स्थित्यंतर झालेलें दिसत, तीच त्याची अजाग्रत स्थिती, ह्मण जे मनोविकारांनीं ज्ञानास अन्य गतिकत्व प्राप्त होतें तें अन्यगतिकत्व दूर करून एखाद्या नियमित ठिकाणीं त्यास अधिष्ठित करण्याचें सामर्थ्य कर्णेंद्रियास शब्दद्वारा प्राप्त आहे. असें समजा कीं, एक मनुष्य एकाद्या वस्तु विषयीं कांहीं विचार करीत बसल्यामुळें त्याच्या मनोवृत्ति त्या वस्तुचे स्वरूप दर्शनादिकांत तल्लीन होऊन गेल्या आहेत. इतक्यांत एक मनुष्य मोठ्यानें "वाघ आला वाघ आला" ह्मणून ओरडला. हा शब्द कानीं पडतांच ज्या विषयाकडे त्याचे ज्ञानाची एकाग्रता झाली असेल तो विषय सुटून या ध्वनी बरोबर तो धरारून उठेल, व वाघ शब्द श्रवणानें कांहीं तरी घातक जनावर आपल्या संन्निध येत आहे आणि तें अमुक तऱ्हेचें आहे व त्यापासून आपल्या जीवितास भीति आहे इत्यादि विचार त्यास तत्क्षणींच होऊन तो तेथून पळून जाईल. तेव्हां असें जें ज्ञानाचें कल्पित गोष्टी पासून परावर्तन होतें तीच त्याची जाग्रदावस्था होय. पण ही अवस्था श्रोत्रेंद्रिया वांचून प्राप्त होत नाहीं. श्रोत्रेंद्रियद्वारा कोणताहि ध्वनी किंवा नाद याचा आत्म्याला अनुभव घडतो. श्रोत्रेंदिया वांचून शब्द ज्ञान होत नाहीं. बहिऱ्या मनुष्यापुढें एखाद्या गवयानें सुस्वर गायन केलें, किंवा एखाद्या अस्खलीत वक्त्यानें पाहिजे तितकें वाक्पटुत्व मिरविलें, किंवा एखाद्या वाद्य वाजविणारानें आपलें सर्व कौशल्य प्रकट केलें तरी तें निर्फळ होय. त्यापासून त्या बहिऱ्या मनुष्याच्या आत्म्याला मुळींच आनंद होणार नाहीं. कारण वरील स्वरजन्य आनंद हा ज्यास ते स्वर समजत असतील त्यास होईल.

आणि हें समजण्याला श्रोत्रेंद्रिया वाचून दुसरा मार्ग नाहीं. ह्मणून बहिरा शाब्दिक ज्ञानास अपात्र होय. आतां येथें ही एक गोष्ट लक्षांत ठेवण्या जोगी आहे ती ही कीं, श्रोत्रेंद्रियद्वारा आत्म्याला फक्त ध्वनीचा साक्षात्कार मात्र होतो, तेव्हां तो ध्वनी ज्या मानानें कर्कश किंवा मधुर असेल त्याप्रमाणें तोंहि साहजीक त्यास कळेल, पण त्या ध्वनीचे योगानें आनंद किंवा दुःख किंवा भीति किंवा क्रोध किंवा पश्चाताप याचा आत्म्यावर पूर्ण ठसा उठण्यास त्या परिश्रुत ध्वनी विषयीं ज्ञान परिपक्व व प्रकाशित पाहिजे. संगीत शास्त्रामध्यें कुशल अशा मनुष्याला गवयाचे गाण्यापासून जो आनंद होईल, तो इतरांस होणार नाहीं. त्यांत कांहीं विषय तर असे आहेत कीं, त्याप्रसंगीं ज्ञानावाचून इतरांस त्याचा कांहीं हर्षविषाद वाटत नाहीं. सरासरी तो ध्वनी त्याचें श्रोत्रेंद्रिय शाबूद असल्यामुळें त्यास ऐकूं मात्र येईल. जो पाखंडी आहे त्यास वेदांत विषयांचे श्रवणापासून आनंद होणार नाहीं, तृतीय प्रकृति पुरुष असेल त्याची चित्तवृत्ति तरुणीच्या सौंदर्य वर्णना पासून थरारून जाणार नाहीं, जो निर्बळ व भेकड असेल त्यास शौर्य प्रचूर कथानकांपासून हर्ष वाटणार नाहीं, व जो मूर्ख असेल तो पंडिताच्या पांडित्यानें विस्मित होणार नाहीं. तेव्हां तात्पर्य काय कीं, ज्याविषयीं श्रोत्रेंद्रियद्वारा आत्म्याला ध्वनीचा साक्षात्कार होतो त्या ध्वनी विषयीं आत्माधिष्टित ज्ञान जर पारंगत असेल तरच आत्म्यास तज्जन्य आनंद होईल. नाहीं पेक्षां "नळी फुंकिली सोनारें इकडून तिकडे गेलें वारें" इतकाच त्या शब्दश्रवणाचा उपयोग होईल. तेव्हां शाब्दिक ज्ञान हें अशा प्रकारचें आहे तथापि इतकें मात्र खरें कीं हें ज्ञानेंद्रिय आत्माधिष्टित ज्ञानास जागृत किंवा इतर विषयांपासून पराङ्मुख करतें. पण हें श्रोत्रेंद्रिय ज्ञानाचें कांहीं अधिष्टान नाहीं. ह्मणजे श्रोत्रेंद्रियाचे ठिकाणीं ज्ञान राहात नाहीं

आतां नेत्रेंद्रिया विषयीं विचार करूं. या इंद्रियद्वारा आत्म्याला पाहणे या क्रियेचा अनुभव घडतो. यावत् दृश्य पदार्थांचं आत्म्याला ज्ञान होण्याला कारण हेंच इंद्रिय होय. दृगेंद्रियानें पदार्थ मात्राचा आकार, स्थिती, रंग, रूप, जाती वगैरे समजतात. आतां या ठिकाणीं ही पूर्वोक्त कर्णेंद्रिया प्रमाणें दृगेंद्रियाचा व्यापार तरी आत्माधीनच आहे. ह्मणजे नुसता कोणताहि पदार्थ पाहिल्यानें त्या पदार्थाचें ज्ञान होत नाहीं, ह्मणजे त्या पदार्थादिकांची ज्ञापकता आत्म्याचे ठिकाणीं उत्पन्न होत नाहींत, तर आत्म्याचे ठिकाणीं जें ज्ञान असतें त्या ज्ञानासहित जेव्हां कोणत्याही पदार्थावर दृगेंद्रियाचा प्रयोग घडतो तेव्हांच त्या पदार्थाची योग्यता आत्म्यास समजते. ह्मणजे आत्म्याचे ठिकाणीं ज्ञान सर्वदा आहेच. फक्त तें अनेक उपाधींनीं व्याप्त असतें त्या मुळें ज्या विषयांत तें गर्क असतें त्या विषयाकडे त्याचा निदध्यास असतो. तेव्हां तात्पर्य काय कीं, डोळयांचे ठिकाणीं कांहीं ज्ञान नाहीं. आतां इतकें मात्र खरें कीं, आत्माधिष्ठित ज्ञान जरी पूर्ण विकास पावलेलें असलें तथापि देहाचें दृगेंद्रिय जर नष्ट झालें असेल तर त्यास पदार्थांचा रंग आणि रूप हीं कधींहि समजणार नाहींत. ह्मणजे जन्मांध मनुष्य कितीहि ज्ञानी असला तथापि त्यास रंगाची व रूपाची कल्पनाच करतां येणार नाहीं. कारण रंग आणि रूप हे कांहीं स्वतंत्र पदार्थ नाहींत. पदार्थाशीं सार्वकाळ संलग्न असणारें तें एक प्रकारचें तेज आहे. ज्या प्रमाणें छाया नेहमी पदार्थाला धरून असते त्याचप्रमाणें रंगहि नेहमी पदार्थास धरून असतात. एखादा वृक्ष आंधळयास दाखवितां येईल व त्याच्या पर्णादि आकारावरून आणि त्याच्या फुलांचे सुवासा वरून त्यास त्याची ओळखही करून देतां येईल, पण कोणत्याहि वृक्षाचे छायेचें ज्ञान अंधास कसें व्हावें. आतां आकारादिकाचें ज्ञान होण्यास नेत्रांचीच गरज नाहीं. कारण स्पर्शेंद्रियापासूनहि तें समजण्या जोगें

असतें. परंतु रूप आणि रंग हे केवळ दृगेंद्रियाचेच विषय होत. रंगाचें परिज्ञान होण्यास डोळेच पाहिजेत. रूपविषयक परिज्ञाना विष यीं जरी नेत्रच प्राधान्य आहेत, तथापि नेत्रांचे ठिकाणीं ज्ञानाची स्थिती नाहीं. ह्मणजे नेत्रेंद्रियाचे ठिकाणीं ज्ञान राहात नाहीं. व्यव हारामध्यें याचा अनुभव येतो. अंधळा पुरुष विद्या संपन्न व ज्ञानी असतो. त्याला उणीव कायती येवढीच कीं, सृष्टी सौंदर्याचा त्यास साक्षात्कार घडलेला नसतो. तथापि सौंदर्याचीं तो अनेक तऱ्हेनें वर्ण नें करूं शकेल. व पदार्थाच्या सादृश्यादिकावरून तो प्रत्येक रंगा विषयीं विवेचन ही करूं शकेल. फक्त त्याचा त्याला अनुभव नसेल येवढेंच. आतां अविद्वान व भ्रमिष्ट पुरुष चांगला डोळस आहे सम जा. पण त्याचे डोळ्यांचा त्याला काय उपयोग होईल? त्यास पिंवळा पदार्थ दाखविला तरतो काळा, व काळा दाखविला असतां पिंवळा ह्मणेल; किंवा अशाच तऱ्हेच्या भलत्याच एखाद्या रंगाचें नांव सांगेल किंवा कदाचित् त्या रंग विषयास सोडून दुसरें कांहीं भलतेंच बोलेल. त्याचे डोळे चांगले शाबूद असतां असा प्रकार कां व्हावा ही शंका येण्याजोगी आहे. आणि अनुभव तर याच्या विरुद्ध दिसतो. आतां याचें कारण इतकेंच कीं दृश्य वस्तूचें परिज्ञान होण्यास डोळ्याचा उपयोग आहे हें खरें, परंतु या कामीं डोळे एकटे उपयोगी नाहींत. आत्मा अन्य व्यापार सोडून त्या वस्तु निरीक्षणाकडे लागला पाहिजे. ह्मणजे डोळ्यांच्या स्वाभाविक पहाण्यानें वस्तुचें ज्ञान होत नाहीं. आत्म्यानें कोणतीहि वस्तु मुद्दाम डोळ्यानें पाहिली पाहिजे तरच ती ज्ञात होते. याच्या स्पष्टीकरणार्थ उपनेत्र घ्या. या उपनेत्रांची शक्ति तरी फार विलक्षण असते. वृद्धावस्थेमध्यें किंवा मस्तकांतील कांहीं विकारांचे योगानें दृगेंद्रियाचा व्यापार जेव्हां मंद होतो, तेव्हां हें उपनेत्र डोळ्यांना मदत करितें. या दृष्टिमांद्याचे प्रसंगीं उपनेत्राचें सहाय नसेल तर पुरुषास डोळे

असुनहि ते नसल्या सारखे होतात. ह्मणजे उपनेत्रच त्याचे डोळे होतात. आतां मूळ नेत्रांपेक्षांहि उपनेत्रांकडे जरी इतकें श्रेष्ठत्व येतें, तथापि नेत्रावांचून उपनेत्र व्यर्थ होय. उपनेत्र लाविलें तरी पाहाणें ही क्रिया नेत्रांनीं करावी लागते. आणि इतकी खटपट केली—ह्मणजे नेत्रांनीं नीट दिसेना ह्मणून त्यांस उपनेत्र लाविलें—तरी आंतील पहाणारा जर स्थितीवर असेल आणि त्यास जर पाहण्याची इच्छा असेल तरच पहाण्याचें सार्थक होईल. कारण या सार्थकतेस ज्ञानाची अवश्यकता असते, आणि तें ज्ञान सर्वदां आत्म्याचे ठिकाणीं राहतें. तेव्हां श्रोत्रेंद्रिय व दृगेंद्रिय यांचे ठायीं ज्ञानाची स्थिती नाहीं.

पंच ज्ञानेंद्रियांचे योगानें मनुष्यास पंचविषयक ज्ञान होतें. शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध, हे पंच विषय होत. यां पैकीं वर सांगितलेल्या इंद्रिय द्वयानें ह्मणजे श्रोत्रेंद्रियानें आणि दृगेंद्रियानें शब्द आणि रूप हे दोन विषय समजतात. जगामध्यें या दोन इंद्रियांचे व्यापाराची व्याप्तिच फार आहे. स्पर्शेंद्रियाचे व्यापारानें शरीरास कोणत्याहि वस्तुचा स्पर्श झाला असतां त्या स्पर्शित वस्तुची आत्म्यास परीक्षा होते. थंड, उष्ण, नरम, टणक, इत्यादि जे पदार्थांचे गुण ते या स्पर्शेंद्रियानें समजतात. या इंद्रियाचा मुख्य भाग त्वचा. ती शाबूद असेल तरच त्यापासून वरील ज्ञान होतें. ह्मणजे या त्वचेच्या आंतील रक्ताभिसरण चालू असलें पाहिजे. त्यांत जर कांहीं अंतर पडलें, तर या इंद्रियाचा व्यापार भ्रष्ट होतो. आतां येथें इतकें मात्र लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, त्वचा नाशाबूद झाली तथापि आत्म्याचे ठिकाणीं ज्ञान असतें त्यांत कांहीं कमतर पणा येत नाहीं. इतकेंच मात्र होईल, कीं शरीराचे ज्या भागाची त्वचा बिघडल्या मुळें निर्व्यापार झाली असेल त्या ठिकाणीं कांहीं स्पर्श झाला असतां त्यापासून आत्म्याला जो बोध व्हावयाचा तो होणार नाहीं. तथापि

तो बोध त्यास शरीराचे इतर भागांपासून होईल. तेव्हां यावरून स्पर्शेंद्रियाचे ठायीं ज्ञानाची स्थिती नाहीं हें उघड आहे.

आतां पदार्थाच्या रसाचा बोध होण्याला साधन जिव्हा आहे. पदार्थाचे ठायीं गोड, कडू, आम्ल, तिखट, खारट, मधुर, इत्यादि ज्या भिन्न भिन्न रुचि असतात त्यांचा या रसनेंद्रिय द्वारानें आत्म्याला बोध होतो. यामुळें जे मधुर व रुचिकर पदार्थ असतील त्याचें मनुष्य सेवन करितो, व कटु व अरुची उत्पन्न करण्यासारखे असतील ते टाकून देतो. आतां या रसनेंद्रियाचे व्यापारांतही एक मोठा चमत्कार आहे. व त्याचा अनुभव वैद्यशास्त्रांत दृष्टीस पडतो. वास्तविक पाहिलें असतां या इंद्रियानें फक्त पदार्थांची रुची मात्र कळते. पदार्थाचे गुणदोषादिक जाणण्यास या इंद्रियाचा कांहीं उपयोग नाहीं. पण अनेक तऱ्हेच्या मिश्रणादिकांचे योगानें मनुष्यानें या पदार्थांचे गुणदोषाची परिक्षा करून प्रसंगानुरूप त्यांची चमत्कारिक योजना केलेली आढळते आणि त्या योगानें रसनेंद्रियास स्वाभाविक प्रीय जे मधुर व रुचिकर पदार्थ ते सोडून तो या इंद्रियद्वारा कटु आम्लादिक पदार्थांचें सेवन करितो. तेव्हां यावरून इतकेंच समजावयाचें कीं, या इंद्रियापासून आत्म्यास पदार्थांचे रुच्यादिकांचा जरी बोध होतो, तथापि या इंद्रियाचे ठायीं ज्ञानाची स्थिती नाहीं. तें आत्म्याचे ठायींच सर्वदां असतें. घ्राणेंद्रियाविषयींहि हाच प्रकार जाणावा. ह्मणजे पदार्थांचा सुगंध किंवा दुर्गंध समजण्याचे कामींच फक्त या इंद्रियाची योजना आहे. ह्मणजे गंध परीक्षणाचें तें एक द्वार आहे. ह्मणजे या द्वारानें आत्माधिष्ठित ज्ञान गंध विषयाकडे वळतें. पण या घ्राणेंद्रियाचे ठिकाणीं ज्ञान नाहीं.

प्रकृत विवेचनावरून वाचकांचे लक्षांत आलेंच असेल कीं, वरील पंच ज्ञानेंद्रियांचे ठिकाणीं ज्ञानाची स्थिति आहे असें कोणत्याहि रीतीनें सिद्ध होत नाहीं. आतां या इंद्रियांस ज्ञानेंद्रियें ह्मणण्याचें कारण

इतकेंच कीं, त्या त्या इंद्रियाचे योगानें तत्तद्विषयक ज्ञानाची आ त्म्याचे ठिकाणीं जागृति होते. पण तेवढ्यावरून त्या इंद्रियांचे ठि काणीं ज्ञान आहे असें ह्मणतां येणार नाहीं. ज्याप्रमाणें शरीरास हीं पंच ज्ञानेंद्रियें आहेत त्याचप्रमाणें हस्त पादादि पंच कर्मेंद्रियें हि आहेत. कर्मेंद्रियांचे योगानें मनुष्य कर्म- करितो आणि ज्ञानेंद्रियांचे योगानें आत्मा त्याचा अनुभव घेतो कर्मेंद्रियांचे व्यापाराचें पर्यवसान हि ज्ञानावरच आहे. आणि तें ज्ञान या इंद्रियसमुच्चयास सोडून व आत्म्याला धरून राहिलेलें आहे. आतां इंद्रियाचे ठिकाणीं ज्ञान नाहीं, याचा अनुभव स्वप्नावस्थेंत आहे. स्वप्नामध्यें आत्म्याला जे अनुभव घडतात व तो ज्या क्रिया करितो त्यास वरील दशेंद्रिया पैकीं कोणाचीहि गरज लागत नाहीं. स्वप्नस्थितींत तो या देहाच्या पायांवाचून धांवतो, हातांवाचून मारामार करतो, डोळ्यांवांचून अनेक तऱ्हेचे चमत्कार आवलोकन करतो, कानावाचून एखाद्या गवयाचें गाणें ऐकतो, व तोंडावांचून पाहिजे तेवढी बडबड करतो. तेव्हां इंद्रियांवाचून आत्म्याचे ठिकाणीं भोगपरिज्ञान आहे हें उघड होतें. इंद्रियें हीं विषयोपभोगाचीं साधनें असून भोगपरिज्ञान आत्म्याचे ठिकाणींच आहे. ह्मणजे ज्ञानाचें अधिष्ठान आत्मा आहे.

- येथपर्यंत जें विवेचन झालें त्यांत ज्ञान हें आत्म्याचे ठिकाणीं राहतें इतका इत्यर्थ ठरला. पण प्रस्तुत विषयामध्यें ज्ञानाचें नुस्तें वास्तव्य च समजून निर्वाह होत नाहीं. तर त्याची योजना वास्तविक व्हावी कुणीकडे व प्रस्तुत कुणीकडे केली जात आहे हा मुख्य विचार करणें आहे. अमुक ठिकाणीं अग्नी आहे, अमुक रितीनें तो उत्तेजित होतो, व अमुक कृतीनें त्यापासून मनुष्याचीं अमुक अमुक कार्यें होतात, हें नुसतें अग्नीच्या स्थितीचें, स्वरूपाचें, आणि शक्तीचें वर्णन झालें. पण येवढ्या वरून इच्छित कार्याची सिद्धी होणार नाहीं. कारण त्याची सम्यग्योजना केल्याविना कार्य घडणार नाहीं. सम्यग्योजनेनें जो

अग्नी पाण्याची वाफ करून त्या योगानें आगगाड्या, आगबोटी, व अनेक तऱ्हेचीं जबरदस्त यंत्रें चालवूं शकतो, व तद्द्वारा कोठ्यावधी लोकांचें हित करितो, तोच अग्नी अस्ताव्यस्त टाकिला असतां गावच्या गांव जाळून टाकितो, किंवा अनेक यंत्रादिकांचाहि क्षणांत नाश करितो. याकरीतां त्याची योजना नीट केली पाहिजे. कारण त्याची स्वभाविक प्रवृत्ति जाळण्या कडे असते, त्याचप्रमाणें आत्माधिष्ठित जें ज्ञान आहे त्याची स्वाभाविक प्रवृति विषयां कडे असते. कारण, अगोदर विषय आणि मागाहून मनुष्याची उत्पत्ति असा सृष्टिक्रम दिसतो. तेव्हां विषयांकडे आत्म्याची प्रवृत्ति असणें साहजीक आहे. आणि दुसरें कारण असे कीं, मनुष्य उत्पन्न झाला ह्मणजे त्याची सर्व स्थितिहि विषयांतच असते. त्याच्या अंतःकरणांत ज्ञानांकुराचा उद्भव होण्यापूर्वीच ह्मणजे ज्ञानांकुराचें बीजारोपण होण्या बरोबर त्याजवर विषयरूपी उदकाचे सिंचनाची सुरवात होते. व पुढें याच उदकानें तो ज्ञानवृक्ष वाढून विस्तृत होतो. ह्मणजे जन्मादारम्य मनुष्यास विषयांची संगती असून त्याची स्थिति हि विषयांतच असल्यामुळें त्याच्या आत्म्याची प्रवृत्ति विषयांकडे असते यांत मोठेंसें नवल नाहीं. आतां विषय शब्दाचा अर्थ केवळ स्त्रीसंग असें मात्र कोणी समजूं नये. जेवढे ऐहिक भोग तेवढे सर्व विषय होत. घर दार, आतसोयरे, स्त्रिया, इष्टमित्र, पुत्रपौत्र, बंधुवर्ग, घोडे, गाड्या, दासदासी, राज्यसुखोपभोग वगैरे हे सर्व विषय होत. तेव्हां या विषयांकडे आत्म्याची प्रवृत्ति किती असते, व या विषय सुखाला मनुष्य किती भुलून जातो हें सांगण्याची गरज नाहीं. मनुष्य मात्रास त्याचा अनुभव आहे, निद्रा, आहार आणि मैथुन हीं विषय जन्य सुखें होत. या सुखस्थितीची मनुष्यास' अति उत्कंठा असते. मोठेमोठे ज्ञानी, त्रिकालज्ञ, तपस्वी, पराक्रमी, व महा समर्थ पुरुषहि य विषयांचे नादीं लागून फशी पडले आहेत. विश्वामित्राची

स्थिति सर्वांस माहित आहेच. ज्याणें साठ हजार वर्षें लोहपिष्ट खाऊन तपश्चर्या केली, क्रोध दृष्टीनें आवलोकन केलें असतां एखाद्या महा पर्वताचें चुर्ण करण्याविषयीं समर्थ असें ज्याच्या तपश्चर्येचें तेज, 'शापादपि शरादपि' असा ज्याचा पराक्रम, ज्याणें प्रतिसृष्टी निर्माण करून ब्रह्मदेवाच्या गर्वाचें हरण केलें, ज्याच्या तेजाला पाहून पृथ्वीपती गर्भगलित होत्साते हात जोडून ज्याच्या पुढें उभे राहत असत, व ज्याची आज्ञा शिरसा मान्य करण्या विषयीं देवताहि तयार असत, असा तेजस्वी, तपस्वी, पराक्रमी व उग्रमूर्ती जो विश्वामित्र त्याची मेनकेनें किती फजिती केली? त्यास तपभ्रष्ट करून आपले मागून श्वान रूपानें तिणें हिंडविलें. सर्व विषयांमध्यें स्त्रिया प्राधान्य होत. स्त्री विषयाचे नादीं पुरुष जितका लागतो तेवढा इतर विषयाचे इच्छेनें तो नादावत नाहीं. व स्त्रियांची पुरुषांविषयींहि अशीच स्थिति जाणावी. तेव्हां तात्पर्य काय कीं आत्म्याची प्रवृत्ति स्वभावत: विषयांकडे असते. आतां जिकडे आत्म्याची प्रवृत्ति असते तिकडेच मनुष्याचे सर्व विचार असतात हें उघड आहे. यामुळें स्वाभाविक विषयोपभोगाची इच्छा जागृत असून सर्व विचारांची तंद्री तिकडेसच असते. आतां हे विषय एकाकी सुटणें जरी दुर्घट आहे तथापि त्यांपासून दूर असण्याचा मनुष्यानें सर्वदा यत्न करीत असलें पाहिजे. विषय हे नाशिवंत असल्यामुळें त्या पासून होणारें सुखहि क्षणिकच असतें. याकरितां अखंड व पूर्ण सुखानुभवाविषयीं मनुष्यानें अवश्य यत्न केला पाहिजे. हें पूर्ण सुख अध्यात्मविचारावांचून अनुभूत होणार नाहीं. अध्यात्मविचाराची योग्यता अंगीं येण्यास ज्ञान परिपक्व दशेस आलें पाहिजे. ह्मणजे यथोचित कर्माचरणांचे योगानें शुद्धांत:करण होत्साता मनुष्य या अध्यात्म विचारा विषयीं तत्पर झाला ह्मणजे त्याचें ज्ञान पूर्ण विकास पावतें या अध्यात्म विचारा विषयीं ज्ञानच श्रेष्ठ आहे असें सांगितलें. पण यावरून कर्मांपासून मात्र पराङ्मुख होतां उपयोगी

नाहीं. कारण चित्तशुद्धीचें मुख्य साधन कर्म आहेत. ज्ञानमार्ग आणि कर्ममार्ग असे मोक्ष संबंधी दोन पंथ आहेत. आतां हे दोन पंथ फक्त दिसण्यांत असून वादमात्र आहेत. तथापि परिणामी कर्माचें पर्यवसान ज्ञानच आहे. ज्ञान उत्पन्न होण्याला अंतःकरणाची शुद्धी झाली पाहिजे. आणि अंतःकरण शुद्ध होण्यास कर्म प्राधान्य आहे. योगाभ्यासादिक हे कर्ममार्ग होत. मोक्षाला हे दोन्हीहि सारखेच आहेत.

द्वौ क्रमौ चित्तनाशस्य योगो ज्ञानंच राघव।
योगो वृत्तिनिरोधोहि ज्ञानं सम्यगवेक्षणं ॥
असाध्यः कस्यचित् योगो कस्यचित्तत्त्वनिश्चयः।
प्रकारौ द्वौ ततो देवो जगाद परमः शिवः ॥

रज्जूवर ज्या प्रमाणें सर्पाचा भास व्हावा तद्वत या माया वेष्टीत क्षणिक सृष्टी विषयीं मनास वाटलेला जो सत्यत्वाचा भास त्याच्या नाशा विषयीं यथार्थ ब्रह्मज्ञान हेंच मोक्षाला कारण आहे; किंवा योगाभ्यासानें कल्पना शक्तिचा जो निरोध होतो तोहि मोक्षप्रद आहे. मिळून तात्पर्य इतकेंच कीं, कल्पनेचा नाश झाला पाहिजे. आतां याजवर कदाचित् कोणी अशी शंका घेईलकीं, या निःसार संसाराचेठायीं अरती धरून वैराग्यानें युक्त होत्साते विवाहादिक न करतां जे पुरुष संन्यास करतात त्यास मोक्ष प्राप्ती होते असें सांगितलें आहे तेव्हां आतां कर्माची किंवा ज्ञानाची गरज काय? अशा अर्थाचीं जीं वचनें असतात त्यांचा पूर्वापार संबंध मनांत आणून नंतर त्याची विधि वाक्यता ठरवावी लागते. या सन्यासा विषयीं भगवद्गीतेंत सांगितलें आहे तें असें:—

नकर्मणा मनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषो श्नुते ॥
नच सन्यसनादेव सिद्धिः समधिगच्छति ॥

कर्माचे योगानें चित्तशुद्धि होते, चित्तशुद्धि झाल्यानें आत्मानात्म विचार समजतो, आणि आत्मानात्म विचार हेंच वास्तविक ज्ञान होय. तेव्हां कर्माचे योगानें तरी चित्तशुद्धि होऊन ज्ञान प्राप्ति होते ह्मणून कर्म हीं मनुष्यास अत्यावश्य आहेत. आत्मविचारा विषयीं ज्ञान उत्पन्न झालें नसेल तर नुसत्या संन्यास ग्रहणानें मोक्षप्राप्ती होणार नाहीं. संन्यास तरी ज्ञानी पुरुषासच शोभतो. ज्ञानाचे योगानें परमात्म स्वरूपाचा आत्मत्वें करून साक्षात्कार झाला ह्मणजे त्या पुरुषास ब्रह्मविद् ह्मणतात. नंतर तो ब्रह्मवेत्ता पुत्रेषणा, वित्तेषणा, इत्यादिक ज्या ऐहिक भोगाच्या प्रवृत्ति त्यांचा त्याग करून भिक्षावृत्तीनें राहतो. पण ही वृत्ती ज्ञाना वांचून व्यर्थ आहे. अज्ञानी आहे त्यास ही वृत्ती इहपरत्र सुखापासून दूर करिते आणि जो ज्ञाता आहे तो या संन्यास वृत्तीनें मोक्षास जातो. आतां ज्ञात्यास तरी ही संन्यास दीक्षा अवश्य च आहे असेंहि ह्मणतां येत नाहीं. कारण गर्ग, वसिष्ठ, आदिकरून जे ज्ञानी ते संन्यास विरहित असतांहि ब्रह्मवेत्ते ह्मणून त्यांची प्रसिद्धि आहे. तेव्हां तात्पर्य कायकीं, अध्यात्म विचारास व मोक्षसाधनास ज्ञानाची अवश्यकता आहे. ज्ञान हें चित्तशुद्धि झाल्यावांचून प्राप्त होत नाहीं व चित्तशुद्धीलों यथोचित कर्म हें अवश्य आहे. तेव्हां मनुष्य मात्रानें वर्णाश्रम धर्म पाळले पाहिजेत हें उघड आहे. आतां हें मात्र लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, जें कर्म करण्याचें तें यथासांग न झालें तर त्यापासून चित्ताची शुद्धी न होतां त्या कर्माचा फुकट भार मात्र होईल. नुसतें दंभ माजवून चित्तशुद्धी होत नाहीं

आतां ज्ञानमार्ग असो किंवा कर्ममार्ग असो, कोणत्याहि मार्गानें गेलें तरी अखेर अध्यात्म विचार केल्यावांचून मोक्षप्राप्ति होणार नाहीं. अध्यात्म विचाराचे योगानें ब्रह्मसाक्षात्कार होतो. ब्रह्मसाक्षात्कार हाच पूर्णसुखानुभव आहे. मनुष्याचें जें कांहीं कर्तव्य ह्मणून आहे तें हेंच. यास अध्यात्म विचार पाहिजे. वेदांत श्रवणाचे

योगानें अध्यात्म विचार करून श्रुति, युक्ति, आणि अनुभव यांहीं करून आत्मा—सुखदुःखरूप जीं देहेंद्रियादिक—त्याहून निराळा आनंदात्मक ब्रह्मरूपच आहे अशी खात्री झाल्यामुळें त्या आनंदस्वरूप आत्म्याचे ठायींच ज्याची निरतिशय प्रीति आहे अशा मनुष्यास मग कांहीं कर्तव्य उरत नाहीं. आतां ब्रह्मसाक्षात्काराची इच्छा झाली असतां प्रथम आत्म विचार करावा असें उपनिषदादिकांत सांगितलें याचें कारण इतकेंच कीं स्त्रिया आपले गळ्यांत नथ आडकवली असूनहि ती सांडली अशा भावनेनें सर्व घर हुडकूं लागतात, आतां नथ आपले गळयांत आहे अशी खात्री होण्यास तिणें आपला गळा पाहिला ह्मणजे झालें. परंतु हें कार्य गळयाला हात न लावतां आरशांत पाहिल्यानें सहज होतें. आरशांत पाहूं लागली ह्मणजे आरशांतील प्रतिबिंबाचे गळ्यांत ती नथ दृष्टीस पडते व त्यामुळें ती आपल्या पाशींच आहे असा तिला बोध होतो. तद्वत आत्मा जरी ब्रह्मरूप आहे व आपल्या जवळच आहे तथापि विचार रूपी आदर्शनांत पाहिल्यावांचून त्याचा साक्षात्कार होत नाहीं.याकरितां ब्रह्मसाक्षात्कारास अध्यात्मविचार अवश्य सांगितला आहे. ब्रह्म तरी तेंच, किं ज्यापासून हीं भूतें उत्पन्न होतात, ज्याचे सत्तेनें तीं स्थिति पावून व्यवहार करितात, आणि शेवटीं ज्यांचा लयहि त्याचेच ठिकाणीं होतो. आतां आनंदमय आत्मरूप तेंच ब्रह्म होय. परंतु हें दुर्ज्ञेय आणि सर्वांतर असल्यामुळें एकाकी त्याचा बोध होणार नाहीं म्हणून पंचकोश क्रमानें त्याचें विवरण केलें आहे. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय, असा आत्मा पंचकोशात्मक आहे. आत्म्यास कोशपरत्वें स्थूल सूक्ष्म आकार आहेत.. तथापि वस्तुतः आत्मा हा ब्रम्हरूप आहे. म्हणजे आत्मा हेंच ब्रम्ह आहे. आतां कोणास असें वाटेल कीं ब्रह्म हें जर आत्म्याचेंच आनंदमय स्वरूप आहे तर मग त्याजबद्दल विचार करण्याचें कारण काय? अध्यात्म विचाराचे खटपटींत पडून,

वदांतादिकाचे श्रवणानें श्रोत्रेंद्रियांना त्रास करून घेण्यापेक्षां स्वतः आनंदानें वागावें ह्मणजे आपण ब्रह्मरूपच आहों. तसेंच अध्यात्म विचारजन्य जो ब्रह्मसाक्षात्कार हा घडण्यास सृष्ट पदार्थ किंवा स्थूल देहधारी मनुष्याचे विचार तरी कशाला पाहिजेत असेंहि कदा चित् कोणास वाटेल. परंतु अशा तऱ्हेच्या ज्या अनेक प्रकारच्या शंका त्यांचा निरास होण्यासच अध्यात्मविचार प्राधान्य होय. जों पर्यंत मनुष्याच्या अंत:करणांत अनेक प्रकारचे तरंग व नाना तऱ्हेच्या शंका येतात तेथपर्यंत विचार हा अवश्य आहे. विचारावांचून शंकेचें समाधान व्हावयाचें नाहीं. आणि मनुष्याच्या शंकांचें समाधान झाल्यावांचून त्यास आनंद होणार नाहीं. समाधान आणि आनंद एकरूप आहेत. ह्मणजे समाधान झालें किं तेथें आनंद आहेच. आणि आत्मानंद हेंच ब्रह्मरूप ह्मणून पुर्वी सांगितलेंच आहे. आतां येथें अशी येक शंका येण्या जोगी आहे कीं, आनंदानुभव हाच जर ब्रह्म साक्षात्कार आहे तर मग मनुष्य प्रतिदिनी या ब्रह्मसाक्षात्कारास पावतो. मग अध्यात्मविचार करून तरी कर्तव्य तें काय? आतां परमानंद ब्रह्मरूप आहे हें खरें व मनुष्यास आनंद होतो हेंहि खरें. पण त्या आनंदापासून ब्रह्म साक्षात्कार झाल्याचें किंवा अशा आनंदी मनुष्यास ब्रह्मवेत्ता ह्मटल्याचें अनुभवास येत नाहीं ही गोष्ट तर निर्विवाद आहे. कांहीं पुरुष तर असे आनंदी असतात कीं, आनंद सुखांत त्यांस ढोंगाच्या वस्त्राची देखील दाद नसते. सुरापानादिकांचे योगानें आनंदमय झालेले विद्वान व अविद्वान रस्त्यां तून झोकांड्या खात व डुलत आणि झुकत चालतांना आपण पहातों, पण त्यांच्या ठिकाणीं ब्रह्मसाक्षात्कार दृष्टिगोचर तर होत नाहींच पण ते आनंदी प्राणी किंवा ज्यांच्या विशेषणाचें आद्याक्षर काढलें असतां शंकराचे वाहनासहि लज्जा उत्पन्न करणारे असे ते नरपशु सुराभक्त गटारामध्यें लोळकुंड्या मारीत पडतात, तेव्हां हा आनंद रूप

चा ब्रह्मसाक्षात्काराशीं विरोधीपणा दिसतो. तेव्हां त्याच्या प्रति पादनास बाध येतो असें सकृद्दर्शनीं वाटेल. पण विचार करून पाहिलें असतां तसा प्रकार मुळींच नाहीं. ह्मणजे आत्म्याचें आनंदमय रूपच ब्रह्म आहे. आतां वर जे आनंदी पुरुष सांगितले त्यांस त्या ब्रह्माचा साक्षात्कार व अनुभव होत नाहीं. याचें कारण, तो आनंद दुःख परिणामी होय. ह्मणजे आनंद दोन प्रकारचा आहे. एक विषय जन्य आनंद आणि दुसरा ब्रह्मानंद. विषय जन्य आनंद दुःख परि णामी असून अंतःकरणास उद्विग्नता व तिरस्कार उत्पन्न करणारा आहे. आणि ब्रह्मानंद हा सुखपरिणामी व अवीट आहे. आतां या आनंदाचे असे दोन भेद पडण्याचें कारण इतकेंच कीं, पहिला ह्मण जे विषयजन्य आनंद हा मानीव व क्षणिक असून दुसरा ह्मणजे ब्रह्मा नंद सत्यरूपी आणि चिरकालीक आहे. असी कल्पना करा कीं, रंग भूमीवर नाटककार मंडळीनें खेळाची सुरवात केली त्यांत एक राजाचें सोंग आणलें. वरील नाटक पहाण्यास ज्या ठिकाणीं तें नाटक होत आहे त्याप्रदेशाचा व जी मंडळी नाटक करिते त्या मंड ळीचा राजा प्रत्यक्ष त्या ठिकाणीं येऊन तें राजाचें सोंग पहात आहे. आतां रंगभूमी वरील त्या सोंगाडे राजे साहेबांस मानसन्मान देणें व त्याच्या आज्ञा पालन करून त्याचे हुकूम अाम लांत आणणें हें काम त्या खरे राजेसाहेबांचे तोडींचेंच होईल. पण तें कोठपर्यंत? राजे साहेब पडद्याच्या आंत जात तों पर्यंत. ते पडद्याच्या आंत गेले ह्मणजे कदाचित् मालदाराची सामानाची पेटी डोक्यावर घेऊन घरीं जाण्याचाहि त्यांस प्रसंग येईल. पण खरे राजे साहेबांची स्थिति पाहून फारच निराळे तऱ्हेची असते. आतां एकंदर या पृथ्वीरूप रंग भूमीवर पाहिलें असतां मोठे सार्वभौम बादशाहाहि नाटकांतील सोंगांप्रमाणेंच आहेत. परंतु प्रकृत उदाहरण हें वरील दोन प्रकारच्या आनंदांस लागू पडेल ह्मणून

घेतलें आहे. नाटकांतील राजे मानीव व क्षणिक असल्यामुळें कांहीं वेळानें त्या राजे साहेबांस डोक्यावर बोजा उठवावा लागतो, तद्वत विषयानंदी पुरुषास आनंदाचे भरांत एखाद्या गटारांत लोळकंडी मारावी लागते, किंवा मूत्र विसर्जनास प्रतिबंध झाल्यामुळें सर्व लज्जा गुंडाळून एखाद्या डाक्टरा पुढें उभें राहवें लागतें, किंवा अशाच तऱ्हेच्या दुसऱ्या एखाद्या दुःखास डोकें द्यावें लागतें. याचें कारण विषय जन्य आनंद हा खरा आनंद नसून केवळ मानीव असतो यामुळें त्याचा नाश होतो. निद्रा, आहार, आणि मैथून हीं विषयजन्य आनंदाचीं स्थानें होत. पण या पासून सर्वांस, सर्व वेळीं, व सर्वत्र आनंद होत नाहीं. पण ब्रह्मानंदाचा प्रकार तसा नाहीं. ब्रह्मानंदा विषयीं कधींच विट येत नाहीं. तो आनंद अनुभविण्यास ज्ञानी लोकच पात्र होत, विषयी पुरुषांस त्याचा गंधहि मिळणार नाहीं. कारण, विषयोपभोग हा अविचारांचा मूळ पाया होय. आणि ब्रह्मानंदाचा अनुभव होण्यास अध्यात्म विचाराची अवश्यकता आहे. “ कोहं कथमिदं जातं कोवा कर्तास्य विद्यते ” हा विचार विषयी पुरुषास होणार नाहीं. कारण त्याची असक्ति विषयावर असते. आणि अध्यात्म विचार तर पुरुषास विषयां विषयीं तिरस्कार उत्पन्न करून विषयां पासुन त्यास पराङ्मुख करितो. विषयां विषयीं निदध्यास हा पुरुषास सर्वकाळ स्वाभाविक असतो. आणि या विषयोपभोगाची इच्छा इतकी प्रबळ असते कीं, सार्वभौम राजासहि त्या विषयीं तृप्ती होत नाहीं. या विषय संबंधी तृष्णेनें मनुष्य अगदीं वेडावून जातो. एका कवीनें ह्मटलें आहे:—

निस्वो व्येकशतं शती दशशतं सोपीह लक्षंशतं ।
लक्षेश: क्षितिराजतां क्षितिपतिश्चक्रेशतां वांच्छति ॥
चक्रेश: सुरराजतां सुरपतिर्ब्रह्मास्पदं वांच्छति ।
ब्रह्मा विष्णुपदं हरि: शिवपदं तृष्णावधिं को गत: ॥

म्हणजे दरिद्री असतो तो आपल्यास शंभर रुपये मिळावे म्हणून इच्छा करितो, ज्याचे जवळ शंभर आहेत त्यास हजार मिळविण्याची इच्छा असते, हजार रुपये ज्या जवळ आहेत त्यास लक्षाधीश होण्याची इच्छा असते, लक्षाधीश पृथ्वीपती होण्याची इच्छा करितो पृथ्वीपती असतो त्यास सार्वभौम व्हावें अशी इच्छा होते, सार्वभौम असतो त्यास अश्वमेधादिक यज्ञाचे योगानें इंद्रपद मिळवावें अशी इच्छा होते, इंद्र ब्रह्मपदाची इच्छा करितो, ब्रह्मदेव विष्णुपद प्राप्त व्हावें म्हणून प्रयत्न करितो, आणि विष्णु तर शिवपदाची इच्छा करितो. तेव्हां अजिंक्य व अपार अशी जी तृष्णा तिच्या स्वाधीन पुरुष झाला म्हणजे अनेक जन्म घेतले किंवा यावज्जीव अनेक प्रयत्न केले तथापि भोगेच्छा तृप्त होणें कठीण. म्हणूनच ज्ञानी लोक या विषयांचा नाद सोडण्या विषयीं सांगतात. या विषयावरील आसक्ति कमी होण्यास अध्यात्म विचार केला पाहिजे अंत:करणांत अध्यात्म विचाराचे विजारोपण होण्यास वेदांत श्रवण हें मुख्य साधन होय. वेदांतश्रवणानें विषयांची योग्यता समजून ते दु:खपरिणामी आहेत अशी चित्ताची खात्री झाली म्हणजे त्या विषयीं स्वाभाविकच अनासक्ति उत्पन्न होते. ती अनासक्ति उत्पन्न झाली म्हणजे या सृष्टीशीं आपला संबंध कोणत्या प्रकारचा आहे, आपण आलों कोठून, जाणार कोठे, आपल्यास कर्तव्य काय, विषय उत्पन्न झाले कशा पासून, त्यांची संगती केल्या पासून परिणाम काय होईल, देह हा काय पदार्थ आहे, या देहाचा व आत्म्याचा संबंध काय, या देहावर सत्ता मिरवणारा जो मी तो कोण आहें, आत्मा आणि परमात्मा यांचा संबंध काय, इत्यादि गोष्टीं विषयींचा जो विचार तोच अध्यात्मविचार होय. पण हे विचार मनुष्याच्या मनांत येण्यास ऐहिक यातायातींतून तो मोकळा झाला पाहिजे. आतां या मोकळेपणा करितां त्याणें प्रपंचादिक सोडलेच पाहिजेत असें नाहीं,

प्रपंचामध्यें राहूनहि त्यास मोकळेपणानें वागतां येतें. मात्र इतकेंच केलें पाहिजे कीं, हरयेक वस्तूवर त्याचें स्वात्मत्व व ममत्व आहे असें तो मानीत असतो ती भावना दूर झाली पाहिजे. ह्मणजे मी करीन तें होईल व माझ्या वांचून अमुक व्यक्तिचें चालणार नाहीं किंवा अमुक व्यक्तिवर अवलंबून राहिल्यावांचून आपल्यासहि गत्यंतर नाहीं, अशा समजुतीनें स्त्री पुत्रादिकां विषयीं मनामध्यें भिनलेलें जें अनन्य गतिकत्व त्याचा निरास झाला पाहिजे. ह्मणजे वरील समजूत केवळ भ्रांतिमूलक आहे. या जगामध्यें मनुष्यास सुख दुःखें हीं आकस्मिक येत असतात. त्याच्या कर्तृत्वाकर्तृत्वाचा संबंध आपल्याकडे आहे हें मानणें व्यर्थ होय. अध्यात्मविचाराचे योगानें या भ्रमाचा निराश होऊन सर्व सत्ता एका परमेश्वराची आहे, व त्यास शरण जाऊन तादात्म्य स्थिति पावल्या वांचून मनुष्यास सुख व समाधान हीं प्राप्त होणार नाहींत, असा निश्चय होतो. ईश्वरानें मनुष्यास जें ज्ञान दिलें आहे तें केवळ निद्रा, आहार, मैथुनादिक विषय सुखें भोगण्याकरितांच दिलें नसून त्या ज्ञानाचा त्याणें कांहीं तरी विशेष उपयोग केला पाहिजे असा ईश्वरी संकेतच दिसतो. कारण, विषयसुखेच्छा पश्वादिकांत असून तेहि आपली ती इच्छा तृप्त करितात. तेव्हा मनुष्यानें जन्मास येऊन जर पशुपक्षादिकां प्रमाणें विषय सुखांतच आयुष्य घालविलें, तर त्याणें मनुष्य जन्मास आल्याचें सार्थक केलें नाहीं असें ह्मणावें लागेल. ईश्वराचे अमूल्य देणगीचें सार्थक न केल्याबदल विषयी पुरुष हे ईश्वराचे अवकृपेस खचित पात्र होतील. पश्वादिकांस सारासार विचार करण्या सारखें ज्ञान नाहीं त्या अर्थी त्यांचें कृत्य अपराधास पात्र नाहीं, परंतु मनुष्याचे हातून घडलेले अपराध मात्र क्षम्य नाहींत. या करितां मनुष्यानें ज्ञानाचे योगानें वस्तुमात्राची योग्यता जाणून त्या प्रमाणें त्याच्याशीं संगती ठेवावी. व अध्यात्म विचाराचे योगानें आपलें

आत्मिक कल्याण करून घेऊन मनुष्यजन्माचें सार्थक करावें. आतां असें करण्यास त्याणें संसाराचा त्याग करून आरण्यांतच जाऊन राहिलें पाहिजे किंवा 'मातिचरामि' अशा शपथेनें जिच्याशीं गुंतून गेला असेल अशा स्त्रियेला किंवा आप्तादिकांना सोडून दिलें पाहिजे असें नाहीं. संसारांत राहूनच कमलोदक न्यायानें त्यांत लिप्त न होतां आत्मकल्याण करून घ्यावें.

---

# परमार्थबोधक जुनी कविता.

## पद

भज मन रघुविर प्रीति तूं मनुजा ॥
सांगूं मी तुजला किसीरे ॥ भज० ॥ ध्रु० ॥
दुर्बुद्धिजननी असुर संपदा नये नये ये रिती ॥
सग सोडुनी निसंग होई धरि वेगें सत्संगतीरे ॥ १ ॥
अयोध्याधीश हा विधी हरुप जो सनकादिक वंदिती ॥
दृढतर अंतरिं स्मरतां त्याशीं पावशी उत्तमगती ॥ २ ॥
नरतनु दुर्लभ समजुनि ऐशी नये नये मागुती ॥
नकळे तुजला ह्मणउनि शिकवी आनंदतनय या रिती ॥
भज मन रघुविर प्रीति तूं मनुजा ॥ सांगूं मी० ॥ ३ ॥

## पद

वैकुंठीचा राणा माझा भाईरे भलारे बाप ॥
तोडर त्रिदांचा पाई गर्जे तो भलारे बाप॥ध्रु०॥
श्रीमंताचा गाढा मेढा बळियाढा भलारे बाप ॥
त्रैलोक्य वाखाणी तुझा पवाडा भला० ॥ १ ॥
अघहरणा सुखकरणा धरणा भवतरणा भला० ॥
गिरिधरणा करि करुणा कलिच्या उद्धरणा भला० ॥ २ ॥
बहुरंगी सत्संगी शक्ति अर्धांगी भलारे० ॥
स्तंभ विदारुनि प्रगटशि रंगा श्रीरंगा भला० ॥ ३ ॥
काळमुखींचा सोडविला त्वां नरदास भला० ॥
केला नाथ ब्रह्मसरस्वति हरिदास भला० ॥ ४ ॥

# पद

अभिमानी पूर्ण ब्रिदाचा, दासांचे लाड पाळी ॥
कनुवाळ माय माझी, घडी घडी ते सांभाळी ॥ धृ० ॥
अभिमानीं भरली हुंडी, मातेच्या लज्जेसाठीं ॥
जीवविली पद्मावती, जयदेवा केली भेटी ॥
बोलविला वेद रेडा, ज्ञानेश्वर वचनासाठीं ॥ १ ॥
कबिराचे मागीं बैसे, जाठ्याचें शेत राखी ॥
सुरदास मिराबाई, गुंतलासि त्यांचे भाकीं ॥
पैठणीं येकनाथ, गंधाचा वाहे धाक ॥
शबरीचीं उच्छिष्ट बोरें, आवडीनें देव चाखी ॥ २ ॥
बोधल्या तुकोबाची, दाविली साक्ष जगासीं ॥
विसोबा खेंचराचीं, पाऊलें देव सोशी ॥
रामीं हो रामदासा, त्रिकाळीं दर्शन त्याचें ॥
हें काय करणें त्याचें, सत्ता हो भगवंताची ॥ ३ ॥
अभिमानी पूर्ण ब्रिदाचा, दासांचे लाड पाळी ॥

# पद

संत पदाजी जोड ॥ दे हरि ॥ धृ० ॥
संत समागम स्वात्म सुखाचा ॥
उगवी सुंदर मोड ॥ दे हरि साधु० ॥ १ ॥
सुफलित करुनी पूर्ण मनोरथ ॥
पुरवी सर्वहि कोड ॥ दे हरि साधु० ॥ २ ॥
अमृत ह्मणे हरी निज भक्तांचा ॥
शेवट करिशिल गोड ॥ दे हरि साधु० ॥ ३ ॥

# सुभाषित

संपदि यस्य न हर्षो विपदि विषादो रणेच धीरत्वं ॥
तं भुवनत्रयतिलकं जनयति जननी सुतं विरलं ॥ १०८ ॥

" संपत्ती प्राप्त झाली असतां ज्याला हर्ष होत नाहीं. व विपत्तीचें हि जो दु:ख मानीत नाहीं; समरांगणामध्यें जो धैर्यशाली, अशा सत्पुत्राला प्रसवणारी माता त्रिभुवनामध्यें विरळच होय."

नलिकागतमपि कुटिलं न भवति सरलं शुन: पुच्छं ॥
तद्वत् खलजनहृदयं बोधितमपि नैव याति माधुर्यं ॥ १०९ ॥

"कुत्र्याचें शेंपूट नळीमध्यें घालून ठेवलें तरी तें सरळ होत नाहीं, तद्वत दुर्जनास कितीहि सद्बोध केला तथापि तो आपल्या अंगचा दुर्गुण टाकीत नाहीं."

वहेदमित्रं स्कंधेन यावत् कालविपर्यय: ॥
अथैवमागते काले भिंद्याद्घटमिवाश्मनि ॥ ११० ॥

"जों पर्यंत काल प्रतिकूल आहे तों पावेतों शत्रूला खांद्यावर मिरवावा, पण अनुकूल काल येतांच त्याला मातीच्या घड्यासारखा आपटून टाकावा"

उदये सविता रक्तो रक्तश्चास्तमने तथा ॥
संपत्तौच विपत्तौच महातमेकरूपता ॥ १११ ॥

"सूर्य उदयास आला असतां तो जसा रक्तवर्ण व तेजस्वी असतो, त्याच प्रमाणें अस्त समयींहि त्याचें रूप असतें. जे महान आहेत त्यांस संपत्ती प्राप्त झाली असतां व ते विपत्तिग्रस्त झाले असतांहि तेजस्वी व आनंदी असतात."

शुन:पुच्छमिव व्यर्थं जीवितं विद्ययाविना ॥
न गुह्यगोपनं शक्तं नच दंशनिवारणे ॥ ११२ ॥

"विद्येवांचून पुरुषाचें जीवित श्वानपुच्छा प्रमाणें व्यर्थ होय. श्वानाचें पुच्छ त्याच्या गुह्यगोपनाला उपयोगी पडत नाहीं, व त्यानें त्यास माशा वगैरे झाडतांहि येत नाहींत."

त्यजंति मित्राणि धनैर्विहीनं ।
पुत्राश्च दाराश्च सुहृज्जनाश्च ॥
तमर्थवंतं पुनराश्रयंति ।
ह्यर्थो हि लोके पुरुषस्य बंधु: ॥ ११३ ॥

"संपत्ती नष्ट झाली असतां पुरुषास त्याचे मित्र, पुत्र, स्त्री, व आप्त सोयरे हे सोडून जातात. परंतु पुन: तोच पुरुष संपत्तीमान झाल्या असतां ही मंडळी त्याचे सन्निध जमते. या वरून अर्थ हाच पुरुषाचा बंधु होय."

ते धन्या: पुण्य भाजस्ते तैस्तीर्ण: क्लेशसागर: ॥
जगत्संमोहजननी यैराशाशी विर्पीजिता ॥ ११४ ॥

"सर्व जगाला मोहित करणारी जी अशारूपी सर्पिणी ती ज्यांणीं जिंकिली ते पुरुष धन्य होत; पुण्यवानहि त्यांसच ह्मणावें व तेच क्लेशरूपी सागराला तरून गेले असें समजावें."

यत्रानेके क्वचिदपि गृहे तत्र तिष्ठत्यथैको ।
यत्राप्येकस्तदनु बहवस्तत्र नैकोपि चांते ॥
इत्थं चेमौ रजनिदिवसौ दोलयन् द्वा विवाक्षौ ।
काल: काल्या भुवनफलके क्रीडति प्राणिसारै: ॥ ११५ ॥

"ज्या घरामध्यें अनेक मनुष्यें नांदत होतीं तेथें आतां येकटा घरधनी राहतो, जेथें एक पुरुष होता तेथें शेंकडों मनुष्यें नांदु लाग-

लीं, पण कालें करून तीं सर्व नष्ट होऊन तें घर ओसाडच पडलें. याप्रमाणें हा काल कालीसहवर्तमान रात्र दिवसरूपी दोन फांशांनीं पृथ्वी पटावर प्राणीरूपी सोंगटयांनीं खेळत आहे."

हरिणापि हरेणापि ब्रह्मणा त्रिदशैरपि॥
ललाटलिखिता रेखा न शक्या परिमार्जितुं॥ ११६॥

"ब्रह्मा, विष्णु, किंवा शंकर, अथवा तेतीस कोटी देव, यां पैकींहि ललाटलिखित रेषा चुकविण्यास कोणी समर्थ नाहीं."

परवादे दशवदनः परच्छिद्रनिरीक्षणे सहस्राक्षः॥
सद्वृत्तवित्त हरणे बाहु सहस्रार्जुनो नीचाः॥ ११७॥

"नीच पुरुष, दुसऱ्याशीं वाद करण्यांत दशवदन, दुसऱ्याचें छिद्र बाहेर काढण्यांत सहस्राक्ष, आणि दुसऱ्याचें वित्त हरण करण्या विषयीं सहस्रार्जुन होय."

गुणैरुत्तुंगतां याति नोच्चैरासनसंस्थितः॥
प्रासादशिखरारूढः काकः किं गरुडायते॥ ११८॥

"श्रेष्ठपणा येण्याला मनुष्याचे अंगीं उत्तम गुणच पाहिजेत. उंच आसनावर बसलें ह्मणून मोठेपणा येत नाहीं. राजवाड्याच्या शिखरावर कावळा बसला तथापि त्यास कोणी गरुड ह्मणत नाहीं."

अप्रार्थितानि दुःखानि यथैवायांति देहिनां॥
सुखान्यपि तथा यांति दैन्यमत्रातिरिच्यते॥ ११९॥

"इच्छा किंवा यत्न केल्यावांचून पुरुषाला ज्या प्रमाणें दुःखें प्राप्त होतात, त्याच प्रमाणें सुखेंही प्राप्त व्हावयाचींच. असें असून दुःख समयीं व्यर्थ दैन्य दाखविण्यांत अर्थ काय?"

तत्र मित्र न वस्तव्यं यत्र नास्ति चतुष्टयं ॥
ऋणदाताच वैद्यश्च श्रोत्रियः सजला नदी ॥ १२० ॥

"जेथें चार पैसे लागले असतां त्याची गरज पुरवणारा, वैद्य, श्रोत्रिय, व जलानें परिपुर्ण अशी नदी, हीं चार साधनें नसतील त्या ठिकाणीं वास्तव्य करणें निर्फळ होय."

दारिद्र्य शोचामि भवंतमेव ।
अस्मच्छरीरे सुहृदे त्युषित्वा ॥
विपन्नदेहे मयि मंदभाग्ये ।
ममेति चिंता क्व गमिष्यसि त्वं ॥ १२१ ॥

" हे दारिद्र्या तूं माझ्या शरीरामध्यें मोठ्या सुखानें वास्तव्य केलें आहेस. परंतु दुर्दैवानें माझ्या या शरीरीचा नाश झाला असतां तूं कुठे जाशील याची मला फार काळजी वाटते व या मुळें अति दुःख होतें." याचाच एक मराठी श्लोक केलेला आहे. तो असा:——

दारिद्र्यमित्रा वससी शरीरीं ।
माझ्याच तूं मानुनि सौख्य भारी ॥
परंतु वाटे मज दुःख मोठें ।
मेल्यास मी जाशील सांग कोठें ? ॥

उदयन्नेव सविता पद्मेष्वर्पयति श्रियं ॥
विभावयन् समृद्धीनां फलं सुहृदनुग्रहं ॥ १२२ ॥

"सूर्य उदयाप्रत आला असतां तो ज्या प्रमाणें कमलांना शोभा देतो, तद्वत पुरुषास ऐश्वर्य प्राप्त झालें असतां सुहृदादिकांवर अनुग्रह करणें हें त्याचें फल होय."

कृपणेन समो दाता न भूतो न भविष्यति ॥
अस्पृशन्नेव वित्तानि यः परेभ्यः प्रयच्छति ॥ १२३ ॥

"कृपणासारखा दाता आजपर्यंत झाला नाहीं व पुढेंहि होणार नाहीं. कारण, जो आपली संपत्ती स्पर्श केल्यावांचून दुसऱ्यास देऊन टाकतो." म्हणजे दाता असतो त्यास दान करते वेळीं आपले संपत्तीस दात लावावा म्हणजे हातानें द्यावी असें तरी वाटतें आणि कृपणाची संपत्ती जातांना तर त्याच्या दृष्टीसहि पडत नाहीं.

कल्पद्रुमोपि कालेन भवेद्यदि फलप्रदः ॥
को विशेषस्तदा तस्य वन्यैरन्यैर्महीरुहैः ॥ १२४ ॥

"कल्पवृक्षहि जर प्राप्त काला यांचून फलप्रद होत नाहींत, तर मग आरण्यांतील इतर वृक्षांहून त्यांच्या ठिकाणीं विशेष तो काय?"

दानाय लक्ष्मीः सुकृताय विद्या ।
चिंता परब्रह्म विनिश्चताय ॥
परोपकाराय वचांसि यस्य ।
वंद्य स्त्रिलोकीतिलकः स एव ॥ १२५ ॥

"जो पुरुष दानादिकाचे ठायीं लक्ष्मीचा व्यय करितो, विद्येनें सुकृत संपादन करितो, ब्रह्मविचारामध्यें काळ घालवितो, व परोपकाराविषयीं सर्वदा झटतो तो सर्व त्रैलोक्यांत वंद्य होतो."

तीर्थानामवलोकनं परिचयः सर्वत्रवित्ताऽर्जनं ।
नानाश्चर्यनिरीक्षणं चतुरता बुद्धेः प्रशस्ता गिरः ॥
एते संति गुणाः प्रवासविषये दोषोस्ति चैको महान् ।
यन् मुग्धामधुराधराधरसुधापानं विना स्थीयते ॥ १२६ ॥

" प्रवासाचे योगानें अनेक तीर्थांचें दर्शन होतें, अनेक लोकांचा परिचय होतो, संपत्ती मिळते, अनेक तऱ्हेचे चमत्कार पहाण्यास सांपडतात, चतुरस्रपणा आंगीं येतो, व वक्तृत्वशक्तिहि वाढते; अशा तऱ्हेचे या प्रवासाचे ठायीं अनेक गुण असतांहि एक महान् दोष आहे, तो कोणता ह्मणाल तर तरूण स्त्रियेच्या अधर संबंधी अमृतपानावांचून दिवस कंठावे लागतात."

फुल्लेषु यः कमलिनी कमलोदरेषु।
चूतेषु यो विलसितः कलिकांतरस्थः॥
पश्चाद्य तस्य मधुपस्य शरद्व्यपायो।
कृच्छ्रेण वेणु विवरे दिवसाः प्रयांति॥ १२७॥

" ज्या भ्रमरानें प्रफुल्लित अशा कमलांतील मधु सेवन केला, आम्र वृक्षावर ज्याणें गुंजारव केला, व दुसऱ्या अनेक सुवासिक पुष्पांत ज्याणें वास्तव्य केलें त्याच भ्रमराला शरदृतु प्राप्त झाला असतां बांबूच्या छिद्रांत दिवस काढावे लागतात."

किं केकीव शिखंडमंडित तनुः किं कीरवत्पाठकः।
किंवा हंस इवांगनागतिगुरुः शारीव किं सुस्वरः॥
किंवा हंत शकुंतबालपिकव त्कर्णामृतं स्यंदते।
काकः केन गुणेन कांचनमये व्यापारितः पंजरे॥ १२८॥

" मयूर पक्षा प्रमाणें चित्रविचित्र असा तुझा देह आहे काय? किंवा शुक पक्षा प्रमाणें तुझ्या वाणीला पाठाशक्ति आहे? किंवा हंसाप्रमाणें सुंदर स्त्रियांची गति जाणणारा तूं आहेस? किंवा मैनेसारखा तुझा स्वर मधुर आहे? अथवा शकुंत पक्षाप्रमाणें स्वरमाधुर्यानें तूं कोणाचे कर्ण तृप्त केले आहेस? हे कावळ्या कोणत्या गुणानें तूं या सुवर्णमय पिंजऱ्यांत वास केला आहेस?"

# सद्धर्मदीप

अंक ११

# अष्टादश पुराणें.

या विषयावर रा. रा. जनार्दन बाळाजी मोडक यांणीं एक निबंध लिहून रत्नागिरीचे सभेंत वाचून दाखविला. हा निबंध आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस अश्रुतपूर्व असेल व खेरीज त्यांतील माहितीहि उपयुक्त आणि संग्रहार्ह असल्यामुळें तो आह्मी येथें घेतों. हा निबंध कांहीं पुस्तकांतून छापलेला आमचे वाचण्यांत आला आहे. आरंभीं हा सर्व निबंध देऊन नंतर तत्कालीन विद्वानाविषयीं चार शब्द लिहूं. प्रस्तुत निबंधांत पुराणां विषयीं क्रमश: वर्णन केलें आहे तें येणें प्रमाणें:—

## १ पुराणलक्षण.

इ० स० पु० ५६ वर्षांचे सुमारास माळव्यांत विक्रमार्क ह्मणून राजा होता. त्याचा शक सांप्रतकाळीं नर्मदेच्या उत्तरेस चालत आहे. त्याचे पदरीं नऊ मोठे पंडित होते. त्यांची योग्यता मोठी असल्यामुळें त्यांस नऊ रत्नें ह्मणत असत. ते पंडित पुढील श्लोकांत सांगितले आहेत:—

धन्वंतरिक्षपणकामरसिंहशंकु वेतालभट्टघटकर्परकालिदासाः ।
ख्यातो वराहमिहिरो नृपतेःसभायां रत्नानि वै वररुचिर्नव विक्रमस्य
॥ १ ॥

ह्या नऊ रत्नांपैकीं जगद्विख्यात कोशाचा कर्ता जो अमरसिंह त्यानें पुराणाचें लक्षण दिलें आहे तें असें:—

सर्गश्चप्रतिसर्गश्च वंशो मन्वंतराणि च ।
वंशानुचरितं चैव पुराणं पंचलक्षणं ॥ १ ॥

अर्थ—सर्ग ह्म० उत्पत्ति, प्रतिसर्ग ह्म० लय झाल्यावर पुनरुत्पत्ति, देव व प्रजापति यांचें वंश कथन, मन्वंतरांचें वर्णन, सूर्यवंशी व चंद्र वंशी राजांचा इतिहास हे पांच विषय ज्यांत असतील त्या ग्रंथास पुराण ह्मणावें.

हें अमरसिंहानें केलेलें लक्षण हल्लींच्या पुराण ग्रंथांस लागू पडत नाहीं, कांहींस तर तें मुळींच लागू पडत नाहीं, व कांहींस अंशतः लागू पडते. यावरून अमरसिंहाचे काळीं जे ग्रंथ पुराण या नांवानें प्रसिद्ध होते त्यांहून हल्लीं पुराण या नांवानें प्रसिद्ध असणारे ग्रंथ अगदीं भिन्न आहेत हें उघड दिसतें. अमरसिंहाचें लक्षण विष्णु पुराणास जसें लागू पडतें तसें दुसऱ्या कोणत्याही पुराणास तें लागू पडत नाहीं. यावरून इतर पुराणांहून विष्णु पुराणांत फारच थोडा किंबहुना मुळींच, फेरफार झाला नाहीं असें दिसतें. तथापि यांत देखिल कांहीं अवांतर विषय आहेत. मन्वंतर वर्णन व वंशानुचरित या दोहोंच्यामध्यें आचार व श्राद्धपद्धति यांविषयीं एक प्रकरण घातलें आहे. तसेंच कृष्णचरित व दुसऱ्या कित्येक लोकप्रिय व सांप्रदायिक कथा प्रतिसर्ग व वंशवर्णन यांचेमध्यें घुसडून दिल्या आहेत. सारांश बहुतेक पुराणांत वरील पांच विषय किंवा त्यांपैकीं निदान कांहीं तरी यावें तें न येतां धर्मोपदेश, आचार, व्रतें इ० निराळेच विषय आढळतात. यावरून अमरसिंहाचे काळीं पुराणें या नांवानें जे ग्रंथ प्रसिद्ध होते तेच हाल्लीं आपणापाशीं नाहींत, तर त्यांत अनेक फेरफार झालेले असे ग्रंथ पुष्कळ आपणाजवळ आहेत हें स्पष्ट दिसून येतें.

श्रीमद्भागवतांत पुराणांचे महापुराणें व अल्पपुराणें असे दोन भाग करून महापुराणांचीं दहा लक्षणें व अल्प पुराणांचीं पांच लक्षणें, असें सांगितलें आहे. तीं लक्षणें येणेंप्रमाणें.—

सर्गोऽस्याथ विसर्गश्च वृत्तिरक्षांतराणिच।
वंशो वंश्यानुचरितं संस्थानं हेतुराश्रय: ॥ १ ॥
दशभिर्लक्षणैर्युक्तं पुराणं तद्विदो विदु: ।
केचित्पंचविधं ब्रह्मन् महदल्प व्यवस्थया ॥ २ ॥

अर्थ—सर्ग म्हणजे उत्पत्ति, विसर्ग म्हणजे पुनरुत्पत्ति, वृत्ति म्ह० सृष्टिची स्थिति, रक्षा म्ह० रक्षण, मन्वंतरें, वंशकथन, वंशजांचा इतिहास, संस्थान म्ह० सृष्टिचा लय, सृष्ट्युत्पत्तिचा हेतु, व सृष्टीचा आधार हे दहा विषय ज्यांत आहेत त्यास महापुराण म्हणतात. व पांचच ज्यांत आहेत त्यांस अल्पपुराण म्हणतात.

भागवतटीकाकार श्रीधर स्वामी यांणीं आपल्या टिकेंत पुराण लक्षणाविषयीं याच अर्थाचा एक श्लोक दिला आहे तो असा—

अथ सर्गो विसर्गश्च स्थानं पोषणमूतय: ।
मन्वंतरेशानुकथा निरोधो मुक्तिराश्रय: ॥ १ ॥

सर्गश्च प्रतिसर्गश्च इ० हा श्लोक तर विष्णुपुराण, मत्स्यपुराण, वायुपुराण, व दुसरीं कित्येक पुराणें यांत आढळतो. आमरकोशाचा टिकाकार रामाश्रम यानें "वंशानुचरितं" याबद्दल "भूम्यादिसंस्थानं" म्ह० भूम्यादिकांचा लय असा पाठभेद दाखविला आहे.

## २ पुराणांचीं दैवतें.

विष्णु, शिव, शक्ति हीं पुराणांचीं मुख्य उपास्य दैवतें आहेत.

## ३ पुराणें रचण्याचीं कारणें.

स्त्रिया व शूद्र यांना धर्माचें ज्ञान होणें अवश्य आहे. परंतु त्यांस यज्ञोपवीत धारण करण्याचा अधिकार नाहीं. यास्तव त्यांना धर्माचें ज्ञान व्हावें म्हणून पुराणें रचिलीं. असें वेदभाष्यकार सायणाचार्य म्हणतात. दुसरें एक पुराण रचण्याचें कारण असें आहे कीं, वैष्णव, शैव, व शाक्त या पंथाचे लोकांना आपापल्या उपास्य दैवतांचें अतिशय माहात्म्य वाढवावयाचें होतें म्हणून त्यांनीं हे ग्रंथ रचून आपला

हेतु सिद्धीस नेला.

४पुराणांचीं नावें.

पुराणाचे नांवाच्या प्रथमाक्षरांचा संग्रह एका श्लोकांत केला आहे तो श्लोक असा—

मद्वयं भद्वयं चैव ब्रत्रयं वचतुष्टयं ।
नालिंपाग्नि पुराणानि कुस्कं गारुडमेवच ॥ १ ॥

ह्यापासून पुराणाचीं नांवें निघतात तीं येणें प्रमाणें:—

| | | |
|---|---|---|
| १ ब्रह्मपुराण. | ७ मार्कंडेयपुराण. | १३ स्कंदपुराण- |
| २ पद्मपुराण. | ८ अग्निपुराण. | १४ वामनपुराण. |
| ३ विष्णुपुराण. | ९ भविष्यपुराण. | १५ कूर्मपुराण. |
| ४ वायुपुराण. | १० ब्रह्मवैवर्तपुराण. | १६ मत्स्यपुराण. |
| ५ श्रीमद्भागवतपु० | ११ लिंगपुराण. | १७ गरुडपुराण. |
| ६ नारदपुराण. | १२ वराहपुराण. | १८ ब्रह्मांडपुराण. |

श्रीमद्भागवतांत पुराणांचीं नांवें सांगितलीं आहेत त्यांत वायुपुराणाचें नांव मुळींच नसून त्याबद्दल शिवपुराणाचें नांव आहे. तीं नांवें येणें प्रमाणें.—

ब्राह्मं पाद्मं वैष्णवं च शैवं लैवं सगारुडं ।
नारदीयं भागवतमाग्नेयं स्कांदसंज्ञितं ॥
भाविष्यं ब्रह्मवैवर्तं मार्कंडेयं सवामनं ।
वाराहं मात्स्यं कौर्मंच ब्रह्मांडाख्यमिति त्रिषट् ॥

(भा. स्कं. १२ अ. ७ श्लोक २३—२४

हींच नांवें विष्णुपुराणांत वर सांगितलेल्या अनुक्रमानें दिलीं आहेत तीं अशीं—

आद्यं सर्व पुराणानां पुराणं ब्राह्ममुच्यते ।
अष्टादश पुराणानि पुराणज्ञाः प्रचक्षते ॥
ब्राह्मं पाद्मं वैष्णवं च शैवं भागवतं तथा ।

अथान्यन्नारदीयं च मार्कंडेयं च सप्तमं ॥
आग्नेयमष्टमं चैव भविष्यं नवमं तथा ।
दशमं ब्रह्मवैवर्तं लैंगमेकादशं स्मृतं ॥
वाराहं द्वादशं चैव स्कांदं चात्र त्रयोदशं ॥
चतुर्दशं वामनं च कौर्मं पंचदशं स्मृतं ।
मात्स्यं च गारुडं चैव ब्रह्मांडं च ततःपरं ॥
( वि० पु० अंश ३ अ० ६ श्लोक १८—२१॥ )

पुराणांसारखेच उपपुराणें ह्मणून लहान लहान ग्रंथ आहेत त्यांची संख्या ही अठराच आहे. तीं उपपुराणें येणें प्रमाणें.—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ सनत्कुमार | उ. पु. | ७ मानव | उ. पु. | १३ सौर | उ. पु. |
| २ नारसिंह | „ | ८ औशनस | „ | १४ पराशर | „ |
| ३ नारदीय | „ | ९ वरुण | „ | १५ आदित्य | „ |
| ४ शिव | „ | १० कालिका | „ | १६ माहेश्वर | „ |
| ५ दुर्वासस् | „ | ११ सांब | „ | १७ भार्गव | „ |
| ६ कपिल | „ | १२ नंदी | „ | १८ वासिष्ट | „ |

कित्येक ठिकाणीं औशनस व आदित्य यांबद्दल ब्रह्मांड व मारीच अशीं नांवें आढळतात.

### ५ पुराणरचनेचा काळ.

कोणताही ग्रंथ केव्हां रचला गेला या विषयीं निर्णय करणें झाल्यास दोन प्रकारच्या प्रमाणाविषयीं विचार केला पाहिजे. पहिलीं अंतःप्रमाणें व दुसरीं बाह्य प्रमाणें. अंतःप्रमाणें ह्मणजे ज्या ग्रंथाविषयीं आपणास निर्णय करावयाचा असतो तो ज्या ग्रंथकाराचे नांवानें मोडत असेल त्या ग्रंथकाराचे इतर ग्रंथांतील भाषाशैलीशीं सदर ग्रंथाची भाषाशैली ताडून पाहाणें; तसेंच सदर ग्रंथांत ठिकठिकाणीं राजे, मोठमोठे ग्रंथकार, कारागिर, क्षेत्रें, रीतिभाति, ज्योतिषसंबंधी

गोष्टी, इत्यादिकांचें वर्णन असल्यास त्यांवरून सदर ग्रंथाचे कालाविषयीं निर्णय करणें. तसेंच सदर ग्रंथांत कित्येक गोष्टी विस्तारानें इत्थंभूत न सांगतां वाचकांस जणों त्या माहितच आहेत असें कल्पून त्याचें केवळ दिग्प्रदर्शन मात्र केलेलें असतें, त्यावरून सदर गोष्टी कोणत्या तरी पूर्वरचित ग्रंथांत असाव्या इ० अनुमानावरून निर्णय करणें. बाह्य प्रमाण ह्मणजे लोकांत सदर ग्रंथाचे कालाविषयीं जो समज असेल त्याच्या सत्यासत्यतेविषयीं विचार करणें.

पुराण शब्दाचा सामान्य अर्थ जुना पदार्थ असा आहे. त्यावरून प्रथम दर्शनीं पुराणग्रंथ फार जुने आहेत असें कोणास वाटेल. परंतु वास्तविक तशी गोष्ट नाहीं. आमचे अतिशय जुनाट ग्रंथ ह्मटले ह्मणजे वेद होत. वेदांचे रचनेच्या कालाविषयीं जर्मनींतील संस्कृत पंडित म्याक्स मूलर यांचें असें मत आहे कीं सर्वांत जुने वेदांचे भाग आहेत. ते इ०स०पू १४०० वर्षांचे सुमारास रचिले गेले. परंतु मार्टिन हौग या संस्कृत पंडिताचें मत आहे कीं ऋग्वेद संहिता हा वेदांचा फार जुनाट भाग आहे. त्याची रचना निदान इ० स० पू० २४०० पासून २००० वर्षांपर्यंत झाली असावी. सारांश वेदांच्या फार जुनाट भागांची रचना ह्मटली तर ४५०० ।५००० वर्षां पूर्वी झाली असावी असें मानण्यास बाध नाहीं. वेदांच्या ब्राह्मणांची रचना संहितेच्या मागून झाली व ब्राह्मणांचे रचने नंतर गृह्य, श्रौत्र, व सामयचारिक सूत्रें रचिलीं. सूत्रांची रचना होऊन फार वर्षें लोटल्यावर पुराणांची रचना झाली.

जसे वेदांचे सर्व भाग एकच काळीं रचिले नाहींत त्या प्रमाणें सर्व पुराणें एकाच काळीं झालीं नाहींत. जीं फार जुनाट आहेत तीं फार तर इ० स० च्या नवव्या शतकांत झालीं असावीं असें युरोपांतील संस्कृत भाषाभिज्ञ पुरुषांनीं अनेक प्रमाणांनीं सिद्ध केलें आहे. व फार अर्वाचीन जीं आहेत त्यांपैकीं कित्येक इ० स० च्या १४ व्या किंवा

१५ व्या किंवा १६ व्याही शतकांत झालीं आहेत.

वर पुराणें रचण्याचीं कारणें सांगतांना शैव, वैष्णव, व शाक्त या पंथाचे लोकांना आपापल्या उपास्य दैवतांचें माहात्म्य वाढवायाचें होतें हें एक पुराण रचनेचें कारण असें सांगितलें आहे, तिकडे लक्ष दिलें ह्मणजे पुराणें फार अर्वाचीन आहेत या ह्मणण्यास दृढ आधार आहे असें दिसून येईल; कारण शैवपंथ प्रवर्तक शंकराचार्य हे इ० स० च्या ८ व्या किंवा ९ व्या शतकांत झाले, वैष्णवपंथ प्रवर्तकांतील पहिले रामानुजाचार्य हे इ० स० च्या १२ वे शतकांत, मध्वाचार्य १३ व्यांत व वल्लभाचार्य १६ व्यांत झाले. तेव्हां ज्या ज्या पुराणांत ह्या पंथांचीं मतें आहेत तीं ह्या आचार्यांच्या मागून झालीं पाहिजेत. निदान ज्या भागांत तीं मतें आहेत ते भाग तरी आचार्यां मागून रचिले हें सर्वांस कबूल करावें लागेल. ह्यावरून पुराणाची रचना इ० स० च्या ८ व्या शतका पासून १६ व्या शतकापर्यंत झाली हें सिद्ध होतें.

पुराणाचे आर्वाचीनत्वाविषयीं दुसरें एक बलवत्तर प्रमाण असें आहे कीं, कांहीं पुराणांत भविष्याचे मिषानें त्या पुराणांचे रचनेच्या काळीं असलेल्या राजांचे वंश सांगितले आहेत. ह्याप्रकारचीं भविष्यें वायुपुराण, विष्णुपुराण, भागवतपुराण, व मत्स्यपुराण, या चोहोंमध्यें मात्र आढळताव हें खरें; तथापि इतर पुराणांचा आपल्या प्राचीनत्वाविषयीं जितका बाणा आहे त्याहून ह्या चोहोंचा कमी आहे असें नाहीं.

महाभारत, याज्ञवल्कयस्मृति, व मनुस्मृति ह्या ग्रंथांत पुराण शब्द आढळतो इतकेंच नव्हे तर ह्या ग्रंथांहून जुनाट जीं उपनिषदें त्यांत व शुक्लयजुर्वेदाच्या ब्राह्मणांत ही पुराण शब्द आढळतो. परंतु या ग्रंथांतील पुराण शब्द हल्लीं पुराण या नांवानें मोडणाऱ्या ग्रंथांस बिलकूल लागू पडत नाहीं. यास्तव वरील जुनाट ग्रंथांवरून पुराण रचनेच्या काळाचा निर्णय होत नाहीं.

वेदांत सूर्य, चंद्र, उषस्, वायु, वरुण, इंद्र इ० देवतांची स्तुति व माहात्म्य आहे. परंतु त्यांत विष्णु व रुद्र ह्मणजे शिव यांचें फारसें माहात्म्य वर्णिलें नाहीं. वेदांत सांगितलेल्या धर्मसंबंधी गोष्टी साध्या आहेत. पुराणांतील धर्मसंबंधी विचार तितके साधे व सरळ नसून विष्णू, शिव, व शक्ति यांचें माहात्म्य त्यांत फार आहे असें वर सांगितलेंच आहे. यावरून हीं पुराणें फार जुनाट नाहींत असें दिसून येतें.

आतां कोणी असा प्रश्न करील कीं, पुराणें हे जर जुनाट ग्रंथ नाहींत तर त्यांस हें नांव पडण्याचें कारण काय? तर त्यांस उत्तर इतकेंच कीं, वेद, गृह्यादिसूत्रें व जुनाट इतिहास यांतील गोष्टी, कथा, आख्यानें, रीतिभाति, आचारविचार, धर्म, नीति इ० गोष्टींकडे लोकांचें दुर्लक्ष्य होऊं लागलें तेव्हां त्या गोष्टींचा ज्या ग्रंथांत अर्वाचीन काळीं संग्रह करून ठेविला त्या ग्रंथांस पराणें ह्म० पुरातन (पुराण्या) गोष्टींचे अर्वाचीनकाळीं करून ठेविलेले ग्रंथ असें नाव पडलें.

### ६ पुराणांचें वर्गीकरण.

पुराणांचे वर्ग तीन रीतींनीं करतां येतात. पहिली रीति त्यांच्या विशालत्व लघुत्वावरून वर्ग करण्याची. दुसरी त्यांचे आराध्य दैवतांवरून वर्ग करण्याची. तिसरी त्यांचे सत्वादि गुणांवरून वर्ग करण्याची. पहिल्या रीतीनें पुराणांचे मुख्य भेद पुराणें व उपपुराणें वर सांगितलीं आहेत. दुसऱ्या रीतीनें मुख्य पुराणांचे वैष्णव पुराणें, शैव पुराणें, शाक्त पुराणें, व एतद्भिन्न पुराणें असे चार वर्ग होतात. अठरा मुख्य पुराणांपैकीं पद्मपुराण, विष्णुपुराण, भागवतपुराण, नारदपुराण, ब्रह्मवैवर्त पुराण, वराह पुराण, गरुड पुराण, व ब्रह्म पुराण, हीं आठरा वैष्णव पुराणें आहेत. शिव किंवा वायु, अग्नि पुराण, लिंग पुराण, स्कंद पुराण, कूर्म पुराण, व मत्स्य पुराण हीं सहा शैव पुराणें होत. मार्कंडेय पुराणांत देवीमाहात्म्य ह्मणून एक प्रकरणच आहे यास्तव

त्यास शाक्त मानण्यास चिंता नाहीं. बाकीचीं पुराणें चवथ्या वर्गांत येतात. तिसऱ्या रीतीनें मुख्य पुराणांचे सत्वगुणी, रजोगुणी, व तमोगुणी पुराणें असे तीन वर्ग होतात त्याविषयीं क्रम पुराणाच्या ४२ वे अध्यायांत ह्मटलें आहे:—

मात्स्यं कौर्मं तथा लैंगं शैवं स्कांदं तथैवच ।
आग्नेयं च षडेतानि तामसानि निबोधत ॥
वैष्णवं नारदीयं च तथा भागवतं शुभं ।
गारुडं च तथा पाद्मं वाराहं शुभदर्शने ॥
सात्विकानि पुराणानि विज्ञेयानि शुभानि वै ।
ब्रह्मांडं ब्रह्मवैवर्तं मार्कंडेयं तथैव च ॥
भविष्यं वामनं ब्राह्मं राजसानि निबोधत ॥
सात्विकेषु पुराणेषु माहात्म्यमधिकं हरेः
राजसेषु च माहात्म्यमधिकं ब्रह्मणो विदुः ।
तद्वदग्नेश्च माहात्म्यं तामसेषु शिवस्य च ॥
संपुर्णेषु सरस्वत्याः पितॄणां च निगद्यते ।

या श्लोकांत मत्स्यपुराण, कूर्मपुराण, लिंगपुराण, शिवपुराण, स्कंदपुराण, व अग्निपुराण, हीं सहा तमोगुणी; विष्णुपुराण, पद्मपुराण, नारदपुराण, भागवतपुराण, गरुडपु० व वराहपुराण हीं सहा सत्वगुणी; आणि ब्रह्मांडपु०, ब्रह्मवैवर्तपु०, मार्कंडेयपु०, भविष्यपु०, वामनपु०, व ब्रह्मपु० हीं सहा रजोगुणी असें सांगून सत्वगुणी पुराणांत विष्णुचें माहात्म्य फार असतें, रजोगुणी पुराणांत ब्रह्मदेवाचें माहात्म्य फार असतें, व तमोगुणी पुराणांत शिवाचें माहात्म्य विशेष असतें असें सांगितलें आहे.

७ पुराण संहितेची संख्या.

मत्स्यपुराणाच्या ५३ व्या अध्यायांत ह्मटलें आहे कीं,—

चतुर्लक्षमिदंप्रोक्तं व्यासेनाद्भुतकर्मणा ।
मत्पितुर्मम पित्राच मयातुभ्यं निवेदितं ॥१७॥
इहलोकहितार्थाय संक्षिप्तं परमर्षिणा ।
इदमद्यापि देवेषु शतकोटि प्रविस्तरं ॥१८॥

भावार्थ—लोकहितास्तव व्यासानें शतकोटी पुराणसंहितेचा चार लक्ष संक्षेप केला.

श्री मद्भागवतांत ही सर्व पुराण संहिता चार लक्ष सांगून प्रत्येक पुराणाची ग्रंथ संख्या सांगितली आहे ती येणें प्रमाणें—

ब्राह्मं दशसहस्राणि पाद्मं पंचोनषष्टिच ।
श्रीवैष्णवं त्रयोविंशश्चतुर्विंशतिशैवकं ॥
दशाष्टौ श्रीभागवतं नारदं पंचविंशति ।
मार्कंडेयं नव वान्हं दशपंच चतु:शतं ॥
चतुर्दश भविष्यंस्यात्तथा पंचशतानिच ।
दशाष्टौ ब्रह्मवैवर्तं लिंगमेकादशैवतु ॥
चतुर्विंशति वाराहमेकाशीति सहस्रकं ।
स्कांदशतं तथाचैकं वामनं दशकीर्तितम् ॥
कौर्मं सप्तदशाख्यातं मात्स्यंतत्तु चतुर्दश ।
एकोन विंशत्सौपर्णं ब्रह्मांडं द्वादशैवतु ॥
एवं पुराणसंदोहश्चतुर्लक्ष उदाहृत: ।
(श्रीमद्भा० स्कं० १२ अ० १३ श्लो० ४–८॥)

या वरून प्रत्येक पुराणाची ग्रं॰संख्या येणेंप्रमाणें—

| | |
|---|---|
| ब्रह्मपुराण. १०,००० | भाग० पु० १८,००० |
| पद्मपुराण. ५५,००० | नारद पु० २५,००० |
| विष्णु पु०. २३,००० | मार्कं० पु० ९,००० |
| शिवपुराण २४,००० | अग्निपु० १५,४०० |
| भविष्य पु० १४,५०० | वमान पु० १०,००० |

| | |
|---|---|
| ब्रह्मवै० पु० १८,००० | कूर्मपुराण १७,००० |
| लिंगपुराण ११,००० | मत्स्यपु० १४,००० |
| वराहपु० २४,००० | गरुडपु० १९,००० |
| स्कंदपु० ८१,१०० | ब्रह्मांडपु० १२,००० |

४,००,००

मत्स्यपुराणांत ज्या संख्या दिल्या आहेत त्यांची बेरीज ४ लक्षां हून ४८०० अधिक भरते. कारण ब्रह्मपुराणांत ३००० अग्निपुराणांत ६०० कूर्मपुराणांत १०००,आणि ब्रह्मांडपुराणांत २०० अधिक संख्या सांगितली आहे.

८ पुराणांची सरणी.

पुराण ग्रंथांची सामान्य सरणी प्रायः प्रश्नोत्तर रूपानें असते. ह्मणजे एकाद्या व्यक्तीनें दुसऱ्यास एकादे गोष्टीविषयीं प्रश्न करावा व दुसऱ्यानें त्यास सविस्तर उत्तर द्यावें. पूर्वी अमुकानें अमुकास असाच प्रश्न केला होता त्यावेळीं जें त्यानें उत्तर दिलें त्याच्याच आधारानें मी तुह्मांस सांगतों असें प्रायः उत्तर देणारा प्रश्न करणाऱ्यास सांगून आरंभ करतो.

९ पुराणांची भाषा.

श्रीमद्भागवता सारखे कवित्व दाखविण्याकरितां केलेले जे ग्रंथ त्यांशिवाय इतर पुराणांची भाषा सरळ व सोपी असते. कित्येकांत त्यांतील विषयाचे योगानें काठिन्य आलें आहे. छंद प्रायःअनुष्टुप असते भागवतासारख्या ग्रंथांत ठिकठिकाणीं व अन्य ग्रंथांत देवादिकांचीं स्तोत्रें जेथें असतात तेथें मोठीं वृत्तें येतात. पण अनुष्टुप छंदाचा भरणा फार. कोठें कोठें गद्यही असतें. विष्णु पुराणाच्या ४ थ्या अंशाचा बहुतेक भाग गद्यरूप आहे. तसेंच भागवताच्या ५ व्या स्कंधाचे कांहीं अध्याय गद्यात्मक आहेत.

## १० पुराण संहिता प्रवर्तक
## ह्म० मुळचे पुराणिक

श्रीमद्भागवताच्या १२ व्या स्कंधांत ह्मटलें आहे कीं व्यासाजवळ रोमहर्षण सर्व पुराणसंहिता पढला. त्याचे जवळ त्रय्यारुणि, काश्यप, सावर्णि अकृतव्रण, वैशंपायन, व हारीत हे सहाजण पढले. आणि ह्या साहांजवळ रोमहर्षणाचा पुत्र सुत हा पढला. ह्या विषयीं भागवतांत श्लोक आहेत ते हे—

त्रय्यारुणिः कश्यपश्च सावर्णिरकृतव्रणः।
वैशंपायनहारीतौ षड्वै पौराणिकाइमे ॥
अधीयंत व्यासशिष्यात्संहितां मत्पितुर्मुखात्।
एकैकामहमेतेषां सर्वाः समध्यगाम् (?) ॥
कश्यपांऽहंच सावर्णी रामशिष्योऽकृतव्रणः।
अधीमहि व्यास शिष्याच्चतस्त्रो मूलसंहिताः ॥

(भा० स्कंद १२ अ० ७ श्लोक ५—७)

या श्लोकात पुराणाच्या मूळ चार संहिता होत्या व त्या कश्यप, सूत, सावर्णी, आणि अकृतव्रण हे चौघे रोमहर्षणाजवळ पढले असें दर्शविलें आहे.

विष्णु पुराणांत तर सहा पुराण प्रवर्तक निराळेच दिले आहेत ते हे—

पुराण संहिता तस्मै ददौ व्यासो महामुनिः।
सुमतिश्चाग्निवर्चाश्च मित्रयुःशांतपायनः।
अकृत व्रणोऽ थ सावर्णीः षट्शिष्यास्तस्यचाभवन् ॥

यांत सुमति, अग्निवर्चा, मित्रायु, शांतपायन, अकृतव्रण, व सावर्णि हे सहा शिष्य रोमहर्षणाचे असें सांगितलें आहे.

बहुतेक पुराणांचा उपक्रम करणारा सूत आहे. सुताविषयीं वायु व पद्म या दोन पुराणांत असें ह्मटलें आहे कीं पुराण सांगणें हें सुताचें कर्तव्य आहे. त्याचे इतका पुराण सांगण्याचा अधिकार ब्राह्मणास सुद्धां नाहीं. असें आहे तरी विष्णुपुराण व दुसरीं कित्येक पुराणें यांचा उपक्रम करणारा सूत नाहीं.

## ११ पुराणसंहिताकार.

पुराण संहितेचा कर्ता कृष्णद्वैपायन व्यास हा आहे असा सर्वांचा समज आहे. परंतु एका पुराणाविषयीं ह्मणजे श्रीमद्भागवताविषयीं मात्र वाद आहे. कोणी ह्मणतात कीं, तें बोप देव नांवाच्या एका पुरुषानें केलें. व या कारणास्तव ते त्याची गणना अष्टादश पुराणांत न करितां देवी भागवत व्यासकृत आहे असें ह्मणून त्याचीच गणना ते अष्टादश पुराणांत करितात. माझे एका विद्वान स्नेह्याचे सांगण्यावरून असें समजतें कीं, बोपदेवांनीं श्रीमद्भागवत ह्मणून लहानसा दुसराच एक ग्रंथ केला आहे. तो व्यासकृत भागवता इतका मोठा नसून सुमारें त्याचे एक तृतीयांश एवढा येईल. हा वाद बोपदेवकृत भागवत दृष्टीस पडेपर्यंत संपावयाचा नाहीं.

महाभारताचे आदिपर्वांत व्यासचरित पुढें लिहिल्या प्रमाणें वर्णिलें आहे.—

एका कोळयाची मुलगी यमुनेवर नांव चालवित असतां पराशर ऋषि तेथें आले. त्या कोळ्याच्या सुंदर मुलीस पाहून ऋषीस कामोद्भव झाला. तेव्हां “तूं मला भज” अशी तिची ऋषीनें प्रार्थना केली. तिनें सर्व लोक पहात आहेत ही अडचण दाखविली. तेव्हां ऋषीनें धुकें उत्पन्न केलें. ती कन्या एका मत्स्याचे उदरापासून उत्पन्न झाली होती ह्मणून तिचे आंगास घाण येत असे ती जाण्याचा तिनें वर

मागितला तोही ऋषीनें दिला. नंतर आपलें कन्यात्व नष्ट न होण्याचा वर मागून घेऊन ती त्यास अनुकूल झाली. तिचे ठायीं तत्काल पुत्र उत्पन्न झाला. तोच कृष्णद्वैपायन व्यास. तो काळया रंगाचा असल्यामुळें त्याचें नांव कृष्ण हें पडलें. यमुनेच्या द्वीपांत (बेटांत) त्याची उत्पत्ति झाल्यामुळें त्यास द्वैपायन हें नांव मिळालें. त्यानें वेद व इतर ग्रंथ यांची जुळणी केल्यामुळें त्याचें व्यास किंवा वेदव्यास असें नांव पडलें. त्याचा बाप पराशर हा वसिष्ठाचा मुलगा शक्ति याचा पुत्र होता. यावरून व्यास वसिष्ठाचा पणतू होतो. व्यासाच्या आईचें नांव सत्यवती. ती पुढें भीष्माचा बाप शांतनु याची बायको झाली. "तूं जेव्हां जेव्हां माझें स्मरण करशील तेव्हां तेव्हां मी तात्काळ येत जाईन" असें आईस सांगून कृष्णद्वैपायन व्यास तपश्चर्या करण्याकरितां गेला.

बोपदेव हा भारतवर्षीय एक वैयाकरण होता. त्यानें मुग्धबोध म्हणून एक व्याकरण लिहिलें आहे. त्याची मुख्यत्वेंकरून बंगाल्यांत फार प्रसिद्धी आहे. मुग्धबोधावर दुर्गासाची टीका आहे. पाणिनीची अष्टाध्यायी व बोपदेवाचा मुग्धबोध या दोहोंची रचना व परिभाषा ह्या फार भिन्न आहेत. पाणिनीचे व्याकरणापासून जें आपणास ज्ञान होतें, तें दुर्गासाचे टीके खेरीज मुग्धबोधापासून व्हावयाचें नाहीं. कविकल्पद्रुम म्हणून एक कवितावद्ध ग्रंथ बोपदेवानें केला आहे. त्यांत संस्कृत भाषेंतील सर्व धातूंचा संग्रह केला आहे. कविकल्पद्रुमावर बोपदेवानेंच काव्यकामधेनु म्हणून टीका लिहिली आहे. रामव्याकरण म्हणून एक ग्रंथ आहे तोही बोपदेवानेंच केला असें म्हणतात. श्रीमद्भागवत बोपदेवानें केलें असें पुष्कळ लोक मानितात, म्हणून वर सांगितलें आहेच. परंतु दुर्जनमुखचपेटिका म्हणून एक लहानसें पुस्तक आहे. त्यांत श्रीमद्भागवत व्यासकृतच आहे असें सांगून, पुढें परमहंसप्रिय, मुक्ताफळ, हरिलीला हे तीन ग्रंथ बोपदेवानें केले असें

सांगितलें आहे. शतश्लाकचंद्रिका म्हणून एक वैद्यकावर लहानसा ग्रंथ आहे तो बोपदेवाचेच नांवानें मोडत असतो. बोपदेव इ० स० च्या १२च्या किंवा १३च्या शतकांत होऊन गेला असें युरोपांतील संस्कृतभाषाभिज्ञांचें मत आहे.

## १२. अष्टादश पुराणांतील विषयांचें संक्षिप्त विवरण.

मत्स्यपुराणाचे ५३ वे अध्यायांत प्रत्येक पुराणांतील विषयांचें व ग्रंथसंख्येचें दिक्प्रदर्शन थोडक्यांत केलेलें आहे. त्यांतून प्रत्येक पुराणाविषयीं प्रथम श्लोक घेऊन मग वर्णन करण्याचा क्रम धरिला आहे.

### १लें ब्रह्मपुराण.

ब्रह्मणाभिहितं पूर्वं यावन्मात्रं मरीचये ।
ब्राह्मं तु दशसाहस्रपुराणं परिकीर्तितम् ॥ १ ॥

भावार्थ—जें पूर्वीं ब्रह्मदेवानें मरीची ऋषीस सांगितलें व ज्यांत दहा हजार श्लोक आहेत तें ब्रह्मपुराण.

पुराणांच्या यादींत ब्रह्मपुराणाचें नांव प्रथम असल्यामुळें त्यास आदिपुराण म्हणजे पहिलें पुराण म्हणण्याची चाल आहे. तसेंच यांत सूर्याचे अर्चेविषयीं पुष्कळ मजकूर असल्यामुळें यास सौरपुराण असें ही म्हणतात. हल्लीं जें ब्रह्मपुराण उपलब्ध आहे त्यांत वर लिहिल्या-प्रमाणें दहा हजार श्लोक आढळतात. ब्रह्मोत्तरपुराण म्हणून याचा एक भाग आढळतो तो व स्कंदपुराणांतील ब्रह्मोत्तरखंड हीं फार भिन्न आहेत हें पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे.

वरील मत्स्यपुराणांतील श्लोकांत हें पुराण ब्रह्मदेवानें मरीचीस सांगितलें असें आहे. परंतु हल्लीं जें ब्रह्मपुराण उपलब्ध आहे त्यांत तें ब्रह्मदेवानें दक्षास सांगितलें व तेंच लोमहर्षणानें नैमिषारण्यांत ऋषींस

सांगितलें असें आहे. हें ब्रह्मदेवानें दक्षास सांगितलें आहे ह्मणून याचें नांव ब्रह्मपुराण.

ब्रह्मपुराणाचे आरंभीं जगदुत्पत्ति, मन्वंतरें, व कृष्णापर्यंत सूर्यवंशीं व चंद्रवंशीं राजांचा इतिहास हीं प्रकरणें आहेत. पुढें संक्षेपानें सर्व विश्वाचें वर्णन केलें आहे. नंतर उत्कल क्षेत्र ह्मणजे ओडीसा प्रांत व त्यांतील सूर्य, चंद्र, व जगन्नाथ यांचीं देवालयें व वनें यांचें वर्णन आहे. पुढें कृष्णचरित आहे तें विष्णुपुराणांतील कृष्णचरिताशीं शब्दशः जमतें. ग्रंथाचे शेवटीं योगाभ्यासाविषयीं थोडासा मजकूर आहे. ब्रह्म पुराणास पुराणाचें लक्षण मुळींच लागू पडत नाहीं. उत्कल क्षेत्रां तील म्हणजे ओडीसा प्रांतांतील देवालयांविषयीं यांत मजकूर आहे त्यावरून हें इसवी स॰च्या १३ व्या किंवा १४ व्या शतकाचे पूर्वीं रचिलें नसावें असें दिसतें.

ब्रम्हपुराणाचें उत्तर खंड हें एकाद्या माहात्म्यासारखें आहे. त्यांत मुख्य विषय म्हटला म्हणजे बलजा नदी म्ह॰ मारवाड प्रांतांतील बनास नदी इचा महिमा हा आहे. तो महिमा स्पष्टपणें दाखविण्या करितां अनेक आख्यानें लिहिलीं आहेत.

२रें पद्मपुराण.

एतदेव यदा पद्ममभूद्धैरण्मयं जगत् ।
तद्वृत्तांताशयं तद्वत्पाद्ममित्युच्यते बुधैः ॥
पाद्मं तत्पंचपंचाशत्सहस्राणीह कथ्यते ।

अर्थ—ज्या वेळीं हें जगत् सुवर्ण कमला सारखें होतें त्या वेळेच्या कथा ज्यांत आहेत व ज्यांत ५५००० श्लोक आहेत त्यास पद्मपुराण ह्मणतात.

पद्म पुराण हा फार विस्तीर्ण ग्रंथ आहे. ह्याची ग्रंथसंख्या महा भारताचे निम्मेहून अधिक आहे. ह्याचीं पांच खंडें आहेत. पहिलें सृष्टिखंड. यांत सृष्टीच्या उत्पत्तीचा प्रकार आहे. दुसरें भूमि

खंड. यांत भुगोलाची माहिती आहे. तिसरें स्वर्गखंड. चवथें पातालखंड. ५वें उत्तर खंड. कांहीं पुस्तकांत क्रियायोगसार म्हणून एक साहावें खंडही आढळतें.

हें पुराण रोमहर्षणाचा पुत्र उग्रश्रवा याणें नैमिषारण्यांत ऋषींस सांगितलें. जगदुत्पत्तीच्या वेळीं ज्या पद्मांत ब्रह्मा उद्भवला त्या पद्माचें ह्मणजे कमलाचें यांत वर्णन असल्यामुळें यास पद्म पुराण हें नांव पडलें आहे. पूर्वीं ब्रह्मदेवानें पुलस्त्यास जें सांगितलें व पुलस्त्यानें भीष्मास जें सांगितलें तेंच उग्रश्रवस् सूत यानें ऋषींस सांगितलें आहे. सृष्टिखंडांत जगदुत्पत्ति व प्रजापतिवंशकथन हीं दोन प्रकरणें आहेत, तीं विष्णु पुराणांतून उतरून घेतल्या सारखीं आहेत. पुढें मन्वंतरांचें वर्णन करून शेवटीं पुष्कर ह्म० अजमीराजवळचें पोखर सरोवर याचें वर्णन आहे.

दुसरें भूमिखंड—याच्या पहिल्या १२७ अध्यायांत अनेक आख्यानें व कथा आहेत. त्यांत पत्नी, मातापितरें, व गुरु या मानिलेल्या तीर्थांचें व पृथ्वीवरील क्षेत्रांचें वर्णन आहे. शेवटीं भूगोलवर्णन आहे.

तिसरें स्वर्गखंड—यांत भूलोकाच्या वर अंतरिक्षांत जे सप्तलोक आहेत त्यांचें वर्णन आहे. त्यांत सर्वांचे शेवटीं वैकुंठ आहे असें सांगितलें आहे. नंतर कांहीं प्रसिद्ध राजांच्या कथा सांगून शेवटीं वर्णाश्रम धर्म सांगितले आहेत.

चवथें पातालखंड—ह्यांत पाताल लोकांचें ह्मणजे नाग लोकांचें प्रथम वर्णन करून पुढें कालिदासकृत रघुवंशांत ज्या कथा आहेत, त्याचें निरूपण केलें आहे. शेवटीं श्रीमद्भागवतमाहात्म्य, कृष्णलीला विष्णुपुजामहिमा हीं प्रकरणें आहेत.

पांचवें उत्तरखंड— यांत माघस्नाना पासून प्राप्त होणारें पुण्य, लक्ष्मीनारायण या मंत्राचा महिमा, विष्णुभक्ति, वैष्णव मुद्राधारण, विष्णुच्या मूर्ति करण्याचा प्रकार इतकीं प्रकरणें आहेत. शेवटीं

भगवद्गीतामाहात्म्य, हीं आहेत

कलियुगांत तपश्चर्या व योगसाधन करण्यास मनुष्यें असमर्थ झाल्यामुळें त्यांस मोक्षप्राप्तीचें दुसरें साधन कोणतें असा जैमिनीनें प्रश्न केल्यावरून व्यासानें विष्णूचें ध्यान, नमस्कार, मुद्राधारण, व पूजन केल्यानें सर्व धर्मांचें फळ कलींत येतें, असें सांगितलें. हा मजकूर कित्येक पद्मपुराणाचे पुस्तकांत साहावें क्रियायोगसार म्हणून जें प्रकरण आढळतें त्यांत आहे. हें प्रकरण विष्णु पुराणाचे शेवटचे अंशांतील मजकुराशीं पुष्कळ अंशीं जमतें.

३ रें विष्णुपुराण.

वराहकल्पवृत्तांतमधिकृत्य पराशरः ।
यत्प्राह धर्मानखिलांस्तदुक्तं वैष्णवं विदुः ॥
त्रयोविंशतिसाहस्रं तत्प्रमाणं विदुर्बुधाः ।

भावार्थ.—ज्यांत पराशरानें वराहकल्पाचे संबंधानें सर्व धर्म सांगितले आहेत तें विष्णुपुराण, त्यांत २३,००० श्लोक आहेत.

हें पुराण पराशरानें आपल्या मैत्रेय नामक शिष्यास सांगितलें आहे. ह्याचे साहा भाग आहेत. प्रत्येकास अंश असें नांव आहे.

पहिल्या अंशांत विष्णु व प्रधान आणि पुरुष यांची उत्पत्ति कशी झाली तो प्रकार, नेत्रांचें पातें हलण्यापासून कल्पापर्यंत कालविभाग, वराह अवताराचें वर्णन, निरनिराळे प्राण्यांचे उत्पत्तीचा प्रकार, दुर्वास ऋषी इंद्रावर कोपल्यामुळें लक्ष्मी व अमृत हीं नष्ट झालीं तीं प्राप्त होण्याकरितां केलेल्या समुद्रमंथनाचें वर्णन, दक्षकन्या व ऋषी यांचे संततीचा प्रकार, उत्तानपाद राजाचा धाकटा मुलगा ध्रुव याला आढळपद मिळाल्याचा प्रकार, ध्रुवाच्या वंशजांचें वर्णन, आणि विश्वाचे

निरनिराळे विभाग व त्यांचे स्वामी यांचें वर्णन इतकीं प्रकरणें आहेत.

दुसऱ्या अंशांत पृथ्वीच्या द्वीपांचें वर्णन, सप्तपाताल व नरक यांचें वर्णन, ग्रहांची स्थिति, गति, व रथ यांचें वर्णन हीं प्रकरणें आहेत. सूर्याचे रथाचें वर्णन फार चमत्कारिक व विस्तृत आहे. शेवटीं विष्णुचा महिमा व संसाराची अनित्यता, हीं दोन वेदांतशास्त्राचीं मूलतत्वें स्पष्ट करून दाखविण्याकरितां भरताचें आख्यान दिलें आहे.

तिसऱ्या अंशांत मनु व त्यांचे वंशज यांचें वर्णन; अठ्ठावीस वेदव्यास, व पुराणें यांची उत्पत्ति; वेदांच्या शाखा; पुराणांचीं नांवें; वर्णाश्रम धर्म हीं प्रकरणें आहेत. शेवटीं यमगीता ह्मणून एक प्रकरण आहे त्यांत विष्णूभक्तांना यमाचे दूत स्पर्श करीत नाहींत असें दर्शविलें आहें.

चवथ्या अंशांत सूर्यवंशी व चंद्रवंशी राजांच्या वंशजांचा इतिहास कलियुगांतील अगदीं अर्वाचीन कालापर्यंत सांगितला. ह्या अंशाच्या ११ व्या अध्यायापासून १५ व्या अध्यायापर्यंत कृष्णावर स्यमंतक मणी चोरल्याचा आळ आला होता त्याची कथा आहे. मागध राजाचे इतिहासांत ह्मटलें आहे कीं,——

यावत्परिक्षितो जन्म यावन्नन्दाभिषेचनम् ।
एतद्वर्षसहस्रं तु ज्ञेयं पंचदशोत्तरं ॥
(वि० पु० अं० ४, अ० २४, श्लो० ३२)

महानंदिसूतः शूद्रागर्भोद्भवोऽतिलुब्धो महापद्मो नंदः परशुराम इव अपरोक्षखिलाक्षत्रांतकारी भविता ॥४॥ तस्याप्यष्टौ सुताः सुमाल्याद्या भवितारस्तस्य च महापद्मस्यानु पृथ्वीं भोक्ष्यंति । महापद्मस्तु पुत्राश्च एकं वर्षशतमवनीपतयो भविस्यंति । नवैतान्नन्दान् कौटिल्यो ब्राह्मणः समुद्धरिष्यति ॥६॥ तेषामभावे मौर्याश्च पृथिवीं भोक्ष्यंति । कौटिल्य एवं चंद्रगुप्तं राज्येऽभिषेक्ष्यति ॥७॥ अं० ४ अ० २४

भावार्थ— परीक्षित राजाचे जन्मापासून १०१५ वर्षें लोटल्यावर महापद्मनंद राज्यास राज्याभिषेक झाला. तो व त्याचे आठ पुत्र अशा नऊ नंदांनीं १०० वर्षें राज्य केलें. नंतर चंद्रगुप्त राजा झाला.

चंद्रगुप्त इ० स० पूर्वी ३१५वे वर्षी गादीवर बसला असें युरोपियन इतिहासकारांनीं सिद्ध केलें आहे. तेव्हां ३१५ त १०१५ व १०० म्हणजे ११३० मिळविले असतां इ० स० पूर्वी १४३० वर्षें हा परीक्षित राजाचे जन्माचा व भारती युद्धाचा शक निघतो.

पांचव्या अंशांत कृष्णचरित आहे. देवानीं प्रार्थना केल्यावरून विष्णूनें आपल्या डोक्याचा एक केंस उपटून त्यास देवकीच्या उदरांत भूभार हरण करण्याकरितां जन्म घेण्यास सांगितलें असा उपक्रम करून पुढील कथा भागवतांतील कथेप्रमाणेंच सांगितली आहे. नंतर अनिरुद्ध व बाणासूर यांचें युद्ध, काशीचा राजा पौंड्र यानें वासूदेव हें नांव धारण केलें होतें त्याचा कृष्णाचे हातून वध, यादवांचा संहार, कृष्णनिर्णाय, व कृष्णाचें निजधामास गमन हीं आख्यानें आहेत.

साहाव्या म्ह० शेवटच्या अंशांत कालाचे कल्प म्हणून जे विभाग आहेत त्यांविषयीं सांगून नंतर मानवी शरीरास जीं अनेक दुःखें होतात तीं फक्त विष्णुभक्तीनें नष्ट होतात, दुसऱ्या कोणत्याही उपायानें नष्ट होत नाहींत; अतएव सर्वांनीं विष्णुभक्ति करावी, असें सांगून ग्रंथसमाप्ति केली आहे.

४ थें वायुपुराण.—

श्वेतकल्पप्रसंगेन धर्मान्वायुरिहाब्रवीत् ।
यत्रैतद्वायवीयं स्याद्रुद्रमाहात्म्यसंयुतम् ॥
चतुर्विंशत्सहस्राणि पुराणं तदिहोच्यते ।

भावार्थ—ज्यांत श्वेतकल्पाचे संबंधानें वायूनें धर्म सांगितले

आहेत व ज्यांत रुद्राचें माहात्म्य आहे त्यास वायुपुराण ह्मणतात. त्यांत २४,००० श्लोक आहेत.

पुराणांच्या कित्येक यादींत वायुपुराणाचें नांव नसून त्या ठिकाणीं शिवपुराणाचें नांव आढळतें असें वर दर्शविलेंच आहे. आतां वरील मत्स्यपुराणांतील श्लोकांत वायुपुराणांत रुद्राचें माहात्म्य आहे असें सांगितलें आहे त्यावरून वायुपुराण व शिवपुराण हीं दोन्ही एकाच पुराणांचीं नांवें आहेत असें दिसतें. मिताक्षरेचा टीकाकार बालंभट्ट याचेंहि हीं दोन्ही एकाचींच नांवें असेंच मत आहे. या गोष्टीस दुसरें एक असें प्रमाण आहे कीं, दोन्हींची ग्रंथ संख्या अनुक्रमें मत्स्यपुराणांत व भागवतांत सांगितली आहे ती अगदीं जमते. शिवाय हीं दोन्ही एकाचींच नांवें याविषयीं रेवामहात्म्यांत ह्मटलें आहे कीं:—

> चतुर्थं वायुना प्रोक्तं वायवीयमिति स्मृतम्।
> शिवभक्तिसमायोगाच्छैवं तच्चापराख्यया ॥ १ ॥

हें सूतानें नैमिषारण्यांत ऋषींस सांगितलें आहे. पूर्वी तें त्याच ठिकाणीं वायूनें ऋषींस सांगितलें होतें ह्मणून त्याचें नांव वायुपुराण असें पडलें. ह्याचे चार भाग आहेत. प्रत्येक भागास पाद असें नांव आहे. पहिला प्रक्रियापाद, दुसरा उपोद्घात पाद, तिसरा अनुषंग पाद, व चवथा उपसंहार पाद.

पहिल्या पादांत सर्गाचें ह्म० उत्पत्तीचें वर्णन आहे. दुसऱ्यांत सर्गाचे वर्णनाची समाप्ति करून कल्पांचें वर्णन केलें आहे. त्यांत एकंदर ३३ कल्प आहेत, व शेवटच्या कल्पाचें नांव श्वेतकल्प असें सांगितलें आहे. पुढें प्रजापतींचे वंश, पहिल्या साहा मन्वंतरांतील गोष्टींचें निरूपण, व विश्ववर्णन हीं प्रकरणें आहेत. मधून मधून दक्षयज्ञ, महेश्वरमाहात्म्य, नीलकंठ स्तोत्र, इ० शिवस्तुतिपर प्रकरणें आहेत.

तिसऱ्या पादांत सप्तर्षि व त्यांचे वंशज यांचें वर्णन व दक्षकन्यांपासून उत्पन्न झालेल्या सृष्टींतील नानाविध पदार्थांचें निरूपण हीं करून पुढें पितृपूजन व श्राद्धकल्प हीं प्रकरणें आहेत. श्राद्धकल्पानंतर चंद्रवंशी व सूर्यवंशी राजांचें वर्णन आहे.

शेवटच्या उपसंहारपादांत पुढें होणारीं मन्वंतरें, कालमान, क्षत्रमान, सृष्टिलय, योगसाधनाचें फल, व शिवपुराणमाहात्म्य यांचें संक्षेपानें वर्णन केलें आहे.

## ५ वें श्रीमद्भागवतपुराण.

यत्राधिकृत्य गायत्रीं वर्ण्यते धर्मविस्तरः।
वृत्रासुरवधोपेतं तद्भागवतमुच्यते ॥ १ ॥
सारस्वतस्य कल्पस्य मध्ये ये स्युर्नरामराः।
तद्वृत्तान्तोद्भवं लोके तद्भागवतमुच्यते ॥ २ ॥
अष्टादशसहस्राणि पुराणं तत्प्रकिर्तितम्।

भावार्थ— ज्यांत धर्माचें विस्तारानें वर्णन केलें आहे, ज्याचा गायत्रीनें आरंभ होतो, ज्यांत वृत्रासुराचा वध वर्णिला आहे, ज्यांत सारस्वत कल्पांतील देव व मनुष्य यांचें वृत्त आहे तें भागवत पुराण. त्यांत १८,००० श्लोक आहेत.

पुराणांच्या ज्या यादी आढळतात त्या सर्वांत या पुराणाचें पाचवें स्थान आहे. फक्त पद्मपुराणांत मात्र भागवत हें सर्व पुराणांचें सार आहे असें सांगून त्यास अठरावें स्थान दिलें आहे. ह्याचे बारा भाग आहेत. प्रत्येक भागास स्कंध असें नांव आहे. एकंदर अध्याय ३३२ आहेत.

व्यासपुत्र शुकाचार्य यानें परीक्षित् राजास जें सांगितलें तेंच सूतानें नैमिषारण्यांतील ऋषींस भागवतांत सांगितलें आहे.

आरंभीं सृष्टीच्या उत्पत्तीचें वर्णन आहे. इतर पुराणांत उत्पत्तीचें वर्णन सांख्यशास्त्रास अनुसरून केलेलें असतें तसें यांत नसून तें वेदांतशास्त्रानुसार केलें आहे.

द्वितीय स्कंधांत सर्व भागवत संक्षेपानें सांगितलें आहे.

तिसऱ्या स्कंधांत वक्ता मैत्रेय व पृच्छक विदुर आहे. प्रथम ब्रह्मदेवाची उत्पत्ति व कालविभाग सांगितल्यावर वराह अवताराचें लांबलचक वर्णन केलें आहे. पुढें प्रजापती व स्वायंभुव यांची उत्पत्ती सांगून स्वायंभुवाची कन्या देवहूति इचें कर्दम ऋषीशीं लग्न झाल्याचा प्रकार वर्णिला आहे. देवहूतीचा पुत्र कपिल यानें सांख्यशास्त्र आपल्या मातेस सांगितलें तो प्रकार या स्कंधाच्या शेवटच्या नऊ अध्यायांत दिला आहे.

स्वायंभुव मन्वंतरवर्णन; प्रजापति वंशवर्णन; ध्रुव, वेण, पृथु इ० राजांच्या कथा, हीं प्रकरणें चौथ्या व पांचव्या स्कंधांत आहेत. यांतील कथा विष्णुपुराणांतील कथेशीं पुष्कळ अंशीं जमतात. व कित्येक स्थळीं तर त्या शब्दशः उतरून घेतल्या सारख्या आहेत.

सहाव्यांत विष्णुपूजनाचें पुण्य फार आहे. हें दाखविण्याकरित पुष्कळ कथा सांगितल्या आहेत.

सातव्यांत प्रल्हादचरित आहे.

आठव्यांत बाकी राहलेल्या मन्वंतरांचें वर्णन व अनेक कथा आहेत. त्यांत गजेंद्रमोक्ष, समुद्रमंथन, वामन अवतार, व मत्स्य अवतार या मुख्य आहेत.

९ व्या स्कंधांत वैवस्वत मन्वंतरांतील सूर्यवंशी व चंद्रवंशी राजे कृष्णापर्यंत सांगितले आहेत.

१० व्यांत कृष्णचरित विस्तारानें सांगितलें आहे.

११ व्यांत यादवांचा संहार व कृष्णनिर्याण आहे.

१२ व्यांत कलियुगांत होणारे राजे सांगून व्यासानें वेदांचा विचार केला व पुराणें रचिलीं याविषयीं व मार्कंडेयाविषयीं कथा सांगून शेवटीं भागवतस्तुति करून ग्रंथ समाप्त केली आहे.

### ६ वें नारदपुराण.

यत्राह नारदो धर्मान् बृहत्कल्पाश्रयानिह ।
पंचविंशत्सहस्राणि नारदीयं तदुच्यते ॥ १ ॥

भावार्थ — ज्यांत नारदानें बृहत्कल्पांतील धर्म वर्णिले आहेत, व ज्यांत २४,००० श्लोक आहेत तें नारदपुराण. यांशिवाय दुसरें एक बृहन्नारदीय पुराण ह्मणूनही एक पुस्तक प्रसिद्ध आहे.

ह्या नांवाच्या दोन्ही ग्रंथांस पुराणाचें लक्षण लागू पडत नाहीं. ह्यांत वैष्णवपंथ व विष्णुभक्ति हे दोन मुख्य विषय आहेत. त्या विषयानुरूप विष्णुचीं स्तोत्रें, व्रतें, व विष्णुभक्तीचें महात्म्य दाखविण्याकरितां अनेक आख्यानें हीं यांत आहेत.

नुसतें जें नारद पुराण त्यांत ध्रुवाख्यान व प्रल्हादचरित हीं आहेत. पुढें रुक्मांगद राजाच्या मोहिनी नांवाच्या मानसकन्येनें एकादशी व्रताचा भंग कर किंवा आपला पुत्र ठार मार असा आग्रह धरिला तेव्हां विष्णुभक्तीच्या भंगापेक्षा पुत्रहत्येचें पातक कमी असें समजून राजानें पुत्रवधाचें पातक स्वीकारलें याबद्दल कथा आहे.

यांत वैष्णव पंथाचें फारच प्राबल्य दिसतें त्यावरून हें सोळाव्या किंवा १७ व्या शतकांत रचिलें असावें.

बृहन्नारदीय हें नुसत्या नारद पुराणासारखेंच वैष्णवधर्म प्रतिपादक आहे.

७ वें मार्कंडेयपुराण.

यत्राधिकृत्य शकुनीन् धर्माधर्मविचारणात् ।
व्याख्यातं यन्मुनिप्रश्ने ऋषिभिर्धर्म चारिभिः ॥१॥
मार्कंडेयेन कथितं तत्सर्वं विस्तरेण तु ।
पुराणं नवसाहस्रं मार्कंडेयमित्युच्यते ॥ २ ॥

भावार्थ — मुनीनें प्रश्न केल्यावरून ऋषींनीं जें उत्तर दिलें त्याच्या अनुरोधानें मार्कंडेयानें धर्माधर्म जाणणाऱ्या पक्षांच्या कथानकास आरंभ करून जें विस्तारानें वर्णिलें आहे त्यास मार्कंडेय पुराण ह्मणतात. त्यांत ९,००० श्लोक आहेत.

व्यासशिष्य जैमिनी यानें मार्कंडेयास वासुदेवाचें स्वरूप कथन करण्याविषयीं विनंती केल्यावरून मार्कंडेयानें शमीक ऋषीनें पाळलेल्या विंध्याचलस्थ पक्ष्यांस वासुदेवानें मृत्युलोकीं अवतार कशाकरितां घेतला; पांच पांडवांची द्रौपदी स्त्री कशी झाली? बलदेवानें ब्रह्महत्येचें पातक जाण्याकरितां प्रायश्चित्त कां केलें? व कृष्णार्जुन असतां द्रौपदीच्या पुत्रांचा संहार कां झाला? हे चार प्रश्न जैमिनीनें केले.

ह्या चार प्रश्नांचीं प्रथम उत्तरें देऊन मग वृत्रासुरवध, हरिश्चंद्राख्यान, व वसिष्ठविश्वामित्र कलह हीं आख्यानें सांगितलीं आहेत. नंतर जन्म, मृत्यु, व पाप यांचा विचार केला आहे. पापाचे संबंधानें निराळ्या नरकांचें वर्णन केलें आहे. पुढें सृष्टीची उत्पत्ति व मन्वंतर वर्णन हीं प्रकरणें आहेत. मन्वंतराचे वर्णनांत देवीमाहात्म्य ह्मणून एक लांबच लांब प्रकरण आहे. बंगाल प्रांतांत दुर्गापूजा ह्मणून जो मोठा उत्साह होतो त्यास हें देवीमाहात्म्यच आधारभूत आहे. या पुराणांत कोणत्याही पंथाचें माहात्म्य किंवा कोणत्याही

एखाद्या विशेष दैवताचें माहात्म्य नसल्यामुळें हिंदुस्थानांत शैवादि-पंथ प्रबल होण्यापूर्वी ह्म० इ० स० च्या ९ व्या किंवा १० व्या शतकांत हें रचिलें असावें असें दिसतें.

## ८ वें अग्निपुराण.

यत्तदीशानकं कल्पवृत्तांतमधिकृत्य च ।
वसिष्ठायाग्निना प्रोक्तमाग्नेयं तत्प्रचक्षते ॥ १ ॥
तच्च षोडशसहस्रं सर्वक्रतुफलप्रदम् ।

भावार्थ—ज्यापुराणांत ईशानकल्पांत झालेल्या गोष्टी वर्णिल्या आहेत व जें अग्निनें वसिष्ठास सांगितलें त्यास अग्निपुराण ह्मणतात. त्यांत १६,००० श्लोक आहेत.

हें अग्निनें वसिष्ठास सांगितल्यामुळें याचें नांव अग्निपुराण असें पडलें आहे. याचे ३३२ अध्याय आहेत. यांत नानातऱ्हेचे अनेक विषय असल्यामुळें हें फार मनोरंजक आहे. परंतु यांतील बहुतेक विषय दुसऱ्या ग्रंथांतून घेतलेले आहेत.

अग्निपुराणाच्या आरंभींच्या आध्यायांत दहा अवतारांचें वर्णन आहे. त्यांपैकीं राम व कृष्ण या दोहोंचें वर्णन रामायण व महा भारत या ग्रंथांतील वर्णनानुसार आहे. या वरून भारत व रामायण हे ग्रंथ झाल्या नंतर याची रचना झाली असावी असें दिसतें. पुढें शिवाचे लिंगार्चनाविषयीं हकीकत आहे. नंतर होम, मंत्र, मंडळें, व पवित्रकें यांविषयीं सांगून पुढें देवालयें कशीं बांधावीं; मूर्ति कशा कराव्या; तळीं, बागा, निशाणें, घट, इत्यादि वस्तु कशा कराव्या यांविषयीं माहिती दिली आहे. लिंगार्चनाचेवेळीं व दुर्गापूजेचेवेळीं योजावयाचे मंत्र व मुद्रा यांविषयीं यांत जो मजकूर आहे तो शारदा-

तिलक व मंत्रमहोदधि यांतील मजकुराशीं बराच जुळतो.

पुढें भुवनकोश ह्मणून एक प्रकरण आहे त्यांत तीर्थांचें वर्णन आहे. त्यांत नर्मदा, श्रीशैल, अविमुक्तानगरी, व तेथील देव अविमुक्तेश्वर याचें वर्णन केलें आहे. हल्लीं वारणाशी ह्मणजे काशी, वारणा व अशी या दोन नद्यांचे मध्यें आहे त्याप्रमाणेंच अविमुक्तानगरी ही याच दोन नद्यांचे मध्यें होती असें सांगितलें आहे. सगळया तीर्थवर्णनांत गयामाहात्म्य मोठें आहे.

तीर्थवर्णना नंतर भरतखंड व इतर देश यांचें वर्णन आहे. पुढें सत्यादिग्रहांचें वर्णन करून ज्योतिषप्रकरण सांगितलें आहे. नंतर मन्वंतरांचें वर्णन करून जनन, उपनयन, विवाह, मरण, इ० संस्कार व वर्णाश्रमधर्म सांगितले आहेत. पुढें परमात्मध्यानाचें व अनेक व्रतांचें वर्णन केलें आहे. नंतर दान करण्याचे पुण्याविषयीं व शरीरदंडनाविषयीं सांगितलें आहे.

पुढें राजधर्म सांगितले आहेत त्यांपैकीं कांहीं दशकुमार चरित्रांतील राजनीतिशीं जमतात. नंतर शस्त्रें व धनुर्विद्या यांचें वर्णन केलें आहे पुढें धर्मशास्त्रावर जे अध्याय आहेत ते मिताक्षराग्रंथाशीं अगदीं अक्षरश: जमतात. नंतर वेदाध्ययन, दुर्दैवशमन, हवन, व अनेक देवतांचें पूजन यांचें वर्णन केलें आहे. पुढें वेदशाखा, पुराणें, आणि सूर्यवंशी व चंद्रवंशी राजांचें वर्णन, याविषयीं लिहिलें आहे. चंद्रवंशी राजांचे वर्णनांत यदूचा वंश कृष्णा पर्यंत व कुरूचा पांडवांपर्यंत सांगितला आहे. नंतर सुश्रुताचे ग्रंथाधारें वैद्यक प्रकरण लिहिलें आहे. त्यांत वनस्पतींचे योगानें जसे रोग दूर होतात त्याप्रमाणेंच मांत्रिक उपायांनीं ही दूर होतात असें सांगितलें आहे.

पुढें शिव व देवी यांच्या अवतारांची पूजा करतेवेळीं योजावयाचे मंत्र सांगितले आहेत. नंतर काव्य व साहित्य शास्त्र यांविषयीं माहिती दिली आहे. पुढें पिंगल मुनींच्या ग्रंथाधारें छंदशास्त्र सांगून ग्रंथाचे शेवटीं व्याकरणशास्त्र सांगितलें आहे त्यांत तिङंत प्रकरण नाहीं. व्याकरणाचे नियम पाणिनि व कात्यायन यांचे ग्रंथाधारेंच लिहिले आहेत.

९ वें भविष्यपुराणः—

यत्राधिकृत्य माहात्म्यमादित्यस्य चतुर्मुखः ।
अघोरकल्पवृत्तांतप्रसंगेन जगत्स्थितिम् ॥
मनवे कथयामास भूतग्रामस्य लक्षणम् ।
चतुर्दश सहस्राणि तथा पंचशतानिच ॥ २ ॥
भविष्यचरितप्रायं भविष्य तदिहोच्यते ।

भावार्थ— ज्यांत ब्रह्मदेवानें आदित्याचें माहात्म्य वर्णिलें आहे व मनूस अघोर कल्पांतील जगदुत्पत्ति व सृष्ट वस्तूंचीं लक्षणें सांगितलीं आहेत तें भविष्य पुराण. त्यात १४,५०० श्लोक आहेत.

हें पुराण सुमंतूनें शतानीक नांवाच्या पांडव राजास सांगितलें आहे. ह्याचे पांच भाग आहेत. त्यां पैकीं पहिल्या चोहोंत ब्रह्मा, विष्णु, शिव, व त्वष्टृ यांचें वर्णन असावें असें त्या चोंहोंच्या नांवावरून दिसतें. तसेंच पांचव्यांत प्रतिसर्गाचें ह्मणजे लय झाल्यावर होणाऱ्या पुनरुत्पत्तीचें वर्णन असावें असें वाटतें. समग्र ग्रंथ कोठें आढळत नाहीं. या पुराणाचा जेवढा भाग उपलब्ध आहे त्या भागाच्या आरंभीं सृष्टीच्या उत्पत्तीचें वर्णन आहे. तें मनुस्मृतीच्या १ ल्या अध्यायांतून उतरून घेतल्या सारखें आहे. पुढें दहा संस्कार, संध्यावंदन, गुरूपासना, वर्णाश्रमधर्म, व व्रतें सांगितलीं आहेत, मधून मधून आख्यानें आहेत त्यापैकीं च्यवनाचें आख्यान फार मोठें आहे. नाग

पंचमीचें व्रत सांगितल्यावर सर्व जातींचें वर्णन केलें आहे. नंतर कृष्ण, त्याचा पुत्र सांब, वसिष्ठ, नारद, व व्यास यांचा, सूर्याची शक्ति, प्रभा, व पूजा यांविषयीं संवाद आहे.

भविष्योत्तर ह्मणून एक ग्रंथ आढळतो त्यांतही भविष्य पुराणाप्रमाणेंच प्रथम व्रतें सांगून मग दानें कशीं करावीं हें सांगितलें आहे.

हें भविष्योत्तर पुराण भारती युद्ध आटपल्यावर युधिष्ठिरास राज्याभिषेक झाला ते समयीं कृष्णानें त्यास सांगितलें आहे.

१० वें ब्रह्म वैवर्तपुराण:—

रथंतरस्य कल्पस्य वृत्तांतमधिकृत्य यत् ।
सावर्णिना नारदाय कृष्णमाहात्म्यसंयुतम् ॥१॥
यत्र ब्रह्मवराहस्य चरितं वर्ण्यते मुहु: ।
तदष्टादशसाहस्र ब्रह्मवैवर्तमुच्यते ॥ २ ॥

भावार्थ— जें सावर्णीनें नारदास सांगितलें, ज्यांत कृष्ण माहात्म्य आहे, ज्यांत रथंतर कल्पांतील गोष्टी व ब्रह्मवराहाचें चरित हीं वर्णिलीं आहेत तें ब्रह्मवैवर्तपुराण. त्यांत १८००० श्लोक आहेत.

या पुराणांत राधाकृष्णाचे भक्तीचें माहात्म्य फार वर्णिलें आहे. यांतील बरींच आख्यानें दुसऱ्या कोणत्याही पुराणांत आढळत नाहींत हें सौतीनें नैमिषारण्यांत शौनकादि ऋषींस सांगितलें आहे. परब्रह्माच्या कृष्णावताराचें वर्णन असल्यामुळें याचें नांव ब्रह्मवैवर्तपुराण. ह्याचीं चार खंडें आहेत. पहिलें ब्रह्मखंड, दुसरें प्रकृतिखंड, तिसरें गणेशखंड व चवथें कृष्णजन्मखंड.

पहिल्या खंडांत कृष्णापासून सर्व देवांची उत्पति झाली असें सांगूनं पुढें कृष्ण रासमंडळांत जातांच त्याचे अंत:करणापासून राधेची उत्पत्ति झाली असें सांगितलें आहे नंतर शिवाची कृष्णभक्ति वर्णन करून भक्ति व मुक्ति यांचे प्रकार सांगितले आहेत.

पुढें ब्रह्मदेव व त्याची स्त्री सावित्री यांचे पासून तर्कशास्त्र, गाण्यांतील राग, दिवस, वर्षे, युगें, संस्कार, रोग, काल, व मृत्यु यांची उत्पत्ति झाली असें सांगून ब्रह्मदेवाच्या निरनिराळ्या अवयवांपासून झालेल्या संततींचें ही वर्णन केलें आहे. पुढें एका अध्यायांत विश्वकर्मा व घृताची अप्सरा यांचे पासून नीच जाति व मिश्रजाति उत्पन्न झाल्या विषयीं एक प्रकरण आहे. हा अध्याय कोठें कोठें जातिनिर्णय या नांवानें एका लहानशा ग्रंथाऐवजीं आढळतो. त्याचें लोकांत वजन ही बरेंच आहे. नंतर वैद्यकावरील ग्रंथकार व ग्रंथ यांचीं नांवें सांगून कृष्ण, त्याचें स्थान गोलोक, व नारायणमुनी यांचें वर्णन आहे.

प्रकृतिखंडांत मूल प्रकृतीचे दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती, सावित्री व राधा असे पांच भाग झाले असें सांगून पुढें गंगा, तुलसी, मनसा, षष्ठी, व काली ह्या मूल प्रकृतीच्या अंशरूपानें; स्वाहा, स्वधा, दक्षिणा, स्वस्ति, कित्येक सद्गुण दुर्गुण, आणि उपदेवांच्या स्त्रिया ह्या मूल प्रकृतीच्या कलारूपानें; आणि पृथ्वींतील सर्व स्त्रिया मूल प्रकृतीच्या अंशांश व कलांश रूपानें उत्पन्न झाल्या असें वर्णिलें आहे. नंतर मुख्य प्रकृतीविषयीं कांहीं गोष्टी सांगून शेवटीं गोलोक व नरक यांचें वर्णन व इतर कांहीं गोष्टी सांगितल्या आहेत.

गणेशखंडांत पार्वतीनें शिवाचे आज्ञेवरून व्रत करून विष्णुभक्ति केल्यामुळें साक्षात् भगवान कृष्ण गोलोक व नरक सोडून तिचा पुत्र झाला असें सांगितलें आहे. पुत्रोत्साहाचें वर्तमान ऐकून सर्व देवांबरोबर शनी शिवपार्वतीचे भेटीस आला त्याची दृष्टी मुलावर पडतांच त्याचें शिर धडापासून वेगळें झालें तें गोलोकीं निघून गेलें. तेव्हां पार्वतीचें दुःख शांतवन करण्य करितां विष्णुनें पुष्पभद्रा नदीवर एक हत्ती निजला होता त्याचें शिर आणून गणेशाचे धडास

लाविलें. पार्वतीनें 'तूं पंगु होशील' असा शनीस शाप दिला. पुढें कार्तिकस्वामीच्या जन्माचें वृत्त सांगून गणेशाचें शिर जाण्याचें कारण असें सांगितलें आहे कीं शिवानें कश्यपाचा पुत्र आदित्य ऊ० सूर्य यास मारिलें तेव्हां "तुझ्या पुत्राचें शिर नष्ट होईल" असा कश्यपानें शिवास शाप दिला. नंतर गणेशास एकदंत नांव पडण्याचें कारण असें सांगितलें कीं, शिवपार्वती निद्रिस्त असतां शिवभक्त परशुराम शिव दर्शनास आला त्यास द्वारीं गणेश होता त्यानें अटकाव केला तेव्हां दोवांचें युद्ध झालें त्यांत गणेशाचा एक दांत परशुरामाचे परशुनें मोडला. पुढें गणेशाचीं नांवें सांगून त्याचा एक दांत जाण्याचें कारण त्यास तुलसीचा शाप होता असें सांगितलें आहे. हीं आख्यानें सांगण्यापूर्वीं परशुरामाचें आख्यान फारच विस्तारानें सांगितलें आहे.

कृष्णजन्मखंड हें फार मोठें आहे. याचे १३२ अध्याय आहेत. कृष्णानें राधेच्या प्रीतीस्तव अवतार घेतला असें प्रथम सांगून पुढें कृष्णाविषयीं अनेक मोठमोठालीं व मनोरंजक आख्यानें सांगितलीं आहेत. शेवटीं १३१वे अध्यायांत पुराणांतील विषयांची अनुक्रमणिका देऊन १३२त सर्व पुराणांचीं व उपपुराणांचीं नांवें सांगितलीं आहेत

११वें लिंगपुराण:—

यत्राग्निलिंगमध्यस्थ: प्राह देवो महेश्वर: ।
धर्मार्थकाममोक्षार्थमाग्नेयमधिकृत्य च ॥ १ ॥
कल्पांते लैंगमित्युक्तं पुराणं ब्रह्मणा स्वयं ।
तदेकादशसाहस्रं.................................

भावार्थ— ज्यांत अग्निलिंगांत राहणाऱ्या महेश्वरानें अग्निकल्पाच्या अंतीं धर्मार्थकाम मोक्षांचें वर्णन केलें आहे तें लिंग पुराण. त्यांत ११००० श्लोक आहेत.

सांप्रत जें लिंगपुराण उपलब्ध आहे त्यांतील विषय वरील वर्णनानुसारच आहेत. ईशान कल्पास उद्देशून तें लिहिलें आहे एवढाच काय तो भेद. आरंभीं सर्ग व प्रतिसर्ग आणि प्रजापतींचे वंश यांचें संक्षेपानें वर्णन केलें आहे. त्यांत सर्व वस्तुंचें कारण शिव असें म्हटलें आहे. पुढें शिवाचे अवतार व निरनिराळ्या कल्पांतील त्याचीं कृत्यें यांचें वर्णन केलें आहे. नंतर शिव व विष्णु यांचे प्रतिस्पर्धेच्या कांहीं गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांत शिवाचें वर्चस्व दाखविलें आहे. पुढें विश्ववर्णन व वैवस्वत मन्वंतरांत कृष्णापर्यंत झालेल्या राजांचें वर्णन हीं आहेत. नंतर शिवाचे अवतारांचे पूजेचा विधि, स्तोत्रें इ० सांगून अनेक आख्यानांनीं त्यांचें स्पष्टीकरण केलें आहे. या ग्रंथास पुराणापेक्षां शिवाराधनकल्प हें नांव विशेष शोभेल. यांत योगाभ्यासाचें महत्व विशेष वर्णिलें आहे यावरून योगाभ्यासाची प्रवृत्ति भरतखंडांत इ० स० च्या ८ व्या किंवा ९ व्या शतकांत झाली त्यानंतर हें लिहिलें असावें असें दिसतें.

( पुढें चालू. )

# स द्धर्म दीप

अंक १२

——००——

## साल अखेर.

या पुस्तकाचा दुसरे वर्षाचा हा शेवटला अंक आहे हें आमचे वाचकांस माहीत आहेच. पहिल्यावर्षी या पुस्तकाला जे वर्गणीदार मिळाले त्यापेक्षां चालूसालीं वर्गणीदारांची संख्या बरीच जास्त वाढली आहे शिवाय या सालीं आह्मी 'अबलामित्र' नांवाचें दुसरें एक मासिक पुस्तक सुरू केलें व तें पुस्तक आमच्या प्रस्तुत पुस्तकाच्या वर्गणीदारांस थोडी किंमत कमी घेऊन देण्याचें कबूल केलें होतें. त्याप्रमाणें आमच्या दुसऱ्याहि पुस्तकास बऱ्याच लोकांकडून आश्रय मिळाला. सदरील दोन्ही पुस्तकांमिळून आह्मास सुमारें २५०० वर्गणीदार आहेत हें आह्मी मोठ्या आनंदानें कळवितों. आतां सदरील पुस्तकांचे किमतीचे मानानें वर्गणीदारांची ही संख्या ह्मणजे फार आहे असें नाहीं, तथापि ती आमच्या अपेक्षित संख्येपेक्षां बरीच जास्त असल्यामुळें आह्मी पुष्कळच आहे असें समजतों. या वर्गणीदारांचे संबंधांत आणखी एक अभिनंदनीय गोष्ट आहे ती ही कीं, वर्गणीचे वसुलाकरितां पुस्तकाचे मळपृष्ठावर 'आश्रयदात्यांस सूचना' या सदराखालीं वतनदार जाहिरात देण्याचा प्रसंग या दोनहि सालांत आह्मास आला नाहीं.

मनुष्य जे जे यत्न करितो त्यांत त्याच्या स्वकार्य साधनाचा हेतु असतो असें आह्मी मागें एका अंकांत सविस्तर सांगितलें आहे. यत्न करणारा मनुष्य विद्वान असो किंवा अविद्वान असो, श्रीमंत असो किंवा दरिद्री असो, राजा असो किंवा रंक असो, गृहस्थाश्रमी असो किंवा

संन्यासी असो, आणि संसारी असो किंवा विरक्त असो, प्रत्येकाचे यत्नांत स्वहित साधनाचा हेतु असतो. असो, मिळून सांगावयाचें इतकेंच कीं, आह्मी जो प्रस्तुत उद्योग आरंभिला आहे यांतहि आम चा स्वहित साधनाचा हेतु प्राधान्य आहे हें सांगण्यास आह्मास कांहीं हरकत दिसत नाहीं. आलिकडे वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें वगैरे प्रसिद्ध करण्याचें काम हें लोककल्याणाचें, तसेंच देशसुधारणुकेंच व विद्यावृद्धीचें आहे अशी पुष्कळ लोकांची समजूत आहे, व ती निःसं शयपणें खरीहि आहे. पण हल्लीं आपल्या देशांतसें काय परंतु सर्व पृथ्वींत जीं वर्तमान पत्रें किंवा मासिक पुस्तकें प्रसिद्ध होत आहेत त्यां पैकीं कोणत्याहीं पुस्तकाचा किंवा वर्तमान पत्राचा कर्ता केवळ सार्वज निक हित मनांत आणून आणि स्वहिताचा हेतु मुळींच मनांतन धरून ही सोन्याची समशेर उरावर धरीत असेल असें आह्मास मुळींच वाटत नाहीं. ह्मणजे प्रत्येकाचा हेतु स्वहित साधनाचाच असतो आतां हें मात्र खरें कीं, कांहीं गोष्टी अशा असतात कीं, त्या मनुष्य स्वहिता करितां ह्मणून जरी करूं लागला तथापि त्यापासून स्वाभाविक च सार्वजनिक हितास कांहीं मदत होते. तथापि एक रुपयामध्यें वर्गणीदा रांची बारामहिने पर्यंत ताबेदारी संभाळणें व शु० प्रतिपदा अथवा एखा- दा महिना आधींमागें झाला असतां वर्गणीदारांच्या नाखुषीस कारण होऊंनये ह्मणून दुप्पट कामाचा भारा उरकून टाकणें ही गोष्ट कोणी केवळ सार्वजनिक हिताकरितां करीत असेल असें आह्मास वाटत नाहीं. निदान आह्मी तरी ती लोकांवर उपकार करावे किंवा लोकांचें कल्याण व्हावें ह्मणून करीत नसून आमचे वर्गणीदार नाखुष झाल्यास पुढील सालीं त्यांजकडून आह्मास व्हावी तशी मदत होणार नाहीं हें मनांत आणूनच आह्मी वरील कामगिरी कदाचित् थोडी अधीमागें झाली तथापि साल अखेर तोंड मिळवणी करून टाकतों. आतां आज या विषयाकडे वळण्याचें कारण इतकेंच कीं,

कित्येक लोकांकडून आह्मास जीं पत्रें येतात, त्यांत आमच्या पुस्तकास एखादे महिन्यामध्यें निघण्यास उशीर झाला किंवा एखाद्या वेळीं तें पुस्तक वेळेवर न पोंचलें तर त्यायोगानें त्यांस राग येऊन स्वदेश भक्त, देश कल्याणेच्छु, लोक कल्याणेच्छु, सार्वजनिक हितचिंतक, वगैरे बरींच विशेषणें आह्मास दिलेलीं असतात. हीं विशेषणें देणारांचा असा हेतु असतो कीं, आमचें काम वेळचेवेळेस न झालें तर देशाचें नुकसान होऊन वरिल विशेषणांस आह्मी अपात्र होऊं. असो, आमच्या वर्गणीदारांची समजूत आमच्याबद्दल कशीहि असलीं तथापि आह्मी जें काम हातीं घरलें आहे तें नियमित वेळीं व योग्य रीतीनें बजावणें हें आमचें कर्तव्य आहे हें आह्मीहि जाणतों. व बहुधा आमचे हातून होण्याजोगें असेल. तितकें तें काळजीनें व. लक्ष पूर्वक आह्मी बजावितों हें आमचे वाचकहि जाणत असतीलच चालू सालीं वर्षा अखेरीस मध्यंतरीं लांबलेले अंक आह्मीं आजचे अंकाबराबर सर्व पुरे करून दिले आहेत. येत्या वर्षा विषयीं आह्मी खात्रीनें सांगतों कीं, आमच्या सर्व मासिक पुस्तकांचे अंक प्रत्येक महिन्याच्या शुद्ध प्रतिपदेस रवाना व्हावे अशा तजविजी मनुष्याच्या हातामध्यें जितक्या करण्यासारख्या आहेत तेवढ्या सर्व आह्मी बहुधा केल्या आहेत. ह्मणजे छापण्याचें सामान वगैरे भरपूर आणलें आहे. ही गोष्ट हल्लीं एकदकम तीन अंक पाठविल्यामुळें वाचकांचे लक्षांत येईलच. व यावरून पुढें आह्मी ह्मणतों याप्रमाणें नियमितपणा राहील किंवा नाहीं याचेंहि त्यांस अनुमान करतां येईल. आतां मनुष्यानें अनेक यत्न व संकल्प केले तथापि ते सिद्धीस नेणारा ईश्वर असल्यामुळें, आणि त्याचे इच्छेनुरूप सर्व गोष्टी घडत असल्यामुळें आह्मी असें करूं आणि तसें करूं असा मनुष्याचा अभिमान व्यर्थ आहे. तथापि लौकीक रीतीनें आमचे कामगिरीबद्दल ज्या सुचना करणें रास्त वाटल्या त्या आह्मी केल्या आहेत.

'सद्धर्मदीप' या पुस्तकांत पांचचार तऱ्हेचे विषय असतात. त्यां पैकीं कित्येक वर्गणीदारांना प्रत्येक अंकांत वेदांतविषय फार असला ह्मणजे बरें वाटतें, कित्येकांस व्यवहारिक विषयांवरील निबंध आव डतात, कित्येकांस राजकीय संबंधाचे निबंध पसंत पडतात आणि कित्येकांस सुभाषित, जुनी कविता, आणि आख्यायिका वगैरे किरकोळ विषयच आवडतात. आतां 'पिंडे पिंडे रुचिर्भिन्ना' या न्यायानें सर्व लोकांस सर्व विषय आवडत नसतील हें खरें, आणि यामुळें आह्मी स्थलावकाशानुरूप सर्व विषयांचा थोडा बहुत समावेशहि करितों या पुस्तकांत पुढील वर्षापासून आह्मी 'श्री भगवद्गीतेला' आरंभ कर णार आहों. गीतेंतील एक श्लोक आरंभीं देऊन पुढें त्याचा मराठी भाषेंत अर्थ व नंतर श्रीमत् शंकराचार्यांनीं गीतेवर जें भाष्य केलें आहे, व मधुसूदन, सरस्वती, श्रीधर स्वामी, प्रभृतींनीं ज्या व्याख्या केल्या आहेत त्यांच्या अनुरोधानें प्रत्येक श्लोकाचा स्पष्टार्थ दिला जाईल. भगवद्गीता ही उपनिषदात्मकच असल्यामुळें यांत वेदांत विषय ओतप्रोत भरला आहे. परंतु त्याच्या नुसत्या पठणानें किंवा नुसत्या शब्दार्थानें लोकांस गुह्यार्थाचा बोध होत नाहीं. आतां गुह्य अर्थ व त्या अर्थाची संगती समजण्यास संस्कृतामध्यें जरी अनेक टीका व व्याख्या आहेत, तथापि महाराष्ट्र भाषाभिज्ञांस त्याचें यथार्थ ज्ञान होण्यास त्या व्याख्यांचीं मराठींत भाषांतरें झाल्यावांचून दुसरा उपाय नाहीं. या ग्रंथावर वे० शा० सं० रघुनाथ शास्त्री पर्वते यांणीं बरेच वर्षांपूर्वी 'भाषाविवृत्ति' ह्मणून एक मराठींत व्याख्या छापलेली आमचे पहाण्यांत आली आहे; परंतु त्या ग्रंथाच्या प्रति प्रस्तुत दुर्मोळ असून खेरीज त्यांची व्याख्यान करण्याची पद्धती व भाषा शास्त्रीय रिवाजाची असल्यामुळें केवळ प्राकृत जनांस तो ग्रंथ मराठी झाला असूनहि दुर्बोधच आहे. याकरितां आह्मी या पुस्त कांत गीता ग्रंथाची मराठींत व्याख्या करून प्रत्येक श्लोकांतील

विषयांचा पूर्वापार संबंध व शंका समाधानासहित त्याचा स्पष्टार्थ देण्याची योजना केली आहे. गीताशास्त्र हें सर्व वेदांताचें सार अस ल्यामुळें वेदांत विषयाची ज्यांस विशेष अभिरुची आहे अशा आम च्या वाचकांस ही योजना फार पसंत पडेल अशी आमची खात्री आहे. शिवाय हा ग्रंथ छापण्याची अशी योजना केली आहे कीं, या विषयाकडे आमचे पुस्तकाचीं दर खेपेस १६ पृष्ठें देण्याची तजवीज केली असून अखेरीस त्याचें स्वतंत्र पुस्तक बांधतां यावें अशी छाप ण्याची शिस्त ठेविली आहे.

पुढील सालापासून आह्मी आणखी एक मासिक पुस्तक काढण्याची सुरवात करणार आहों. त्याजबद्दल मागील अंकाचे सोबत ह्यांडबिलें पाठविलींच आहेत. ऐतिहासिक विषय नाटक रूपानें देण्याचा आम- चा विचार आहे. पेशवे नाटक या सदराखालीं, पेशवाई संपादन करणारे मूळ पुरुष बाळाजी विश्वनाथ यांजपासून तों अखेरचे बाजीराव पेशवे याचे कारकीर्दीचे अखेर पर्यंत सर्व पेशव्यांच्या इति- हासाची माहिती नाटक रूपानें देण्याचा विचार आहे. दुसऱ्या सदरा खालीं ज्या कित्येक गोष्टी इतिहासांत दाखल करण्यासारख्या प्रस्तुत काळीं घडल्या जातात त्यांची माहिती नाटकरूपानें देण्याचा विचार आहे. या विषयाचे संबंधानें सध्या वासुदेव बळवंत फडका याची हकीकत देण्याची सुरवात केली आहे. शिवाय थोर पुरुषांचीं चरित्रें ह्मणून एक सदर ठेविलें असून त्यांत अर्वाचीन काळीं झालेले विद्वानांचीं व प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें देण्याची योजना केली आहे. अशा तऱ्हेचें पुस्तक आपले देशांत हें पहिलेंच असल्यामुळें सर्व लोकांकडून त्यास मदत मिळेल अशी आशा आहे. आतां त्या पुस्त कांतील जाहिराती दाखल हा मजकूर लिहून प्रस्तुत अंकांतील जागा आडवण्याचा हेतु इतकाच कीं, ‘सद्धर्मदीप’ पुस्तक घेणारास वरील नाटकमाला नांवाचें पुस्तक कमी किमतीनें देण्याची योजना

केली आहे. या मुळें या पुस्तकाशीं त्याचा निकट संबंध आहे हें वाचकांचे लक्षांत येईलच.

या पुस्तकाचे बरे वाईट पणाचा विचार करण्याचें काम आमचें नसून त्याचा निर्णय ठरवणें हें आमच्या सुज्ञ वाचकांचे कडे आहे. येत्या सालींहि आह्मी दरसालचे वहिवाटी प्रमाणें ठिकठिकाणीं मुद्दाम एजंट पाठविणार आहोंत. या व्यवस्थेनें पैसा पाठविण्याचा वगैरे त्रास वर्गणीदारांस न पडून पत्र व्यवहारादिकांचीहि त्यांस तसदी पडत नाहीं. एजंट मार्फत आलेला पैसा आह्मास पोंचून त्याजबद्दल तपशीलवार याद प्रत्येक अंकांतून देण्यांत येते. आज पर्यंत कोण त्याहि एजंटाकडे पैसा भरला आणि तो आमचेकडून मजुरा मिळाला नाहीं, अशी गोष्ट कोणत्याही वर्गणीदाराचे संबंधांत झाली नाहीं. पण ही व्यवस्था आह्मी मुद्दाम रवाना केलेले एजंटांचे संबंधानें किंवा ज्यांस आमचे तर्फे वर्गणी घेण्याचा आह्मी अधिकार दिला असतो अशा एजंटांचे संबंधानें जाणावी.

आतां आमच्या प्रीय वर्गणीदारांस आमची येवढीच विनंती आहे कीं, त्यांणीं चालू सालीं अंक पोंचण्यास कदाचित जरी वेळ अवेळ झाली असली तथापि तें मनांत न धरतां येत्या वर्षीहि सालाबादा प्रमाणें मदत करावी. येत्या वर्षी अंक नियमित पोंचण्याचें आज उगाच अभिवचन देण्यांत अर्थ नाहीं, तथापि वर जी व्यवस्था केल्याबद्दल लिहिलें आहे त्यावरून बहुधा आमच्या वाचकांची खात्री होईल व त्याचा येत्या सालीं अनुभवहि येईल. या महिन्यामध्यें आषाढ महिन्यांत एजंट पाठविण्यांत आले याचें कारण इतकेंच कीं, श्रावण महिन्यांत एजंट रवाना झाले ह्मणजे वर्गणीदारांचा आदमास बरोबर समजत नसल्यामुळें अंकांच्या द्विरावृत्ति काढाव्या लागतात. आषाढांत एजंट पाठविल्यामुळें भाद्रपद शु॰ प्रतिपदेपर्यंत वर्गणी दारांचे संख्येचा आदमास करण्यास वेळ सांपडतो. चालू सालीं

आह्मी जें काम केलें व पुढल्या सालीं जें काम करण्या विषयीं कंबर बांधली आहे तें आमचे वाचकांस कळविणें रास्त जाणून या अंकांत बरीच जागा आडवली आहे. तरी या कामीं आमच्या वर्गणीदारांनीं नाखुष न होतां पुढील साला करितां आह्मास उत्तेजन यावें ह्मणून सर्वांनीं यथाशक्ति या कृत्यास मदत करावी अशी त्यांस विनंती करून सर्वांतरयामी परमेश्वर सर्वांचे कल्याण करो अशी त्याची प्रार्थना करून आह्मी हा विषय आटपतों.

# परोपकार.

(लिहून आलेला म०)

देह त्यागितां कीर्ति मागें उरावी ॥मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥
मना चंदनाचे परी त्वां झिजावें ॥ परी अंतरीं सज्जना नीववावें॥

असा समर्थांनीं जनास उपदेश केला आहे.आतां हे उपदेश तीन प्रकारचे आहेत. ह्मणजे एक ऐहीक सुख देणार, दुसरा केवळ परलोक सुख देणारा, आणि तीसरा ऐहीक व पारलौकीक सुख देणारा. त्यांत ह्याचे थोडक्यांत भेद सांगतों. ऐहीक सुख देणारा उपदेश ह्मणजे लेखन वाचन आदि करून विद्यागुरू करितात तो. त्याच प्रमाणें दुसरा ह्मणजे परलोक देणारा उपदेश साधु आदि करून जपतपादी अथवा भगवन्नामस्मरणादि करण्यास सांगतात तो, आणि ती तिसरा ऐहीक व परलोक सुख देणारा उपदेश विद्यमानीच्या पद्यांत समर्थांनीं केला आहे तो. आतां हे तीनही उपदेश क्रमानें पाहिलें असतां पहिला ह्मणजे ऐहीक सुख देणारा, हा कनिष्ट होय. व दुसरा केवळ परलोक सुख देणारा हा मध्यम आणि ऐहीक व परलोक सुख देणारा हा उत्तम होय. कारण "प्रपंच साधुनी- परमार्थाचा लाभ ज्याणें केला तो नर भलारे भला" असें एका कवीनें ह्मटलें आहे. आणखी ऐहिक संबंधांत लोकांवर जेवढे उपकार करण्यास सांपडतात तेवढे परमार्थ मार्गाकडे मनुष्य लागला ह्मणजे सांपडत नाहींत. कारण परमार्थ मार्ग हा केवळ आत्मकल्याणाचा होय. तेव्हां तिथे परोपकारादि गोष्टींकडे मनुष्याचें तादृश लक्ष नसतें. आतां हेंहि खेर कीं, ऐहिक सुखेच्छा तृप्त झाली, ह्मणजे परमार्थ मार्गाकडे वळलेंच पाहिजे. तथापि या पैकीं एकाच मार्गानें ह्मणजे ऐहिक किंवा परमार्थीक या पैकीं एकच सुख ज्या उपदेशानें उत्पन्न होईल तो उपदेश श्रेष्ट नसून उभय सुखांची प्राप्ती करून देणारा असा उपदेश उत्तम

होय असें मला वाटतें. अतां असा उत्तम प्रकारचा उपदेश समर्थांनीं कोणास केला असावा याचें मुळ पाहूं गेलें असतां असें वाटतें कीं हा उपदेश मनुष्य जातीच्या प्राण्यासच केला अहे. कारण हा देह अशा योग्यतेचा आहे कीं,

सृष्ट्वा पुराणि विविधान्यजयात्मशक्त्या ॥
वृक्षान् सरीसृपपशून खगदंशमत्स्यान् ॥
तैस्तैरतुष्टहृदय: पुरुषं विधाय ॥
ब्रह्मावलोकधिषणं मुदमाप देव: ॥

ह्मणजे ब्रह्मदेवानें आपल्या चातुर्यानें अनंत प्रकारचे प्राणी उत्पन्न केले परंतु त्याचें समाधान होईना. तेव्हां शेवटीं हा नरदेह उत्पन्न केला व तेणें करून समाधानही वाटलें. तर अशा प्रकारच्याच देहास उपदेश करणें योग्य होय. पहा कीं या देहाची योग्यता समर्थांनीं वर्णन करते वेळीं असें सांगितलें आहे कीं,—

धन्य धन्य हा नरदेहो ॥ येथील अपूर्व वार्ता पहाहो ॥
जो जो कीजे परमार्थलाहो ॥ तो तो पावे सिद्धीतें ॥

या देहांत जो जो लाभ करून घेण्याचें प्राणी मनांत आणील तो तो सिद्धीस जाईल. कारण ज्या देहाचे प्रीत्यर्थ—

आयु: क्षणलवमात्रं न लभ्यते हेमकोटिभि: क्वापि

ह्मणजे कोट्यावधी मोहरा दिल्यानेंही ज्यानें क्षणमात्रही आयुष्य मिळणार नाहीं असें मुद्गलाचार्य ह्मणतात. परंतु तुळसीदासांनीं तर असें ह्मटलें आहे कीं.—

तीन लोक और चौदा भुवन नही सासका मोल

स्वर्ग मृत्यु पाताळ असे तीन लोक अथवा चतुर्दश भुवनें जरी भरवीस घातलीं तरी या देहाचे एका श्वासाचेंही मोल होणार नाहीं. तस्मात असा अमोल्य देह ज्यास प्राप्त जाहाला आहे त्यासच हा उपदेश

आहे असें जरी सिद्ध जाहालें तथापि त्या लोकांतही भेद तीन आहेत ह्मणजे मुक्त मुमुक्षू आणि विषई या तीन प्रकारचे लोकां पैकीं हा उपदेश कोणास असावा असी जर शंका येईल तर तिचें समाधान असें आहे कीं जे पुरुष मुक्त आहेत त्यांस कोणत्याहि तऱ्हेच्या उपदेशाची मुळीं अवश्यकताच नाहीं. दुसरे मुमुक्षु हेहि मोक्षाचे मार्गास लागले असल्यामुळें तेहि उपदेशांतून मुकले. आतां बाकी राहिले जे विषयी आहेत ते त्यांस मात्र उपदेश करणें जरूर आहे. यावरून त्यांस ह्मणजे विषई जनांस हा समर्थांचा उपदेश आहे. कारण उपदेश ह्मणजे बोध हा विषई जनांसच करण्याचें कारण असें आहे कीं, ते ज्या विषयांचें सेवन करितात ते इतके दोषी आहेत कीं (दोषेण तीव्रो विषय: कृष्णसर्प विषादपि । विषं निहंति भोक्तारं द्रष्टारं चक्षुषाप्ययं) ह्मणजे कृष्ण सर्पाचेंही विष जो भक्षण करील तें त्यासच मात्र मारतें. परंतु हे विषय केवळ पाहाणारासही मारतात. पहा कीं हे विषय पांच आहेत शब्द स्पर्श रूप रस आणि गंध परंतु या पांचांनीं प्राणी ठार केले आहेत. ते—कुरंग मातंग पतंग भृंगा: मीना हता पंचभिरेव पंच ॥ एक प्रमादि न कथं निहन्याद्यस्येयते पंचभिरेवपंच ॥ मग ज्यांनीं एकेकटयानींच केवळ आपले अवलोकनानें येकेकाचा नाश केला आहे. असे पांचही एकटा प्राणी सेवन करूं लागला असतां त्या पासून वांचणेंच कठीण. पण कदाचित वांचला तर शुद्धीवर तर रहाण्याची शंकाच नको. या साठीं असा विषय सेवनानें उन्मत्त होऊन जो प्राणी भ्रमिष्ट झाला आहे त्यास उपदेशावांचून दुसरा मार्गच नाहीं. कारण ज्याला मी आलों कोठून कर्तव्य कोणतें आणि शेवटीं मी जाणार कोठें याचें ज्ञान नाहीं, त्यांत आणि पशूंत विशेष भेद नाहीं. असें एका कवीनें ह्मटलें आहे.

आहार निद्रा भयमैथुनंच ॥ सामान्य मेतत्पशुभिर्नराणां ॥
ज्ञानं हितेषामधिको विशेषो ॥ ज्ञानेन हीनः पशुभिः समानः ॥

यासाठीं ज्याला दुर्लभ नरदेह प्राप्त झाला आहे खरा. परंतु याचा उपयोग केला तर मात्र यासारखा देह नाहीं. परंतु जर व्यर्थ घालविला तर त्याहून पशूही चांगले असें तुळशी दासांनी ह्मटलें आहे कीं॥ पशु का होत पन्हैया ॥ नरका कुच्छ नहि होत ॥ जब नर करणी करे तो नरका नारायण होत ॥ याकरितां असा देह हातीं लागला असोन तो व्यर्थ घालविणें योग्य नव्हे. कारण हा देह अमोल्य आहे खरा, परंतु चंचल इतका आहे कीं. ( विद्युच्चलंजीवितं ) ज्याप्रमाणें विद्युल्लता चमकून क्षणांत नाहींशी होते. त्या प्रमाणें हा देहही क्षणीक आहे. ह्मणून अविलंबानें समर्थांनीं यास बोध केला आहे. आतां जर समर्थांचे मनांत मनुष्यास उपदेश करणें आहे तर पद्यांत मनाची योजना कां केली असा हा प्रश्न उत्पन्न होईल परंतु याचें समाधान असें आहे कीं, थोरांचे वर्तनाचा मार्ग ह्मटला असतां कोणतिही गोष्ट विचारल्या वांचून सांगूं नये. आणि हे देहास आलेले प्राणी तर आपणास वागण्याचा मार्ग विचारीत नाहींत व खऱ्या मार्गानें वागत नाहींत तर यांस उपदेश करून सुमार्गास लावणे हें आपलें कर्तव्य, होय असें मनांत आणून तें आपले हातून व्हावें व 'अप्रश्नस्य उत्तरं' हा दोष तर येऊं नये आणि उपदेश तर केला पाहिजे. असा हेतू मनांत आणून आपलेच मनाचें मीष करून जनास बोध करितात कीं, बाबाहो या जनांत वर्तन असें करावें कीं. ( देहत्यागितां कीर्ति मागें उरावी )कारण असा अमोल्य आणि क्षणिक देह जर आपणास मिळाला आहे तर त्यांत अशी वस्तु संपादन करावी कीं, जी कधीं ही नाहींसी होणार नाहीं. आतां अशी वस्तु सर्व जगतांत पाहिली असतां एक कीर्तिवांचून दुसरी नाहींच. पहा कीं, (सुरतसें किरत बडी विनपंख उडजाय) अशी अविनाश कीर्ती जेणेंकरून प्राप्त होईल असें वर्तन करावें. असा समर्थांच्या श्लोकार्थानें उपदेश झाला परंतु या कीर्तीचेहि प्रकार दोन आहेत. एक सत्कीर्ती आणि दुसरी दुष्कीर्ति

या दोन्ही ही सारख्या आहेत, या साठीं या दोन प्रकारचे कीर्तींतून कोणतेही प्रकारची कीर्ति राहिली तथापि चिंता नाहीं अशी कोणी शंका घेतील असें मनांत आणून समर्थ याच श्लोकाचे उत्तरार्धांत सांगतात कीं, 'मनाचंदनाचे परीत्वां झिजावें०' ह्मणजे या दोनहीं कीर्तींतून सत्कीर्ति राहण्यास झटावें. असें समर्थांनीं सुचविलें आहे. कारण मनाचंदनाचे परी झिजावें, परंतु अंतरीं सज्जनास निववावें असें सांगितलें आहे. तर सज्जनाचे अंतःकर्णास समाधान करणारी सत्कीर्तीच होय, यावरून सत्कीर्ती राहाण्यास साधनें कोणतीं याचा विचार समजणें जरूर आहे. आतां देहा मागें कीर्ती राहण्या सारखीं अनंत साधनें जरी आहेत तथापि त्या सर्वांत परोपकारा सारखें दुसरें साधनच नाहीं. असें केवळ मीच ह्मणतों असें नाहीं. तर समार्थांनेंही हेंच साधन सांगितलें आहे कीं:—

नरदेह हा स्वाधीन ॥ नव्हे सहसा पराधीन ॥
परोपकारें झिजऊन ॥ कीर्ति रूपें उरवावा ॥

कारण ज्या परोपकाराची योग्यता काय सांगावी कीं, प्रत्यक्ष विष्णु

परोपकृतिकैवल्ये तोलयित्वा जनार्दनः ॥
गुर्वी मुपकृतिमत्वा ह्यवतारान् दशा गृहीत् ॥

परोपकार आणि साक्षात मोक्ष यांची तुलना केली असतां परोपकारच विशेष वाटल्यावरून विष्णूनें दशावतार धारण करून लोकांवर उपकार केले ही ज्या परोपकाराची योग्यता असा परोपकार जर मनुष्याचे हातून घडला तरच त्याची कीर्ती जगांत राहणार आहे नाहीं तर प्राणी मनुष्य देहास आला आणि नाहीं सारखाच होतो कारण तुकारामानें असें ह्मटलें आहे कीं, जर मनुष्याकडून परोपकार नाहीं घडला तर मग

नाहीं तरी काय थोडीं ॥ श्वान शुकरें बापुडीं ॥

यासाठीं अमोल्यदेह प्राप्त होऊन व परोपकाराविषयीं अनुकूलता असून

केवळ श्वाना सारिखा किंवा शुकरा सारिखा घालविणे योग्य होईल काय? मित्र हो तुकारामानें श्वाना सारिखा किंवा शुकरा सारिखाच व्यर्थ ह्मटला आहे परंतू आपणास मी असें सांगतों कीं वर्तमानी देशाभिमान अथवा जात्याभिमानाचे संबंधानें पाहिलें असतां श्वानाचीही बरोबरी आपले हातून करवत नाहीं असें ह्मणणें भाग पडतें पहा कीं.—

न दिसे आह्मा माजी जितका देशाभिमान शुनकांत ॥

हें ह्मणणें कोणास अतिशयोक्तीचें वाटेल परंतु थोडा विचार केला असतां या शंकेचें निवारण झाहाल्या वांचून राहणार नाहीं व आपण प्रत्यक्ष नित्य या शहरांतील श्वानांचा असा नियम पहातोंकीं एक ठिकाणीं रहाणारीं जीं कुत्रीं आहेत आणि त्यांत जर दुसरें आलें आणि आपले पैकीं नुसतें येखाद्यावर गुरगुरलें तर सर्व तत्काळ तीं एकत्र होऊन आपले आळींतील त्या श्वानास साह्य करितात. आणि आपण आपले देशबांधवांस अनंत प्रकारचीं संकटें प्राप्त झालेलीं केवळ कानांनी ऐकूनच नव्हे तर प्रत्यक्ष डोळ्यांनीं व स्वत: अनुभव घेत असतांही त्यापासून मुक्त होण्याविषयीं ज्यांचे हातून तर कांहीं झहालेंच नाहीं. परंतु नुस्तें ज्यांच्या मनांतही पण आलें नाहीं. त्यांस श्वाना पेक्षांही नीच ह्मणणें भाग पडेलच. परंतु ज्याचे हातुन देशाभिमानयुक्त परोपकाराचीं कृत्यें घडलीं नाहींत त्यांहून.—

तृणं चाहं वरं मन्ये नरादनुपकारिणात् ॥
घासो भूत्वा पशून् पाति भीरून् पाति रणांगणे ॥

केवळ तृण जें आहे तें ही घास ह्मणजे चारा होऊन पशूंचें रक्षण करितें व त्याच प्रमाणें समरंगणीं जो भीत झाला त्यास रक्षणास त्याचे मुखीं उभें राहून त्याचें रक्षण करितें ही गोष्ट सर्व आबाल वृद्धांस माहीत आहे कीं, ज्यानें दातीं तृण धरलें त्याचें रक्षणच होतें तस्मात मित्र हो असा अमोल्य देह ईश्वरानें आपणास दिला आहे

तर तो परोपकाराचेच कामीं झिजवावा असें समर्थांचें सांगणें आहे. आतां तो परोपकार तीन प्रकारचा आहे. तो असा, कायीक वाचीक आणि मानसीक. परंतु या सर्वांत आरंभीं मानसीक परोपकार घडला पाहिजे. ह्मणजे मनानें लोकांवर उपकार करण्याची इछा उत्पन्न झाली पाहिजे. कारण या वांचून बाकीचे दोन प्रकारचे परोपकार होऊं सकत नाहींत. दुसरा वाचीक ह्मणजे वाणी द्वारा परोपकार करणें याचेही दोन भेद आहेत. ह्मणजे आपल्या मुखानें एखाद्यास चांगली कल्याणाची गोष्ट सांगणें. दुसरा लेखन संबंधानें ह्मणजे सुबोध ग्रंथ लिहून ठेवणें. आतां तिसरा कायीक-ह्मणजे शरीरानें दुसऱ्या वर उपकार करणें हें होय. आतां या सर्व प्रकारच्याही उपकारांत दोन प्रकार आहेत. ह्मणजे प्रसंगीं आपलें अनहीत करून परोपकार करणें आणि आपला स्वार्थ साधून त्यांतव्र होईल तितका परोपकार करणें यांत पहिले प्रकारचे ह्मणजे आपलें अनहीत करून घेऊन परोपकार करणारे लोक जगांत फारच कमी. किंबहुना नाहींत ह्मटलें तरी विशेष दोष येणार नाहीं. परंतु सर्वांत याची गणना फारच मोठी केली आहे. आतां दुसरे प्रकारचे लोकांस ह्मणजे आपलें हीत साधून परोपकार करणारांस ही परोपकरी संज्ञा आहे. व ती बरोबर असून त्यांचीहि कीर्ति चिरकाल राहाते. पहा कीं, वाचीक परोपकाराने अखंडीत कीर्ती राहिली असे संस्कृत कवीमध्यें कालिदास, भवभुती, आदिकरून,प्राकृत पंडितांत पाहिले तर वामन पंडीत मोरोपंत वगैरे होत. त्याच योग्यतेचे त्यांचे ग्रंथ उदयास आणणारे आपणा सर्वांस माहीत आहेत असे आपले परशुरामपंततात्या गडबोले. त्याच प्रमाणें वर्तमानी मोठी उदयास आलेली व ज्ञानाचें केवळ भांडार असी जी आपली राजभाषा तिचे भाषांतराचे संबंधानें पाहिले तर पुण्या सारखे शहरांत भर सभेंत ज्यांस केवळ बृहस्पतीची उपमा देत ते शास्त्रीबोवा आदिकरून. तसेच कायीक परोपकारा विषयींहि

म्हटलें तर फार प्राचीनांत पाहिलें असतां विक्रम. शें दोनशें वर्षांत म्हटलें तर आपले शिवाजी महाराज कीं ज्यानें आपला धर्म बुडतो असें वाटलें असतां देहाची परवा न करितां मोठमोठे पराक्रम केले. तेणें करून त्याची कीर्ती इतकी चिरायू जाहाली कीं हल्लींचे आपले न्यायी व सार्वभौम राजाचे इतिहसांत ती शोभत आहे. त्याच प्रमाणें पांचपंचवीस वर्षांतील पुरुषांकडे दृष्टी देणें झाल्यास ज्याचे नांवाचा प्रत्यक्ष उच्चार करण्याची गरज लागत नाहीं. कारण सन १८५७।५८ सालचा ध्वनिच ज्यांच्या मूर्ती वाचकांच्या दृष्टीपुढें उभ्या केल्यावांचून रहात नाहीं. परंतु त्यांनीं ज्याप्रमाणें अघोर व निर्दय पणाचीं कृत्यें केलींकीं ज्यांचें स्मरणच अंगावर रोमांच उभे करितें. फार कशाला. नुकतें सहा महिन्यामागें वाचकांचें लक्ष गेलें तर ज्यानें प्रत्यक्ष आपणास ज्यापासून जन्म झाला असा बाप, त्याच प्रमाणें सहोदर बंधू, फार तर काय पण जिचें आपण वेदाज्ञेनें अग्नि ब्राह्मणां सन्निद्ध पाणी ग्रहण केलें व जिला आपणावांचून जगतांत दुसरा सुखास थारा नाहीं अशा साध्वींचेही सुखाकरितां आपलें तन मन धन याचा व्यय न करितां केवळ परोपकार बुद्धीनें आपले देशबांधवांस दुःसह संकटांतून मुक्त करण्याविषयीं आपले सर्वस्वाचा नाशही मनांत न आणितां केवळ.

जयेन लभते लक्ष्मी मृतेचापि सुरांगनाः ॥
क्षणविध्वंसिनी काया का चिंता मरणे रणे ॥

याच वाक्यावर दृष्टी देऊन कार्यारंभ केला परंतु तें विचार पूर्वक सत्कृत्य नसल्यामुळें जरी कार्य सिद्धी जाहली नाहीं तथापि त्याची कीर्ती केवळ आपणास तर काय परंतु न्याई, व मोठ्या शूर विद्वान लोकांसही ज्ञेय झाली, एवढेंच नव्हे तर त्यांच्या विद्वान सुविचारी पत्न्यांसही त्याविषयीं इतकी प्रीति उत्पन्न झाली कीं त्यांनीं त्यास संकट समयांतहि पुष्पांचा गुच्छ समर्पण केला आणि मनुष्य अथवा

शूर यासच ह्मणावें, असें बोलून दाखविल्याचें ह ऐकीवांत आहे. तस्मात् मित्रहो याच पुरुषांतील अविचाराचें कृत्य शिवाय करून बाकी त्याप्रमाणें जर कीर्ति संपादन केली तरच आपण • मनुष्य देहास आल्याचें फळ नाहींतर पशुहून किंबहुना तृणाहूनहीं न्यूनतेस पात्र होणार आहों. आणि परोपकाराचे कामी हा देह झिजविला असतां ऐहिक चिरकाल कीर्ति आणि परलोक संबंधी मुक्तीस पात्र होणार आहों. पास प्रमाण.

दिधली जगदीशानें परउपकारें सरूपता मुक्ति ॥
यास्तव शामतनूला जलधर पावे अशी कवी उक्ती ॥

मेघ पूर्वी पांढरा हेता, परतु परोपकार ह्मणजे लोकांवर वृष्टी करण्याचें मनांत आणल्या बरोबर जगदिश्वरानें आपली सरूपता मुक्ती (शामत्व)दिल्यामुळें शामतनुला पावला. यासाठीं असा ऐहिक व पारलौकीक सुख देणारा उपदेश समर्थांनीं मनुष्यांस केला आहे कीं या देहांत वर्तन असें करावें कीं—

(देह त्यागितां कीर्ति मागें उरावी॰)

# वक्तृत्व

ज्यांनीं ह्मणून इंग्लिश अथवा मराठी शाळेंत कांहीं दिवस काढिले आहेत अशा तरुण मनुष्यांस व तद्वारा इतर मनुष्यांस वक्तृत्व अंगीं असावें अशी साहजीक इच्छा उत्पन्न होते. कारण हा भूषणदायक गुण आहे असें त्यांस कळतें. यास्तव जेथें जेथें अशी दहापांच मंडळी जमण्यासारखी असते तेथें ही कला संपादण्यासाठीं नेहमी सभा स्थापन होतात. ह्यावरून वक्तृत्वाच्या खऱ्या स्वरूपाचा आवांका त्यास कधींच झाला असेल व ह्मणूनच त्याच्या मागें लहान थोर विद्वान अविद्वान लगतात असें वाटण्याचा संभव आहे; तरी कित्येक सामान्य सभांचे प्रयत्न प्रत्यक्ष पाहून व श्रेष्ठ ह्मणविणाऱ्या कांहीं सभांच्या वहिवाटी संबंधीं हकिकतींवरून असें वाटतें कीं, वक्ते होणाऱ्यां पैकीं पुष्कळांमध्यें ह्या कलेच्या नांवापेक्षां तिजसंबंधी विशेष माहितीचा अभाव असतो. ह्मणून ह्या गुणाचें महत्व व तो संपादण्यास साधनें वगैरे काय असलीं पाहिजेत ह्या विषयावर मिळेल तितकी माहिती मिळवून स्वमतांसह एकवट केल्यास निष्फळ होणार नाहीं असें जाणून पुढील निबंध लिहिला आहे. ह्यांत पहिल्यानें वक्तृत्वाची सामान्य व्याख्या करून ऐतिहासिक माहिती संक्षेपानें दिली आहे. त्या नंतर वक्त्याच्या आंगीं कोणत्या गोष्टी असल्या पाहिजेत त्या सांगून वक्तृत्वाचीं साधनें सांगितलीं आहेत. हा निबंध या विषयावर पुरेसा आहे असा अर्थ नाहीं, तरी त्या विषयीं बरीच माहिती व्हावी ह्या हेतूनें लिहिला आहे.

आपल्या मनांतील एखादा उद्देश अथवा एखादी गोष्ट दुसऱ्यास पसंत पडून ती त्याच्या मनांत भरेल अशा रितीनें ती बोलून दाखविण्याची ज्यास शक्ती असते त्यास वक्ता ह्मणावें. व त्या

शक्तीस वक्तृत्व ह्मणावें. ही शक्ती थोडी बहुत प्रत्येक मनुष्याच्या अंगीं वागत असते. देहमान असून फार राग आला ह्मणजे अथवा दयेनें, दुःखानें अथवा ढळढळीत अन्याय होतांना पाहून मन हळहळलें ह्मणजे जें आपण बोलतों; त्यांत खचित वक्तृत्वाची छाया दृष्टीस पडते. दुसरा मनुष्य आपणास लागेसें बोलत असतां मन जसजसें चेतवत जातें तसतसें त्याचें तोंड बंद करण्यास सर्व शक्तीचें मान करून जेव्हां आपण आपणावरील दोष उडवूं लागतों तेव्हां फार दिवस अभ्यास करूनही साधणार नाहीं अशा शैलीनें आपण बोलतों; त्यावेळीं आपलें अल्पस्वल्प वक्तृत्व हाव भावांसह बाहेर पडतें. ऐकणाराचें मन वेधण्याची व तें पाहिजे तिकडे वळविण्याची किल्ली सर्वांस सारखी साधत नाहीं. वक्तृत्वाचें बीज मनुष्याचे ठाईं स्वाभाविक असतें खरें तरी इतर शक्तीप्रमाणेंच त्यास मोठ्या युक्तीनें व मेहनतीनें वाढविल्यावांचून त्याचा पूर्ण विस्तार होत नाहीं व ज्यास सर्व सूज्ञ फार चहातात तें रूप त्यास येत नाहीं. पक्क दशेस पावलेलें वक्तृत्व हा श्रेष्ठ गुण मानला आहे. तो व साध्य करून घेण्यास श्रमही फार लागतात. एका मनुष्यानें प्रथमतः नावडणारा व खोटा दिसणारा मार्ग एकदां भाषण करून हजारों मनुष्यांस खात्रीनिशीं प्रीय व रास्त दिसेसा करणें ह्मटलें ह्मणजे इतक्या लोकांच्या मनांच्या लगामी त्या एकट्याच्या हातीं आल्या असें नव्हे काय? सरकारी अधिकार हातीं नसेल किंवा द्रव्यादि लालूच देण्याची शक्ती नसेल तर एका अडाणीही मनुष्यास आपल्या मना प्रमाणें वागेसें करण्यास महत प्रयास लागतात हें जर खरें आहे तर हजारों विचारी व अनुभवी लोकांची सप्रमाण समजुत घालून त्यांस हव्या त्या पंथास लावण्याचा अधिकार केवळ भाषणांत येण्यास श्रम थोडे लागतील काय? व त्याचें महत्व सामान्य आहे असें निर्दोष ह्मणवेल काय? सामान्य लोकांत वक्तृत्व ह्मणजे, विपरीत

मार्गी प्रवृत्त करण्यासाठीं रचलेलें पोकळ पांडित्य असा समज झाला आहे. इकडील वक्तृत्वोत्तेजक सभेंतून झालेलीं भाषणें ऐकून तर ते ह्मणतात कीं, आमच्या समजास बळकटी आली. वक्तृत्वाचें नांव काढतांच त्यांस तिटकारा येतो; कारण कोणीं फारवेळ बडबड केली ह्मणजे त्यासच थोर वक्ता ह्मणावयाचें असें त्यांस वाटतें व तें वक्तृत्वाचें माप बोलण्यास लागलेल्या वेळावरून करितात. ते ह्मणतात त्या प्रमाणेंच ही कला निंद्य कराल तर त्यांस दोष कसा द्यावा? पण हा समज मलताच आहे. प्राचीन काळापासून उत्तम वक्त्यांस मान मिळत आला व त्यांच्या उत्कृष्ट भाषणांनीं अनेक जातीचे प्रसंगीं बहुत लाभ झाले ह्या गोष्टी जर निर्विवाद ठरतात तर अशा लोकांस दोष आल्यावांचून रहाणार नाहीं. वक्तृत्व हा इतर गुणा प्रमाणेंच एक गुण आहे व तो योग्यायोग्य मार्गीं योजणें मनुष्याच्या स्वाधीन आहे. हलक्या मनाचे लोक द्रव्याच्या लोभानें निंद्य कामा करितां अनुमत अथवा मदत मिळविण्यास तो गुण पुढें करितात एवढ्यावरूनच त्याचें महत्व कमी मानणें आह्मांस योग्य दिसत नाहीं—सारांश वक्तृत्व हा आमोलिक गुण वक्त्यास दुर्मिळ भूषणा प्रमाणें आहे.

वक्तृत्वाचे मुख्य प्रकार तीन गणिले आहेत. जेव्हां वक्त्याच्या मनांत लोकाचें मन संतोषित करण्यावांचून दुसरा हेतु नसतो तेव्हां त्याचें वक्तृत्व पहिल्या प्रकारचें होतें. अशा भाषणांत अर्थापेक्षां शब्दलालित्यादि गोष्टी फार असतात. एखाद्या मंडळीच्या वार्षिक समारंभासाठीं मुद्दाम तयार करविलेलीं व्याख्यानें, राजांची अथवा सरदारांची मर्जी संपादण्यासाठीं बनविलेलीं मानपत्रां या तोलाचीं बोलणीं इत्यादिकांत हा वक्तृत्वाचा प्रकार मुख्य असतो. हा प्रकार प्रसंग पाहून बेताबेतानें योजला असतां त्याच्या आधारानें थोरांचें मन रंजवितां कांहीं महत्वाच्या गोष्टी त्यांच्या मनांत घुसवितां येतात.

ह्या प्रकारचें भाषण द्वेषादिकांस कारण नसतें. दुसऱ्या प्रकारच्या वक्तृत्वांत वक्त्यास कांहीं अर्थ संपादनाचा व आत्मकल्याणाचा हेतु असतो, आणि तिसऱ्या प्रकारांत लोकांचे मनावर एखादा ठसा उठवून त्या पासून सार्वजनिक कल्याण साधावयाचें असतें. लोकांची विषयाचे संबधानें समजूत घालून त्यांस आपले मतास मिळवणें हा वक्त्याचा मुख्य हेतु असतो. हा हेतु सिद्धीस जाण्यास वक्ता फार कुशळ पाहिजे. त्याणें स्वमत सिध्यर्थ उपयुक्त पुरावे मोठ्या खुबीनें आपले भाषणांत दर्शित केले पाहिजेत. इतकेंच नाहीं तर ज्यांपुढें आपण बोलतों त्यांच्या शंका सहाजिक कशा उत्पन्न होतील ह्याचा तर्क पुढें जें बोलावयाचें त्यावरून करून त्या शंका उद्भवतात न उद्भवतात इतक्यांतच आपण होऊन त्यांचें निरसन करावें लागतें. असें केल्यानें कदाचित एखादि शंका निघाल्यास ती ऐकणाराच्या मनांत फारवेळ टिकत नाहीं.

ह्याप्रकारचें उत्तम भाषण करितां येण्यास विषयाची उत्कृष्ट माहिती असून तो विषय लोकांच्या मतें कसा समजला जातो हें स्पष्ट माहीत असलें पाहिजे. जी गोष्ट खरी करावयाची तिच्यासारखी अथवा तिच्या अगदीं विरुद्ध पूर्वीं कधीं घडलेली आहे किंवा कसें हें समजण्यास ऐतिहासिक ज्ञानाची गरज आहे. दोन पक्ष्या झाल्या ह्मणजे एकीचा दुसरी पाडव करितांना ह्या प्रकारच्या वक्तृत्वाचा आधार धरून असते. धर्मप्रकरणीं सिद्धांत ठरविणारे पंडीत, व्याकरण न्यायादि विषयांची चर्चा करणारे शास्त्री, न्यायाधिशापुढें वादी प्रतिवादी तर्फे भांडणारे वकील ह्यांचें वक्तृत्व ह्याच प्रकारचें असतें. ह्यांत अर्थगांभीर्य मुख्य असलें पाहिजे. न्यायाधिशास गोड गोड शब्दांच्या माळा कितीही घातल्या तरी त्यांच्या गंधानें त्याचें मन मोहित होणार नाहीं. योग्य प्रमाणांनीं त्याचें मन बंधांत आणून शेवटीं खात्रीखालीं दडपून ठेविलें पाहिजे. हें

काम सामान्य नाहीं. असें भाषण करितां येण्यास जीभ वळवावी लागते. वर्षानुवर्ष अभ्यास करावा लागतो—तिसरा प्रकार सर्वांत श्रेष्ठ होय. ह्या प्रतिच्या भाषणांत पहिल्या प्रकारांतलें शब्दसारस्य, दुसऱ्यांतलें अर्थ गांभीर्य व प्रमाणपूरण हीं साधून शिवाय मनोवेध कला व इछिलेल्या मार्गी तात्काळ वर्तण्यास प्रवृत्त करण्याची वेळ साधावी लागते. जेव्हां वक्त्याच्या भाषणांत हे सर्व गुण पूर्ण असतात तेव्हां श्रोत्यांचीं मनें त्याच्या केवळ स्वाधीन होतात. तो ह्मणतो त्यानें त्यांची खात्री होते. त्यांचें मनोरंजन होतें. भय, दुःख, शोकादी जे जे विकार त्याच्या मनास होतात ते ते त्यांच्याही मनास घडतात. ज्याची तो स्तुती करतो त्याची तेही स्तुती करतात. ज्याशी हेळणा करितो, त्याची हेळणा करितात. शेवटीं तो सांगेल त्या रितीनें वागण्यास ते कांकू करीत नाहींत. काय अंमल हा? काय जिभेची शक्ती ही! तरी ह्यांत कांहीं चटक नाहीं. अशा वक्त्याचें मन त्याच्या शब्दद्वारा दुसऱ्यांच्या मनांत मिळून एक रूप होतें. हें वक्तृत्व सर्वांत बिकट पण सर्वांत उत्तम ह्मणून मानिलें आहे. असले वक्ते फार विरळा. ह्मण आहे, "वक्तादशसहस्रेषु" ह्या ह्मणींत दश लक्षेषु ह्मटलें तरी शोभेल. हल्लीं वक्तृत्व हा शब्द सर्वतोमुखीं असल्यामुळें ती कला सोपी, फावल्या वेळीं शिकावयाची असें पुष्कळांस वाटतें पण तसें खचित नाहीं ती आपणास यावी असा ईश्वरी संकेत असला तरी तिच्यासाठीं सर्व आयुष्य खर्चावें लागतें.

प्राचीनकाळीं हिंदुस्थानांत प्रसिद्ध कवि, जोतिषि, गणिती वगैरे कोण कोण होऊन गेले त्यांचीं नांवें आबालवृद्धांस विदित आहेत परंतु प्रसिद्ध कोण झाला किंवा पूर्वी वक्तृत्व कला पूर्णतेस आली होती कीं नाहीं ह्याविषयीं लोकांच्या तोंडीं गोष्टी नाहींत, तथापि एतद्देशीय राज्यांच्या छायेस हरएक विद्या व कला निवांतपणें पक्कदशा पावत

होत्या तेव्हां त्यांबरोबर ही कला वाढली नसेल असें ह्मणतां येत नाहीं श्रीमच्छंकराचार्यांनीं बौध्य व जैन धर्माचा अवाढव्य विस्तार झाला असतां व तीं मतें स्थापित करण्यास शतावधि पंडित मांडी ठोकून बसले असतां त्यांस कुंठित करून वेदोक्त धर्म स्थापित केला. ह्या कामांत वादविवाद करते वेळीं वक्तृत्वाचें फारच प्रयोजन पडलें असेल व त्यावांचून हें काम झालेंच नसेल. त्या काळच्या दोन्ही पक्षांतील ज्ञाते मंडळीच्या ब्रह्मादि गहन गहन विषय संबंधीं मवती न मवती च्या गोष्टी ह्या काळीं शास्त्री मंडळीच्या तोंडून ऐकिल्या ह्मणजे पूर्वोक्त आचार्य, गुरुगोविंदादि विद्वान महान वक्ते असतील असा आमचा तर्क होतो. मनूनें नेम शास्त्र तयार करून कदाचित् राज सत्तेच्या आश्रयानें लोकांत त्याचा प्रसार केला असेल तरी तें शास्त्र उत्तम ठरे तावत्काल पर्यंत मनूस वक्त्याचें काम क्वचित करावें लागलें असेल. शिवाय पूर्वी कोणी महान विद्वान् झाला ह्मणजे दरएक विषयावर वाद करण्यास पंडितांनीं यावें ह्मणून भर दिवसा टेंबे लावून फिरावें अशी चाल होती व अशा विद्वानांची कीर्ति सर्व भरतखंडांत गाजत असे ह्मणून ती मिळविण्यास विद्वान फार झटत इत्यादि गोष्टी पुष्कळांस विदीत आहेत. ह्यावरून सहज अनुमान करितां येईल कीं, आपलें मत स्थापित करिते वेळीं वक्त्याच्या आंगीं जे गुण अवश्य लागतात ते गुण वरील पंडितांमध्यें पूर्णपणें वागत असत. मग वरील गोष्टी ज्याकाळीं झाल्या त्या काळामध्यें व सांप्रत काळामध्यें हजारों वर्षांचें अंतर आहे, शिवाय त्या वेळीं लघुलिपि व छापण्याची युक्ति निघाली नसल्यामुळें त्या वेळच्या वक्त्यांचीं भाषणें आज उपलब्ध नसावींत असें वाटतें. तात्पर्य संस्कृत भाषा प्रचारांत असतां ही कला बरीच वाढली असावी असा आमचा अजमास आहे. ह्याच काळांत आशियाखंडांतील इतर देशांतहि ही कला होती असा सुगावा लागतो. कदाचित तिच्या प्राप्तीसाठीं शाळा घातल्या नसतील

व सर्व व्यासंग सोडून लोक तिच्यामागें लागले नसतील तरी स्वाभाविक गोष्ट कधींना कधीं बाहेर पडतेच. लोकांत बोलण्याचे प्रसंग बहुतांस वारंवार आले असतील व अशा रीतीनें ईश्वरदत्त सुवाचयतेस सहजच पुरण पडून तिला चांगलें रूप आलें असेल. मुसलमानी धर्माची स्थापना करणाऱ्या महंमदानें आरब लोकांस तो धर्म पाळण्यास प्रवृत्त केलें इतकेंच नाहीं तर त्या पंथाचें रक्षण जिवांत जीव आहे तावत्काळ ते करीत इतकें त्यांचे महत्त्व त्यांच्या मनांत बिंबवून दिलें. त्यानें ही गोष्ट काय पैशानें करून घेतली असेल? तरवारीच्या बळानें ह्मणावें तर त्याचा नुकताच उदय होत असतां हजारों लोक केवळ त्याच्या उपदेशानेंच रंगून स्वखुशीनें त्याचे दास बनले असें इतिहासकार ह्मणतात. महंमदाच्या तरवारीच्या पूर्ण अमलांत व त्या नंतर महंमदी धर्माचे जे बादशाह झाले त्यांनीं आपल्या मतास शस्त्रांनीं बळकटी आणली असेल तरीं प्रारंभीं या कामास जिभेचेंच साह्य लागलें असावें. तात्पर्य महंमदाच्या अंगीं वक्तृत्व असलें पाहिजे असें आह्मांस वाटतें. व हें खरें असल्यास येशू ख्रिस्त आणि त्याचे पाल आदि अनुयायी यांसहि वक्ते कां ह्मणूं नये? पूर्वोक्त पुरुषांचें वक्तृत्व सांप्रत काळीं कोणत्या रीतीचें मानलें गेलें असतें हें सांगवत नाहीं. पण वर सांगितलेल्या तिसऱ्या प्रकारच्या उत्कृष्ट वक्तृत्वानें हल्लीं होणारीं कामें त्यांच्या वक्तृत्वानें प्राचीन काळीं ज्या अर्थीं झालीं त्या अर्थीं सध्याच्या काळच्या संबंधानें जरी ते उत्तम वक्ते ठरले नाहींत तरी ते त्या काळचे उत्तम वक्ते होते असें ह्मणतां येईल. प्राचीन काळीं ग्रीक व रोमन लोकांत बहुत वक्ते होऊन गेले. या लोकांत ही कला मेहनतीनें शिकत असत. आणि ती साध्य होण्यास अभ्यास करावा लागतो ह्मणून आह्मी वर सांगितलेंच आहे. आतां कोणा मनुष्यानें यत्न केला असतांहि जरी त्यांस ती साधत नाहीं. तथापि त्याचे यत्न सर्वथैव निर्फळ होत नाहींत हें खचित आहे

कित्येक ठिकाणीं तर निराळ्या शाळाच घालून तेथें ह्या कलेच्या निरनिराळ्या प्रकारचा विद्वान अभ्यास करीत. ह्या दोन्ही लोकांचीं राज्यें प्रजासत्तक होतीं ह्यास्तव लोकांच्या आवडींतल्या मनुष्यास राज्यांतील मोठे मोठे हुद्दे मिळत. ह्या करितां लोकांची मर्जी संपादण्यास जसे सत्य सौंदर्यादी गुण लागत तसाच हाही गुण अवश्य लागे. ह्यामुळें लोकांस गोडी सहज लागून शेवटीं त्यांस तो चांगला साधला. ग्रीक लोकांत जे बहुत वक्ते झाले त्यांत डिमस्थनीस नामें फारच विख्यात झाला. हा लहान असतां दुसऱ्या एका वक्त्याचें भाषण ऐकावयास गेला. तें ऐकतांच त्यास वाटलें कीं, आपणही अशा रीतीनें बोलावयास शिकावें. कांहीं दिवस अभ्यास करून तो लोकांपुढें उभा राहिला पण आपणाशींच बोलणें ह्यांत भेद फार आहे. मोठा समाज पहातांच तो गांगरला. त्याच्या तोंडांतून शब्द निघेना. लोक हसूं लागले. तेव्हां फार लाजेनें तेथून तो निसटून गेला आणि दम न सोडतां शक्ती वाढवून पुढें मोठ्या प्रसिद्धीस आला. ह्या गोष्टीवरून मुळचे सर्वच भित्रे मनुष्य केवळ अभ्यासानें डिमास्थनीस बनतील असें ह्मणवत नाहीं तरी मेहेनतीनें बरीच मदत होईल हें खचित. असो, ग्रीसचा जसा हा वक्ता तसा रोमचा सिसरो. ह्या दोन्ही वक्त्यांचीं भाषणें मूळ भाषेंत उपलब्ध आहेत— अर्वाचीन काळीं इंग्लंड फ्रान्स युनायतेद स्टेट्स वगैरे स्वतंत्र राज्यांत बरेच वक्ते झाले व पुढें होण्याची आशाही आहे. अमेरिकेंत प्रजासत्ताक राज्य असल्यामुळें सिसिरोच्या तोलाचे वक्ते होण्याचा संभव दिसतो. पण आशिआ खंडांत कोणी झाला असें ऐकिवांत नाहीं. त्यांत मुख्यत्वें हिंदुस्थाना विषयीं विचारलें पाहिजे. हरिदास पुराणिकादि वक्ते बहुत सांपडतील पण आलिकडे बोलण्याचे जे मार्ग शिक्षित लोकांस पसंत वाटतात त्या मार्गानें त्यांचीं भाषणें होत नाहींत. बिकट प्रसंगीं लोकांची एखाद्या गोष्टीची खात्री करून देण्यास टाळ मृदंग व एक

देशीय आणि कोर्तीं कविता पुरी पडेल असें वाटत नाहीं. इंग्लंदांतील पार्लमेंन्टा सारखीं वक्तृत्वास उत्तेजक ठिकाणें अद्याप नाहींत व पर राज्याच्या दराऱ्या खालीं वक्तृत्वांतील मुख्य गोष्ट जी निस्पृहता ती दाखविण्यास चांगली सोय नाही. हीं दोन कारणें हिंदु लोकांस ह्या कलेचा अभ्यास करण्यास धीर देत नाहींत.तरी आज दहापांच व र्षांत लोकांच्या मनांत जो बदल झाला आहे तो वाढत गेल्यास, भा षणाच्या कामीं हिंदुलोक खालीं माना कधींही घालणार नाहींत असा अह्मांस पूर्ण भरंवसा आहे.

उत्तम भाषण करितां येणें हा मोठा गुण आहे इतकें एकदां कबूल केलें ह्मणजे त्यापासून लाभ होतील कीं नाहींत हा प्रश्नच अमळ वां कडा दिसतो. कारण गुण आणि दोष हे शब्द अनुक्रमें हित आणि अनहित ह्यांशीं निरंतर संगत धरून असतात. जी गोष्ट अंगीं अस ल्यानें ह्या लोकीं अगर परलोकीं हित होईलसें दिसत नाहीं अशा निरूपयोगी गोष्टीस गुण कोण ह्मणणार आहे? तेव्हां गुण ह्मटलें ह्मणजे त्यापासून हित अवश्य असलें पाहिजे. लाभ आणि तोटे दोन प्रकारचे आहेत, ऐहिक आणि पारलौकिक. ऐहिक लाभ ह्मणजे ह्या संसारांत असतां मनुष्यास ज्याज्या योगानें शारिरिक किंवा मानसी- क सुख प्राप्त होतें ते. व तोटे ह्मणजे ज्यापासून दुःख उत्पन्न होतें ते. पारलौकिक लाभालाभ ह्मणजे मेल्यानंतर ज्या स्थितींत आपण जाऊं असें आह्मांस वाटतें त्या स्थितींत होणारे ते. ज्यांस परलोक किंवा अन्यस्थिती आहे असें वाटत नाहीं त्यांचा ह्या दुसऱ्या प्रकाराशीं संबंधच नाहीं. पण अशी गोष्ट कोणती आहे कीं तिजपासून होणा ऱ्या परीणामांनीं निरंतर हितच होतें? तर हितावह गोष्ट अथवा गुण ह्मटलें ह्मणजे इतकेंच समजावयाचें कीं रीतीनें योजिल्यास त्या गोष्टी पासून अनहित होत नाहीं अथवा होणाऱ्या अनहिता पेक्षां हित विशे ष होतें. हा अर्थ प्रत्येक विद्येस लावितां येतो. तेव्हां वक्तृत्वा पासून

लाभ होतात ह्मटलें तर त्याचा अर्थ त्यापासून सर्वच लाभ होतात अथवा तोटचा पेक्षां लाभांची संख्या जास्त आहे असा समजला पाहिजे. वक्तृत्वा पासून जितके फायदे होतील तितके जास्त तोटे; रीतीनें त्याचा उपयोग करावा त्या रीतीवर आवलंबून आहे. विस्तव गुणी पदार्थ आहे पण तो शाहण्याच्या हातीं असतां आगबोटी चालून अन्नादि शिजून जो फायदा होतो त्याच्या शतपट नाश ता मूर्खाच्या हातीं असतां गांवाला आग घातल्यानें होतो. तेव्हां वक्ते होणारे लोक सूज्ञच होतील असें कल्पून पूर्वोक्त कलेच्या तोटचाचें निरूपण नकरितां लाभच सांगितल्यास बरें दिसेल. वक्तृत्वा पासून पारलौकिक लाभ फारसे नाहींत असें प्रथम वाटतें खरें तरी मनुष्य मात्राचें ऐहिक कल्याण त्याच्या योगानें वाढविलें ह्मणजे त्यांतच कर्तव्य केलेंसें होऊन पारलौकिक लाभ आपणाकडे येण्यास मोठा मार्ग होतो. योग्य रीतीनें उपयोग केल्यास ह्या कले पासून ऐहिक हितें अनेक प्रकारचीं होतात. वक्त्यास हरएक प्रकारचें जगाचें ज्ञान अवश्य लागतें व हें ज्ञान देशांतील बहुतेक लोकांस असावें तसें प्राप्त करून घेण्यास अवकाश अथवा मार्ग नसतात. ह्यामुळें देशावर येणारीं संकटें त्यांस कळत नाहींत व एकदां आलीं ह्मणजे त्यांचें निरूपण कसें करावें हें त्यांस सुचत नाहीं. अशा वेळीं त्यांस उत्तम उपदेश केला व एखादा हितावह उपाय त्यांस समजून सांगितला ह्मणजे तीं संकटें टाळण्यास ते यत्न करूं लागतात. व टाळण्यासारखीं नसल्यास त्यामुळें होणारी अडचण कसी तरी दूर करण्यास ते सरसावतात. असें झाल्यानें देशास काय लहान हित होतें? अशा कृत्यांचीं उदाहरणें प्रत्येक इतिहासांत दृष्टीस पडतात तीं सांगून येथें पाल्हाळ करीत नाहीं. निरनिराळया लोकांत सार्वजनिक अवश्यकता निरनिराळया तऱ्हेची असते, हिंदुस्थानांत सांप्रत पुष्कळ गोष्टींची अवश्यकता आहे. लोकांत एकी, देशाभिमान, वर्चस्वाची इच्छा, स्वधर्म निष्टा, सदाचरण, इत्यादि गुण

वाढतील तितके कमीच आहेत. आपल्या लोकांत भलभलते समज कोठें कोठें आहेत ते काढून टाकिले पाहिजेत. शिवाय दुष्काळा सारख्या अकस्मात होणाऱ्या अडचणी तर कधीं येतील याचा मरंव सा नाहीं. त्या योगानें होणाऱ्या दुःखांचा परीहार करण्यास सध नापाशीं गरीबांची वकिली केल्यावांचून कोण करील? तसेंच वर सां गितलेल्या सद्गुणांचा त्वरीत प्रसार करण्यास वक्त्या सारखा दुसरा कोण समर्थ आहे? ह्या गोष्टी आपल्या लोकांत वक्तृत्वाच्या साह्यानें सुरु झाल्या ह्मणजे त्या कलेच्या महत्वाची किंमत कोण करील? हे लाभ मुख्यत्वें तिसऱ्या प्रकारच्या वक्तृत्वानें होणारे आहेत. हे लाभ सार्वजनिक असल्यामुळें त्या प्रकारास ज्ञाते फारच मौल्य वान समजतात. शिवाय दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारांपासून फायदे बहुत आहेत. वकिलांची बढती मुख्यत्वेंकरून कशानें होते? आंधळयाला जशी काठी तसें वकिलांला व इतर वादकांस वक्तृत्व आहे असें आह्मीं समजतों. खरें मत स्थापित झाल्यापासून त्वरित लाभ झाला तरि त्याच्या अंगत्वें पुष्कळ हित होत असेल. आतां प्रत्येक लाभ निर निराळा घेऊन मारूड लिहिण्यांत अर्थ नाहीं. ह्मणून सदरहू कला फार हितकारी आहे व ती प्राप्त करून घेणें अत्यंत हितकारक आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. वक्तृत्वाचे योगानें मनुष्यांचे मनांत असलेले विचार बदलून नवीन विचार त्यांच्या अंतःकरणांत शिरवितां येतात. उत्तम वक्त्याचें भाषण ऐकून मोठे विद्वान लोकहि स्वमतें सोडून वक्त्याचे मतास अनुसरतात. महा पराक्रमी अर्जुनाची गोष्ट सर्वांस ठाऊक आहेच. समरांगणांमध्यें आप्तादि लोकांस पाहून त्याचे चित्ताला जेव्हां मोह उत्पन्न झाला व हातांतील धनुष्य त्यानें खालीं ठेविलें तेव्हां कृष्णानें आपल्या वाक् प्रसादानें त्याच्या चित्तांत पालट करून त्यास युद्धा विषयीं उत्तेजित केलें. त्या बरोबर अर्जुनानें अनेक विरांचा पराभव केला.

प्रकृत विवेचनावरून वक्तृत्वाची किती अवश्यकता आहे हें सहज लक्षांत येईल. वक्तृत्वाचे योगानें अनेक तऱ्हेचे इहपरत्र लाभ आहेत. आतां कित्येक दुराग्रही व मतलबी लोक आपल्या वक्तृत्वशक्तीनें लोकांचीं मनें असन्मार्गास प्रवृत्त करितात असा केव्हां केव्हां अनुभव घडतो व यामुळें वक्तृत्व जसें हितपरिणामी आहे त्याचप्रमाणें यापासून अनहित होण्याचा संभव आहे असें कबूल करणें भाग पडेल ह्मणून वर सांगितलेंच आहे. पण येथें इतकी गोष्ट मात्र लक्षांत ठेविली पाहिजे कीं, जे वक्ते आपल्या वाग्देवतेच्या प्रसादानें लोकांस भलभलत्याच मार्गास लावून वक्तृत्वशक्तीचा अकलंकीपणा भ्रष्ट करितात असें लोकांस वाटतें ते खरोखर आपला मात्र उपहास करून घेतात. ह्मणजे वरील दोष हा वक्तृत्व गुणाचा नसून वक्त्याचा अप्रयोजकपणाचा होय. कोणत्याही कृत्याला योजक उत्तम पाहिजे ह्मणून जो विद्वन्मान्य सिद्धांत आहे, तोच या वक्तृत्वगुणासही लागू पडतो. एखादें रसायण फार उत्तम आहे असें समजा, पण वैद्यानें जर भलत्याच रोगावर किंवा प्रमाण सोडून त्याची योजना केली तर त्यापासून काय परिणाम होईल? त्या औषधीपासून रोग्याला गुण तर येणार नाहींच, पण त्याच्या जिवाची मात्र हानी होईल. पण हा दोष त्या रसायनाचा नसून वैद्याचा होय. तसाच प्रकार वक्तृत्वाचा आहे. वक्तृत्वाचा विषय ज्या योग्यतेचा असेल त्या प्रमाणें श्रोत्यांच्या अंतःकरणावर त्याचा ठसा उठतो. उत्तम वक्ता 'राजभक्ति' या विषयावर व्याख्यान देऊं लागला तर सरकाराविषयीं प्रजेचे मनांत जें प्रेम व जी भक्ति उत्पन्न करील, त्याच्याच विरुद्ध 'राजद्रोह' या विषयावरील व्याख्यानांत प्रकार दृष्टीस पडेल. दुसरा विषय त्याणें हातीं धरतांच सरकाराविषयीं प्रजेचे मनांत अविश्वास व तिरस्कार उत्पन्न करून तो त्यांस एका क्षणांत बेदील करून सोडील तेव्हां हा विरुद्ध परिणाम वक्तृत्वशक्तिचा नसून विषयाच्या अप्रयोजकतेचा होय. तेव्हां या विषयीं सारासार विचार करणें अवश्य आहे.

---

# स्वात्मानंद

(मा० अं० व० पु० चा०)

जग निर्जीव पाहातसे ॥ आत्मरूपीं राहातसे ॥
निजानंद भोगीतसे ॥ विकारदशे लोपोनियां ॥ ६४ ॥
कल्पनेचें जें कां मूळ पाहें ॥ तें आपणचि साक्षित्वें वर्तताहे ॥
जेंथ कल्पनाची मावळताहे ॥ ते भोगीताहे उर्वरीत ॥ ६५ ॥
अधीक कासया बोलणें ॥ निजात्मस्वरूप जाणणें ॥
आत्म ज्ञान तया ह्मणणें ॥ सदैव रमणें निजानंदीं ॥ ६६ ॥
ऐसा हा निजहृदईंचा विनोद ॥ तुज कथन केला बोध ॥
जेथ च्यारी वाचा होत स्तब्ध ॥ कृतिवीण आनंद इंद्रीयांच्या ॥६७॥
हा स्वात्मानंद निज ग्रंथ ॥ कथिला शुद्ध परमार्थ ॥
अनुभवोनि येथींचा अर्थ ॥ निज कार्यार्थ साधावा तो ॥६८॥
ग्रंथ विस्तार वाढवावा ॥ तरी नावडे महानुभावां ॥
जे अज्ञानजनाचा भ्रांतिगोवा ॥ ज्ञानसद्भावा फेडीती जे ॥६९॥
पंचब्रह्म प्रणवाकार ॥ विस्तारला सविस्तर ॥
ऐकात्मते अनुभवीं साचार ॥ तोचि ईश्वर जाणावाकीं ॥ ७० ॥
तेचि हे पंच उल्हास ॥ धरूनि भक्ती भाव रस ॥
जे श्रवण करिती निर्दोष ॥ निजात्मा परेश पावती ते ॥ ७१ ॥
पंच उल्हास पंच ब्रह्म ॥ येथें येकचि नांदे पुरुषोत्तम ॥
आदी अंत मध्य उगम ॥ जाणती उत्तम तेचि ज्ञानी ॥७२ ॥
त्वंपद तत्पद शोध कळला ॥ असी पदीं ऐक्य जाहाला ॥
लक्षातीत अलक्ष पावला ॥ निजात्मकळा पूर्ण तेचि ॥ ७३ ॥
जाणीव नेणीव ग्रासिता ॥ आत्मकळा स्फुरद्रूपता ॥
येकचि भासे तत्वता ॥ देहात्मता नुरवीचि ॥ ७४ ॥

ज्ञेय ज्ञाता ज्ञान ॥ ध्येय ध्याता ध्यान ॥
नुरे त्रिपुटीचें भान ॥ अद्वयघन निजानंद ॥ ७५ ॥
भक्ति प्रतापेंचि करूनी ॥ सर्व भूतिं आत्मा जाणुनी ॥
निवाला तो निजात्मध्यानीं ॥ विस्तार वचनीं काय बोलों ॥७६॥
शके सत्राशें शाहात्तर ॥ आनंदनाम संवत्सर ॥
चैत्र शुद्ध मनोहर प्रतिपदा बुधवार॥ते दिवशीं ॥७७॥
रेवती नक्षत्र निश्चयेसीं ॥ प्रथम प्रहर परियेसी ॥
ग्रंथवाणी परमात्मा ऋषीकेसी ॥ त्याची तयासी निरोपिली ॥७८॥
नमन संतसज्जना ॥ मज कृपा करावी दीना ॥
हेचि तुम्हाप्रति प्रार्थना ॥ आपुलें म्हणा मजप्रति ॥ ७९ ॥
इति स्वात्मानंद लिखीते ॥ श्रीपूर्णदास विरचिते ॥
निजात्मस्वरूपवर्णनं ॥ नाम पंचम उल्हासः ॥ ॥ ५ ॥
एवं ग्रंथ ॥ ४०९ ॥ ॥ ५ ॥ ॥ ५ ॥ ॥ ५ ॥

समाप्त.

# पद

रामचंद्र कविचकोर चंद्र वंदिला ॥ धृ० ॥ रामचंद्र धरूनि मनीं ॥ कामजनित ताप हरूनी ॥ कामनाविहीन पूर्ण ॥ धामपदारूढपणें ॥ या मनासि काम नाणिला ॥ रामराम जप जपोनि दोष खणिला ॥ हा महा भवांबुनिधी बा उलांडिला ॥ रामचंद्र ० ॥ १॥ हे कृपाळ हे दयाळ ॥ हे सुशीळ सरसशीळ ॥ हे विशाळ हे सुमंगला ॥ निशिदिनीं हृदयीं जपोनि कोमला ॥ चरण धरूनि शरण मी तुज घन:शामला ॥ रामचंद्र ० ॥२॥ नको -मुख प्रमुख कर्म ॥नको लौकिकादि धर्म॥ जोडतसे महा शर्म॥ सांपडलें येक वर्म॥गुरुकृपें मला॥याचि रिती आह्मा निज ध्यास लागला ॥ ह्मणुनि विहित असे हाचि मार्ग चांगला ॥ राममचंद्र ० ॥ ३ ॥ जयजय रघुवीर ॥ असा घोष करिती वीर ॥ याचि रवें पडे नीर ॥ यमदमादि कांस धीर ॥ नव्हे ह्मणुनि नुरति यातना ॥ दुरित जाय नाम घेतां वदनकेतना ॥ आनंदतनय नमन करी फणींद्रकेतना ॥ रामचंद्र ० ॥ ४ ॥

# पद

पांडुरंगाचे पाय ॥ पाहूं चला रे ॥ धृ ॥
नामबळें त्रैलोक्य जिंकूं॥करूं काळावरी हल्ला रे ॥ पां० ॥ १ ॥
निमिष असें हें बहु मोलाचें ॥ टपतो रविचा पिलारे॥ पां०॥२॥
दशवदनादिक गर्व गेले ॥ कां उगले तुह्मी भुला रे ॥ पां ॥ ३ ॥
आदि नारायण कोटिकृपेनें ॥ नरदेह तुह्मा दिला रें ॥ पां ॥ ४ ॥

दा. क्र. 14783
वाई जि. सातारा

## पद

पंढरपूरपती विठोबारे ॥ धृ० ॥
सांडुनियां अभिमान निरंतर ॥ लोक तिन्ही जपती ॥ १ ॥
पदपद्मातळीं योगविद्या ॥ येकसरें लपती ॥ २ ॥
उद्धवचिद्धन रुक्मिणीरमणा ॥ शेषाच्या सुपती ॥ ३ ॥

## पद

गेली हुरहुररे मनाची ॥ धृ० ॥
बसतों ऐशा स्थळीं कीं मज ॥ कोणी न ह्मणे उठरे ॥ १ ॥
निर्विकल्प चिन्मात्र मी कां करूं ॥ शाब्दिक पुटपुटरे ॥ २ ॥
तुप रोटी भाकर भाजी ॥ खातों मुठमुठरे ॥ ३ ॥
कोंकिळ बोले स्थिर मी कोठें ॥ जाऊं लुटलुटरे ॥ ४ ॥

## पद

विलंब न लावी न लावी ॥ झडकरि स्वरूप दावी ॥ धृ० ॥
दीनानाथ गिरिजे ॥ ब्रीद सत्य करावें तुळजे ॥ वि० ॥ १ ॥
तुझिया भेटी साठीं ॥ बळकट प्राण धरिला कंठीं ॥ वि० ॥ २ ॥
आदिनारायण तान्हा ॥ तूं माय कृपेचा दे पान्हा ॥ वि० ॥ ३ ॥

## पद

उघड हरी कीर्तनीं सांपडशी ॥ धृ० ॥
उमगिता नुमगे सदाशिवा ॥ श्रुती शास्त्रें दडशी ॥ उ० ॥ १ ॥
अष्टांगादिक योग महा तप ॥ तेथेंहि नातुडशी ॥ उ० ॥ २ ॥
उद्धवचिद्धन नाचतो कीर्तनीं ॥ त्या अंगें दडशी ॥ उ० ॥ ३ ॥